# यशवंतराव चव्हाण

## आठवणी-आख्यायिका

लक्ष्मण माने



3.60954
6
Y.C.P
M 923.60954/MAN
022886
LIBRARY

# यशवंतराव चव्हाण
# आठवणी–आख्यायिका

# यशवंतराव चव्हाण
# आठवणी–आख्यायिका

लक्ष्मण माने

Y. B. CHAVAN LIBRARY
- MUMBAI -
CALL NO.
ACC. NO.: 22886
D 27/3/2015

ग्रंथाली

ग्रंथाली प्रकाशन क्रमांक ५२१

ISBN No. 978-93-80092-21-8

**यशवंतराव चव्हाण : आठवणी–आख्यायिका**
लक्ष्मण माने

पहिली आवृत्ती २५ फेब्रुवारी २०१३

© शशी माने
समता, १०, ब, करंजे,
सातारा–४१५००१

प्रकाशन
ग्रंथाली
वुलन मिल म्युनिसिपल स्कूल,
तळमजला, जे.के. सावंत मार्ग,
यशवंत नाट्यमंदिराशेजारी,
माटुंगा (प.), मुंबई ४०००१६
दूरध्वनी : (०२२)-२४२१६०५० / २४३०६६२४
granthali02@gmail.com

मुखपृष्ठ : सुभाष अवचट

अक्षरजुळणी : ग्रंथाली संगणक विभाग

मुद्रण
इंडिया प्रिंटिंग वर्क्स,
इंडिया प्रिंटिंग हाऊस,
४२, जी. डी. आंबेकर मार्ग,
वडाळा, मुंबई ४०० ०३१

**मूल्य २५० रुपये**

यशवंतरावांनी जिला मुलगी मानले,
जिचे माहेरपण केले
त्या शशीला प्रेमपूर्वक

# मनोगत

माझ्या जडणघडणीमध्ये तथागत गौतम बुद्ध, म. जोतिराव फुले, राजर्षि छत्रपती शाहू महाराज आणि बोधिसत्त्व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा फार मोठा प्रभाव आहे. आणखी दोन माणसे, जी मी एकही दिवस विसरू शकत नाही, ज्यांनी माझे जीवन घडवण्यासाठी, माझ्या व्यक्तिमत्त्वाला आकार देण्यासाठी मला प्रेमाने आपल्याबरोबर राहू दिले त्यात एस.एम. जोशी आणि आदरणीय यशवंतराव चव्हाणसाहेब यांचा फार मोठा वाटा आहे. चव्हाणसाहेबांच्या या जन्मशताब्दीच्या निमित्तानं मी पाहिलेले, ऐकलेले, वाचलेले यशवंतराव, मला भावलेले यशवंतराव इतरांनाही सांगावेत म्हणून हा लेखनप्रपंच केला आहे. वाचकांना तो भावला, यशवंतरावांच्या संबंधी त्यांचे कुतूहल जागृत झाले आणि साहेबांचे आयुष्य वाचक समजावून घेऊ शकले किंवा ते समजावून घेतले पाहिजे इतकी जरी वाचकांमध्ये जाणीव निर्माण झाली तरी माझे हे लेखन सार्थकी लागले असे मी समजेन.

यशवंतराव दलित साहित्याचे स्वागत करतात, समर्थन करतात. दलित उपेक्षितांच्या राजकीय हक्कांना सामाजिक बळ न लाभल्याने आपल्या समाजजीवनात जो विसंवाद, संकुचितपणा निर्माण झाला आहे त्याची दलित साहित्य ही अपरिहार्य फलश्रुती आहे असे ते मानत असत. दलित साहित्यिकांनी मराठी साहित्यक्षेत्रात मोलाची भर घातली आहे. उच्चभ्रू साहित्याचे किंवा त्यांच्या संकल्पनांचे मानदंड लावून दलित साहित्याला जोखणे बरोबर होणार नाही. उच्चभ्रू साहित्यात पाश्चात्त्य वळणाची अश्लिलता आपल्याला चालते, मात्र दलित साहित्यातून

येणारी भाषा आपल्याला चालत नाही. तिच्या शुद्धाशुद्धतेची आपण टवाळी करतो. नाके मुरडतो. हा नैतिक भेदभाव आहे. दुहेरी मानदंडाची भावना त्यामध्ये आहे असे ते स्पष्ट सांगत. (ऋणानुबंध पृष्ठ क्र.२१०) दलित साहित्याच्या भाषेला अशिष्ट व ओंगळ ठरवणाऱ्या समीक्षकांना कानपिचक्या देऊन यशवंतराव त्या भाषेचे समर्थन तर करतातच, शिवाय यातून मराठी भाषेला आणि समाजाला होणार असलेल्या संभाव्य फायद्यांचे सूचनही करतात. त्यांच्या मते भाषेचे माध्यम जर अभिव्यक्तीसाठी असेल तर तिचा सामाजिक अभिव्यक्ती हाही अविभाज्य भाग मानणे क्रमप्राप्त ठरते. हजारो वर्षे दडपल्या गेलेल्या समाजाचा पहिला उद्‌गार रूढ कल्पनेप्रमाणे असू शकत नाही. तशी अपेक्षाच अनाठायी आहे. उलट तो उद्‌गार निघाला हेच सामाजिकदृष्ट्या महत्त्वाचे असल्यामुळे आपण त्याचे स्वागत करायला पाहिजे असे ते मानत. उपेक्षित सामाजिक स्तरांच्या भावनांची कोंडी फुटून त्याचा उपयोग सामाजिक सुधारणांसाठी व सामाजिक प्रक्रियेसाठी होऊ शकेल अशी खात्री ते बाळगतात. (यशवंतराव चव्हाण राजकारण आणि साहित्य- भा.ल.भोळे, पृष्ठ १५०)

आदिवासी व उपेक्षित जाती यांची भाषा आता नव्या मराठी भाषेत येणार आहे. हे सामुदायिक चिंतन किंवा देवाणघेवाण भाषेच्या दृष्टीने उपयुक्त आहे. त्याने मराठी भाषा समृद्ध होईल. म्हणून दलित साहित्याची भाषा कदाचित वेगळी वाटेल, तरी तिचा कस, तिच्यातील रग जर नव्या मराठीत उतरली तर ती हवीच आहे. (ऋणानुबंध पृष्ठ क्र.२११)

कलावंताची तरल संवेदनशीलता, सर्जनशील प्रतिभा, शब्दशक्तीच्या समर्थ किमयेच्या क्षमतेचे परिपूर्ण भान, व्युत्पन्नमती आणि उदंड व्यासंग, साहित्याबद्दलची चोखंदळ जाण आणि साहित्य व समाज यांच्यातील अन्योन्य नात्याचे यथार्थ भान, चतुरस्त्र अनुभवसंपन्नता, आश्वासक समीक्षाबुद्धी इत्यादी दुर्मिळ गुणांचा समुच्चय यशवंतरावांच्या व्यक्तिमत्त्वात होता. त्यांच्यातल्या कलावंत लेखकाने योजलेले अनेक आराखडे मनातल्या मनातच राहून गेले. ते पुरे झाले असते तर मराठीला ललालभूत ठरेल असे वाङ्मय त्यांनी मराठीला दिले असते.

यशवंतराव चव्हाण हे केवळ महाराष्ट्राच्याच नाही तर देशाच्या राजकारणामध्ये आपला वेगळा ठसा उमटवणारे असामान्य नेतृत्व होते.

२५ नोव्हेंबर १९८४ रोजी त्यांचे निधन झाले. त्यापूर्वी अनेक प्रकारांनी त्यांचा तेजोभंग झाला होता. अनेक अवमान त्यांनी पचवले होते. कौटुंबिक दुःखाने तर त्यांच्यावर सामूहिक हल्ला केला होता. त्यांच्या जागी अन्य कुणी असता तर उन्मळूनच पडला असता. वेणूताईंच्या नंतर तर त्यांचे जीवन सत्त्वहिन झाले होते. शेवटपर्यंत ते वेणूताईंना क्षणभरही विसरू शकले नाहीत. अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत जन्माला आलेले यशवंतराव आपल्या अंगच्या अभिजात व अतुलनीय गुणांनी ध्येयनिष्ठ आणि मुल्यनिष्ठ जीवन जगले. माझ्यासारख्या सर्वार्थाने उपेक्षित असलेल्या माणसावर त्यांनी पुत्रवत प्रेम केले. शशी, भाई, समता आम्हाला त्यांच्या कुटुंबाचा भाग केले. त्यांच्याबरोबर त्यांच्या वेदना वाटून घेता आल्या नाहीत, पण आमच्या कुटुंबासोबत चार क्षण आयुष्याचे त्यांना विरंगुळा मिळाला आणि खरे तर त्याने आमचेच आयुष्य समृद्ध झाले. चव्हाणसाहेबांच्या या ऋणातून मुक्त होणे शक्य नाही.

चव्हाणसाहेबांच्या बरोबर जेवढा काळ मी काढला, जे त्यांच्याशी बोललो अशा आठवणी तर आल्याच; शिवाय मी ऐकलेल्या त्यांच्याबद्दलच्या आख्यायिका या ग्रंथामध्ये आल्या आहेत. यशवंतरावांचे व्यक्तिमत्त्व उलगडत असताना, स्वातंत्र्योत्तर काळातला सामाजिक बदलही चित्रीत करावा आणि त्यांच्या आठवणी सांगत असताना त्यांचे लोकोत्तर निर्णय तरुण पिढीपर्यंत पोहोचवता आले तर पाहावे असाही प्रयत्न केला आहे. ही पत्रे लिहीत असताना महात्मा फुल्यांचे समग्र वाङ्मय त्र्यं.ना. अत्र्यांचा गावगाडा, माधुरी पुरंदरे यांचे पिकासो, मी पाहिलेले यशवंतराव-सरोजिनी बाबर, कृष्णाकांठ-यशवंतराव चव्हाण यांचे आत्मचरित्र, यशवंतराव चव्हाण व्यक्तित्व व कर्तृत्व-गोविंद तळवळकर, सह्याद्रीचे वारे-यशवंतराव चव्हाण, भूमिका-यशवंतराव चव्हाण, यशवंतराव चव्हाण-अनंतराव पाटील, रामभाऊ जोशी यांनी संपादित केलेले यशवंत स्मृतिगंध, यशवंतराव चव्हाण-राजकारण आणि साहित्य हा भास्कर लक्ष्मण भोळे यांचा ग्रंथ, अशा ग्रंथांचा मला मोलाचा उपयोग झाला आहे.

ही पत्रे लिहीत असताना जसे काही ग्रंथांचे साहाय्य झाले तशा काही मित्रांनी अनेक आठवणी शेअर केलेल्या आहेत. त्यात माझे पत्रकार मित्र बाबूराव शिंदे, विनायकदादा पाटील, यशंवतराव गडाख,

प्रगती बाणखेले, दत्ता बाळ सराफ , रंगनाथ पठारे, अरुण शेवते, यांचा आवर्जून उल्लेख केला पाहिजे. हस्तलिखिताची पहिली प्रत अर्थातच शशी वाचत होती, अनेक सूचना करत होती. तर आपल्या सर्व कामाच्या व्यापातून वेळ काढून मनीषा पांब्रे यांनी ग्रंथाची टंकलेखनाची जबाबदारी उत्तमप्रकारे पार पाडली. या सर्व मित्रांच्या, सहकाऱ्यांच्या प्रेमळ आग्रहाने हा पत्रप्रपंच वाचकांपर्यंत पोचला. ते पोचवण्याचे काम 'ग्रंथाली'च्या सर्व मित्रांनी केले. ग्रंथाचे कव्हर माझे 'उपरा'च्या पहिल्या वाचनापासूनचे मित्र, जगप्रसिद्ध चित्रकार सुभाष अवचट यांनी केले आहे. सुभाष एक अवलिया माणूस. फार मोठा कलावंत. या ग्रंथाला त्याने मुखपृष्ठ करावे असे मला वाटले. शब्द टाकावा की नको अशा मनस्थितीत होतो. आणि म्हटलं पाहूया, तो घरातला तर आहे. आम्ही शिव्या तर एकमेकांना पूर्वीपासूनच देत आलोय. सुभाष अत्यंत दिलदार माणूस. एका क्षणाचाही विलंब न लावता त्याने मुखपृष्ठ करण्याचे मान्य केले. मी त्याचा आणि उल्लेख केलेल्या सर्वच माझ्याच माणसांचे आभार मानतो. सकाळी सकाळी लेखन सुरू असले तरी कोणासही दाद न देता मांडीवर बसून मी कसे लिहितो आहे हे पाहण्याचा हट्ट करणारी माझी नात श्रावस्ती असो की कुतूहलाने पाहणारी यशवंत, लुम्बीनी ही नातवंडे असोत, सर्वांनीच या लेखनाला प्रोत्साहित केले. कारण मी अपघातानंतर हात गमावलाच होता. तो लिहू लागला याचाच आनंद कुटुंबातल्या सर्वांना होता. या माझ्या ग्रंथाचा उपयोग वाचकांना आणि त्यातही तरुण वाचकांना व्हावा ही माफक अपेक्षा.

नव्या पिढीने बदलत्या जीवनपद्धतीबरोबरच, बदलत्या जागतिकीकरणा-बरोबर यशवंतरावांनी मांडलेला, टोकाचा उजवा आणि टोकाचा डावा या दोन्ही टोकांना सोडून, कृषी औद्योगिक समाजाचा, समाजवादाचा जो विचार मांडला तो विचार कदाचित आपल्या देशाला अधिक मार्गदर्शक ठरू शकेल. आपल्या देशाने मिश्र अर्थव्यवस्था स्वीकारली आहे. खाजगी गुंतवणूक, सार्वजनिक गुंतवणूक, शासनाची गुंतवणूक, आणि सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे सहकारातली गुंतवणूक करण्याची तरतूद केली आहे. तराजूचा काटा एका कोणाही टोकाकडे झुकू लागला की भारतीय जनता तो मध्यावर आणते. केवळ औद्योगिकीकरण आणि केवळ शेती असे न करता बुद्धांनी सांगितलेला मध्यम मार्ग स्वीकारला तर तरुण पिढीच्या पुढचे

प्रश्न सुटतील का, असाही विचार हे लिहीत असताना मनामध्ये होता. यशवंतरावांच्या आख्यायिका सातारा जिल्ह्यातल्या खेड्यापाड्यात पसरलेल्या आहेत. झोपडीपासून बंगल्यापर्यंत आमची सर्वांची घरे ही चव्हाणसाहेबांची होती. सगळ्यांच्या दुखल्याखुपल्यात घरातला बनून जगणारा एक कर्ता माणूस आज आमच्यात नाही. परंतु त्यांच्या आठवणी आणि आख्यायिका या आमच्या घराघरात आहेत. सर्व तरुण मुलांना सुप्रियाच्या मार्फत मी चव्हाणसाहेबांचा विचार सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

**लक्ष्मण माने**

समता, १०, ब,

करंजे, सातारा-४१५००१

दिनांक १४ नोव्हेंबर २०१२

पं.जवाहरलाल नेहरू जयंती

# आठवणींची साठवण

आठवणी यशवंतराव चव्हाणसाहेबांच्या आणि कथन करणारे लक्ष्मण माने. उत्तम पुस्तक होण्यासाठी आणखी काय हवे आहे? या संयोगाचा परिणाम तोच झाला आहे. एक उत्तम निर्मिती आपल्या हाती येते आहे.

यात माने यांनी शरद पवार यांच्या कन्या सुप्रिया सुळे यांना पत्ररूपाने या आठवणी सादर केल्या आहेत. खरे तर, हे कथन आहे सुप्रियाच्या पिढीसाठी. सुप्रिया निमित्तमात्र आहे.

चव्हाणसाहेबांची पिढी व सुप्रियाची पिढी यात दोन पिढ्यांचे अंतर आहे. आजोबांच्या आणि नातवांच्या पिढीत असते तसे. चव्हाणसाहेबांचे व्यक्तिमत्त्व, कर्तृत्व ऐकले आहे, पण पाहिले, अनुभवले नाही, अशी ही पिढी आहे. ते जाणून घेण्याची या पिढीला जिज्ञासा आहे. माने यांच्या लिखाणात ही जिज्ञासा शमविण्याची क्षमता आहे.

चव्हाणसाहेबांच्या सावलीत वाढलेल्या व सुप्रियाचे बोट धरलेल्या पिढीचे लक्ष्मणराव प्रतिनिधी आहेत.

यशवंतरावांचा जीवनपट विस्तीर्ण आहे व विविध पैलूंनी नटलेला आहे. त्यातील काही काळ व काही पैलू माने यांच्या वाट्याला आले आहेत. ते त्यांनी अत्यंत संवेदनशील मनाने टिपले आहेत व पत्ररूपाने सादर केले आहेत.

महात्मा गांधींनी उत्तम भाषणाची व्याख्या केली आहे. ''तुमच्याजवळ सांगण्यासारखे काहीतरी असावे व ते तुम्ही मन:पूर्वक

सांगितले की उत्तम भाषण होते.'' ही व्याख्या या लिखाणालाही लागू होते. माने यांच्याजवळ लिहिण्यासारखे बरेच काही होते आणि त्यांनी ते मन:पूर्वक लिहिल्यामुळे उत्तम झाले आहे.

यशवंतरावांनी लक्ष्मण माने यांचे आत्मकथन 'उपरा' वाचले. त्यात माने यांच्या वाट्याला आलेल्या परिस्थितीमुळे भारताच्या पार्लमेंटवर बॉम्ब टाकावा वाटते, असे मानेंनी लिहिले आहे. हे वाचून चव्हाणसाहेब हादरले, ते म्हणाले, 'मी एवढी वर्षे पार्लमेंटमध्ये आहे. देशाने प्रगती केली असे आपण मानतो. पण माझ्याच मतदारसंघातील, माझ्याच सातारा गावातील एक भटक्या-विमुक्त जातीतील तरुणाला पार्लमेंटवर बॉम्ब टाकावासा वाटतो. या तरुणाचे मनोगत आपण समजावून घेतले पाहिजे. चव्हाणसाहेबांनी स्वत: पुढाकार घेऊन मानेंशी संवाद साधला. त्यांचे मनोगत समजावून घेतले. या चर्चेच्या प्रक्रियेत त्यांचा स्नेहबंध जोडला गेला. ज्या दुर्मिळ लोकांच्या वाट्याला यशवंतराव एक कुटुंबवत्सल व्यक्ती म्हणून आले त्यात माने कुटुंबीय आहेत. सौ. शशी माने ही मुलगी व लक्ष्मणराव जावई, असा हा स्नेहबंध विकसित होत गेला. चव्हाणसाहेबांचे जावई म्हणजे महाराष्ट्राचे जावई, हे माने यांचे महाराष्ट्राशी नाते, असे आम्ही सर्व चव्हाणप्रेमी मानतो व लक्ष्मणरावांशी तसेच वागतो. जावई मधूनच व्यवस्थेवर रागावतो, चिडचिड करतो. समाजव्यवस्थेचे प्रतिनिधी समजून शरद पवारांसह आम्हा सगळ्यांना समक्ष, मनसोक्त शिव्या घालतो. शिव्या पेपरात छापूनही आणतो. आम्ही सगळे गप्पगुमान ऐकून घेतो. काय करणार, जावई पडला ना! आणि तो साहेबांचा.

सध्याच्या पिढीसाठी आवश्यक व उपयुक्त असे चव्हाणसाहेबांच्या-वरील लिखाण या निमित्ताने झाले आहे. यशवंतराव चव्हाण जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने निर्माण झालेला हा महत्त्वाचा दस्तऐवज लक्ष्मण माने यांच्या नावावर नोंदवला गेला आहे.

ही पत्ररूप आठवणींची साठवण मराठी वाचकांच्या सदैव लक्षात राहील.

**– विनायक पाटील**

दिनांक २६/०१/२०१२

चि. सुप्रिया,

सप्रेम जयभीम.

हे वर्ष यशवंतराव चव्हाणसाहेबांच्या जन्मशताब्दीचं वर्ष. त्या निमित्तानं मी पहिलेले, अनुभवलेले आणि ऐकलेले यशवंतराव त्यांच्या नातीला सांगावेत आणि तरुण मुलांशी संवाद साधावा. चव्हाणसाहेबांची लाखो नातवंडं यानिमित्तानं चव्हाणसाहेबांना समजावून घेतील, ही अपेक्षा. तुझ्याशी केलेला सुसंवाद म्हटलं तर आजही खाजगी कानगोष्टीसारखा आणि म्हटलं तर सर्वांसाठी खुला.

मी अगदी लहान होतो. माझा लहानपणचा अवतार काय सांगू तुला? आईनं मागून आणलेला लांब बाह्याचा सदरा. तो पार घोट्यापर्यंत जात असे. त्यानं चड्डी असली काय, नसली काय, फार फरक पडत नसे. दोन्ही हातांच्या बाह्यांनी नाक पुसत हिंडायचं. या मळ्यातनं त्या मळ्यात. शिव्यांचं तर काय सांगू, अख्ख्या निरगुडीत एकही माणूस नसेल, ज्यानं मला शिव्या दिल्या नव्हत्या! अवखळपणा, खोडकरपणा आणि नसत्या उठाठेवीही रोज शिव्या खायला लावणाऱ्याच. आकाबाईच्या म्हशी आन् बकाबाईला उठाबशी! कुणाची तरी कुरापत काढायची, मग शिव्याच शिव्या. तरी बरं दोनच कान होते. ते दोन्ही इतक्यांदा उपटले गेलेत, की जे उरलेत ते आयुष्यभर साथ आहेत याचंच आश्चर्य. तुला सांगतो, निरगुडी हे माझं गाव. फलटणच्या संस्थान काळात फलटणला भुईपाटानं पाणी पुरवणारं बागायती गाव. तीन आळ्यांमध्ये वाटल्यालं. सारं गाव सस्त्यांचंच. वरची आळी म्हणजे मानसिंग सस्त्यांची आळी. बहुतेकदा तेच सरपंच असायचे. मधली आळी किसना पाटलांची आणि खालची आळी म्हणजे रावसाहेब धन्यांची. पांढरीवरली वस्ती वेगळी. रावसाहेब धनी म्हणजे गावचे कारभारी. चिरेबंदी, दुमजली, चौसोपी, भलामोठा वाडा म्हणजे धन्यांची शान. सगळ्या गावात त्यांचा मोठा मान. मैंदाळ नैतिक धाक, साऱ्या गावाला. वाड्याच्या म्होरं प्रचंड मोठं मैदान. मैदानात सारी गावची पोरं खेळायची. वाड्याच्या बाजूला राखणीला नेमलेला कैकाडवाडा, रामुसवाडा, मांगवाडा. वाड्याच्या भोवताली तटबंदीसारखा उभा. वाड्याची भावकी मोठी. त्यानं गावात त्यांचा दबदबा.

रावसाहेब धनी आणि त्यांचा थोरला मुलगा रामभाऊ हे डाव्या विचाराचे कम्युनिस्ट. पाटलाचा वाडा गावात आहे, गाव पाटलाच्या वाड्यात नाही, हे पाटालानं ध्यान्यात ठेवावं आणि गावानं पाटलाचा आब म्हणजे आपला आब आहे असं मानावं, असं कायबाय ते म्हणत असत. रामभाऊला त्यानं मॅट्रिकपर्यंत शिकवलं होतं. आमच्या गावात मॅट्रिकएवढं शिकल्यालं कुणीच नव्हतं. त्यामुळे रामभाऊ साऱ्या गावचे कारभारी.

पाटलाच्या वाड्याच्या पाठीमागे नरसिंग सस्ते गुरुजींचा वाडा. आता तू म्हणशील हे वाडापुराण कशाला लावलंय? ते यासाठी, की आळ्या एकाएका पार्टीला वाटल्याल्या होत्या. वरची आळी, मधली आळी काँग्रेस पार्टीची. त्यांची भावकी वेगळी. खालची आळी पांढरी, सारी मागासवर्गीय मंडळी, रामभाऊ सस्त्यांबरोबर लाल बावटंवाल्यांची. आता माझ्यासारख्या पोरास्नी काय? पक्ष काय आन् पार्टी काय? गर्दी जमली की हुंदडायचं आन् दंगामस्ती करायची. त्यावेळी प्रभातफेऱ्या आणि संध्याकाळी प्रचारफेऱ्या निघत असायच्या. प्रभातफेरी निघाली की, सर्वात पुढं बैलजोडी औताला जुपल्यावानी. खांद्यावर औतं, अर्धा खोचा खोचून शेतकरी औतामागं उभा. अंगात पांढरी पैरण, डोक्यावर गांधी टोपी, पायात करकरीत वहाणा, असा सजवलेला शेतकरी. बैलांचंही तसंच. तुला झुली म्हाईती आहेत? फार छान असतात. मखमली, मखरावर वेलबुट्ट्या, कशिदा काढलेल्या. मध्ये मध्ये महिरपी काचा, काचांचे गोल चौकोनी तुकडे, फार सुंदररीत्या गुंफलेल्या असतात. चारी बाजूंनी छान गोंडे असतात. रंगीबेरंगी गोंड्यांनी सजलेल्या या झुली बैलाच्या पाठीवर घातलेल्या असायच्या. कपाळालाही फार सुरेख बाशिंगं असायची. बैलांची शिंगं तासून रंगवलेली. शिंगाला गोंड्यांच्या शेंब्या. दोन्ही पांढरीशुभ्र टोकदार शिंगाची खिल्लारी जोडी. अंगावर नजर ठरायची नाही असं पाणी. बेंदराला सजवावं तशी सजवलेली. काय सांगू तुला, हे बैल बघताना फार धमाल यायची. बिशाद नसायची कुणाची त्यांच्यापुढे जायची. या नटलेल्या बैलांच्या पुढे डफडं, ताशा, पिपाणी, हलगी वाजायची. बैलांच्या मागं पोरींची, पोरांची रांग. सारी शाळेतली. त्याच्यामागं चारदोन बाया गावच्या पुढारणी. मग बाकी सारी मोठी माणसं. म्हातारे-कोतारे-तरणे साऱ्यांच्या हातात तिरंगी झेंडे. आमच्या या प्रभातफेरीत सारेच मोठ्यामोठ्यानं घोषणा द्यायचे. आम्ही सारी पोरं घोळ्यानं सारी एका दमात म्हणायचो 'जय'. मंग 'भारतमाता की जय, महात्मा गांधी की जय, पंडित जवाहरलाल नेहरू की जय'. मंग यायचं 'यशवंतराव चव्हाणांचा', आमचा कोरस म्हणायचा, 'विजय असो.' 'यशवंतराव चव्हाण आगे बढो, हम तुम्हारे साथ है।' यातला प्रत्येक जय, प्रत्येक विजय आम्ही सारे बेंबीच्या देठापासून ओरडायचो. त्यात रांग मोडली की मोठा माणूस बसायच्या जागेला रट्टा द्यायचा. 'रांग मोडायची नाय, रांग मोडायची नाय.'

असं दमात घ्यायचा. घोषणा पुढं सुरू व्हायच्या. अगं, एक गंमत फार भारी. आमची प्रभातफेरी जेव्हा बोळाबोळातनं जायची, आम्ही 'जय' म्हणलो की, कुत्री भुंकत अंगावर यायची. बोळकांडं इतकी बारीक, समोरून कुत्री घुसली तर सारी परवड व्हायची. त्या बोळातनी पायातच गटारं असायची. 'जय' म्हणता म्हणता पोरींच्या अंगावर चिखल कसा जाईल, अशा बेतानं मुद्दाम पाय घाण पाण्यात आपटायचा. पाण्याची चिपळी पोरींच्या अंगावर उडाली की, फिदीफिदी दात काढायचे. मग पोरींनी 'किरड्या, मुडद्या, दिसंना व्हय रं तुला' म्हणून शिव्या दिल्या, तरी दुर्लक्ष करायचं आन् चालू लागायचं. मोठी माणसं पुढं रेटायची. अखंड बोळातून आमचं फेरीचं काम चालूच असायचं.

काँग्रेसची खूण बैलजोडी. 'बैलजोडीच्या चित्रावर शिक्का मारा.' 'यशवंतराव चव्हाणांना विजयी करा.' 'पंचवार्षिक योजना हीच आमची घोषणा.' 'राज्य कसं घेतलं गांधीनं? मूठभर मिठानं, मूठभर मिठानं.' 'तिरंगी झेंडा जिंदाबाद.' सारं गाव दणाणून जात होतं. फार मोठी फेरी असायची. सकाळपेक्षा संध्याकाळी फेरी मोठी निघायची. सारा गाव जागवायचा. बाया, पोरी आपापल्या उंबऱ्यावर, दारात, अंगणात, बोळाच्या तोंडाला, घोळक्या घोळक्यानं बगत उभ्या राहायच्या. ज्याच्या त्याच्या तोंडी 'बैलजोडी', 'बैलजोडी', 'यशवंतराव', 'यशवंतराव', 'यशवंतराव' असायचं. बैलजोडीचा असा दणक्यात प्रचार असायचा. 'अहो, बाबूराव जेवणाची काय सोय आहे का?' 'अहो काकासाहेब, काही खाण्यापिण्याची व्यवस्था आहे का?' 'काय राव, ही काय जत्रा हाय का चव्हाणाच्या पोरीचं लगीन?' 'ही इलॅक्शन हाय इलॅक्शन, ध्यान ठीवून असा. इरोदक ह्याच्यातलं कायतर करतील. आपली आपली माणसं ताब्यात ठिवा, आन् बैलजोडी.' 'आरं बाबा, इंग्रज पळालं, ह्येच मोठं झालं. वाटत होतं का जात्याली म्हणून? आजून आमच्या कानात त्यांच्या बुटाचा आवाज हाय. ज्यो बेइमानी करंल, त्यो नरकात जाईल. साडी, माडी, जेवणावळ्या, पत्रावळ्या, घोटबर दारू ह्याज्यापरीस दारातला सावकार गेला, ही का बारकी गोष्ट हाय? कवातरी ती तांबड्या तोंडाची माकडं जात्याल, आन् आसं स्वातंत्र्य मिळंल, सपनात होतं का? मर मर मेहनत केली, पॉट भरत होतं का? आता स्वराज आलं, कुणीबी उपाशी निजायचं नाय. साळा आल्या, शिक्शान आलं, म्हणजे सगळी भरून पावत्याल बगा. घटकीच्या घोटासाठी असं आयसंग जाऊन बापाला रामराम करायचा नसतो. बाप बापच असतो बाबा. एवढी घटना काय शेन खायला लिहिली? यशवंतराव तुरुंगात गेला, तवा काय त्याला सपान पडलं व्हतं? आरं फलटणच्या तुरुंगात व्हता, पोटचा गोळा गेला तरी तुरुंगातनं बाहीर नाय आला. माफी नाय मागितली. त्याला नाय द्यायचं मत तर मग कुणाला?' चावडीवरल्या गप्पांना असा ऊत यायचा. चव्हाणांचं

मोठेपण अशा खऱ्याखोट्या आख्यायिका घेऊन जन्माला आलं होतं.

एक प्रभातफेरी संपली की विरोधकही फेरी काढत असत. त्यांच्या हातात लाल रंगाचा, विळा-हातोडा असलेला झेंडा असायचा. त्यांच्या घोषणा वेगवेगळ्या. माणसं फार नसायची. बारकीसारकी पोरंबी नसायची. चारदोन बाया, आन् पाचपन्नास पुरुष. सारे प्रौढ, गंभीर. गंमतजंमत नाही, दंगामस्ती नाही, वाद्यं नाहीत, गोंगाट-कालवा नाही. मोठमोठ्यानं 'लाल बावटे की जय.' 'शेतकरी, कष्टकरी, कामगारांचा विजय असो', 'गरिबांचं राज्य आलंच पाहिजे', 'शेतकऱ्यांचं राज्य आलंच पायजे', 'क्रांतीसिंह नाना पाटलांचा विजय असो', 'कॉम्रेड हरिभाऊ निंबाळकरांचा विजय असो' असे नारे देत फिरायचे. त्यावेळी या लाल बावटेवाल्यांच्या सायकलवरूनही प्रभातफेऱ्या निघत. एखाद्या सायकलच्या नळीवर बसून, हातात लाल झेंडा घेऊन मीही घोषणा देत असे, 'लाल बावटे की जय'. हे लाल बावटेवाले आम्हाला चिरमुरे-फुटाणे द्यायचे. या फेरीत बहुतेक सारे मागासवर्गीय. रामभाऊ सस्ते आणि त्यांच्या विचाराची माणसं. सारे शिस्तीनं चालायचे. सगळ्यांच्या हातात लाल बावटे. किती सालची निवडणूक कोण जाणे? काँग्रेसच्या फेरीत आम्ही पोरं मोठ्या संख्येनं असायचो. फेरी संपली, की सर्वांना लिमलेटच्या दोनदोन गोळ्या मिळायच्या. लाल बावटावाले अशा काही गोड गोळ्या द्यायचे नाहीत. त्यांचं आपलं लाह्या-फुटाणे. त्यांच्या घोषणा बी जड, लांबच्या लांब. आपलं पब्लिक भारी. हिकडं गेलं तरी 'जय' म्हणायचं, तिकडं गेलं तरी 'जय' म्हणायचं. कशाची 'जय' कुणास ठाऊक? साऱ्यांचीच जय. पण, आजही महात्मा गांधी म्हटलं की, आपोआप तोंडात येतं, 'जय.' 'यशवंतराव चव्हाणांचा.. म्हटलं की, आपोआप तोंडात येतं, 'विजय असो.' इतका दीर्घकाळ चव्हाणसाहेबांचा आमच्या साताऱ्याच्या माणसांशी संबंध होता. हयात असेपर्यंत ते आमचे नेते होते. दुसरा कुणीही आमच्या लोकसभा मतदारसंघात उभा राहिला नाही. आणि निवडूनही येऊ शकला नाही. विजयी व्हायचे ते चव्हाणच. चव्हाणसाहेबांचं साताऱ्याच्या मातीशी हे जे नातं होतं ते अखेरपर्यंत. त्यांची आठवण झाली नाही, असा एकही दिवस निदान माझ्या आयुष्यात जात नाही. जेवढं आठवेल, तेवढं तुला कळवत जाईन. तळागाळातून शिखराला पोहोचलेल्या एका अवलियाची गोष्ट. ज्याचं नाव होतं 'यशवंत'.

तुझा,

लक्ष्मणकाका

दिनांक २९/०१/२०१२

चि. सुप्रिया,

सप्रेम जयभीम.

निरगुडी हे फलटण तालुक्यातलं फार जागरुकता बाळगणारं गाव. तसं गिरवीही राजकीयदृष्ट्या जागरूक गाव. दोन गावं शिवथडी. त्यानं पै-पावनं दोन्ही गावांत मैंदाळ. कोण कुणाच्या नात्यातला आसंल सांगता येत नाही. कुणाचा पदर कुठं लागंल सांगता यायचा नाही, येवढा गोतावळा. दोन्ही गावचा कुणबावा मोठा. बागायती जमिनी जिरायतीपेक्षा कमी. कोरडवाहू जमिनीच जास्त. पण तुला सांगतो, शेतकरी मरणाचं कष्ट करून बागायती शेतीत सोनं पिकवत होते. मोत्यासारखी ज्वारी आता कुठं बगायला मिळत नाही. तीस-चाळीस पेरांचा ऊस. त्यावेळी ४१९ ची मोठी लागन असायची. पण, शेती रानवडी असो, बागायती असो, वारंगुळ्यानं व्हायची. काढणी, मळणी, पेरणी सारी कामं वारंगुळ्यानं व्हायची. त्यात गावातली माणसं सारी कायम एकमेकांत गुतल्याली असायची. भांडणतंटा झाला तरी तेवढ्यापुरता. पुन्हा एक व्हायचं. पण शेती जशी मनगटाच्या जोरावर फुलायची, तसं राजकारण बी रक्तात मुरल्यालं, लोणच्यावाणी. इरिशिरी तेवढीच. सारं नातंगोतं, पै-पावनं भावकीत गुंतलेलं असायचं.

मागच्या पत्रात मी तुला प्रभातफेरीबद्दल लिहिलं व्हतं, की आमची तिरंगी झेंड्याची मिरवणूक मोठी निघालीती. पण वारं सारकं फिरत व्हतं. एक डाव तिरंग्याचा जोर दिसायचा, तर दुसऱ्या दिशी लालबावट्याचा. गावात नुसत्या चर्चा आन् चर्चा. कोण कुणाची कुरापत कवा काढंल ह्याचा नेम नव्हता. निवडणुकीची तारीख जशी जवळ यायला लागली, तसतसं वातावरण गरम व्हाया लागलं. त्यात एका दिशी चावडीम्होरं बोर्ड लागला : 'संयुक्त महाराष्ट्र समिती'. ह्या बोर्डावर लिहिलं व्हतं, 'गुरुवार, दिनांक ४ रोजी सायंकाळी सात वाजता तोफा गरजणार, तोफा गरजणार! शाहीर अमर शेख, शाहीर अण्णाभाऊ साठे, शाहीर गव्हाणकर, शाहीर जंगम स्वामी यांची जाहीर सभा. प्रमुख वक्ते : क्रांतीसिंह नाना पाटील, कॉ. हरिभाऊ निंबाळकर, कॉ. रामभाऊ सस्ते. हजारोंच्या संख्येनं उपस्थित राहा. निपाणी, बेळगाव, धारवार,

कारवार, बिदर, भालकीसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे.' बोर्ड बघायला पोरासोरांबरोबरच थोरामोठ्यांची गर्दी जमू लागली. ज्याच्या त्याच्या तोंडी एकच गोष्ट, संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे. 'मुंबई आमच्या हक्काची, नाही कुणाच्या बापाची.' 'मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे.' आता गावात वातावरण पेटलंय, म्हणजी ज्यो त्यो खाका सावरून म्हणायला लागला, 'लाल बावटेकी जय.' घराघरावर लाल झेंडे दिसायला लागले. कालपर्यंत तिरंगी झेंड्याकडे आसलेले लोक हळूहळू लाल झेंड्याकडे वळू लागले. त्यांच्या प्रभातफेऱ्या मोठ्या होऊ लागल्या. आमच्या गावातली तरणी पोरं सायकलवर बसून सारा तालुका पिंजून काढू लागली. आता सारेच हौसेगौसेनवसे हुरळून पळाया लागले. नाही म्हणायला वरची आळी, मधली आळी जाम तिरंग्याला चिकटून व्हती. त्यानं गावात नुसत्या झेंड्याची लढाई सुरू होती. तीच स्थिती गिरवीची आन् साऱ्या तालुक्याची. वाटार फुटलं, फलटण फिरलं, निंबळकद लाल झालं, भाडळी गेली, आसं मोठी माणसं म्हणायची. म्हंजे काय झालं ते आम्हा पोरांना कळायचं न्हाय. पण लाल बावटेवाले म्होरं सरलेते. ज्याची चूल पेटत नव्हती, त्योबी राजकारणाशिवाय काय बोलत नव्हता. बगता बगता ४ तारीख आली. लाल बावटावाल्यांची दिसभर पळापळ सुरू होती. गाव सारं शिवारात गेलतं. शिवारातली कामंधामं टाकून पोटाला का बिबा घालायचा का? राजकारणानं काय, चुली पेटत नव्हत्या त्याकाळात. ती देशसेवा होती, समाजसेवा होती. छातीवर गोळ्या झेललेल्यांचं रक्त अजून भळभळत होतं. जखमा ओल्या होत्या. क्रांतिकार्य केलेले अनेक क्रांतिकारक जिवंत होते. अनेकांच्या पराक्रमाचे पोवाडे गायले जात होते. बघता बघता उन्हं कलली. सांच्याला गाईगुरं माघारी फिरली. गाईगुरं घरच्या ओढीनं हंबरत गोठ्याकडं पळत होती. मेंढरांची खांडं साऱ्या वाटनं धुरळा उडवीत बॉ बॉ करीत वाडग्याकडं म्होरच्या पावंडानं धनगरामागं पळत व्हती. आयाबाया पोरालेकरांस्नी काखंला घिऊन, डोस्क्यावरचं गवताचं भारं उजव्या हातानं धरून, लुगडं पायात येणार नाही अशा बेतानं पाय उचलीत चालत व्हत्या. कुणी जळानकाटूक डोस्क्यावर घितलेलं, तर कुणी भाकरीच्या रिकाम्या टोपल्या घितलेल्या. सारी वाट धुळीनं माखल्याली. दिस जसा कडुशाला गेला तसं तिन्हीसांजा झाल्या. गुरंढोरं दावणीला गेली. आन् चावडीम्होरं माणसं हळूहळू जमायला लागली. तिन्हीसांजा टळून गेल्या. घराघरांत दिवंलागण झाली. चावडीवरला स्पिकर मोठ्यामोठ्यानं पवाडं म्हणू लागला. आता थोड्याच वेळात कार्यक्रमाला सुरुवात होणार हाय. लोकांनी खाली बसून घ्यावं, कार्यकर्ते सांगत व्हते. आम्ही पोरं एकमेकांच्या आंगावर माती उधळीत धिंगाणा घालीत व्हतो.

सुप्रिया, ते दिवसच मंतरलेले होते. नुकतंच स्वातंत्र्य मिळालं व्हतं. ही गर्दी जमलेली, अख्ख्या पंचक्रोशीतनं माणसं आली व्हती. चावडीम्होरं पाय ठिवायला

जागा नव्हती. आमी स्टेजम्होरं जागा धरलीती. रेटारेटी, पोरांची घुसळण चालूच व्हती. आन् हलगीवर थाप पडली. वीज कडाडावी तशी हलगी बोलू लागली. सारी माणसं चित्रावाणी गपचिप. एकएक कवन आंगावर काटा आणीत व्हतं. शाहीर जंगमस्वामी तेवढे आले होते. बाकीची नामवंत मंडळी आली नव्हती. जंगमस्वामींच्या कलापथकानं दांडगी रंगत आणलीती. शाहीर खडखडीत आवाजात पक्षाचा प्रचार करणारी गाणी म्हणत व्हते. लोक टाळ्यांवर टाळ्यांचा कडकडाट करीत व्हते. शाहीर सादर करत होते, 'आम्ही काँग्रेसला मत कां द्यायचं, आन् बैलोबा म्हणून घ्यायचं?' अत्यंत तालासुरात, खड्या आवाजात शाहीर गाणं म्हणत व्हते. त्यांची गाणी आता व्यक्तीवर घसरायला लागली. यशवंतरावांवर ते 'अपीशा यशा' म्हणाले. अपयशवंत उपदेश म्हणाले. यशवंतरावांवर व्यक्तिगत टीका होऊ लागली, तशी सभेतली काही मंडळी बिथरली, काहींनी आधीच तयारी केली व्हती. कालवा सुरू झाला. सगळ्या कार्यक्रमांत अतिउत्साही लोकही असतातच की. काही चेकाळले; तर काही चवताळले. शाहीरांना आणखीनच चेव आला. डफ, तुणतुणं टिपीला गेलं. 'यशवंताला आवदसा दिसली', शाहीर म्हणाले. झीलकरी म्हणाले, 'आरं पर ती कशी हासली? यशवंतरावांच्या बोडकीवाणी हासली.'

'बोडकीवाणी म्हंजी.'

'आरं आमची मंबई ह्यो चोर गुजराथ्यासनी द्यायला उठलाय. ह्या चोराला का म्हण द्यायची. आन् आमी बैलोबा म्हणून घ्यायची.' डफाचा ठेका नेमका समवर आणीत शाहीर कवन गात होता. 'झाली मुंबई आमची तुमची, मंग यशवंतराव भांडी घासा तुमी गुजराथ्यांची. आमी मुंबई मिळवणार, आन् मंडळी यशवंतराव मुरारजींची.....धुणार. आरं मुंबई घेतल्याबिगार आता थांबणार नाही. डांग सोडणार न्हाय. बात मराठी मुलखाची, साऱ्यांच्या ऐक्याची, आन् समदीजण जिरवू यशाची. हानु हातुड्याचा घाव, आमचा भलताच भाव, आमी मुंबईच्या गादीवर बसणार. यसबा, तुमी कराडच्या मसणवट्यात रडणार.'

यशवंतराव, त्यांच्या कुटुंबीयांची, काँग्रेस साऱ्यांचा खुर्दा शाहीर करत होता. जवाहरलाल नेहरूंची टर उडवीत होता. एका बाजूला शाहीराच्या डफाच्या ठेक्याला टाळी पडत होती. तर दुसरीकडं गेणू सस्ता उठला, 'ये तुझ्या आईच..... कुणाला चोर म्हणतुयास रं.' शिव्यांची लाखोली सुरू झाली. त्याला बावटावाल्यांनी आडवला, तसं वरच्या आळीच्या पोरांनी मुसांडी मारली आन् स्टेजकडं पळाले. मग पाटलाच्या वाड्यांतल्या पोरांनी काठ्या काढल्या. आम्ही पार घाबरलो. पळायला तर जागाच नव्हती. आपण आता या गर्दीत चेंगरणार, मरणार, म्हणून आम्ही बारकी पोरं उंदीर बिळांत घुसावा तसं स्टेजच्या खाली लपलो. जीव भांड्यात पडला. मोठ्या माणसांस्नी घुसता येत नव्हतं. वर मारामारी सुरू होती. काठी, लाठी, कुऱ्हाडी, दगडांचा वर्षाव

झाला. अनेकांची टकुरी फुटली, अनेकजण जायबंदी झाले. कुणाचा हात मोडला, कुणाचा पाय मोडला, दंगल आता गावभर पसारली. गणू सस्ता म्हंजी पैलवान माणूस. डोस्क्याचं मुंडासं त्यानं गर्दीत उधाळलं. त्याला वाटलं, टकुऱ्यातच कुणीतरी हानलं. आन् मंग काय, उचल की आपट सुरू झालं. शाहीर सामान घिऊन चावडी मागं पळाला. त्याज्या मागं पोरं पळाली. कोण कुणाला धरतोय. कोण कुणाला मारतोय. 'यशवंतरावासारख्याला ह्यो भाड्या आमच्या गावांत इऊन चोर म्हणतुया. आरं काय बगताया काय?' मानसिंग सस्ता म्हणला. तसं गणपत पाटील म्होरं सरला, त्यानं नरसिंग मास्तरला आडवा केला. ते बिचारे जरा चोचरं बोलायचे. त्यांचं खादीचं धोतार फाटलं, टोपी उधाळली. आंगातल्या नेहरू शर्टाच्या चिंध्या झाल्या. ते काय म्हणत होते, कुणास कळत नव्हतं. पण, मोठ्यामोठ्यानं तावातावानं बोलतं व्हते. तेवढ्यात कुणीतरी रामभाऊच्या डोस्क्यात काठी हानली. आन् मंग जी तुंबळ माजली, ती इचारू नको. आतापर्यंत गप आसलेल्या म्हारामांगाची, रामुशाची पोरं उतारली आत, आन् सारं गाव पेटतंया का म्हणून ज्यो त्यो जीव मुठीत घिऊन पळाय लागला. आमी आत गप, जीव मुठीत धरून रडत, बोंबलत व्हतो. पण कुणाचं आमच्याकडं ध्यानच नव्हतं. म्होरल्या दंग्यात हाक ना बोंब. कोण बघतंया का म्हण आमी कासावीस. तेवढ्यात माझा बाप मला शोधीत म्होरनं गेला. त्याला आमी कसं दिसणार? आमी तर खाली होतो स्टेजच्या! कुणी म्हणत व्हतं, सासकलकरांनी दंगल केली. कुणी म्हणं, गिरवीकरांनी दंगल केली. गावातले लोक जखमी झाले होते. थोड्या वेळात पोलिसांच्या गाड्या आल्या. गर्दीतनं वाट काढत माझे वडील मला शोधतच व्हते. मी त्यांना सापडत नव्हतो. पोलिसांनी जसा तिथं ताबा घेतला, तशी सारी गर्दी पशार झाली. काँग्रेसचे मानसिंगराव, नरसिंग गुरुजी, वरची आळी, मधली आळी यातले पुढारी जखमी झाले व्हते. लाल बावटावालेही प्रमुख कार्यकर्ते जखमी झाले व्हते. साऱ्या कीर्तनाचा बगता बगता तमाशा झाला होता. सारं गाव आता पोलीस काय करणार, या भीतीनं गांगरून गेलं व्हतं. दवाखान्यात पोलिस जखमींना घेऊन गेले. गावं शांत झालं. सारी माणसं घराघरात शाहीराचंच चुकलंय, त्यो लयच घसारला म्हणत व्हती. कायबाय म्हणत व्हती. यशवंतराव म्हंजी स्वातंत्र्य चळवळीचं नाक. त्यांना कशापाय वंगाळसंगाळ बोलायचं? एकजण म्हणत व्होता, 'आरं कुठं इंद्राचा ऐरावत आन् कुठं शामभट्टाची तट्टानी? यशवंतराव ते यशवंतरावच.'

ती. बाबांना, सौ. वहिनींना सप्रेम नमस्कार.

तुझा,
लक्ष्मणकाका

दिनांक ०१/०२/२०१२

चि. सुप्रिया,

सप्रेम जयभीम,

मागच्या पत्रात तुला यशवंतराव चव्हाणांसंबंधी लहानपणी मी अनुभवलेली गावातली निवडणूक प्रचारातली दंगल सांगितली व्हती. वातावरण तर पूर्ण प्रतिकूल झालं होतं. गावागावात चळवळीची लाट आली व्हती. संयुक्त महाराष्ट्र समितीनं सर्व विरोधी पक्षांना एका झेंड्याखाली आणलं व्हतं. काँग्रेसला दिवस मोठे कठीण व्हतं. चव्हाणसाहेबांच्या नेतृत्वाचा कस लागला व्हता. समोर फार मोठंमोठी माणसं व्हती. त्या वयात मला यातलं काही समजत नव्हतं. पण आताचा मी त्यात डोकवायला नको, म्हणून जे जसं घडलं तसंच तुला सांगावं हे उत्तम. नव्या पिढीनं मागच्या पिढीकडून काही शिकता आलं तर पाहावं. ते नीट पाहता यावं म्हणून मी माझ्या लहानपणी ऐकलेले-पाहिलेले यशवंतराव तुला सांगतो आहे.

निवडणुकांच्या तारखा जवळ येऊ लागल्या व्हत्या. सुगी चालू व्होती. शिवारातल्या ज्वारीच्या काढण्या सुरू झाल्या. राखणी बसल्या होत्याच. कणसातणी दाणं भरत व्हतं. पाखरांनी ऊत आणलाता नुस्ता. भल्या सकाळी दिस उगवायच्या आत माणसं हातात गोफणी घिऊन रानात पळत व्हती. कानाला बांधल्याल्या टापश्या पदराचं शेव कानाला गुंडाळून, हातातल्या गोफणीनं माळ्यावर चढून, हा ऽऽ हा ऽऽ रांडा मेल्यांनो म्हणत बाया, पोरं, बापे राखन करत होते. त्यानं सारं शिवार सकाळच्या पारी जागं होऊन कामाला लागलंत. तवा कुठला च्या आन् पाणी? न्याहरी येस्तवर पाण्याचा थेंब दिकून पोटात जायाचा न्हाय. मंग लयच भूक लागली, तर हिरवी कणसं चोळायची आन् टाकायची तोंडात. तेवढाच आधार. दिस कासराभर येस्तोवर पाखरांच्या झुंडीच्या झुंडी शिवारात हिंडायच्या. एकानं हाकल्या, की दुसऱ्याच्या रानात. बुजागवणी तर जागूजागी लागल्याली असायची. पण, पाखरंबी माणसापरीस हुशार.

तुला का सांगू सुप्रिया, आम्ही पोरं सकाळी सकाळी रानातली पाखरं मोजत मस्ती करीत हिंडत व्हतो. मळ्यातल्या बारवावर बाया धुणं धुत व्हत्या. पल्याड

हिरीवर मोट चालली होती. मोटचं गाणं सुरात चालू व्हते. तेवढ्यात गेणा सस्ता रानातनं हिरीवर आला. हातपाय धुतलं, चूळ भरली. दातावनं बॉट फिरावलं आन् मोटकरी वामनला म्हणाला, 'ह्याज्या मायला, लय पनवती आलीती, गेली. पर वामन आता कस रं करायचं? आपल्यालाबी पक्षाची सभा घ्या पायजी का नको? डोक्याचा गोयंदा झालाय. पण, नरसिंग गुरुजी मनावरच घिना, का करावं? मानसिंगराव उठतूया आन् फलटनात घुसतुया. मी एकला का करणार रं? माझं कोण आयकतया?' वामननं बैलं थांबावली. 'गेणूनाना, काढ तंबाखू, च्या मायला चंचीच घरी राहिलिया.' बैलं उभी करून वामन गेणबाकडं आला. तंबाखू चोळत वामन म्हणाला, 'म्या ऐकलया यशवंतरावांचीच सभा आणायला मानसिंगराव फलटणात चकरा मारतुया. मारामारी झाल्यापस्नं लयच चेकाळल्याती खालच्या आळीची पोरं. आपुन बी काय मेल्या आयचं दूध पिलोय व्हय! बगा म्हणावं आमी काय करतुया.' आम्ही आपलं पाटातनं मस्ती करत चिखलात खेळत होतो. चिखलानं भरल्याली आंगं. मोटनं पाणी वतलं म्हंजी पाण्याचा लोंढ्याखाली निजायचं. पाणी वरनं गेलं, की नाचत बसायचं. दिस सरला तिनी सांजचं आमी खेळत खेळत चावडीम्होरं गेलू तर तिथं काँगेस पार्टीचा बोर्ड लागल्याला- 'दहा तारखीला संध्याकाळी ५ वाजता ना. यशवंतराव चव्हाण, ना. मालोजीराजे, ना. निंबाळकर यांची जाहीर सभा होणार आहे. साऱ्या गावकऱ्यांनी सभेला उपस्थित राहावे.' गावभर दवंडीबी चालू होती. सारं गाव पुन्हा जागं झालं. कामधाम करणारे सारे गावकरी यशवंतराव आता काय उत्तर देणार, शाहीराची कशी जिरणार म्हणून सभेची वाट बघू लागले. माझ्यासारखी पोरं कोण 'यशवंतराव?' त्यास्नी बगता येईल म्हणून चेकाळून गेलोतो. रोज गावभर लोक यशवंतरावांच्या कथा सांगीत होते. लाल बावटेवाले नाना पाटलांच्या पत्री सरकारच्या गोष्टी सांगीत व्होते. कोण इंग्रजांशी कसा लढला, कुणी रेलवे लुटली, कुणी सरकारी मळ्यातलं ऊस पेटावलं, तर कुणी आगीनगाडी लुटली. सारे सांगत व्होते. कुणी खबरे आता लाल झेंडा घिऊन नाचतात, तर कोणी खबरे तिरंगा. स्वातंत्र्यसैनिकांच्या थाटात मिशावणी पिळ मारीत, गांधी टोपी तिरकी करून आपुनबी त्यात हुतू म्हणून फुशारकी मारत व्हते. आली, आली, म्हणता दहा तारीख आली. सारं गाव यशवंतरावांच्या वाटंला डोळं लावूनशानी बसलतं. शाहीराची सभा वरल्या आळीच्या पोरांनी उधाळल्याली. रामभाऊच्या डोस्क्यात काठी लागलीती हे खालच्या आळीची माणसं इसरायला तयार नव्हती. पुन्हा कलागत व्हणार, म्हणून माणसं आता सावध व्हती. त्यात नरसिंग गुरुजी म्हणाले, 'गावात काय बी व्हता कामाचं न्हाय. आदीच गावाची अब्रू गेलीया. शांततेत सारं करायचं. फक्त गावातनं बैलजोड्याची मिरवणूक

निघंल. यशवंतराव, म्हाराजसाहेब गाडीत बसत्याल. बाकी म्होरं १०१ बैलजोडी जोडल्याली आसंल. घोषणा नाही, गुलाल नाही.' मानसिंग सस्ता म्हणाला, 'मंग का उपयोग? बैलजोडीच्या चित्रावर शिक्का मारा', 'आपली खूण, बैलजोडी' येवढं तर म्हणू.' गुरुजींनी परवानगी दिली. साऱ्या पंचक्रोशीतनं बैलं जमायला लागली. शिवळ आन् बैलं येटणानं एकामेकाला बांधली आन् गावाच्या बाहेर समद्या रस्त्यानं बैलंच बैलं. बैलजोड्या बगायला ही गर्दी झाली. आलं आलं म्हणता गाड्या वाजाया लागल्या. ढोल-ताशे वाजू लागले. धुळीचं लोट आभाळाला भिडले. रामभाऊ सस्ते आन् आणखी पाचसहा लोकांना पोलिसांनी पिंजऱ्यात घालून फलटणला नेहलं. त्यानं लाल बावटेवाले चवताळले. पण, काय करणार? पोलिसांनी सारं गाव ताब्यात घितलंतं. गर्दी तर तोबा झाली. आमच्या बानं आमाला जाम धरून ठेवलं व्हतं. 'पळायचं न्हाय, चेंगरून मरशील. मुठीयेवढा जीव, काय करायचं तुला?' म्हणत दाबून हात धरलाता. मला कायच दिसत नव्हतं. मी रडाया लागलो. बानं समजूत काढीत खांद्यावर घितलं. आता दिसायला लागलं. मी आनंदानं टाळ्या वाजवल्या. गाड्या आल्या आन् गाड्यातनं खादीच्या कापडातली दोन मोठी माणसं खाली उतारली. दोघांच्या आंगात नेहरू शर्ट, पांढरी धुवाट धोतारं 'तिरक्या आकाराची टोपी हाय ना, ते यशवंतराव.' बानं सांगितलं, 'आन् बुटके हायत ना, सरळ टोपीवाले, ते महाराज.' मी बगत व्होतो. बाया यशवंतरावांस्नी कुंकू लावीत व्हत्या. पाचपन्नास बाया, नुसती गर्दी. कोण कुंकू लावतंया, कुणी दुसरीला मागं सारून म्होरं घुसतंय, तर कुणी आरतीतील वात म्होरं सारतंय, कुणी ओवाळतंय! बापे मंडळी 'यशवंतराव चव्हाणांचा विजय असो' अशा घोषणा देता देता, चवड्यावर येऊन यशवंतरावांना कसं बगता येईल म्हणत जो तो म्होरं म्होरं घुसतोय. त्यानं नुसती रेटारेटी. निघा निघा, पुढारी जमावाला आवरत होते. पण, एक जमाव मागं गेला की, दुसरा म्होरं. यशवंतरावांचं कपाळ कुंकवानं पार लालभडक दिसायला लागलं. म्हाराजांचा गोरापान चेहरा आणखीच लाल दिसायला लागला. नरसिंग गुरुजींना मोठा घोर. माणसांची उलघाल चालू. प्रत्येकाला यशवंतरावास्नी, महाराजास्नी बगायचं असतंया. त्यात बैलांच्या शिवळा घिऊन बैलं चुळबूळ करायला लागली. बैलकरी बी कावलं, 'लेका, आमास्नीबी बगायचंय नव्हं, यशवंतरावाला. ये धर माझी बैलं धर.' एक दुसऱ्याला इनवत व्हता. पोरं मोठी बरं का, झाडांवर चढून यशवंतरावाला बगत व्हती. अशी तोबातोबा गर्दी. काकणाच्या, साड्यांच्या, पदरांच्या सुंदरमाळा मोठ्या शोभिवंत दिसत होत्या. बाया नटूनथटून आल्यात्या. कालवा तसाच म्होरं सरायला लागला. जिनं ववाळलं तिनं ववाळलं, ज्या ऱ्हायल्या त्या फुगून चालायला लागल्या. बैलं बी म्होरं म्होरं

निघाली. घोषणांचा पाऊस पडत व्हता. 'काँगेसची खूण बैलजोडी.' 'बैलजोडीच्या चित्रावर शिक्का मारा.' बाया बी जोराजोरात घोषणा देत व्हत्या. मिरवणुकीतला ताशावाला रंगात आला होता. ढोल, ताशा, सूर, सनई, कांडकी एकाच तालासुरात रंग भरत व्हती. पुढारी त्यास्नी 'चला म्होरं, चला म्होरं' म्हणून रेटत व्हते. बैलाच्या येसणी प्रत्येक बैलकऱ्यानं वडून धरल्या व्हत्या. त्यानं ताकदीचं खोंडसुद्धा गप्प गाईवाणी हळूहळू चालत व्हतं. मध्येच एकांदा बैल शेणाचं पव टाकायचा. आन् 'हात् तुझ्या आयला' म्हणत बैलकरी आंगावरलं श्यान झाडीत 'त्याज्या बायला, तुला खाल्ला आराबानं' म्हणत, त्याच्या पोटात कोपरानं मारीत व्हता. मिरवणूक मुंगीवाणी म्होरं सरत व्हती. माणसांची गर्दी बी मुंग्यावाणी झाली व्हती. १०१ बैलजोड्यांची मिरवणूक! बैलंच बैलं. पांढरी, तांबूस रंगाची, काळ्या रंगावर झकास पांढरं टिपकं, तर काय काय बैलांवर पांढऱ्या रंगावर काळं टिपकं. परत्येकाचा वाण येगळा. परत्येकाची शिंगं येगळी. कुणी खिल्लरी जोडी आणलेली, तर कुणी नंदीबैलावाणी पंढरपुरी आणलेली. साऱ्यांच्या गांधीटोप्या, म्हंजी आभाळांतल्या बगळ्यावाणी रांगत निघालेल्या. मी बाच्या खांद्यावरनं साऱ्या टोप्याच टोप्या बगत होतो. तेवढ्यात काय झालं कुणास ठाऊक, ज्यो त्यो वर बगत व्हता. पाटलाच्या वाड्याम्होरनं मिरवणूक निघालीती. कैकाडवाड्यात आली. तिथं वाटच्या एका बाजूला मोठाच मोठा लिंब. लिंबाच्या म्होरं, वाटंच्या म्होरच्या बाजूला चिंचंचं झाडं. दोन्ही झाडं आमनेसामने. एका झाडावर चारपाच जणांनी हातात दावं धरल्यालं. तसंच त्याच दाव्याचं दुसरं टोक दुसऱ्या झाडावर चारपाच जणांनी धरल्यालं. पायातली पायतानं त्या साऱ्यांनी कासऱ्यात ववल्याली. कासरा वडून धरल्यानं सारी मिरवणूक जोड्यांच्या माळंखालनं गेली. जसं हे ध्यानात आलं तसं पोलिस, कार्यकर्ते आणि गर्दीतली सारी माणसं दिसंल ती वस्तू झाडावर मारायला लागली. यशवंतरावांचा फार मोठा अपमान या टोळक्यानं केला व्हता. पोलिसांनी झाडांच्या बुंध्याचा ताबा घेतला आणि यशवंतरावांनी कौशल्यपणाला लावून मिरवणूक म्होरं सरकावली. पोलिसांनी झाडावरल्या टोळक्याला झोडत झोडपत पिंजऱ्यात घातलं. सारा रंगाचा बेरंग झाला. जोड्याच्या माळंखालनं काँग्रेसची मिरवणूक गेली. पोलिसाला आधी का समाजलं न्हाय आसं. सारी एकमेकाला इचारत होती. हे गाव समितीचा बालेकिल्ला. रामभाऊला एकट्याला पिंजऱ्यात बसावलं म्हणं का झालं? त्याला अटक नस्ती केली तर कायबी नसतं झालं. गर्दी म्होरं सरत व्हती. बैलांच्या जोड्या लांबच्या लांब होत्या. त्या साऱ्याबरोबर गर्दी चावडीम्होरं सरकत निघाली. साऱ्या पंचक्रोशीतनं माणसं आली व्हती. आता तू म्हणशील, इतकी माणसं कशी आली? त्याकाळात गाड्यांची

रेलचेल नव्हती. प्रत्येकाकडं सायकल व्हती. सायकलीनं, गाड्या जुंपून नाहीतर पायीपायीच माणसं पदरच्या भाकरी बांधून सभंला जायची. आतावाणी खाण्यापिण्याची सोय तवा होत नव्हती. आपापल्या पडशीत आपापली शिदोरी असायची. सभा संपली म्हंजी कार्यकर्ते आपापल्या सोयीनं हिरीवर, वड्यावर, जिथं पाणी आसंल तिथं जेवणं करायची. ज्यानं कायच आणल्यालं नसंल, त्यालाबी समद्यासंग जेवायला मिळायचं. तवा पक्ष गरीब होते, गरिबांचे होते. राजकारण धंदा नव्हता. यशवंतरावांनी कोणा गावाला सोड, कुणा कार्यकर्त्याला पुढाऱ्यालासुद्धा असलं जेवणखाण दिलं नव्हतं. माणसं इचारासाठी भांडायची. इचार करून स्वार्थासाठी नाही. पक्षासाठी डोस्की फुटायची, थैल्यासाठी नाही...

तर बग मी भलतीकडेच गेलो. मिरवणूक शांततेत पार पडली. दंगल झालीच असती. पण पोलिसांनी, कार्यकर्त्यांनी अपमान गिळून यशंतरावांना सभंच्या ठिकाणापर्यंत नेलं. बानं मला खांद्यावरनं खाली उतरवलं. आम्ही चावडीवरल्या पटांगणात एका कडंला बसलो. काय झालंच नाय आसं माणसं वागत व्हती. पण प्रत्येकाचा चेहरा पार पडला होता. प्रत्येकजण खजील झाला व्हता. गावाचं नाव पुन्हा खराब झालं व्हतं. बदनामी झाली व्हती. मानसिंगराव, नरसिंग गुरुजी रडवेले झाले व्हते. तर यशवंतराव धीरगंभीर, शांतपणे मधल्या खुर्चीत बसले व्हते. फलटणचे महाराज मालोजीराजे नाईक निंबाळकर म्हणजे अगदी लालबुंद माणूस. उंचीने थोडे कमी पण, चेहरा अतिशय बोलका. यशवंतरावांच्या शेजारच्या खुर्चीवर बसले होते. महाराज कार्यकर्त्यांना सारख्या सूचना देत होते. मानसिंगराव गावचे सरपंच. त्यांनी समद्या पावण्यांचं स्वागत केलं. महाराजांनी यशवंतरावांना भला मोठा हार घातला. टाळ्यांचा कडकडाट झाला. काँग्रेस पक्षाच्या विजयाच्या घोषणा झाल्या. सभेला समितीवालेही मोठ्या प्रमाणात होते. सारे यशवंतरावांचं ऐकायला शांत बसलेले. सभा सुरू झाली. महाराजांनी अत्यंत शांत स्वरात भाषण केलं. संयुक्त महाराष्ट्राची मागणी ही आपली सर्वांचीच असल्याचं सांगत पक्षाला विजयी करण्याचं आवाहन करून ते खाली बसले. आता यशवंतराव काय बोलणार यासाठी साऱ्यांचे कान आसुसले व्हते.

सुप्रिया, चव्हाणसाहेबांचं पहिलं भाषण इतक्या लहानपणी मी ऐकलं याचा अभिमानही वाटतो व समजून घेण्याचं ते वय नव्हतं म्हणून दुःखही होतं. ते बोलायला लागले. डाव्या बाजूला तिरकी असलेली टोपी त्यांना फार शोभून दिसत असे. अंगातलं जॅकेट, जॅकेटला असलेलं पेन, धोतर, नेहरू शर्ट, पायात बूट असे अत्यंत साधे. समोरचा माईक त्यांनी नीट केला. साऱ्या म्होरक्यांची नावं घेतली. आणि जसं खरंच काही झालंच नाही असा सुसंवाद सुरू झाला. गावची ते नानाप्रकारे

तारीफ करत होते. बैलांची मिरवणूक आणि त्यात हरवलेले यशवंतराव शेती, शेतकरी, पाणी, स्वराज्य, देशाची राजकीय परिस्थिती, शेतकऱ्यांचे प्रश्न, विकासाचे प्रश्न, शेतकऱ्यांच्या दु:खी-कष्टी आयुष्याच्या व्यथा, वेदना यशवंतरावांच्या ओठी होत्या. मधून मधून टाळ्यांचा कडकडाट होत होता. साहेब बोलत व्हते, ''मला मुंबई पाहिजे. धारवाड, कारवार, निपाणी, बेळगाव, बिदर, भालकी आणि डांगही पाहिजेल हाय. पण तो शांततेच्या मार्गानं. वाटाघाटी करून, मला आपण साऱ्यांनी हार घातले तसं जोड्यांच्या माळाही. लोकशाहीमध्ये दोन्हीही महत्त्वाचं. डोंगराएवढ्या हारांच्या ढिगावर उभा राहिलो आणि काही भावंड रागावली त्यांनी जोड्यांच्या माळा गळ्यात घातल्या, पण मी डगमगलो नाही, रागावलो नाही. ज्यांच्या पोटात दुखतं ते रागवणारच. त्यांच्या रागाकडेही मी मायेनं पाहिलं. राज्याच्या, देशाच्या हिताचं पाहिलं. ही सारी शक्ती मिळाली तुमच्यामुळे. तुमच्या डोळ्यांतले दु:खाश्रू पाहून, हे दु:खाश्रू पुसायचे तर संयम असला पाहिजेल. कुणी अपशकुन केला तरी खचून जाऊ नका. पक्षाला प्रचंड मतांनी निवडून द्या.''

सुप्रिया, तो मंतरलेला काळ होता. तो मला लहान असताना पाहता आला. तशी चळवळ आता पुन्हा होईल का? दु:खी, पीडितांचे अश्रू कुणी पुशील का? हे वाटून पोटात खड्डा पडतो. लोकशाही खरंच गेली गोरगरिबांच्या हातून. काय ठाऊक, ती परतेल की नाही? काळ मोठा कठीण आलाय खरं.

आदरणीय बाबांना, सौ. वहिनींना सप्रेम जयभीम.

तुझा,<br>
लक्ष्मणकाका

दिनांक ०६/०२/२०१२

चि. सुप्रिया,

सप्रेम जयभीम.

खरं तर त्यावेळी मी तिसरी किंवा चौथीत असेन. फार समजण्याचं वय होतं असंही नाही. पण मी तेव्हा बँड पथकांत घुंगऱ्या वाजवत असे. निवडणुका आल्या की लोक फार जागरूकता दाखवतात आणि निवडणुका संपल्या की सपाटून झोपी जातात. लोकांची स्थिती येणा देणाऱ्या गाईसारखी असते. येणा यायल्या लागल्या की ती चारी पाय झाडू लागते, मोठमोठ्यानं हंबरू लागते. ओरडण्यानं लोकांना कळते की हिला आता बाळ होणार आहे. आयाबाया तिला मदत करीत असतात. आणि मोकळी झाली की हुश्यऽ करून निपचीत पडते. पाच वर्षांसाठी. आपल्या लोकशाहीचंही तसंच आहे, निवडणुका करणारं यंत्र. तर काय सांगत होतो, कसल्याही निवडणूका नव्हत्या. जत्राखेत्रा नव्हती. लगीन इव नव्हतं आन् कुणाची मयत बी झाली नव्हती. पण माणसं सारी फलटणाकडं पळत होती. आनंदानं नाचत होती. साऱ्याच पक्षातली माणसं एकमेकांना आनंदानं मिठ्या मारीत होती. रानामाळातली सारी काम धामं झाली होती. सुगी नुकतीच संपल्याली. खळ्यावरनं सारी दौलत घराघरांत पोचल्याली. गहू, हरभरा, ज्वारी, तुरं, मूग, मटकी, हुलगं, साऱ्या शेतकऱ्यांच्या खळ्यावरनं घराघरांत आलं होतं. पाऊस चांगला झालाता. पिकं सोन्यावाणी आलीती. गावकीतली सारी बलुती बलुतं उकळत हिंडत होती. त्यांना शेतकरीराजा खुशीनं वतनातल्या कामाचं दाण टाकीत होता. बिनभिकारी गल्लोगल्ली गांव मागीत हिंडत होते. गावातली टोळकी कामधंदा उरकल्यानं चावडीवर, पारावर चंच्या सोडून शिळुप्याच्या गप्पा मारीत बसले होते. लिंबाच्या झाडाला लगडलेल्या लिंबोळ्यांचं घस गळायला सुरुवात झाली होती. लिंब, पिंपळ, वड, चिंच यांना नव्या नवतीचा कवळाझार पाला फुटायला लागला होता. चैत्रपालवी का, काय म्हणत्यात? पण चिंचचा पाला तू मुंबईकर असल्यानं खाल्लास की नाही मला माहिती नाही; पण राजूदादा, अजितदादा तुला सांगतील. लहान मुलं चिंचेचा तांबूस रंगाचा शेंडा आणि कवळा पाला आणि गूळ यांचा

लाडू करून खात. आंबटगोड असलेला हा पाला फार छान लागतो. तुझ्या मुलांना तू आर्वजून दे, मस्त असतो. नुसती चिंच आंबट असते तर नुसता गूळ गोड असतो. दोन्ही एकत्र खाऊन बघायला हरकत नाही. हे लिहिताना सुद्धा लहानपण आठवून तोंडाला पाणी सुटतंय. खरंच पोरांना हौसेनं रानमेवा खाऊ घातला पाहिजे. कैऱ्या, बोरं, जांभळं, करवंदं हे खायलाच पाहिजे. कवटं सुद्धा याचवेळी मिळतात. ती पण गूळ घालून खातात. मजा असते. हे खरं जगणं. त्यासाठी पैसापाणी काहीच लागत नाही गं! ...तर माणसं का पळत होती हे शाळा चालू असती तर समजलं असतं. मास्तरनं सांगितलं असतं ना? शाळंला उन्हाळ्याच्या सुट्ट्या लागलेल्या. कुण्या मोठया माणसाला इचारावं तर ज्योत्यो आपल्याच नादात. आम्हां बारक्या पोरास्नी कोण काय सांगणार? वर डाफरून म्हणणार ये, तुला काय करायचं रे x x अशा फुकाच्या शिव्या खाव्या लागायच्या. सुप्रिया, शिव्यांची पण एक गंमत आहे. मी लहानपणी जेवढ्या शिव्या खाल्यात ना तेवढ्या कुणीच खाल्या नसतील. गावात एकबी पाटील उरला नसंल ज्यानं आपली आयमाय काढली नाय. त्यानं चौकशी करायला मन धजत नव्हतं. मोठं मोठं पुढारी तर आधीच मुंबईला पळालं व्होतं. काय झालं कुणाला ठावं? पर दुपार झाली तसं गावातल्या लोकांनी पाडव्याला गुढ्या उभारतात तसल्या गुढ्या उभारल्या. आनंदानं साखर वाटत होते. वरची आळी, मधली आळी, खालची आळी, सगळे पक्ष, समंदे पुढारी आनंदाने एकमेकाला टाळ्या मारीत होते. काँग्रेसवाल्यांना समितीवाले म्हणयचे, 'झाला का नाय?'

काँग्रेसवाले म्हणायचे, 'झाला बाबा झाला, पर बाबांनू मंगलकलश यशवंतरावांनीच आणला नव्हं.'

'हो रे बाबा. आणला, पर आमी रक्ताचं पाणी केलं तवा नव्हं. आन् शंभर हुतात्मे झाले तवा आणला यशवंतरावांनी मंगलकलश' समितीवाले म्हणायचे.

आम्ही त्यांच्या तोंडाकडे बगायचो. हात्तीच्या! हे मंगलकलश काय प्रकरण आहे? ही मोठी माणसं आसं कोड्यात का बरं बोलतात. घरात आईबाला इचारायची सोयच नाही. ती आडाणी टकुऱ्याची. त्यास्नी काय ठावं कसला कलश? पण घरूघर साखर मिळतीया ना. आम्ही सारी खुश. पाटलाच्या वाडयाम्होरं माणसं जमायला लागली. तिथं मोठ्यामोठ्या माणसांनी साकार वाटायला धरलीती.

'होणार होणार होणार! म्हंजी काय झालाच!'

मी नुस्ता बगायचो. त्याज्या भन काय झाला? म्या धडा करून हळूच गेणानानाला इचारलं,

'नाना, काय झालां वं?'

'हात तुज्या आयचं, येडपाट, तुज्या तुला एवडं कळंना. आरं आपण मिळावला ना महाराष्ट्र, संयुक्त महाराष्ट्र. आजपास्नं आपलं राज्य झालं.'

तवा मला संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे ही भानगड समाजली. पण म्हंजी नक्की काय झालं ते समाजलं नाय. ते सांच्याला रेडिओ लावला ना ग्रामपंचायतीचा, तवा उमाजलं. साऱ्या गावात एकच रेडिओ. त्यो लागायचा सांच्याला. शेतकरी बंधूंसाठी कार्यक्रम म्हणून एक संगीत वाजायचं. ते संगीत ऐकलं का समजायचं, की ग्रामपंचायतीत गावकरी हायेत. मंग रेडिओ लागला की सारं गावं जमायचं बातम्या ऐकायला. फार छान! गावच्या चावडीम्होरं माती असल्यानं पायांनी मैंदाळा धुरळा उडायचा. नाकातोंडात मातीच माती. पोरांची दांडगी रेटारेटी, मस्ती. एकमेकास्नी खाली पाडून वर बसायची. बारकी-मोठी पोरं दंगा चालू होता. तेवढ्यात मोठ्या माणसांनी जीवाचं कान करून ऐकायला सुरुवात केली. आमच्या गावचा रेडिओ म्हणजे लय भारी. नुसता मांजरावानी गुरगुरायचा. त्यानं ऐकणारानं कितीबी कान नीट ठेवला तरी घरघर चालूच ऱ्हायाची. पण आजचा दिस येगळाचं होता. सारं गावं जत्रंला जमावं तसं जमल्यालं. सारी बाया पोरं, गटागटानं बसल्याली. गडबड, गोंधूळ सारं बंद. पोरास्नी दाबून गप्प बसावल्यालं होतं. कालवा सरला. तिन्हीसांजा व्हायला आल्यात्या. दिस बुडाय निगालाता. लालभडक गोळा हळूहळू मावळतीला निगाला. सोन्यावाणी पिवळं धमक ऊन पाटलाच्या वाड्याच्या कौलावरनं घरंगळत चावडीम्होरं मुजरा घालीत होतं. तेवढ्यात रेडिवन बोलंन सुरू झालं.

'आकाशवाणी मुंबई, नंदकुमार कारखानीस आपणास बातम्या देत आहे...'

तसं सारी माणसं चिडीचिप बसली. संयुक्त महाराष्ट्र राज्याचं उद्घाटन ३० एप्रिल १९६० रोजी रात्री १२ वाजून १ मिनिटांनी भारताचे प्रधानमंत्री पं.जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते मुंबईत झाले.'

मध्येच खरखर, घरघर. 'हात तुज्या आयला. ये ती बटान फिरव.' दुसरा म्हणाला.

'आल्याका सरपंच हे रेडिव बदला राव, ऐन टायमाला गचाकतुया.'

'गप ये, गप ये.' सारे ओरडू लागले. पुन्हा आवाज सुरू झाला.

'हा समारंभ राजभवनाच्या पटांगणात भव्य स्वरूपात झाला. संयुक्त महाराष्ट्राचा नवा नकाशा तयार करण्यात आलेला होता. विद्युतदीपांनी चमचमणाऱ्या या नकाशावरील रेशमी आवरण पंडितजींनी बाजूला केले आणि टाळ्यांच्या गजराने भव्य शामियाना निनादून गेला. प्रधानमंत्री पं.जवाहरलाल नेहरूंना आणि उपस्थितांना नव्या महाराष्ट्राचे दर्शन घडले. याप्रसंगी कॉंग्रेसच्या अध्यक्षा

श्रीमती इंदिरा गांधी उपस्थित होत्या.'

झालं! बोंबलला रेडिवचं कायच ऐकायला इना. सारे गावकरी गपगार बसून होते. आवाज खरखर करीत पुन्हा बोलू लागला.

'आनंदाला उधाण आले. कार्यक्रम निमंत्रितांसाठी होता. याप्रसंगी गानकोकिळा लता मंगेशकर यांनी महाराष्ट्र गीत गायले. पसायदानाने कार्यक्रम संपला. आम जनतेसाठी दुपारी शिवाजी पार्क मैदानावर कार्यक्रम ठेवण्यात आला होता. लक्षावधी लोक या समारंभाला उपस्थित होते. राष्ट्रध्वज, मंगलवाद्ये आणि लोकांच्या उत्साहाने वातावरण भारावून गेले होते.'

"महाराष्ट्राने आता नव्या पर्वात पाउल टाकले आहे. मराठी भाषिकांचे मी मनापासून अभिनंदन करतो, शुभेच्छा देतो, आपली भावी वाटचाल समृद्ध व्हावी." असे विचार प्रधानमंत्री पं.जवाहरलाल नेहरू यांनी व्यक्त केले. त्याचवेळी यशवंतराव चव्हाणांचे अत्यंत मनोहर असे भाषण झाले. ते आपल्या भाषणात म्हणाले, "शेती, उद्योग व शिक्षण यावर भर देण्याचा प्रयत्न राज्याला शुभेच्छा देताना आपणास आश्वस्त करतो आहे. ज्ञानेश्वर, तुकाराम, शिवाजी महाराज, महात्मा फुले, डॉ. आंबेडकर या नररत्नांनी महाराष्ट्राच्या संस्कृतीचा जो वारसा आपल्या हाती दिला आहे. तो अमोल ठेवा समजून महाराष्ट्राची व देशाची सेवा करण्याचे व्रत आपण सर्वजण घेऊया. शेती आधारीत उद्योगावर उभी राहिलेली समाजव्यवस्था स्थापन करण्याचा प्रयत्न करूया. महाराष्ट्राच्या जगन्नाथाचा हा रथ चालविण्यासाठी सर्वांचा हातभार लागावा अशी इच्छा त्यांनी व्यक्त केली. आजच विधिमंडळातील सर्व लोकप्रतिनिधींनी यशंतरावांची नवा मुख्यमंत्री म्हणून निवड केली. भाषणाचा सविस्तर वृत्तांत थोड्याच वेळात."

झालं! यशवंतराव चव्हाणांचा विजय असो, संयुक्त महाराष्ट्राचा विजय असो, महात्मा गांधी की जय, पं.जवाहरलाल नेहरूंचा विजय असो, यशवंतराव चव्हाण जिंदाबाद. समितीवाले म्हणायचे अत्रे, डांगे जिंदाबाद. संयुक्त महाराष्ट्र समितीचा विजय असो. सारेच साऱ्या घोषणा देत होते. उत्स्फूर्त अशी सगळ्या गावाची मिरवणूक निघाली. त्यानं सारं गाव आनंदानं उत्साहानं भरून गेलं होतं. कुणाचीही जिंदाबाद करायला आम्हा पोरांना आनंदच असायचा. डोळा लिमलेटच्या गोळीवर असायचा. धुळीनं भरलेले बोळाबोळातले रस्ते. कळकटलेली, मळकटलेली आमची लक्तारलेली आयुष्य शिवण्याचा सुईदोरा कोणाकडे होता का? गावात लाईट नव्हती. चौकाचौकात लाकडी खांबावर चौकोनी खोक्यात कंदील लावत ग्रामपंचायतीचा शिपाई हिंडायचा. त्या मिणमिणत्या लायटीमध्ये लोक रातभर सुकानं झोपायचे. लोकल बोर्डाच्या दोन खोल्या म्हणजे आमची शाळा. तशी ती

मारुतीच्या देवळातही भरायची. पिण्याच्या पाण्याचं तर काय सांगू, गावातल्या मायाबहिणी सकाळसंध्याकाळ लांबलांबच्या हिरीवरनं पाणी आणत. पाटलाच्या वाड्यात तेवढी हिर होती. बाकी साऱ्यांनी रानामाळातनं पाणी आणायचं. साखर वाटून, लिमलेटच्या गोळ्या वाटून उत्साहानं गावानं सणच साजरा केला म्हणना. हे सारं बगीत बा टोपल्या वळीत रस्त्याच्या कडंला बसल्याला. तो येणाजाणारांना इचारीत होता,

'नव्हं, पाटील, ही रेडिव बोलतया ती का खरं आसतया व्हय? आवं आता त्यो माणूस बोलत व्होता ती खरं आसतया व्हय?'

माणसं एकमेकास्नी टाळ्या मारीत हसायची. बा आईकडं कसनुसं त्वांड करून बगायचा.

'आग, म्या काय वंगाळ बोलतूया व्हय. ही मला का हासत्यात. रेडिव खरं बोलतूया का खोटं?'

'का कराचं तुमाला. गप्प बसा झालं. नसत्या चौकश्या. शेजारणी आईबाई तुज्या डोस्क्याला कॅस का गं नाही. कां कराचं आपल्याला. त्यो कसं बोलतूया. येवढी माणसं खरं म्हणत्यात नव्हं. ती संमद्यी शानी हायत नव्हं? ती म्हणत्यात खरं तर खरं. गप वळा म्होरं बगून.'

आईनं बाला गप केला. पण हीच स्थिती सुप्रिया, साऱ्या गावाची होती. रेडिव नुकताच आला होता ना गावात. तुला सांगायचं म्हंजी कंच्याच गावाला तवा वाटा नव्हत्या. तसं फलटणवरनं निरगुडीला जायला गाडंवाट होती. ह्या गाडंवाटनं बैलगाडी जायला लागली तरी बैलांच्या पायांनी धुरळा उडायचा. गाडी येतीया हे कोसावनं समजायचं. नुसता फुफाटाच फुफाटा. खाचखळगं तर विचारूच नगं. एक पाय खड्ड्यात आन् दुसरा टाकला तरी खड्ड्यात. खड्ड्यातनं फुफट्यात. फुफाट्यातनं खड्ड्यात. एकांदी गाडी यायची. गाडी म्हणजे मोटार गाडी यायची गं! कवातरी. आम्हां गावातल्या पोरांना दोन कोस गाडी असली तरी समजायचं. वावटळीतली धूळ, पालापाचोळा जसा वर वर जातो ना आभाळाला भिडायला तसं. गाडी येतीया म्हणलं की धुळीचं लॉटच्या लॉट आभाळात दिसायला लागायचं. आता बी तसंच झालं. डाक्टरची एक मोटारगाडी व्हती. ती कवातरी गिरवीला जायाची निरगुडीवरनं. आम्ही मिरवणूक झाल्याबरोबर वाटंवरच खेळत व्हतो. तेवढ्यात आभाळात धुळीचं लॉट दिसायला लागलं. अंधार पडत होता तिन्हीसांजला. वावटळ तर नसंल? आमच्यातला एकजण म्हणाला, 'आली आली, आरं ती डाक्टरची डमडम आली. तसं आम्ही सारी पोरं वाटनं पळायला लागलो. जसं गाडी जवळ आली तसं धूळ बी लय उडायला लागली. गाडी म्होरं

गेली आन् तिज्यामागं त्या धुळीत आम्ही पोरं पळत व्हतो. आत्ताची पोरं नाय का तुमचं हेलीकॅप्टर उडाल्यावर धुळीच्या लोटात नाचत्यात तसं येड्यासारखं आनंदानं. नाकातोंडात, कानात, डोस्क्यात नुसती मातीच माती. सारीजण धुळीनं पार माखलो होतो. गाडी लांब जाईस्तोवर धुळीचा लोट उडत होताच. लोट संपला. आम्ही थांबलो. खेळा, खेळा, भाड्याहो, एक म्हातारा केकाटला. त्याच्या हातातली काटी बगून आम्ही पळालो. गवश्यानो आता ह्यो वाटंचा रस्ता हुईल. इकास नाचत ईल. दुसरा एकजन म्हणाला, म्हंजी काय हुईल गा? आरं इकास म्हंजी इकास. येवढ समजत न्हाय. आपलं यशवंतराव पुन्यांदी मुख्यमंत्री झाल्याती. आता सडाक सिमिट कांक्रीटाची हुईल. दुसरा म्हणाला, लय दांडगी सुय हुईल बाबा. आरं पायात पायतानं नसत्यात नव्हं गरिबाच्या. लय पायाला चटका बसतुया फुफाट्याचा. किती पाय उचलावं मानसानं. पर आता काळजी नाय. यशवंतराव आला आता बग, इकास हुईल म्हंजी इकास हुईल. रस्ता, पाणी, लाईट, साळा सारं हुईल. टोपी म्होरं सरकवीत, 'कसं? आगा काड तंबाकु काड.' म्हातारा म्हणाला, ती योजना म्हंजी काय रं. यशवंतराव रिडीवात सांगत व्हता नव्हं. आयला, लय बाबा, आवगड इचारतुयास.

अज्ञानाचा हा डोंगर अंगावर घिवून यशवंतरावांनी महाराष्ट्रासाठी, देशासाठी स्वप्न पाहिलं. त्यातली काही स्वप्नं तुला सांगायची असं ठरवलयं. तुला ती आवडतीलच माशाच्या पिल्लाला पाण्यात पोहायला शिकवावं लागत नाही.

आदरणीय बाबांना, सौ. वहिनींना सप्रेम जयभीम.

तुझा,
लक्ष्मणकाका

दिनांक १८/०२/२०१२

चि. सुप्रिया,

सप्रेम जयभीम.

'कृष्णाकाठी कुंडल आता, पहिले उरले नाही' या गोविंदाग्रजांच्या कवितेच्या ओळींनी चव्हाणसाहेबांनी 'कृष्णाकाठ' या त्यांच्या आत्मचरित्राची सुरुवात केली आहे. कृष्णेबद्दलचं प्रेम त्यांच्या मनामध्ये बाळकडूसारखं होतं. चव्हाणसाहेब आपल्यातून जाऊनही २५ वर्षं उलटून गेली. तरीही माझ्या मनामध्ये रुंजी घालणारा कृष्णाकाठ आणि यशवंतराव, कृष्णेच्या खोऱ्यातले आम्ही सारे भूमिपुत्र आणि यशवंतराव, नदीचं पाण्याशी जेवढं घट्ट नातं असतं, तेवढंच घट्ट नातं मराठी माणसांबरोबर यशवंतरावांचं होतं. ते स्वत:ला या सगळ्यापस्नं वेगळं करूच शकले नाहीत. महाराष्ट्राच्या आणि राष्ट्राच्या बरोबर असलेलं त्यांचं नातं हे अभिजात होतं. कृष्णा, कोयना, भीमा, निरा यांनी जसं आम्हाला समृद्ध केलं आहे, तसंच यशवंतरावांनी आमची आयुष्यं समृद्ध केली आहेत. त्यामुळे त्यांनी आणि त्यांच्या पिढीनं दिलेलं वैचारिक धन पाथेयासारखं माझ्या पिढीला सगळ्या प्रवासात वापरता आलं. ते जिथे जिथे भेटले, जसे जसे भेटले तसे तसे जीवनाच्या वेगवेगळया टप्प्यांवर भावले. दह्यारी, दुधारी, तुपारी, ताकारी, लोणारी ही सारी कृष्णाकाठची गावं. तिच्या समृद्ध वैभवाची साक्ष. याच नदीच्या काठावर यशवंतरावांची पावलं मोठी मोठी होत जाताना या कृष्णामाईनं पाहिली. कृष्णेचं खोरं हे भौतिक अर्थानं समृद्ध, तेवढचं साहित्य-संगीत-कला या साऱ्या सांस्कृतिक आयामांनी भरलेलं. या साऱ्याचा एकजीव रस म्हणजे यशवंतराव. तर काय सांगत होतो, तेव्हा पावसाळा नुकताच संपला होता. फलटण-बारामतीचा पाऊस तुला ठाऊक आहेच. यशवंतरावांनी काय केलं? असा प्रश्न तुमच्या पिढीला नेहमी पडत असणार, हो ना? आजची तुमची सायबर पिढी आहे. आम्हाला साधा मोबाईल वापरता येत नाही. नातवंडं लीलया सारी अत्याधुनिक उपकरणं वापरतात याचं मला खूप नवल वाटतं. त्या अर्थानं तुमची मुलं, तुम्ही खरंच फार हुशार आहात. पण हे जे जग आज तुमच्या मुठीत आहे ना, तिथवरचा प्रवास फार

महत्त्वाचा आहे. तो काळ आजच्यासारखी साधनं नसल्यानं टिपून ठेवता आलेला नाही. तो जो काही शब्दांमध्ये पकडता येईल तेवढा पकडायचा हा प्रयत्न.

तर काय सांगत होतो? फलटणचा पावसाळा नेहमीच बिनभरवशाचा. आला आला म्हणत वाळवाणं अंगणात गोळा करावीत तोवर गायब. गेला गेला म्हणून निवांत राहावं तर क्षणात सारं आभाळ काळंभोर आणि मुसळावानी विजावाऱ्यासह पडणारा पाऊस. विजांचा कडकडाट आणि ढगांच्या गडगडाटानं तुफान कोसळू लागलं की गाईगुरांना, पशुपक्ष्यांना, वृक्षवेलींना कुठे तोंड लपवावं हे कळत नसे. वारा असा पिंगा घाली की कंबरेतून गोल फिरणारी, केस मोकळे सोडलेली, पिंगाकरी बाई जशी पिंगा घालते तसं तुफान सुरू झालं ना की झाडं गरगरायला लागत. कडाडा फांद्या मोडून पडत. जीव मुठीत धरून सारी माणसं आडोशाला पळत असत. नाले, ओढे, भरभरून धावत सुटत. आणि तसा अचानक आलेला हा पाऊस अचानक क्षणांत निघूनही जात असे. पिकापाण्याची, घरादारांची फार फार दुर्दशा करून जात असे. त्याला वळीव म्हणतात. सांगून येणार नाही आणि सांगून जाणार नाही.

निरेला पूर आला की सारी वाहतूक बंद. सोमंथळीतून सांगवीला जायचं तर, निरेला बारा महिने तेव्हा पाणी असे. पूर येई तो पार सांगवीची चावडी आहे ना आपली, तिथवर. सोमंथळीत तर पाणी पार गावात घुसायचं. तिन्ही बाजूंनी ओढे. निरेला तेव्हा पूल नव्हता. नदीच्या पात्राला ओलांडायचं तर नावेनं जावं लागत असे. सांगवीच्या शाळेच्या मागे या नावा लावलेल्या असायच्या. सांगवीचा बाजार शुक्रवारी भरत असे. दोन्ही तालुक्यांतली माणसं बाजारहाटाला सांगवीला येत. नदीला पाणी आलं की नावेत बसून आम्ही सांगवीला जायचो. नावेत बिघाड झाला, नावकरी नसला की माणसं, म्हंजे पुरुष माणसं नदीपात्रात उड्या टाकत आणि पोहत येत असत. असे पट्टीचे पोहणारे होते, सांगू तुला! मीही लहानपणापासून नदीत पोहत असे. आमचं एक पाचदहाजणांच टोळकंच होतं म्हणना. नदीला पूर आला की आम्ही पळत गावापासून दोनतीन किलोमीटर नदीच्या वरच्या बाजूला जात असायचो. नदीत उड्या मारायच्या, पुरात पोहायचं तसं धाडसाचं पण सोपं. भीती वाटली ना पाण्याची, की मेला. भोवऱ्यात सापडला तरी मेला. गावातल्या लोकांच्या नजरा चुकवून आम्ही पोरं पुरात उड्या मारायचो, पोहायचो. पुरातनं त्यावेळी कलिंगड, टरबूज वाहत येत. त्यातला वेल पकडायचा, पायानं तो सारा वेल वाहत, पाण्याबरोबर पोहत गावाजवळ नदीच्या कडेला आणायचा. पूर बघायला आलेले गावकरी शिव्या देत वेल पकडू लागत आणि वेलाला लागलेली कलिंगडं मग साऱ्या गावांत वाटली जात. सारा गाव एकीकडे पुरानं धास्तावलेला असायचा,

दुसरीकडे 'पोरं म्हणजे फार हुशार' म्हणून शाबासकी द्यायचा.

पुरात वाहत येणारी मोठमोठी झाडं, लाकडं, सारं दावी धरून आम्ही बाहेर काढत असू. अशी जमलेली लाकडं शिमग्याच्या होळीसाठी देवळाम्होरं साठवून ठेवत असायचो. पण कुणी माणूस आजारी पडला, बायांची बाळंतपणात अडचण झाली तर गाव बंद असायचा. फलटणला जाता यायचं नाही. गाव ओढे पुरांनी वेढलेलं. बारामतीला जाता यायचं नाही, नदी आडवी. नावाडी सांगवीला, बोलावणार कसं? नाव अलिकडं असली तिच्या नशिबानं तर जीव वाचणार, नाहीतर बाळ, बाळंतिनीला मुठमाती द्यावी लागायची.

अशी बेटाबेटांमध्ये अडकलेली गावं, पुरानं वेढलेली गावं, माणसं. दळणवळणाची कोणतीच सोय नसलेला काळ तो. सर्व्हिस मोटारी होत्या पण ओढ्यांना, नदीला पूर आला म्हंजे काय करणार, मोटार तरी? व्यापार नव्हताच म्हटलं तरी चालेल. एकाददुसरं किराणामालाचं गावात दुकान. तेही गुजरातवरनं आलेल्या गुजराती माणसाचं. त्यात जे काही मिळेल ते वाणसामान. काडेपेटी, चहापत्ती, साखर आणि सगळ्यात महत्त्वाचं म्हंजे रॉकेल. रॉकेलवरनं लक्षात आलं म्हणून सांगतो, गावं सारी अंधारात बुडालेली. तिन्ही सांजा झाल्या की दिवा लावायचा. ज्याची बरी ऐपत त्याच्या घरी काचेचे कंदील. गोरगरीब माणसांकडे चिमण्या. चिमणी म्हणजे त्रिकोणी आकाराची पत्र्याची बुदली. तिला वात घालायला रॉकेल ओतायला टोपण असायचं. टोपणाला एक भोक असायचं. त्या भोकातून कापडाची चिंधी सरकवायची. ती रॉकेलमध्ये भिजवायची आणि चिमणी रॉकेलनं भरायची. एक चिमणी पेटली की बास! साऱ्यांच्या चिमण्या पेटत. मिणमिणता उजेड. अगदी चूल पेटवायलासुद्धा आयाबाया एकमेकीला आपआपल्या चुलीतला विस्तव उलतान्यातनं देत असत. काडेपेटी नसायची ना? चौकाचौकात खांबावर ग्रामपंचायत दिवे लावत असायची. त्या खंदिलाच्या उजेडात गावकरी रात्ररात्रभर लेझीम खेळत असत. मी लेझीम बरा खेळत असे पण ढोल मात्र छान वाजवायचो. रस्त्यावरला खंदील विझला की सारं गावं अंधारात बुडून जायाचं. त्यानं चोऱ्यामाऱ्या, दरोडं यांना ऊत आलेला असायचा. रातच्याला आठ वाजता सारं गाव चिडीचूप झोपी जायाचं.

आम्हा पोरांना अभ्यासाला शाळंत जावं लागायचं. शिक्षकही शिकवणीला मुक्कामाला असायचे. पोरांनी वाकळा, गोधड्या, रकटी, फाटकीतुटकी आणि दप्तर म्हंजे बाजारातल्या थैल्या, पिशव्या. तुमच्या मुलांसारख्या सॅक-बिक नव्हत्या. दोन्ही बंद काखेला मारायचे, हातात चिमणी पेटवून घ्यायची आणि अंधारातनं वाट काढीत शाळेत पोहचायचं. सारी पोरं आशीच येत. पोरी शाळेत नसायच्या.

एखादीच असली तर ती अभ्यासाला नसायची. त्यामुळे सारी पोरंच. मी जरा आगाऊ. सगळ्यांचा मार खाणारा, शिव्या खाणारा. सारी पोरं झोपली की झोपण्याचं सोंग करायचं. शिक्षकही आमच्याच बरोबर झोपलेले असायचे. आपली गरिबाची चिमणी. रॉकेल नसायचं. शिक्षक भल्या पहाटे अभ्यासाला उठवायचे. तेव्हा रॉकेल पायजे. मंग रात्रीच कुणाच्या तरी चिमणीतलं रॉकेल आपल्या चिमणीत वतून घ्यायचं आणि त्याची चिमणी आपल्या 'शू'नं भरून टाकायची. पहाटे सर्वात आधी उठून शांतपणे अभ्यासाला बसायचे. प्रत्येकजण आपली चिमणी पेटवत असे. आपल्या पुढ्यात आपली चिमणी पाहिजे. चिमणीच्या काजळाचा धूर ज्याच्यात्याच्या नाकातोंडात जात असे. नाकाची भोकं त्या काजळीनं काळी होऊन जात. आजही तो रॉकेलचा वास आणि चिमणीच्या धुराची काजळी माझ्या नाकात आहे. ज्यांच्या घरात चिमण्या होत्या आणि नाकात काळं काजळ, त्यांनाच समजेल की यशवंतरावांनी काय केलं. तर पहाटे सगळे जीव लावून अभ्यास करायला बसत, पण ज्याचं रॉकेल मी माझ्या चिमणीत ओतून घेतलेलं असे त्याची चिमणी पेटत नसे. ती नुसती तुडतुडायची. पेटायची नाही. ती कशी पेटणार? मी आपण त्या गावचेच नाही असा अभ्यासात मग्न असायचो. तक्रार गुरुजींकडे जायची. कोण कबूल होणार? ज्याची स्थिती बरी तो खंदील वापरत असे. मग गुरुजी संतापून सगळ्यांना रुळांनी सपासप छड्या द्यायचे. मुकाट्यानं सारेजण मार खात असू. गुरुजी फार चांगले, तेही मग रडत. असे शिक्षक जे मार मारत आणि पुन्हा लागलं ना रे सगळ्यांना म्हणून डोळ्यांच्या कडा पुशीत! सुप्रिया, सांग आता असले एक तरी गुरुजी असतील काय?

अचानक गावांत चर्चा सुरू झाली. आम्ही काही दिवस निरगुडीला, काही दिवस सोमंथळीला, काही दिवस काजडबोरीला म्हंजे इंदापूरला राहत होतो. माझे आईवडील गाढवांच्या पाठीवरनं माती वहाण्याचं कामं करीत होते. अचानक वडिलांना, चुलत्यांना गाढवावर माती वाहण्याचं काम मिळालं. निरा नदीवर पूल होणार, बारमाही नदीवरनं पलिकडं जाता येणार. आन् महत्त्वाचं म्हंजे वाहतूक सुरू होणार. गावात चर्चाच चर्चा. यशवंतराव महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले होते. निरा नदीवर पूल होणार होता. गावात माणसांला कामं मिळणार होती. त्यानं सारीच गरीब माणसं आनंदून गेली होती. आमच्याही गाढवांना रोजगार मिळाला होता. आता फलटण-बारामती रस्ता सिमेंट कॉंक्रीटचा होणार. स्वातंत्र्याचा पहिला धडा सारेजण गिरवत होते. फलटणचे महाराज बांधकाम खात्याचे मंत्री होते. बगता बगता कामांनी गती घेतली. पिलर उभे रहायला लागले. नदीत उभे राहणारं हे काम पाहायला माणसांची मोठी गर्दी व्हायची. मी तर शाळेला दांड्या मारून

काम करू लागलो. आता मी बराच कळीत झालो होतो. बगता बगता पुलाचं काम आकाराला येऊ लागलं. स्लॅब पडला. सांगवी, सोमंथळी, शिरवली, अलिकडची सांगवी, साऱ्या गावात एकच चर्चा होती. यशवंतरावांनी पिढ्यांची सोय केली. दोन तालुके जोडले. दोन जिल्हे जोडले. पाउसकाळात होणारी कोंडी फुटली. हाताला कामं मिळाली. दोन येळा चूल पेटाया लागली. सारी गोरगरीब रयत यशवंतरावांना प्रेमानं 'साहेब' म्हणू लागली. सायबानं रस्ता केला. सायबानं पूल बांधला. फलटण-बारामती जोडलं गेलं. पुलाचा स्लॅब झाला आन् आम्ही पोरं पुलावरनं नुसतं पळत सुटायचो. बगता बगता वाहतूक सुरू झाली.

या पुलावरनं आठवलं म्हणून सांगतो, एकदा नदीला मोठा पूर आला होता. तुझे बाबा फार धाडसी. ते काही कामासाठी फलटणला आले होते. जीप होती तेंव्हा त्यांच्याकडे. ड्रायव्हिंगही तेच करीत होते. नदीला पाणी वाढलेलं. पुलावरनं पाणी वाहू लागलं होतं. पुलाचे लोखंडी कठडे तेवढे दिसत होते. साखळीला पाणी लागलं होतं. पूर केव्हा ओसरेल माहिती नाही. तुझ्या बाबांची जीप पुलाजवळ आली. गाडीतून खाली उतरले, अंदाज घेतला. सारे गावकरी त्यांना विनवत होते, आसलं नाही ते धाडस करू नका. पुरात गाडी घालू नका. पण शारदाबाईंचा हा तरणाताठ पोरगा कोणाचं ऐकेना. घातली ना त्यांनी पाण्यात गाडी. काळजाचा ठोका चुकावा आसं हे अचाट धाडस. माणसं दोन्ही बाजूला पुलावर श्वास रोखून बगत होती. तरणी पोरं प्रोत्साहन देत होती. तर शिट्ट्या वाजवणाऱ्या पोरांना म्हातारी माणसं शिव्या देत होती. बगता बगता गाडी अर्ध्या पुलाला ओलांडून गेली. जर गाडी बंद पडली तर काय होणार, पाणी वरवर वाढत चाललंय. काळजाचं पाणी पाणी झालतं माणसांच्या. आणि गाडी पोहोचली पलिकडे. सारी माणसं शिट्ट्या, टाळ्या वाजवून शरदरावांची वाहवा करीत होते. त्यांच्या धाडसाचं कौतुक करीत होती. ज्याच्या त्याच्या तोंडी होते ते यशवंतराव, शरदराव आणि शारदाबाई. शारदाबाई म्हणजे आमच्या परिसरातल्या गोरगरीब माणसांची सेवा करणाऱ्या मोठ्या नामवंत पुढारी. त्याकाळात तुझ्या बाबांपेक्षा बाईंनाच लोक जास्त ओळखत असत.

बाबांना, सौ. वहिनींना सप्रेम जयभीम.

तुझा,
लक्ष्मणकाका

दिनांक ११/०६/२०१२

चि. सुप्रिया,

सप्रेम जयभीम.

दिवस उन्हाळ्याचे व्हते. सुगी संपलीती. कैकाड्यांची बिऱ्हाडं आता बेंडाच्या तायाची जुळवाजुळव करण्यात दंग व्हती. तवा आमी शिंदी भांडवलीच्या वरकड माळावर आमची पालं मांडली व्हती. आठरापगड जातीची माणसं. अस्वलवाला, दरवेशी, सांगढोंग करणारे बहुरूपी. तुकादादा त्यातलाच एक. पांढराधुवार अंगरखा, पांढरंधुवाट धोतर, त्याच्यावर जाकीट आन् डोस्क्याला डावीकडं कलल्याली झोकदार टोपी. पायात वहाना. अगदी डिक्टो यशवंतरावच. जोडीला आत्माराम. धडधडीत देहाचा, पण स्वांग घेतलेलं इंग्रज पोलिसाचं, गुडग्यात पाय बांधल्याला. त्यात एक पाय लंगडा आन् एक पाय चांगला. हातात काठी, अर्धी खाकी चड्डी, अर्धा खाकी सदरा खोचलेला, कंबरला पट्टा आन् डोस्क्याला इंग्रज पोलिस घालत तसली टोपी, डोळ्याला काचा नसलेला चष्मा. दोगं गाव मागायला निगालते. बा तुकादादाला म्हणाला, 'तुका, आज अगदी यशवंतरावावानी मोठा पुढारी झालायास. काय बेत काय हाय?'

दादा म्हणाला, 'दहिवडीला यशवंतरावांची सभा हाय नव्हं.'

'कवा?'

'हाय आठ-दहा दिसांनी, कालच शिंदीतली पुढारी मंडळी बोलत व्हती. तवापस्नं आपूनबी यशवंतरावांवानी कापडं करावीत म्हण दोन दिस म्या आन् आत्माराम सोंगाच्या तयारीला लागलू. आता पांढरा धोतार लागायचं, तर गाठलं पाटलाला.'

'पाटलानं काय सांगितलं? आसं स्वांग कर?'

'नाही बापूदा. आरं, त्याच्याकडूनच घितली नव्हं पांढरी जुनी कापडं, टोपी, सदरा, धोतार, जाकीट. सारं जुनं. मंग गेलू वड्याला. येस्करानं सांगितलं, गावातल्या म्हारूड्यांत शिपायाची कापडं हाईत. त्यालाबी गाठला. आणली जुनी शिपायाची कापडं. हिंगणबिटक्याची हिंगण हुडकून आणली बायकूनं. दोन दिस रोज वड्याला धुवायची. मंग झालं तयार. रातच्याला तांब्यात कोळसं घातलं. पोत्याव धोतार

हातारलं. फिरवला तांब्या, झाली इस्तरी. काय मंग, बायकू म्हणली, घ्या उशाला. घडी करून उशाला घितली. टोपी तर लय झॅक झाली बग. टोकं कशी काढल्यात. यशवंतरावानी दिसलं पायजेल ना?'

'आन वहाना रं?' बानं इचारलं.

'वहानांचं बी रामायण. सिताबायच्या मालतीचा इट्टल हाय नव्हं, त्यानं सांगितलंय, त्याच्या बापाच्या चपल्या अगदी डिक्टू यशवंतरावांच्या चपल्यावाणी हायेत. फॅशनच हाय तसली. तसल्या चपला घातल्या का म्हणत्यात, यशवंतरावांवानी पायतानं कुठनं आणलीस गा? मंग गेलू पळत माळवाडीवर आन् जुन्यापान्या चपला मागितल्या. त्यो माळी म्हंजी स्वातंत्र्यसैनिक. त्यानं पायजे तशा काढून दिल्या. बग, काटा फुटल्याला न्हाय आजून.'

'आन् ह्या शिपायाचा पाय का बांधलागा? आरं, त्यो सांजपवतोर मरंलना.' बा म्हणला.

'आगा, पोटाला का बिबं घालील. नुसता आकडून तर बांधलाया ना. त्योबी चड्डीत. काटी हाय की टेकायला. त्यानं भार तर पडत न्हाय. नुसता रडतुया. आता स्वांग आनायचं म्हंजी दुकनारच की रं उलीसा. काय आत्माराम?'

'व्हय. व्हय आम्ही दोघांनी इचार केला. माझा पाय पत्री सरकारनं कापलाय.'

'आसं हाय व्हय!' बा म्हणला.

'इंग्रजांचा शिपाई ना? लय अत्याचार करीत व्हते. तवा यशवंतरावांनी डिक्टेटर म्हणून शिक्षा दिलीती पत्र्या ठोकायची.'

'आरं, यशवंतरावानं नव्हं. नाना पाटील अशा सजा द्यायाचे. त्यांनी दिली आसंल नव्हं.'

'आरं बाबा, आपल्याला का करायचं नामावली? यशवंतराव येणार हाईत नव्हं भाषणाला? त्यानं स्वांग घियाचं. बापू तुला सांगतू, तुझं टोपलं इल का मला इनायला? तसच हे बी हाय. खोटंनाटं स्वांगाचं ती. नाना पाटलांचा पवाडा आमचा ज्योती कसा रंगवू रंगवून म्हणतू. तसा यशवंतरावांचा बी पवाडा म्हणतू. त्यो पवाडा म्हणणार, त्याचं जोडीदार संबुळ वाजवणार, आन् आम्ही दोगं गर्दीत थाळ्या फिरवणार.'

आसं कायबाय म्हणत चार-पाच जणांची टोळी टाळ मृदंग वाजवीत माळावरनं खाली गावाकडं उतारली. आन् बा म्हणाला, 'आपूनबी उद्याच्याला दहिवडी गाठायची. तथं मोठी सभा हाय. लय माणसं जमत्याल खेड्यापाड्याची. चार कणग्यांची गिराईकं घावत्याल. झापं-कुडीकं खपत्याल. घावलं तर बॅन्डालाबी काम मिळंल. सारी बरोबरची बिराडं तयारीला लागली. उदारीपादारी उकळून घ्या. उद्या सकाळचं ऊनं व्हायाच्या आत दहिवडी गाठली पायजे.'

सुप्रिया, यशवंतराव, किसनवीर, नाना पाटील, बापूनाना कचरे, कासेगावकर

वैद्य, नागनाथअण्णा नायकवडी यांचे पोवाडे आमचे लोक गात असत. पूर्वी शिवाजी आणि शिवाजीच्या सवंगड्यांच्या पराक्रमाचे पोवाडे गाणारे शाहीर आमचेच, हागनदारीत राहणारे. या लोककलावंतांनीच गांधी, नेहरू, सुभाषबाबू, यशवंतराव यांचे पोवाडे खेड्यापाड्यात नेले. काँग्रेस पक्ष गोरगरिबांपर्यंत यांनीच नेला. दांगट, गोसावी, जोशी, नाथपंथी डवरी गोसावी हे अत्यंत शीघ्र कवी यशवंतरावांच्या पराक्रमाच्या कथा बहारीनं सादर करत असत. खेड्यापाड्यात त्या काळात हीच करमणूक व्हती, प्रबोधन व्हतं. टी.व्ही. आतासारखा घराघरात नव्हता. सिनेमासुद्धा मोठ्या शहरात व्हता. भारूडं, तमाशा, पोवाडे, गोंधळ, जागरणं, बहुरूप्यांची सोंगं, नाना रंगाचे नाना ढंगांचे आमचे लोक माणसांबरोबर जनावरांचेही खेळ करीत. केवळ कवनांनी जिताजागता भूतकाळ लोकांपुढं उभा करीत. यशवंतराव आता या आख्यायिकांचा भाग झाले व्हते. नाना पाटील, यशवंतराव, नागनाथअण्णा, किसनवीर, साताऱ्यातल्या घराघरात गेले, ते या लोकांच्या प्रसारामुळे. प्रचाराची मोठी फळी बिनपगारी, पोटावारी पक्षाला मिळायची. आता लोककलावंतांना मानधनं मिळतात. तशी ती तेव्हा नव्हती. या लोककलांना, लोककलावंतांना राजाश्रय दिला तो यशवंतरावांनी. नाट्यपरिषद मंडळ, राज्य नाट्यस्पर्धा, तमाशा विकास परिषद हे सारे उपक्रम यशवंतरावांनी सुरू केले. पुढे काही चाललेत, काही बंद पडले. भीक मागण्यासाठी हा समाज मात्र दारोदार हिंडतच राहिला.

दुसऱ्या दिवशी आमची गाढवं दहिवडीच्या वाटंला लागली. शंभू महादेवाच्या डोंगररांगांत त्यावेळी डोंगर उतरला की उताराला दगडांची चवतळ असायची. सगळ्यांनी एकावर एक दगडं मांडायची. मग म्होरं जायचं. सारे वाटसरू तसं करीत. असं का करीत, माहीत नाही. दगडं पडली तरी ती पुन्हा रचायची. मगच पुढं जायचं. काय असेल या दगडात, शोधलं पाहिजे. भरदुपारी आम्ही दहिवडीत पोहोचलो. त्याकाळी बाजारतळावर भटक्यांची पालं पडलेली असत. घिसाडी, कैकाडी, दांगट, जोशी, माकडवाले, दरवेशी– कितीतरी जातीचे भिकमागते, बाजारतळावर आपापल्या भाईबंदांबरूबर पालं मांडून पोटापाण्याचा धंदा करीत व्हते. आमची बिराडंबी त्यात जावून मिसळली. दहिवडीचा हा बाजारतळ म्हणजे तिकाटणे. म्हसवडला जाणारा रस्ता, नात्यापुत्याकडे जाणारा रस्ता, साताऱ्याकडं जाणारा रस्ता– असं तिन्ही रस्त्यांच्यामध्ये हे तिकाटनं झाल्यालं होतं. याला बाजारतळ म्हणत. बाजारतळ म्हणजे फार मोठी मोकळी जागा. दहिवडी त्यावेळी आतासारखं शहरवजा नव्हतं. मोठं खेडं व्हतं. आठवडी बाजाराचं. आम्ही चारपाच दिस तिथं राहिलो. एका संध्याकाळी गावातले कार्यकर्ते, म्होरके, आम्हा लोकांच्या बिराडावर आले. तसं सारी माणसांनी गर्दी केली. पुढारी सांगत व्हते, उद्याला यशवंतरावांची सभा आहे. तुमची सारी बिराडं, पालं नदीच्या पात्रात तात्पुरती हलवा. सभा झाल्यावर मग पुन्यांदा या. साऱ्यांनी

होकार भरला. सभेसाठी सारा बाजारतळ झाडूनझुडून स्वच्छ केलाता. एका बाजूला भलं मोठं स्टेज बांधलंत. बैलजोडीची निशानी भिंतीभिंतीवर काढल्याती. तिरंगा झेंड्यांनी सारा बाजारतळ सजवला व्हता. दिस ऊनाचं, माणदेशी ऊनाचा चटका मैंदाळ, तुझ्यासारख्यांना सोड, तिथं राहणारालासुद्धा त्वांड बाहेर काढता यायच नाय. असा ऊनाचा रक. तरी आकरीत आसं, की हळूहळू माणसं जमायला लागली! मटकीला मॉड फुटावं तसं बाजारतळ माणसांनी फुलला. कुणाला तरी गावात कैकाड्यांची पालं उतारल्याचं लक्षात आलं. लागलीच कैकाड्यांना आदेश आला, यशवंतरावांची मिरवणूक उघड्या जिपीतनं काढायची हाय. बँडबाजा घिऊन या. सारे कैकाडी बॅन्ड वाजवीत. प्रत्येकाला मोठा मान मिळाल्यासारखं झालं. प्रत्येकाला साऱ्या समाजाम्होरं आपली कला दाखवता येईल आसं वाटलं. झाडून सारे आपापली सणगं घिवूनशानी निगाले. मी काहीच वाजवीत नव्हतो. पण बाच्या धोतराच्या सोग्याला धरून गर्दीत मिसाळलो. यशवंतरावांच्या गाडीबरोबर आणखीन चारपाच गाड्या होत्या. नदी ओलांडून गाड्या अलिकडं आल्या. गावकऱ्यांनी सजवलेल्या उघड्या जीपमध्ये यशवंतराव, मालोजीराजे, आणखीही एक कुणी भिंगारदिवे उभे राहिले. सारे लोक कॉंग्रेसचा, यशवंतरावांचा, गांधी-नेहरूंचा जयजयकार करत, जयघोष करत निगाले. मिरवणुकीच्या सर्वात पुढे बॅन्डवाले वाजवीत होते. मिरवणूक सारी गावभर फिरली आन् बैलजोडीचा प्रचार करत गाडी तळावर म्हणजे बाजारतळावर आली. लय खच्चून गर्दी जमलीती. स्टेजवर मऊशार गाद्या घातल्यात्या. पांढरीशुभ्र कापडी बिछाती घालून गाद्या सजवल्यात्या. लोड-तक्के नीटनेटके लावले व्हते. यशवंतराव, मालोजीराजे स्टेजवर गेले. गावच्या पुढाऱ्यांनी साऱ्यांना बैजवार बसवले. हारतुरे झाले आणि स्टेजवर एकदम कालवा झाला. भराभर गाद्या उचकटल्या गेल्या. सारी सभा बसलेली उठली. गर्दी म्होरं म्होरं सरू लागली. काय झालं? काय झालं? एकच कालवा उसळला. माईकवरून खाली बसण्याच्या सूचना सुरू झाल्या. कुणीतरी पायतानानं स्टेजवर गादीवर मारीत व्हता. कुणालाच काही कळत नव्हतं. 'यशवंतरावास्नी विंचू चावला' कुणीतरी म्हणाला. आन् बगता बगता कालवा थांबला. ज्यो त्यो 'विंचू चावला, विंचू चावला' म्हणू लागला. कुणी मांत्रिक गर्दीतनं स्टेजकडं पळू लागला. आंगारा, धुपारा करणारे होते, तसे वैद्य हकीमही गर्दीतनं स्टेजकडे पळू लागले. त्यानं पुन्हा कालवा झाला. यशवंतराव शांतपणे उठले. सारे उपचार नाकारले आणि माईक हाती घेतला. तेवढ्यात एका माणसानं पानाचा विडा दिला, तो त्यांनी तोंडात घातला आणि जसं काही झालंच नाही, अशा थाटात यशवंतराव बोलू लागले. सभा डोलू लागली. हळूहळू सभा एवढी रंगली, की हास्य, विनोद, टाळ्या, कोपरखळ्या, चिमटे यांत सारे जणू काही विसरून गेले की, यशवंतरावांना विंचू चावला आहे! विंचू चावला असेल, तर तुलाही समजेल काय

यातना असतात. मुंग्यांनी घाम फुटत असतो. पण या माणसानं अख्खी सभा खिशात घातली. सभा यशवंतरावांनी जिंकली, ते खाली बसले. सभा संपली. प्रत्येकाच्या डोक्यात राहिले ते यशवंतराव. विंचू चावला असताना स्थितप्रज्ञासारखं भाषण देणारे यशवंतराव. त्यांचा धीरोदत्तपणा, त्यांची कणखरवृत्ती, कळा सोसण्याची अफाट शक्ती. मी लहान होतो. माझ्या लक्षात राहिलं ते भाषण नव्हे, ते माझं वय पण नव्हतं. विंचू चावला तरी कळा सोशीत केलेलं त्यांचं भाषण, सोशिकपणा याचीच चर्चा साऱ्या तालुकाभर व्हती. तशाही स्थितीत तुकाराम, आत्माराम यांनी यशवंतरावांची केलेली नक्कल बघून गर्दीतले यशवंतराव जवळ आले. हसले. यशवंतरावांनी पाठीवर थाप मारली. 'वा गड्यांनो' म्हणाले आणि गाडीत बसले. कोण कौतुक दोघांना! खुद्द यशवंतरावांचा स्पर्श झाला. स्वर्ग दोन बोटं उरला. बिऱ्हाडावर हीच चर्चा व्हती. सारी माणसं आनंदून गेलीती.

मी मोठा झालो. त्यांच्याबरोबर गाडीतून त्यांच्यासोबत हिंडू लागलो. एकदा मी त्यांना या सभेची आठवण सांगितली आणि विचारलं, 'साहेब, विंचवाच्या कळा नव्हत्या का येत?' साहेबांनी माझं कौतुक केलं, लक्षात ठेवल्याबद्दल. म्हणाले, 'अहो, तो विंचूच ना? विष तर चढतच होतं. कळाही सुरू होत्या. ठणका, उन्हाचा दणका, यातनांनी खूप बेजार. पण, उन्हातान्हातनं आलेली माणसं. त्यांचा केवढा विरस होणार? विंचवानं कोणी मरत नाही. आणखी गंमत सांगतो, मी पोटात असताना देवराष्ट्रात आईला विंचू चावला होता. त्यानं मला विंचू फारसा चढत नाही, असं आईनं सांगितलं होतं.'

'पण साहेब, तास-दीड तास भाषण कसं केलंत?'

'अहो, त्याचं असं आहे. विंचू त्याचं काम करीत होता. मी माझं काम करत होतो. सभा उधळली जाणं पक्षाला परवडणारं नव्हतं. माणसं जशी उतरवणारी असतात, तशी चढवणारीही असतात. राजकारणही असंच असतं ना? कुणी चढवणारे असतात, कुणी पाडणारे असतात. आपण आपलं काम करत राहिलं पाहिजे.'

यशवंतरावांच्या सहनशिलतेला सलाम! खेड्यापाड्यातून आलेले शेतकरी हे खरं त्यांचं दैवत. सभा संपल्यावर वैद्यांनी औषध दिलं. तोपर्यंत तो विंचू उतरत होता. जनतेसाठी देहभान विसरून काम करणारा नेता. आम्हा भिक्षा मागणारांतही किती पॉप्युलर होता. नाहीतर आताचं राजकारण आन् पुढारी! सारा आनंद आहे!!

ती. बाबांना आणि सौ. वहिनींना सप्रेम जयभीम.

तुझा,<br>
लक्ष्मणकाका

दिनांक १६ जून २०१२

चि. सुप्रिया,

सप्रेम जयभीम.

दिवस पावसाळ्याचे व्हते. आमचा फलटणचा पाऊस म्हणजे बिनभरवशाचा खेळ. शेतकरी आकाशाकडे डोळे लावून बसलेला. शेती हा तसा नेहमीच आतबट्ट्याचा खेळ. पावसानं ओढ दिलेली, त्यानं खरीपातल्या पेरण्या रखडलेल्या. बाजरीची हिरवीगार कणसं रानात डोलू लागली की, जीव कसा कापसाच्या बोंडावाणी फुलतुया. पण चातकासारखी वाट बगून बी पावसाचा काळा ठिपकासुद्धा आभाळात दिसत नव्हता. नुसतं भनाना वारं सुटायचं. आमच्या शाळा सुरू झाल्यात्या. शाळांच्या वर्गखोल्यांचे उकिरडे झालेले असायचे. पयला आठवडा शाळांच्या जमीन करायच्या. साऱ्यांनी श्रमदान करायचं. खोलीतले खड्डे मुरमानं भरायचे. मुरमाची वाहतूक पोरांनी रांगा लावून करायची. मुलींनी गावभर हिंडून शेण गोळा करायचं, शेणाचा काला करायचा, शाळा सारवायची. अशी कामाची वाटणी असायची. वर्गातली सारावल्याली जमीन वाळंस्तोवर शाळा पटांगणात, लिंबाच्या झाडाखाली भरायची.

दुपारच्या लघवीची सुट्टी झाली आसंल, ऊन मैंदाळ तावत व्हतं. आमी निरगुडीतच व्हतो. पावसाळ्याचं चार महिने आम्ही गावात असायचो. माझी शाळा चार महिने बिनधोकपणे चालायची. त्यानं खूप मजा यायची. मी रमून जायचो. पावसाळा संपला, की सारी कैकाडआळी पोट भरायला निरगुडीतनं बाहेर पडायची. मंग कुणी कुठं जावं ते ठराचं, तर पावसाळा एका जागी काढायचा. मी नुकताच शाळेत जात व्हतो. मोठा झालो तरी पयलीतच बसत व्हतो. मागच्या वर्षी तर दसऱ्याला शाळंत नाव घातलंतं. ज्या गावात जाईन, तिथल्या शाळंत बसायचं. काही शाळा चांगल्या असायच्या. शिक्षक वर्गात बसू द्यायचे. पण काही शिक्षक खडूस असायचे. शिव्या देत. ‘तुझ्या बापानं अशी दोन दिवसांत शाळा शिकली होती का?’ मास्तर बापाला लय बोलायचा. मास्तरच्या पाया पडून बा बेजार व्हायचा. आली दया, तर बसू द्यायचा. नाहीतर बा पाट्या वळायला

शाळंच्या भिंतीला टिकून बसायचा आन् मी वरांड्यात बसून मास्तर जे शिकवतो ते बगत, ऐकत बसायचो. खूप राग यायचा. सत्तेपुढं शहाणपण चालत नाही, आसं बा म्हणायचा. माझी शाळा आशी सुरू तर झालीती. आन् दोन पारचं देशपांडे मास्तर आम्हा साऱ्या पोरांला गप बसवत म्हणाले, 'सारे उठून उभे राहा.' आम्ही रेटारेटी करत उभे राहिलो. धुराळा, खकाना उडाला. पोरं ठसकायला लागली. कायबाय खोटं खोटं खोकायला बी लागली. देशपांडे मास्तर म्हंजे धोतर, सदरा, काळ्याभोर झुपकेदार मिशा नि डोक्याला काळी कॅनव्हासची टोपी. मोठ्यानं खाकरले तशी पोरं चिडीचीप उभी राहिली. गुरुजींचा चेहरा फार रडवेला झालाता. त्यांनी सांगितलं, 'डोक्यावरल्या टोप्या काढा, खाली ठेवा आन् गपचिप उभे राहा. आज मातृहृदयी सानेगुरुजींची पुण्यतिथी. दोन मिनिटं मौन बाळगून त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात येणार आहे.' आम्ही सारे शांतपणे उभे राहिलो. मला काही कळून येत नव्हतं. 'खाली बसा' म्हणाले, बसलो. सानेगुरुजींची आवडती प्रार्थना सुरू झाली- 'खरा तो एकची धर्म-जगाला प्रेम अर्पावे'. देशपांडेगुरुजींचं छोटं भाषण झालं. आणि भंडारेगुरुजींनी सांगितलं, 'आता शाळेला सुट्टी आहे. उद्या मोठ्या पोरांनी लवकर यायचं आहे. सकाळी आठ वाजता. बोडक्याच्या वाडीला जायचं आहे. बोडक्याच्या वाडीला शाळेच्या इमारतीचं उद्घाटन आहे. त्याला मुख्यमंत्री मा.ना.यशवंतरावजी चव्हाणसाहेब येणार आहेत.'

माझ्या डोसक्यात फार बसलं नाही, पण सुट्टी मिळाली याचाच आनंद जास्त व्हता. मोठी पोरं गाण्यांचा कार्यक्रम करणार व्हती. जगतापगुरुजींनी गाणी बसवली व्हती. मोठा उत्साह व्हता पोरांच्यात. राज्याचे मुख्यमंत्री पहिल्यांदाच आमच्या परिसरात येणार व्हते. लाल बावटावालेसुद्धा आनंदून गेले व्हते. पण तसं दाखवीत नव्हते. तालुक्यातल्या झाडून साऱ्या शाळांतली मोठी पोरं-पोरी, मास्तर, गावातले पुढारी, सारे खादीचे कपडे घालून खादीच्या टोप्या घालून दुसऱ्या दिवशी निगाले. मला खूप रडायला यायला लागलं. मी बाच्या मागं लागलो, मला यायचंय. बाला माझं वझं नको होतं. गावातली सारी पोरं निगाली व्हती. मला कुणी नेत नव्हतं. 'लहान हायेस, चेंगारशील, पळताबी यायचं नाही. मोठं झाल्यावर निहीन.' 'मला यशवंतरावास्नी बगायचं हाय' मी रडत मागं लागलो.

'आरं, बगितलयास की त्यानला.'

मी माझा हट्ट सोडत नव्हतो. धोतराचा सोगा धरून रडत होतो.

आई कळवळून म्हणाली, येवढं पॉर कळवळून रडतया तर का न्हाई नेत? बानं माझं गठुळं उचाललं आन् खांद्यावर मारलं. निघालो पाय पाय बोडक्याच्या वाडीला. एका कोपऱ्यातलं हे गाव निरगुडीपास्नं दोन कोस तर गिरवीपास्नं कोसभर.

आम्ही माळावरनं झपाझपा चालत निगालो. सारी पोरं, मास्तर, गावकरी पायपाय चालत निगालेते. जत्रंवाणी गर्दी झाली. ज्यो त्यो यशवंतरावांचं गुणगान गात व्हता. बेलिपाचा पोरगा. बेलिप म्हंजे काय? मला ठाव नव्हतं. इचारायची सोय बी नव्हती. सारी गर्दी बोडक्याच्या वाडीला सरकत व्हती. साळेचं उद्‌घाटन हे निमित्त. बाकी सारी माणसं जमली होती ते यशवंतरावांचं भाषण ऐकायला. बाच्या खांद्यावर बसून चालण्यात फार मजा असते. तू कधी बाबांच्या खांद्यावर बसली असशील काय? अशी माळरानातल्या वाटेनं चालली असशील काय? गंमत असते! मजेत बा शीळ वाजवीत असतो. मला त्याज्या डोक्यावर खरं तर ठेका धरायचा असतो. त्यावेळी 'विठ्ठला तू वेडा कुंभार' हे गाणं खूप प्रसिद्ध होतं. बा तेच गुणगुणत होता.

आम्ही आसं पोहोचलो, तर गर्दीऽऽ ही मरणाची. कोण पुढं जाऊ देणार? तेवढ्यात पोलिसांच्या शिट्ट्या वाजू लागल्या. लाल दिव्याच्या गाड्या भरवेगात कार्यक्रमाच्या जागी आल्या. खडाखडा गाड्यांचे दरवाजे वाजले. पांढऱ्या कापडांतली डझनानं पुढारी माणसं स्टेजवर आली. स्टेज म्हणजे शाळंच्या वरांड्याला धरूनच बांधलेलं लाकडी फळ्यांचं मचान. सारी माणसं उठल्यानं धूळ उडाली. तसं माईक सांगू लागला, 'खाली बसा, खाली बसा'. माणसं खाली बसली. शाळंतल्या मुलांनी कण्हेरीच्या फुलांची आरास केली व्हती. कमानीला लावलेल्या सिंद्धीच्या झाडांच्या फडांना रंगीबेरंगी चुरमुरे चिकटवलेले. सुंदर फुलांच्या गुच्च्यासारखे ते दिसत व्हते. साऱ्यांच्या नजरा पोरांच्या सजावटीनं सुखावल्या होत्या. आंब्याच्या पानांची तोरणं, झेंडूच्या माळा, मखमलीच्या फुलांचा सुवास चारी बाजूनं दरवळत व्हता. गावातल्या पुढाऱ्यांनी मंत्र्यांचे स्वागत केलं. हारतुरे झाले, आमच्या शाळंतल्या पोरांनी स्वागतगीत फार छान म्हटलं. त्यात जगताप गुरुजींचा ऊर अभिमानानं भरून आलाता. सारी पोरं, गुरुजी खुशीत व्हते. आमच्या शाळंला मान मिळाला होता ना! सभा सुरू व्हती. कमालीची शांतता व्हती. शिवारात कुणाच्या तरी मळ्यात विहिरीवर मोट चालली व्हती. तिच्या चाकाचा कुईकुई असा छान आवाज येत व्हता. मोटकरी आपल्या बैलांना रिजवीत मोठ्या खड्या आवाजात मोटंवरचं गाणं म्हणत व्हता. शेतकऱ्याच्या या स्वागतानं यशवंतराव भलतेच खूश दिसत व्हते. खेड्यापाड्यातले शिक्षक, विद्यार्थी, हजार-दोन हजार ग्रामस्थ जमलेले. साऱ्यांच्या डोक्यावर गांधी टोपी असल्यानं सभा पांढऱ्या टोपीतल्या बगळ्यांनी सजवल्यासारखी दिसत व्हती. माझी सारखी चुळबूळ चालली व्हती. अखेर बानं मला खांद्यावरनं खाली उतरवलं. मी गर्दीतनं वाट काढत माझ्या शाळेतल्या पोरांच्या घोळक्यात सामील झालो. तवा बरं वाटलं. यशवंतराव

बोलायला उभे राहिले.

'गड्यांनो, यायला जरा उशीर झाला. तुम्हाला उन्हात बसवून मी उशिरा आलो. येताना त्या मोटकऱ्याची झिल मला तुम्हापर्यंत यायला देईना. गाडी थांबवली, बांधाबांधानं विहिरीकडं गेलो. तर हा पंढरीचा विठूराया शेताला पाणी देण्यात दंग. कुणीतरी पुढारी येतोय हे त्याच्या ध्यानात बी नव्हतं. मी विहिरीच्या काठाला उभा राहून मोटंवरलं गाणं ऐकत खिनभर उभा राहिलो. त्यानं मला पाहिलं. धावत आला. मिठी मारली. गळाभेट झाली. मला पंढरीची वारी झाली. त्याची अस्तुरी गुडघाभर चिखलातनं आली. पोरं दोन-तीन दारी धरीत होती. गुडघ्याएवढी पोरं आईबापाला मदत करीत होती. शेतकरी मोट सोडून 'ह्यो आलोच सभेला' म्हणून बैलं सोडू लागला. त्याला मी अडवला. काम सुरू ठेवायला सांगितलं. पोरं शाळंत घालायला सांगितलं. आन् धावत आलो.'

हे म्हटल्याबरूबर टाळ्यांचा नुसता पाऊस पडला. हिरीवरचं चाकाचं वाजणं, तारस्वरातलं मोटकऱ्याचं गाणं चालूच होतं. सुप्रिया, तेव्हा इंजिनं नव्हती. मोटंनंच रानं भिजवायची. बागायती जवळपास नसायची. तुला सांगतो, क्वचितच गावातल्या शिवारात एखाद्या शेतकऱ्याकडं बागायती व्हती. बाकी सारी रानं जिरायती. पावसाच्या जिवावर पिकणारी. त्यानं शेतकऱ्याघरी अठराविश्व दारिद्र्य. अन्नदात्याच्याच पदरात पसाभर पडत आसंल तर बाकीच्यांना काय मिळणार? शाळा नावाला व्हत्या. पाच-पाच दहा-दहा मैलांवर शाळा असायची. गोरगरिबांची, खेड्यापाड्यातली पोरं कशी शिकणार? त्यानं सारेच अडाणी. यशवंतरावांसारखा नेता म्हणजे या जनतेच्या नाडीवर बोट असणारा नेता. संवेदनशीलता म्हंजे काय, ते मोठा झाल्यावर मला कळायला लागलं. ही संवेदनशीलता आज औषधालाही सापडत नाही राजकारणात, समाजकारणात.

तर चव्हाणसाहेब सांगत व्हते, 'या मोटेवरल्या विठोबाची पोरं आता या शाळेत आली पायजेल. शिक्षक बंधुभगिनींनो, गावात एकही मूल शाळेबाहेर ठेवायचं नाही. जातपात, धर्म, लिंग काहीही बघायचं नाही. कोणत्या का वयाचं मूल असेना. शाळेत बसवा. त्याला लिहायला-वाचायला शिकवा. वयाचा विचारच करू नका. सहा, सात, आठ, नऊ, दहा-कितीही वयाचं लेकरू असू द्या. बसवा त्याला वर्गात. गैरहजेरीची सोयच ठेवू नका. सारे हजरच ठेवा. शाळेच्या वेळा बदला. आता इंग्रज नाहीत. आपणच आपले मालक. शिकण्यासाठी कायदा, नियम कशाचीच तुम्हाला अडचण येणार नाही, हे मी बघेन. शाळा लवकर भरणार, रात्री उशिरापर्यंत चालू ठेवा. शेतकऱ्यांच्या पोरांना शिकवायचं आहे. शेतीची कामं लक्षात घेऊन वेळापत्रक तयार केलं पायजेल. शाळेत पोरं येत नसतील, तर

शाळा बांधाबांधावर भरवा. मी तुम्हाला उघड्यावागड्यावर बसू देणार नाही. ती माझी जबाबदारी. कुणाही पोराला किंवा पालकाला त्याचं उत्पन्न विचारू नका. आपल्या घटनेनं सगळ्यांना शिक्षण मोफत आणि समान करण्याची जबाबदारी आपल्या खांद्यावर टाकली आहे. सोयी, सवलती, तुमचे पगार, भत्ते, कशाचीच काळजी करू नका. मी तुम्हा साऱ्या गुरुजींच्या साक्षीनं या शाळेच्या इमारतीचं उद्घाटन झालं असं जाहीर करतो.

आता कार्यकर्त्यांसाठी थोडं सांगतो आणि मी आपली रजा घेतो. मी आपला फार वेळ घेणार नाही. महात्मा फुले, सावित्रीमाई फुले या दाम्पत्यानं आपल्या बहुजन समाजाला शिक्षणाची दारे खुली केली. जोतिराव म्हणाले होते,

विद्येविना मती गेली
मतीविना गती गेली
गतीविना वित्त गेले
वित्ताविना शूद्र खचले
इतके अनर्थ एका अविद्येने केले...

काय वाट्टेल ते करा, पण कष्ट करणाऱ्या, काम करणाऱ्या, शेतकऱ्यांची पोरं, गोरगरीब रयतेची पोरं शिकलीच पायजेल. एकही पोर उनाडक्या करत रानात, गावात हिंडणार नाही हे बघा. मुलं माझी की त्याची, हा प्रश्न नाही. मुलं ही देशाची संपत्ती आहे, हे लक्षात घ्या. कुणी बाप आपल्या मुलाला शाळेत पाठवत नसला तर त्याला माझा निरोप द्या. मुलाचं शिक्षण महत्त्वाचं. शिक्षण हा त्याचा हक्क आहे.'

आसं बरंच काही ते बोलले. मध्ये मध्ये टाळ्यांचा, हशांचा पाऊस पडत होता. सभा संपली, गाड्या निघून गेल्या. गावकरी, पंचक्रोशीतले शिक्षक यशवंतरावांच्या कौतुकात बुडाले व्हते. आमच्या शाळेतले आकोबा सस्तेगुरुजी माझ्या बाबरोबर बोलत होते. माझ्या बाला मला शिकवण्याची भलतीच घाई. आकोबागुरुजींनींच नाव शाळंत घातलेलं. ते बाला रागवत असावेत. पोरांचा कालवा. गर्दी. त्यात या दोघांचं बोलणं सुरू होतं.

सुप्रिया, अगं माझ्या शाळंची ही मोठी चित्तरकथा. गुरुजींनी पंचावन्न साली माझं नाव शाळंत घातलं ते दिवाळीला. म्हणजे ५५ साल गेलं. मी परीक्षेला बसलोच नाही. ५६ला मी सप्टेंबरपर्यंत निरगुडीत व्हतो. पुढे आम्ही पोट भरायला गेलो मावळात, कोकणात. तिकडून परत आलो, तर परीक्षा संपलेल्या. पुन्हा मी पहिलीत आणि सत्तावन्नलाबी मी पहिलीत! म्हणून गुरुजी रागवले व्हते बाला. आता परीक्षेला बसवलं नाहीस, तर हे वर्ष पण जाईल म्हणाले. मग बानं प्रयत्न

केले असावे. सत्तावन्नला मी पहिलीची परीक्षा दिली. यशवंतरावांच्या या सभेनं मला दुसरीत घातलं. पण ही गोष्ट काही माझी एकट्याची नाही. दहा-अकरा वर्षाचे, घोड्याएवढे घोडे पयली-दुसरीत असायचे. अगं, मी सातवीला गेलो ना, तेव्हा काही पोरांना दाढ्यामिश्या आल्या व्हत्या. गावात मुलगामुलगी उंडरत फिरतायेत म्हटलं, की गुरुजी मोठी पोरं घिऊन यायचे आन् अकरा वाजता साऱ्या गावातली पोरं उचलबांगडी करून शाळंत आणायचे. कुणी कुणी चारचारदा नापास व्हायचे. त्याच वर्गात. पाया पक्का झाला पायजेल ना? सारे हसत. पण, माझी शाळा मार्गाला लागली. मला शिकण्याची ओढ लागली. जिथं बिऱ्हाडं जात त्या गावच्च्या शाळेत मी जाऊ लागलो. दर तिसऱ्या दिवशी नवी शाळा, नवे गुरुजी, नवे सोबती, नव्या कविता, नव्या चाली. प्रत्येक शाळेतले शिक्षक कवितांना चाली लावत. माझा आवाज चांगला व्हता. मी एकच कविता अनेक चाली लावून म्हणत असे. त्यात प्रत्येक शाळंत मी हौसेनं कविता म्हणून दाखवत असे. परीक्षेला मात्र निरगुडीला जात असे. चौथी पास होईपर्यंत बा मला परीक्षेला घिऊन जात असल्याचं मला आठवतं. यशवंतराव नुसते मंत्री, मुख्यमंत्री नव्हते; तर ते बहुजन समाजातल्या गोरगरिबांच्या पोरालेकरांचे पालकही होते.

एकदा महाराष्ट्राचे माजी शिक्षण मंत्री मधुकरराव चौधरी मला सांगत होते, 'गरिबीमुळे ज्यांना शिक्षणापासून वंचित राहावे लागते अशा सर्व जातीधर्मातील गरीब बांधवांच्या मुलांना मोफत शिक्षण द्यावं असा प्रस्ताव समाजकल्याण विभागाच्या वतीनं मंत्रिमंडळाच्या एका सभेसमोर आला होता. कल्याणकारी राज्याचं एक पुरोगामी पाऊल म्हणून आम्ही अनेकांनी त्याचं स्वागत केलं, पण तेवढ्याच कडाक्याचा विरोध काही मुखंडांनी केला. राज्याच्या आर्थिक परिस्थितीचं कारण सांगण्यात आलं. यशवंतरावजींनी विरोध करणाऱ्यांची समजूत घालण्याचा खूप प्रयत्न केला. परंतु या योजनेसाठी तिजोरी उघड्याची शक्यता दिसेना. शेवटी गरीब बांधवांसाठी असलेली इतकी आवश्यक व पुरोगामी योजनाही आम्ही हाती घेऊ शकणार नसू तर हे मुख्यमंत्रीपद काय कामाचे, असे निर्वाणीचे उद्‌गार काढून ते रागारागानं बैठकीतून उठून गेले. त्यानंतर खूप भवती न भवती झाली. आम्ही काही सहकाऱ्यांनी समजावण्याची शिकस्त केली. तुटेपर्यंत ताणू नका म्हणून परोपरीनं सांगितलं. दबावाखाली का होईना, विरोधकांची मनं तयार झाली. यशवंतरावजींना परत बोलावण्यात आलं आणि ९०० रुपयांच्या खाली उत्पन्न असलेल्या, आर्थिकदृष्ट्या मागास इ.बी.सी. वर्गासाठी मोफत शिक्षण देण्याची योजना मंजूर झाली. आपलं मुख्यमंत्रीपद पणाला लावून यशवंतरावजींना ही योजना मंजूर करून घ्यावी लागली.'

सुप्रिया, म्हणून मी महाराष्ट्रातल्या खेड्यापाड्यातल्या गोरगरीबांच्या लेकरांचे यशवंतराव पालक होते असे म्हणालो. माझ्यासारख्या लाखो पोरांचं शिक्षण या क्रांतिकारी निर्णयानं झालं. आज आम्ही जे काही आहोत, ते या सवलतीमुळे, यशवंतरावांमुळे. या सभेत त्यांनी जे काही सांगितलं ते माझ्यासाठी शाळेचे बंद दरवाजे उघडणारं होतं, हे मी कधीही विसरत नाही. त्यांना विसरणं हा कृतघ्नपणा होईल. पुढे ही सवलत १२०० रुपयांपर्यंत वाढली. मी शिकत असताना ती २००० पर्यंत गेली होती. आता तिचं काय झालं आहे, मला माहिती नाही.

सौ. वहिनींना, बाबांना सप्रेम नमस्कार.

तुझा,
लक्ष्मणकाका

दिनांक २२/०६/२०१२

चि. सुप्रिया,

सप्रेम जयभीम.

यशवंतराव चव्हाणसाहेबांना मी अनेक वर्षं पाहिलं. त्यातल्या लहानपणच्या आठवणी मी तुला सांगत व्हतो. अशीच आणखी एक आठवण, जरा कळीतपणातली. मी प्राथमिक शाळेत व्हतो. पाचव्या इयत्तेत असेन. गोष्ट तशी म्हटलं तर गमतीची, आणि म्हटलं तर गंभीरही.

एके दिवशी दारातल्या चिंचंच्या झाडाखाली बा टोपल्या वळीत बसला व्हता. उन्हं कासराभर आली व्हती. आई घरातच व्हती. भाकरीचा खरपूस वास सुटला व्हता. मी बाच्या भोवताली गलुरीचा डाव खेळत व्हतो. घाणेरीच्या फोकांचा ढीग बा सपासप चिरीत व्हता. मध्येच तंबाकूची पिचकारी मारून 'विठ्ठला तू वेडा कुंभार' असं गाणं गुणगुणत व्हता. गावचा कुलकर्णी सायकल दामटीत गावातनं फलटणला निगाला व्हता. बाचं त्याच्याकडं लक्ष नव्हतं. म्होरं गेलेली सायकल एकदम मागं आली. सायकल स्टॅन्डला लावीत काका म्हणाला, 'काय बापू?' तेव्हा बानं वर बगितलं, अदबशीर उठून उभा राहिला. घाबऱ्या घाबऱ्या म्हणाला,

'काय म्हणता काका? म्या तर काय बी नाय केलं. आयची आन म्या काय नाय केलं.' बा हांजी हांजी करीत म्हणाला, काका हसला आणि म्हणाला,

'बापू, आरं काय नाय, जरा वेगळ्या कामानं आलो. फलटणला निगालो व्हतो. जरा इचार केला आन् मागारी आलो.' बानं आपलं बसायचं पोतं झाडलं, नीटनेटकं झटकून हातारलं आन् पारावर टाकलं. बसा म्हणला. आपण तुटाक उभं राहिला. मी खेळतच व्हतो. जरा कुतूहलानं म्होरं सराकलो.

काका हळू आवाजात बाला सांगत होता. 'बापू, आरं आमची घरं दारं साऱ्या लोकांनी राज्यभर जाळली. कोण तो गोडसे? त्यानं बापूजींना गोळ्या घातल्या. लोकक्षोभात साऱ्या राज्यभरातल्या बामणांची घरं दारं पेटवून राखरांगोळी केली. आमचा सारा समाज देशोधडीला लागला. सर्वत्र जाळपोळ झाली. घावलं ते घेऊन माणसं जीव मुठीत धरून शहाराकडे पळाली. जमीनजुमला, घरंदारं,

वाडं सारं जितल्या तितं राहिलं. कित्येकांना प्राण गमवावा लागला.' काका पंचानं डोळे पुशीत होता. बानं बी डोळे पुसले.

बा म्हणाला, 'आवं काका, पर आपल्या गावात कुठं काय झालं?'

'होरे बाबा, ही रावसाहेब धन्यांची कृपा. आम्ही जीव मुठीत घिऊन दार लावून बसलो होतो. आन् धनी दारात बसून राहिले. देशपांडे-कुलकर्ण्यांच्या घराकडे कुणी फिरकलासुद्धा नाही. चार दिवस पहारा ठेवला. गावाला समजावलं, आमच्या केसाला धक्का लागला नाही. आम्ही वाचलो. पण आता गावात राहायला बायको, पोरंलेकरं तयार नाहीत. माझं मन थाऱ्यावर नाही. म्हणून सारी मुलं लेकरं फलटणला हालावली. हुईल कसं तरी, पूजापाठासाठी गावात येतो. चार घरच्या पूजा करतो. महादेवाला अभिषेक असेल किंवा गावातले काही धार्मिक काम असेल, तर लोक येतात फलटणला. आता जीव उडालाय. सारी शान संपली. मानमरातब गेला. फुलं वेचली तिथं गवऱ्या वेचायची वेळ आली.'

बा आवंढा गिळत म्हणला,

'तुमच्यासारक्या मोठ्या लोकाची अशी गत झाली. काका आमी तर कायमचं वनवासी. कर्माचे भोग.'

'आरं, आता एक नवंच संकट आलंय कूळ कायद्याचं. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. सगळ्या लोकाला आनंद झाला. मलाही आनंद झाला. पण, त्यांनी नवा कायदा आणलाय. बापू, तो कायदा आमच्या मुळावर उठलाय. कसेल त्याची जमीन, जो वहिवाटदार आहे, कूळ आहे तोच त्या जमिनीचा मालक होणार. कागदावरचा मालकी हक्क संपला. आता मला सांग, काय करायचं आम्ही? माझी सारी जमीन कुळाकडं आहे. त्यातनं पांडुरंगाकडे आहे ती वाचेल. तो भला माणूस आहे. पण आठ बिग्यातली कशी वाचणार? ती घोडेवाल्याकडे आहे. त्याच्या वाटेला कोण जाणार? कायदा तर विपरीत झाला. पण कायद्यापेक्षा कुणी मोठा नसतो ना?'

बा नुसती मान हालवीत व्हता. काही समजून, काही ना समजून. दोन पाट्या झाल्या असत्या, पण सुतावाणी सरळ झालेला काका बगणं हेच मोठं कौतिकाचं हाय.

'तर मी काय म्हणतो. तुमा कैकाड्याची पाचपन्नास घरं आहेत. तुमाला गाव वचकून असतंया. तवा तू मला मदत करतोस का?'

'आवं, हे का बोलणं झालं, काका?' बा म्हणाला, 'काय बी सांगा की, फलटणला निहून सोडू काय?'

'नाही रे बाबा, तुमी सर्वजण आहात म्हणून माझ्या जीवाला कसला धोका

नाही. गोष्ट येगळी हाय.'

'बोला, बोला की,' बा म्हणला.

'माझी आठ बिग्यात वीस एकर काळीभोर जमीन हाय. ती हाय घोडेवाल्याकडं. ती जमीन मी तुझ्या नावावर करतो. तुला कूळ म्हणून दाखवतो. रेकॉर्डचं माझं मी बगतो. तुला कूळ म्हणून दाखवतो. त्यातली तुला पाच एकर मोफत देतो. उरलेली पंधरा एकर तू माझी मला परत दे. तुझ्यावर विश्वास आहे म्हणून म्हणतोय. तुझ्या आयुष्याचं कल्याण होईल. माझ्याही पोराबाळांचा आशीर्वाद तुला लागंल. न्हाय म्हणू नको.'

'आव काका, मला गरीबाला का करायची जमीन? दोन पाट्या वळल्या ना की दोन पायल्या ज्वारी येतीया. जमीन करायची म्हंजी लय लडतरी. बैलं करा, नांगरा, पेरा, काढा. न्हाय काका न्हाय. तुमी सारी जमीन देतो म्हणाला तरी न्हाय बा. हे आपल्याला व्हयाचं न्हाय. आम्ही घोडवाल्याला घाबरत न्हाय, हे खरं हाय. पण जमीन का करायची आम्हांला? आमच्यातलं कुणीच न्हाय तयार होणार जमीन घ्याला. आवं, सोन्याची सुरी आसली म्हण काय झालं? उरात कुणी खुपशील का? तुमचं मैंदाळ उपकार हाईत आम्हा लोकावर. दुसरं काय बी सांगा.'

काका म्हणाला, 'हात तुझ्या लेका, देव आला द्यायला आन् पदर नाही घ्यायला. चालू दे, चालू दे तुझं. येतो मी.' म्हणीत काकानं सायकलवर टांग टाकली. फलटणकडे निघून गेला. बामण गेल्याबरूबर बाजवळ आई आली नि इचारू लागली. 'काय म्हणत होता वो बामन?'

बानं सारं आईला हाळू आवाजात सांगितलं. 'मग का न्हाई म्हणला? चांगलं झालं आसतं. नशीबच फुटकं बगा. एक म्हण आकलंचं काम करत न्हाय. कसं चालून आलतं नशीब. तर माझंच कपाळ फुटकं' आईला फार वाईट वाटलं.

बानं जमिनीच्या पाच एकरावर जणू पाणी फिरवलं होतं.

बा म्हणला, 'आग येडे, बामन जवा एकांदी गोष्ट करायला सांगतू, ते बी आपणहून, तवा शान्यासारकं वागावं लागतं. बाकी समद्याचं येगळं आन् बामनाचं येगळं. आपला समदा राग व्हटात आन् बामणाचा पोटात. ते काय उगाच्या उगं जमीन द्याला उठला आसंन, ह्या लफड्यात काय गोच्याड नसंल? आपून गरीब कशाला आडकायचं असल्या कज्ज्यात? एक गाव उनं तर दस गाव पुणं. काय?'

आईनं मान हालवली आणि हे पुराण इथं संपवलं. फुडं या जमिनीवरनं फार रामायण झालं. पांडुरंग सस्त्याकडची जमीन आता बी कुणाला तरी वहिवाटीला दिली होती. प्रत्यक्ष ताबा होता कुतवळाचा. जमीन कुतवळच करत होते. पण ती कुळं म्हणून व्हती पाटलाच्या नावानं. कुतवळ म्हंजी वहिवाट माझी, जमीन माझी,

पाटील म्हणे, कूळ मी आहे. कागदोपत्री मालक मी आहे. झालं, कलागत सुरू झाली. पाटलांची आन् कुतवळांची बिग्यातल्या जमिनीवरनं तशी लढाईच जुंपली. रोज मारामाऱ्या, डोकी फुटायची. रोज दोनचार दवाखान्यात. पोलिस नाही का फिर्याद नाही. बामणाची जमीन गावात एक नंबरचा तुकडा. प्रकरण कोर्टात गेलं. दुसरी जमीन घोडंवाल्याकडं. जमीनदारीचा थाट होताच. कुळकायद्यानं आता घोडंवाला मालक झाला.

सुप्रिया, तुला सांगतो. यशवंतरावांनी हा कायदा काही स्वत:च्या पोरालेकरांसाठी केला नव्हता. जो जो प्रत्यक्ष राबतो, घाम गाळतो, त्या शेतकऱ्यासाठी क्रांतिकारक कायदा होता. तो कोणत्या स्थितीत होता, हे आपल्या सर्वांचे राष्ट्रपिता महात्मा जोतिराव फुले यांच्या शब्दातच पाहू या. काय स्थिती होती शेतकऱ्यांची? स्वातंत्र्य मिळालं ते केवळ राजकीय नव्हतं. आर्थिक, सामाजिक स्वातंत्र्यही होतं. एका वर्गानं दुसऱ्या वर्गाची लूट करणं म्हणजे स्वातंत्र्य नाही. एका जातीनं दुसऱ्या जातींना लुटणं म्हणजे स्वातंत्र्य नव्हतं. तो होता एक राजकीय, सामाजिक, आर्थिक गुलामगिरीतून मुक्त होण्याचा कायदा. पण याचा फारसा विचार आपल्या शहाण्यासुरत्या विद्वानांनी, पुढाऱ्यांनी केला नाही. तो कायदा कोणत्या स्वरूपात आला, तो कोणा एका जातीच्या विरोधात होता काय? १९४८ सालच्या दंगलीत ज्यांचं नुकसान झालं व्हतं त्यांची भरपाईही यशवंतरावांनीच दिली व्हती. ते यशवंतरावच व्हते. जातीपातीच्या पलीकडे गेलेले यशवंतराव महात्मा फुल्यांना अभिप्रेत असलेला, डॉ.बाबासाहेबांनी संविधानात दिलेला नवा समाज निर्मिण्याचं काम करणारे व्हते. तर काय सांगत व्हतो, महात्मा फुल्यांनी काय स्थिती सांगितली व्हती शेतकऱ्यांची, ती पाहूया. 'शेतकऱ्याचा आसूड' या त्यांच्या पुस्तकामध्ये अतिशय कष्टप्रद असं शेतकऱ्याचं जीवन उभं केलं आहे. ते म्हणतात,

''एक कुळवाडी एके दिवशी नदीच्या किनाऱ्याजवळच्या हवाशीर दाट आंबराईतील कलेक्टरसाहेबांच्या कचेरीच्या तंबूकडून, मोठ्या रागाच्या त्वेषात हातपाय आपटून, दातओठ खात आपल्या गावाकडे चालला आहे. ज्याचे वय सुमारे चाळिशीच्या भरावर असून हिमतीत थोडासा खचल्यासारखा दिसत होता. डोईवर पीळदार पंचाचे पांढरे पागोटे असून त्यावर फाटक्या पंचाने टापशी बांधलेली होती. अंगात खादीची दुहेरी बंडी व गुढवेचोळणा असून पायांत सातारी नकटा जुना जोडा होता. खांद्यावर जोट, त्यावर खारवी बटवा टाकला असून, एकंदर सर्व कपड्यांवर शिमग्यांतील रंगाचे पिवळेतांबूस शिंतोडे पडलेले होते. पायांच्या टाचा जाड व मजबूत होत्या खऱ्या, परंतु काही काही ठिकाणी उकलून भेगा पडल्यामुळे

थोडासा कुलपत चालत होता. हाताच्या कांबी रुंद असून, छाता पसरट होता, चोटीशिवाय भवूक दाढीमिशा ठेवल्यामुळे वरील दोन दोन फाळ्या दातांचा आयब झाकून गेला होता. डोळे व कपाळ विशाल असून आतील बुबूळ गारोळें भोऱ्या रंगाचे होते. शरीराचा रंग गोरा असून एकंदर सर्व चेहरामोहरा ठीक बेताचा होता, परंतु थोडासा वाटोळा होता. सुमारे बारावर दोन वाजल्यावर घरी पोहोचल्यावर जेवण झाल्यानंतर थोडासा आराम करण्याचे इराद्याने माजघराचे खोलीत जाऊन तेथे वलणीवरील बुरणूस घेऊन त्याने जमिनीवर अंथरला आणि त्यावर उशाखाली घोंगडीची वळकटी घेऊन तोंडावर अंगवस्त्र टाकून निजला, परंतु सकाळी उठून कलेक्टरसाहेबांची गाठ घेतली व ते आपल्या चहापाण्याच्या व खाण्यापिण्याच्या नादांत गुंग असल्यामुळे, त्यांच्याने माझी खरी हकिकत ऐकून घेऊन, त्याजपासून मला हप्ता पुढे देण्याविषयी मुदत मिळाली नाही. या काळजीने त्यास झोप येईना, तेव्हा त्याने उताणे पडून आपले दोन्ही हात उरावर ठेवून आपण आपल्याच मनाशी बावचळल्यासारखे बोलू लागला-

'इतर गावकऱ्यांसारखा मी पैमाष करणाऱ्या भटकामगारांची मूठ गार केली नाही, यास्तव त्यांनी टोपीवाल्यास सांगून मजवर शेतसारा दुपटीचे वर वाढविला व त्याच वर्षी पाऊस अळमटळम पडल्यामुळे एकंदर सर्व माझ्या शेत व बागाइती पिकास धक्का बसला. इतक्यात बाप वारला व त्याच्या दिवसमासाला बराच खर्च झाला, यामुळे पहिले वर्षी शेतसारा वारण्यापुरते कर्ज ब्राह्मण सावकारापासून काढून त्यास मळा गहाण देऊन रजिस्टर करून दिला. पुढे त्याने मन मानेल तसे, मुद्दल कर्जावरील व्याजाचे कच्च्यांचे बच्चे करून माझा बारवेचा मळा आपल्या घशांत सोडला. ज्या सावकाराच्या आईचा भाऊ रेव्हेन्यूसाहेबांचा दप्तरदार, चुलता कलेक्टरसाहेबांचा चिटणीस, थोरल्या बहिणीचा नवरा मुनसफ आणि बायकोचा बाप या तालुक्याचा फौजदार, याशिवाय एकंदर सर्व सरकारी कचेऱ्यांत त्यांचे जातवाले ब्राह्मणकामगार, अशा सावकाराबरोबर वाद घातला असता, तर त्याच्या सर्व ब्राह्मण आप्तकामगारांनी हस्तेपरहस्ते भलत्या एखाद्या क्षुल्लक कारणावरून माझा सर्व उन्हाळा केला असता. त्याचप्रमाणे दुसरे वर्षी घरांतील बायकामुलांच्या अंगावरील किडूकमिडूक शेतसाऱ्याचे भरीस घालून नंतर पुढे दरवर्षी शेतसारा अदा करण्याकरिता गावातील गुजर-मारवाडी सावकारांपासून कर्जाऊ रकमा काढल्या आहेत, त्यांतून कित्येकांनी हल्ली मजवर फिर्यादी ठोकल्या आहेत व ते कज्जे कित्येक वर्षांपासून कोडतांत लोळत पडले आहेत. त्याबद्दल म्या कधी कधी कामगार व वकिलांचे पदरी आवळण्याकरिता मोठमोठाल्या रकमा देऊन, कारकून, चपराशी, लेखक व साक्षीदार यांस भत्ते भरून चिऱ्यामिऱ्या देता देता

माझ्या नाकास नळ आले आहेत. त्यांतून लांच न खाणारे सरकारी कामगार कोठे कोठे सापडतात. परंतु लांच खाणाऱ्या कामगारांपेक्षा, न लांच खाणारे कामगार फारच निकामी असतात. कारण ते बेपर्वा असल्यामुळे त्यांजवळ गरीब शेतकऱ्यांची दादच लागत नाही व त्यांच्या पुढे पुढे करून जिवलग गड्याचा भाव दाखविणारे हुशार मतलबी वकील, त्यांच्या नावाने आम्हा दुबळ्या शेतकऱ्यांजवळून कुत्र्यासारखे, लांचांचे मागे लांचांचे लचके तोडून खातात. आणि तसे न करावे तर सावकार सांगतील त्याप्रमाणे आपल्या बोडक्यांवर त्यांचे हुकूमनामे करून घ्यावेत. यावरून कोणी सावकार आता मला आपल्या दारापाशी उभे करत नाहीत! तेव्हा गतवर्षी लग्न झालेल्या माझ्या थोरल्या मुलीच्या अंगावरील सर्व दागिने व पीतांबर मारवाड्याचे घरी गहाण टाकून पट्टीचे हप्ते वारले. त्यामुळे तिचा सासरा त्या बिचारीस आपल्या घरी नेऊन नांदवीत नाही. अरे, मी, या अभागी दुष्टाने, माझ्यावरील अरिष्ट टाळण्याकरिता माझ्या सगुणाचा गळा कापून तिच्या नांदण्याचे चांदणे केले! आता मी हल्ली सालचा शेतसारा द्यावा तरी कोठून? बागाइतांत नवीन मोटा विकत घेण्याकरिता जवळ पैसा नाही. जुन्या तर अगदी फाटून त्यांची चाळण झाली आहे. त्यामुळे ऊसाचे बाळगे मोडून हुंडीचीही तीच अवस्था झाली आहे. मकाही खुरपणीवाचून वाया गेला. भूस सरून बरेच दिवस झाले. आणि सरभड गवत, कडब्याच्या गंजी संपत आल्या आहेत. जनावरांना पोटभर चारा मिळत नसल्यामुळे कित्येक धट्टेकट्टे बैल उठवणीस आले आहेत. सुनाबाळांची नेसण्याची लुगडी फाटून चिंध्या झाल्यामुळे लग्नांत घेतलेली मौल्यवान जुनी पांघरुणे वापरून त्या दिवस काढीत आहेत. शेती खपणारी मुले वस्त्रांवाचून इतकी उघडीबंब झाली आहेत की, त्यांना चारचौघांत येण्यास शरम वाटते. घरातील धान्य सरत आल्यामुळे राताळ्याच्या बरूबर निर्वाह चालू आहे. घरात माझ्या जन्म देणाऱ्या आईच्या मरतेवेळी तिला चांगलेचुंगले गोडधोड करून घालण्यापुरता मजजवळ पैसा नाही, याला उपाय तरी मी काय करावा? बैल विकून जर शेतसारा द्यावा, तर पुढे शेतकी कोणाच्या जिवावर ओढावी? व्यापारधंदा करावा तर मला लिहिता-वाचता मुळीच येत नाही. आपला देश त्याग करून जर परदेशांत जावे, तर मला पोट भरण्यापुरता काही हुन्नर ठाऊक नाही. कण्हेरीच्या मुळ्या मी वाटून प्याल्यास कर्तीधर्ती मुले आपली कशीतरी पोटे भरतील. परंतु माझ्या जन्म देणाऱ्या वृद्ध बयेस व बायकोसह माझ्या लहानसहान चिटकुल्या लेकरांस अशा वेळी कोण सांभाळील? त्यांनी कोणाच्या दारांत उभे राहावे? त्यांनी कोणापाशी आपले तोंड पसरावे?'

म्हणून अखेरीस मोठा उसासा टाकून रडता रडता झोपी गेला. नंतर मी डोळे पुशीत घराबाहेर येऊन पाहतो तो त्याचे घर एक मजला कौलारू आहे. घराचे

पुढचे बाजूस घरालगत आढेमेढी टाकून बैल बांधण्याकरिता छपराचा गोठा केला आहे.''

सुप्रिया, तत्कालीन शेतकऱ्यांची दैन्यावस्था जोतिराव फुल्यांनी इतक्या चित्रमय भाषाशैलीमध्ये दिली आहे आणि शेतकऱ्याचे शब्दचित्र इतकं हुबेहूब आहे की, ते माझ्याच्यानं सांगितल्याशिवाय राहवत नाही. पत्र थोडं लांबेल हे खरं, परंतु तत्कालीन शेतकऱ्याची स्थिती आणि गती समजावून घ्यायची असेल तर फुल्यांनी रेखाटलेलं हे शब्दचित्र आपण पाहिलंच पाहिजे. बैलाच्या गोठ्याचं वर्णन करताना ते म्हणतात, ''दोनतीन उठवणीस आलेले बैल रवंथ करीत बसले आहेत. व एक बाजूला खंडी-सवा खंडीच्या दोनतीन रिकाम्या कणगी कोपऱ्यात पडल्या आहेत. बाहेर आंगणात उजवे बाजूस एक आठ बैली जुना गाडा उभा केला आहे. त्यावर मोडकळीस आलेला तुराठ्यांचा कुरकुल पडला आहे. डावे बाजूस एक मोठा चौरस ओटा करून त्यावर एक तुळशीवृंदावन बांधले आहे व त्यालगत खापरी रांजणाच्या पाणईचा ओटा बांधला आहे. त्यावर पाण्याने भरलेले दोन तीन मातीचे डेरे व घागरी ठेविल्या आहेत. पाणईशेजारी तीन बाजूला छाट दिवाली बांधून, त्यांचे आत ओबडधोबड फरश्या टाकून एक लहानशी न्हाणी केली आहे. तिच्या मोरीवाटे वाहून गेलेल्या पाण्याचे बाहेरचे बाजूस लहानसे डबके साचले आहे, त्यामध्ये किड्यांची बुचबुच झाली आहे. त्याचे पलीकडे पांढऱ्या चाफ्याखाली उगडी नागडी सर्वांगावर पाण्याचे ओघळाचे डाग पडलेले असून खरजुली डोक्यात खवडे, नाकाखाली शेंबडाच्या नाळी पडून घामट अशा मुलांचा जमाव जमला आहे. त्यातून कितीयेक मुले आपल्या तळहातावर चिखलाचे डोले घेऊन दुसऱ्या हातांनी उर बडवून 'हायदोस हायदोस' शब्दांचा घोष करून नाचत आहेत. कोण दारू पिट्याची दुकान घालून, कलालीन होऊन, पायात बाभळीच्या शेंगाची तोडे घालून दुकानदारीन होऊन बसले आहेत. तिला कित्येक मुले चिंचोक्याचे पैसे देऊन, पाळीपाळीने लटकी पाण्याची दारू पेल्यावरती तिच्या अमलामध्ये एकमेकांच्या अंगावर होलपडून पडण्याचे हुबेहूब सोंग आणीत आहेत.

त्याचप्रमाणे घराचे पिछाडीस घरालगत आढे-मेढी टाकून छपरी गोठा केला आहे. त्यात सकाळी व्यायलेली म्हैस, दोनतीन वासरे, एक नाळपडी घोडी बांधले आहे. भिंतीवर जिकडेतिकडे कोन्याकोपऱ्यांनी घागरी तांबडी गोचडी चिकटली आहेत. छपराच्या वळचणीला वेणीफणी करताना निघालेले केसाचे बुचके जागोजाग कोंबले आहेत. त्यालगत बाहेर परसात एके बाजूस कोंबड्याचे खुराडे केले आहे. त्याशेजारी एकदोन कैकाडी झाप पडलेले आहेत व दुसऱ्या बाजूस हातपाय धुण्याकरिता व खरकटी मडकी-भांडी घासण्याकरिता कडगळ दगड

बसवून एक उगडी न्हाणी केली आहे. तिच्या खुल्या दरजांनी जागोजाग खरकटे जमा झाल्यामुळे त्यावर माश्या घोंघों करीत आहेत. तर पलीकडे एका बाजूस शेणखइ केली आहे. त्यात पोरासोरांनी विष्ठा केल्यामुळे चहूकडे हिरव्या माश्या भनभन करत आहेत. शेजारी पलीकडे एका कोपऱ्यात सरमड गवत व कडब्यांच्या गंजी संपून त्यांच्या जागी त्या त्या वैरणींच्या पाचोळ्यांचे लहान मोठे ढीग पडलेले आहेत. दुसऱ्या कोपऱ्यात गवऱ्यांचा कलवड रचला आहे. त्याच्या शेजारी बाभळीच्या झाडाखाली मोडक्या औतांचा ढीग पडला आहे. त्याच्या खाली विलायती धोतरे उगवली आहेत. त्यामध्ये नुकतीच व्यायलेली झिपरी कुत्री आल्यागेल्यावर गुरगुर करीत पडली आहे. शेजारी गवानींतील चगळचिपाडांचा ढीग पडला आहे. बाकी उरलेल्या एकंदर सर्व परसात एक तरुण बाई घराकडे पाठ करून गोवऱ्या लावीत आहे. तिचे दोन्ही पाय शेण तुडवून गुडघ्यापावतोपर्यंत भरले होते. पुढे एकंदर सर्व माजघरात उंच खोल जमीन असून येथे पाहावे तर दळण पाखडल्याचा वैचा पडला आहे. तेथे पाहावे तर निसलेल्या भाज्यांच्या काड्या पडल्या आहेत. येथे खाल्लेल्या गोंधणीच्या बिया पडल्या आहेत. तेथे कुजक्या कांद्याचा ढीग पडला आहे. त्यातून एक तऱ्हेची उबट घाण चालली आहे. तेथे खुल्या जमिनीवरी एक जख्ख झालेली म्हातारी खालीवर पासोडी घालून कण्हत पडलेली होती. तिच्या उशाशी थोड्याशा साळीच्या लाह्या व पितळीखाली वाटीत वरणाच्या निवळीत जोंधळ्याची भाकर कुसकरून केलेला काला व पाणी भरून ठेवलेला तांब्या होता. शेजारी पाण्यात तहाने मूल टाहो फोडून रडत पडले आहे. याशिवाय कोठे मुलांच्या मुताचा काळा ओघळ गेला आहे. कोठे पोराचा गु काढल्यामुळे लहानसा राकेचा पांढरा टवका पडला आहे. घरातील कित्येक कोनेकोपरे चुना-तंबाकू खाणाऱ्यांनी पिचकाऱ्या मारून तांबडेलाल केले आहेत. एका कोपऱ्यात तिघीचौघींचे भलेमोठे जाते रोविले आहे. दुसऱ्या कोपऱ्यात उकळाशेजारी मुसळ उभे केले आहे. आणि दाराजवळील कोपऱ्यात केरसुणीखाली झाडून लावलेल्या कचऱ्याचा ढीग साचला आहे. ज्यावर पोरांची गांड पुसलेली चिंधी लोळत पडली आहे. इकडे चुलीच्या भाणुशीवर खरकटा तवा उभा केला आहे. आवलावर दुधाचे खरकटे मडके घोंगत पडले आहे. खाली चुलीच्या आळ्यात एके बाजूला राखेचा ढीग जमला आहे. त्यामध्ये मनी मांजरीने विष्ठा करून तिचा मागमुद्दा नाहीसा केला आहे. चहूकडून भिंतीवर ढेकण पिसा मारल्याची तांबूस रंगाचे पुसट डाग पडले आहेत. त्यातून कोठे पोरांचा शेंबूड व कोठे तपकिरीच्या शेंबडाचे बोट पुसले आहे.

एका देवळीत आतले बाजूस खात्या तेलाचे गाडगे, खोबरेल तेलाचे मातीचे

बुटकुले, दांतवणाची कळी, शिंगटाची फणी, तखलादी आरशी, काजळाची डबी आणि कुंकवाचा करंडा एके शेजेनी मांडून ठेविल्या आहेत व बाहेरच्या बाजूस देवळीच्या किनाऱ्यावर रात्री दिवा लावण्याकरिता एकावर एक तीनचार दगडांचे दिवे रचून उतरंड केली आहे. त्यातून पाझरलेल्या तेलाचा ओघळ खाली जमिनीपावेतो पसरला आहे. त्या सर्वांचे वर्षातून एकदा आषाढ वद्य अमावास्येस कीट निघावयाचे. दुसऱ्या देवळीत पिठाच्या टोपल्याशेजारी खाली डाळीचा कणुरा व शिळ्या भाकरीचे तुकडे पडले आहेत. तिसऱ्या देवळीत भाकरीच्या टोपल्या शेजारी थोड्या हिरव्या मिरच्या, लसूण, कोथिंबीर, दुधाचे शिंप व आंब्याच्या करंड्या पडल्या आहेत. ज्यावर माश्या व चिलटे बसून एकीकडून खातात व दुसरीकडून त्याजवर विष्ठा करीत आहेत. आणि चौथ्या देवळीत सांधलेल्या जुन्या वाहनांचा व जोड्यांचा गंज पडला आहे. शेजारी चकमकीचा सोकटा व गारेचे तुकडे पडले आहेत. एका खुंटीवर अंथरावयाच्या जुन्या जीर्ण झालेल्या घोंगड्या व चवाळीं ठेवल्या आहेत. दुसरीवर पांघरावयाच्या गोधड्या व पासोड्या ठेवल्या आहेत, तिसरीवर फाटके मांडचोळणे व बंड्या ठेवल्या आहेत. नंतर माजघराचे खोलीत जाऊन पाहतो तो जागोजाग मधल्या भिंतीला लहानमोठ्या भंडाऱ्या आहेत. त्यातून एका भंडारीस मात्र साधे गावठी कुलूप घातले होते. येथेही जागोजाग खुंट्यांवर पांघरुणांची बोचकी व सुनाबाळांचे झोळणे टांगले आहेत. एका खुंटीला घोडीचा लगाम, खोगीर, वळी व रिकामी तेलाची बुधली टांगली आहे. दुसरीला तेलाचा नळा टांगला आहे. शेवटी एका बाजूला भिंतीशी लागून डेऱ्यावर डेरे व मडकी रचून पाच उतरंडी एके शेजेनी मांडल्या आहेत. शेजारी तुळईला दोन मोळाची शिंकी टांगली आहेत. त्यावर विरजणांचे व तुपांचे गाडगे झाकून ठेविले आहे.

अलीकडे भला मोठा एक कच्चा विटांचा देव्हारा केला आहे. त्याच्या खालच्या कोनाड्यात लोखंडी कुऱ्हाडी, विळे आणि विळी पडली आहे. वरती लहानसे खारवी वस्त्र अंथरून त्यावर रुप्याचे कुलस्वामीचे टाक एके शेजेनी मांडले आहेत. त्यांच्या एके बाजूस दिवटी बुदली उभी केली आहे व दुसरे बाजूस दोम दोम शादावलाची झोळी, फावडी उभी केली आहे. वरती मंडपीला उदाची पिशवी टांगली आहे. खाली बुरणुसावर शेतकऱ्यास गाढ झोप लागून घोरत पडला आहे. एका कोपऱ्यात जुनी बंदुकीची नळी व फाटक्या जेणासहीत गादीची वळकुटी उभी केली आहे. दुसऱ्या कोपऱ्यात नांगराचा फाळ, कुळवाच्या फाशी, कोळप्याच्या गोल्हया तुरीची गोधी व उलटी करून उभी केलेली ताक घुसळण्याची रवी आणि तिसऱ्या कोपऱ्यात लवंगी काठी व पहार उभी केली आहे. सुमारे दोन

तीन खणात तुळयांवर बकान व शेराचे सरळ नीट वासे बसवून त्यावर आडव्या तिडव्या चिंचेच्या फोकाट्यांच्या पटईवर चिखलमातीचा पेंड घालून मजबूत माळा केला आहे. ज्यावर राळा, राजगिरा, हुलगा, वाटाणा, पावटा, तीळ, चवळी वगैरे अनेक भाजीपाल्यांचे बी डेऱ्यातून व गाडग्यातून भरून ठेविले आहे. वरती कांबिऱ्याला बियाकरिता मक्याच्या कणसाची माळ लटकत असून पाखाडीला एके ठिकाणी चारपाच वाळलेले दोडके टांगले आहे. दुसऱ्या ठिकाणी दुधा भोपळा टांगला असून तिसऱ्या शिंक्यावर काशीफळ भोपळा ठेवला आहे. चौथ्या ठिकाणी नळ्यासुद्धा चाडे व पाबारीची वसु टांगली आहे. कित्येक ठिकाणी चिंद्याचांद्यांची बोचकी कोंबली आहेत. मध्ये एका कांबीऱ्याला बाशिंगे बांधली आहेत. वरती पाहावे तर कौलाचा शेकार करण्यास तीनचार वर्षे फुरसत झाली नाही व त्याचे खालचे तुराट्याचे ओमन जागोजाग कुजल्यामुळे गतवर्षी चिपाडाने सांधले होते म्हणून त्यातून कोठेकोठे उंदरांनी बिळे पाडली आहेत. एकंदर सर्व घरात स्वच्छ हवा घेण्याकरिता खिडकी अथवा सवाना मुळीच कोठे ठेविला नाही. तुळया, कांबीरे, ओमनासहीत वाशांवर धुराचा डांबरी काळा रंग चढला आहे. एकंदर सर्व रिकाम्या जागेत कातीनीने मोठ्या चातुर्याने अतिसुकुमार तंतूंनी गुंफलेली मच्छरदाणीवजा आपली जाळी पसरली आहेत. ज्यावर हजारो कातिणींचे पिल्ले आपली खेळ कसरत आहेत. ओमन, वासे, तुळयांवर जिकडेतिकडे मेलेल्या घुल्यांची व कातिणींची विषारी टरफले चिकटली आहेत. त्यातून तुळया वगैरे लाकडांच्या ठेवणीवर कित्येक ठिकाणी उंदीर व झुरळांच्या विषारी लेंड्यांनी मिश्र झालेल्या धुळीचे लहान लहान ढीग जमले आहेत. फुरसत नसल्यामुळे जेथे चारपाच वर्षातून एकदासुद्धा केरसुणी अथवा खराटा फिरविला नाही. इतक्यात उन्हाळा असल्यामुळे फार तलकी होऊन वळवाचा फटकारा येण्याचे पूर्वी वादळाचे गर्दीमध्ये वाऱ्याचे सपाट्याने कौलाच्या सापटीतून सर्व घरभर धुळीची गर्दी झाली. तेव्हा तोंड वासून घोरत पडलेल्या कुणब्याच्या नाकातोंडात विषारी धूळ गेल्याबरोबर त्यास ठसका लागून तो एकाएकी दचकून जागा झाला. पुढे त्या विषारी ठसक्याने त्याला इतके बेजार केले की, अखेरीस थोडासा बेशुद्ध होऊन तो मोठमोठ्याने विव्हळून कण्हू लागला त्यावरून त्याच्या दुखणाईत म्हाताऱ्या आईने माजघरातून धडपडत त्याच्याजवळ येऊन त्याचे मानेखाली खोगिराची वळी घातल्यानंतर त्यांच्या हनुवटीला हात लावून तोंडाकडे न्याहाळून रडता रडता म्हणाली, 'अरे भगवंतराया, मजकडे डोळे उघडून पाहा, रामभट्टाच्या सांगण्यावरून तुला साडेसातीच्या शनीने पिडा करू नये म्हणून म्या तुला चोरून कणगीतले पल्लोगणती दाणे नकट्या गुजरास विकून अनेक वेळा मारुतीपुढे, ब्राह्मण जपास बसवून, सवाष्ण

ब्राह्मणांच्या पंगतीच्या पंगती की रे उठवल्या. कित्येक वेळी बाळा तुला चोरून परभारा गणभट्टाचे घरी सत्यनारायणाला प्रसन्न करण्यानिमित्त ब्राह्मणाचे सुखसोहळे पुरवण्याकरिता पैसे खर्च केले आणि त्या मेल्या सत्यनारायणाची किरडी पाजळली, त्याने आज सकाळी कलेक्टर सायबाचे मुखी उभे राहून तुला त्याजकडून सोयीसोयीने पट्टी देण्याविषयी मुदत कशी देववली नाही रे? अरे मेल्या ठगभटांनो, तुमचा डोला मिरविला तुम्ही नेहमी मला शनी व सत्यनारायणाच्या थापा देऊन. मजपासून तूप-पोळ्यांची भोजने व दक्षिणा उपटल्या. अरे, तुम्ही मला माझ्या एकुलत्या एक भगवंतरायाच्या जन्मापासून आज दिनापावेतो नवग्रह वगैरेंचे धाक दाखवून शेकडो रुपयांस बुडवून खाल्ले. आता तुमचे ते सर्व पुण्य कोठे गेले? अरे, तुम्ही मला धर्ममिषे इतके ठकविले की तेवढ्या पैशात मी अशा प्रसंगी माझ्या बच्च्याच्या कित्येक वेळा पट्ट्या वारून, माझ्या भगवंतरायाचा गळा मोकळा करून त्यास सुखी केले असते. अरे, तुमच्यातीलच रागू भरारीने प्रथम इंग्रजास उलटे दोन आणे लिहून देऊन त्यास तळेगावास आणिले. तुम्हीच या गोरे गैरमाहितगार साहेब लोकास लांड्यालबाड्या सांगून आम्हा माळ्या-कुणब्यास भिकारी केले. आणि तुम्हीच आता आपल्या आंगात एकीचे सोंग आणून इंग्रज लोकांचे नावाने मनगट तोडीत फिरता. इतकेच नव्हे, परंतु हल्ली माळी, कुणबी जसजसे भिकारी होत चालले तसतसे तुम्हांस त्यांना पहिल्यासारखे फसवून खाता येईना म्हणून तुम्ही ब्राह्मण टोपीवाल्यास बाटवून पायात बूट पाटलोन व डोईवर सुतक्यासारखे पांढरे रुमाल लावून चोखामेळ्यांपैकी झालेल्या ख्रिस्त भाविकांच्या गोऱ्या गोमट्या तरुण मुलींबरोबर लग्ने लावून, भर चावडीपुढे उभे राहून माळ्या-कुणब्यास सांगत फिरता की, आमच्या ब्राह्मण पूर्वजांनी जेवढे म्हणून ग्रंथ केले आहेत ते सर्व मतलबी असून बनावट आहेत. त्यात त्यांनी उपस्थित केलेल्या धातूंच्या किंवा दगडांच्या मूर्तीत काही अर्थ नाही. हे सर्व त्यांनी आपल्या पोटासाठी पाखंड उभे केले आहे. त्यांनी नुकताच पटलणीतील परदेशी लोकांत सत्यनारायण उपस्थित करून, आता इकडे तुम्हा सर्व अज्ञानी, भोळ्या, भाविक माळ्या-कुणब्यात नाचवू लागले आहेत. ही त्यांची ठकबाजी तुम्हांस कोठून कळणार? यास्तव तुम्ही या गफलती ब्राह्मणांचे ऐकून धातूंच्या व दगडांच्या देवाच्या पूजा करू नका. तुम्ही सत्यनारायण करण्याकरिता कर्जबाजारी होऊन ब्राह्मणाचे नादी लागू नका. तुम्ही निराकार परमात्म्याचा शोध करा म्हणजे तुमचे तारण होईल. असो. परंतु तुम्ही आम्हा या भिश्या माळ्या-कुणब्यास उपदेश करीत करीत फिरण्यापेक्षा प्रथम आपल्या जातबांधवांचे आळ्यांनी जाऊन त्यास सांगावे की, तुम्ही आपल्या सर्व बनावट पोथ्या जाळून टाका. माळी-कुणबी, धनगर वगैरे शेतकऱ्यांस खोटे उपदेश करून

आपली पोटे जाळू नका. असा त्यास वारंवार उपदेश करून त्याजकडून तसे आचरण करवू लागल्याबरोबर शेतकऱ्यांची सहज खात्री होणार आहे. दुसरे असे, की आम्ही जर तुम्हा पाद्याब्राह्मणांचे ऐकून आचरण करावे तर तुमचेच जातवाले सरकारी कामगार येथील गोऱ्या कामगारांच्या नजरा चुकावून, भलत्यासलत्या सबबी कटवून आम्हा शेतकऱ्यांच्या मुलाबाळांची दशा करून सोडतील.' इतक्यात शेतकरी शुद्धीवर येताच आपल्या मातोश्रीच्या गळ्यास मिठी घालून रडू लागला.

आता बाकी उरलेले एकंदर सर्व कंगाल, दीनदुबळे, रात्रंदिवस शेतीत खपून कष्ट करणारे निव्वळ अज्ञानी, माळी, कुणबी, धनगर वगैरे शेतकऱ्यांच्या हल्लीच्या स्थितीविषयी थोडेसे वर्णन करितो, तिकडेस सर्वांनी कृपाकरून लक्ष पुरविल्यास त्याजवर मोठे उपकार होतील. बांधवहो! तुम्ही नेहमी स्वत: शोध करून पाहिल्यास तुमची सहज खात्री होईल की एकंदर सर्व लहानमोठ्या खेड्यापाड्यांसहित वाड्यांनी शेतकऱ्यांची घरे दोनतीन अथवा चार खणांची कौलारू अथवा छप्परी असावयाची. प्रत्येक घरात चुलीच्या कोपऱ्यात लोखंडी उलतणे अथवा खुरपे, लाकडी काथवट व फुंकणी, भानुशीवर तवा, दुधाचे मडके व खाली आळ्यात रांधणाच्या खापरी तवल्या, शेजारी कोपऱ्यात एखादा तांब्याचा हंडा परात, काशाचा थाळा, पितळी चरवी अथवा वाटी नसल्यास जुन्या गळक्या तांब्याशेजारी मातीचा मोखा परळ व जोगल्या असावयाच्या. त्यालगत चारपाच डेऱ्यामडक्यांच्या उतरंडी. ज्यात थोडेथोडे साठप्याला खपले, हुलगे, मटकी, तुरीचा कणुरा, शेवया, भुईमुगाच्या शेंगा, भाजलेला हुळा, गव्हाच्या ओंब्या, सांडगे, बिवड्या, मीठ, हळकुंडे, धने, मिरी, जिरे, बोजवार हिरव्या मिरच्या, कांदे, चिंचेचा गोळा, लसूण, कोथिंबीर असावयाची. त्याचे लगत खाली जमिनीवर काल संध्याकाळी गोडबोल्या भट, पेशनर सावकाराकडून वाढीदीढीने जुने जोंधळे आणलेले, तुराट्यांच्या पाट्या भरून त्या भिंतीशी लावून एकावर एक रचून ठेवलेल्या असावयाच्या. एके बाजूला वळणीवर गोधड्या, घोंगड्यांची पटकुरे व जुन्यापान्या लुगड्यांचे धड तुकडे आडवे उभे दंड घालून नेसण्याकरिता तयार केलेले धडपे. भिंतीवर एक लाकडाची मेख ठोकून तिजवर टांगलेल्या चिंध्याचांध्यांच्या बोचक्यावर भुसकट व गोवऱ्या वाहावयाची जाळी. दिव्याच्या कोनाड्यात तेलाच्या गाडग्याशेजारी फणी व कुंकवाचा करंडा, वरती माळ्यावर गोवऱ्या व तीनधारी निवडुंगाचे सरपणाशेजारी वैरण नीट रचून ठेवली असावयाची. खाली जमिनीवर कोन्याकोपऱ्यांनी कुदळ, कुऱ्हाड, खुरपे, कुळवाची फास, कोळप्याच्या गोल्ह्या, जाते, उखळ, मुसळ, व केरसुणीशेजारी थुंकावयाचे गाडगे असावयाचे. दरवाजेबाहेर डाव्या बाजूला खापरी रांजणाच्या पाणईवर पाणी वाहावयाचा डेरा व घागर असून पलीकडे गडगळ

दगडाची उघडी न्हाणी असावयाची. उजवे बाजूला बैल वगैरे जनावरे बांधण्याकरिता आढेमेढी टाकून छपरी गोठा केलेला असावयाचा. घरातील सर्व कामकाजाचा चेंदा उपसून, पुरुषांच्या पायावर पाय देऊन, दिवसभर शेतीकाम उरकू लागणाऱ्या बायकोच्या अंगावर सुताडी घोटा बांड व चोळी, हातात रुप्याचे पोकळ गोट व ते न मिळाल्यास कथलाचे गोट नि गळ्यात मासा-सव्वामासा सोन्याचे मंगळसूत्र, पायाच्या बोटात चटचट वाजणारी काशाची जोडवी, तोंडभर दातवण, डोळेभर काजळ आणि कपाळभर कुंकू, याशिवाय दुसऱ्या शृंगाराचे नावाने आवळ्याएवढे पूज्य, उघडी नागडी असून अनवाणी सर्व दिवसभर गुराढोरांच्या वळत्या करीत फि रणाऱ्या मुलांच्या एका हातात रुप्याची कडी करून घालण्याची ऐपत नसल्यामुळे त्याच्या ऐवजी दोन्ही हातात कथलाची कडी व उजव्या कानात पितळेच्या तारेत खरड्यांच्या बाळ्या, याशिवाय अंगावर दुसऱ्या अलंकाराचे नावाने शिमगा. हिवावाऱ्यात व उन्हातान्हात रात्रंदिवस शेती खपणाऱ्या शेतकऱ्याचे कमरेला लुगड्यांचे दशांचा करगोटा, खादीची लंगोटी, टोपीवर फाटकेसे पागोटे, अंगावर साधे पंचे न मिळाल्यास घोंगडी व पायात ठिगळे दिलेल्या अथवा दोरीने आवळलेल्या जोड्यांशिवाय बाकी सर्व अंग सळसळीत उघडेबंब असल्यामुळे त्याच्याने अतिशय थंडी पावसाळ्यात हंगामशीर शेती मेहनत करवत नाही. त्यातून तो अक्षरशून्य असून त्यास सारासार विचार करण्याची बिलकूल ताकद नसल्यामुळे तो धूर्त भटांच्या उपदेशांवरून हरिविजय वगैरे निरर्थक ग्रंथातील भाकडकथेवर विश्वास ठेवून पंढरपूर वगैरे यात्रा, कृष्ण व रामजन्म, व सत्यनारायण करून अखेरीस रमोजी करिता शिमग्यात रात्रंदिवस मारता मारता नाच्यापोऱ्याचे तमाशे ऐकण्यामध्ये आपला वेळ थोडा का निरर्थक घालवितो. त्यास मुळापासून विद्या शिकण्याची गोडी नाही व तो निव्वळ अज्ञानी असल्यामुळे त्यास विद्येपासून काय काय फ ायदे होतात हे शेतकऱ्याच्या प्रत्ययास आणून देण्याऐवजी शेतकऱ्यांनी नेहमी गुलामासारखे त्याच्या तावडीत राहावे या इराद्याने शेतकऱ्यास विद्या देण्याची कडेकोट बंदी केली होती.''

सुप्रिया, भट-सावकारांचं हे वर्तन काही एका दिवसाचं नाही. पिढ्यान् पिढ्या सुरू होतं. या शोषणाची सारी तऱ्हा यशवंतरावांनी पाहिली होती. शेतकऱ्याच्या विपन्नावस्थेचं सारं वर्णन त्यांनीही फुल्यांच्या समग्र वाङ्मयात वाचलं होतं. त्याचा परिणाम त्यांच्या मनावर खोलवर झाला होता. या गुलामगिरीतून शेतकरी, कामगारांची, कष्टकऱ्याची सुटका झाली पाहिजे म्हणून त्यांनी 'कुळकायदा' केला. 'कसेल त्याची जमीन' आणि सोसायट्या, पतसंस्था, बँका सहकारी पद्धतीनं चालवून त्यांनी शेतकऱ्याला त्याच्या दु:स्थितीतून बाहेर काढण्याचा प्रयत्न केला.

22886
22/7/15

या भूमिपुत्रानं घेतलेला हा निर्णय म्हणूनच लक्षावधींना गुलामीतून मुक्त करणारा क्रांतिकारक कायदा ठरला.

पुढे, मी ८१–८२ साली जेव्हा त्यांच्याबरोबर बोललो, तेव्हा 'त्या काळामध्ये कुळकायद्याची अंमलबजावणी करताना नोकरशाहीचा त्रास झाला नाही काय?' असं विचारलं. त्यावर ते हसले आणि म्हणाले, 'एखादा जुना बळावलेला आजार जेव्हा तात्पुरत्या मलमपट्टीनं बरा होत नाही. तेव्हा असाध्य रोगावर कठोरपणे इलाज करावा लागतो. तसा इलाज मी केला. लहानपणापासून पाहिलेलं शेतकऱ्यांचं दु:ख, शोषणातून या शेतकऱ्याची सुटका करायची तर कठोर कायदा करणं गरजेचंच होतं. त्यात मी फारसं वावगे केलं असं नाही. 'ज्याचे होते, त्यांना दिले' मी काय केले?' असं उत्तर त्यांनी दिलं. 'शेती आणि शेतकरी', 'शेतीपूरक व्यवसाय' हे त्यांच्या चिंतनाचे विषय होते. आजचे राज्यकर्ते आज हे सारे घडाळ्याचे काटे उलटे फिरवून पुन्हा खाजगी सावकारी, जमीनदारी, सरंजामदारी काही वेळा मागच्या दारानं, तर काही वेळेस खुलेआम करत आहेत. यशवंतरावांचे अनुयायीच आज सरंजामदारी, भांडवली व्यवस्थेचे आधुनिक दास बनत असल्यानं पुन्हा एकदा इतिहासाची पुनरावृत्ती होताना आपण पाहत आहोत. यशवंतरावांचे आणि आमचेही हे मोठे दुर्दैव. हे पत्र फारच मोठं झालं, पण म. फुल्यांचं अत्यंत उत्कट प्रकटीकरण, शब्दलालित्य, मराठी भाषेचा एक वेगळा बाज, सौंदर्य तुम्हा तरुण मुलांना कळावं यासाठी विस्तार होत असतानाही जसंच्या तसं देण्याचा मोह मला आवरता आला नाही.

सौ. वहिनींना, बाबांना सप्रेम जयभीम.

तुझा,
लक्ष्मणकाका

दिनांक ५/७/२०१२

चि. सुप्रिया,

सप्रेम जयभीम.

स.न.वि.वि.

दिवाळीच्या सुट्ट्या नुकत्याच संपल्यात्या, थंडीची नुसती सुरुवात झाली व्हती. आई, बा सारी पोटं भरायला गेली, पण मी आता एकटाच निरगुडीला राहून शाळेत जात व्हतो. मला शिकायचं व्हतं. कळायला लागलंतं, माझा मीच स्वयंपाक करून जेवत व्हतो. गावांतल्या कुणाचं बी पडेल ते काम करायचो. त्यानं लय करून सयपाकच करायला लागायचा नाही. कुणीतरी कोर-चतकोर द्यायचं. आन् सारं शिवार होतंच ना? सकाळपास्न सांज पवतोर एका जागेला पाय ठरायचा नाही. कुणी विचारायला नाही. आमकं कर, तमकं करू नको असं कोण विचारणार? आईला काळजी असायची. ती पोटामागं गेलेली. आपला जलम गल्लीतल्या प्राण्यासारका. दुपारची शाळा सुटली की, सारी पोरं आपआपल्या घरी जेवायला जायची. मी आन् माझ्यासारखे चारपाच मित्र घरी जायचो नाही. घरी जेवणच नसायचं. खायचेच वांदे म्हणून आम्ही एक नामी युक्ती शोधलेली होती. गावांत चारपाच विहिरी. त्यानं पाचदहा जणांच्या बागायती. बाकी सारी जिरायती. कुणब्यांची घरं, बागायतीत ऊस आन् केळी. शाळा सुटली की आम्ही टोळीनं कुणाच्या तरी ऊसात घुसायचो. पार आत फडात जायचं पन ऊस मोडायचा नाही. ऊस मोडला तर फार मोठा फटाकड्यासारखा आवाज होतो. असा आवाज झाला, तर शेतकरी पळत येतो. आत मग उसाच्या चिंध्या होस्तोवर मरणाचा मार खावा लागतो. म्हणून ऊस मोडायचा नाही. मुळापस्न उपटायचा. मुळाची माती झाडायची आणि आख्खा ऊस बुडक्याकडून खायला सुरुवात करायची. चुईट्या खड्डा करून पुरायच्या. पोट भरून ऊस खाऊन झाला, की एकाएकानं बाहेर निघायचं. तोंड मनगटानं पुसायचं. नाहीतर केळीच्या फडात शिरायचं. पाडाची केळं खायची. साल खड्डा करून पुरायची. दुसरा खड्डा काढायचा. त्यात गाभाळलेली पाडाची केळं काढून पुरायची. वरनं केळीचाच पाला घालायचा.

पुरून झाली की त्यावर खुणेसाठी दगडं, विटंचा तुकडा ठेवायचा आणि पोटभर केळी खाऊन शाळेकडे सुटायचं. सापडलं तर शिव्यांची लाखोली. गालफाडं फुटायची. पुन्हा शाळंत मास्तर मारणार ते वेगळंच. पण, पोटातली भूक भागलेली असायची. आसं रोज चालू व्हतं. शाळा हेच आता घरं झालं व्हतं. झोपायलाही शाळंत. त्यावेळी सारीच पोरं अभ्यासाला, झोपायला, शाळंत असायची. कुंभार नावाचे एक शिक्षक अगदी आमच्यापेक्षा जरासे मोठे, सातवी झाली की तेव्हा शिक्षकाची नोकरी चालून घरी यायची. कुंभार मास्तरांची नुकतीच नेमणूक झालेली. मिसरूड नुकतंच फुटलेलं. ते आमच्यातच मिसळायचे. आम्ही सारी पोरं त्यांच्यासोबत खूप वेळ असायचो. रोज संध्याकाळी चिमण्या, कंदील घेऊन आम्ही शाळेत अभ्यासाला बसायचो. काळा धूर नाकात जाऊन साऱ्यांची नाकं काळी व्हायची. गाव सारं काळ्याकुट्ट अंधारात दिवंलागणीलाच झोपल्यालं असायचं. चौकाचौकांत ग्रामपंचायतीनं लाकडाच्या ठेंब्यावर कंदील लावलेले असायचे. अंधारामुळं खूप मोठ्या चोरांच्या, दरोडेखोरांच्या टोळ्या डाका घालायला यायच्या. अंधारात गडी आलं, घरं फोडली आणि पसार झाली तरी समजायचं नाही. सांच्याला गुरुजींबरोबर गावातली तरुण मंडळी गप्पा मारत बसायची. आमचं वाचण्यापेक्षा त्यांच्या शिळूप्याच्या गप्पा ऐकण्यातच सारं ध्यान असायचं. गप्पा म्हणजे राजकारण असायचं. आन् राजकारणात यशवंतराव हा विषय महत्त्वाचा असायचा.

गावशिवारात आन् गावात माणसांची वर्दळ वाढलेली असायची. पाचसात माणसं चावडीवरच झोपायची. कुंभारगुरुजी कार्यकर्त्यांना सांगत व्हते, 'आता बगा तुम्ही, यशवंतराव मुख्यमंत्री हाईती. कसा कायापालट व्हतो गावाचा ते.' एक म्हणाला, आहो गुरुजी, गावशिवारात लय खड्डं काढायचं चाललंया बगा. लोखंडाचं मोठ्यालं पोलच्या पोल पडायला लागल्यात. गावातली आन् परगावातली लय पोरं काम करत्यात. खड्डं काडत्यात, पोल रवत्यात आन् जरमलाच्या तारवाणी अंगठ्यावाणी तारांची भेंडूळी फिरवीत पोलास्नी जाम फिट बसवून तारा वडत्यात. रोज बी मिळतूया की कणकून.

दुसरा म्हणाला, 'आवं गुरुजी, ह्यो खेळ कशाचा म्हणायचा? का ह्यो बी यशवंतरावाचा खेळ हाय?' एक साठीतला मिशावाला म्हातारा मोठ्यांदा हसत म्हणाला.

'तात्या, आवं हासू नका. ह्यो खेळ न्हाय.' गुरुजी म्हणाले.

'आवं आसं तारास्नी कवा दिवं लागल्यालं बगीतलय? सांगाकी गुरुजी.'

'तात्या, आवं ही खांबं सारी लायटीची हाईती. ह्या तरा लाईटीच्या हाईत्या.

खांबावरनी दिवं लागत्याल. आन् सारा गाव उजीडात भरून जाईल.'

'आवं मंग बरंच हायकी. माणसं जागी राहत्यात आन् गुरुजी, लोकसंख्या बी कमी व्हईल!' सारी मस्करी करत हसत व्हती. आम्ही पोरं त्यांचंच सारं ऐकत व्हतो. डोळे पुस्तकात आन् कान गप्पांत व्हते. गुरुजी आणि गावकरी यांच्यात गप्पा रंगल्या व्हत्या. कुणाचाच असा लाईटीवर विश्वास बसत नव्हता.

'यशवंतरावांनी सारा महाराष्ट्र उजळून टाकण्याचा धाडसी निर्णय घेतलाय. राज्यात सगळीकडे आता लाईट जाणार. कोयनेचं धरण कशाला बांधलंय माहीत हाय?' गुरुजी पुन्हा बोलू लागले, 'यशवंतरावांनी मुख्यमंत्री झाल्याबरूबर कोयना नदी हेळवाकजवळ आडवायची ठरीवलं. पाटण माझं गाव म्हण सांगतो. छप्पन्न साली धरणाला सुरुवात झाली. दोन डोंगराच्या मधी धरण बांधलं. कोयनामायला आडीवलं. आन् मागच्याच महिन्यात त्याचं उद्‌घाटन पंडित नेहरूंच्या हातनं केलं. आसं काम दुनियात कुणी केलं नसंल तसलं काम यशवंतरावांनी केलंय.' आता मातर सारी मंडळी थट्टामस्करी न करता ऐकत व्होती.

'आवं पर त्यानं लाईट कशी व्हती?'

'कोयना धरणातनं सह्याद्रीला बोगदा पाडला. आन् पाणी चिपळूनजवळ पोफळीत नेहलं...'

'बया बया बया! काय सांगता काय? ह्ये मातर लय मोठं काम झालं बाबा.'

'होय. जगात नसंल आसलं काम झालं. पोफळीत यंत्र बसवली. जनित्र म्हणत्यात त्याला. पाण्याचा प्रवाह या यंत्रावरनं वेगात जातो. यंत्राची पाती हालत्यात आन् त्यानं लाईट तयार व्हती. ती यंत्रातच साठीवत्यात. ती ह्या वायरातनं साऱ्या राज्यात पसरायचं काम चाललंया.'

'गुरुजी, ह्ये म्हंजी लय देवावाणी अचाट काम झालं बगा. पण गुरुजी हे पाणी पावसाळ्यात कसं आडवणार? हे फुटलं तर कसं व्हणार?'

'पाटील, आवं आपल्या निरगुडीला नाही लागणार. नगा काळजी करू.' गावकरी म्हणाला.

पाटलाला दाबीत तात्या म्हणाले, 'गप आयका गड्यांनू, हं गुरुजी सांगा.'

'धरणाला दरवाजे हाईत की. पाणी वाढायला लागलं की दरवाजा उघडून पाणी नदीत सोडत्यात. किसना-कोयना दोगी बी भरभरून वाहत्यात. कोयना म्हंजी महाराष्ट्राची भाग्यलक्ष्मीच होणार म्हणा की, आन् यशवंतराव भाग्यविधाते.'

'हां, हे कसं बोलला. लाखात एक बगा.' सारे गावकरी एकमेकांना टाळ्या देत व्हते. यशवंतराव आता नुसते नेते नव्हते. त्याहून काही वेगळे व्हते. घराघरातल्या माणसाला ते आपल्या घरातलेच वाटत व्हते. प्रत्येकाला आपला 'घरचा माणूस'

म्हणून त्यांचा अभिमान वाटत व्हता. तो गरिबांना वाटत व्हता, तसा श्रीमंतांनाबी वाटत व्हता. आन् जातीपातीच्या पलीकडं त्यांचं नातं प्रत्येक माणसाशी जोडलं जात व्हतं. ज्यांच्या दातावर मास होतं ते बी, आन् ज्यांची चूल पेटत नव्हती ते बी यशवंतरावांना आपल्या घरातला माणूस, करता माणूस मानत व्हतं.

गप्पा रंगात आल्या होत्या. यशवंतरावांच्या राजकारणाची बेरीज–वजाबाकी चालू होती.

'गुरुजी, ही लाईट इल म्हणता, ते चांगलंच हाय, पर मला सांगा, आमा शेतकऱ्यांच्या नशिबात पाणी कवा मिळंल? आन् आमच्या मागच्या मोटा कवा जात्याल? दिसना दिस मोट चालली तरी बिगा भिजवायला आठ दिवस तरी लागत्यात बगा. हातापायांची, बोटांची दशा तरी बगा. लय मरणाचं कष्ट, बैलावाणी राबतुया शेतकरी. कोर, चतकोर जी काय आसंल ती मीठमिरची कशी खातूया. ते का सांगावं? घाम गाळगाळून मेलो. सावकारांचं याजच फिटत न्हाय. यशवंतरावांनी कुळकायदा केला. देवावाणी धावून आला. पण सावकार काय बोकांडीचा हालंना. त्याला काय करावं गुरुजी?' तात्या म्हणाले.

'आवं मोटंच काय घिवूनशानी बसलाय? पांढरीवरलं किसन मास्तर सांगत व्होतं, यशवंतरावानं इंजिनबी काढल्यात नव्हं. आता बगता बगता मोटा जातील्या.' कुंभारगुरुजी म्हणाले.

'आता ही इंजिन म्हंजी काय वं?' एकजण म्हणाला.

'रेल्वे बगीतलीयास नव्हं लोणंदात?'

'व्हय व्हय, तसलं इंजिन म्हणताय?'

'हं. बगा, पण ते चालतंया कोळशावर, आन् हे इंजिन चालतंया तेलावर.'

'चालतया म्हंजे? का रेल्वेवाणी पळतंया?'

'आवं पळंल कशाला? ते हिरीतलं पाणी वर वडतंया.'

'व्हय? च्या बायला, हे बरीक नामी झालं.' चर्चा संपली. सार जण हळूहळू घराकडं निघालं. आम्हाला गुरुजींनी झोपायला सांगितलं. आमी वाटच बगत व्हतो. दिवं फुकलं. आंधार. गप डोळं मिटलं.

चारपाच दिवसांतच एक कौतिक झालं. पांढरीवरल्या हिरीवर किसन पाटलानं इंजिन बसावलं. समदं गाव ह्ये काय इंजिन हाय, ते बगायला उलाथलं. हिरव्या रंगाचं लोखंडी उभं एक चाक. त्याला फिरवायला हांडेल. किसन मास्तरचा भाऊ गरागरा चाकाला हांडेल लावून फिरवायचा. तसं भाक् भाक् करीत इंजिन काळा धूर वकायचं. डाव्या हातानं धरल्यालं उभं इटीवाणी लोकांड खाली टाकायचा. तसं वेगात आलेला हांडेल अलगद काडायचा आन् झालं की इंजिन सुरू! आन्

तिकडं थारूळ्यानं पायपातनं पाण्याचा मुर्सींडा. अख्खी निरगुडी बगायला आलीती. सारं आकरीत घडत व्हतं. दहावीस मोटंचं पाणी टाकीत व्हतं इंजिन!

गावकरी नुसते हारकुन गेले व्हते. थारूळ्यातलं पाणी पाटात मावत नव्हतं. पलानीनं पाणी शेतात कवा आलं ते समाजलं न्हाय. मोटंवाणी आता पाण्यासाठी वाट बगीत बसायचं नव्हतं. इंजिनाचा धूर आन् फाकफाक आवाज... आवाजानं सारी गावंपांढरी दुमदुमायला लागली. जो तो इंजिनाचीच चर्चा करीत व्हता. इंजिनातनं पाणी कसं येतं. ज्यो त्यो तिखटमीठ लावलावून दुसऱ्याला सांगीत व्हता. आम्ही पोरं तर काय, दिसभर तिथनं हाललो नव्हतो. एक लोखंडी पाईप हिरीतल्या पाण्यात सोडलेली आन् दुसरीनं पाणी थारूळ्यात... काय गम्मत व्हती म्हणून सांगू! पहिल्या दिवशी आमी सारेच पाण्याला घाबरलो व्हतो. येवढ्या जोरात पाणी थारूळ्यात आपटत व्हतं, की त्याच्या चिपळ्यांनी कासराभरात भिजलं व्हतं. पाण्याजवळ कुणी जाईना. शेतातल्या माणसाला **दारी धरताना** काय व्हतंय कां ते बगीत व्हते सारेजण. किसनमास्तर हुशार. ते साऱ्यांना चिडवीत व्हते, 'आरं पाणी हाय ना, त्याला शॉक लागतूया. पाण्याला हात लावू नगा. ते लांब फेकतया.' झालं! सारी घाबरून लांबनंच बगत व्हती पाणी.

सुप्रिया, हा नुसता बदल नव्हता. क्रांती होती, क्रांती! यंत्रयुगाची सुरुवात व्हती. लोखंडाच्या साच्यानं असं पाणी ओढता येतं हे अडाणी शेतकऱ्याच्या डोक्यात बसत नव्हतं. किसनमास्तरच्या आईनं घरातनं ताटं आणलं, नारळ आणला, उदबत्त्या, गुलाल सारा पूजेचा सरंजाम आणला. पाण्याची शांती केली पायजेल का नको? साऱ्या आया बाया जमल्या, म्हणून म्होरं साऱ्या सवासणींनी पूजा केली. चोळीचा खण, नारळ उचलून थारूळ्यात पाण्यावर पाच येळा ओवाळला आन् 'ये ये भागिरथी कल्याण कर गं' म्हणून पाटाच्या पाण्यात सोडलं. सारे जमल्याले गावकरी बायापोरांसह हळदीकुंकू वाहूनशानी पाया पडले. आता काय लागीर व्हनार न्हाय. इंजिनाला आन् माणसानला. किसनगुरुजींनी पाण्याला नमस्कार केला आन् स्वत: पाण्यात उतरले तसं साऱ्यांनी जोरजोरात टाळ्या पिटल्या. आन् मंग काय बगता, ज्यो त्यो पाचपावन केल्याला पाण्याला शिवायला लागला. आम्ही पोरांनी अंगावरले आंगडी काढली आन् एकएक जण थारूळ्यात उड्या मारायला लागलो. गावाच्या मनातली भीती गेली. माणसांनी इंजिन आपलंसं केलं. ज्यो त्यो म्हणत व्हता. 'शेतकरी सुखी तर जग सुखी, शेतकऱ्यांचा कल्याण कर राजा.' यशवंतराव हे अगदी त्यांच्या अंतापर्यंत शेतकऱ्यांनी आपआपल्या काळजात जपून ठेवले व्हते. एकही निवडणूक ते कधी हरले नाहीत.

असाच आणखी एक धक्का किसन मास्तरांनी दिला गावाला. एका दिवशी

बैलगाडीतनं बरंच आवजाड लोखंडी सांगाडं हिरीवर आलं. लाकडाच्या पेट्यात हे लोखंड काय हाय? सारे पुन्हा कुतूहलानं बगायला लागले. पांढरीवर धक्के, धक्के आणि धक्के बसत होते. किसनगुरुजी शिकलेले. शेजारच्या गावात शिक्षक. पुरोगामी विचारांचे. सुधारणा करणारे. पांढरीच्या हिरीला लागून त्यांनी पत्र्याची शेड बांधली. जराशी खड्ड्यात बांधायला लागली. हिरीचं पाणी उपसायचं आन् आता आता पिठाची चक्की. बगता बगता फलटणातली माणसं आली. त्यांनी भल्या मोठ्या चाकाच्या पुल्या, बारक्या चाकाच्या पुल्या, कापडाचं काळं पट्टं. कुरुंदाच्या दगडांची जाती, त्याज्यावरती निळ्या रंगाची टोपी. टोपीला फिरकी, भिंगरी, वर दाणं वतायला लोखंडी सोपासारखी चार सूपं एकमेकाला जोडल्याली. इतभर नळी त्याला जोडून आत सोडलेली. इंजिन चालू करायचे. ते पट्ट्यानं गिरणीला जोडायचं. शाळंला दांड्या मारून आम्ही पोरं हे बगत बसायचो. तासन् तास. तहान नाही का भूक नाही. इंजिन आणि गिरण, बायांचं तर थवंच्या थवं पाखरावाणी यायचं. लांबनंच बगायचे. डोक्यावरला पदर तोंडात धरीत 'बया, काय ह्ये आकरीत म्हणावं?' प्रत्येकीच्या चेहऱ्यावर चांदणं नुसतं फुलल्यालं. हासू ओसंडून जात व्हतं. साऱ्या बायांची पिढ्यान् पिढ्यांची ढोरमेहनत संपणार व्हती. पहाटं उठायचं आन् जात्यावर दळणं टाकायची, पायली पायली रोज दळायचं. जात्यावरल्या ओव्या प्रत्येकीच्या तोंडात रसवंती खुलवायच्या. बरं असो, नसो. म्हातारी असो, तरणी असो, की मुलगी, प्रत्येकीला दळावंच लागायचं. तर पीठ मिळणार. पीठ नसंल तर भाकरी कशी व्हणार? गरीब श्रीमंत, खालचा-वरचा, कुणी बी असू द्या. भाकरी लागतीच आन् भाकरीला पीठ. चुलीवर खरपूस भाकरी थापायची प्रत्येकाची आई. पहाटे उठून जात्यावर दळण दळायची, पाणी भरायची, ती आईच. म्हणून आई बैलासारखं राबायची. या बाईची, आईची भावना होती. यशवंतराव तिचा मुलगा होता. तो पुढं मंत्री झाला आन् जलमाचं पांग फिटलं. पिढयान् पिढ्याचं हातातलं जातं सुटलं. कंबरचा काटा ढिला व्हायचा दळून दळून, वर नवऱ्याच्या लाथा, सासूचा सासुरवास. साऱ्या जलमाचा वनवास तुम्हा मुलींना. त्या पिढीच्या यातना आता समजणार नाहीत. आम्ही साक्षीला आहोत. बामणाच्या बाईला दळायला लागायचं, आन् कुणब्याच्या बाईलाही दळायला लागायचं. इंजिनानं ही क्रांती केली. पांढरीवरल्या किसनानं गिरण बसावली. इंजिनातनं काळा धूर बाहेर पडायचा. त्या पायपीला ड्रायव्हरनं एक पालता जरमलचा गडू बसवला. आन् काय जादू झाली सांगतो तुला, इंजिन सुरू झालं की साऱ्या गावांत ठोकठोकठोक असा दांडगा आवाज व्हायचा. टुकटुक वाजायला लागली की, बाया पोरं आपआपली दळणं घेऊन गिरणीम्होरं रांगा लावून उभी ऱ्हायाची. दोन

लाकडाच्या दांडक्यावर फुल्या मारलेल्या. ड्रायवर गिरणीच्या आत, बाकी सारी बाहेर. दळाप टाकलं की, जाती आवाज करत दळू लागत आन् गिरणीतलं पीठ डब्यात जमा व्हायला लागायचं. वाऱ्यानं पीठ सारीकडं उडायचं. भिंती पांढऱ्याशिपत, ड्रायवर पांढराच पांढरा, दाडी, मिशा, केस, डोळं, तोंड-सारं पिठानं माखलेलं ऱ्हायाचं. सारं गाव दळायला पांढरीवर जमत व्हतं. हळूहळू इंजिनाची क्रांती गावोगाव पोहोचली. दळण दळायला लागली, पाणी वडायला लागली. साऱ्या शिवारातनं इंजिनच इंजिनं. प्रत्येकजण इरशिरीनं इंजिन घ्यायला लागला. यालाच क्रांती म्हणतात. बदल. बाबासाहेब म्हणाले व्हते तसा, रक्ताचा एक थेंबही न सांडता होणारा बदल.

हजारो वर्षांचा सीतामायचा वनवास. उखान्यात बाया म्हणत,

'सीतामायचा वनवास बारा सालांचा,

आमचा साऱ्या जलमाचा वनवास की बाई...'

हा पिढ्यांचा वनवास संपायला आरंभ झाला. 'यशवंता, भाऊराया धावूनी आला, घास शेवटचा घालीते भाऊराया' आयाबहिनींना कष्टातून मुक्त करणारा यशवंत आम्ही लहान असताना पाहिला. तुझ्या पिढीलाही तो दिसावा, इतकंच.

सौ. वहिनी, बाबांना सप्रेम नमस्कार.

तुझा,

लक्ष्मणकाका

दिनांक १५/७/२०१२

चि. सुप्रिया,

सप्रेम जयभीम.

यशवंतराव हे साताराकऱ्यांसाठी पडलेलं सुंदर स्वप्न व्हतं. ज्या वयातल्या या आठवणी मी तुला सांगतो आहे ना, तो काळ मोठ्या उलथापालथींचा व्हता. सामाजिकदृष्ट्या तर तो फारच क्रांतिकारक होता. त्यातलीच एक आठवण तुला सांगतो.

मी तेव्हा पाचवी-सहावीत असेन. गावांतली तरुण पोरं कुठंतरी निघाली व्हती. चावडीवर मालट्रक येऊन उभा राहिला होता. मोठी माणसं, तरुण पोरं भराभरा ट्रकमधी चढाया लागली. आपण लहान त्यामुळे, कुणीच ट्रकजवळही येऊ देत नव्हता. आपल्या पिल्लांत येणाऱ्या दुसऱ्या कोंबडीच्या पिल्लाला कोंबड्या चोची मारून हाकलवतात, तसं हाकलीत व्हते. ट्रकच्या म्होरच्या बाजूला काँग्रेसचा तिरंगी झेंडा लावलाता. टपावर नेहरूंचा, गांधींचा आणि यशवंतरावांचा भला मोठा फोटो लावलाता. बगता बगता ट्रक गच्च भरला. आम्ही बारकी पोरं ट्रकच्या भोवताली 'ही काय भानगड आहे?' अशा कुतूहलानं पाहत व्हतो. गावात आलेला पहिला मालट्रक. तांबड्या रंगाचा. पुढं आलेलं त्याचं निमुळतं तोंड. तोंडाला रंग वेगळा. दोन्ही पुढच्या चाकांवर पत्र्याचं झाकान. त्याला लागून मडगार्ड, तर गाडीच्या वरच्या बाजूला चौकोनी गाळ्यागाळ्याची जाळी. त्यात खोलवर गेलेलं भोक. दोन्ही बाजूला दिवे. त्याला लावलेल्या गोल काचा. बारीक डोळं बसवावंत तसं त्या काचांवर दोन डोळं. म्होरं मडगार्डला बांधल्यालं पक्षाचं झेंडं. सारं गाव मालट्रक बगायला जमल्याला. ज्यो त्यो त्या धुडाचं कौतिक करीत व्हता. कुणी बावकाडाचं म्होरंल त्वांड धरीत वर चढत होता, तर कुणी मागल्या फाळकुटाला लोंबकाळत वर चढीत व्हता. खरं तर मला वर चढता येत नव्हतं. आपण लहान आहोत, याचं मनाला फारच वाईट वाटत व्हतं. आपल्याला आसं लोंबकाळत वर तर चढता येईल, पण कोण चढू देईल? बगता बगता मला खूप रडाया यायला लागलं. त्यात बी जवा माझ्या वयाच्या पोरांना त्यांचे बाप पटापट उचलून वर

ट्रकमध्ये घ्यायला लागले, तेव्हा आपला बा लांबूनच ट्रक बगतोय, त्याला बी कुणी जवळ येऊ देत नव्हतं हे दिसलं आन् मी गप झालो. मोठी माणसं हायेत. पाटलांच्या माणसांच्या आपण बरूबरीचं न्हाय. त्यांची बरूबरी करायची न्हाय. आपलं किती बी बरूबर आसलं तर तसं म्हणायचं न्हाय. नाही पाटील, तुम्ही म्हणताव तसं, तुमचीच लाल. आमची काळी, आसं म्हणून जगायचं. आईनं सांगितलेलं हे रोजच्या रोज पाठ करायला लागायचं. त्यांची शेंबडी पोरं सोन्याची, त्यान्ला आवंजावं करायचं. आमचा बा, त्याला त्याचं भारी कौतिक. त्या पोरांना 'रावसाहेब, धाकलं धनी' म्हणायचा. ह्यो धनी माझ्या वर्गात शिकत असायचा. मैंदाळ राग यायचा. पण करायचं काय? 'पायरीनं राहावं लागतं. त्यांच्याच आसऱ्यानं ऱ्हायायचं. त्यांच्याच बांधावरनं चालायचं तर त्यांना नमूनच राहायचं.' अशीच सारी स्थिती होती. तशात ट्रकचा ड्रायव्हर खाली उतरला. हातात लांबच्या लांब लोखंडी सळी होती. टोकाला जराशी वाकडी. त्यानं ती अलगद जाळीच्या भोकातून आत घातली आन् गरागरा फिरवली. आन् भाकभाक धूर फेकीत मोटार सुरू झाली. इंजिन सुरू झालं. ड्रायवर केबीनमधी बसला आन् ट्रक हालला. म. गांधी की जय, पंडित जवाहरलाल नेहरू की जय, यशवंतराव चव्हाण की जय, अशा घोषणा देत मालट्रक गावाबाहेर गेला. गर्दी पांगू लागली तशी मोठी माणसं आपसात बोलू लागली. मालट्रकनं उडवलेला धुरूळा डोळ्यांत, डोक्यात गेलेला. कुणी कुणाच्या डोळ्यांत फुकून काडीत होता. तर कुणी हाळहाळत होता. 'च्या बायला, म्या बी गेलू आसतो पाटणला. पर कसं जाणार? उसाला पाणी पाजायचा, बैलं येत्याल उस फोडायला...'

बा म्हणाला, 'कसं दिसत्यात वं नेहरू, तात्या.'

'आरं आता म्या तरी कवा बगीतल्या. म्हनीत होतो जावं बगायला. पर कसंच काय आनू फाटक्यात पाय! पावणं येणार हाईत नव्हं लेकीला बगायला. धराण काय पुन्यांदा बगीन,' आसं मनातचं बोलावं तसं बोलत तात्या निघून गेलं. पण माझ्या डोक्यात किडं लागलं वळवळायला. ही धरणं काय आसतं? मी लागलो बाच्या मागं. 'धरण म्हंजी काय आसतं?' बानं दिली एक ठिवू न कानाखाली. 'जा भाड्या खेळ जा. मला का कळतंया? येवढं ग्यान आसतं तर कशाला माझी घाशीत बसलो असतो.'

मी मुकाट्यानं खेळायला पळालो. पण, धरण काय डोळ्यांतनं जाईत नव्हतं. खेळत व्हतो, तर पोरंबी एकमेकास्नी तेच विचारत व्हती. कुणालाच काय ठाव नव्हतं. मग सुताराचा बाळ्या म्हणाला, 'आरं पर हांडीलानं इंजिन कसं सुरू झालं? म्हणीत खोटाखोटा पाईप हातात धरून कंबरतनं लागला की गोलं फिरायला. तसं

आखखा दिस आम्ही ट्रक, इंजिन, ड्रायव्हर, स्टेअरींग, धरण हे नवे शब्द जसे पाठ करावेत, तसे फेर धरून आम्हा पोरांच्या खेळात पिंगा घालत व्हते.

दुसऱ्या दिवशी जत्रेला जाऊन यावं तसं गुलालानं सारी कापडं लालभडक झालेले लोक तीर मारून आल्यासारखे गावात मिरवीत व्हते. ज्यो त्यो त्यांना मान देत होता. इठलाला जाऊन आल्यावर वारकऱ्याला जसं गावात मान मिळतुया तसा ह्या लोकान्ला मान मिळत व्हता. प्रत्येकजण इचारीत होता, कसं दिसलं रं यशवंतराव? आन् नेहरूस्नी बगीतलसं का रं? कसं बोलत्यात? मराठीतनं बोलले का विंग्रजीतनं रं? मग मोठा आव आणीत तो सांगायचा, 'लय मैंदाळी गर्दी झालीती. आमी लांब एका टेकडीवर उभे व्हतो. जवळनं बगायला न्हाय घावलं. यशवंतराव तेवढं बोललं मराठीतनं. नेहरू हिंदीतनं बोलले. काय समाजलं न्हाय. लांब झग्याचा नेहरू शर्ट, गांधी टोपी, जाकीट, धोतर, आन् बाकीचे बी तसेच. 'धरण धरण' बोलत व्हते. पर पोलिस काय जावू देत नव्हते कुणाला. तोबा तोबा गर्दी, माणसचं माणसं.'

'पर धराण म्हंजी काय आसतंया गां भानुदास?' बा इचारत व्हता. मला बी कुतूहाल व्हतंच. मी पुढे सरकून ऐकू लागलो. 'मला तरी काय समाजतंया? पार ऐकल्यालं सांगतू झालं.'

'हां, सांगा' बानं हातातलं टोपलं तसंच बाजूला सारलं. तंबाकू काढली. भानुदासाला दिली. तंबाकूला चुना लावीत त्यो सर्गात जाऊन आल्यावाणी सांगायला लागला. 'बापू नदी कवा बगीतलीयास का?'

'व्हय. बगीतलीया की. कोकणात पोटं भरायला जाईन आसतूना तवा.'

'मंग किसना बगीतलीयास?'

'न्हाई बा.'

'मंग कोयना बगीतलीयास?'

'न्हाईबा.'

'मंग आस हाय बग. किसना, कोयना, येण्णा, गायत्री, सावित्री ह्या पाच भनी, शंकराच्या लेकी. महाबळीसरात शंकराच्या जठतनं निघत्यात केसावाणी, मंग धार होतीया करंगळीवाणी, ती येतीया एका कुंडात, कुंडातनं पाचजणी पायवाटंनं निघत्यात. तिघी मावळतीला आन् दोगी उगवतीला. थोरली किसनाबाय, ती वाईला येतीया. दुसरी येण्णामाय. ती महाबळीसरातल्या कड्याकपारीनं, किरणं मारीत येतीया मावळतीला. किसनाबायला मिळतीया. तिघीतली एक मावळतीला बरीच म्होरं जाती आन् एका डोंगरवड्याला येढा मारीत पुन्हा डावीकडं वळती आन् दोन पहाडाच्या मधनं वाट काडीत काडीत एकटीच सुसाट किरणं टाकीत

झेपा टाकीत निगालीती कोयनामाय. आन् बाकीच्या मावळतीला कड्यावरनं उड्या मारीत कोकणात जात्यात. आन् ततनं सागराला मिळत्यात. त्या धाकल्या दोगी गायत्री आन् सावित्री. कोयनामाय तेवढं लांबच्या लांब ढेंगा टाकीत महाबळीसराच्या डोंगररांगा मागं सारीत कराडाला किसनामायला मिळती. पाऊस काळात कोयनामाय म्हंजी राक्षीसासारखं अक्राळविक्राळ रूप धारण करतीया. समदं कराड पाण्याखाली जातंया. यशवंतरावांचा जीव ह्या संगमावर जडल्याला. लहानाचं मोठं झालं त्ये ह्या संगमावर. किसनामाई, कोयनामाई म्हंजी यशवंतरावाला जीव का प्राण. किसनाकाठ म्हंजी दह्या-दुधाची धार. तुपाची, लोण्याची रेलचेल. तासन् तास नदीतल्या डोहात यशवंतराव पोहलेले. दोन्ही नद्यांचे महापूर आणि उडालेला हाहाकार, पुरातलं बेफाट पाणी-सारंच यशवंतरावांना घडवणारं जीवन. ते पहिल्यांदा मुख्यमंत्री झाले आणि कोयनामाईच्या या पुत्रानं तिलाच आडवण्याचा घाट घातला. देशाला उजेडाचं स्वप्न पडलेलं. यशवंतरावांनी उजेडाचं स्वप्न खरं करण्याचं ठरवलं. तज्ज्ञ माणसं जोडली, कामाला लावली. सारं कसब पणाला लागलं. आख्खी कोयनामाय आडवायची.

'म्हंजी?' बा म्हणला.

'म्हंजी का हातानं आडवायची व्हय येड्या? समंदी इंजिनेर, हाजारो माणसं, धूड यंत्र कामाला लागली. दोन डोंगराच्या भक्कम टेकड्या निवाडल्या. दोन टेकड्यास्नी जोडायचं. पायाला शिसं वतलं म्हणत्यात. मंग दगडांची भली दांडगी भिंत बांधली. पाणी सोडायला दारं केली. लय पाणी झालं तर सोडायला डोंगरायेवढाले दरवाजे केले. चारपाच वर्षं काम चाललं. आन् काल नेहरूंनी त्याचं उद्‌घाटन केलं. यशवंतरावांनी लय काळजात ठिवाव तसं भाषाण केलं. कोयनामाईची खणानारळानं वटी भरली. शेतकऱ्यांच्या लेकरानं केलेले हे अचाट काम बघून सारा शेतकरीवर्ग गहिवरून आलाता. यशवंतरावांची कीर्ती दाही दिशाला पसरू लागली. आता मोठमोठं पूर येणार नाहीत. कराड, सांगली पुरात जाणार नाहीत. शेकडो मैलांचा डोंगरकड्याकपारीचा शिवसागर तयार झाला. महाबळीसरापास्नं ते पाटणपर्यंत कोयनानगर वसवून साऱ्या राज्याला दिपवून टाकील आसं धरण यशवंतरावांनी बांधलं. आता सारी लाईट राज्याला मिळंल. यशवंतराव म्हणाले, आता कुणाच्याच लेकराच्या नाकात काजळी साठायची न्हाय. परत्येकाच्या गावात-घरात उजेड येईल. सारं उजाडेल, समृद्धीचं पीक गावागावांत फोफावेल.'

जणू गरिबाघरी ग्यान आलं की व्हते अशी क्रांती. घराघरात मायमावल्या जात्यावर दळताना-

'बंधुराया माझा यशवंता, बांधी कोयनामाईला धरणं.

इकासाचं ग धोरण, त्यानं बांधीयलं तोरण'

म्हण गाणी गायला लागल्या. यशवंत गुणवंत झाला, साताऱ्याचा अभिमान झाला.

सौ. वहिनींना, बाबांना सप्रेम जयभीम.

तुझा,

लक्ष्मणकाका

दिनांक २६/७/२०१२

चि. सुप्रिया,

सप्रेम जयभीम.

आमची बिऱ्हाडं तेव्हा बडेखानाच्या माळावर उतरली व्हती. या माळावर चिटपाखरू राहत नव्हतं. माणसांची वस्ती नव्हती. मात्र माळ अठरापगड जातींच्या माणसांनी फुलून गेला व्हता. ज्वारीच्या काढण्या सुरू झाल्या ना, की बिनभिकाराला ऊत आलेला असायचा. बडेखान म्हंजी अगदी मनातल्या वाऱ्यानं बेभान झालेल्या वारूचा माळ. चारी वाटांचा मेळ-साखरवाडी, सुरवडी, काळज, हिंगणगाव, तरडगाव, आदर्की, लोणंदपर्यंत पाट्या विकायला जाता यायचं. पाचदहा कैकाड्यांची बिऱ्हाडं. रस्त्याच्या कडेला झाडाखाली उतारलेली. घाणेरीच्या फोका काळजच्या ओढ्याला खच्चून भरलेल्या. त्यानं सारे कैकाडी खूश. तुला गंमत सांगू, आमच्यात बी इनाम असत्यात. इनाम काय फक्त पाटलानाच असतात? आमची इनामं म्हणजे भीक मागण्यासाठी पाट्या, टोपल्या विकण्यासाठी एकाएका कुटुंबाला दिलेली गावं. ते त्याचं इनाम. त्यात दुसरा कैकाडी जात नाही. आणि गेला तर पंचायतीत कज्जा जातो. इनामदार भटके म्हंजे परंपरेनं नियमित वेळेला नियमित वेळी ठरलेल्याच गावाला जातात. ठरलेल्या गावी आपला माल विकून, काम करून कमाई करतात. ते त्या गावचे इनामदार. आता तुझ्या लक्षात येईल, आमची आडनावं मराठे असलेल्या गावच्या इनामदारासारखी का असतात ते.

अशा रीतीनं जे बिनपावसाच्या काळात, सुगीच्या दिवसांत अनेक गावी नियमित जातात आणि पावसाळ्यात त्या गावी स्थायिक झाले असतील ते मिळेल तो काम धंदा करून राहतात. त्यांना 'फिरस्ते' असं म्हणतात आन् जे फिरस्ते किंवा भटके नेमलेल्या गावी वहिवाटीप्रमाणे न राहता वाटेल तिथे भटकतात त्यांना 'उपलाने' किंवा 'उपरे' म्हणतात. भटक्यांचे असे दोन प्रकार पडतात. तिसरा प्रकार आहे तो गुन्हेगार जमातींचा. ते पोटासाठी चोऱ्यामाऱ्या करतात. तर, बडेखानाच्या माळावर आम्ही उतरलो होतो. सारा माळ बिऱ्हाडांनी भरून गेलाता. घिसाडी, बेलदार, वडार, कैकाडी, लमान, नेवाती, वैदू, गोंड, मांगगारूडी, भिल्ल, गोपाळ, कोल्हाटी, हरदास,

दरवेशी, बंदरवाले मुसलमान, गारुडी, माकडवाले, कंजारभाट, नंदीबैलवाले, तिरमल, चित्रकथी, फासेपारधी, बहुरूपी, रायरंद, भोपे, भगत, आराधी, वाघे, मुरळ्या, जोगती, हिजडे, जोगतिनी, कानकाडणी, भराडी, वासुदेव, पांगूळ, गुरू बाळसंतोषी, राऊळ, मेढगी (आपल्या बारामती तालुक्यात यांची संख्या मेडद, माळेगाव, जळोची या गावी मोठ्या संख्येनं आहे.) ठोके जोशी, कुडमुडे जोशी, पोतराज, कानफाटे, गोसावी, उदाशी, अंधोरी आंधळेपांगळे, नाथपंथी डवरी गोसावी, वारकरी, कबीरपंथी, संन्याशी, घरभारी, तीर्थयात्रा करणारे काशी कापडी, नाना तऱ्हेचे गोसावी, बैरागी, जातीजातीचे गुरू व मागते. मानभाव, नानक, फकीर शिद्धी, इराणी, बलुची, अफगाणी, मरीआईवाले, मसणजोगी असे शेकडो जमातींचे वेगवेगळ्या वेशातले लोक. वेगवेगळ्या भाषा बोलणारे, चालीरितीनं भिन्न भिन्न; पण तीन दगडांच्या चुलीवर शिजवून खाणारे लोक. काही जाती गाढवं पाळणाऱ्या, त्यांचं गोत्र गाढव, म्हणून ते गाढव गोती.

जातवार, जातीच्या लोकांची बिऱ्हाडं एकत्र लावत असत. आमच्या बिऱ्हाडाशेजारी मात्र दोन घिसाड्यांची बिऱ्हाडं व्हती. ते आमच्यासारखे उघड्यावर राहत नव्हते. त्यांची बिऱ्हाडे बारदान्याची व्हती. दोन लाकडं उभी मेढ्यासारखी एकामागे एक ठोकलेली, त्यावर आडवं लाकूड बांधलेलं आणि त्यावर वढून बारदान बांधीत. चारी कोपऱ्यांना चार लोखंडी मेका ठोकून त्याला खाली ओढून बारदान बांधलेलं असे. त्यानं त्यांची दोन्ही पालं खूप छान दिसत. त्यांच्याकडेही पाचसात गाढवं, एकदोन खाट म्हशी होत्या. त्यांची गाढवांची पारख फार चांगली असते. उंच काठेवाडी गाढवं यांच्याकडे असतात. ती फार उठून दिसत. अतिशय देखणी असतात गाढवं. बकरी, कोंबड्या, कुत्री म्हंजे यांचा संसार. नांगराचा फाळ, कुऱ्हाडी, कुदळी, वसू, खुरपी, ऐरण, धाबा, सुळे, पळ्या, विहे, वायकांडे, शिळ्यांचे खुळखुळे, सुकल्या, खोरी, टिकाव, बैलगाडीच्या चाकाच्या धावा, कोयते असे. शेतकऱ्याला लागणारे हरप्रकारचे जिन्नस हे तयार करतात. यांच्या पालाच्या पुढच्या भागात भाता लावलेला असतो. भात्यावर कोळशाचा बारकासा ढीग घालायचा. भात्याची काठी दोरीनं ओढत कोळसा चिंधीनं पेटवला जायचा. जाळ सुरू झाला की, लोखंडी काम सुरू व्हायचं. भाता फुकत भला मोठा घण घेऊन पुरुषासारखं कंबरेला पिळोखे घालीत गरागरा फिरवीत बायका घण मारीत. लालबुंद लोखंड आकार बदलायचं. घिसाडी मोठ्या खुशीत ऐरणीवर तापलेलं लोखंड फिरवीत राही. त्याला पाहिजे तो आकार देऊन नव्या नव्या वस्तू त्यातून ते तयार करत. हा नवनिर्मितीचा उद्योग त्यांच्या पालापुढे तासन् तास बसून मी पाहत राही. आमच्या बिराडाच्या दुसऱ्या बाजूला पंधरा वीस माती वडारांची बिऱ्हाडं व्हती. प्रत्येकाकडं शेळ्या, कोंबड्या, गाढवं, कुत्री आणि

डुकरे असतात. वडार, कैकाडी एकत्र राहतात. कारण ते दोघंही डुकरं पाळतात आणि डुकरं खातात. मोठी कष्टाळू जमात. विहिरी खणणं, घरं बांधणं, पार बांधणं, बांधबंदिस्ती करणं, गाढवांच्या पाठीवरून मातीची वाहतूक करणं, वाळूची वाहतूक करणं, दगड काढणं-फोडणं, दगड घडवणं, मूर्ती करणं, जाती-पाटे-वरवंटे-उखळी तयार करणं. जाती उखटणं, चौरंग तयार करणं, विकणं, बाया-पुरुष मिळून गावांत हिंडून जाती उखटून देतात.

सुप्रिया, या लोकांनी जाती तयार केली नसती, तर माणसांनी धान्य काय कडाकडा फोडून खाल्लं असतं? प्रत्येकाच्या दारात जातं होतं. ते ज्याच्याकडे नाही, असा फक्त गुरव. तो सोडला तर सारे पीठच खातात. पण त्याची आठवण गावाला, गावकऱ्यांना कधीच होत नाही. बांध घालणं, ताली बांधणं, तळी खोदणं, देऊळं-राऊळं बांधणं, मोठमोठे वाडे बांधणं, किल्ले बांधणं, याला लागणारे दगड घडवणं, माती भिजवणं, मातीचा काला करून माती कमावणं, गवतांच्या तसूच्या तसू महिनोन् महिने तुडवणं, त्याआधी माती बारीक करणं, ही सारी गावाची कामं, राजांची कामं. नक्षीची कारागिरी करणारे वडारांचे अनेक प्रकार. कैकाडी मातीची वाहतूक करत. वडार माती तयार करत. मोठ्या कष्टाचं काम. त्यांच्याही अनेक जाती आहेत. बेलदार, गाडी वडार, माती वडार, पाथरूट, कैकाड्यांच्यात गावकैकाडी, चोर कैकाडी, माकडवाले, पामलोर, या उपजाती तर वडारांच्यातली संता मुचलर ही अगदी बारकी जमात चोऱ्या करणारी. बाकी सारे काबाडकष्ट करणारे. पण हे सारे चोरीसाठी बदनाम. जाती, उखळ, पाटे, वरवंटे या वस्तू घरोघर जाऊन विकणं, बदल्यात धान्य गोळा करणं, गावात भाकरी मागणं, मागून खाणं, डुकरं पाळणं यातच त्यांचं उत्पन्न. डुकरांचे केसही विकले जातात. पावसाळ्यांत पोटासाठी हे लोक चोऱ्या करतात. मेंढरं, बकरी, कोंबड्या चोरणं, देव विकणं, कणगी फोडणं, घरफोडी करणं, हातोहात वस्तू लांबवणं यात कैकाडी माहीर. ज्या घरात माणसं कमी असतात, त्या घराच्या परसदारात चारपाच कैकाडणी बसतात. काहीजणी पुढल्या दारी खोटी भांडणं करून एकमेकाला रक्त निघेतोवर मारतात. घरातली माणसं तंटा सोडवायला घराबाहेर गेली म्हणजे मागच्या दारी बसलेल्या आमच्या बाया आत शिरून हाती लागेल ते घेऊन पसार व्हतात. काही कैकाडी माकडांचा खेळ करतात. साळी, धनगर, कोष्टी, मोमीन यांना गवताच्या मुळापासून तयार केलेल्या कुंच्या बांधून विकतात. बायकांना छान गोंदणं काढता येतात. राजापासून रंकापर्यंत सर्व बायका त्या काळी गोंदून घेत असत. आपला बाप किंवा नवरा हातावर गोंदून घेणं, कपाळावर टिकली गोंदून घेणं, हातावर साप गोंदून घेणं ही त्या काळी बायकांमध्ये मोठी वहिवाट होती. समाजाची केवढी सेवा ही माणसं करत होती. पण गाव कायम

त्यांना गावाबाहेरच्या माळावर, हागणदारीत ठेवत होतं.

असंच एक आणखी दुसरं बिऱ्हाड माझ्या लक्षात राहिलं ते वैदूंचं. वैदू ही अशीच शिकार करत हिंडणारी जमात. रानूमाळ हिंडून, जंगल पायाखाली घालून झाडपाल्याची औषधं शोधत असत. जंगली जनावरांच्या शिकारी करत. त्या जनावरांच्या रक्त, मांस, हाडे, कातडी यापासून कितीतरी औषधं आणि त्यांचे औषधी गुण परंपरेनं त्यांना अवगत असत. ते कधी एकटेदुकटे राहत नाहीत. चांगली शंभर दोनशे माणसं, शेकडो कुत्री, शेकडो गाढवं एकत्र हिंडत असत. उसाच्या फडातून ससे, कोल्हे, रानमांजरं यांच्या शिकारी, खोकडांच्या शिकारी, खोलखोल पाण्यातल्या मगरी मोठ्या खुबीनं हे वैदू पकडत असतात. गाढवं, कोंबड्या, शेळ्या आणि कुत्री ही या जमातीची संपत्ती. ज्याच्याकडे कुत्री जास्त तो श्रीमंत. त्याच्याकडे हक्कानं मुलगी देणार. ज्याच्याकडे कुत्री नाहीत, तो श्रीमंत असला तरी त्याच्या घरी मुलगी देणार नाहीत. जो कुत्र्याला खाऊ घालत नाही, तो माझ्या लेकीला काय खायला घालील, असा त्यामागे विचार.

यांच्या पंचायती आजही चालू आहेत. कोणाच्या घरी साप निघाला, तर पायलीभर दाणे घेऊन ते साप पकडून देतात. पुरुष-बाईचं औषध, वाताचं औषध, आसं म्हणत गावोगाव हिंडतात. पुरुष तुंबड्या काढण्यात तरबेज असतात. स्त्रिया शीलवान असून पातिव्रत्याचं पालन कसोशीनं करतात. सुया, दोरं, मणी, पोत, दाभण, पोरांच्या मनगट्या, वाळे, बायांच्या कानातली फुलं, रिबीनी, रांगोळ्या विकतात. धान्य, भाकरी भीक मागून आणतात. सर्व घरदार भीक मागतं. ताज्या भाकरी स्वत:साठी ठेवतात. शिळ्या भाकरी, अगदी भुरा आलेल्या भाकरीही झोळीत घेतात. त्या कुत्र्यांसाठी. वैदूंच्या दोन जाती, एक संचिवाले वैदू आणि दुसरे झोळीवाले वैदू.

सांगत होतो ते राहिलंच बघ बाजूला. तर सुप्रिया, एव्हाना तुझ्या लक्षात आलं असेल, मी असा का आहे. चौथीपर्यंत मला शिकायचं नव्हतं. माझं फिरस्त्यांचं मस्त मौजेचं आयुष्य होतं. अठरापगड जातींची आम्ही पोरं माळावर गाढवं राखत सुखात होतो. बाच्या डोक्यात मात्र मला शाळेत घालायचं, शिकवायचं खूळ होतं. दररोज फोकांचा वळ उठेपर्यंत मी शाळेत जात नव्हतो. चौथीपासून उलटं झालं. मला शिकायचं होतं आणि बाला फोका, पाट्या वळण्यात, विकण्यात मला घालायचं होतं. सुप्रिया, माझी आई फार कर्तबगार. तिनंच खरं तर मला घडवलं. ती अतिशय सुंदर आवाजात गायची. बायांबरोबर फेर धरून नाचायची. आम्ही आठ भावंडं. सगळ्यांना गरिबीतही तिनं मायेनं वाढवलं. मी तिच्या हाताला धरून पाट्या, टोपली विकायला जायचो. तुमच्या पवारांच्या मळ्यातही यायचो. मेडदला माझे मामा राहायचे तर काट्याची वाडी माझं आजोळ. अगदी लहान असताना आई मला घेऊन वाड्यावस्त्यांवर

पाट्या टोपली विकायची. सर्वत्र मागून आणलेल्या भाकऱ्या. तुझ्या आजीच्या, बाईंच्या वसरीला बसून आम्ही जेवायचो. त्या आईला **आनवरी** म्हणून हाक मारत. घरातल्या भाकऱ्या, ताक आणि शेवग्याच्या शेंगाचं पिठलं किंवा शेवग्याच्या शेंगाची आमटी देत असत. आजही मी तुझ्या मळ्यात गेलो ना तर मला दिसतात त्या बाई आणि त्यांनी तेव्हा वाढलेल्या शेवग्याच्या शेंगा.

असाच मी आईच्या मागं टुमणं लावून, ती नको नको म्हणत असताना, तरडगावातल्या गल्लीबोळात हिंडत व्हतो. हातात काठी व्हती. अंगावर भला मोठा अंगरखा, चड्डी नव्हतीच. मी चौथीला गेल्यावर बानं मला चड्डी विकत घेतली. आता मी मोठा झालो व्हतो ना? म्हणून आई मला पाट्या विकायला नेत नव्हती. नीट बोलत नव्हती. तू जा निरगुडीला, शाळा बुडवू नको म्हणून रागवत व्हती. तरी मी तिच्या मागं मागं हिंडत व्हतो. एके ठिकाणी माणसं जमली व्हती. मी तिकडं बगत व्हतो. आई दुसऱ्या बोळातनं पुढं गेली. मी पळायला लागलो. आणि काय सांगू सुप्रिया, कुत्र्यांनी अक्षरश: मला उताणा केला. हातातली काठी उडून गेली व्हती. कुत्र्यांनी पायाचा लचका घेतला व्हता. माणसं पळत आली. कुत्र्यांना हुसकावून लावलं. आई पळत आली. मी रक्तबंबाळ झालो व्हतो. आईनं केलेला आक्रोश आजही काळजाचा ठाव घेतो. तिनं पदरानं रक्त पुसलं. चुना लावला, रक्त थांबलं. सारे गावकरी मला एकट्याला सोडल्याबद्दल तिला नावं ठेवीत होते. तिनं मला एका घराच्या वसरीला बसवलं. 'उठू नको' म्हणून शिव्या देत बजावलं. डोक्यावर झाप, पाट्या घेतल्या आणि म्होरल्या आळीला गेली. माझ्या कानावर येत होतं, 'घेता का गं झाप, पाट्या, टोपल्या.' माझ्या पायाचं रक्त थांबलं होतं.

कुत्रं काही पहिल्यांदाच चावलं नव्हतं. मी उठलो आणि माणसं जमली व्हती तिथं गेलो. माणसं कुणाची तरी वाट बघत व्हती. कुणाची ते काही माहीत नव्हतं. थोड्या वेळानं एक गाडी आली. त्या गाडीत दोन-तीन बायका होत्या. दोन अगदी तरण्या. माझ्या आईच्या वयाच्या. एक होती त्या दोघींपेक्षा वयानं मोठी. साध्या, पण सुती साडीत ती बाई फारच छान दिसत व्हती. डोक्यावरला पदर अतिशय अदबीनं घेतला होता. कपाळावरचं कुंकू अतिशय ठसठशीत दिसत व्हतं. गळ्यातलं डोरलं, मणीमंगळसूत्र डोकावत व्हतं. पायात छान चपला व्हत्या. अतिशय सोज्वळ, शांत, घरंदाज चेहरा, अत्यंत बोलके डोळे, ओठांची हसरी ठेवण, थोडी आटोपशीर जिव्हणी, नाकात छानशी चमकी, नाक फार लांब नाही आणि फार आखूडही नाही अशी अत्यंत शालीन बाई गाडीतनं उतरली. तसं लोक घोषणा द्यायला लागले. 'यशवंतराव चव्हाणांचा विजय असो', 'वेणूताई चव्हाणांचा विजय असो.' मी गर्दीत पुढे सरकलो. बाईंनी घोषणा बंद करायला लावल्या. शांतपणे चालत एका घराच्या पडवीला बसल्या.

तिथं हळदीकुंकू व्हतं. भराभर बाया-पुरुष जमले. गर्दी वाढू लागली. एक पुढारी भाषण करायला उभा राहिला. बाईंनी त्यालाही बोलू दिलं नाही. म्हणाल्या, 'मी काही पुढारी नाही. तुम्हाला भाषण ऐकायचं तर साहेबांचं ऐका. मी काही भाषण करीत नाही. आम्ही साऱ्याजणी हळदी कुंकवाचा कार्यक्रम करू. पण एक निरोप सांगायला आलीय. म्हटलं तर साहेबांचा म्हणा किंवा माझाच प्रेमाचा आहे असं समजा. पंचायत समितीला निवडणुकीसाठी आपल्या पंचक्रोशीतला चांगला शिकलासवरलेला गरीब शेतकऱ्याचा पोरगा उभा राहिलाय. कृष्णचंद्र भोईटे. त्याला सर्वांनी मतं द्या. मोठ्या बहुमतानं निवडून यायला पाहिजे. मी कुणाचा प्रचार करत नाही. मी काही चांगलं भाषण करू शकणार नाही. पण माझा हा सांगावा सगळ्या मतदारांपर्यंत पोहोचवा. अडसूळअण्णा, तुम्ही आलं पाहिजे मला मुंबईला सांगायला, आपला कृष्णचंद्र निवडून आला...'

बाई बसूनच बोलत व्हत्या. गावकरी जिवाचं कान करून ऐकत व्हते. मला थोडं थोडं समजत व्हतं. बाईंनी चहा घेतला. हळदीकुंकू झालं. बाई उठल्या. साऱ्या बायांची रेटारेटी सुरू व्हती. जो तो म्हणत व्हता, वेणूताई कधी कुणाला मत द्या, असं सांगायला येणाऱ्यातल्या नव्हत्या. त्या कधीही राजकारणात नसतात. भोईट्याचं भाग्य मोठं, ते निवडून आल्यातच हाय बगा. यशवंतरावांनी खेड्यापाड्यात पंचायतीचा धडाका उडवून दिलाय. आता मुंबईचं राज्य गावात आलं. लोकशाहीला कोंब फुटलं.

सुप्रिया, हे सारं चित्र आजही डोळ्यांपुढं आहे. फलटण आणि वेणूताई अशी फलटणची नवी ओळखं राज्यभर आणि देशभर झाली. चव्हाणसाहेबांची सासुरवाडी म्हणून आणि फलटणच्या मनमोहन राजवाड्यातली राजकीय खलबतं यासाठी फलटण प्रसिद्ध. मी वेणूताईंना पहिल्यांदा पाहिलं ते तरडगावांत. कुत्रं चावलं असताना. मात्र सारी टोपली विकून मला बसवलं होतं तिथं आई गेली तर मी गायब. ती मोठ्यानं रडत मला शोधत व्हती. मी गर्दीत तिला सापडत नव्हतो. ती फार कासावीस व्हती. मी तिला दिसलो. ती पळत आली. मला छातीशी कवटाळलं आणि रडायला लागली. बायाबापे आम्हांकडं कौतुकानं पाहत व्हती. ही सख्खी आई आणि पुढे जिनं माझ्यासारख्या लाखो पोरांवर प्रेम केलं, ती दुसरी आई मी पहिल्यांदा पाहिली. तरडगावच्या शेतकऱ्याच्या पोराच्या प्रचारात. तो पोरगा पुढे निवडून आला. पाच वर्षं तालुक्याचा सभापती झाला.

ती. सौ. वहिनींना, बाबांना सप्रेम जयभीम.

तुझा,
लक्ष्मणकाका

दिनांक ७/८/२०१२

चि. सुप्रिया,

सप्रेम जयभीम.

मागे एका पत्रात मी तुला, कोयनेची लाईट येणार तेव्हा शिवारात नव्यानं तारा ओढायचं काम कसं सुरू होतं त्याची हकिकत सांगितली आहे. त्याकाळी फलटणला फक्त लाईट असावी. माझ्या आठवणीप्रमाणे रात्रीच्या वेळेला फक्त फलटणच दिसायचं. शहराचा पुंजका सोडला तर बाकी सारा भाग काळ्याकुट्ट अंधारात गुडूप झालेला असायचा. काही कारणानं फलटणवरनं निघायला उशीर झाला म्हणजे लोक एक तर उघड्या मारुतीच्या मंदिरात झोपायचे किंवा एकाला दोघं असतील तर बोलत बोलत निघायचे. फलटण निरगुडी तेव्हा गाडवाट व्हती. झिरपवाडीच्या माळावर संस्थानचा सैतान बंगला व्हता. त्या बंगल्यात भूतं राहतात असा आजही समज आहे. तेव्हा तिथून भुताच्या पालख्या निघतात, अमावास्येला तर भुतांच्या पंगती बसतात अशा गोष्टी मोठी माणसं आम्हाला सांगत असत. तानाजी रामोशी तर म्हणे एकदा त्यांच्या पालखीत सामील झाला. दिवटी धरून चालत व्हता. भुतं पंगतीला बसली. ही पंगत कोणत्यातरी ओढ्याला बसली व्हती. तानाजी रामोशी कशाला बी न घाबरणारा माणूस. तो पंगतीला बसला. तो हे सगळं सांगत व्हता, तवा बी आमची पाचावर धारण बसलेली. जाम घाबरलो व्हतो. तुला सांगतो, काळ्या रंगाचा तानाजी अंधारात भूतांच्या पंगतीत कसा दिसत असेल? त्याच्या आकडेबाज मिश्या, भलं मोठं पागोटं, अंगावरली घोंगडी, हातातली काठी, भुतांना दिसत नसंल का? मी विचारलं तसं म्हणला, 'घोंगडीची खोळ पांघरली व्हती ना, मंग कसा दिसंल? त्यांचं पाय उलटं असत्यात. म्हण म्या बी पायतान उलटी घातलीती. बोलायचं न्हाय. बोललं की खलास. तिथल्या तिथं मरून पडणार. बसलो जेवायला. लाडू आन् काय काय, नको म्हणायचं न्हाय. वाढत्याल ते सारं घोंगडीच्या खोळीत भरत गेलो. पंगती उठल्या. भुतं निघून गेली. मी तिथंच बसलो व्हतो. पहाटं झुंजूमुंजू व्हताना उठलो. तर घोंगडीतनं सारं दगाडं न गोटं. लाडू कुठं गेलं कोणास ठाव? पण, तवापास्न ह्यो हात गेला त्यो गेलाच.' अशा गोष्टी आम्हां पोरांना खूप आवडायच्या. पण रस्त्यानं निघालो

की त्या नजरंम्होरं यायच्या आन् मग काय? सुसाट पळत सुटायचं!!

तर सांगायचा मुद्दा काय, सारं अंधाराचं साम्राज्य. त्यानं चोऱ्या, दरोडे, मोठ्या प्रमाणात व्हायचे. रामोशी, कैकाडी, मांग- आमच्या गावात टोळ्या व्हत्या यांच्या. दहशत बी मोठी व्हती. तान्या रामोशी आता थकला व्हता. त्याच्या तरुणपणच्या संस्थान काळातल्या गोष्टी तो सांगायचा. 'सांगून-सवरून, दवंडी देऊन तेव्हा दरोडे पडायचे. पाचपन्नास तरुण पोरं एकत्र टोळी करायचे. खडान्‌खडा माहिती काढायचे. कोणत्या पाटलाचं वागणं गैर आहे, कोणाकडं पैका आहे, याची माहिती घ्यायची. त्या गावात दवंडी देऊन गावाला सावध करायचं! 'ह्या महिन्यात तुमच्या गावावर तान्याचं बंड पोचणार हाय. गाव-कामगार-पाटलानं शहानं व्हायचं. न्हायतर गावावर दरूडा पडंल याची नोंद घ्यावी हो....' म्हण दवंडी द्यायची. अशी दवंडी झाल्यावर गावचा वतनदार पाटील तान्या रामोशाला शरण जायचा. आसंल ती खंडणी द्यायचा. नाही तोड निघाली तर दरोडा पडायचा. पाटलाचा वाडा, श्रीमंतांची घरं लुटून टोळी पसार व्हायची. मुद्देमाल काही जावायचा न्हाय. गरिबांना त्रास नव्हता. गावात दरोडा आला तरी तो गरिबाघरी नसायचा. गरिबांची सहानुभूती दरोडेखोरांना असायची. गावचा रामोशीच माग काढायचा. त्यानं टोळी घावायची न्हाय. तान्या रामोश्याच्या टोळीत किसन नाईक नावाचा गोफण्या होता. त्याला लोक 'गोफण्या किसन' म्हणून हाक मारायचे. दिवसभर त्यो माळावर वड्याला बारक्या दगडांची शोधाशोध करायचा. माळावर ढीग लावून ठेवायचा. दरोड्याला निघताना समद्या गड्यांनी हे दगडाचं गोटं पाटकुळीवर घोंगड्याच्या खोळीला भरून घ्यायचं. प्रत्येकाच्या कंबरंला गोफण असायची. दरोडा घालायच्या जागेपास्नं तिकाटन्यावर गोफण्या किसन उभा राहायचा. झोळीत गोटे असायचे. दुसऱ्या वाटंनं दुसरा गडी, जेवढ्या वाटा तेवढं गडी गोफणी घिवून उभं राहायचं. ह्या चौघांच्या जिवावर बाकीचे गडी वाड्यावर चढून जायाचे. कानास कु होणार नाही, याची प्रत्येकजण काळजी घ्यायचा. कुत्रीसुद्धा दरोड्यात सामील असायची. एक गडी कुत्र्यामागं असायचा. दिसला कुत्रा की, टाक बैलाचं हाडूक! हाडूक चघळीत कुत्रं बसायचं गपचीप. त्यातनं कुणी काळ्याकुट्ट अंधारातनं जाग झालंच, तर किसन गोफणीच्या दगडात येणाऱ्याचं आकाळ फोडायचा. जागेवरच गडी उताना. आख्खं गाव आलं तरी गडी गोफण फिरवीत गाव आडवायचा. बाकीचे चिऱ्याचिऱ्यावरनं वाड्यावर जायाचे. कौलं काढायची. पाटील झोपला आसंल तिथं उतरायचं. दोगांनी उशाला, दोगांनी पायथ्याला कुऱ्हाडी घिवून उभं राहायचं. बाकीच्यांनी माल भरलेल्या गोण्या खांद्यावरनं कौलावर आन कौलावरनं वाड्याबाहेर आन तितनं गावाबाहेर न्यायच्या. बायापोरांनी दंगा केला तर, तरण्या पोरांनी दंगा केला तर कुऱ्हाडीनं घाव घालायचं. बायांच्या अंगाला कुणी हात लावायचा नाही,

असा नियम. एखाद्यानं लावला तर पहिला बळी त्याचाच. दागिणं काढून घ्यायचे. आयाबहिणीला हात लावायचा नाही. एकएकदा मोठी गंमत व्हायची. बाळंतिणीसाठी उतरंडीत लावल्याली बिदागी यांना घावायची. बिदागी म्हणजे बाळंतिणीसाठी तुपात खारका मुरवत ठेवलेल्या आसायच्या. त्या खारका गड्यांना घावल्या, की तिथंच ते खात बसायचे! वेळ झाला की निघायचे. गडी गावाच्या बाहेर गेल्यावर कुत्री बोंबलायला लागायची. तोवर गडी पार पशार झालेले आसाचे. अशी गावंच्या गावं लुटली जायची. मोठी दहशत होती त्या काळी रामोश्यांची. आणलेला माल गावच्या पाटलाकडं ठेवायचा! हजेऱ्या व्हत्या. दिवसातून तीन वेळा पोलिस पाटील हजेरी घ्याचा. सारा माल त्याच्याकडेच असल्यानं तो सारे गडी गावात हजर व्हते, रात्रीपण हजर व्हते, अशी खोटी हजेरी मांडायचा. प्रकरण कोर्टकचेरीत गेलं तरी सारी टोळी सहिसलामत सुटायची. बोंबाबोंब झाली नाही म्हंजे अर्धा माल पाटील या सर्वांना वाटून द्यायचा. राजापूरची रामोश्यांची टोळी फार प्रसिद्ध होती. ते पार कलकत्यापर्यंत जाऊन दरोडे घालत...

तर काळोखाची अशी मोठी दहशत, भीती होती. शिवाय छोट्या मोठ्या भुरट्या चोऱ्या. शेतातल्या पिकांच्या, कपाश्या, कणसं, शेंगा... भुरट्या चोरांचा रात्री खूप सुळसुळाट असायचा. आमचे लोक मोठ्या संख्येनं चोऱ्या करत असत. दिवसाला तीन वेळा, रात्री तीन वेळा हजेरी असायची. पण या कायद्याला न जुमानता आमचे लोक दरोडे घालत. गाव बेजार व्हायचा. आमच्यातल्या चांगल्या माणसांनाही पोलिस खूप त्रास द्यायचे. कधीकधी नेवाती टोळ्या, कधी पारधी टोळ्या, कधी मुसलमानांच्या फिरस्त्या परमुलखातल्या टोळ्या खेड्यापाड्यात हैराण करत असत. नेवाती गावचे मुसलमान लोक हजारो गाई म्हशी, घोड्यांसह यायचे. गाव कामगारास आतल्या अंगाने पैसे देऊन झुडपी जंगल चारायला विकत घ्यायचे. पण हे केवळ निमित्त, चोऱ्या करणं हाच हेतू. शेतात राखणदार असला तरी पाण्यावर जाताना किंवा या गावाहून त्या गावाला जाताना ते आपली गुरं शेतकऱ्यांच्या शेतात चारू लागत. रात्री-बेरात्री रानंच्या रानं चारून फस्त करत. जनावरंही इतकी तरबेज असायची की, परक्या माणसाचा वास आल्याबरोबर चौखूर उधळत असत. रात्रीच्या वेळी शेतात राखण कोण करणार? त्यामुळे या टोळ्यांचं काम बिनधोक होत असे. इराणी, बलुची, पठाण, लोकांच्या टोळ्या रानोमाळ हिंडत असत ते असतच. चाकू, तलवारी, बरचे, काश्या, सुऱ्या, कापडी बूट, सोन्या-रुप्याची खोटी नाणी, खोटे जवाहीर विकण्याच्या निमित्तानं येणारे आणखी वेगळे लोक येत, ते वेगळेच. त्यानं 'घरच्या भीतीनं घेतलं रान, वाटेत भेटलं मुसलमान' अशी म्हण बायापोरांच्या तोंडी असायची. लालबुंद, उंचेपुरे, धट्टेकट्टे मुसलमान पाहिले तरी आमची चड्डीत 'होत' असे! अशा

टोळ्यांवर टोळ्या आल्या, की गावाची पाचावर धारण बसत व्हती. जो तो जीव मुठीत धरून जगत असे. दारांना आतून कड्या घालून बसायचे. आपल्या दारात गडी आले तर काय? अशावेळी बाहेरच्या टोळ्यांचा प्रतिकार तानाजी नाईकाची टोळी करत असे. सारा गाव एक होऊन या रामोश्यांच्या मार्गदर्शनाखाली टोळीवाल्यांचा बंदोबस्त करीत असे. रातच्याला गस्त घालीत. प्रत्येक आळीतली तरणी पोरं टेंबं धरून रात्ररात्र 'जागते रहो'चा पहारा देत. बायापोरांनी झोपायचं. गरीब माणसं बिनघोर असायची. त्यांच्या झोपड्याकडे कशाला येतील टोळीवाले? सारं अंधाराचं राज्य होतं. रात्र चांदण्याची असो की अंधाराची टोळ्यांना फरक पडत नसे. ते आपलं कसब कामाला लावत.

सुप्रिया, असं दहशतीचं वातावरण. इंग्रजांचं राज्य येवो अथवा संस्थानिकांचं, खरं राज्य असायचं ते या दरोडेखोर टोळ्यांचं, त्यांना सामील असलेल्या गाव कामगारांचं. या सर्वांना काहींना काही वाटतच हे दरोडेखोर टोळ्यांतले लोक आपला निर्वाह करत असत. भिकारी, टोळीवाले, अज्ञानाच्या अंधारातच असत. पण गावाबाहेरही अंधारातच असत. माझी आजी फार छान सांगायची–

महादेव आला ईश्वरस्वारी
बी पेरले धरणीच्या उदरी
मेघ बरसला पिकल्या मोत्याच्या घागरी
पाचा कणसांसाठी महादेव करून गेला चोरी
फिरून घेतली पाच कणसे भेंडे उडविले चारी
महादेवाच्या गळा बांधीला एका वेळावरी
सोड बळीराया तुझे भाग्य आहे थोरी
आंध्रव, गंध्रव राजा स्वर्गाचा झाला
अंकली टंकली राजा निर्वाणाचा टाळी
असा पवाडं गाते तुझ्या धर्माची साळी

मानवाचं सत्त्व पाहण्यासाठी देव वाट्टेल ते रूप धारण करतो व दान देणाऱ्याला स्वर्ग प्राप्त होतो, असं दानाचं महत्त्व सांगितलं आहे. चोऱ्या करायच्या, भीक मागायची जगण्यासाठी, अंधारातली ही प्रेतं– जीव जात नाही म्हणून भुताखेतांच्या गोष्टी आळवीत, देवधर्माच्या नावानं ठेचा खाऊन जगत असायची. मरण येत नाही म्हणून जगायचं. किंवा मरेपर्यंत जीव मुठीत धरून जगायचं. स्वातंत्र्यांचा सूर्य उगवला, अज्ञानाचा अंधार दूर झाला. अशा संधिकाळात यशवंतरावांनी आपलं राजकारण केलं आहे. जुनी व्यवस्था मोडायची. नव्यानं नवं जग उभं करायचं.

तर काय सांगत होतो, अंधाराची कळा, पिढ्यांचा अंधार. त्या दिवशी

सकाळच्या पारी तान्या रामोशी मोठ्या खुशीत बाच्या बरोबर तंबाकू मळत सांगत व्हता, 'बापू, दवंडी द्यायला सांगतूया गड्या महाराला. सरपंच म्हणाल्यात समद्या गावाला सांगायला पायजेल. दवंडी देऊन सांगा आज साऱ्याला गावातली लाईट सुरू होणार हाय.' तान्या नाईक म्हारूड्याकडं गेला. बा आईला म्हणाला,

'आगं आयकलंस का, सांच्याला ह्या खांबावला लाईट लागणार हाय'.

दोन महिन्यापास्नं गावातल्या गल्ल्याबोळानं चौकाचौकांत खड्डे खांदून लोखंडी पोल रवायचं काम सुरू व्हतं. पाचपन्नास माणसं खांब रवीत व्हते. तारा वडीत व्हते. आड येणाऱ्या झाडांच्या फांद्या कापीत व्हते. महिनाभर गावात एकच चर्चा व्हती. आपल्या गावात आता लाईट सुरू होणार हाय! ज्यो त्यो लाईट कवा सुरू होणार म्हण वाट बगीत व्हता. आन् गजा म्हाराची दवंडी फिरू लागली. दिवस उगवून कासराभर आला व्हता. सकाळच्या उन्हात पोरं गल्ल्याबोळात गोट्या खेळत व्हती. दारातनी जनावरांचा शेणगोटा करत शेतकरी कामाला लागले व्हते. सकाळच्या गायांच्या धारा काढून दुधं चुलीवरती तापत व्हती. बाया घराघरांत लगबगीनं चुलीवर भाकरी भाजत व्हत्या. कुणी आंगुळी करीत व्हते. कुणी भाकरी बांधून लगबगीनं शेरडं सोडून रानात निघाला व्हता, तर कुणी म्हसरांना हागनदारीत हाकीत व्हता. बेंदतल्या हिरीवर बायांची मुरकंड वळली व्हती. प्रत्येकीला पाणी वडायची घाई झालीती. प्रत्येकीची बादली हिरीतनं पाणी काढायला खाली टाकलेली. सगळ्याजणी कंबरेत वाकून पाणी शेंदत व्हत्या. घागरी, हांडे, चरव्या, कळश्या भरत व्हत्या. एकमेकीला उचलू लागत व्हत्या. त्यानं एकच कालवा चाललाता. प्रत्येकीला रानात जायाची घाई व्हती. अन् तेवढ्यात गज्या म्हारतीची आरूळी आली.

'ऐका हो ऐका, आपल्या गावचे सरपंच मानसिंगराव सस्ते यांनी आज रोजी संध्याकाळी आपल्या गावातली लाईट सुरू होणार हाय म्हण सांगितलं हाय हो....' म्हणत हातातलं डफडं वाजवीत व्हता. प्रत्येकजण कान दिवून ऐकत व्हता. आज लाईट सुरू होणार. मानसिंगराव लाईट सुरू करणार. वड्याला पूर यावा तसा दवंडीच्या बातमीचा पूर आला. गज्या सांगीत व्हता. घराघरावर गुढ्या उभारून, तोरणं बांधून स्वागत करा हो.... सारा गाव आनंदात नाचू लागला. पंचमीला बाया जमायच्या, अंगणाअंगणात फेर धरून नाचायच्या, फुगड्या खेळायच्या. सारं गाव खुळावलं. मानसिंगरावांनी साऱ्या गावातल्या बायांना कपूर मणेराकडं जाऊन फुकाट बांगड्या भरायला सांगितल्या. आन् प्रत्येकजण मणेराच्या म्हणजे गावातल्या कासाराच्या दारात बसू लागल्या. रानातल्या कामाला सुट्टी. बैलकं, कुळवाडी, रानात गेलं. जनावरं कुणी दावणीला उपाशी ठिवीत नाही. जनावरं रानात चरायला सुटली. मेंढक्यांनी खांडं वाड्यातनं मोकळी केली. ती ब्यां ब्यां करीत रानात पळाली. मेंडकं मेंढराना

हाकीत गावाबाहेर माळावर गेलं. मास्तरनी शाळंला सुट्टी दिली. त्यानं पोरं उंडारली. गावभर बायांनी रांगोळ्या घातल्या. सडं घातलं. कोतवालानं दवंडी दिली. सारं गाव कामाला लागलं. दिवसभर सारंजण वाट बगीत व्हते. संध्याकाळ कवा व्हणार? गोरगरीब पोटामागं रानूमाळ गेली, तर गावच्या वरच्या आळीतल्या बायकांनी गावातल्या बायकांना गोळा केलं. सरपंच त्यांच्या आळीचा व्हता. मानसिंग सस्ता उंचापुरा, धिप्पाड माणूस. खादीचं धोतर, खादीचा नेहरू शर्ट, डोक्यावर गांधी टोपी. सणावाराला नेहरू शर्टावर जाकीट असा पोशाख असायचा. गावातली पाटीलकी आता संपली व्हती.

वतनानं येणाऱ्या पाटलाला मान व्हता. पण नव्यानं आता सारा गावचा कारभार ग्रामपंचायतीत निवडून आलेल्या सरपंचाच्या हातात गेला व्हता. गावकामगार पाटील, कुलकर्णी, देसाई, देशपांडे यांना आता काही सत्ता राहिली नव्हती. ती ग्रामपंचायतीला निवडून आलेल्या लोकांना मिळाली व्हती. कुळकरण वतनं गेली. सावकारी कायद्यानं मोडली. कुळांच्या नावानं जमीन झाली. कसंल त्याची जमीन. लाखो शेतकरी आपआपल्या वहिवाटीच्या जमिनीचे मालक झाले. पाटलांचा दरारा संपला. पाटलांच्या वाड्याचं वैभवही संपलं. गावाला नवा राजा आला. पण तो पाटलिणीच्या पोटी जलमाला येत नव्हता. तो मतपेटीत जलमाला येत व्हता.

सुप्रिया, ही क्रांती व्हती आणि ती यशवंतरावांनी केली होती. स्वराज्य आलं, ते माझं आहे ही जाणीव प्रत्येकाला व्हत व्हती. सगळ्या जातीधर्मातल्या पोरांना शाळंत घालायला पाहिजे, हे कळालं. शाळंचं नाव बदललं. आता नवा बोर्ड शाळांवर लागला. 'जीवन शिक्षण मंदिर'. आता कोणाचंही पोरगं शाळेबाहेर वरांड्यावर बसणार नाही. शिवताशिवत, माणसांना माणसांचा विटाळ व्हता तो कायद्यानं गेला. आता कुणी उच्च नाही, कुणी नीच नाही. कुणी खालचा नाही, कुणी वरचा नाही. सारं वातावरण स्वप्नवत. आडावरचं पाणी मागून घ्यायचं, हिरीला शिवायचं नाही, सावली सुद्धा पडू द्यायची नाही... बाटाबाट झाली की मरणाचा मार, शिव्या, 'भाड्याहो पायरीनं ऱ्हावा' हे वाक्य तुझ्या पिढीला ऐकायलाही येत नाही. त्याचं कारण स्वातंत्र्य मिळालं. स्वराज्य आलं. बाबासाहेबांनी एका कलमात सारी माणसं एका रांगेत बसवली. हा सारा काळ तुला सांगतो, मंतरलेला काळ होता. हजारो वर्षांच्या रूढी, परंपरा, खुळचट कल्पना, अंधश्रद्धा मोडू लागल्या. गावागावांत हे चित्र निर्माण झालं. एकट्या यशवंतरावांनी हे केलं, असं मी म्हणत नाही. भारतानं जे संविधान स्वीकारलं, त्याला याचं श्रेय आहेच. यशवंतरावांना ते राबवण्याचं आहे.

...आज सांच्यापारी येरवाळीच सारं गाव रानातनं गावात यायला लागलं. येरवी तिन्हीसांजला येणारं गाव येरवाळी गावात येत व्हतं. ज्याला-त्याला ओढ

लागली व्हती ती लाईटीची. दिस मावळतीला गेला. दिवसाची कोवळी उन्हं पाटलांच्या वाड्याच्या चिरेबंदी कळसावर चमकू लागली. किलबिलाट करत पिंपळावर, लिंबावर, वडावर थवंच्या थवं येऊन बसू लागलं. बगळ्यांच्या माळा तोरणासारख्या महादेवाच्या देवळावरल्या वेलावर बसू लागल्या. गाई, गुरं हंबरत रानातनं येऊ लागली. त्यांच्या पायांचा फुफाटा पावडर मारावी तसा धुरळा उडवीत वाडग्यात, गोठ्यात जावू लागलं. प्रत्येकजण रोजची कामं करत व्हता, पण प्रत्येकजण कडूस पडायची वाट बगीत व्हता. आजपास्नं गज्या म्हाराला चौकाचौकातलं, खांबावरलं कंदील लावायला लागणार नव्हतं. आता त्याला दवंडी द्यावी लागणार नव्हती. तान्या नाईकाला गावची राकान करायची नव्हती. हजारो वर्षांची गुलामी संपणार व्हती. वतनं गेली, गुलामी गेली, गुलामीचा अंधार व्हटणार व्हता. बापे सारे चावडीवर शाळंम्होरं जमू लागले. बाया, पोरी महादेवाच्या देवळाम्होरं, भैरूबाच्या देवळाम्होरं येताळाच्या पटांगणात आल्या. आळ्यातल्या बाया जमून फेर धरून नाचायला लागल्या. आम्ही पोरं हुंदडत गावभर नुसतं धिंगाणा घालीत पळत व्हतो. घराघरावर पाडव्याला लागतात तशा गुढ्या उभ्या राहिल्या व्हत्या. दिवाळी साजरी व्हावी, तसं गावं आनंदात बुडालं व्हतं. मानसिंग सस्ते, नरसिंगराव सस्ते, रामभाव सस्ते, गावाची कर्ती माणसं जमलीती. नरसिंग गुरुजी जरा बोबडे बोलत. ते तसे तालुक्यातले मोठे पुढारी. त्यांनी सभा सुरू केली. अंधार पडू लागला आणि गावचे सरपंच मानसिंगराव सस्ते यांनी खटका वडला. सारा गाव लखलखीत लाईटींनी चमकू लागला! ज्यो त्यो नाचत होता. 'म.गांधी की जय', 'जवाहरलाल नेहरू की जय', 'यशवंतराव चव्हाण की जय' अशा घोषणा चालू झाल्या. गावभर मिरवणूक निघाली. प्रत्येकाच्या अंगणात उजेड पडला व्हता. सारं गाव त्यात न्हालं व्हतं. क्षीण आवाजात 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर की जय' आसं बी कुणी कुणी म्हणत व्हता. हाळूहाळू 'गाव तिथं लाईट' गेली. यशवंतरावांनी खुद्द अंधार पाहिला आन् ते उजेडातही न्हाऊन निघाले. सारी रात्र बायापोरं, म्हातारेकोतारे, पोरंबाळं कुणी बी झोपलं नाही. रात्रभर चौकाचौकांत बसून स्वराज्य, गांधी, नेहरू, आंबेडकर, यशवंतरावांचं गुण गाईत व्हते. दिवसरात्र धिंगाणा करून मी कवा झोपलो ते कळलंच नाही.

सुप्रिया, यशवंतराव नुसता माणूस नव्हता. तो एक विचार व्हता. एक आचार व्हता. प्रगतीची स्वप्न बघणारा महाराष्ट्राचा कर्ता पुरुष व्हता.

ती. सौ. वहिनींना, बाबांना सप्रेम जयभीम.

तुझा,
लक्ष्मणकाका

दिनांक २०/८/२०१२

चि. सुप्रिया,

सप्रेम जयभीम.

बघता बघता मी मराठी सातवी पास झालो. आता शाळा बंद होणार. घरची शिकवायची ऐपत नव्हती. मला तर शिकायचं व्हतं. बानं स्पष्टपणे सांगून टाकलं, लगीन करा, आन् रिकामं व्हा. पोटापुरती शाळा झाली. कुठंतरी हातापाया पडून नोकरी लावून काय व्हतंय का बगू. मास्तर, तलाठी, पाटकरी अशा नोकऱ्या त्या काळात सातवी पास झाल्याला मिळायच्या. तसं कायतरी बगू. म्हणून शाळंच्या नावानं त्यानं बोलणं बंद केलंतं. आईच्या मागं म्या टुमनं लावलंतं, मला पुढं शिकायचंय. आई म्हणाली, 'ही चिलीपिली सांभाळू, का तुला शिकायला धाडू, सांग. मला बी वाटतंय त्वा लय शिकावा. पर आपल्या गरिबीची, घरादाराची परवड हाय. करावी तरी काय इगत करावी? मी काय तुला पैसाआडका देणार न्हाय. शिकायचं म्हंजी त्वांडाचं काम न्हाय. पैका लागणार, जेवायला खायाला लागणार. ते कोण देणार? आमचा थारा एका जागंला न्हाय. हातावरलं पॉट. पॉट निहील तिकडं जायाचं. आतापासून कंच्या बी मास्तरच्या पाया पडून बा तुझा घालीतच होता की साळंत. पर आता म्होरल्या शाळंच कसं करायचं?' चारी बाजूनं अंधारून आलेलं. मदतीला कुणी नाही. त्यात निरगुडी माझ्याचमुळं सुटलीती. तो सारा तपशील मी 'उपरा'त लिहिला आहेच. तू तो वाचला असशीलच. मला मदत करणारे आकोबा सस्तेगुरुजी, रामभाव सस्ते आता निरगुडीत, तर मी सोमंथळीत. माझं वय लहान. मी काय करणार होतो? मनाचा निर्धार पक्का होता. काय झालं तरी शाळा मध्येच सोडायची न्हाय. मी आईला सांगितलं, 'फलटणला प्रवेश घेतो. चालत जाऊन-येऊन शाळा करतो. तुम्ही नसाल तवा, माझं मी सयपाक करून राहतो. न्हाय तर गावात मिळंल ती कामं करून पॉट भरतू.' आईचा जीव कासावीस झालाता. तिच्या डोळ्यांतनं धारा लागल्यात्या. 'येवढा शहाणपणा कसा आलं रं लेकरा तुला, ऱ्हाई तू घरी, घर बी राकन व्हईल आन् शाळ बी करा. म्या तुला जमलं तसं जवारी, मिठ, मिरच्या

पुरवीन. तुझं तू हातानं कयन खा. कामाला इलाज न्हाय. घावल ती कामं कर. आन् भागीव.'

सुप्रिया, त्यावेळी मी अशा वाटेवर व्हतो, जिथून माझ्या आयुष्याचं वारू कुठंही भरकटलं असतं. पण आईनं योग्य वेळी योग्य निर्णय घेतला. मला तिची शिकवण फार मोलाची वाटायची. 'आपुन बदनामी जातीतली माणसं. पयल्यावाणी करू नकुस. पायरीनं ऱ्हा. कुणाच्या वाळ्यापालवर पाय देवू नको. सोनं पडलं असलं तरी त्याला हात लावू नकू. काय ग्वॉड तर काम ग्वॉड. कुणाच्या बी हातातलं काम घी, मन लावून कर. कामानं माणूस मरत न्हाय. कामच माणसाला जगवतंय. कुणी काय दिऊ दे, नाही दिऊ दे. दिलं तर घे, उचलू नकोस. एकटा राहणार हाईस, कुणाच्या वंगाळ संगतीला लागू नकोस. सारं आभाळ फाटल्यालंच हाय. वावटळीत असा दिवा लावायचा कर्मकठीण हाय.'

त्यावेळी आम्ही बॅन्ड वाजवत व्हतो. आमचा बॅन्डचा ताफा व्हता. एप्रिल, मे-दोन महिने मी बॅन्ड वाजवत व्हतो. त्यानं माझे पैसे मला मिळणार व्हते. त्यामुळे शाळंच्या वह्या, पुस्तकं, कपडे भागवणार व्हतो. बानं आता सारं आंग काढून घेतलंतं. मी आन् आईच ठरवत व्हतो. मी फलटणला प्रवेश घ्यायला गेलो. सारी गावातली, खेड्यापाड्यातली पोरं हायस्कूलला फलटणला जात. तिथं मुधोजी हायस्कूल म्हंजे श्रीमंत लोकांचं, शहरातल्या लोकांचं, हायस्कूल. तर श्रीराम हायस्कूल खेड्यापाड्यातल्या गरीब पोरांचं हायस्कूल. मी प्रवेशाला गेलो. जवळ नवा दमडा नाही. कुणाला भेटावं, काय सांगावं, कसं बोलावं? काहीच माहिती नव्हतं. प्राचार्य ना.मा. भोसले यांनी दाखवलेल्या औदार्यामुळे एक पैसाही खर्च न करता प्रवेश मिळाला. ना वशिला, ना पैसा. माझ्यासारखी शेकडो मुलं श्रीराम हायस्कूलमध्ये प्रवेश घेत व्हती. हे हायस्कूल श्रीराम एज्युकेशन सोसायटी, फलटण या संस्थेचं. चव्हाणसाहेबांचे बरेच नातेवाईक या संस्थेत व्हते. नामदेवराव बेडके संस्थेचे अध्यक्ष होते. बाबासाहेब मोरे चव्हाणसाहेबांचे मेहुणे. तर दत्ताजी बेडकेंना साहेबांच्या बंधूंची मुलगी दिलेली. फलटणमधले हे बेडके कुटुंबीय चव्हाणसाहेबांच्या मार्गदर्शनाखाली संस्था चालवत व्हते. त्यानं बबनराव अडसूळ, शहा वकील, स.रा.भोसले, बाळू मेटकरी अशी चव्हाणसाहेबांना मानणारी मंडळी झटत व्हती. मला शाळेत प्रवेश मिळाला याचा खूप आनंद झाला. माझ्यासारखी शेकडो गोरगरिबांची मुलं शिकायला येत व्हती. थोडीशी शहरातली पोरं असत, झाकपक; बाकी सारी यथातथाच. धडप्यातली भाकरी बांधून आणायच्या, मधल्या सुट्टीत कॅनॉलवर सोडायच्या. शाळेजवळून कॅनॉल वाहत व्हता. या कॅनॉलवर मी अनेकदा रडत बसायचो. आईची खूप आठवण यायची. नको ही शाळा, असं वाटायचं.

पण का कुणास ठाऊक, शाळा हेच जग झालं व्हते. त्या काळात शाळंला महिना पाच रुपये फी असायची आणि गरीब पोरांना ती नादारीतून माफ व्हायची. त्याचा फॉर्म भरायचा. मी काही भरला नव्हता. आता काय करायचं? नादारीच्या फॉर्मला १० पैसे लागायचे. दहा पैसे बी नव्हते. कसंतरी करून ते मिळवले. अर्ज कसातरी भरला. तलाठ्याकडे गेलो. तो म्हणाला, माझी सही नाही चालत. सरपंचाकडे जा. सरपंचाकडे दोनचार हेलपाटे मारले. त्यानं सही आणि शिक्का दिला. मला यातलं काहीसुद्धा कळत नव्हतं. एवढंच कळालं, की आता शाळंत आपणाला फी भरावी लागणार नाही. फी माफीची सवलत मिळाली.

सुप्रिया, ही फी माझ्या वेळेला १२०० च्या आत उत्पन्न असणाऱ्यांना, सर्व जातिधर्मातील मुलामुलींना मिळत व्हती. खरं सांगू, ही सवलत नसती तर हे पत्र लिहिण्यासाठीची अक्षरं माझ्या हातात आणि डोक्यात आली असती का? आज जे काही दोन घास मिळताहेत. उत्तम बंगल्यात राहतोय, गाडीतून फिरतोय हे सारं मिळालं ते कुणामुळे? पहिल्यांदा डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळे. त्यांनी घटना लिहिली नसती, जन्मानं सारे समान ठरवले नसते, तर ना चव्हाणसाहेब झाले असते, ना सवलत मिळाली असती. ही आम्ही आमची सारी जीवनं या महापुरुषांच्या झोळीत टाकली ना, तरी त्यांचे उपकार फिटणारे नाहीत. पुढे मी शिकत गेलो. मोठा झालो. वयानं, विचारानं, वाचनानं, चिंतनानं वाढलो. थोरामोठ्यांच्यात वावरू लागलो, अधिकार, हक्क, कर्तव्यं समजू लागली.

त्या काळात आमच्या शाळेच्या गॅदरिंगला तेव्हाचे शिक्षणमंत्री मधुकररावजी चौधरी आले होते. चव्हाणसाहेबांच्या शाळंत आलो, याचं फार मोठं समाधान त्यांच्या चेहऱ्यावर दिसत व्हतं. मी कळीत झाल्यानं मला आता यशवंतरावांबद्दल फार कुतूहल व्हतं. त्यांचा विषय कुठं बी निघाला, की माझी पावलं आपोआप थांबत. कान टवकारून मी ऐकत राहत असे. मधुकररावजी बोलले ते आजही मी अंत:करणात खोलवर जपून ठेवलं आहे. खरं तर या सर्व आठवणी मी कधी लिहिल्या नसत्या. त्या माझ्या वैयक्तिक, माझ्यापुरत्या ठेवण्याचा माझा निर्णय व्हता. परंतु जन्मशताब्दी आणि मिळालेलं बोनस आयुष्य यामुळे तुम्हा तरुण मुलांना त्या सांगाव्यात म्हणून लिहिण्याचा निर्णय केला. कित्येकदा राजकारणातल्या माणसाबद्दल चांगलं लिहिणं हेतूबद्दलच संशय निर्माण करू शकतं, म्हणूनही टाळत आलो. पण आता खरं सांगू, कुणाच्याच दारात उभं राहायचं नाही, कुणाकडेच काही मागायचं नाही. ज्यांच्यासंबंधी लिहायचं आहे ते जाऊनही आता पंचवीस वर्षं उलटून गेलीत. म्हणून मनाला वाटलं सुप्रियाला लिहावं. अपघातात आणि त्या अगोदरही तू उभी राहिलीस ना खंबीरपणे, भाई,

समता, शशी यांच्या पाठीशी. तुम्हा सर्वांमुळे पुनर्जन्मच झाला ना. म्हणून तुला लिहिण्याचा निर्णय केला... हे पुन्हा भलतीकडेच गेलो... तर सांगत काय व्हतो, ही बाराशे रुपयांची सवलत कशी आली, ते शिक्षणमंत्री ना.मधुकरराव चौधरी सांगत व्हते.

'यशवंतरावांच्या मंत्रिमंडळातील त्यांचा एक सहकारी, संघटनेतला कार्यकर्ता म्हणून कितीतरी हृद्य प्रसंग त्यांच्या सहवासात अनुभवले. ते सारे सांगणं शक्य नाही. तुम्हा मुलांना ते तेवढे समजणारही नाहीत. पण ही मोठी माणसं आहेत. काही त्यांच्यासाठीही सांगावयाचे आहे.' मधुकरराव चौधरी म्हणजे साक्षात सौजन्यमूर्ती. पांढरंशुभ्र धोतर, पांढरा नेहरू शर्ट, त्यावर जाकीट, डोक्याला पांढरीशुभ्र कडक इस्त्रीतली, तिरकी घातलेली. टोपी ही त्यावेळी चव्हाण स्टाईल म्हणून प्रसिद्ध होती. आम्हीही तशाच टोप्या घालत होतो. माझ्या माध्यमिक शाळेत टोपी सक्तीची होती. आणि ती तिरपी घालायची. डोळ्यांना सोनेरी कडांचा चष्मा, भव्य कपाळ, बोलके डोळे, अत्यंत शांत, सोज्वळ, सात्त्विक चेहरा. कोणाही माणसाला आपलंसं करणारा. सारी सभा शांत होती. ते चव्हाणसाहेबांच्या आठवणी सांगत होते-

'चव्हाणसाहेबांचे मंत्रिमंडळ म्हणजे केवळ राजकीय लोकांचा मेळा नसे, तर कौटुंबिक जिव्हाळ्याचे संबंध असलेले एक मोठे कुटुंबच असे. ते त्यांच्या सहकाऱ्यांच्या जीवनात सहज व सहृदयतेने प्रवेश करत व त्यांच्या सुखदु:खाशी समरस होत. मराठी, गुजराती मंत्री असले तरी आणि मतभेद झाले तरी ते खेळीमेळीने सर्वांना बरोबर घेत. जसे कुटुंबप्रमुख म्हणूनच वावरत. त्यांचा दराराही तसाच होता. प्रत्येकाला आपले मत मांडता येत असे. ते सर्वांचे शांतपणे ऐकून घेत. सर्वांना पुरेसा वेळ मिळत असे. घाईगर्दीनं चर्चा लवकर आटपा, उरका, असे कधी होत नसे. उलट, कुणी बोलले नाही तर ते शांतपणे त्याला बोलते करून त्याचेही मत जाणून घेत. सर्व निर्णय एकमताने होत असत.'

मधुकररावांनी सांगितलेली एक आठवण कधी बी विसरता येणार नाही अशी व्हती. ते अत्यंत तळमळीनं बोलत व्हते. काळजाला हात घालून भावनांच्या हिंदोळ्यावर पालक आणि मुलं डोलत व्हती. मध्ये मध्ये टाळ्यांचा गजर होत व्हता. काही माणसांचं बोलणं मनाची विलक्षण पकड घेतं. मधुकररावांचे बोलणं अदबीचं तर होतेच, पण एखाद्या उत्तम शिक्षकानं शिकवावं तसं ते शिकवत. त्यांना 'सानेगुरुजींच्या धडपडणाऱ्या मुलांतला एक' असं लोक म्हणत ते उगीच नाही.

दुसरी आठवण सांगताना ते म्हणाले,

'१९५८-५९ चा सुमार असेल. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या लक्षावधी अनुयायांना बौद्ध धर्माची दीक्षा देऊन हिंदू धर्मातून बाहेर काढले. त्यानंतर मागासवर्गीयांना अनुसूचित जाती म्हणून घटनेनुसार मिळत असलेल्या सवलती द्यायच्या का, असा प्रश्न मंत्रिमंडळासमोर आला. घटनेनुसार तसे बंधन सरकारवर नव्हते. डॉ. बाबासाहेबांचा काँग्रेसविरोध आणि धर्मांतराच्या त्यांच्या प्रक्षोभक निर्णयामुळे त्यावेळच्या बैठकीसमोर प्रश्न आला. अत्यंत कडाक्याची चर्चा झाली. मते अजमावण्यात आली. यशवंतरावजींसह आम्ही चारच सदस्य सवलती सुरू ठेवाव्यात या मतांचे होतो. कारण, धर्मबदल झाला म्हणून लगेच मागासपण गेले असे होत नाही. कायदेशीर बंधन नसले तरी नैतिक व सामाजिकदृष्ट्या सवलती सुरू ठेवणेच न्यायाचे आहे असे आमचे मत होते. मात्र मुख्यमंत्रीच अल्पमतात असे चित्र होते. यशवंतराव खूप दुःखी झाले. त्यांनी अत्यंत तळमळीने बाजू मांडली. शेवटी विषय तहकूब ठेवण्यात आला. मुख्यमंत्र्यांनी पंडितजींशी याबाबत आधी चर्चा करावी असे ठरले. पुढच्या बैठकीच्या वेळी यशवंतराव अतिशय आनंदी दिसले. सुरुवातीलाच त्यांनी पं.जवाहरलाल नेहरूंशी झालेल्या चर्चेचा वृत्तांत कथन केला. पंडितजींनी सवलती सुरू ठेवण्याला अनुकूल असल्याचे सांगितले. नवबौद्धांना मागासवर्गीयांच्या शक्य त्या सर्व सवलती चालू ठेवण्याचा मंत्रिमंडळाचा ऐतिहासिक निर्णय झाला. 'आज आपणाला कृतार्थ वाटते' असे यशवंतराव म्हणाले. राजकारणी विचारावर सामाजिक न्यायभावनेने मात केली असेच मला वाटते.'

तेव्हाचं 'श्रीराम हायस्कूल' म्हणजे आताचं 'यशवंतराव चव्हाण हायस्कूल.' उघड्या बोडक्या माळावर नव्यानं सुरू झालेलं. एका बाजूला नीरेचा उजवा कालवा, श्रीराम कारखाना तर दुसरीकडे नुसती तरवडाची झाडं. संस्थेत नेहमी वेगवेगळे कार्यक्रम होत असत. मी पोटामागे धावत व्हतो. शाळा न बुडवता जे काम जमेल तेवढं करायचं. हॉटेलमध्ये कपबश्या उचलल्या, पावबटर विकलं, वर्तमानपत्रं टाकली. त्यातच माझा सारा वेळ जात व्हता. त्यानं राजकारण, यशवंतराव आसलं सारं माझ्या डोक्यातूनच गेलं व्हतं. आईवडील, गावोगाव तर मी कधी सोमंथळीत, तर कधी फलटणमध्ये. खरं तर सुप्रिया, मला सांगणारं, शिकवणारं, वळण लावणारं असं कुणीच नव्हतं. आसं वाग आन् तसं वागू नको, असं जवळचे मित्र सोडले तर कुणीच सांगितलं नव्हतं. त्यानं मी कसाही भरकटलो असतो. पण माझ्या मित्रांमुळे, आईमुळे मी तसा भरकटलो नाही. पहाटे लवकर उठून पावबटर विकायचं, त्यानंतर ९ वाजता पुणे गाडी यायची, तिच्यातून वर्तमानपत्रांची पार्सलं यायची. तेव्हा मी पेपर टाकत व्हतो. हे सारं अकरा वाजेपर्यंत

संपवायचं. अकराला शाळा भरायची. प्रार्थना संपता संपता कसंतरी मी शाळंच्या मैदानात पोहोचायचो. पोरं वर्गात गेलेली असायची. लेट जाणाऱ्यांना एका रांगेत उभं केलं जायचं. प्रभुणे आमचे पी.टी.चे शिक्षक होते. अत्यंत कडक, बुटका माणूस. देहानं थोडासा स्थूल. भव्य कपाळ, मोठाले डोळे, हातात पी.टी.च्या वेळी वाजवायची शिट्टी. त्या शिट्टीला लांब गळ्यात अडकवण्यासाठीची जाड दोरी. त्या दोरीची माझी रोज भेट व्हायची. हातावर छड्या आणि उघड्या पायांच्या पिंढऱ्यांवर सपासप दोरीचे फटके. मी रोज उशिरा शाळेत जायचो. रोज मार खायचो. तोवर वर्ग सुरू झालेले असायचे. मी दारात उभा राहिलो की शिक्षक 'या....' असं काही म्हणायचे, की सारा वर्ग हसायचा. मी मान खाली घालून गपचीप मागच्या बाकावर जाऊन बसायचो. माझ्या मनानं कोवळ्या वयातच मला असे मानपान पचवायला शिकवले आहेत. मला त्याचं फार काही वाटायचं नाही.

एके दिवशी काय झालं, कुणास ठाऊक? प्रभुणेसरांनी नेहमीसारखं मला शिक्षा केली, ती मी नेहमीसारखी सोसली. हाताला मुंग्या आलेल्या. हात काखेत घालून कळवळलो. प्रभुणेसर मारायचे थांबले आणि मला म्हणाले, 'मान्या, रोज असा उशिरा का येतोस? काय अडचण आहे तुझी? मला सांग बघू.' मी गप. 'अरे खरंच, शिक्षा होणार नाही. खरं काय ते सांग.' मग मी सांगत गेलो. माझी मान खाली होती. सर ऐकत व्हते. मी सांगता सांगता डोळे पुसत व्हतो. मैदानावर आता आम्ही दोघंच व्हतो. सरांनी मला अचानक पोटाशी धरलं. मी वर पाहिलं, सरांच्या डोळ्याला धारा व्हत्या. रोज मला मारणारे ते मारकुटे सर रडत होते! 'बाळ, तू लहान आहेस, पण माझ्या हातून फार मोठी चूक होत होती. तू रोज मार खातोस पण मला का सांगितलं नाहीस?' सरांनी माझ्या हाताला धरलं. थेट वर्गात नेलं. वर्गशिक्षकांची परवानगी घेतली आन् वर्गात गेलो. मला वाटलं, आता वर्गात धुलाई होते की काय! पण झालं भलतंच. सरांनी मला टेबलवर उभं केलं. क्षीरसागर सर माझे वर्गशिक्षक होते. ते बाजूला उभे होते. प्रभुणेसरांचा चेहरा रडवेला. पोरं गंभीर. प्रभुणेसरांनी मी करीत असलेले कष्ट साऱ्या वर्गातल्या मुलांना सांगितले. आपण याला शिक्षा केली, या अपराधी भावनेचा उल्लेख केला. देवानं मला सद्‌बुद्धी दिली आणि यानं मला सांगितलं, बरं झालं, यापुढे मी त्याला मारणार नाही. मी टेबलावरून खाली उतरलो. सारी मुलं गंभीर होती. आपण याला चिडवतो, हसतो, चेष्टा करतो याचं सर्वांना वाईट वाटत होतं. क्षीरसागरसरही खजील झाले. प्रभुणेसरांनी माझी वरात आता संस्थेच्या ऑफिसमध्ये नाना बेडकेंकडे नेली. झालेला सारा प्रकार सांगितला. त्यांनी पाठीवरून हात फिरवला. शाबासकी दिली आणि शाळा सोडू नको, लागेल ती मदत देण्याचं सांगून मला बाहेर पाठवलं.

प्रभुणेसरांशी बराच वेळ ते काही बोलत होते. सर बाहेर आले. त्यावेळी मी केसरी दैनिकाचं वर्गणीदारांना वितरण करीत असे. प्रभुणेसरांनी रूद्रभटांना सांगून माझी कामाची वेळ ठरवून दिली आणि मी मॅट्रिक होईपर्यंत सरांनी मला कधीही शिक्षा केली नाही. मुलांनी वेडंवाकडं वागवलं नाही. उलट, नारायण बोडके, रामदास रासकर यांच्याबरोबरच धनंजय भोसले, दिलीप भोसले, इकबाल मेटकरी या शहरातील मुलांनीही मला खूप प्रेमानं वागवलं. यशवंतरावांच्या टोपीचं टोक आणखीनच तिरकं झालं असं मला वाटलं!

ती. सौ. वहिनींना, बाबांना सप्रेम जयभीम.

तुझा,
लक्ष्मणकाका

दिनांक २३/८/२०१२

चि. सुप्रिया,

सप्रेम जयभीम.

मी आता फलटणला बराच रुळलो होतो. माध्यमिक शाळेचं शिक्षण सुरू होतं. काम करायचो. चार पैसे मिळवायचो. त्यानं घरी कसलाच त्रास नव्हता. दिवस वेगानं बदलत होते. अभ्यासातही बरी प्रगती होती.

ते साल दहावीचं होतं. मित्रांबरोबर रविवारपेठेत खोली घेतली. सातआठ मुलं एकत्र राहत होतो. नारायण बोडके, रामदास रास्कर या वर्गमित्रांनी मला खोलीचं भाडं न भरता राहू दिलं. आता अभ्यासाला थोडा शांत वेळ मिळू लागला. तरीही मित्रांच्याच डब्यात जेवत होतो. या मित्रांनी केलेल्या मदतीला तोड नाही. लहान असताना निवडणुका, राजकारणामध्ये भाग घेत असे, पण शहरात कोण विचारतो? फार तर पोरांच्यात चर्चा असे कधीतरी. त्यात जेबल्यांच्या वाड्यात आम्हांला थोडी मोठी खोली मिळाली. आता तिथे राहू लागलो. तो वाडा म्हणजे दोन मजली घर. समोर रस्त्याला लागून रेशनिंग दुकान. तेथे जेबले स्वत: दिवसभर असत. भुतांसाठी प्रसिद्ध म्हणून कोणी त्या भुताटकीच्या वाड्यात राहत नसत. पाठीमागं मोठ्ठा पिंपळ. पिंपळपानांची सळसळ नित्याची. माडीवरही माझ्यापेक्षा वरच्या वर्गातली मुलं राहत होती. पाचपन्नास विद्यार्थी एकत्र राहत. सारे खेड्यापाड्यातून आलेले. साऱ्यांचे डबे येत असत. माझे त्यात भागून जात असे. जातीचा त्रास इथे खूपच कमी होता.

जेबल्यांच्या वाड्याजवळच डॉ. कृष्णचंद्र भोईटे यांचं घर होतं. तेथे लोकांचा रोज राबता असायचा. कृष्णवर्णीय शेलाट्या अंगाचा, पांढरी पँट, पांढरा हाफ शर्ट, पायाला छान बूट, डोक्याच्या केसांचा भांग त्यानं अतिशय काळजीपूर्वक पाडलेला असायचा. अत्यंत टापटिपीत राहायचे. डोळ्यांच्या चष्म्याच्या सोनेरी कडा, भेदक नजर, हसरा चेहरा, डोळ्यांत मिस्कील भाव. जाणाऱ्या-येणाऱ्याला पोहोचवायला किंवा घरात घ्यायला दारात येत तेव्हा आम्हाला दिसत. मागं एका पत्रात मी तुला सौ.वेणूताईंना पाहिल्याचं लिहिलं होते. त्यावेळी त्या याच भोईटे

यांचा प्रचार करीत होत्या. एम.ए.,पी.एच.डी. झालेला हा माणूस साधा लेखनिक म्हणून श्रीराम सहकारी साखर कारखान्यात नोकरीला होता. कविता हा याचा आवडीचा विषय. काही कविता एकत्र करून त्यांनी एक छोटासा कवितासंग्रह प्रसिद्ध केला होता. खेडेगावातल्या गरीब छोट्या शेतकरी कुटुंबात वाढलेला. घरी अठराविश्व दारिद्र्य, नोकरी आणि कविता. शिक्षणही पहिल्याच पिढीत आलेलं होतं. स्वभाव अत्यंत शांत. मनमिळावू, थोडेसे अबोल. आम्हा पोरांना मोठे कुतूहल. आम्ही त्यांना लांबूनच पाहायचो. कधीतरी शहरातले मित्र दिलीपसिंह भोसले किंवा धनंजय भोसले आमच्या खोलीवर येत असत. ते आले की राजकारणावर बोलत असत. त्याचंही आम्हाला फार अप्रूप वाटे. धनंजय भोसले तर माझा बॅचमेट होता. तो स.रा.भोसले बापूंचा धाकटा मुलगा. बापू बॅरिस्टर, राजाभाऊ भोसले यांचे वडील आमच्या शाळेच्या मॅनेजिंग बोर्डात. घरी मोठी श्रीमंती. त्या काळी धनंजय भोसले म्हणजे हिरो. कडक इस्त्रीतले कपडे. टोकदार अणकुचीदार टोपी. ही श्रीमंतांघरची पोरं. दिलीप भला मोठा उंचच्या उंच. मी त्याच्यापेक्षा कितीतरी बुटका. या पोरांच्या व्यक्तिमत्त्वाने आम्ही फार घाबरून असायचो. प्रभुणेसरांमुळे मी साऱ्या शाळंतल्या शिक्षकांचा, मुलांचा आवडता विद्यार्थी झालो होतो.

एके दिवशी दिलीप, बाळू मेटकरी, धनंजय खोलीवर आले. त्यांनी सर्वांनी कृष्णचंद्र भोईटे यांच्याकडे जायचं ठरवलं. ते तालुक्याचे पंचायत समितीचे सभापती होते. घरापुढे कायम एक जीप उभी असायची. आम्ही सारे घाबरत घाबरत त्यांच्या घरी गेलो. दिलीपनं दाराची बेल वाजवली. आतून कुणीतरी दार उघडलं. या बसा! म्हणाले. आम्ही जाऊन सतरंजीवर बसलो. तेवढ्यात पायजमा, बनियन अशा घरातल्या कपड्यातच भोईटेसाहेब बाहेर आले. बैठकीच्या खोलीत आम्ही सातआठ पोरं. दिलीप, धनंजयला ते ओळखत होते. 'काय धनू, काय काढलंत?' म्हणत चष्मा पुसत गादीवर बसले मांडी घालून. 'या खेड्यातल्या मुलांना तुम्हाला पाहायचं होतं. ती इथं जेबलेवाड्यात राहतात. रोज तुम्हाला लांबून पाहतात. म्हटलं, चला तुमची ओळख करून देतो.'

'काय दिलीपराव, काय म्हणतात बाबा?' दिलीपचे बाबाही असेच उंचेपुरे. हॉटेलचा व्यवसाय करत. त्यांच्या ओळखी होत्या. सभापतींनी आमच्या ओळखी करून घेतल्या. आम्ही आमची नावं सांगितली. 'तुम्ही सभापती कसे झालात, ते सांगा.' आमच्यातला एक जण म्हणाला. ते मोठे रुबाबदार हसले.

'अरे, त्याचे काय झाले, मी माझ्या काही कविता छापून त्याचे छोटे पुस्तक केले होते. त्यावेळी यशवंतरावजी चव्हाणसाहेब महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. मी

कारखान्यात नोकरीला होतो. साहेब राजकारणातल्या कामासाठी, दौऱ्यासाठी फलटणला येत असत. त्यांच्या वाचनात माझी कविता आली. त्यांना ती खूप आवडली, भावली. त्यांचे खेड्यापाड्यातल्या तरुण पोरांवर फार लक्ष असायचे. त्यांनी माझी चौकशी सुरू केली. बबनराव अडसूळ, बबनराव क्षीरसागर यांच्याकडे त्यांनी पहिल्यांदा चौकशी केली. मला बोलवायला सांगितले. मी गरीब घरचा शेतकऱ्याचा मुलगा आहे, हे त्यांना समजले. कारखान्यात मला न्यायला लोकही आले. पण मी काही भेटू शकलो नाही. त्यावेळी माझे वडील आम्हा साऱ्यांना सोडून गेले होते. त्यांचे निधन झाल्याने मी फलटणमध्ये नव्हतो. आरडगावला होतो. त्यामुळे त्यावेळी भेट झाली नाही. पण आण्णांनी मला निरोप दिला. यशवंतराव चव्हाणसाहेबांनी सवडीने मला मुंबईला भेटायला बोलावले आहे. मला खूप म्हणजे खूपच आनंद झाला. मी सवडीने मुंबईला गेलो. साहेब त्यावेळी वर्षा बंगल्यावर राहत होते. मी थोडा भीतभीत बंगल्यावर गेलो. समुद्रकिनारी असलेला मोठाच्या मोठा बंगला. पायऱ्या चढून मी वर गेलो. एका माणसाने 'काय पाहिजे?' असे विचारले. त्याला मी का आलोय ते सांगितले. त्याने आत जाऊन सांगितले. ताई बाहेर आल्या. त्यांनी छान हसून स्वागत केले. माहेरचा माणूस! बसा, म्हणाल्या. 'साहेब बाहेर कार्यक्रमात आहेत. येतीलच एवढ्यात. सांगत होते तुमच्या कवितांबद्दल. खूप आवडल्यात त्यांना. बसा तुम्ही', असे म्हणून त्या पुन्हा आत गेल्या. मी कोचावर अवघडून बसून राहिलो. चहा आला. मी खिडकीतून विशालकाय समुद्र पाहू लागलो. बराच वेळ गेला. दारात खाडखाड आवाज आला. साहेब गाडीतून उतरले. पायऱ्या चढून वर आले. मला पाहिले. मी माझे नाव सांगितले. आमची पहिलीच भेट होती. मी खूपच संकोचलो होतो. साहेबांनी माझे हात हातात घेतले. कवितांबद्दल बोललो. माझे वडील गेल्याचे त्यांना समजलेच होते. बसा म्हणून आत गेले. सारी माणसे बाहेरच हॉलमध्ये बसली. थोड्या वेळाने मला आत बोलावण्यात आले. जेवणाच्या टेबलाजवळ आता आम्ही दोघेच होतो. ताई आत काहीतरी करत होत्या. साहेबांनी अत्यंत आस्थेने बोलायला सुरुवात केली. 'पंचायत समितीच्या निवडणुका आहेत. तुम्हाला तुमच्या गटातून उभं राहायचं आहे. बाकी सारं मी पाहतो. तुमच्या खांद्यावर जरा मोठा बोजा टाकायचा आहे. लोकसंपर्क सुरू करा. कामाला लागा.' जेवण झाले. मी निघणार, म्हटल्यावर ताई बाहेर आल्या. म्हणाल्या, 'साहेब म्हणतील त्याला नाही म्हणू नका. काम नीट करा.' मी दोघांचे आशीर्वाद घेतले. घरी आलो. कामाला लागलो. ताईंनी खूप मदत केली. मी निवडून आलो. साहेबांनी तालुक्याची जबाबदारी दिली. मी सभापती झालो. 'पंचायत राज'चा कायदा आला. सामान्य घरातला

एक माणूस सभापती झाला. गेली चार वर्षे सभापती म्हणून काम करतो आहे', भोईटेसाहेब आम्हा पोरांना सांगत होते. चव्हाणसाहेब आणि त्यांच्या सहवासातील अनेक आठवणी त्यांनी सांगितल्या. तेवढ्यात कुणीतरी मोठा माणूस त्यांना भेटायला आला. आम्ही निरोप घेऊन बाहेर पडलो. आम्ही भोईटेसाहेबांचे सख्खे शेजारी होतो. पण कुतूहलाने पाहण्यापलीकडे आमचा फारसा संबंध आला नाही. त्यांच्या कामाबद्दल मात्र खूपच कुतूहल होते. एके दिवशी पहाटे आम्ही सारे एकमेकांच्या अंगावर पडू लागलो. आम्हाला वाटले भुताचाच फेरा आला. सारे बाहेर पळालो. पेट्या वाजत होत्या. बाहेर सारे लोक सैरावैरा पळत होते. काय होतंय कळत नव्हतं. प्रत्येकजण म्हणत होता, मोठा हादरा बसला. भूकंप झाला. कोयनेचा भूकंप. घरांना तडे गेलेले. जुन्या घरांची पडझड झाली. भोईट्यांच्या दारात माणसांची गर्दीच गर्दी. ते लोकांना समजावत होते. आम्ही जामच घाबरलो होतो. चारआठ दिवस तरी कुणी खोलीत झोपत नव्हतं. सगळे बाहेर झोपत होतो. सारं गावच बाहेर झोपत होते म्हटलं तर वावग होणार नाही.

पुढे निवडणुका लागल्या. कृष्णचंद्र भोईटे विरुद्ध मालोजीराजे नाईकनिंबाळकर अशी लढाई झाली. आमच्या शाळेच्या ग्राऊंडवर सभा होती. दिलीप आणि त्याचे शहरातले सहकारी सभेच्या स्टेजची कामे करीत होते. आम्ही कुतूहलाने पाहत असायचो. सभेला यशवंतराव, किसनवीर, बाळासाहेब देसाई, दादासाहेब जगताप, आमच्या संस्थेचे अध्यक्ष नाना बेडके आणि जिल्ह्यातले मोठे पुढारी स्टेजवर जमले होते. समोर प्रचंड जनसमुदाय होता. आमच्या शाळेचे मैदान भरून गेले होते. 'मनमोहन राजवाड्याच्या विटा काढून वाडा जमीनदोस्त करू, राजेशाही संपली आहे. हे राजांनी ध्यानात घ्यावे,' असे किसनवीर म्हणाले. याचा राग येऊन गावात दगडफेक झाल्यानं शहराला पोलिसी छावणीचं रूप आलं. गर्दीत कोण काय बोललं ते समजलं नाही. पण ही लढाई भोईट्यांनी जिंकली. राजा हरला, प्रजा जिंकली. त्यानंतर फलटणच्या राजकारणाच्या चाव्या सामान्य कुटुंबातल्या शेतकऱ्याकडे गेल्या. यशवंतरावांनी ही लढाई जिंकली.

ही १९६७ सालची निवडणूक होती. मालोजीराजे हे राजकारणातलं बडं प्रस्थ होतं. मोरारजीभाई देसाई आणि महाराजसाहेब यांचे फार चांगले संबंध होते. तरीही त्यांना पक्षाचं तिकीट मिळालं नाही. त्यानं शहरात वातावरण फारच तापलं होतं. सारं शहर महाराजांचं. क्वचितच कुणीतरी काँग्रेसचं काम करी. प्रचारकही मिळत नव्हते. फलटण खंडाळा मतदारसंघात खंडाळ्याचा ग्रामीण भाग आबासाहेब वीरांनी काँग्रेसमय केला होता. लढत मोठी अटीतटीची झाली. भोईटेसाहेब अगदी हजार-दोन हजार मतांनी निवडून आले. गावातली दंगल आजही माझ्या लक्षात

आहे. आबासाहेब वीरांनी केलेलं भाषण फारच गाजलं होतं. राजांच्या विरोधी एवढी कडक भाषा त्यांनी वापरली होती, की त्यामुळे दंगल झाली. या सभेनंतर माझा फलटणशी फारसा संबंध राहिला नाही. राजकारणाचा तर कुतूहल म्हणूनही संबंध राहिला नाही.

अलीकडे मी भोईटे साहेबांना भेटलो. खूप छान बोलले. आता वयोमानानुसार थकलेत. आम्ही माध्यमिक शाळेत त्यांच्या शेजारी राहून शिकलो होतो. तेव्हाचे भोईटेसाहेब तरुण, तडफदार, देखणे. आता भेटायला गेलो तर ते सायंकाळचा फेरफटका मारायला विमानतळाकडे गेलेले. मी आल्याचं कळवायला त्यांचा मुलगा गेला. मी बसून होतो. ते तात्काळ मोटारसायकलवरून घरी आले. थकलेले, कृष्णकाया, आवाज मात्र होता तसाच. आम्हाला मोकळं वाटावं म्हणून अंगणातच खुर्च्या मांडल्या. दोघांचा जिव्हाळ्याचा विषय अर्थातच 'यशवंतराव'. अतिशय आनंदात होते. चव्हाणसाहेबांच्या आठवणी निघाल्या की, ते खुलतात. मोकळे होतात. पहिल्यांदा राजकारणात कसे आले, तिथपासून सांगू लागले. त्यातला बराच भाग मी आधीच तुला सांगितला आहे. त्यांनी सांगितलेला आता पुढचा भाग बघ-

''मी पंचायत समितीचा सभापती झालो. कायदा नव्यानं आलेला. ग्रामपंचायती लोकांनी निवडून दिलेल्या. स्वातंत्र्य गावाच्या दारात आलेले. अतिशय उत्साहानं निवडणुका झाल्या. गावचे पाटील, वतनदार, देसाई, देशपांडे, कुलकर्णी, सरंजामदार ही जुनी रचना मोडीत काढून चव्हाणसाहेबांनी नवीन लोकांकरवी, लोकांनी लोकांसाठी बहुमतानं निवडून दिलेली पंचायत निवडून आणली. गुप्त मतदानाचं मोठं कौतुक होतं. लोक आपल्या मर्जीनुसार शिक्का मारून लोकप्रतिनिधी निवडू लागले. तालुक्याचा कारभार पंचायत समिती बघू लागली, तर जिल्ह्याचा कारभार जिल्हापरिषद पाहू लागली. शिक्षण, आरोग्य, शेती या सर्व क्षेत्रांत वेगानं विकास सुरू झाला. मी कामाला सुरुवात करणार, त्याआधी साहेबांचे आशीर्वाद घ्यायला मुंबईला गेलो. सचिवालयात त्यांना भेटलो. ते म्हणाले, 'बसा थोडा वेळ. मग बरोबर जाऊ.' आम्ही दोघंच गाडीत होतो. 'कृष्णचंद्र, आता तुम्हाला माझे काम करावयाचं आहे. तालुक्यातला माणूस अन् माणूस जोडायला हवा. पण, आता माझ्याकडे येऊ नका. माझा फारसा उल्लेख करू नका. ते सारं मनात ठेवा. प्रत्येक कार्यक्रमाला राजेसाहेबांना बरोबर ठेवा. त्यांचा सन्मान करा. त्यांच्याच सल्ल्यानं काम करा. आपले लोक रागावतील. साहजिकच आहे ते.

ते माझ्यावर सोडा. मी समजावेन त्यांना. पाच वर्षं जीवतोड मेहनत करा.

गावागावापर्यंत पोहोचा. हे करताना तुम्ही माझे आहात हे विसरून जा.' साहेबांना मी म्हणालो, 'साहेब, हे कसं शक्य आहे?' ते म्हणाले, 'राजकारणात सारं जमवावं लागतं. सारंच काही मनासारखं होत नाही. तुम्ही लोकांमध्ये राहा. तक्रारी माझ्याकडेच येतील. मी सांगेन आपल्या लोकांना.' वडिलांनी मुलांना कानगोष्टी सांगाव्यात तसं त्यांनी सांगितलं. मी नाराजीनंच तयार झालो. फलटणला परत आलो. वसंतराव जानवले महाराजांचे जवळचे कार्यकर्ते. त्यांच्यामार्फत महाराज साहेबांशी सतत संपर्क ठेवला आणि साहेबांनी सांगितल्यानुसार कामाला लागलो. बघता बघता पाच वर्षं संपत आली. मी साहेबांना मुंबईला जाऊन भेटत होतो. साहेब दौऱ्यावर आले तरी फारशी घसट करत नव्हतो. आमचे लोक तक्रारी करत. पण, साहेबांनी मला कधीही काही त्यासंबंधी सांगितलं नाही. ६७ च्या निवडणुकांचे नगारे वाजू लागले. विधानसभेला तिकीट मागण्याचा प्रश्नच नव्हता. महाराजच उमेदवार असणार, हे गृहीत होतं. मी काही उभा राहणार नव्हतो. एकदा वर्षावर ताईंना भेटायला गेलो होतो. त्यांनी सांगितलं, 'विधानसभेला तिकिटाची मागणी कर. तुझं काम चांगलं आहे. बाकीचं मी पाहीन.' आता काय करावं? मी काळजीतच परत आलो. त्यावेळी तिकिटं दिल्लीत ठरत नव्हती. स्थानिक लेव्हलला ती ठरत. तालुका काँग्रेस कमिटीनं शिफारस जिल्हा काँग्रेसकडे आणि तिथून शिफारस होऊन राज्याच्या काँग्रेसकडे. त्यावर तिकीट मिळे. आमच्याकडे तिकिटाचा प्रश्नच नव्हता. पाच मिनिटांचं काम, असं राजेसाहेबांना वाटले होते. ते साहजिकच होतं. कोण मागणार होतं तिकीट? मीटिंग सुरू झाली नि मी तिकिटाची मागणी केली. बॉम्ब पडावा तसं झालं. सारेच समजावू लागले. पण, मी तिकीट मागितलंच. तालुक्यातून दोन नावं गेली. जिल्ह्यातूनही दोन नावं गेली. आता मोठी धावपळ सुरू झाली. ताईंनी साहेबांना आग्रहानं सांगितले होतं. 'काय वाट्टेल ते झालं तरी फलटणच्या तिकिटाचं कृष्णचंद्रलाच द्या. फलटणकरांना विश्रांती द्या. संस्थानिकांचे लाड बंद करा. शेतकरी कुटुंबांना न्याय द्या.' ताई कधी राजकारणात भाग घेत नसत. कुणाची शिफारस करत नसत. कशातही ढवळाढवळ करत नसत. पण फलटणबद्दल त्यांना आस्था होती. वेणूताईंना बरं नाही म्हणून भेटायला आलेल्या यशवंतरावांना राजेसाहेबांनी पूर्वी ब्रिटिश रेसिडेंटला सांगून अटक करवली होती. त्या हे कधीच विसरू शकल्या नव्हत्या. अन् साहजिकच होतं ना? त्यानंतरच त्यांचं अपत्यही गेलं होतं. या विषयावर त्या बोलत नसत. साहेबांनी त्यांचंच ऐकलं आणि ते त्यांच्या कामाला लागले. आपल्या तिकिटात काही अडचणी आहेत हे महाराजांना समजलं. ते चव्हाणसाहेबांपुढे उभे राहिले. धोतराचा सोगा पुढे केला आणि 'यात फलटणचं तिकीट टाका' म्हणू लागले.

साहेब उठले, त्यांना जवळ घेतलं आणि म्हणाले आता वयाचा विचार करा. घरातल्या इतर कुणाला तिकीट मागा. त्यांनी आपला आग्रह कायम ठेवला. साहेब एवढंच म्हणाले, 'ठीक आहे, मी तुमच्या आडवा येणार नाही.' महाराज समजले. तिकीट नक्की झालं. ही गोष्ट जेव्हा आबासाहेब वीरांना समजली तेव्हा ते भलतेच चिडले. साहेब तेव्हा दिल्लीत राहत होते. आबांचा मोठा दबदबा होता तेव्हा जिल्ह्यात आणि राज्यातल्या काँग्रेसमध्ये. साहेबांना थेट बोलणारा आबा हा त्यांचा मित्रही होता. त्यांनी साहेबांना विचारल्यावर ते त्यांच्या स्वभावाप्रमाणे सौजन्यानं वागले. घडलेला प्रसंग सांगितला. आबांनी आग्रह धरला आणि तिकीट वाटपात आपण फलटणमध्ये पडणार नाही, असा शब्द घेतला. त्यांच्यावर खूप प्रेशर आलं पण, तिकीट मलाच मिळालं. महाराजसाहेब पुन्हा उभे राहिले अपक्ष म्हणून. ते संस्थानिक, मंत्री. ते सर्वार्थानं समर्थ; मी सर्वार्थानं दुबळा. तरुण होतकरू, पाच वर्षं मतदारसंघात केलेलं काम आणि पक्षाचे हजारो कार्यकर्ते. आबा आणि साहेब आमची दैवते. त्या बळावर उभा राहिलो आणि जिंकलो. अगदी काठावरल्या मतांनी. मग मात्र पुढे तीन वेळा आमदार झालो. महाराजांचं राजकारणातलं प्रस्थ संपलं. गावपातळीपासून राज्यपातळीपर्यंत काँग्रेस आणि चव्हाणसाहेबांचा शब्द अखेरचा असायचा. माझ्यासारखी तरुणांची फौजच साहेबांनी जमा केली होती. पंचायत राज हे राज्यकारभाराचं प्रशिक्षण केंद्र व्हावं, त्यातून नेतृत्व उदयाला यावं, ते प्रशिक्षित असावं, लोकांमधून आलेलं असावं, लोककल्याणकारी राज्य व्हावं, ही त्यांची विचारसरणी होती.''

मधेमधे चहा येत होता. मी त्यांना बोलतं करत होतो. गाडी जरा भलतीकडे गेली तर ती पुन्हा रुळावर आणण्याचं काम करत होतो. बोलायचे थांबले की, थोडं इकडचं तिकडचं बोलायचं. बोलणे सुसंगत करून घ्यायचं. हातात पेन्सिल नाही, कागद नाही, टेपरेकॉर्डर नाही. नुसत्या खुल्या गप्पा. फार छान असतात अशा साहेबांच्या आठवणी.

सुप्रिया, काही वेळा यांचा हेवा वाटतो. आपण त्यानंतरच्या काळात जन्माला आलो याची खंत वाटते. शाहू महाराजांच्या कथा ऐकताना जसं आपण काळाचं भान विसरतो ना, तसंच चव्हाणसाहेबांचं सारं आयुष्य आहे. एक नितांतसुंदर जगणं. आमच्या जिल्ह्यात चंद्रहार पाटील, कृष्णचंद्र भोईटे, प्रतापराव भोसले, दादासाहेब जगताप, शंकरराव जगताप, प्रभावती सोनावणे, विलासराव पाटील उंडाळकर, पी.डी. पाटील अशी मोठी टीमच आमदार म्हणून निवडून आणली होती. नवं नेतृत्व बहुजनांमधून आलं पाहिजे, सत्ता पाझरत सामान्यातल्या सामान्य माणसाकडे संक्रमित झाली पाहिजे, त्यासाठी त्याला प्रशिक्षण मिळालं पाहिजे,

संधी मिळाली पाहिजे, गरीबातल्या गरीब माणसाला राज्य आपलं वाटलं पाहिजे. जातीपातीच्या पलीकडे जाऊन सर्वांना समान संधी मिळायची तर नवं नेतृत्व उभं केलं पाहिजे. त्यांना सत्तेचा आधार दिला पाहिजे. कार्यकर्त्यांची शक्ती वाढवली पाहिजे. कृषी औद्योगिक समाज, समाजवादी समाजरचना हे त्यांचं स्वप्न होतं. भोईटेसाहेबांचा निरोप घेताना अशा कितीतरी विचारांनी डोक्यात गर्दी केली होती. हा जातिनिष्ठ, श्रेणीबद्ध समाज मला केव्हातरी न्याय देईल, या भ्रमात मी कधीच नव्हतो. पण बहुसंख्याक असलेल्या समाजातील तळातल्या सामान्य माणसाला तरी काही मिळेल ही शक्यताच आता उरलेली नाही. सारे सरंजामदार लोकशाहीच्या मतपेटीच्या आधारेच जिल्ह्यात सुस्थिर झाले आहेत. पण उर्ध्वगामी असलेला हा समाज मुजरे घालण्यातच दंग आहे. सारे जुने वाडे उल्हसित आहेत. आमदार, खासदार, मंत्री सारे तेच आहेत. पूर्वी घोडे होते, आता गाड्या आहेत. नजरेतला धाक तोच आहे. सामान्य गेणबा कंबरेत वाकलेलाच आहे. यशवंतरावांना हे अपेक्षित होतं काय? आम्ही निघालो कुठे? पोहोचलो कुठे? या प्रश्नांची उत्तरं आमच्या पिढीला द्यावीच लागतील. भोईटेसाहेब थकलेत. परवाच केशवराव पाटीलअण्णा गेले. ज्यांनी स्वातंत्र्य मिळवलं, ते काळाच्या पडद्याआड जात आहेत. बरं झालं, साहेब गेले. हे त्यांच्याच्यानं पाहावलं नसतं. नवे सरंजामदार सरदार पाहण्याचे दिवस त्यांना दिसले नाहीत, हे बरंच झालं!

ती. सौ. वहिनींना, बाबांना सप्रेम जयभीम.

तुझा,
लक्ष्मणकाका

दिनांक २५/८/२०१२

चि. सुप्रिया,

सप्रेम जयभीम.

माझे लहानपण संपूर्णपणे खेड्यात गेले. आम्ही पोटासाठी गावोगाव हिंडत होतो. त्यातला मी एक. लिहिता-वाचता येईल एवढेच शिकवण्याचे ठरवून, गावोगावच्या मास्तर लोकांच्या हातापाया पडून वडिलांनी मला वाचण्या-लिहिण्यापुरते शिकवले. मी शेकडो शाळांमध्ये माझ्या प्राथमिक शिक्षणाचे धडे गिरवले. माझा पिंड पोसला तो या खेड्यांमध्ये. फलटणला होतो तरी माझी पक्की नाळ जोडली होती ती गावाशिवाशी. वाढलो फक्त गावकरी संस्कारात हे मला कबूल केले पाहिजे. मी मॅट्रिक झालो. एस.एस.सी.पास झालो. पुढच्या शिक्षणासाठी आता योग्य शहरात जावे लागणार. फलटणला महाविद्यालय होते. तिथे माझे निभणार नव्हते. तिथे लेबर स्कीम नव्हती. मला तर हाताने काम केल्याशिवाय पुढचे शिक्षण घेता येणार नव्हते. त्यावेळी भटक्या-विमुक्तांना कसल्याच सवलती नव्हत्या. फक्त बाराशे रुपयांच्या आतल्या उत्पन्नाची आर्थिकदृष्ट्या मागासवर्गाची सवलत. आणि अशा जातवार काही सवलती असतात याचे भानही नव्हते. मिळेल ते काम करायचे आणि शिकायचे. शिकण्यासाठी काम करायचे. मला लेबर स्कीममध्ये प्रवेश हवा होता. तो कोल्हापूरच्या रयत शिक्षण संस्थेच्या राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालयात मिळाला. तो सारा प्रसंग इथे सांगणे अप्रस्तुत आहे. पण मन फार व्यथित होते ते मला आता माझे खेडे अंतरणार, मी मोठ्या शहरात जाणार या कल्पनेने.

ज्या खेड्यात मी काळ कंठला ते काही माझे नव्हते. त्यात माझे काहीच नव्हते. घरदार, शेतीवाडी, शिवार काहीच नव्हते. तरी ते माझे होते. खेडणे म्हणजे जमीन कसणे, आणि खेडू म्हणजे जमीन कसणारा. जमीन कसणारा तो खेडूत. खेडूची जी वस्ती म्हणजे खेडे. गावगाडा, गावकी, गावमुकादम, गावपंचायत, भावकी, भाऊबंदकी, कोणतेही गाव असू दे. त्याला दोन भागांत वाटलेले असते. मध्ये पांढरी आणि भोवताली काळी. या पांढरीत गावची वस्ती असते. बहुतेक

गावाला तटबंदी असायची ती आता मोडकळीस आली आहे. पण तिला वेस म्हणत. ही वेस म्हणजे गावचा कडेकोट बंदोबस्त. गावची वेस म्हणजे गावकूस. या वेशीच्या बाहेर राहणारे एक अस्पृश्यांचे गाव आणि गावात राहणारे स्पृश्यांचे गाव. या अस्पृश्यांच्याही पलीकडे आम्ही लोक हागणदारीत किंवा माळावर पाले ठोकून राहणार. हे तात्पुरते वसलेले तिसरे गाव. या गावाला आम्ही 'जातगाव' म्हणत असू. वेशीच्या आतले लोक मेलेली जनावरे खात नाहीत. ते त्याला माती म्हणतात. तर वेशीबाहेरचे लोक मेलेल्या जनावरांना फाडून भाजी म्हणून खात असत. आम्हा लोकांना गावातले लोक त्यामुळे शिवून घेत नव्हते. अभक्ष्य भक्षण हा अस्पृश्यतेचा एक निकष घटनेने मान्य केला आहे. हे मृतमांस खाणाऱ्या जाती म्हणजे महार, मांग, गावकुसाबाहेर बाहेर बंजारा, वडार, कैकाडी, फासेपारधी. या जंगली जातीची पाले माळावर. म्हणजे, एक गाव एक नसतो, तो तीन ठिकाणी वाटलेला असतो. एक शेती करणाऱ्यांचे सवर्ण गाव. एक अस्पृश्यांचा गाव तर एक फिरस्त्यांचा गाव. अशी तीनतीन गावे मिळून एक गाव. पुन्हा जातींची घरे विस्कटलेली नसतात. घरांची रचना जातवार असते. जातींची घरे सलग असतात. माळीआळी, सुतारआळी, कोळीवाडा, रामोसवाडा, महारवाडा, मांगवाडा, भिलाटी अशी नावे असतात. भिल्ल कोळी, रामोशी, कैकाडी, वडार, पारधी, या जमातींना गावगाडाकार अत्रे 'तुफानी जाती' असा मार्मिक शब्द वापरतात. तुफानी म्हणजे जंगल पहाडातून आलेले आक्रमक लोक. म्हणून या जाती गुन्हेगार जाती! लूटमार, चोरी, दरोडे, एवढेच नव्हे; जे जे नीतीबाह्य, ते ते या लोकांनी करावे अशी रचना. जे अस्पृश्य गोमांस किंवा पड खात नाहीत अशा ढोर, चांभार, भंगी यांची वस्ती एक तर गावकुसाच्या आत गावाच्या शेवटी किंवा गावकुसाबाहेर अगदी गावाला खेटून. अस्पृश्य, भटके-विमुक्त यांच्या वस्त्या गावकुसाबाहेर पूर्व दिशेला. वारा पश्चिमेकडून वाहतो ना? म्हणून कोणत्याही गावात अस्पृश्य जातींची वस्ती गावाच्या पूर्वेला असते. गावाला शुद्ध हवा हवी.

सुप्रिया, मेलेले ढोर ओढणे म्हणजे काय असते, हे ते ओढल्याशिवाय कसे कळावे.' जनावरे ओढणे, ती फाडणे, मांस वाटून घेणे, ओले मांस वाळवत ठेवणे-दोऱ्या बांधून ते वाळवायचे. त्या चाण्या वाळलेल्या मांसाचे तुकडे करायचे. त्या बोट्या बोट्या घागरीत भरून उतरंडीला लावायच्या. पावसाळ्याच्या दिवसांत त्या सुगडात शिजवून पोट भरायचे. बदल्यात येस्कराचे काम करायचे. महारालाच येस्कर म्हणतात. महार गावचा वतनदार असे इरावती कर्वे या समाजशास्त्रज्ञ म्हणतात. महार ही महाराष्ट्राची खूण. जिथवर महार, तिथवर महाराष्ट्र. एकही गाव असा नाही, जिथे महार नाही. महाराष्ट्र हे महार राष्ट्र आहे. हे महारांचे राज्य आहे.

बाकी सारे विस्थापित. त्यांचा पराभव कसा झाला याचा इतिहास उपलब्ध नाही. तो इतिहास तुला मुळातून वाचावा लागेल.

जातींचे उकिरडे म्हणजे खेडे. जी जन्माने मिळते आणि मरणानेही जात नाही, ती जात. कायद्याने, घटनेने घालवली तरी जी मनामनामध्ये नसानसामध्ये ठासून भरली आहे. जी जात ज्या गावात बहुसंख्य, ती जात त्या गावची वतनदार मालक. इतरांनी गुलाम म्हणूनच तेथे जगायचे. दाती तृण धरून काही गावे धनगरांची, काही गावे मराठ्यांची, काही गावे माळ्यांची, काही गावे वंजाऱ्यांची– ज्या गावात जी जात बहुसंख्य ती तिथे राजा. इतर जातीच्या लोकांनी त्यांची खुशामत करतच जगावे असा रिवाज. तेव्हा, काळी आणि पांढरी असे गावाचे दोन भाग. कुणबी म्हणजे शेतकरी आणि अडाणी म्हणजे बिगर शेतकरी. आम्ही गमतीने त्यांना कुणबी म्हणजे कोणीबी असे म्हणत असू. ते काही मालक नव्हेत. वतनदारी मिळवायची असते. ती मिळते, त्याने तो मूळनिवासी ठरत नाही. कोणती बी जात आत वसते तो कुणबी. कुणी म्हणतात कुणमी. पृथ्वीला, धरणीला नमन करणारा. तर, तामिळमध्ये कूळ म्हणजे जमीन कसणारा. कुळथ, कुणबी याचा मूळ अर्थ 'कुल' टॉटेम, कुळाचार. ज्याचे कुटुंब शेती करते, तो कूळ–कुळवाडी. थोडक्यात शेतकरी शब्दाचा पर्यायी शब्द कुणबी असावा. शेतीचा धंदा करणारा, शेतीत बी पेरणारा कुणबी. पण तो काही जातिवाचक शब्द नाही. शेतकरी म्हटल्याबरोबर डोळ्यांपुढे उभे राहतात शेते, पिके, गवत, झाडे, गुरेढोरे, शेळ्यामेंढ्या, मेंढके, शेतकरी, गुराखे, विहिरी, नांगर, कुळव, मोट, मळा, गोफण, तिफण, तिवडे, नाडा, पास, शिवळ, जुपणी, अशा कितीतरी गोष्टी. एक मात्र खरे, कुणबी पुढे झाल्यावाचून एकही वसाहत झाली नाही. जगाच्या खाण्यापिण्याचा सारा भार कुणब्याने उचलला. साऱ्यांच्या उदरभरणाची व्यवस्था केली ती कुणब्याने. म्हणून खऱ्या अर्थाने तो 'बळीराजा' आहे. बळीचा वारस आहे. इडापिडा टळो, बळीचे राज्य येवो असे दिवाळीला सारे शेतकरी म्हणतात ते काही उगीच नाही. उत्तम शेती, मध्यम व्यापार, कनिष्ठ चाकरी अशी म्हण हजारो वर्षे प्रचलित आहे. आताची स्थिती विपरीत आहे. शेतकऱ्याला वरायला आता शेतकऱ्यांच्या पोरी तयार नाहीत. पण तरीही सुप्रिया, खेडे हा जातींचाच समूह राहिला. बळी तो कान पिळी. सारी विषम व्यवस्था, जातीच उच्चनीच साऱ्या. उतरंडीसारख्या. मुख्य गाभा शेती, पण शेती हा काही एकट्याचा धंदा नाही. त्याला अनेक प्रकारे अनेकांची मदत लागते. शेतीचा धंदा करणे असो; की खाजगी प्रपंचाची शेती असो, अनेक कामे चालण्यासाठी त्याला शेतीत नसलेल्या अडाण्याची वाढलो आवश्यकता होती. ज्यांची शेतकऱ्याला सर्वांत जास्त गरज असेल त्या वर्गाला

तो म्हणू लागला 'कारू' आणि ज्याची जुजबी मदत लागते, त्याला म्हणू लागला 'नारू'. कारूचा अर्थ 'प्रत्यक्ष करणारा.' ज्याची विद्या, कसब, मेहनत कुणब्याच्या धंद्याला आणि खाजगी व्यवहाराला आवश्यक असा धंदा करणारा तो कारू. आणि ज्याच्या धंद्यावाचून कुणब्याचे नडत नाही, असा धंदा करणारा नारू. कारूला दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर बलुतेदार असे म्हणतात. तर नारूला आलुतेदार म्हणतात. कारू व नारू वेगवेगळ्या जातीचे असतात. कुणब्याला दोघेही मायमाता म्हणतात. शेतीच्या व्यवसायात, गावकीच्या सामान्य किंवा विशेष गरजा भागविण्यासाठी कारू-नारू आपल्या जातिगत कसबाचा वापर करून जी कामे करतात, त्याबद्दल त्याच्या कामाचे मोल म्हणून त्यांना प्रत्येक शेतकऱ्याने जो पिकाचा वाटा वंशपरंपरेने द्यायचा असतो त्याला 'बलुते' आणि 'आलुते' म्हणतात. ज्यांना बलुते मिळते ते बलुतेदार आणि ज्यांना आलुते मिळते त्यांना आलुतेदार. शेतकऱ्याला ज्या बलुत्याचा जितका उपयोग, त्यामानाने त्याची प्रतवारी होऊन तीन वर्ग पडतात. अशा वर्गाला कास म्हणतात. पहिल्या वर्गाला थोरली, दुसऱ्या वर्गाला मधली, तिसऱ्या वर्गाला धाकली कास म्हणतात. कास म्हणजे गाईचे सड. कुणबी म्हणजे काय, तर गाय. बलुतेदार वासरे. ही वासरे आपापल्या पाळीप्रमाणे कासेला लागणार. पहिली गरज कुणब्याला बलुत्यांची. तो थोरला. तो पहिल्यांदा कासेला लागणार. पोटभर जोगावणार. म्हणजे सर्वांत जास्त बलुते त्याला मिळणार. पहिली पात झाल्यावर दुसरी ओळ सुटणार. तिला पहिलीपेक्षा कमी दूध मिळणार. म्हणजे, कमी बलुते मिळणार. तिसऱ्या ओळीची पाळी शेवटी येते. त्यामुळे तिचा वाटा सर्वांत कमी. बलुतेदाराला हक्काने बलुते मागता येते. उदा. सुतार. सुताराची सर्वांत जास्त गरज. त्याला जास्त द्यावे लागणार. चौगुला, महार, सुतार, लोहार, चांभार, कुंभार, न्हावी, सोनार, जोशी, परीट, गुरव, कोळी, ह्यांना बलुतेदार म्हणतात. तर तेली, तांबोळी, साळी, सणगर, शिंपी, माळी, गोंधळी, डवरी, भाट, ठाकर, गोसावी, जंगम, मुलाणी, वाजंत्री, घडशी, कलावंत, तराळ, भोई या अठराजणांना आलुती म्हणतात. यात बदलही होतात. स्थानपरत्वे नावे बदलतात. गरजेनुसार काही बलुत्यांना आलुते मिळते तर काही आलुत्यांना बलुते मिळते. म्हणजे, गावकुसातले गाव असे अठरापगड जातींत वाटलेले असते. त्याशिवाय आणखी एक वर्ग आहे. तो फिरस्त्या वतनदारांचा. फिरस्ते व्यापारी, तीर्थोपाध्याय, मंदीरवाले, दरगेवाले, मनोरंजन करणारे, भिक्षा मागणारे, चोऱ्या करणारे, तेही शेतकऱ्यांचे खळे मागून खातात. उपलाने गोसावी, बैरागी, फकीर, जंगम, मानभाव, आंधळे पांगळे भिक्षुक, गोपाळ, कोल्हाटी, गारुडी, तमासगीर, किती सांगावेत? हा देशच मुळी कष्ट करणाऱ्यांपेक्षा

भीक मागणाऱ्यांचा आहे. जो तो उठतो, तो ऐतखाऊ बनतो. ऐतखाऊ असणे, हाताने काम न करणे, याला ऐशआराम म्हटले आहे. पोटाचा घेर वाढवून, शेंडीला तूप लावून जगणाऱ्यांचा रोल मॉडेल म्हणून वापर करण्याने प्रत्येकाला तूप हवे आहे. आयता भात हवा आहे. भात पिकवण्यासाठी हात मात्र कुणी द्यायला तयार नाही. त्याने सारा कुणबावा देशोधडीला लागला आहे. साऱ्यांचे भरीत झाले आहे. शेती परवडेनाशी झाली आहे. सत्तर टक्के लोक शेतीवर उदरनिर्वाह करत आहेत. सावकारी बोकाळली आहे. व्यापारउदीम करणारे पैसेवाले लोक शेतकऱ्याला कसे नाडतात, ते यापूर्वी महात्मा फुल्यांचा संदर्भ देऊन मी तुला सांगितले आहेच.

सुप्रिया, यशवंतरावांच्या कार्यकर्तृत्वाचा आढावा घेताना ते मला कसे दिसले, ते कसे हसले यापेक्षा कोणत्या स्थितीत त्यांनी कोणत्या भूमिका घेतल्या हे पाहणे महत्त्वाचे आहे असे मला वाटते. माझ्या लहानपणी मी या स्थितीतले काही पाहू शकलो. तुझ्या बाबांचा काळ आणखी अगोदरचा आहे. ती. बाईंचा काळ तर त्या अगोदरचा. शेतीची म्हणजे 'काळी'ची स्थिती आपण पाहिली. यशवंतरावांना मोठी जमीन नव्हती. कायम दुष्काळी भागातला त्यांचा जन्म. अल्पभूधारक वडील. तेही सरकारी नोकरीला. अल्पभूधारक शेतकरी म्हणजे शेतमजूरच. शेतमजुरांच्या पोराच्या हातात कारभार आला. तो बाबासाहेबांनी देशाला दिलेल्या महान संविधानाने. सत्तेचा वापर गोरगरीब रयतेसाठी करावा; सत्तेचे विकेंद्रीकरण व्हावे, सत्ता पाझरत सामान्यातल्या सामान्य माणसांपर्यंत जावी, सामान्य माणूस लोकशाहीत राजा व्हावा, तो राणीच्या पोटी नव्हे; तर मतपेटीतून जन्माला यावा ही त्यांच्या घटनेने दिलेली धारणा आहे. प्रत्यक्ष स्थिती मात्र विपरीत होती. आता त्या स्थितीबद्दल थोडे सांगतो. गावगाडाकार त्र्यं.ना.अत्रे यांनी त्यांच्या 'गावगाडा' या ग्रंथात फार छान मांडणी केली आहे. भाषा थोडी जुनी आहे. तुला समजायला थोडी अवघड आहे, पण ती समजून घेतली पाहिजे. गावगाडा आणि स्वातंत्र्यपूर्व काळातील सत्ता काय होती, जिच्याविरुद्ध यशवंतरावांना संघर्ष करावा लागला? त्यांनी तो मुख्यमंत्रीपद कसाला लावून केला? काय बदलले त्यांनी? ग्रँट डफ हे इतिहासकार म्हणून माहीत आहेत. ते आपल्या साताऱ्यात कलेक्टर होते. ते काय म्हणतात बघ, मोठे सरकार, त्यामध्ये परगणा, त्याचे आंत कर्यात तिच्यापोटी समंत, तिचेमध्ये महाल, त्याचे आत तालुका, मराठाशाहीत सुमारे साठपर्यंत गावे मिळून महाल किंवा परगणा व काही परगणा मिळून सुभा, ह्याप्रमाणे राज्याचे विभाग केले होते. डोंगराच्या किंवा जंगलाचा भाग अमुक एका गावाच्या हद्दीत सामील केला नसल्यास त्याला तरफ घालत. साधारणत: महालाचे क्षेत्र परगण्यापेक्षा लहान असे. सुभ्याला सरकार प्रांत किंवा देश म्हणत. प्रांतावर सुभेदाराचा अंमल

होता. सुभ्यावर कुलअखत्यार सुभेदाराचा असे व आतल्या महाल परगण्यावर हवालदार, कमाविसदार, मामलेदार, वगैरे अधिकाऱ्यांच्या नेमणुका तो करी. पुढे पुढे हवालदारी वंशपरंपरेने चालू लागली आणि हवालदार वतनदार बनले. मामलकीत एक ते तीन परगणे येत. सरपाटील, सरदेशमुख, सरदेशपांडे, सरदेसाई, व सरनाडगौडा हे सर्वांत वरिष्ठ दर्जाचे वतनदार अधिकारी होत. दर प्रांताला दिवाण, फडणवीस, पोतनीस, मुजुमदार हे वतनदार सुभेदार असत. त्यांना दरकदार म्हणत. पोतनीसाकडे प्रांताचे नगदीचे हिशेब व फडणवीसाकडे संबंध दप्तर होते. परगणे पाटील, देसक, देशमुख, देशपांडे, देश कुलकर्णी, देश चौगुला, परगणे-नाईक, महाल-नाईक, हे मुख्य वतनदार परगणे अंमलदार होते. त्यांना जमेदार, महाल जमेदार, जमीनदार अथवा हक्कदार म्हणत. गावाला जसे पाटील, कुलकर्णी, जागल्या; तसे परगण्याला देशमुख, देसकुलकर्णी, देशपांडे, देस चौगुला, परगणेनाईक हे होते. देशमुख, देश चौगुला हे मराठे, देशपांडे ब्राह्मण व महाल नाईक भिल्ल, रामोशी किंवा कोळी असत. वतनाप्रीत्यर्थ मुसलमान झालेले देशमुख, देशपांडे, परगणेनाईक कुठे कुठे होते. सर्व ग्राम अधिकारी वंशपरंपरेने हुद्देदार होते. या वतनदारांच्या अधिकारात केवळ महसुली अंमलच नव्हता, तर गावच्या नित्यनैमित्तिक गावकी व घरकी व्यवहाराला उपयोग असे कारू-नारू, उदाशी, तमासगीर भिक्षुक वगैरे सर्वजण येत.

दर गावाला पाटील असतो. पाटील हा कोणी राजाने दिलेला हुद्दा नसावा. जातपाटलाच्या नमुन्यावर सर्वश्रेष्ठ गावमुकादमाचे पाटील हे नाव ठेवले असावे. जातपाटलांचे वर्णन दिले आहे त्यावरून गाव पाटलाच्या दर्जाची व अधिकार मर्यादेची अटकळ बांधता येईल. जातपाटलाचे सर्व अधिकार गावपाटलाला असून खेरीज तो गावातला राजाचा प्रतिनिधी होता व आहे. पाटलाला गावचा प्रभू म्हटले तरी चालेल. बहुतेक गावामध्ये सुरक्षिततेसाठी इतर वस्ती मध्य भागात व पाटीलगळ गावकुसाजवळ माऱ्याच्या ठिकाणी घडलेली दिसते. गाव वसविणारा पुढारी बहुधा गाव पाटील झाला. ज्यांनी गाव वसविला त्या मिरासदारांपैकी पाटलांचे घराणे प्रमुख व म्हणून गावात मानाने सर्वांत वडील असायचे. जो गावाची बाजू सावरून व उचलून धरणारा आणि गावाला घेऊन चालणारा म्हणून रयतेला पटला आणि सरकारी काम, वसूल वासलात बंदोबस्त बिनबोभाट करणारा म्हणून सरकारला पटला, तो गावाला पटला, तो गावचा पाटील झाला. पाटलांना गावापुरते मुलकी, दिवाणी, फौजदारी, कुळाधिकार असत. सर्व पाटील घरंदाज व त्यातले बहुतेक सरदार असल्यामुळे त्यांना राजाचे बहुतेक अधिकार मिळाले व ते त्यांनी नेकीने गाजवले. भोसले, दाभाडे, पवार, गायकवाड, शिंदे, होळकर, ह्यांनी राज्ये

कमावली तरी ते पाटीलकीला कवटाळून राहिले आणि त्यांनी नवीन पाटील वतने संपादन केली. महाप्रभावशाली महादजी शिंद्यांना पाटील म्हणवून घेण्यात भूषण वाटे, हे इतिहासप्रसिद्ध आहे. 'उतरंडीला नसेना दाणा, पण दादला असावा पाटीलराणा' किंवा 'दोन हाणा, पण पाटील म्हणा' या म्हणी पाटलाचा मानमरातब व्यक्त करतात.

पाटील स्मरणाचा कितीही धड असला तरी त्याला लिहितावाचता येत नव्हते. त्यामुळे त्याला लेखक मदतनीस आवश्यक झाला. या मदतनीसाला पटवारी, कुलकर्णी किंवा पांड्या म्हणत. कुळे करणारा म्हणजे कुळावर, गावचा हिशोब लिहिणारा तो कुलकर्णी. कुळकरण वतन सुमारे हजार वर्षांचे जुने आहे असे सांगतात. बहुतेक कुलकर्णी ब्राह्मण, काही प्रभू, क्वचितच मराठे, लिंगायत व मुसलमान असत. पाटीलकीच्या खालोखाल कुलकर्ण्याला महत्त्व होते. पेशव्यांपासून तो खालपर्यंत सर्व ब्राह्मण सरदार त्याला बिलगले. तो सर्व गावचे रेकॉर्ड ठेवी. शेती, जनावरे, माणसे साऱ्यांची गणती ठेवी. मुलकी कागदपत्रे, दिवाणी कामातील पंचायतीचे सारांश व फैसलेनामे, फौजदारी कामाचे कागद वगैरे सारी कामे कुलकर्णी करी.

सुप्रिया, हे थोडेसे सविस्तर सांगितले कारण त्याशिवाय यशवंतरावांनी काय बदलले हे कळणार नाही. ते महाराष्ट्राचे शिल्पकार होते म्हणजे काय? जुनी सारी व्यवस्था जन्माधिष्ठीत होती, वंशपरंपरेने आलेली होती. ती बदलण्याचा प्रश्न होता. घटनेमध्ये विकासाचा केंद्रबिंदू माणूस मानला आहे, पण वास्तवात जमीनदारी, वतनदारी, सरंजामदारी ठाण मांडून बसली होती. घटनेत समता सांगितली होती पण प्रत्यक्षात विषमता होती. पुढे मी मोठा झाल्यावर जेव्हा त्यांच्याशी बोललो, तेव्हा त्यांनी फार मार्मिक शब्दात एक प्रसंग सांगितला. त्यावेळी पक्षात मोठी शिस्त होती. पक्षाचे पार्लमेंटरी बोर्ड होते. ते क्रियाशील होते. पक्षातले सर्व आमदार पक्षकचेरीत बसून शासकीय विधेयकांवर विचारविनिमय करत. प्रसंगी सर्वांच्या मनाचा कानोसा घेण्यासाठी पक्षाचे नेते सर्वांना बोलते करत. ही परंपरा तुझे बाबा मुख्यमंत्री होते तोपर्यंत मी स्वत: पाहिली आहे. पक्षातल्या आमदारांची एक बैठक बोलावण्यात आली होती. चव्हाणसाहेबांनी 'पंचायत राज'चे विधेयक विधिमंडळात आणणार असल्याचे सांगितले. आपल्या राज्यघटनेत संसद आणि विधिमंडळ अशी द्विस्तरीय शासनप्रणाली आहे. संसद आणि विधिमंडळ अशी दोन धारांची शासनपद्धती घटनेने स्वीकारली आहे. यशवंतरावांच्या मनात ती त्रिस्तरीय करायची होती. सर्व सत्ता अधिकाधिक लोकांपर्यंत जाणार होती. 'सत्तेचे विकेंद्रीकरण' असे त्यांनी त्यांचे वर्णन केले होते. विधेयकाचा सर्व तपशील साहेबांनी

सर्व आमदार, मंत्र्यांना सांगितला. लोकांनी आपली मते मांडावीत म्हणून त्यावर पक्षांतर्गत चर्चा सुरू झाली. आमदार, जेष्ठ मंत्री सारे बोलू लागले. आम्ही काय करायचे, मतदारसंघात पंचायत समितीच्या सभापतीने विकासाची कामे केली तर आम्हाला कोण विचारील, जिल्हा परिषदेने जिल्ह्याची कामे केली तर जिल्ह्यात आम्हाला कोण विचारील, आम्ही पुन्हा निवडून कसे येणार? एक ज्येष्ठ मंत्री म्हणाले, गावचा सरपंच कोण असणार, दिल्लीत कोणीही आले आणि गेले, कितीही शाह्या आल्या गेल्या, पण गाव राखले ते गावच्या पाटलाने. त्या पाटलाचे काय होणार? सरपंच कुणीही झाला तर या पाटलाला कोण विचारणार? तुम्ही गाव मोडायला निघाला आहात. लोकशाही आली तरी ती जुन्याच वाटेने येईल, नव्या वाटेने येणार नाही! दुसरे एक मंत्री म्हणाले, मग निदान असे करा, तालुक्याच्या पंचायत समितीच्या सभापतीला आमदार करा. जिल्ह्यातला ज्येष्ठ नेता जिल्हापरिषदेचा अध्यक्ष करा आणि गावचा पाटील सरपंच करा. म्हणजे, सगळ्यांनाच सोईचे होईल. लोकशाही मान्य नसलेले जातदांडगे, धनदांडगे, सरंजामदार, वतनदार यांनी आता विधिमंडळातही प्रवेश मिळवला होता. प्रत्येक पुरोगामी निर्णयात यांचा आडवा पाय असे. हे सारे यशवंतरावांना ठाऊक होते. महाराष्ट्राचे मन त्यांना समजत होते. गावोगावच्या मिरासदारांच्या मिरासदाऱ्या संपवायच्या तर कायदाच करावा लागणार. त्यांचे जनतेच्या नाडीवर बरोबर बोट होते. त्यांनी सर्वांचे म्हणणे शांतपणे ऐकले आणि म्हणाले, 'राज्य सर्वांचे आहे, ते सर्वांसाठी आहे आणि सर्वांनी एकत्र येऊन करायचे आहे. ते कोणा जातिधर्माचे, गटाचे असणार नाही. माझी भूमिका बेरजेची आहे, वजाबाकीची नाही. सर्वांना बरोबर घेतले पाहिजे. सर्वसामान्य माणसाला राज्य आपले वाटले पाहिजे. त्यासाठी आपण सत्तेच्या विकेंद्रीकरणाचे धोरण घेतले पाहिजे. जुन्या व्यवस्थेबद्दल मला काही बोलायचे नाही. नव्या विटीदांडूने नवा खेळ खेळला पाहिजे. ही माझी भूमिका पक्षाला मान्य नसेल, तर उद्यापासून मी महाराष्ट्राचा मुख्यमंत्री असणार नाही.' असे निर्वाणीचे बोलल्यावर ग्रामीण भागातून नव्याने आलेले तरुण आमदार त्यांच्या बाजूने बोलू लागले. वातावरण बदलून गेले. त्यातून आताची त्रिस्तरीय व्यवस्था जन्माला आली. जिल्हा परिषदा, पंचायत समित्या, ग्रामपंचायती. दलित, आदिवासी, बलुतेदार, आलुतेदार पहिल्यांदा गाव नावाच्या व्यवस्थेत यामुळे सन्मानाने समाविष्ट झाले. अजूनही भटक्या-विमुक्तांना या व्यवस्थेत थारा नाही. तरी हे पाहिल्यावर यशवंतरावांच्या दूरदृष्टीचा महिमा समजतो. स्त्रियांना या सर्व व्यवस्थेत शूद्राप्रमाणे गुलाम केले होते. तुझ्या बाबांनी या भगिनींसाठी जिल्हा परिषदांची दारे उघडली. हे 'पंचायत राज' आले नसते तर जुनेच बोके नव्याने

खादीचे कडक कपडे घालून नव्या व्यवस्थेचे मालक झाले असते. आज डोळे उघडे ठेवून पाहिले तर हे सरंजामदार, वतनदार सारा प्रदेश काबीज करत आहे. पैसा परमेश्वर झाला आहे. यशवंतरावांच्या क्रांतिकारक विचारांचा रोजच्या रोज पराभव होताना सामान्य माणूस पाहतो आहे.

ती. सौ. वहिनींना, बाबांना सप्रेम जयभीम.

तुझा,
लक्ष्मणकाका.

दिनांक ४/९/२०१२

चि. सुप्रिया,

सप्रेम जयभीम.

मी १९६९ ला फलटण सोडले. कोल्हापूरच्या राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालयाच्या लेबर स्कीममध्ये प्रवेश घेतला. राजकारणाचा आणि राजकारण्यांचा संबंध राहिला तो फक्त वर्तमानपत्रातल्या बातम्यांपुरता. पोटासाठी काम आणि उरलेला वेळ कॉलेज, अभ्यास यात जाऊ लागला. कोल्हापूरला गेलो तो गळ्यातल्या गंड्यादोऱ्यासह. खिशात काळूबाईच्या अंगाऱ्याच्या पुड्या घेऊन. मी कोल्हापूरला गेलो नसतो, फलटणला राहिलो असतो, तर कदाचित शिकलो असतो, पण माणूस झालो असतोच असे नाही. परंपरांच्या जोखडात अडकलेला एक, असेच झाले असते. लग्न, पोरेबाळे या संसाराच्या परंपरागत चक्रात अडकलो असतो. कोल्हापूरने मला नवा जन्म दिला. माझा पुनर्जन्म झाला. अंगारे, धुपारे, नवस, सायास, कर्मकांड, देव, दैव, धर्म असल्या लचांडातून मी मुक्त झालो. अंगातला देव केव्हा गेला हे मला समजलेच नाही. मी हळूहळू बदलत गेलो. मला सापडले ते शाहू महाराज, म. ज्योतिराव फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर. या महापुरुषांच्या विचारांची ओळख झाली ती या कोल्हापूरच्या मातीत. जातीपातीच्या पलीकडे घेऊन जाणारे गुरुजन, सहकारी, मित्र आणि शाहू छत्रपतींच्या पुरोगामी क्रांतिकारक विचारांची शिदोरी घेऊन जगणारे हजारो लोक. कोल्हापूर सर्वार्थाने क्रांतिकारक. जीव लावला तर जिवाला जीव देणारे आणि दुसऱ्या टोकाला गेले तर ढुंकूनही न पाहणारे साधेभोळे लोक. समतावादी, परिवर्तनशील विचारांनी माझी जडणघडण झाली ती या लाल मातीत. मी जगभर गेलो तरी आजही माझे आवडीचे गाव कोल्हापूरच आहे. त्याचे कारण या गावाने मला कार्यकर्ता म्हणून, माणूस म्हणून घडवले. वि.स.खांडेकर तथा भाऊ यांच्याबरोबर राहण्याचा माझ्या आयुष्यातला काळ खरेच मंतरलेला काळ. पुस्तकांशी माझी ओळख झाली ती भाऊंच्या घरी. ज्ञानसागराच्या तीरावर मला उभे राहता आले. त्यातले काही चार थेंब माझ्याही आयुष्याचे सोने करून गेले.

मी राष्ट्र सेवा दलात गेलो, शशी भेटली, लग्न केले. सेवादलाने माझे तरुण मन बंडखोर केले. समाजवादी विचारांचे संस्कार या कोवळ्या वयात झाले. लोकशाही, समाजवाद, धर्मनिरपेक्षता, विज्ञाननिष्ठा या मूल्यांवर मला माझे आयुष्य उभे करता आले. मन एका विचाराने भारावून गेले. जातिधर्मापलीकडे गेलो. माझे कुटुंब आंतरभारती झाले. अगदी कोकणस्थ ब्राह्मणापासून पूर्वास्पृश्य समाजापर्यंत माझे कुटुंब सोळा-सतरा जातींनी व्यापले. आणि आता आम्ही सारे कुटुंबीय तथागत भगवान बुद्धांच्याा वाटेने गेलो आहोत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दाखवलेला रस्ता खऱ्या अर्थाने आपलासा केला. तो परिवर्तनाचा बिंदू म्हणजे कोल्हापूर. तुझ्या बाबांशी माझी नाळ जुळली ती या विचारांच्यामुळे. तुझ्या लग्नात मी, महानोर, अरुण मेहता, अरुण गुजराथी, विठ्ठलभाई मणियार असे कितीतरी जातीचे आम्ही-वरबाप म्हणून फेटे बांधून महाराष्ट्रातल्या लोकांचे वेगवेगळ्या गेटवर स्वागत करत होतो ते या विचारांमुळेच. आपल्या एकुलत्या एका लेकीचे लग्न लाखो माणसांच्या साक्षीने शरदरावांनी बारामतीत केले तो खरे तर इतिहास होता. आंतरजातीय विवाहाला लाखो लोक जमले होते. कुठेही विषादाचा सूर निघाला नाही. शाहू छत्रपतींच्या नंतर एवढे धाडसी पाऊल तुझ्या बाबांनी उचलले. त्याचा आम्हा मित्रांना फार अभिमान.

आज तुझे कौतुक करताना मनापासून आनंद होतो तो यासाठी. त्यांनी मला काही गुळखोबरे दिले नाही. मी धर्मांतराचा निर्णय केला. ते काळजीत होते. मला न सांगता ते अनेक गोष्टी करीत होते. राज्यात कुठेही साधा दगड सभेत आला नाही. मी राज्यभर फिरत होतो. पोलिस संरक्षण न घेता बोलत होतो. त्याचे कारण आमचे अंतरीचे नाते. नात्यात ते कधीच राजकारण आणत नाहीत. त्याचे कारण यशवंतराव चव्हाण साहेबांकडून आम्हाला मिळालेला वारसा आहे. सर्व विचारांच्या लोकांशी त्यांचा स्नेह आहे तो व्यक्तिगत पातळीवर. बाळासाहेब ठाकरे त्यांचे मित्र असतात आणि अगदी टोकाचे डावे, उजवे कम्युनिस्ट ही त्यांचे तेवढेच मित्र असतात. व्यक्तिगत नात्यामध्ये ते कधीही राजकारण आणत नाहीत.

तर, मी आता मोठा होऊन, आंतरजातीय लग्न करून पुन्हा कोल्हापुरातून सातारला आलो होतो. पण आता मी पूर्वीचा राहिलो नव्हतो. राजकारणात होतो, समाजकारणात होतो. समाजवादी परिवाराने आम्हांला काँग्रेसविरोधाची संथा दिली होती. परिवर्तन, क्रांती, बदल या विचारांनी भारावून मी काम करू लागलो होतो. काँग्रेसचे राजकारण प्रस्थापित व्यवस्थेला जोपासणारे होते. यशवंतराव त्यांचे नेते होते. मी व्यवस्था परिवर्तनाची स्वप्ने पाहत होतो. भाबडेपणा गेला होता. यशवंतरावांबद्दल पूर्वी जसा भाबडा जिव्हाळा होता तसा तो राहिला नव्हता.

वयाबरोबर वर्ग जाणिवा आल्या होत्या. वाचनाने मन घडत होते. काँग्रेस विरोध मनात पक्का बसला होता. जातजाणीव काय असते ते समजू लागले होते. समाजवादी विचारांनी भारावून गेलो होतो. बाबा आढाव, भाई, बापू, पन्नालाल सुराणा, मृणाल गोरे हे आमचे आदर्श होते. सातारला आलो आणि समाजवादी युवक दलात काम करू लागलो. तो सारा तपशील 'उपरा'त आला आहेच, तो तुला ठाऊक आहे. काँग्रेसबद्दल मनात कडवटपणा भरून होताच. दलित पँथरच्या चळवळीत काही वर्षे गेली होती. त्याने तर भाषेलाही चांगले क्रांतिकारक वळण लागले होते. आणि या अशा बदललेल्या मानसिकतेत मी पुन्हा यशवंतरावांना भेटत होतो. साताऱ्याच्या मातीत. १९७३ सालच्या मे महिन्यात मी सातारला आलो. ते साल ७२ च्या दुष्काळाच्या नंतरचे होते. पाऊस होता; पण अन्नधान्याचा कोण तुटवडा होता. रेशनिंगवर मिलो मिळत होता. मिलो म्हणजे अमेरिकन ज्वारी. तांबड्या रंगाची. तिला कसलीही चव नव्हती. भाकरीही नीट होत नव्हत्या. लालभडक, जनावरे खाणार नाहीत अशी ज्वारी गोरगरिबांना तासन्तास रांगांमध्ये उभे राहून घ्यावी लागत होती. तीही पुरेशी मिळायची नाही. रॉकेलची टंचाई, रॉकेलही रेशनिंगवर होते. रेशनिंग कार्डधारकांना निदान लिटर-दोन लिटर मिळे. बाकीच्यांना तेही नव्हते. सातारला पिण्याच्या पाण्याचा पुरवठा कास तलावातून होत असे. पाऊस बेताचा. त्यामुळे नगरपालिका पाणी फार मोजूनमापूनच सोडत असे. उघड्या पाटाने शहराला पाणीपुरवठा होत होता. पाण्यात कायकाय पडलेले असायचे. एकदा पाण्यात गाढव मरून पडले होते. गाव तसेच पाणी पित होते. लोक आपली जनावरे पाटात धूत असत. फिल्ट्रेशनची पुरेशी व्यवस्था नसल्याने गाळाचे लालभडक पाणी सर्व शहरातल्या नळाला येत असे. कितीही गाळून घेतले तरी पाण्यातला गाळ जात नसे. रोज पिण्यापुरते पाणी असे. नळ कोंडाळ्यांच्या खाली खोल खड्डे करून लोक बादल्यांनी पाणी भरत असत. पिण्याच्या पाण्याचा प्रश्न हा शहरात फार ज्वलंत विषय होता.

आम्ही समाजवादी युवक दलाचे तरुण कार्यकर्ते या संदर्भात लोकजागरण करत होतो. लोकांचा चांगला प्रतिसाद होता. पाण्यासारखी जीवनावश्यक बाब असल्याने आम्ही तावातावाने असंतोष संघटित करत होतो. त्यात एकदा कासचा पाट फुटला. चारपाच दिवस शरहाला पाणीपुरवठाच नव्हता. सारी बोंबाबोंब उडालेली. नगरपालिका टँकरने पाणी पुरवायचा प्रयत्न करीत होती. आम्ही रिकाम्या घागरींचा मोर्चा काढला होता. मोर्चाला फार चांगला प्रतिसाद लाभला. खूप लोक आले होते. स्त्रियांचा भरणा मोठा होता. डॉ. दाभोळकर आमचे नेते होते. शहरात सतत संघर्ष चालू होता. त्यावेळी यशवंतराव परराष्ट्र मंत्री असावेत. त्यांना

आम्हा लोकांची माहिती होतीच. आम्ही काढीत असलेले मोर्चे ठाऊक होते. एकदा, ते सातारच्या सर्किट हाउसवर आले आहेत असे आम्हाला समजले. आम्ही तात्काळ एक शिष्टमंडळ त्यांना भेटायला नेले. दाभोळकरांनी आम्हा साऱ्यांना शिष्टमंडळात नेले. खूप गर्दी होती. पाय ठेवायला जागा नव्हती. आम्ही चिठ्ठी आत पाठवली. चव्हाणसाहेबांनी तात्काळ काँग्रेसचे सर्व नेते बाहेर पाठवले. गर्दी बाहेर गेली. सातारच्या सर्किट हाउसच्या हॉलमध्ये साहेब खुर्चीत बसलेले. साहेब हसतहसत उभे राहिले. 'या, दाभोळकर या' त्यांनी हातात हात घेतला. अत्यंत सौजन्याने आमचे स्वागत केले. 'बसा, बोला काय काढलेत?' दाभोळकरांनी सारा विषय मांडला. धान्य, रॉकेल, पाणी या प्रश्नांसंबंधी बोलले. कासचा पाट फुटल्याचे आणि त्यामुळे चार दिवस पाणी नसल्याचे मी सांगितले. ते क्षणात चिंतेत पडले. अत्यंत शांतपणे सारे ऐकले. समोर बेल होती ती वाजवली. एक माणूस आत आला. त्याला म्हणाले, 'जिल्हाधिकाऱ्यांना बोलवा.' तात्काळ जिल्हाधिकारी समोर उभा राहिला. त्यांनी अधिकाऱ्यांना सांगितले, 'हे तरुण माझे मित्र आहेत. शहरात फार चांगले काम करत आहेत. त्यांनी मला जी माहिती दिली, ती फार गंभीर आहे.' डॉ. दाभोळकरांनी पुन्हा जिल्हाधिकाऱ्यांना आकडेवारीसह सर्व सांगितले. चव्हाणसाहेब म्हणाले, 'काय करता येईल सांगा. पाट किती दिवसांत दुरुस्त होईल?' कलेक्टर म्हणाले, 'सर दोन-तीन दिवस तरी लागतील.' साहेब म्हणाले, 'चार दिवस गृहीत धरूया. एक दिवस जास्त. पण, पाच नाही. दुसरे, रेशनिंग. या तरुण मुलांकडे गाववार आकडे आहेत. लोक धान्य चोरून विकताहेत. सारा तपशील दाभोळकरांकडे आहे. तो घ्या. संबंधितांना तात्काळ कायद्याने वठणीवर आणा. किती दिवस लागतील सांगा.' कलेक्टर 'सर...सर ...सर' करत राहिला. साहेबांनी सौजन्याने पण ठामपणे आदेश दिला. 'पंधरा दिवसांच्या आत मला दिल्लीला समजले पाहिजे, किती लोकांवर कारवाई झाली ते. रॉकेल, रेशनिंग तात्काळ पुरवठा करा. अडचण आली तर मला सांगा. चला, डॉक्टर आता काय राहिले.' कलेक्टरला म्हणाले, 'स्वत: लक्ष घाला. पुन्हा या संबंधी चर्चा नाही.' कलेक्टर बाहेर गेले. साहेबांनी आम्हा सर्वांचा परिचय करून घेतला. आम्ही मनातून ठरवून गेलो होतो. असे बोलू नि तसे बोलू. प्रत्यक्षात या वागणुकीने ढेकळासारखे विरघळून गेलो. हे रसायनच काही और होते. त्यांनी आम्हाला बिलकूल अडवले नाही. सारे शांतपणे ऐकले. आम्ही सुरुवातीला तावातावाने बोलू लागलो. तरी ते शांतच होते. आमचा आवाज आपोआपच खालच्या पट्टीत आला. त्यांनी सारे समजावून घेतले. अधिकाऱ्यांना आदेश दिले. हसत स्वागत केले. तोंडभरून कौतुक केले. वर प्रत्येकाची चौकशी केली.

हसत दारापर्यंत पोहोचवायला आले. आम्ही सारे मनातून आनंदून गेलो होतो. निदान मी तरी खूपच भारावून गेलो होतो. ज्या माणसाला लहानपणापासून मी लांबून पाहत आलो होतो त्या माणसाला मी आयुष्यात पहिल्यांदाच इतक्या जवळून पाहत होतो. मी त्यांच्याशी बोललो. अगदी जवळून. मला किती आनंद झाला होता, हे शब्दात सांगता येत नाही. ही खरी त्यांची-माझी पहिली भेट. पुढे सातारच्या वर्तमानपत्रामध्ये बातमी आली. कासचा फुटलेला पाट तात्काळ दुरुस्त झाला. शहराला नियमित पाणीपुरवठा सुरू झाला. रेशनिंग, रॉकेलच्या काही व्यापाऱ्यांवर कारवाई झाली. पण स्थिती फारशी सुधारली नाही.

ते सर्किट हाउसवरून निघाले, ते थेट एका कार्यकर्त्याच्या घरी. कोणालाही न सांगता. ही त्यांची पद्धत होती. कार्यक्रमाला जाण्याअगोदर ते गावात कुणाच्या घरी वाईट प्रसंग घडला आहे, कोण आजारी आहे, कोणाला भेटले पाहिजे याची योजना मनाशी करून येत असावेत. बबनराव उथळे त्यांचे अत्यंत निष्ठावंत कार्यकर्ते. शिवाजी उदय मंडळाचे संस्थापक, अत्यंत सरळ चारित्र्याचा माणूस. ते आजारी होते. साहेब तडक त्यांच्या घरी. बबनराव उथळयांना कल्पनाही नव्हती. तोच त्यांच्या दारात साहेबांच्या गाड्यांचा ताफा दाखल. बबनराव उथळ्यांची भलतीच तारांबळ उडाली. त्यांनी स्वागत करायच्या आत साहेबांनी त्यांना मिठी मारली. 'काय म्हणते डिस्क? चालणे सुरू आहे की नाही?' बबनराव अवाक्‌च झाले. साहेब चौकशीला आले, त्यांना काय काय झाले, सारे माहीत! बबनराव अगदी आतून हलून गेले होते. खुशाली विचारून साहेब पंधरावीस मिनिटांत बाहेर पडले. बबनराव मात्र साहेबांना अंत:करणात कायमचे ठेवून बसले. आजही ते यशवंतरावांना कधी विसरले नाहीत. फार निष्ठावंत. दिवस कसेही आले, नि गेले. साहेबही गेले. पण त्यांच्यावरच्या निष्ठा बबनरावांसोबतच जातील. कार्यकर्ते जोडण्याची साहेबांची रीतच काही और होती.

ती. सौ. वहिनींना, बाबांना सप्रेम जयभीम.

तुझा,
लक्ष्मणकाका

दिनांक ६/९/२०१२

चि. सुप्रिया,

सप्रेम जयभीम.

दिवस आता खूपच बदलले होते. माझ्या विचार करण्याच्या पद्धतीतही मोठा बदल झाला होता. पूर्वी मी साताऱ्यातून कोल्हापूरला गेलो होतो, आता मी कोल्हापूरच्या तालमीत तयार होऊन सातारला आलो होतो. पुलाखालून बरेच पाणी गेले होते. जात नावाची गोष्ट मला गवसली होती. पूर्वी पाठ्यपुस्तकांशिवाय मला काहीच माहिती नव्हते. समाजवादी युवक दलात सामील झालो आणि वैचारिक प्रगल्भता वाढली. विचार तपासायचा असतो, त्यासाठी व्यासंग करावा लागतो हे समजले होते. पुस्तके घेण्याची ऐपत नव्हती. पण नगर वाचनालयात वर्गणीदार होता येत होते. प्रमोद कोपर्डे, किशोर बेडकिहाळ आणि मी तासन्‌तास ग्रंथालयात असायचो. संध्याकाळी नगरवाचनालयाच्या कट्ट्यावर आमचा अड्डा जमायचा. त्यावेळी 'मागोवा'चा एक ग्रुप फार काम करायचा. आदिवासींमध्ये, दलितांमध्ये काम करण्याची क्रेझ होती. दाढी वाढवायची, केस वाढवायचे, बिन इस्त्रीचा खादीचा पायजमा, लांबलचक नेहरूशर्ट, मनगटाजवळ घडी घालून मुडपलेला, डोळ्याला चष्मा, बगलेत शबनम बॅग, तोंडात सिगारेट आणि अर्धा कप चहा हे क्रांतिकारकाचं आधुनिक रूप. तोंडात मार्क्स, ट्रॉट्स्की, माओ, यांचे संदर्भ आणि नावे. कोटेशन्स, 'दास कॅपिटल', वर्ग, कष्टकरी वर्गाची अधिसत्ता, पीपल्स डेमॉक्रसी, भांडवली लोकशाही, अशा अत्यंत अवघड शब्दांत कोणी बोलू लागला की आमच्यावर दांडगे दडपण येत असे. फिडेल कॅस्ट्रो, चे गव्हेरा, माओ हे आमचे आदर्श होते. तेव्हा फुले, शाहू, आंबेडकर ही काही आताच्यासारखे चलनी नावे नव्हती. फिडेल कॅस्ट्रो आणि चे गव्हेरा यांनी केलेली क्युबातली क्रांती आपणच केली असल्यासारखी मोठी नशा त्या काळात आम्ही अनुभवली होती. सारी प्रस्थापित व्यवस्था उलथून टाकीत आहोत, आपणच चे गव्हेराच्या भावनांचे पारायण करीत आहोत, ड्रॅगन जागा झाला आहे, तो आपणच आहोत अशी स्वप्ने तरुण मनाला पडत असत.

जावळी तालुक्यातल्या, महाबळेश्वर तालुक्यातल्या जंगलाकडे पाहिले की वाटायचे, हीच जंगले उद्याच्या क्रांतीला साथ देणार आहेत. सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यांत वेड्यासारखे आम्ही हिंडत असायचो. कुठेतरी मनाने या जागतिक क्रांतीशी स्वत:ला जोडून घ्यायचो. भूक लागली तरी दाबून धरायची, डी क्लास व्हायचे, भणंग राहायचे, असे राहिल्याने क्रांती होते, असे आमचे समज होते. ही झापडे उतरायची ती एखादी घटना जेव्हा कानफटांत खाडकन् मारायची तेव्हा. हे वर्गबिर्ग काही खरे नाही. आपण पहिल्यांदा महार, मांग, चांभार, ढोर, कैकाडी, माकडवाले आहोत. अस्पृश्य, आदिवासी, भटके-विमुक्त आहोत 'वर्ग' नाही घरी चूल पेटायची बोंबाबोंब आणि स्वप्न पडायची क्रांतीची. 'युटोपियन सोशालिस्ट' ही शिवी वाटायची. जमिनीवर पाय यायचे ते एखाद्या सामाजिक धक्क्याने. असे धक्केही रोजच बसत. पण पुस्तकात झालेल्या क्रांत्या आणि आपले वास्तव काही जुळायचे नाही. समाजवादी युवक दलातले आम्ही तरुण पेटून उठायचो. काहीजण नोकऱ्या करत. ते जास्त वाचन करत. आम्ही तुलनेने कमी वाचायचो. पण चळवळ गतिमान करण्यासाठी खेड्यापाड्यातून माणसे पेटवीत उठायचो. आमच्या ग्रुपमध्ये पार्थ पोळके नावाचा एक उमदा तरुण सामील झाला. गोरापान, उंचापुरा, पैलवानकी केलेली, कोल्हापूरच्या स्पर्धांमध्ये नावाजलेला. दलित असल्याने त्याचे माझे पटकन जमले. तो शिक्षकाची नोकरी करायचा, पण तळमळ, पोटतिडीक फार वरच्या दर्जाची. मी नुकताच सरकारी नोकरीत शिरकाव केलेला. त्यामुळे माझा मार्क्स थोडा पातळ झालेला. चूल पेटवायची तर क्रांतीला लगाम घालावाच लागला. परंतु काम काही बंद केले नव्हते. कधी दाभोळकरांच्या स्कूटरवर तर कधी पार्थच्या मोटरसायकलवर ऑफिस सुटले, की खेड्यापाड्यातल्या दलित वस्त्या धुंडाळायच्या. उत्साहाला पारावार नव्हता. खेडी म्हणजे नरक, जातीचे उकिरडे. आमची माणसे नागवली जात होती. पार्थ पोळके आणि मी समाजवादी युवक दलाच्या बिनीच्या तोफा. बाकीचे मित्र मध्यमवर्गीय, शहरातले. आम्ही पक्के खेड्यातले, त्यांच्या भाषेत बोलणारे. त्यामुळे आपोआपच कामाचे वाटप, श्रमविभागणीनुसार. आम्ही 'राबणारे'!

एके दिवशी पार्थ फारच बैचेन होता. तो दारात आला तोच धुमसत. पायरीवरच बसला. शशीने घरात बोलावले. मी जेवत होतो. जेवण उरकून निघालो, त्याच्या गाडीवर बसलो. तो फार वैतागला होता. 'पेपर बघितला नाहीस का?' मी म्हटले 'अजून नाही. का? काय विशेष?' 'कोरेगाव तालुक्यात टकले बोरगाव नावाचे गाव आहे. रातच्याला तिथे होतो. प्रकरण मोठे भयानक आहे.' तोवर आम्ही माझ्या ऑफिसच्या दारात आलो. तो म्हणाला 'दोन मिनिटात ये.' मी

सही करून लगेच बाहेर आलो. गाडीवरून शेजारच्या हॉटेलमध्ये गेलो. तो पैलवान. त्याला चहाचे वावडे. माझे तसे नव्हते. मी पक्का चहाबाज. मी चहा सांगितला. तो सांगू लागला. 'टकल्या बोरगावात अण्णा भिशाचं घर आहे. त्याची बायको मंगल भिसे. मजुरी करतात. दोन बारकी मुकी पोरं आहेत. मंगल भिसे तरुण आहे. ती एका पोराला घेऊन गावच्या खाली ओढ्याला जळाण येचायला गेली होती. ती जळण येचत होती. पोरगं संगतीला होतं. बरीच लाकडं एकत्र बांधली. तवर कोण हायरं तिकडं म्हणत घाडगे नावाचा शेतकरी हाक मारू लागला. मंगल त्याला दिसली. दिवस उन्हाळ्याचे होते. दुपारी एक-दोन वाजायची वेळ. घाडगे म्हणाला, "जरा माझी पाठ खाजवून दे". तो आंब्याच्या झाडाखाली बसला होता. तो बापासारखा. ती सरळपणाने पाठ चोळायला गेली. त्यानं दंडकी काढली. मंगल पाठ चोळू लागली. मळाचं लॉट निघत होतं. पण घाडग्याच्या इचारातला मळ मंगलला दिसत नव्हता. त्यानं तिला मुरगाळली. कोंबडीसारखी. बोंबलायलाबी वेळ दिला नाही. पोरगं बोंबलत व्हतं. पण मुकं ते मुकं. ते काय करणार? घाडग्यानं डाव साधलाता. मंगलनं स्वत:ला सोडवून घेतलं. पळत बोंबलत निघाली घराकडं. घाडगे सांगीत व्होता, बोललीस तर वंशाला दिवा ठेवणार न्हाय. त्वांड बंद ठिव. तसंच झालं. ती गप घरी आली. रातच्याला अण्णाला सांगितलं तसा स्फोट झाला. अण्णानं मांगूड्यात साऱ्यांना सांगितलं. अख्खा मांगवाडा पेटून उठला. दोन दिवसात मला कुणकुण लागली. मी जाणार होतो. पण, रातच्याला अण्णा भिसेचं प्रेत रेल्वे रुळावर पडलंत. पेपरात आलंय छापून ते वाचून सुन्न झालोय. संध्याकाळी सुटलं, की गाठू बोरगाव.

दिवसभर डोस्क्यात नुसता जाळ झालाता. कामात लक्ष नव्हतं. केव्हा एकदा पाच वाजतात, असं झालतं.'

सुप्रिया तुला सांगतो, 'जावे त्याच्या वंशा तेव्हा कळे' असे म्हणतात ते खोटं नाही. या देशातला भोगवटा जन्माधिष्ठित आहे. जिवाची तगमग होत होती. पाच वाजता पार्थ आला. आम्ही बोरगाव गाठले. मांगवाड्यात स्मशानशांतता. एक भयानक सन्नाटा. माणसांची जेवणेखावणे चालली होती. मोटारसायकलचा आवाज ऐकून सारी भराभरा जमली. अण्णा भिसेच्या दारात पोराटोरांनी गर्दी केली. नातेवाईक जमले. झाला प्रसंग मोठा गंभीर होता. मंगल पोरांना पोटाशी घेऊन, पाय पोटाला धरून बसलेली. डोळ्यांना धारा लागलेल्या. पार्थला बघून हंबरडा फोडला, तसं अंगावर काटा उभा राहिला. आम्ही सांत्वन केले. पार्थने साऱ्या दलितांना एकत्र येण्याचे आवाहन केले, 'मातंग-बौद्ध सारे एकवटून कामाला लागू. सातारला मोर्चा काढू. भिश्यांनला न्याय मिळालाच पाहिजे.' मोर्चाची तारीख

ठरली. आम्ही रात्री साडेअकरा-बारा वाजता सातारला पोहोचलो. पोरांचे चेहरे आठवले की, जीव तुटायचा. समाजवादी युवक दलातले आम्ही सारे कामाला लागलो. माध्यमांनी मोठी साथ दिली. रोज दोनतीन गावे, असा सपाटा सुरू झाला. सारा भाग ढवळून काढला. 'मंगल भिसेला न्याय मिळालाच पाहिजे, आरोपीला अटक करा' या मागणीसाठी प्रचंड मोर्चा निघाला. मी, पार्थाने एकापेक्षा एक सरस मोर्चे काढले असतील, पण हा मोर्चा इतका प्रचंड होता की, त्याचे रेकॉर्ड आजही कोणी मोडू शकलेले नाही. साताऱ्यातला सर्वांत मोठा मोर्चा बाया, पोरं, पोरी, म्हाताऱ्या-कोताऱ्या, तरणी पोरं-माणसांनी सारा रस्ता फुलून गेला होता. प्रचंड मोठा मोर्चा, जिल्हाधिकारी कचेरीवर सभा सुरू झाली तरी शेवटचे टोक राजवाड्यावरच होते. वर्तमानपत्रांनी मोठी दखल घेतली. अधिकाऱ्यांनी आरोपीला पकडण्याचा कसोशीने प्रयत्न करू, असे आश्वासन दिले. पण, प्रत्यक्ष काहीच होईना. पार्थ फारच अस्वस्थ होता. काय करावं? आम्ही आरोपीला ओळखत होतो. तो कुठे आहे ते आम्हाला रोज समजत होते. पण पोलिसांना सांगूनही ते पोहोचण्यापूर्वी आरोपीला खबर मिळायची नि तो फरार व्हायचा.

याच दरम्यान यशवंतरावजी चव्हाणसाहेब सातारच्या सर्किट हाउसवर आहेत हे आम्हाला समजले. त्यावेळी ते परराष्ट्रमंत्री होते. आम्ही पंधरावीस जण तात्काळ सर्किट हाउसकडे पळालो. दाभोळकरांना निरोप पाठवले. नरूभाऊ तिथे आले. शासकीय विश्रामगृहाच्या पटांगणात पाय ठेवायला जागा नव्हती. सगळीकडे काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते. दाभोळकरांना ओळखत असल्याने पुढाऱ्यांनी त्यांना वाट काढून दिली. आम्ही त्यांच्या मागे गर्दीतून वाट काढत दारापर्यंत गेलो. दार लावलेले. बाहेर कार्यकर्त्यांची रेटारेटी सुरू. पोलिस मोठ्या कष्टाने गर्दीला शांत करीत होते. आतल्या हॉलमध्ये जिल्ह्यातले आमदार, खासदार मंत्री असे खासे लोक. नरूभाऊंनी एका कागदावर नाव लिहून आत पाठवले आणि पाचच मिनिटांत सारे चित्र बदलले. हॉलमधले सारे पुढारी बाहेर येऊ लागले. आम्ही हॉलमध्ये गेलो तर साहेब एकटेच खुर्चीत बसलेले. हसून आम्हा सर्वांना बसायला सांगितले. आम्हाला ते ओळखत होते. त्यांनी नावानिशी उल्लेख सुरू केले. आपल्यासारख्या सामान्य कार्यकर्त्यांची नावे साहेबांच्या लक्षात आहेत. त्यांनी नावाने आपल्याला बोलावून जवळच्या खुर्चीत बसवले, त्यानेच केवढा आनंद झाला होता. तो काही सांगता येणार नाही. एका बाजूला पार्थ, एका बाजूला मी. समोरच्या कोचावर किशोर बेडकिहाळ, डॉ. दाभोळकर, बाळासाहेब थोरात, चंद्रकांत शेडगे, विजय मांडके असे पंधरा वीस जण बसलेले. 'बोला पार्थ, काय काढलंत?' पार्थने सारा वृत्तांत सांगितला. साहेब फार गंभीर झाले. एकच मुका मुलगा साक्षीला होता. बाप मारून टाकलेला

रेल्वे रुळावर. मातंग समाजातली ही भगिनी. 'मी मोर्चाचा सारा वृत्तांत वाचला आहे. माझ्या मतदारसंघातल्या उपेक्षित मुलीवर अशी वेळ येत असली तर मी कदापि सहन करणार नाही. आरोपीला तात्काळ अटक झालीच पाहिजे.' पार्थ म्हणाला, 'पण, काहीतरी मार्ग काढला पाहिजे. मार्ग काढल्याशिवाय आम्ही आपल्याला उठूच देणार नाही.' 'तेच म्हणतो मी. आपण उठायचेच नाही.' दाभोळकर म्हणाले, 'साहेब माफ करा, आपल्याला न सांगता घेराव करावा लागतोय.' 'दाभोळकर, अहो प्रसंगच असा आहे, उपचार कसले बघायचे? तुमचा घेराव आता उठणार नाही, पण घेराव म्हणजे घेराव. लघुशंकेलासुद्धा कुणी उठायचे नाही.' साहेबांनी बेलचे बटण दाबले. तात्काळ माणूस आत आला. 'जिल्हाधिकारी, एस.पी.ना बोलवा.' दोन्ही अधिकारी नम्रपणे साहेबांपुढे उभे. डॉ. दाभोळकरांनी प्रसंग सांगितला. एस.पी. म्हणाले, 'साहेब, प्रयत्न सुरू आहेत. तात्काळ अटक होईल.' 'अहो तात्काळ कसले? या कार्यकर्त्यांनी मला घेराव केला आहे. आणि माझ्या मतदार संघात एका उपेक्षित भगिनीवर अत्याचार होतो आणि आरोपी सापडत नाही?' तोवर पार्थने आरोपी कुठे लपला आहे हे एका कागदावर लिहून कागद माझ्याकडे दिला. मी तो साहेबांकडे दिला. त्यांनी वाचला. मला हळूच म्हणाले, 'नक्की आहे ना?' मी मानेनेच होकार दिला. आता साहेबांचे रूपच बदलले. ते अधिकाऱ्यांना संतापूनच बोलले. 'कार्यकर्त्यांना ठावठिकाणा माहीत असतो नि पोलिसांना, प्रशासनाला नसतो? हे काय चाललं आहे? आरोपीची प्रॉपर्टी जप्त करा, जोपर्यंत आरोपी सापडत नाही तोपर्यंत मी इथून उठणार नाही. हा कागद घ्या.' एस.पी. फारच खजील झाले. त्यांनी कागद घेतला नि 'सर, सर' म्हणत बाहेर गेले.

साहेबांनी जिल्हाधिकाऱ्यांना सूचना दिल्या. तेवढ्यात एक जिल्ह्यातले मोठे पुढारी हॉलमध्ये आले. आम्ही 'घेराव' केलाय. हे एव्हाना बाहेर गेले होते. काँग्रेसचे पुढारी संतप्त झाले होते. कार्यकर्तेही पेटले होते. आत आलेले पुढारी दाभोळकरांना म्हणाले, 'काय डॉक्टर, साहेबांना घेराव केला आहे?' दाभोळकर बोलण्याऐवजी साहेबच म्हणाले, 'हो घेराव केलाय. मी त्यांचा घेराव कबूल केलाय. आता आरोपी सापडेपर्यंत मी इथंच बसून राहणार. तुम्ही निघा.' 'साहेब, मूठभर माणसं...' साहेब शांतपणे म्हणाले, 'माणसं किती हा प्रश्न महत्त्वाचा नाही. सामाजिक न्यायाचे प्रश्न संख्येने सोडवायचे नसतात. इथं तर अन्यायच अन्याय आहे.' पुढारी खाली मान घालून बाहेर गेले. पंधरा वीस मिनिटात एस.पी. आत आले. 'साहेब, आरोपीला ताब्यात घेण्यात आलं आहे. आपण घेराव उठवावा अशी विनंती आहे. जिल्हाधिकाऱ्यांकडे साहेबांनी पाहिले. ते म्हणाले, 'सर, आरोपीला आताच ताब्यात

घेतले आहे.' साहेब हसले. 'चला दाभोळकर, उठवायचा का घेराव?' आम्ही सारे उभे राहिलो. घेराव उठवला. साहेबांचे आभार मानायला पार्थ प्रयत्न करू लागला. साहेबांनी त्याच्या खांद्यावर हात ठेवला. 'अरे, आभार मानायचे, तर पोलिसांचे माना. माझे कशाला?' आमचे लोक बाहेर निघाले. साहेब म्हणाले, 'लक्ष्मण, भेटत जा.' मी 'होय साहेब' म्हणून बाहेर गेलो. मनात असते तर साहेबांनी पाच मिनिटांत आम्हाला बाहेर काढले असते. कार्यकर्त्यांची मोठी फौज होती. आमदार, खासदार, मंत्री होते. त्यांना काय अशक्य होते? पण ज्या पद्धतीने त्यांनी विषय हाताळला ती पद्धती एका कुटुंबवत्सल पित्याची होती. दीनदुबळ्यांना न्याय द्यायचा, तर माया लागते. मायाच नसेल तर लोकशाही असली काय, नसली काय. गरिबांना सारे सारखेच. छत्रपती शाहू महाराज राजेच होते. अपार करुणेनं भरलेलं त्यांचं हृदय लोकशाहीपेक्षा मोठं होतं. यशवंतराव त्यांचे वारसदार होते. वारसा चालवायला पोटच्या पुत्राची गरज असत नाही, हेच खरे.

ती. सौ. वहिनींना, बाबांना सप्रेम जयभीम.

तुझा,
लक्ष्मणकाका

दिनांक ७/९/२०१२

चि. सुप्रिया,

सप्रेम जयभीम.

मागील पत्रात मी तुला टकले बोरगावच्या अत्याचारासंबंधी लिहिले होते, तो मे महिना असावा. २६ जून १९७५ रोजी आणीबाणी जाहीर झाली. देशात अभूतपूर्व परिस्थिती निर्माण झाली. वृत्तपत्रांनी अग्रलेखाच्या जागा कोऱ्या सोडल्या होत्या. सेंसॉरशिप लागली होती. देशभरातील राजकीय पुढाऱ्यांना अटका झाल्या होत्या. काहीही समजण्यास वाव नसल्याने अफवांचा पूर वाहत होता. आम्हीही इंदिरा गांधी, काँग्रेस यांच्याविरोधी होतो. आणीबाणीला आमचाही विरोध होता. शक्यतोवर जाहीर भूमिका न घेता भूमिगतांना मदत करण्यापर्यंत तो होतो. जिल्ह्यातल्या काँग्रेस पक्षाशी आमचे चांगले संबंध होते. विशेषत: आबासाहेब वीर, चव्हाणसाहेब, यांच्याशी आमच्या संघटनेचे आणि डॉ. दाभोळकरांचे सलोख्याचे संबंध असल्यामुळे आम्हापैकी कुणालाही अटक झाली नाही. बाकी जिल्ह्यातले आमचे साथी कुणी येरवड्यात कुणी नाशिकला जेलमध्ये होते. काही भूमिगत होते. साधना साप्ताहिक आणीबाणीविरोधी लिखाण करतच होते. कालांतराने त्याच्यावरही बंदी आली. मग मधू वाणी आणि इतर मित्रांनी एक अनियतकालिक काढले. साधनेचे अंक आमच्याकडे असत. ते जवळ बाळगणे तसे धोक्याचे होते. पण हे अंक आम्ही आबासाहेब वीरांना देत होतो. 'समाजप्रबोधन पत्रिका', 'नवभारत', 'साधना' यांसारखे अंक आबा वाचत असत.

आम्ही जिल्हा मध्यवर्ती बँकेत गेलो की, आम्हाला फार सन्मानाने वागवत असत. आमची कामे आम्ही विश्वासाने करीत असू. इंदिराजींनी २१ कलमी कार्यक्रम जाहीर केला होता. त्यात अनेक चांगल्या गोष्टी होत्या. सावकारीपाशातून मुक्त होण्याचे एक कलम होते. सामाजिक चळवळींचा भाग म्हणून त्याही स्थितीमध्ये आम्ही ग्रामीण भागात काम करीत होतो. त्याने आबासाहेब वीरांशी आमचे चांगले संबंध झाले होते. आम्हाला लागेल ती मदत ते करत असत. आमचे पुढारी दिवसभर काँग्रेसविरोधी बोलत असले तरी रात्री काँग्रेस पुढाऱ्यांशी

गप्पा मारीत बसलेले असायचे. आम्ही तरुण पोरे मात्र डोक्यात राख घालून क्रांतिकार्य करत असायचो. असा आणीबाणीचा काळ गेला, आणीबाणी उठली. इंदिराजींनी राजबंद्यांना मुक्त केले आणि निवडणुका जाहीर झाल्या. ७७ साली काँग्रेसला जबरदस्त धक्का बसला. काँग्रेसची पीछेहाट झाली. स्वत: इंदिरा गांधी पडल्या. जनता पक्षाचे सरकार आले. यशवंतरावजी विरोधी पक्षाचे नेते झाले. पुन्हा काँग्रेस फुटली. इंदिरा काँग्रेस, रेड्डी काँग्रेस दोन शकले झाली. चव्हाणसाहेब रेड्डी काँग्रेसमध्ये राहिले आणि ७८ साली, महाराष्ट्रात विधानसभेच्या २८८ जागांसाठी निवडणूक झाली. जनता पक्षाची दिशा विनाशाकडे जात होती. पण आम्ही कुणीही जनता पक्षात गेलो नाही. आमचे अनेक साथी आग्रह करीत होते. पण सातारच्या आम्ही मित्रांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाबरोबर जाणे शक्य नाही, असे सांगून जनता पक्षाला लांबूनच सलाम केला. आमची सहानुभूती मात्र जनता पक्षाला होती. निवडणुकांचे राजकारण करायचे नाही, त्यापेक्षा परिवर्तनाच्या चळवळी गतिशील करायच्या, या भावनेने 'एक गाव एक पाणवठा'सारख्या चळवळीत आम्ही होतो.

एके दिवशी आम्ही धामणेरहून साताऱ्याकडे येत होतो. डॉ. दाभोळकरांची स्कूटर ते चालवीत. मी मागे बसलेला असे. गावागावांत आम्ही 'दलित हक्क समिती' नावाने संघटना चालवत होतो. राजकारणात नसलो, तरी सगळ्यात होतो आणि कशातच नव्हतो! नरूभाऊ म्हणाले, 'अभयसिंह महाराजांना जनता पक्षाचे तिकीट द्यायचे आहे. तसा अण्णाचा निरोप आहे असे समजले. चल, आपण त्यांना भेटू.' वाटेतच सातारा-कोरेगाव रस्त्यालगत विसावा विहीर आहे. ती महाराजांची आहे. तिथे अभयसिंह महाराजांचा ऊसाचा मळा होता. विहिरीवर इंजिन होते. ते इंजिन दुरुस्त करत अभयसिंह महाराज बसले होते. रुंद पायांचा पायघोळ पायजमा, अंगात बाह्यांचा ओपन शर्ट. त्यावेळी ती फॅशन होती. भव्य कपाळ, अत्यंत शांत, प्रसन्न चेहरा, ओठातल्या ओठात बोलणे, इंजिनाच्या तेलाने हात काळेभोर झालेले. काही तेलाचे डाग पायजमा-शर्टावर. दोन्ही चवड्यांवर बसलेले महाराज आमच्याकडे, म्हणजे रस्त्याकडे पाठ करून बसले होते. आम्ही जवळ गेलो तरी ते त्यांच्याच तंद्रीत होते. आम्ही अगदी जवळ गेल्यावर एकदम दचकले. सावरत म्हणाले, 'काय डॉक्टर, काय काढलेत?' अत्यंत सभ्य, पापभीरू, सरळ, मितभाषी, मृदू नरूभाऊंनी त्यांना निरोप सांगितला. एखादी पाल अंगावरून झटकावी तसे त्यांनी नरूभाऊंचे शब्द झटकले. 'डॉक्टर, अहो असलं काही मी कधी मनातही आणलं नाही. आमचेच प्रश्न आम्हाला निस्तरता निस्तरता नको झाले. हे झंझाट कशाला? ते राजकारण-बिजकारण आमचे दादा महाराज बघत

होते. आम्ही बाकीचे लोक आपापले उद्योग करीत असतो. तिकडे अदालत वाड्यावर आईसाहेब महाराज आहेत. त्यांना भेटा. त्या सांगतील तुम्हाला.' डॉक्टर म्हणाले, 'महाराज, अत्यंत नामी संधी आहे. देशातलं वातावरण चांगलं आहे. आपण नुसते उभे राहिलात तरी जिंकून याल.'

'दाभोळकर, अहो मला चार माणसांत बोलता येत नाही. तिथं मी काय करणार. माझा तो पिंडच नाही. आपण भलं आपलं काम भलं. मी असल्या भानगडीत नाही. आपल्याच्यानं ते होणारच नाही.' महाराज म्हणाले.

'महाराजसाहेब, खूप मोठी संधी आलीय.' मी म्हणालो.

'ते खरंही असेल हो. पण मला शक्य नाही. '

महाराज काही तयार झाले नाहीत. ते आपला हेका सोडेनात. आम्ही गेल्या पावली माघारी आलो. पुढे खूप उलथापालथी झाल्या. अभयसिंहराजे यांना जनता पक्षाने सातारा विधानसभेचे तिकीट दिले. प्रचार सुरू झाला. महाराज स्टेजवरून दोनतीन वाक्ये कशीतरी बोलत. 'मला मते द्या' म्हणत. अत्यंत लाजरेबुजरे सभ्य गृहस्थ. बाकी भाषणे करायला महाबळेश्वरकर, दाभोळकर, आमच्या संघटनेचे आम्ही सर्वजण. तात्या मांडवेकर, बळीभाऊ कदम असा संच होत गेला. प्रचार सुरू झाला. मध्यंतरी एकदा चव्हाणसाहेब जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले होते. मी आवर्जून भेटायला गेलो होतो. ते त्यांच्या सूटमध्ये बसले होते. बाकी एकदोघे होते. ते गुपचूप बाहेर गेले. मी त्यावेळी पत्रकारिता करीत होतो. साहेबांनी वातावरण विचारले. मी त्यांना सांगितले. काँग्रेसने घोरपडे गुरुजींना उमेदवारी दिली होती. त्याचा प्रचार चांगला होता. पण राजांचे पारडे जड होते. साहेब मला म्हणाले, 'लक्ष्मण, मी अनेकांना सांगितलंय, पण कुणी ऐकत नाही. आम्ही तात्या मांडवेकरांनासुद्धा सांगितलं. तुम्हाला घोरपडे नको असतील तर त्यांना पाडा पण विषाची परीक्षा पाहू नका. आपल्या पाच-दहा पिढ्यांचं नुकसान होईल. मी मोठ्या मेहनतीनं सत्ता विकेंद्रीकरणाचा निर्णय केला आहे. सत्ता खाली झिरपत गेली पाहिजे. ती गोरगरिबांपर्यंत, शेवटच्या माणसापर्यंत गेली पाहिजे. तुम्ही जे करता आहात तो सत्ता उर्ध्वगामी करीत आहात. ती एकदा आपल्या हातून गेली ना, तर पाच-दहा पिढ्या हातातून निघून जाईल. आम्ही फार पोळलो होतो. आता दिवसच फिरताहेत.'

साहेब काय म्हणत होते हे माझ्या अकलेने तेव्हा समजत नव्हते कारण काँग्रेसचा तत्कालीन स्थितीत राग आला होता. त्याची प्रतिक्रिया उमटत होती. आम्हाला आणीबाणी नको होती, काँग्रेस नको होती. पण आपल्या हातातून सत्ता जाते आहे, याचे भान त्यावेळी नव्हते, आणि आता ते म्हणाले, तशी पाच-दहा

पिढ्या परत खाली सत्ता अधोगामी होईल, असेही होणार नाही. साहेबांनी किती जाणीवपूर्वक राजकारणाचा विचार केला होता. लोकशाहीत कुणी राजा नाही, कुणी रंक नाही, कुणी अमीर नाही, कुणी गरीब नाही. लोकशाहीत लोक महत्त्वाचे. शाही नाही. म्हणून ते आयुष्यभर लोकभावनेचा आदर करीत आले. 'आपण मुख्य प्रवाहात राहिलं पाहिजे' म्हणजे काय ते आता समजते. त्यावेळी डोक्यात क्रांती झाली होती! एक निर्णय चुकला, तर त्याची किती शिक्षा होते ते पाहण्यासारखे आहे. आज त्यांचे प्रत्येक कथन म्हणजे सुविचार झाला आहे. बहुजनांची सत्ता लोकांनी बहुसंख्य असूनही अल्पसंख्याकांच्या हाती दिली आहे. अल्पसंख्य असलेल्या जाती आणि बहुसंख्याक जाती ही गोष्टच त्यांना मान्य नव्हती. ते म्हणायचे, घटना जात मानत नाही. आपण ती मानतो. जेवढ्या लवकर तिचा लोप होईल, तेवढे चांगले.

वसंतराव नाईक १२ वर्षे मुख्यमंत्री का राहिले हे चव्हाणसाहेबांचे मन समजल्याशिवाय आपल्याला समजू शकत नाही, हेच खरे. अभयसिंह निवडून आले, मंत्री झाले, उत्तम वक्ते झाले. कारभार चांगला करू लागले. काँग्रेसमध्ये आले. पंचवीस वर्षे त्यांनी नेतृत्व केले. आता त्यांचा मुलगा आमदार आहे. तेही चांगले काम करीत आहेत. आता ते 'सेट' होतील. तेही पंचवीस वर्षे निवडून येतील. तोपर्यंत त्यांचा मुलगा पंचवीस वर्षांचा होईल. मग तोही आमदार होईल. मंत्री होईल. आपल्या लोकशाहीच्या नावाने चांगभले! गुलामांना गुलामीची जाणीव करून द्या, म्हणजे ते बंड करून उठतील असे डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते. पण ते म्हणाले म्हणून काय झाले? त्यांचे सारे ऐकलेच पाहिजे असे थोडेच आहे. आपली लोकशाही वंशपरंपरागत चालेल. त्याने काय बिघडते? लोकशाहीच आहे. काही लोकांनी, काही लोकांसाठी, काही लोकांकरवी चालवलेली!!

ती. सौ. वहिनींना, बाबांना सप्रेम जयभीम.

तुझा,
लक्ष्मणकाका

दिनांक ८/९/२०१२

चि. सुप्रिया,

सप्रेम जयभीम.

१९८० च्या लोकसभा निवडणुका लागल्या. देशात मोठी विचित्र परिस्थिती होती. ७८ साली सत्तेत आलेला जनता पक्ष म्हणजे आम्हा सर्वांच्या प्रेमाचा विषय होता. खूप अपेक्षा होत्या. लोकशाही समाजवादाची वाटचाल वेगाने होईल अशी अपेक्षा होती. पण आवळ्या-भोपळ्यांची मोट बांधलेली. त्या सगळ्यांत केवळ काँग्रेसविरोध एवढाच समान धागा होता. चौघांची तोंडे चार बाजूला. आर.एस.एस.सारखी प्रतिगामी संघटना-तिच्यात वाढलेले वाजपेयी आणि अडवाणी, समाजवादाचे कट्टर समर्थक जॉर्ज फर्नांडिस, मधु लिमये, संघटना काँगेसचे मोरारजी देसाई. चरणसिंग, राजनारायण यांची टीम. त्यांचे सूप अवघ्या दोन वर्षात वाजले. १९७७ साली काँग्रेसचे पानिपत झाले. यशवंतराव विरोधी पक्ष नेता झाले. मुख्य म्हणजे, इंदिरा गांधींचा पराभव झाला. काँग्रेसच्या हातात दिल्लीचे सरकार राहिले नाही. स्वातंत्र्यानंतर असे पहिल्यांदाच घडले होते. अल्पमतातील काँग्रेस मुख्य विरोधी पक्ष झाला आणि साहजिकच यशवंतराव विरोधी पक्ष नेते झाले. जनता सरकार आणि इंदिरा गांधी यांच्यातले बखेडे रोज नवे नवे विषय घेऊन उभे राहत होते. जनता सरकारने इंदिरा गांधींवर अनेक खटले दाखल केले होते. इंदिराजींनी संसदेबाहेर तीव्र संघर्ष सुरू केला. यशवंतराव प्रगल्भ नेत्यासारखे विरोधी पक्ष नेता म्हणून काम करीत होते. त्यांची भाषणे गाजत होती. मिस्कील चिमटे काढीत ते सत्ताधाऱ्यांना खडे बोल सुनावत होते. त्यांनी जवाहरलाल नेहरू, लालबहादूर शास्त्री आणि इंदिरा गांधी असे तीन प्रधानमंत्री पाहिले होते. तिघांबरोबर काम केले होते. त्यांना कामाचा दीर्घ अनुभव होता.

याउलट जनता पक्षातले पुढारी आयुष्यभर पराभूत मानसिकतेत वाढले होते. त्यांची सगळी कारकीर्द विरोधी पक्षातली, चळवळींची. बिनधास्त भाषणे, बेजबाबदार, बेदरकार बोलणारे सगळे. वावदूकपणा हा अनेकांचा स्थायिभाव होता. आणीबाणीच्या काळात आणखी एक मोठी घटना महाराष्ट्रात घडली. मुख्यमंत्रीपदावर

दीर्घकाळ राहिलेले मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांना राजीनामा द्यावा लागला. त्यांच्या जागी शंकरराव आले. 'एक कडक हेडमास्तर' असेच त्यांचे चित्र. आणीबाणीनंतर इंदिरा गांधींबरोबर राहिलेल्या यशवंतराव, ब्रह्मानंद रेड्डी, स्वर्णसिंग यापैकी कोणावरच इंदिराजींचा विश्वास राहिला नव्हता. हे थकलेले नेते आता जनता सरकारबरोबर लढू शकतील, असे त्यांना वाटेना. ज्याप्रकारे त्या लढू मागत होत्या, तसली लढाई हे नेते करू शकत नव्हते. जनता सरकारने इंदिराजींवर खटला भरला होता. त्यांना अटक केली होती. त्यात सरकारची मोठी फजिती झाली. त्यातच आणखी एक गोष्ट घडली. बेलची या बिहारमधील खेडेगावात दलितांवर झालेल्या अत्याचारावेळी गृहमंत्री चरणसिंग यांनी नव्हे; तर इंदिराजींनी पाण्यातून हत्तीवरून जाऊन भेट दिली. इंदिराजींनी त्या वातावरणात कर्नाटकातील चिकमंगळूर या मतदारसंघातून लोकसभेची निवडणूक लढवली. त्यात त्या विजयी झाल्या. देशातले लोकमत पुन्हा एकदा इंदिराजींकडे वळू लागले. देशभर त्यांच्या प्रचंड मोठ्या सभा होऊ लागल्या. वातावरण वेगाने बदलू लागले. जनता पक्षाच्या कारभाराची त्यांनीच आपापसात भांडून पार वाट लावून टाकली.

याच दरम्यान इंदिराजींनी काँग्रेसच्या कार्यकारिणीचे सभासदत्व सोडले.

१ जानेवारी १९७८ रोजी काँग्रेसचे प्रतिनिधित्व करणारी राष्ट्रीय परिषद घेतली. देशापुढील आव्हानांना सामोरे जाऊन परिणामकारक उपाययोजना करण्यासाठी या परिषदेने त्यांनाच अध्यक्ष निवडले. त्यामुळे काँग्रेसमध्ये आणखी एक फूट पडली. संजीव रेड्डी अध्यक्ष असलेली एक काँग्रेस आणि इंदिराजी अध्यक्ष असलेली एक काँग्रेस. इकडे जनता पक्षात मधु लिमये, जॉर्ज फर्नांडिस यांनी दुहेरी निष्ठेचा प्रश्न लावून धरला. जनसंघाचे मंत्री आर.एस.एस.ची निष्ठा ठेवणार की जनता पक्षाशी असे मोठे वादळ सुरू झाले. अखेर जॉर्जनी राजीनामा दिला. पाठोपाठ राजनारायण, चरणसिंग यांनी बंड केले. त्याला संजीव गांधी यांनी हवा दिली. जनता सरकार अल्पमतात आल्यास काँग्रेसच्या पाठिंब्यावर तुम्ही मंत्रिमंडळ बनवा, असा सल्ला दिला. तो चरणसिंग, राजनारायण यांनी ऐकला आणि जनता पक्षाचे सरकार पडले. चरणसिंग यांनी विरोधी पक्षाचे नेते म्हणून यशवंतरावांना उपपंतप्रधान पद घेण्याची विनंती केली. ती त्यांनी मान्य केली. पण आयत्या वेळी इंदिरा काँग्रेसने पाठिंबा देण्याचे नाकारल्याने हे मंत्रिमंडळच अस्तित्वात आले नाही. त्या अवस्थेत लोकसभा बरखास्त करून निवडणूक घेणे क्रमप्राप्त झाले होते. निवडणुका होऊन इंदिरा गांधी व त्यांचा पक्ष निर्विवाद बहुमत मिळवून अधिकारावर आला. महाराष्ट्रातून यशवंतराव हे रेड्डी काँग्रेसचे एकमेव उमेदवार निवडून आले.

१९८०ची ही निवडणूक यशवंतरावांसाठी मोठी कसोटीची होती. वसंतरावदादा

पाटलांच्या पत्नी शालिनीताई पाटील या इंदिरा काँग्रेसच्या उमेदवार होत्या. चव्हाणसाहेबांविरोधात निवडून येणे तसे सोपे नव्हते. पण वातावरण तापत गेले. आतासारखी कार्यकर्त्यांची उठाठेव नव्हती. साहेबांनी कधी कुणाला पैसे दिले नाहीत, जेवणावळी घातल्या नाहीत. कुणाला वाहने पुरवली नाहीत. पोस्टर-बॅनर नाहीत. तरीही प्रचार सुरू होता. परिस्थिती नाजूक होती. साहेबांनी ज्यांना मोठे केले तीच माणसे साहेबांविरुद्ध काम करत होती. मी पत्रकार म्हणून फिरत होतो. अनेक सभांना माणसे जमत नव्हती. काही शिलेदार तोंड चुकवून बसले होते. साहेबांना अशा स्थितीला कधी तोंड द्यावे लागले नव्हते. त्यात ताईंचा प्रचार त्यांच्या शिवराळ पद्धतीने सुरू होता. त्यांचे एक विधान साहेबांना यश देऊन गेले; ताईंच्या पराभवाला कारण झाले. जनमानसातील त्यांची प्रतिमा धुळीला मिळाली. ते वाक्य सभ्य माणूस उच्चारू शकत नाही. त्यामुळे मीही तुला ते सांगू इच्छित नाही. पण फार खालच्या पातळीवर जाऊन त्या बोलल्या होत्या. त्याने माझ्याही तळपायाची आग मस्तकाला गेली होती. मी काँग्रेसवाला नव्हतो. पण यशवंतराव साताऱ्याचे भूषण होते. आम्हा सर्व सातारकरांचा अभिमान. त्यालाच ताईंनी तडा दिला होता. लोक संतापले. राजकारण, निवडणुका बाजूला गेल्या. मतदार ताईंवर बिघडला. सातारा जिल्हा मध्यवर्ती बँकेत कार्यकर्त्यांची एक सभा झाली. त्यात नेतेमंडळी खालच्या पातळीवर जाऊन बोलू लागली. ताई काय म्हणाल्या होत्या, हे तोपर्यंत सगळ्या जिल्ह्यात झाले होते. साहेबांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. एका शब्दाने झाल्या प्रकाराचा उल्लेख केला नाही. साताऱ्याच्या गांधी मैदानावर सायंकाळी जाहीर सभा होती. आता साहेब काय उत्तर देणार? हा एकच प्रश्न कार्यकर्त्यांच्या मनात घोळत होता. मतदारही आज जुगलबंदी होणार म्हणून मोठ्या संख्येने जमा झाले होते. गांधी मैदान माणसांनी फुलून गेले होते. उत्सुकता शिगेला पोहोचली होती. नेहमीपेक्षा कितीतरी मोठी सभा जमली होती. चव्हाणसाहेब निवडणुकांच्या प्रचाराची शेवटची सभा नेहमी सातारला गांधी मैदानावर घेत. तीच त्यांची मतदारसंघातली मोठी सभा असायची. बाकी सारा प्रचार पक्ष, कार्यकर्ते शिस्तबद्धपणे करत असत. पदरचे खाऊन आपापल्या गावात, आपापल्या गल्लीत आपापली घरे माणसे सांभाळत. त्याचे मतदान होईल हे पाहणे हे कार्यकर्त्यांचे काम होते. त्याला पैकापाणी लागत नसे. गरीब-श्रीमंत सारे झटून काम करत. निवडणुका महाग होत गेल्या, त्यानंतर. तर सभा सुरू झाली. स्वागत झाले, प्रास्ताविक झाले आणि चव्हाणसाहेब बोलायला उभे राहिले. तोच जोश, तोच आत्मविश्वास. मी पत्रकारांच्या कक्षात बसलो होतो. साहेबांनी सुरुवात केली. देशाची स्थिती, लोकशाहीची अवस्था हे बोलत असताना साहेब विषयावर आले. ते म्हणाले, 'मी ज्यांना भावासारखे मानत आलो, थोरल्या भावाचा मान देत आलो, त्या वसंतरावदादा

पाटलांच्या सौभाग्यवती माझ्याविरोधी आहेत. त्या ज्या पद्धतीने बोलतात, ती त्यांची संस्कृती आहे. आपली संस्कृती तसली नाही. आपल्या कुटुंबात थोरली भावजय ही आईसमान मानली जाते. आई रागावली तर पाठीत धपाटा घालते. रागाने तोंडाला येईल तशा शिव्या देते. आपण त्या शिव्या खातो, धपाटा खातो. पण चांगला मुलगा आईला उलटून शिव्या देत नाही. ते त्या मुलाला शोभणारे नाही. त्यामुळे मी चांगला माणूस आहे. मी त्यांचे त्यांना देऊन टाकतो. असली घाण आपण अंगावर घेण्याचे कारण नाही.' लोकांनी उत्स्फूर्त टाळ्यांचा पाऊस पाडला. यशवंतराव काय चीज आहे, हे पाहून सगळेजण अवाक् झाले होते. सारी सभा यशवंतरावांनी खिशात घातली होती. जे ताईंवर चिडले होते, त्या माझ्यासारख्यांनी त्यांना माफ करून टाकले, आणि मतपेटीत साफ करून टाकले.

त्यावेळी यशवंतरावांनी दाखवलेली समयसूचकता, संयम राजकीय जीवनात ज्यांना काम करावयाचे आहे, त्यांच्या अंगी खरोखरी असावी लागते. त्या एका सभेने यशवंतरावांनी निवडणूक जिंकली असे म्हटले तर वावगे होणार नाही. त्यांच्यावर प्रेम करणारे मतदार घराघरात होते. ते नावानिशी, गावानिशी, लोकांना ओळखत असत. राज्यात रेड्डी काँग्रेसचे ते एकमेव उमेदवार निवडून आले. त्यांना पाडावे म्हणून सर्व शक्ती काम करीत होत्या. आतल्या आणि बाहेरच्या, सगळ्यांनाच ते पुरून उरले. देशाचे उपपंतप्रधान झालेले यशवंतराव जिल्ह्यात बिघडलेल्या राजकीय वातावरणाला विटले होते. गटातटात वाटलेले आपले कायकर्ते बघण्याची वेळ त्यांच्यावर आली होती. एका माणसाच्या हट्टासाठी, हेकेखोरपणासाठी पक्ष मोडीत निघाला होता. चव्हाणसाहेब फार व्यथित होते. त्यांचा माझा तर परिचय होताच, पण निवडणुकांमध्ये मी सक्रिय झालो होतो, त्याचा त्यांना आनंदही होता. मात्र त्यांच्याशी जाऊन बोलणे वगैरे शक्य नव्हते. तेवढे धाडसही नव्हते. लांबून लांबूनच आमचा परिचय होता हे खरे.

माझे 'उपरा'चे लेखनही याच काळात सुरू होते. मी काही प्रथितयश लेखक नव्हतो. किंबहुना लेखन हा माझा प्रांतच नव्हता. मी आपला सतरंज्या उचलणारा कार्यकर्ता. त्यावेळी लोक मला 'दाभोळकरांची पोरं' याच गटात आलेखत होते. माझी स्वतंत्र अशी ओळख नव्हतीच. मोर्चे, मेळावे, परिषदा, घेराव, सत्याग्रह अशा गोष्टीत मला क्रांती दिसत होती. पडेल ते काम करायचे. परिवर्तनाची चळवळ गतिमान करायची, म्हणजे बिनपगारी फुल अधिकारी! चोवीस तासाची बिगारी. थँकलेस जॉब. फार फार तर, वर्तमानपत्रात एखाद दुसरी ओळ छापून यायची. फार तर नाव. पण त्यानेसुद्धा आभाळ ठेंगणे व्हायचे, ते वेगळेच. कुणीतरी शाबासकी द्यावी, खूप चांगलं करतोस म्हणावे, असे वाटायचे, पण कसले काय? आम्ही सारी गोरगरिबांसाठी

लढणारे लोक. चहासुद्धा कुणी द्यायचे नाही. आम्ही ज्याचे काम करायचो ना, तेच उघडे. त्यांच्याजवळ काय असणार? पितळीने प्यावा लागायचा बिनसाखरेचा चहा. त्यातही बिन दुधाचा. नाही म्हणायला, सरकारी कारकुनकी मिळाली होती. त्यामुळे दोन वेळचे जेवण आणि खोलीचे भाडे याची काळजी नव्हती. दाभोळकरांमुळे दवाखाना, औषधे असला खर्च नव्हता. भाई, समता या दोन्ही मुलांच्यावेळी शशीची सर्व काळजी शैला वहिनींनी घेतली. आजही मुलांना काही झाले, तर त्यांचाच जीव कासावीस होतो. त्यावेळी मी मंगळवार पेठेतल्या आमच्या लोकांच्या वस्तीत राहत होतो. जयसिंग पोळ या बौद्ध बांधवाने दोन खोल्या भाड्याने दिल्या होत्या. आत एक खोली, बाहेर एक खोली. आत किचन, बाहेर बैठक. शेजारीपाजारी आमच्याचसारखे दोन खोल्यांतले. समोर मोठी झोपडपट्टी. मावळतीला मातंगवाडा, बौद्धवाडा, पाठीमागे वडारवाडा, पूर्वेला मेहत्तर गल्ली. बाकी उरलेली सहकार खात्यातील चतुर्थश्रेणी कामगारांची घरे अशी मोठी झोपडपट्टी. रोज संध्याकाळची भिसे नावाच्या बांधवाच्या शिव्यांची लाखोली पुन्हा गावाकडल्या आठवणी ताजी करायची. सार्वजनिक शौचालय, सार्वजनिक नळ कोंडाळी, नळावरची भांडणे या सगळ्या वातावरणात 'उपरा' लिहिले गेले. खरे तर 'उपरा' मी नाइलाजानेच लिहिले. एकदा अनिल अवचटना मी माझ्या पूर्वायुष्यातल्या काही गोष्टी सांगितल्या, त्याने लिहावे म्हणून. पण झाले भलतेच. त्याने मला लिहायला भाग पाडले. मी भीत भीत थोडे लिहिले. आपण लिहिण्याचे काम कसे करणार? लिव्हणं बामनाचं, दाणं कुणब्याचं, अन् गाणं म्हाराचं. मी अनिलला खूप समजावायचा प्रयत्न केला. पण, त्याने आणि शशीने जो तगादा लावला, त्यानं लिहिता झालो. उपरा २५ डिसेंबरला मुंबईत 'ग्रंथाली'ने प्रसिद्ध केले. त्याला जो प्रतिसाद मिळाला तो अभूतपूर्व होता. मी एकाच प्रयत्नात लेखक झालो. प्रतिसादाची पत्रे, वर्तमानपत्रे, आकाशवाणी सर्वांनी मला खूप उचलून धरले. माझ्या स्वप्नातही न पाहिलेले प्रेम लोकांनी दिले. अमेरिकेतला फोर्ड फाउंडेशनचा पुरस्कार जाहीर झाला. दोन लाख ही रक्कम त्यावेळी फार मोठी होती. मी लेखक झालो.

एके दिवशी सकाळी दहा-साडेदहाच्या आसपास मी ऑफिसला जाण्याच्या घाईत असताना एक गाडी घरासमोर थांबली. त्यातून एक पायजमा-शर्ट घातलेला, उत्तम भांग पाडलेला तरुण उतरला. काळासावळा रंग, नाकाची दांडी उभी, भव्य कपाळ, तरतरीत डोळे. 'मानेसाहेब आहेत का? मी प्रल्हाद चव्हाण. कृषी उत्पन्न बाजार समितीचा सभापती.' मी स्वागत केले. त्यांना घरात बोलावले. ते म्हणाले, 'आपलं घर बघायला चव्हाणसाहेबांनी पाठवलंय. त्यांना आपल्याला भेटायला यायचंय.' मी उडालोच. प्रल्हादभाऊ, मी भेटेन ना त्यांना जाऊन, मी म्हणालो. ते म्हणाले, 'नाही. मला आपलं घर फक्त बघायला सांगितलंय. साहेब एकटेच येणार

आहेत. बँकेत तसा निरोप होता.' ते बिचारे चहा घ्यायलाही थांबले नाहीत. मी मात्र बुचकाळ्यात पडलो. ऑफिसला जावे की वाट पाहावी? एवढा मोठा माणूस कशाला येईल? आपणच त्यांना जाऊन भेटू शकतो ना? मी जेवायला बसलो होतो. मुले शाळेत गेली होती. आणि काय आश्चर्य! खुद्द यशवंतरावजी चव्हाण दारात उभे. मी घास तसाच ठेवला आणि बाहेर आलो. दोघांनी वाकून नमस्कार केला. त्यांनी गळ्यात हार घातला. सातारी पेढा भरवला आणि मिठी मारली. म्हणाले, 'लक्ष्मणराव, मराठी शारदेच्या गळ्यातला कंठमणी मराठीला दिलात.' फार फार आनंद झाला. साहेब एकटेच होते. गाडीत आणखी कुणीतरी होते. पण ते काही आत आले नाहीत. साहेब कॉटवर शांतपणे मांडी घालून लोडाला टेकले. शशीने पाणी दिले. मी तिचा परिचय करून दिला. मग 'आई कुठे असते, वडील सध्या काय करतात? पाट्या वळणं थांबलं की नाही? गावोगाव फिरणं थांबलं की नाही? अशी एकामागून एक विचारपूस. मी 'हो' किंवा 'नाही' किंवा मानेनेच उत्तर देत होतो. दोघांनाही काही सुचत नव्हते. शशीने चहा दिला. साहेबांनी चहा घेतला. 'लक्ष्मण, आता निवांत बोलू. माझ्या गावात मराठी बोलू लागली. वेणूबाईंनाही खूप आवडलं 'उपरा'. त्यात त्यांच्या भावाच्या शाळेत शिकलात तुम्ही. बाईंच्या माहेरचा माणूस. आम्हाला खूप आनंद झाला. येतो मी', असं म्हणत साहेब उठले. आम्हा दोघांचे डोळे पाण्याने भरले होते. एवढा आभाळाएवढा माणूस आम्हा गरीबाघरी झोपडपट्टीत आला. कडकडून भेटला. कैक पिढ्यांचे नाते असावे तसा. साहेबांची गाडी गेली. आम्ही मात्र दोघेही स्वप्न पाहावे तसे भारावून गेलो होतो. असे कितीतरी धक्के त्या काळात अनपेक्षितपणे बसत असत. त्यापूर्वी त्यांचा आणि माझा परिचय होता, पण स्नेह नव्हता. 'उपरा'ने आमच्यातले नातेच बदलून टाकले. साहेबांच्या अखेरच्या क्षणापर्यंत हे आमचे नाते तसेच राहिले. ते उत्तरोत्तर अधिक घट्ट होत गेले. ते इतरांशी फार बोलत नसत. ऐकत फार. पण माझा अनुभव उलट आहे. वयाचे मोठे अंतर असूनही ते माझ्याशी फार मोकळेपणाने बोलत. गावजीवन, गावकी, कुणबावा, त्यातले बाहेरून-आतून पाहिलेले गाव, अनुभव यावर त्यांचे नि माझे विलक्षण प्रेम. अंत:करणात असलेला जिव्हाळा वयाचे अंतर केव्हाच पार करून गेला होता. ते माझ्या आणि मी त्यांच्या प्रेमात पडलो होतो. त्यांचे ते प्रेम कधीही न विसरता येणारे पाथेय.

ती. सौ. वहिनींना, बाबांना सप्रेम जयभीम.

तुझा,

लक्ष्मणकाका

दिनांक १२/९/२०१२

चि. सुप्रिया,

सप्रेम जयभीम.

मावळतीला सूर्य कलला होता. त्याची तिरपी किरणे सोनेरी रंगांची थकलेली, भागलेली, उंच उंच असलेल्या सह्याद्रीच्या शिखरावर पसरलेली. तशी ती माझ्यासारख्या झोपडपट्ट्यांमध्ये रहाणाऱ्यांच्या अंगणात, घरावरही पडलेली. "सूर्य कधीच विचार करीत नाही. हा गरीब याला कशाला देऊ प्रकाश? हा मध्यमवर्गीय हा ओरबाडेल, याचेकडे कशाला जाऊ? हा श्रीमंत तो सर्वांचा मोठा भाऊ, याचेकडे दिले की देईलच की सर्वांना म्हणून काही फक्त श्रीमंतांच्या हवेल्यावर सूर्य आपली किरणे पसरत नाही. तो सर्व चराचरांवर पसरतो. झाडाच्या प्रत्येक पानाला सूर्यप्रकाश घेण्याचा तेवढाच अधिकार हक्क आहे, जेवढा अधिकार उंच उंच वाढलेल्या वृक्षाला आहे. तेवढाच अधिकार जमिनीवर सरपटणाऱ्या गवताला आणि झाडांच्या आधाराने वरवर जाणाऱ्या वेलीला आहे. प्रत्येक पान न्हाऊन निघते सूर्याच्या प्रकाशाने. अशी समता, ममता, माया तो सर्वांवर करीत असतो. कुणी कृतज्ञता व्यक्त करावी, कुणी गुणगान गावे यासाठी काही तो राबत नाही. त्याच्या अंतरीचा उमाळा त्याला गप्प बसू देत नाही. कोणी काही म्हणावे म्हणून तो काहीही करीत नाही." चव्हाणसाहेब मला सांगत होते.

सुप्रिया, मी कर्मसिद्धांतवाला नाही. नशीब, कर्म असल्या गोष्टी मी मानत नाही की कर्मविपाकाचा सिद्धांतही मी मानीत नाही. पण चव्हाणसाहेबांचा जो सहवास मिळाला, वि.स. खांडेकरांचा जो सहवास मिळाला तो माझ्या आयुष्यातला अत्यंत परमोच्च बिंदू होता असे मी मानतो. चव्हाणसाहेब इतरांशी बोलत नसत फार, ऐकत खूप असत. माझा तसा अनुभव नाही. ते खुलले की खूप मस्त बोलत असत. १९८१ साल माझ्या आयुष्यात अत्यंत क्रांतिकारक साल म्हणावे लागेल. ज्या माणसाच्या केवळ दर्शनासाठी आम्ही तासन् तास उतावीळ होऊन उभे असायचो, तो माणूस लांबून तरी दिसावा म्हणून लहान असताना बाच्या खांद्यावर बसून ज्या माणसाला मी गर्दीतनं पाहायचो अशा माणसाबरोबर मी प्रवास करतोय

ही कल्पनाच रोमँटिक नाही वाटत? गर्दीतल्या रेटारेटीतून केवळ गाड्या मोजायच्या. लालपिवळ्या दिव्यांच्या गाड्या, त्यात कुठेतरी यशवंतराव चव्हाण नावाचा माणूस बसलेला असायचा. आम्ही नुसती रस्त्याच्या कडेला उभी राहिलेली पोरे गाड्यांचा ताफा मोजायचो. ज्यांच्या पाठीमागे जास्त गाड्या ते यशवंतराव, ज्यांच्या पाठीमागे तेवढया गाड्या नाहीत तो कुणीतरी साधा मंत्री असे आमचे गणित होते. त्यातल्या एखाद्यानेच पाहिलेले असायचे यशवंतराव. बाकी सारे तो सांगेल त्याला माना हलवत असायचे. अशी स्वप्नवत स्थिती होती माझी. आपण ज्याच्यावर लहानपणी प्रेम केलेले असते तो माणूस खरेच दिसतो कसा, वागतो कसा, बोलतो कसा? याचे कोण कुतूहल लहानपणी असते. तेव्हा कुणी मला सांगितले असते की तुझ्या भाग्यकाळात यशवंतराव भेटणार आहेत. त्यांचे-तुझे अंतरीचे नाते जमणार आहे. तर मी त्याला हसलो असतो किंवा फार तर सांगणाऱ्याच्या बुद्धीची कीव केली असती. पण आज मी तो प्रत्यक्ष अनुभव घेत होतो.

त्याचे असे झाले, जिल्हा मध्यवर्ती बँकेतून बँकेचे मॅनेजर आप्पासाहेब भोसले यांचा माणूस मला निरोप द्यायला आला होता, 'दुपारी आपण बँकेत यावे, आपणास चव्हाणसाहेबांनी बोलावले आहे.' ठरल्यावेळी मी बँकेत पोहोचलो. अप्पासाहेबांचा माझा परिचय होता, तो दाभोळकरांची पोरे या सदरात. त्यांनी हसून माझे स्वागत केले. साहेबांचा निरोप होता. तुम्हाला बोलावण्याचा. ते कराडला निघालेत, तुम्हाला वेळ असला तर आपण त्यांच्याबरोबर जायचे आहे. माझी गाडी कराडला येईल. त्यातून तुम्ही परत या. तुम्हाला हवा तेवढा वेळ गाडी तुमच्याबरोबर राहील. ते येतीलच येवढ्यात. आमचा चहा झाला. आप्पासाहेब भोसले म्हणजे फार भारदस्त माणूस, अत्यंत उत्तम व्यक्तिमत्त्व. बँकेच्या त्या टोलेजंग इमारतीत कोट्यवधी रुपयांची उलाढाल करणारा हा माणूस कमालीचा मृदू, शांत, मनमिळावू, माझ्या आणि चव्हाणसाहेबांच्या मध्ये दुवा असावा तसा. माझ्या घरी तेव्हा फोन नव्हता. आतासारखा मोबाईल असता तर काय मजा आली असती. त्यावेळी घरात फोन असणे ही फार प्रतिष्ठेची गोष्ट होती. घरात गाडी म्हणजे चारचाकी गाडी असणे, फोन असणे ही श्रीमंत माणसाची खूण होती. १९८६ साली तुझ्या बाबांनी माझ्या घरी फोन बसवण्याची व्यवस्था खात्याला सांगून केली. तोपर्यंत फोन नव्हता. अप्पासाहेबांनी मला निरोप द्यायचा, मी बॅग भरायची आणि बँकेच्या गाडीने मला साहेबांपर्यंत पोहचवायचे असे आमचे अलिखित मेतकुट जमले. हा माणूस साहेबांवरील प्रेमाने हे करायचा. साहेब आता मंत्री नव्हते, सत्तेच्या कोणत्याच पदावर नव्हते, खासदार होते. मला जो त्यांचा काळ पाहता आला तो उतरतीचा. राजकीयदृष्ट्या ते मागच्या प्रवासाला निघाले होते. वैभवाचा काळ संपला होता.

गर्दी हटली होती, सरली होती. देण्यासारखे आता त्यांच्याजवळ काही उरले नव्हते. चव्हाणसाहेबांची गाडी रेस्ट हाउसला पोहचली असा बँकेत निरोप आला. मी आणि अप्पासाहेब बँकेतून उठलो नि रेस्ट हाउसला पोहोचलो.

साहेब फ्रेश होत होते. आम्ही आल्याचे त्यांना समजले. त्यांनी खोलीत बोलावले. मी, आप्पासाहेब आत गेलो. चव्हाणसाहेब फार छान हसत. ते हसणे एवढ्या जवळून मी बघत होतो. 'बसा' म्हणाले. 'काय लक्ष्मण, कसे आहात?' सुप्रिया, तुला सांगतो, 'लक्ष्मण' या शब्दाचा एवढ्या मायेने उल्लेख तर माझ्या आईनेसुद्धा केला नव्हता. तिचा मी लक्ष्या होतो. सारे गाव मला लक्ष्या म्हणत असते. बाप्या कैकाड्याचा लक्ष्या हे आपले सार्वजनिक नाम होते. पुढे ते माने झाले. नाव मागे पडले, आडनावानेच ओळखला जायचो. जन्मापासून हाड्या-हाड्या मागे लागलेली. सन्मानाने, प्रतिष्ठेने भिकाऱ्याच्या लेकराला कोण विचारणार, सांग ना? कोण त्याला सन्मानाने बोलावणार? या 'लक्ष्मण' शब्दाचा इतका चांगला उच्चार ते करीत की अंगावर काटा उभा राही. माझ्या उभ्या आयुष्यात मला माझे नाव इतके सुंदर आहे, ते इतके मायेने उच्चारता येते, त्याचा इतका चांगला उच्चार करता येतो हे पहिल्यांदाच समजले. असा अत्यंत चांगला उच्चार करणारी दुसरी व्यक्ती म्हणजे अनिल अवचटांची मुक्ता. तीही चव्हाणसाहेबांसारखी, 'लक्ष्मणकाका' म्हणते. आजही ती मला भेटली की 'कायरे लक्ष्मणकाका' म्हणते नि मला साहेबांची प्रकर्षाने आठवण होते. 'काय लक्ष्मण, आई काय म्हणते? शशी कशी आहे, मुलं मजेत ना? हे विचारल्याशिवाय पुढचे आमचे बोलणे सुरूच व्हायचे नाही. साहेब कितीही व्यस्त असोत आम्ही गाडीत बसलो की पहिल्यांदा आईची, शशीची चौकशी केल्याशिवाय पुढे बोलणेच सुरू व्हायचे नाही. त्यात प्रसंगोत्पात काही बदल होत असेल तेवढाच. पण माझ्या गरीब आईबद्दल आणि शशीबद्दल विलक्षण जिव्हाळा होता. मी खुर्चीत बसलो. माझ्या डोळ्यांना धारा लागलेल्या त्यांनी पाहिल्या. जवळ आले नि म्हणाले, 'अरे हे काय? मी काय वाईट बोललो काय?' मी म्हणालो, नाही साहेब, मला आपण 'लक्ष्मण' असे म्हणालात की उभ्या जन्मात मला असे कुणी मायेने म्हणाले नव्हते.

दिवस मावळतीला गेला होता. साहेब गाडीत मागच्या सीटवर बसले. मी पुढच्या सीटवर बसलो. आमची गाडी कराडकडे निघाली होती. आयुष्यात पहिल्यांदाच साहेबांच्या बरोबर मी प्रवास करू लागलो होतो. सूर्याची किरणे गाडीच्या काचेतून आत येत होती. फार सुंदर संध्याकाळ होती ती. 'लक्ष्मण, मावळतीला निघालेला हा सूर्य आता थकल्यासारखा झालाय. पण किरणं किती शांत आहेत नाही!' साहेब सूर्यावर बोलत होते. आयुष्यातला अत्यंत मोलाचा

क्षण होता. सत्ता, संपत्ती, प्रतिष्ठा या सर्वांच्या पलिकडेचा थकलेला एक सूर्य मीही पाहत होतो. आज सत्तेचा, लाल दिव्यांच्या गाड्यांचा ताफा नव्हता की मागे-पुढे शेकडो गाड्या नव्हत्या. हजारो माणसांची गर्दी नव्हती. सुप्रिया, त्या नितळ सायंकाळी एक अत्यंत अनुभवसमृद्ध पिता सूर्याबद्दल बोलता होता. म्हटले तर माझ्याशी आणि स्वतःशीही मावळता सुंदर सूर्य. 'सूर्य आणि त्याची सोनेरी किरणे. सह्याद्रीच्या शिखरावर पडलेली. आता मावळतीला जात असल्याने सावल्याही गडद झालेल्या. दऱ्यांमध्ये दाटून आलेल्या सावल्या आणि झाडांच्या उंच शेंड्यावर सूर्याची किरणे विसावलेली. ती पाहा लक्ष्मण, पहिल्यांदा ती त्या झाडांच्या शेंड्यावर पडली आहेत. नंतर ती झिरपत झिरपत खाली गेली आहेत. अगदी पार मुळाशी असलेल्या गवतापर्यंत, किती छान! गवतात तरी तो पंक्तीप्रपंच करतो काय? अठरापगड जातींची गवते, कित्येकांना फुलायचे असते, कित्येक कळ्यांना त्याची ऊब हवी असते. अशी ऊब तो मायेने त्या पात्यांना, पानांना, कळ्यांना देतो. त्या फुलतात. फळतात नि गोड फळे देतात. ती तरी कुठे स्वतःसाठी फळे तयार करतात? वृक्षांनी, वेलींनी तयार केलेली फळे ती थोडीच खातात. खाणारा खावून जातो, नि वर झाडाला दगडगोट्यांचा मारही खावा लागतो. दगड मारणारांनाही लक्ष्मण, ती झाडे फळेच देतात. फळांनी बहरलेले वृक्षच देतात पांथस्थाला आसरा आपल्या सावलीत विसाव्यासाठी आणि लोकही असे की विचारू नका. ज्या झाडाखाली झोपतात त्याच झाडाला दगड मारतात. फळे पाडतात, पण वृक्ष कधीच तक्रार करीत नाही. मला हे मोठे सिम्बॉलिक वाटते. लक्ष्मण, आंब्याच्याच तर झाडाला लोक दगड मारतात. बाभळीच्या झाडाला नाही. मग हा विशाद कशासाठी वाटतो आहे? कंठ असा का दाटून येतो आहे. पाखरे बसतात त्यांना हवा तेवढा वेळ झाडांवर. वेळ झाली की भुर्रकन जातातच उडून, म्हणून झाड काही तक्रार करीत नाही गेलेल्या पाखरांबद्दल. आणि ती बसतही नाहीत उंच गेलेल्या ताडामाडाच्या झाडांवर. या झाडांबद्दल लक्ष्मण, मला लहान असताना फार कुतूहल असायचे. अगदी उंचच्या उंच गेलेली ही झाडे आणि त्यांच्या शेंड्यावर पडलेली सोनेरी किरणे मान दुखेपर्यंत पाहत असे. मनातला चंडोल केव्हाच शेंड्यावर पोहचलेला असे. खरे सांगू, याच्या पायथ्याला ना सावली, ना पांथस्थ, ना गुरेढोरे. याची फळे तरी कुणी कधी खाल्लीत? नुसता उंचच्या उंच वाढलेला ताड. एकदा मनात यायचे व्हावे या ताडासारखे उंचच्या उंच, नि साऱ्यांनी मान दुखेपर्यंत पाहावे आपल्याला या उंच जागेवर. पण या उंचीचा उपयोग काय नि कुणाला? फार तर मला एकट्याला. मी क्षणात विचार फेकून दिला मनातून. नाही असे व्हायचे नाही, एकलकोंडे. ऊन-वारा-पाऊस झेलीत, फुलत-फळत वाटसरूला, गाईगुरांना

पोटाशी घेत आणि प्रत्येकाचा दगडांनी मार खात आपल्याला आंब्याच्या झाडासारखेच झाले पाहिजे. जाईल पक्ष्यांचा थवा उडून. गेला तर गेला. चार तरी राघू रहातील ना खोडाच्या बुंध्यात. त्यांच्या पिलांसाठी पोटात आसरा तयार केला पाहिजे. घालतीलच साद ती आपल्या जीर्ण झालेल्या खोडाला.'

सुप्रिया, हे स्वगत होते, प्रकट आत्मचिंतन होते की स्वतःचे सांत्वन? मला समजत नव्हते. मी संकोचून बसलो होतो. एका म्हटलं तर शोकांतिकेच्या नायकाच्या बगलेत. ज्याने मोठ्या कर्तबगारीने गाजवले होते आपले सारे जगणे. हिमालयाच्या मदतीला गेला होता हाच धावून सह्याद्री बनून. तेव्हा साऱ्या देशाने याला डोक्यावर घेतले होते. निरोपताना हा सूर्यांच्या प्रतिमांची, वृक्षांच्या प्रतिमांची जी मनाशी जुळवाजुळव करीत होताना शब्दांची, आपल्याच सांत्वनासाठी, तीच मोठी विलक्षण गुंतागंत होती. पांढऱ्याशुभ्र रूमालाने मध्येच डोळ्यांच्या कडा पुसणारा हा माणूस झाडांशी, पानांशी, फळांशी, गाईगुरांशी बोलणारा हा हाडाचा शेतकरी थकला होता. परतीच्या प्रवासाला निघाला होता. आपल्या कृष्णा-कोयनामाईच्या संगमाकडे. कऱ्हाड केव्हा आले ते समजलेच नाही. मी मुग्धता तशीच ठेवली होती. गेली वीस-पंचवीस वर्षे, कुणालाच नव्हते सांगायचे, पण नातीला तर सांगितले पाहिजेना त्यांच्या! म्हणून सांगतो आहे एवढेच.

ती. सौ. वहिनींना, बाबांना सप्रेम जयभीम.

तुझा,

लक्ष्मणकाका

दिनांक १५/९/२०१२

चि. सुप्रिया,

सप्रेम जयभीम.

चव्हाणसाहेबांचा विरंगुळा वेगळा, वेळ सायंकाळची; साडेसहा-सातची. मी दुपारपास्नं साहेबांबरोबर होतो. तुरळक कुणीतरी येत असे. एरवी शुकशुकाट असायचा. आम्ही दोघे साहित्य, संगीत, कला अशा गोष्टींवर बोलत होतो. जगप्रसिद्ध ठिकाणांबद्दल साहेब खूप गोष्टी सांगायचे. तेथले प्रसंग, मानवी स्वभावांचे विविध नमुने, अनेक विनोदी किस्से आणि गमती. माझ्याकडे सगळा अशा गमतीजमतींचा खजिना, पण अठरापगड जातींतल्या माणसांचा. साहेब जरा आनंदात असले की त्यांच्या आवडीच्या विषयावर ते बोलत असत. बोलताना अतिशय गंभीर विषयही ते फार छान समजावून सांगत. सातारा, कराड तासाचे अंतर, त्याने साहेब कराडला आले की आम्ही तासभर गाडीत बोलायचो आणि बंगल्यावर तास दोन तास. मग मी साताराला परतायचो. गाडी अर्थातच अप्पासाहेब भोसल्यांनी दिलेली असायची.

एकदा मी माझी चित्रकला त्यांना सांगत होतो. काहीकाही विषयांत ना मी फारच 'ढ' होतो. सूर्य उगवतानाचा आणि मावळतीचा, पण शक्यतो उगवतीचा सूर्य किंवा सूर्योदयाचा देखावा लहानपणी शिक्षक हमखास काढावयास सांगत. ड्रॉइंगचा कोरा कागद, रंगपेटी, पेन्सील, रबर शिक्षक देत असत. आपण चित्र काढून द्यायचे. असे चित्र मी काढले, डोंगरांना रंग दिला तो मोठा गमतीचा. लोकांचे डोंगर खालून वर रंगवलेले असतात, तर मी डोंगर वरून खाली रंगवलेले! त्याने माझे डोंगर आभाळातून कोसळत असल्यासारखे रंगलेले. गुरुजींनी साऱ्यांना माझे चित्र दाखवले आणि अख्खा वर्ग हसू लागला. क्षणभर मला काहीच कळेना की मुले का हसताहेत. मी दोन डोंगराच्या मधला भाग रंगवला होता. साहेबांना एका कागदावर मी चित्र काढून दाखवले नि ते ही मोठमोठ्याने हसू लागले. सांगायचा मुद्दा काय, तर एवढी तर चित्रकलेतली मला जाण. चित्र मला आवडतात, पण काढता येत नाहीत.

लक्ष्मण, चला मी तुम्हाला सुंदर चित्र दाखवतो. चित्र मीही लहान असतानाच काढत होतो. पण मोठा झाल्यावर त्याकडे बघण्याचा माझा दृष्टिकोण बदलला. आधिक जाणकाराकडून मी समजावून घेतला. साहित्य, संगीत हे जसे आवडू लागले तसे शिल्प आणि चित्रही आवडू लागले. त्यातही डोळे उघडे ठेवून मी जगभर हिंडलो. असे हिंडत असताना देशोदेशीचे शिल्पकलेचे नमुने पाहत होतो. सुंदर सुंदर निसर्ग सौंदर्यस्थळे पाहत होतो. सुंदर नद्या पाहत होतो. तशी सुंदर वस्तुसंग्रहालयेही पाहत होतो. याबाबतीत जगाची राजधानी शोभावी असे शहर म्हणजे पॅरिस. जगभरातल्या बंडखोरांना आपल्या पोटात सामावून घेणारे शहर. साहित्य, संगीत, कला, राजकारण, देशोदेशीचे बंडखोर कलावंत या शहरात राहिले. सुंदर ललनांची वस्ती या शहराला लाभलेली मोठी नैसर्गिक देणगी. त्यामुळेच जगभरातील सौंदर्याची राजधानी म्हणजे पॅरिस. मोकळेढाकळे स्त्रीपुरुष आणि त्यांची रसिकता. आपल्यासारखे आंबटशौकीन तिथेही नसतील असे नाही, पण अभिजात सौंदर्याची जाण त्या गावाएवढी जगभर मला इतरत्र क्वचितच दिसली असेल. तर असे पॅरिस या शहरातले वस्तुसंग्रहालय 'लुव्र' फार प्रसिद्ध आहे. मी अनेकदा ते पाहिले. कितीही वेळा पाहिले तरी समाधान होत नाही. या संग्रहालयातच 'मोनालिसा'चे जगप्रसिद्ध चित्र आहे. पॅरिस आणि चित्र. पॅरिस आणि पेंटिंग.

चला, मी तुम्हाला छान चित्र दाखवतो. हा माझा फार आवडता चित्रकार आहे. तशी अनेकांची चित्रे मला आवडतात, आवडली. पण जगभरातून मिळतील तेवढे दुर्मिळ ग्रंथ मी जमवत गेलो. याबाबतीत बाबासाहेबांना मी फॉलो करीत आलो. साहेबांनी त्यांच्या खजिन्यातले अनेक ग्रंथ काढले, सारे चित्रकारांचे. सुंदरसुंदर चित्रे. हा पिकासोचा संग्रह. अगदी अलिकडे म्हणजे १९७३ साली गेला. ९० वर्षे जगला, एक अवलिया माणूस. भेटलो होतो मी मुद्दाम त्याला. साहेब मला चित्र समजावीत होते. मी नुसता आज्ञाधारक मुलासारखा हां हां करीत होतो. मला त्यातली काडीची अक्कल नव्हती. डोक्यावरूनच जात होते. पण त्यांचा मूड महत्त्वाचा. ते सांगत होते. त्यांचा चित्रकलेचा केवढा मोठा व्यासंग होता हे मी अनुभवीत होतो. पौरात्य आणि पश्चिमात्य चित्रकार. त्यांची चरित्रे, त्यांची चित्रे एखादी ओळ गुणगुणावी तशी साहेबांच्या ओठावर होती. ते इतके रंगून गेले होते, तल्लीन झाले होते. मी त्यांच्याकडून समजावून घेत होतो. पिकासोसारखा इम्प्रेशनिस्ट चित्रकार. मोनेमाने, दगा, सेझॉन, तुलूज लोत्रेक, व्हान गॉग, गोगँ साहेब सांगत होते. लक्ष्मण, अनेक चित्रकारांची चरित्रे माझ्या वाचनात आली. एखादी कलाकृती पाहणं हा अनुभव मोठा आनंददायी आहेच, पण या

चित्रकारांचा अधिक परिचय व्हायचा, त्याच्या रेषा, रंग अधिक बोलके व्हायचे तर त्याचे जगणेही परिचित हवे म्हणून हे ग्रंथ मी मिळवले, वाचले. त्यातल्या पिकासोसारख्या अवलियाला तर भेटलेच पाहिजे. मी भेटलो, मोठा विलक्षण मनुष्य. सर्वसामान्य नितिमत्तेचे यांना कोणतेच नियम लावता नाही येत. त्यांचे जगणे तसे बंधमुक्त असते. त्यांची चित्रे पाहताना या असल्या नैतिकतेच्या कसोट्या काय कामाच्या? त्या निरर्थकच वाटू लागतात. श्रेष्ठ कलाकृतीला देश-काल बंधन उरत नाही. ती ज्या कलखंडात घडते त्या काळाची कलाकृती असते. म्हणून ती निर्माण करणारा कलाकार ज्या काळात जगला तो काळ, तो समाज, त्या काळची सामाजिक राजकीय परिस्थिती या सर्वांचे भान असावे लागते नि ते भान ठेवून जर कलाकृती पाहता आली ना तर ती अधिक बोलकी, जिवित, देखणी होऊन जाते. पिकासो म्हणत असे, माझी चित्रे ही माझ्या रोजनिशीची पाने आहेत. कलावंताचे जगणे आणि त्यांची निर्मिती याचे अतूट नाते असते. त्याला समजावून घेतल्याशिवाय त्याची कलाकृती समजत नाही. म्हणून मग त्यांची चरित्रे वाचणे फार उत्तम. पिकासोसारख्या अतिशय गुंतागुंतीचे वादग्रस्त व्यक्तिमत्त्व असलेल्या कलावंताबाबत तर हे विशेषकरून लक्षात ठेवले पाहिजे. आपल्या नामदेव ढसाळांसारखे बिनधास्त आयुष्य हा माणूस जगला. पिकासोच्या व्यक्तिमत्त्वात आपल्या काळात एक अढळ स्थान निर्माण केले आहे. आयुष्याच्या प्रत्येक वळणावर, टोकावर ही माणसे कसे विलक्षण गुंतागुंत करीत जगलेली असतात. त्यांचे जगणे हेच एक अत्यंत मौलिक ठेवा बनून जाते. आपल्या नैतिकतेच्या कसोट्या, लक्ष्मण, काहीही असोत, पिकासोसारखी उत्तुंग व्यक्तिमत्त्व, प्रतिभा लाभलेली जी माणसे असतात. मग ती कोणत्याही क्षेत्रातली असोत, संपूर्ण मानवी जीवनावर त्यांचा ठसा उमटतो. त्यांना समजून घेणे म्हणजे आपलेच जगणे समृद्ध करून घेणे नाही का? आपल्या समाजात मुळातच या कलांमधले बारकावे समजावून कुणी मुलांना सांगत नाही. म्हणून मग ती उलटे डोंगर रंगवणारच नाही का? म्हणून माझ्याकडे मिस्कीलपणे पाहून हसू लागले. मीही सामील झालो. काही समजतच नव्हते ना? स्वतःवर ही कोटी करून ते छान हसत असत.

आपल्याकडे चित्रकार म्हणजे वाया गेलेला माणूस. ज्याला आयुष्यात काहीच करता आले नाही तो माणूस या असल्या भिकार नादाला लागतो. चित्र काढणे हे भिकेचे डोहाळे लागल्याचे लक्षण. चित्रकलेचा मास्तर म्हणजे वेडा माणूस. चित्रकार काय असतो? कसा वागतो? कसा विचार करतो? त्याची कलाकृती आणि तो यांचा काही संबंध असतो की नाही? आपण विचारच करीत नाही. लक्ष्मण, चित्र समजावून घ्यावे लागते. समजतेच असे नाही. न समजताही

समजल्याचा अभिनय आपण अभिजनवर्ग करीत असतो. नुसते छान छान म्हणून आपण कसे रसिक आहोत, यातले दर्दी आहोत हे दाखवणारे अनेकजण भेटतात. प्रामाणिकपणे, मला हे समजतच नाही किंवा समजले नाही, ते समाजवून सांगा, असे आपण कुणी कुणाला सांगत नाही. त्यामुळे कलास्वाद घेणे, खरा अर्थ समजणे, कलेतली जाण असणे हे कष्टसाध्य आहे, सहजसाध्य नाही.

पिकासो हा तर लोकविलक्षण कलाकार. अत्यंत वादळी. चांगला नव्वद वर्षे जगला. तब्येतीने अत्यंत धडधाकट. उमेदवारीच्या काळातली दारिद्र्याची काही वर्षे सोडली तर एरवी त्याच्याकडे अफाट संपत्ती होती. नावलौकीक आणि अफाट प्रसिद्धी होती. तो जिवंतपणीच एक मोठी दंतकथा होता. त्याच्याबद्दल जेवढे लिहिले गेले तेवढे क्वचितच कुणाबद्दल लिहिले गेले असेल. त्याची प्रेमप्रकरणे, बायका, मैत्रिणी, याबद्दल खूपच लिहिले गेले हे खरे. तो काही भणंग, उपाशी, व्यसनी, उपेक्षित, वाळीत टाकलेला असा नव्हता. तो ज्या हॉटेलमध्ये बसून त्याच्या मॉडर्न आर्ट करीत असे त्या हॉटेलात जाऊन मी तो बसत असलेली जागा पाहून आलो आहे. पिकासो हा आमच्या काळातला– विसाव्या शतकातला – अतिशय महत्त्वाचा जगप्रसिद्ध चित्रकार होता. पिकासो म्हणजे संपूर्ण शतक आहे. गेल्या शतकाअखेरीचा इंप्रेसिनिझमने पॉप ऑप कलेबर्गत अनेक अनेक बदल तो पाहत होता. त्याने ते पाहिले त्यात स्वतः भाग घेतला. संपूर्ण विसावे शतक त्याने व्यापले. कलेच्या क्षेत्रातला एवढा दिग्गज माणूस. पिकासो म्हणजे विसाव्या शतकाचा विचार. कलेच्या क्षेत्रातच नव्हे तर इतरही क्षेत्रांत विशेषतः सामाजिक राजकीय उलथापालथीचा विचार. लक्ष्मण, तो कम्युनिस्ट होता, मार्क्सवादी होता, तोही त्या कालखंडातल्या राजकीय विचारांचा भाग होता. अत्यंत बंडखोर शैलीचा हा चित्रकार. प्रमाणित फूटपट्ट्या कशाच्याच त्याला वापरता येत नाहीत. पिकासोबद्दल खूप लिहिले गेले. माझ्या पिढीतल्या अनेकांना तो ठाऊकही नाही. मझ्याही सारे वाचनात नाही आले. त्याच्या दोन मैत्रिणींनी लिहिलेल्या आठवणी आहेत. परॉन्सवाज जिलो हिने कार्लटेन लेक ह्या अमेरिकन लेखकाच्या मदतीने लिहिलेले 'माय लाइफ विथ पिकासो' हे पुस्तक सनसनाटी म्हणता येईल असे आहे. त्यामुळे ते जगभर आणि आपल्याकडेही खूप वाचले गेले. मीही ते वाचले आहे. पण त्यात युरोपीय समाज न समाजवून घेता चर्चा करणे व्यर्थ आहे. त्यासाठी त्या समाजाची एथिक्स समजावून घ्यायला हवीत. पिकासोच्या व्यक्तिमत्त्वाला अनेक पदर, अनेक कंगोरे आहेत हेही आपण समजावून घेतले पाहिजे. आंबटशौकीन लोकांनी त्याच्या चित्रांपेक्षा त्याचे खाजगी आयुष्य, त्याच्या बायका, मुले, सवयी, मित्रमैत्रिणी या बद्दलच खूप चर्चा केली, लिहिले. पिकासो

हा स्पेनमध्ये जन्मला. तो पक्का स्पॅनिश होता. डॉन जोझे म्हणजे पाब्लो पिकासोचे वडील. स्पेनमधल्या मालागा शहरात हे राहत असत.

साहेब, पण हे इंप्रेशनिझम म्हणजे काय?

कसे बरे सांगावे, पण तुम्ही चळवळे आहात. इम्प्रेशनिझम म्हणजे अधुनिक चित्रकलेच्या इतिहासातली सर्वात महत्त्वाची चळवळ. समोर दिसणाऱ्या दृश्याचा मनावर तात्काळ होणारा परिणाम, तात्काळ कागदावर वा कॅनव्हासवर उतरवणे. वस्तूच्या पृष्ठभागावरच्या छायाप्रकाशाच्या छटा आणि सावल्यांचे विश्लेषण करणे. स्टुडिओतून बाहेर पडून प्रत्यक्ष जागेवर जाऊन काम करणे ही या चळवळीची काही वैशिष्ट्ये होती. त्याचबरोबर संपूर्णतः समकालीन दैनंदिन जीवनातले विषयही चित्रात आणले गेले. त्यातून पुढे अनेक चळवळींचा, विचारांचा आणि विविध शैलींचा उगम झाला. गेल्या शंभर वर्षांवर इम्प्रेशनिझमचा निर्विवाद प्रभाव होता. यातले महत्त्वाचे चित्रकार होते मोने, माने, इन्वा, झिझले, पिसारो, दगा, सेझॉन, बुंदे, मोरिसो.

साहेब एवढी परकी भाषेतली नावे तुम्ही कशी काय लक्षात ठेवता? एकदा भेटलेला माणूस पुन्हा कितीही वर्षांनी भेटला तरी त्याला तुम्ही नावाने हाक मारता, हे कसे काय जमते? म्हणजे नेमके काय केल्याने हे सारे लक्षात राहते?

साहेब हसले. लक्ष्मण, हे आमचे सिक्रेट आहे. मनाच्या जडणघडणीतून होत असावे असे समजा. शेतकरी नाही का कितीतरी वाण न शिकताही लक्षात ठेवतो, तसेच. पाब्लो हा विलक्षण व्यक्तिमत्त्व लाभलेला कलंदर कलावंत होता. त्याला आपले नियम लावून उपयोग नव्हता, नाही. त्याच्या प्रेमांनी नेहमीच त्याच्यामधली निर्मितीची शक्ती जागृत ठेवली. कामजीवनाचा आनंद घेण्याची शक्ती आणि निर्मितीतली समृद्धी या गोष्टी त्याच्या बाबतीत हातात हात घालूनच येतं. त्याच्या आयुष्यात आलेल्या प्रत्येक स्त्रीबरोबर त्याच्या प्रतिभेचा नवा बहर जगाने पाहिला. त्याच्या कामातल्या प्रत्येक महत्त्वाच्या कालखंडाला त्या त्या स्त्रीचे नाव द्यायला हवे. स्त्री ही त्याचे विचार आणि कलाकृतीच्या दृष्टीने आवश्यक असे तत्त्व होती. तो ग्राफिक्स तर फार उत्तम करीत असे.

साहेब, ग्राफिक्स म्हणजे काय?

ग्राफिक्सचे अनेक अर्थ होतात, पण चित्रकलेत प्रिंटमेकींग ह्या अर्थाने घ्यायचा. तांबे, जस्त, लाकूड किंवा खराच्या सपाट प्लेटवर हाताने चित्र काढून हँडस्प्रेसच्या साहाय्याने त्याच्या अनेक प्रती काढल्या जातात. प्लेटवर हाताने चित्र कोरतात. अनेकदा रासायनिक प्रक्रियाही करतात. याला ग्राफिक्स असे म्हणतात. ग्राफिक्समुळे अनेक प्रती निघू शकतात. रेम्ब्रॉ, गोया, दोमिए, दगा,

तुलुज लोत्रेक, पिकासो, दाली मिरो अशा अनेक श्रेष्ठ कलावंतांनी हे तंत्र मुक्तहस्ते वापरले आहे. आपले लोकही आता उत्तम ग्राफिक्स करतात. या सर्व क्षेत्रांत लक्षात राहिलेला आणखी एक चित्रकार आहे. तो आहे सेझान पॉल. गेल्या शंभर वर्षांतला सर्वांत थोर आणि महत्त्वाचा चित्रकार. ज्येष्ठ साहित्यिक एमिल झोलाचा हा मित्र. इम्प्रेशनिस्ट चळवळीचा म्होरक्या. त्याने रंग आणि छटांच्या विश्लेषणाचे महत्त्वाचे सिद्धांत मांडले. दृश्य वस्तूखाली दडलेला आकृतिबंध व्यक्त करण्याची त्याची महत्त्वाकांक्षा होती. शंकू, दंडगोल, वर्तुळ यांचा चित्रकाराने निसर्गात पाहायला शिकले पाहिजे. हाच पुढे पिकासोने निर्माण केलेल्या क्युबिझमचा मूळ आधार होता. त्याच्या मृत्यूनंतर क्युबिझमचा उगम झाला.

लक्ष्मण, पिकासो म्हणजे ज्वालामुखी होता. तो केव्हा फुटेल हे जसे सांगता येत नाही तसेच पिकासोचे होते. पिकासो दीर्घायुषी होते तर हेन्री तुलुज लोत्रेक अल्पायुषी. याचा बाप सरदार होता. लहानपणी झालेल्या अपघातात दोन्ही पाय अधू झाल्याने त्याच्या शरीराची वाढ खुंटली. हेन्रीने पॅरिसला येऊन आपला चित्रकेलचा नाद जोपासला. व्हान गॉग, गोगाँ, सरा वैगेरे त्याचे मित्र होते. तो अप्रतिम रेखाटनकार होता. वेश्या, धोबीणी, सर्कस, घोडे असे विषय घेऊन अनैतिक चित्रे करून त्याने सनातन्यांचा रोष ओढवून घेतला. जगातले पहिले पोस्टर त्यानेच केले. लिथोग्राफीने. याचा पोस्टर्सनी क्रांती केली. याचा पिकासोवर मोठा प्रभाव होता. आणखी एक महत्त्वाचा चित्रकार पिकासोच्या जडणघडणीत वाटेकरी होता. तो म्हणजे व्हिन्सेन्ट व्हान गॉग. अत्यंत नाट्यमय, अत्यंत वादळी जीवन जगला. मृत्यूनंतर त्याच्यावर कथा, कविता नि चित्रपट तयार झाले. तो जन्माने डच होता. अनेक उद्योग करून वयाच्या सत्ताविसाव्या वर्षी तो चित्रकलेकडे वळला. पॅरिसला दाखल झाला. गेगाँबरोबर राहत असताना त्याला वेडाचे झटके यायला लागले. आणि याच भरात वयाच्या अवघ्या सदतिसाव्या वर्षी त्याने आत्महत्या केली. या दहा वर्षांत त्याने बेफाट काम केले. इम्प्रेझिम चिसिन्थेटीझम अशा अनेक विचार प्रवाहांचे पितृत्व त्याच्याकडे जातं. विसाव्या शतकातल्या जर्मन एक्स्प्रेशनिस्ट चित्रकारांवर त्याचा खूप प्रभाव होता. पिकासो म्हणे, प्रतिभावंत असायचे तर भगंणपणा आला. इतरांच्या रीतीभाती आल्या, त्याला त्या पाळता आल्या नाही तर तो बदनाम होतो. कलावंत जोवर यशस्वी नसतो तोवर त्याच्या घरचे जवळचे लोक त्याला प्रतिभावंत म्हणून वागवतात. पण एकदा का त्याला यश आणि पैसा मिळाला की मग काय त्यांच्या दृष्टीने तो प्रतिभावंत उरत नाही. उरतो तो फक्त यशस्वी आणि पैसेवाला कलाकार. आपल्याकडे नाही का, पैसा नसेल तर पोराला उनाड ठरवत लोक, तसेच हे आहे.

साहेबांचे हे रूप क्वचितच कुणी पाहिले असेल. पूर्ण चित्रकलेत रमलेले. या माणसाच्या व्यासंगाचे विषय तरी किती असावेत! वरकरणी राजकारणी असणारे व्यक्तिमत्त्व बहुआयामी होते म्हणजे काय? अष्ठावधानता आली होती ती त्यांनी कष्टाने कमावली होती. त्यांचा हजरजबाबीपणा हाही त्यांनी व्यासंगाने कमावला होता. मी पिकासोच्या झपाटलेपणाने गोंधळून साहेबांचा निरोप घेतला. कृष्णामाईचे हे लाडके पोर जगातल्या चित्रकारांबद्दल विलक्षण ताकदीने झपाटून गेलेलं मी पाहिले. मी जसा आधी दगड होतो तसाच होतो. साहेबांनी मला चित्र कशी पाहावीत हे अनेक प्रकारे समजावले. खरे तर मला आणखी जवळून जाणण्याची संधी आधी मिळाली असती तर? सुप्रिया, मी एक वेडा माणूस आहे. तोही एक वेडा माणूस होता. जगाचे सारे नियम त्याला लागू नव्हते अन्यथा तोही कोट्यधीश झाला असता. अब्जाधीश झाला असता. सारी मदार त्याच्या केवळ एका शब्दावर होती. तो सांगील ते धोरण आणि बांधील ते तोरण. अशी त्याच्या शब्दांची किंमत होती. त्याला नोटांचे बंगले बांधता आले असते ग, पण तो एक वेडा लोक-लोक, लोकांचे, लोकांसाठी करीत राहिला. जमेल तेवढी बेरीज करीत राहिला. वजाबाकी करायचीच नाही. शेवटी घराची लाइट बिलेही भरायलाही पैसा नव्हता. पण तो खरा धनवान होता. त्याचे धन त्यांच्या विचारात नि ग्रंथालयात होते. लाखोकरोडो रुपयांची त्याची इस्टेट होती, ती या वेड्या माणसांनी भरलेल्या पुस्तकांच्या कपाटांत. त्याचा सांभाळ आता पुढच्या पिढ्यांनी करावा.

ती. सौ. वहिनींना, बाबांना सप्रेम जयभीम.

तुझा,
लक्ष्मणकाका

दिनांक १६/९/२०१२

चि. सुप्रिया,

सप्रेम जयभीम.

चव्हाणसाहेबांबरोबर अनेकदा प्रवास करण्याचा प्रसंग आला. असेच एकदा कोल्हापूरला निघालो होतो. भेटल्याबरोबर साहेबांचा पहिला प्रश्न असे, 'काय लक्ष्मण, आई काय म्हणते? शशी कशी आहे? मुलं काय मजेत ना?' या तीन गोष्टींची चौकशी केल्याशिवाय आणि माझ्याकडून माहिती घेतल्याशिवाय प्रवास सुरू होत नसे. इतक्या आस्थेने ते चौकशी करीत तशी चौकशी माझ्या तरी आयुष्यात कुणी केली नाही. माझी आई आता टोपल्या विणते का? अजून टोपल्यांचा व्यवसाय घरी कुणी करते का? याचे त्यांना फार कुतुहल असे. गाडीत बसले की अन्य कोणत्याही प्रश्नाची चर्चा नसायची. मी राजकारणातल्या माहितीसाठी काही विचारले तर जुजबी उत्तर द्यायचे. आज त्यांनी आणखी एक प्रश्न विचारला. मला म्हणाले

'काय लक्ष्मण, काय वाचताय?'

मी ते सांगितले.

ते म्हणाले, 'कसे वाचता?'

आता आली का पंचाईत. कसे वाचता म्हणजे काय? काय सांगणार?

'साहेब, पहिल्या पानापासून शेवटच्या पानापर्यंत वाचतो.'

'अस्स होय, पण असे वाचण्याचा कंटाळा नाही का येत?

'येतो ना. मग, मग पुस्तक बंद करतो. थांबतो. पुन्हा काही वेळाने वाचू लागतो.'

'आता असे बघा, मध्ये वेळ गेलाच ना? माझे तसे नाही. मी एक नियम केलाय. एक वैचारिक ग्रंथ, एक कविता संग्रह आणि बाकी काहीही. कधी नाटक, कधी ललित लेख असे तीन ग्रंथ बरोबर घ्यायचे. एकाचा कंटाळा आला की दुसरा ग्रंथ घ्यायचा. दुसऱ्याचा कंटाळा आला की तिसरा वाचावयाचा. पण प्रत्येक वेळी आणखी एक अट घालायची. आपली स्वयं शिस्त. जेथवर आपण वाचले तेथवर काही ना काही खूण तर करतोच ना? मग दुसऱ्यांदा जेव्हा आपण वाचायला सुरुवात करणार तेव्हा दहा पाने मागे जायचे, नि वाचायचे. म्हणजे सलगता मिळते आणि

प्रत्येक वेळी दहा पाने मजकूर पुन्हा वाचला जातो. गंमत सांगू काय? आपण व्यासंग करायचा म्हणून वाचणारे लोक. करमणुकीसाठी थोडेच वाचतो. वाचणे एका अर्थाने आपण आपल्याला लावलेले व्यसनच असते ना? न वाचता आपण झोपूच शकत नाही. कितीही कामात असलो नि कितीही आळस असला तरी एक तासभर वाचल्याशिवाय मला तरी काही झोप येत नाही. मग आपण म्हैशीसारखे करावे. ती भराभरा खाते आणि निवांत रवंथ करीत बसते, हो ना? म्हणजे पुन्हा चर्वण करते. आपण दहा पाने मागे गेलो ना की आपोआपच पुन्हा पुन्हा चर्वण होते. एकच पुस्तक एकाच वेळी दोन-तीन वेळा वाचून होते नि त्यावर चिंतनही करता येते. शेरडासारखा नुसता शेंडा खुडून जाण्यात काय मतलब. किंवा झाड चांगले दिसले म्हणजे नुसते ओरबाडून खाण्यात तरी काय मतलब. राजासारखे वाचले पाहिजे. काय वाचतोय, कशासाठी वाचतोय, हे महत्त्वाचे, पण वाचनाने मन संस्कारित होते आहे का? हे समजायचे तर वाचन, चिंतन, मनन पाहिजे. अधाशीपणा काय कामाचा. वैचारिक पुस्तकांबरोबर कविता असली ना की कसा छान विरंगुळा मिळतो. कादंबरीबरोबर नाटक असेल तर फारच उत्तम भट्टी जमते. काय? अनेकजण अनेक प्रकारे वाचतात. मी पुस्तक निवडताना पहिल्यांदा चाळतो, आवडले की बाजूला ठेवतो. अशी बाजूला केलेली पुस्तके गाडीत असतात. माझी गाडी म्हणजे मग छोटे ग्रंथालयच बनते.'

साहेबांनी मला कसे वाचावे याचा वस्तुपाठच दिला. पण 'तुम्ही असे करा असे काही मी म्हणत नाही' असे वर सांगितल्याने तेही टेन्शन नाही.

आता, 'कसे लिहिता,

मी थोडा गोंधळलो पण धाडसाने लेखनप्रक्रिया सांगितली.

ते म्हणाले छान. ही खांडेकरी परंपरा.

मी मान हलवली. 'साहेब, मी एकटाक सलग लिहितो. एकदा लिहिलेला मजकूर फायनल असतो. पुन्हा पुन्हा खाडाखोड करीत लिहीत नाही. अगदी संपादक काही म्हणाला तर दुसरा मजकूर लिहून देतो. पण दुरुस्त्या करत बसत नाही. ते काम फार त्रासाचे असते. मला जे सांगायचे ते सांगितले. त्यात पुन्हा कारागिरी करीत बसण्यात मला काही रस नसतो. मग गरज लागली तर तो अख्खा मजकूर टोपल्यात टाकतो आणि नवीनच मजकूर लिहून देतो.'

वा! वा! लक्ष्मण छान एकपाठी असावे तसे, हो ना? छान आहे.

आम्ही गाडीत छान बोलत होतो. मागे शामराव पवार यांचे भाचे बसलेले. आमची साहित्याच्या निर्मितीप्रक्रियेची चर्चा सुरू होती. शामराव कुतूहलाने ऐकत होते. अगदी शांतपणे. गाडी कोल्हापूरकडे निघाली होती. भोवताली सारी हिरवीगार ऊसाची शेती. मध्येच काढणीला आलेला पिवळा भात आणि वितवित लोंब्या.

कंबरेला बसलेला बागायती भात. कोल्हापूर, कराड म्हणजे काळीभोर जमीन. कसदार माती. शेतकरी अत्यंत कष्टाळू. राबराबून शेतात घाम गाळून मोती पिकवणारे शेतकरी. साहेबांचा विक पॉईन्ट. भोवतालची समृद्धी पाहून मन कसे हरखून जात असे. पावसाळा चांगला झाला. धरणे भरली की चिंता मिटली. शेती, शेतकरी, राधानगरी धरण हे विषय आले की शाहू महाराजांची आठवण झाली नाही असे कधी व्हायचे नाही. मी आणि साहेब असलो की भटक्या-विमुक्तांविषयी हमखास बोलणे व्हायचे. मग महाराजांच्या असंख्य आख्यायिका-आठवणी ते सांगत. मीही शेअर करीत असे. त्यांचे शिक्षण संस्थानकाळात कोल्हापूरला झालेले. त्यामुळे त्यांच्या आठवणीही फार छान असायच्या.

'लक्ष्मण' हा राजा मोठा विलक्षण होता. सामाजिक लोकशाहीचे अनेक प्रयोग याने केले. असे जगात कुठे दिसणार नाही. असले प्रयोग आख्यायिकांच्या रूपात जनमानसात रुजले. सामाजिक समतेसाठी त्यांनी केलेले प्रयोग त्याकाळात खूपच गाजले. एकदा काय झाले, महाराजांच्या लक्षात आले की आपण अस्पृश्यता विरोधी कायदा केला असला तरी समाजातले मोठे लोकच तो पाळत नाहीत. सरदार, जहागीरदार, इनामदार, घरंदाज घराण्यातले लोक यांचे काय करावे? एकदा एक प्रयोग त्यांनी केला. सर्व खासे खासे लोक जेवणासाठी बोलावले. खानसाम्याला बोलावून जेवण उत्तम बनवायला सांगितले. तांबडा रस्सा, पांढरा रस्सा, सुके मटणे, फार छान बेत केला. मात्र खानसाम्याला सांगितले मीठ मात्र कश्यातही घालू नको आणि वाढप्याच्या जागेवर महारांची पोरे बोलावून त्यांना वाढण्याची कामे दे. जी हुजूर म्हणून तो कामाला लागला. ही गोष्ट दोघांनाच ठाऊक. झाले! सारी खासे मंडळी, पंगत बसली. महाराज म्हणाले, घ्या, करा सुरुवात आणि खाली मान घालून लागले जेवायला. सर्वजण जेवताहेत याची खात्री करून घेतली. चार चार घास जेऊ दिले सर्वांना आणि एकदम खानसाम्यावर ओरडले,

लेकानो, तुम्हाला किती वळण लावले तरी समजत कसे नाही. मीठच नाही कशात. ये कांबळ्या, पळ ना, मीठ वाढ सर्वांना. च्या मारी म्हारांनो किती सांगायचं रं तुमास्नी. पोरांनी पळपळून मीठ वाढलं.

लोक जेवत होते. कोणाची हिंमत नव्हती उठण्याची. साऱ्यांना कळून चुकले. खानसाम्यापासून वाढप्यापर्यंत सारे अस्पृश्य समाजातले लोक काम करीत होते. जेवणाला नावे ठेवायला जागा नव्हती इतके सुंदर जेवण. सारे पोट भरून जेवले नि मग महाराज खुशीत सर्वांशी बोलत होते. सर्वांना बाटविले, त्याना मनापासून आनंद झाला होता. आहे का असा राजा? आपली लोकशाही आली. लोकांचे राज्य आले पण माया गेली. मायेचा कळवळा गेला. असा लोकराजा पुन्हा होणे नाही.'

'होय साहेब', मी म्हणालो.

सोनतळी कॅम्प हे त्यांचे या सामाजिक प्रयोगशाळेचे केंद्र होते. ते तेथेच राहत. राजवाड्यात नाही. शेजारी सारी वसाहत भटक्या-विमुक्तांची. पारध्यांवर त्यांचा मोठा लोभ होता. रानातले हिंस्र पशू जर माणसाळविता येतात तर ही माणसे का नाही! प्रेमाने शिकारी चित्ते महाराजांनी माणसाळावले होते. तर प्रेमाने पारधी का माणसाळणार नाहीत. महाराजांनी अनेक प्रयोग केले. एकदा पारध्यांना अटक करून सैनिकांनी महाराजांसमोर त्यांना उभे केले.

महाराज हे चोऱ्या करतात, दरोडे घालतात आणि आता तर ते कॅम्पावरच धाड घालायला आले होते.

महाराजांनी त्यांना कसलाच त्रास दिला नाही. याउलट त्यांची जेवणाची नुसती चंगळ उडवून दिली. पंचपक्वान्न वाढले, बापजलमात ते असे जेवले नव्हते. महाराजांनी त्यांना समोर बोलावले. आणि विचारले, का रे, अशा चोऱ्या करता? तुरुंगात जायची हौस आहे होय तुम्हाला?

तुरुंगाची हौस कुणाला असंल?

मग चोऱ्यामाऱ्या का करता?

जगण्यासाठी. त्यांनी उत्तर दिलं

उद्योगधंदा का करीत नाही?

पक्षी धरतो, त्यावर पोट भरत नाही. दुसरे काही येत नाही. त्यात आमचे नाव कानफाट्या पडल्याने कोणीसुद्धा जवळ घेत नाही. मग नोकरी कोण देणार? फासे लावण्यापलिकडे आम्हाला येतेच काय?

म्हणून काय लोकांची घरे फोडायची?

जगण्यासाठी दुसरे काय करायचे? पोटापुरते जगायला काय बाय मिळाले तर चोरीमारी कशाला कोण करील? चोरीचे काम वंगाळ आसतया ही समाजतयाकी आमास्नी. पर पोटात भूकंचा जाळ निघाला की काय सुचत नाय. डोस्कं फिरतया. आन मंग आसली चोरीमारी करतोय.

महाराजांना प्रश्नाचे मूळ सापडले. त्यांनी पारध्यांना बायापोरांनिशी सोनतळीला हलवले. त्यांना घरी शिधा देण्याची व्यवस्था केली. अनेक दिवस विचार केला. अनेक प्रकाराने त्यांच्या इमानदारीची परीक्षा केली आणि सारा कॅम्प त्यांच्या ताब्यात दिला. तिन्ही गेटवर ते वॉचमन होते. पुढे खाजगीतली राखणही या पारध्यांना दिली. त्यातल्या प्रत्येकाला काम मिळावे म्हणून बांधा-पाडा योजना सुरू केली.

मी हे सांगत होतो तोवर गाडी कावळानाक्याला पोहचली. गाडीने वळण घेतले आणि रसिकभाई शहा यांच्या बंगल्याच्या पोर्चमध्ये थांबली. आमचे बोलणे तेथेच

थांबले. रसिकभाईंनी साहेबांचे हसतहसत स्वागत केले. मी गर्दीत दबकून मागे होतो. साहेबांनी हाक मारली,

लक्ष्मण, चला. रसिकभाई, हे लक्ष्मण माने. माझे तरुण मित्र. मराठीतले मोठे लेखक आहेत. लक्ष्मण हे रसिकभाई, माझे खूप वर्षांपासूनचे मित्र आहेत. बाकी जे काही आहेत ते त्यांच्या कर्तबगारीने आहेत. या आत या.

आम्ही सारे दिवाणखान्यात बसलो होतो. साहेब फ्रेश व्हायला आत गेले. श्रीपतराव बोंद्रे यांनी दोन कार्यक्रम ठेवले हाते. दिवसभराचे कार्यक्रम संपले. नि पुन्हा आम्ही कराडला यायला निघालो. आता पुन्हा आमचे बोलणे सुरू झाले. हां लक्ष्मण, सांगा तुमची बांधा-पाडा योजना.

साहेब, हा कॅम्प मोठा विलक्षण होता. पारधी, डोंबारी, माकडवाले या कॅम्पवर सहकुटुंब महाराजांनी वसतीला ठेवले होते. त्यांना शिधासामुग्री संस्थानच्या खजिन्यातून मिळत होती. कुणी भीक मागायची नाही. चोऱ्या करायच्या नाहीत. डोंबाऱ्याचे ही तसेच होते. काही केल्या एका घरचे खाऊन पोटच भरायचे नाही. गाव मागून खाल्ल्याशिवाय बरेच वाटायचे नाही. शिधा दिला तरी तो शिधा बाजूला ठेवून चोरून पळून जात आणि भिक मागून आणीत आणि जेवण करीत. महाराजांनी उठावे, यांना माणसाळवण्यासाठी प्रयत्न करावा. बरे, हे सारे बिनकष्टाचे मिळतेय. यांना कामाची सवय लागावी म्हणून महाराजांनी एक योजना आखली. सोनतळी कॅम्पवर छोट्या छोट्या पण साध्या इमारतींची बांधकामे काढली. तीही कच्च्या विटांच्या वापराने. आपण त्याला भेंडे म्हणतो ना तसे. आधी भेंडे पाडायचे, वाळवायचे आणि मग वापरायचे. पारध्यांना, डोंबाऱ्यांना, माकडवाल्यांना कामे देण्यासाठी ही कच्च्या बांधकामाची युक्ती महाराजांनी काढली होती. खाणही सुरू केली. खाणीतला दगड काढायचा, मातीच्या विटा करायच्या. या विटातली घरे पावसाळा आला की राहायला वापरायची. पावसाळा संपला की पाडायची. पुन्हा बांधकाम सुरू करायचे. रोजगार मिळाला पाहिजे. यांना कष्टाची सवय झाली पाहिजे. राजकारभारातले लोक फार नाराज असायचे. महाराज हा पैसा वाया घालवीत आहेत. तिजोरीतला पैसा नाहक खर्च होतो आहे. अशी टीका व्हायची. महाराजांनी असल्या टिकेला कधी भिक घातली नाही. फासेपारध्यांना जर माणसांत आणायचे असेल तर त्यांना जवळ घेतले पाहिजे. दूर लोटून उपयोग होणार नाही. महाराजांनी त्यांना आपल्या जवळ घेतले. आईसारखी त्यांच्यावर माया केली. बांधकामावर स्त्रीपुरुषांना काम दिले. पारध्यांवर त्यांचा फार विश्वास होता. ते इमानदारीने राखण करतात की नाही हे तपासून ते पाहत.

एकदा रात्री दोन-अडीच वाजता उठले ते पहारा देतात ते जागे आहेत की

नाही हे पाहण्यासाठी. त्यांनी पाठीवरून एक-दोन डबे घेऊन जाताना जसा आवाज होईल तसा आवाज त्यांच्या पहाऱ्याच्या ठिकाणापासून चारपाचशे फुटांवर महाराजांनी करविला. एका क्षणात जेथून आवाज आला होता अगदी त्या जागेवर लागलीच गोफणीने दोन धोंडे आले. बरे तर बरे की ज्यांनी तो आवाज केला होता ते दोघे जवळ असलेल्या एका खोपटाच्या आडोशाला पोहोचले होते. पारधी कसोटीला उतरले होते.

महाराज एकदा तोफखान्यांना म्हणाले, हे बगा तोफखाने, तुमचे हे अधिकारी. मला या असल्या नाकउडव्या अधिकाऱ्यांचा अत्यंत तिटकारा आलेला आहे. ते नाक फुगवून, गंभीर चेहरा करून असे काही माझ्यापुढे उभे राहतात की जणू काही त्यांचे घर कुणीतरी फोडले आहे. आणि त्याची सारी जबाबदारी माझ्यावर आहे. या अधिकाऱ्यांची तोंडे पाहणे नको असे अलिकडे मला वाटू लागले आहे. एकीकडे हे असले अधिकारी नि दुसरीकडे केवळ खुशमस्करे निर्लज्ज लोक पाहून मन विटून गेले आहे. तोफखाने अहो, मला जनावरांच्या तांड्यात बसून राहणे बरे वाटते. तेथे नाकउडवेपणा नाही, लबाडी नाही. चहाडी, चुगली नाही. विश्वासघातासारखे प्रकार नाहीत. तुमच्या या शहाण्या माणसांपेक्षा मला हे फासेपारधी बरे वाटतात. फसवेगिरी नाही, दिवसभर त्यांच्यासोबत बसलो तरी कंटाळा येत नाही. भूक लागलेली देखील समजत नाही. बोलण्यात ती अडाणी वाटतात, पण प्रामाणिकपणा हा त्यांचा मोठा गुण आहे.

दरवर्षी रीतिरिवाज पाळणारी, उत्तम पेहराव करणारी, मिठास बोलणारी, शहाणीसुरती पण अंतर्यामी स्वार्थी हेतूने ग्रस्त झालेली व इतरांस त्रस्त करणारी माणसे अवतीभोवती आहेत. खुषमस्करी करून मतलब साधणारी. याचा महाराजांना तिटकारा होता. वरकरणी तुमचाच म्हणून भासवणाऱ्या बेईमान माणसापेक्षा 'इमानदार' फासेपारधी त्यांना जिवलग वाटत. मग त्यांची भाषा असेना का रांगडी, 'ए महाराज, हिकडं ये, हा ससा घे' अशी त्यांची एकेरी बोली. आणि कपडे असेनात का मलीन. शुभ्र कपड्यांच्या अच्छादनाखाली खुनशी, दुष्ट, काळेकुट्ट हृदय असण्यापेक्षा मलीन कपड्याखालचे विशुद्ध अंत:करण व अविचल निष्ठा ही पृथ्वीमोलाची.

सुप्रिया, हे ऐकून चव्हाणसाहेबांना जो आनंद झाला तो मी शब्दात नाही पकडू शकत. पृथ्वीमोलाचा या शब्दावर नंतर कितीतरी वेळ ते तो शब्द पुन्हा पुन्हा म्हणत होते, स्वगत. शामराव नि मी पाहतच राहिलो. साहेब बराच वेळ हरवून गेले होते.

लक्ष्मण, ज्याला यश मिळवायचे असते ना त्याचेठाई असावीच लागते अशी अविचल, अव्यभिचारी, नितळ पृथ्वीमोलाची निष्ठा. आज हे सारे जरी निरुपयोगी झाले आहे असे वाटत असले तरी हेच सत्य आहे. ते काळाच्या कोणत्याही कसोटीवर

उतरेल. आज नाही उद्या; काळच सांगेल निष्ठेचे मोल. या त्यांच्या स्वगताला तत्कालीन परिस्थितीचा संदर्भ आहे.

लक्ष्मण, बोला.

एकदा एक मोठे जाणकार विद्वान मित्र महाराजांकडे आले होते. त्यांनी पहाऱ्यावरची ही पारधी माणसे पाहिली. अंगावर कळकट मळकी वस्त्रे, डोक्याच्या झिपऱ्यातून सतत खाजवणारे हात, ओंगळवाणे, महाराजांना त्यांचे मित्र म्हणाले, महाराज, हे काम या पारध्यांना कशाला दिले? किती घाणेरडे लोक, उवांनी भरलेले.

महाराज म्हणाले, असे आहे होय!

पाहा, आता समजेल तुम्हाला बसा असे निवांत.

फासेपारध्यांची निष्ठा तपासण्याचे महाराजांनी ठरवले. थोरामोठ्यांच्या दडपणाला बळी पडतात कां तेही तपासायचे होते. त्यांनी आपले बंधु बापूसाहेब महाराजांना सोनतळी कॅम्पवर तात्काळ बोलावले. इकडे पहाऱ्यावर असलेल्या फासेपारध्यास कोणासही सोडायचे नाही अशी आज्ञा दिली. तासाभराने बापूसाहेब महाराज आले. पण पहारेकरी पारध्याने त्याना अडवले. बापूसाहेब महाराज त्यांचेवर रागावले. पण पारध्यांचा ठेका एकच, 'मला महाराजांनी कुणासही सोडू नकोस असं सांगितलंय.' यावर बापूसाहेबांनी आपण महाराजांचे सख्खे भाऊ असल्याचे सांगितले. महाराजांनी तातडीने बोलावल्याचेही सांगितले. तरीही तो पारधी ऐकेना. मग बापूसाहेबांना संताप अनावर झाला. तेव्हा पहारेकरी पारधी म्हणाला, 'महाराजांचा हुकूम मी मोडणार नाही, तुम्हाला आत सोडणार नाही. तुम्हाला जर आत जायचच असेल तर ही घ्या बंदूक. घाला मला गोळी आणि मग खुशाल जावा. महाराजांचे भाऊ आहात म्हणून सांगतो.' इतक्यात महाराज बाहेर आले. बापूसाहेबांना घेऊन गेले. महाराजांच्या मित्रांना काय समजायचे ते समजले. ते मित्राला म्हणाले, 'त्यांच्या अंगावरची घाणेरडे कपडे मी काढू शकतो, त्यांचे मुंडण करून डोक्यातल्या उवाही घालवू शकेन पण तुमच्या डोक्यातल्या विषमतेच्या मनूने ठासून भरलेल्या उवा कोणत्या औषधाने माराव्यात हे मला कळत नाही.'

महाराजांचा गोरगरीबांवर असा भरवसा होता. तो त्यांच्या जीवाचा जिवलग होता. आमच्या या बोलण्याच्या नादात गाडी कराडात पोहोचली. साहेबांसोबत चहा घेतला आणि मी सातारला पळालो. राजर्षी छत्रपती शाहू महाराज हा आम्हा दोघांचा फार विक पॉईंट होता.

ती. सौ. वहिनींना, बाबांना सप्रेम जयभीम.

तुझा,
लक्ष्मणकाका

दिनांक १७/९/२०१२

चि. सुप्रिया,

सप्रेम जयभीम.

चव्हाणसाहेबांना समजून घ्यायचे तर त्यांची जडणघडण समजून घ्यावी लागते. देवराष्ट्रातले त्यांचे घर याला साक्षी आहे. घराचा भोवताल पाहिला तर लक्षात येते की साहेबांचे घर रामोसवाड्यात आहे. धनगरांची घरे, मुसलमानांची घरे, मागासवर्गीयांची घरे भोवताली आहेत. खेड्यातल्या आळ्यांचा विचार केला तर साहेबांचे बालपण या पोरांच्यातच गेलेले आहे. म्हणूनच 'उपरा'तली भाषा त्यांना आपलीच भाषा वाटत होती. एकदा कराडच्या बाहेरून आम्ही संभाजीबाबा थोरात यांच्याकडे जेवायला जात होतो. कृष्णेचा पूल ओलांडला की कार्वे गावात आपण शिरतो. कार्वे तसे फार मोठे गाव. संभाजी बाबा पूर्वी आमदार होते. साहेबांचे परमभक्त. उंचापुरा देखणा माणूस, गोरापान उभ्या चणीचा चेहरा, पांढरेशुभ्र धोतर, पांढरा नेहरू शर्ट, गांधी टोपी, पायात कोल्हापूरी वहाणा, बोलके डोळे नि बोलका माणूस. उभ्या दांडीचे नाक, पांढरेशुभ्र दात, हसले की मोगरा फुलल्यासारखा वाटायचा. संभाजीबाबांबद्दल साहेब मला सांगत होते. त्यांच्या खूप आठवणी, सामाजिक जाण फार उत्तम. संभाजीबाबांचे घर नदीकाठी होते, दोन मजली. बाबांनी आमचे स्वागत केले. माडीवर बैठक होती. गप्पा सुरू होत्या, गावगाड्यातली म्हारकी आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर. तर सुप्रिया, दोघांचा संवाद ऐकण्यासाठी खरेच तुम्ही मुले हवी होता. संभाजीबाबा मोठे अभ्यासू व्यक्ती. वक्ता आणि श्रोता म्हणूनही चौफेर घडण. अत्यंत पुरोगामी, साहेबांचे पक्के अनुयायी. बोलघेवडे नव्हते. ते महारांची कामे सांगत होते, महार म्हणजे हरकाम्या, पट्टीसाठी लोकांना बोलावणे, तगादा लावणे, गावचा वसूल तहसिलात घेऊन जाणे, कागदपत्रे परगावी पोहचवणे. पाटील-कुळकर्णीबरोबर गावात, शिवारात हिंडणे, परगावी जाणे, गावात आलेल्या अधिकाऱ्यांची जनावरे सांभाळणे, दाणापाणी देणे, शेणलिद काढणे, गावांची वेठबिगार वहाणे, वाट दाखवणे, वाटसरूंना जंगलातून नेऊन पोहोचवणे, दवंडी देणे, गावाची शिव व शेताचे बांध ध्यानात ठेवणे, भांडणात

पुरावा देणे, पिके व खळी राखणे, रात्री काळी-पांढरीत गस्त घालणे, गावची जंगल व झाडे जतन करणे, जंगली जनावरे मारणे, चोरवाटा व माराच्या जागा यांची माहिती मिळवणे. आल्यागेल्याची खबर काढणे. वहिमी लोकांची पाटलास खबर देणे, चोरीचा तपास लावणे, माग काढणे, चावडीपुढे, वेशीपुढे व गावचे रस्ते झाडणे, गाव साफ ठेवणे, मेलेले जनावर ओढणे, याशिवाय बरीच काम होती. चव्हाणसाहेब म्हणाले, बाबा, ही झाली गावकीची कामे. अजून खाजगीची कामे राहिली ना? हा साहेब, गावकीची कामे करणाराला काय म्हणत त्याचा एकच शब्द आहे, तो काय बरे? साहेब म्हणाले 'पाडेवार'. हो साहेब, पाडेवार आन् खजगीची कामे करणाऱ्या महाराला राबता किंवा घरमहार म्हणत. वतनदार महाराची कामे खाजगीकडे असत. कुणब्याचे बी औतकाठी या ओझ्याची. औतकाठी यांची ने आण करणे. दारापुढे झाडणे, गुरांचे गोठे साफ ठेवणे, सरपण आणणे, सरपन फोडणे, मुऱ्हाळी जाणे, चिठ्ठ्याचपाट्या परगावी नेणे अगदी सगळ्यांत वाईट म्हणजे मौतीची खबर परगावी पोहचवणे, सरण वाहणे. बाबा शंकरराव खरातांचे सांगावे वाचलेत काय? साहेब म्हणाले. होय साहेब. वाचले, खरेच या लोकांचे दुःख आपल्या लोकांना समजायचे नाही. जावे त्याच्या वंशा तेव्हा कळे. दहादहा कोस मेलेल्या मयताचा सांगावा घिऊन जायचे. तहान-भूक काही असो, महार लांबून दिसला तरी नांदायला गेलेली मुलगी समजून चुकायची काहीतरी अपशकुन आला. तो दारात आला आणि सांगू लागल्याबरोबर रडारड कालवा सुरू व्हायचा. तो महार कसा आला, कसा गेला, पाणी सुद्धा कुणी विचारायचे नाही. शंकररावांच्या कथा मुळातूनच वाचल्या पाहिजेत. तराळ अंतराळ, तराळकी, येस्करकी, आणि मेलेले ढोर ओढणे, त्याची चिरफाड करणे, त्याच्या मांसाचे वाटे घालणे, ते वाळवून ठेवणे. बाबा आपल्या लोकांनी कधी नाही याचा विचार केलाय का? मेलेली ढोरे आपली आपण ओढली का? साहेब विचारत होते. खरे तर हे सारे प्रश्न माझ्या मनात होते. ते साहेब विचारत होते. नुसता कल्पनांनी सुद्धा घाम फुटतोना आपल्याला? मेलेल्या जनावरांच्या अंगावरल्या माश्या कल्पनेने पाहिल्या तरी बाबासाहेबांच्या धर्मांतराचा अर्थ शहाण्याला समजतो. तो आपल्या लोकांना समजत नाही. बरं पिढ्यान्‌पिढ्याची ही घाणीची कामं ज्यांना करायला लावली, ज्यांनी साऱ्या गावाची स्वच्छता करायची त्यांनाच शिवून घ्यायचे नाही. या संबंधी कुणी कधी बंड केल्याचे दाखवा किंवा आपल्या धर्मग्रंथामध्ये अस्पृश्यतेचा साधा निषेध केल्याचे दाखवा. हे बंड बाबासाहेबांना करावे लागले. हे काम कुणी केले असते का? बाबा, आपले लोक विचारच करीत नाहीत. वहिवाटीने जगतात.

चव्हाणसाहेब खाजगी गप्पांतही आपली तळमळ कशी व्यक्त करीत. बाबांचे माझे संबंध चव्हाणसाहेब गेले ना तरी तसेच होते. मी करीत असलेल्या कामांचाही त्यांना फार अभिमान वाटे. बाबासाहेबांनी घटना लिहिली त्याबद्दल त्यांना जगाने सलाम केलाय. पण साहेब त्यांनी केलेले धर्मांतर युगप्रवर्तक नव्हे का? होय बाबा, मला तरी त्यांचे धर्मांतर म्हणजे युगांतर वाटते. त्यांच्या जागेवर आपण उभे राहिलो ना तरच या वेदना, यातना समजतात. जातिव्यवस्थेचे शिळे तुकडे ज्यांच्या वाट्याला आले त्यांनी का म्हणून तिचे समर्थक व्हावे? बाबा खरे सांगू आपण तरी का समर्थक व्हावे? कोकणातल्या माझ्या एका ब्राह्मण मित्रासोबत त्याचे घरी गेलो होते. लहान होतो, पण समजत होतच ना? मला काही माजघरात जाता येत नव्हते की त्यांचेबरोबर जेवता येत नव्हते. बाहेर पडवीत मला जेवावे लागले. जेवल्यावर माझे ताटही मीच घासले आणि जेथे बसलो होतो ती जागाही सारवावी लागली होती. अर्थात माझा मित्र माझ्या सोबतच बाहेर जेवला आणि सारवूही लागला ते वेगळे. प्रण तो जो सल मनात राहिला ना तो तसाच आजही इतक्या वर्षांनी राहिला आहे. आपल्याला कुणीतरी तुच्छ लेखते आहे. आपला स्पर्श अशुद्ध आहे. ही भावनाच मोठी दुःख देणारी आहे.

संभाजीबाबा म्हणाले, साहेब, आजही तसेच आहे. अस्पृश्यता ही पायरीपायरीने पाळली जाते. आमच्या गावातल्या मंदिरात गर्भगृहात पूर्वी आम्हाला जायला बंदीच होती. तेथे ब्राह्मण असे. आणि तेथेही गम्मत होती. मंदिर स्वच्छ ठेवायचे, धुऊनपुसून घ्यायचे ते गुरवाने. जोवर मंदिर धुऊनपूसून होत नाही तोपर्यंत ब्राह्मण देवळात जात नसे. सारे झाले की ब्राह्मण गुरवाला विचारी, झाले तुझे, पुसून टिपून झाले. ये बाहेर, मग उंबऱ्यावर आपल्या कमंडलूतले पाणी मंत्र म्हणीत टाकी. गाभाऱ्यातही पाणी शिंपडे. मग देऊळ शुद्ध झाले! पुन्हा ब्राह्मण असेपर्यंत गुरवही गर्भगृहात जात नसे. मग कुणबी तर कुठले? ते गर्भगृहाच्या उंबऱ्यापर्यंत. बाकी सारे सवर्ण लोक मंदिराच्या मंडपात असत. अस्पृश्य लोक मंडपाबाहेर पायरीच्या पलिकडे उभे असत.

मी मध्येच म्हणालो, बाबा, जरा एक मिनिट. चव्हाणसाहेब जरा चमकले, हा काय बॉम्ब टाकेल म्हणून. गावातले नेते म्हणवणारेही होते ना गप्पांमध्ये. मी बाबांना विचारले, की 'बाबा, मंदीचा पाया कोण काढते. दगडी चिरे कोण घडवते? मंदिराचे बांधकाम कोण करते? ती सुंदर लेणी, सुंदर नक्षीकामे कोण करते? आणि सुंदर खांब कोण करते? आणि शिखरांपासून कळसांपर्यंत सारी कलाकुसर कोण करते? देवाची सुंदर मूर्ती कोण करते? सभामंडप कोण बांधते? सांगा ना.'

बाबा म्हणाले, कारागीर

बाबा कारागीर अशी जात आहे का?

नाही, पाथरवट, वडार, कैकाडी ही कामे करतात. पाया खोदण्याचे काम कैकाडी, त्याची गाढवे करतात. दगड फोडणे, चिरे करणे, कोपरे घडवणे, बांधकाम करणे अगदी कळसापर्यंतची कामे पाथरवट करतात.

बाबा यापैकी कुणाला मंदिर बांधून झाल्यावर मंदिरात जाता येते? आम्हीच छन्नी हातोड्यांनी दगडाने कोरतो ना तो देव? म्हणजे त्याचे बाप कोण? आम्हीच ना? पण तुमचा भटजी येतो, त्याच्या तांब्यातले पाणी शिंपडतो, मंत्र म्हणतो आणि तुमचा भित्रा देव मंत्रांना घाबरून आम्ही घडवलेल्या मूर्तीत प्रवेश करतो. त्याला प्राणप्रतिष्ठा असे सुंदर नाव देतो. आणि ज्या क्षणाला देव दगडात प्रवेश करतो त्या क्षणाला आमची हकालपट्टी होते. मग मात्र आम्ही काही पायरीला शिवू शकत नाही. त्या देवाला आम्ही घडवले हे त्यास कळत कसे नाही. साधा स्पर्श झाला तरी मरणाचा मार खावा लागतो. बहिष्कार पडतात. अन्याय, अत्याचार होतात, बाबा, हजारो वर्षे हे चालू राहते. यात कुणाला अन्याय वाटत नाही. तेहतीस कोटी देव आम्हाला समजू शकले नाहीत ते काम बाबासाहेबांनी केले.

गावकरी लगेच म्हणतात. साहेब पाने वाढलीत चला. दोन घास घ्या. मग चर्चा चालू दे. आम्ही सारे उठलो. जेवायला बसलो. साहेबांच्या आणि संभाजीबाबांच्या मध्ये साहेबांनी मला बसवले. लक्ष्मणचा हा परखडपणा बाबा आपल्या लोकांना थोडा टोचेल, पण सत्यच आहे ना? जेवणे झाली. आम्ही कराडला परत निघालो. साहेब आता कोणत्याच सत्तेच्या जागेवर नव्हते. लाल दिव्याची गाडी नव्हती. दिमतीला कुणी भालदार, चोपदार नव्हते की अफाट गर्दीही नव्हती. तुरळक माणसे असत. त्यांच्याच वयाची. मित्र म्हणावीत अशी. उगवत्या सूर्याला नमस्कार करणारेच फार. आम्ही त्यांच्या घरी आलो. साहेब, विश्रांती घेणार का थोडावेळ? शामराव म्हणाले, नाही, नाही. लक्ष्मणराव, मी जाऊन येतो तोवर तुम्ही थांबा. कुणीतरी बरोबर असलेले बरे. मी हो म्हणालो. शामराव बाहेर गेले.

लक्ष्मण, माझ्या मनात आहे, बाबासाहेबांचे चरित्र लिहावे. त्या निमित्ताने त्यांचे सारे ग्रंथही वाचून होतील. सलगपणे. साधनांची जमवाजमव करतो आहे. काँग्रेसने त्यांचेवर तसा फार मोठा अन्याय केला आहे. आमचे अनेक सहकारी त्यांना राष्ट्रद्रोहीसुद्धा म्हणत असत. ते गांधींच्या, काँग्रेसच्या विरोधी भुमिका घेत. ती ठामपणे मांडत. संघर्ष करीत, तेव्हा आम्हाला स्वातंत्र्य महत्त्वाचे होते. त्यामुळे त्यांचे असे वागणे हे इंग्रजधार्जिणे वाटावयाचे. इंग्रजांची फोडा, झोडा नि राज्य करा ही नीतीच होती. त्यात आम्हाला म्हणजे काँग्रेसला राजकारण दिसायचे.

आमचे बहुसंख्य नेते म्हणवणारे उच्च, मध्यम वर्गातले तरी होते किंवा शहरांमध्ये वाढलेले परदेशात शिकलेले तरी होते. त्यांना डॉ.आंबेडकर डोकेदुखी वाटत असत. खुद्द गांधीबद्दल कितीही प्रेम असले तरी ग्रामरचनेबद्दल किंवा जातींच्या उतरंडीबद्दलची त्यांची मते मला पटणारी नव्हती. माझ्या घरात सत्यशोधकांचा वारसा होता. त्यातून अस्पृश्यता, जातींची उतरंड, त्यातला कोंडमारा मला समजत होता. संधी मिळाली तेव्हा मी जाणीवपूर्वक काही निर्णय केले. डॉ.आंबेडकरांनी सभागृहात अनेकदा महार वतने खालसा करण्याची बिले आणली, पण ती पास झाली नाहीत. ती संधी मला मिळाली. पहिल्यांदा मुख्यमंत्री झालो आणि डॉ.आंबेडकरांचे कैक वर्षांचे स्वप्न मी पुरे केले. ज्या वतनाच्या गुलामीमुळे सारा अस्पृश्य समाज वेठबिगारीला जुंपला होता ती जन्मोजन्मीची वेठबिगारी नष्ट झाली. एवढेच नव्हे तर या जमिनीसाठी अस्पृश्यता पाळली जाणार नाही, ती कुणीही ताब्यात घेणार नाही, याचीही कायद्यात तरतूद केली.

१९५६ साली बाबासाहेबांनी धर्मांतर केले. आणि धर्मांतरीत झालेल्या बांधवांच्या सवलतींचा मोठा पेच निर्माण झाला. १९५८-५९ चा सुमार असेल. लक्षावधी लोकांनी धर्मांतर केले होते. हिंदू धर्माचा त्याग करून ते बौद्ध धम्मात गेले होते. मागासवर्गीयांना अनुसूचित जाती म्हणून घटनेनुसार मिळणाऱ्या सवलती द्यायच्या का असा प्रश्न माझ्या मंत्रिमंडळासमोर आला. घटनेचे तसे बंधन नव्हते. डॉ.आंबेडकरांचा काँग्रेसविरोध आणि आता धर्मांतराचा प्रक्षोभक निर्णय यामुळे प्रचंड नाराजी मंत्रिमंडळात होती. प्रस्ताव मांडल्याबरोबर खूपच गरमागरम चर्चा झाली. बहुसंख्य सदस्य सवलती देण्याच्या विरोधात होते. माझ्याबरोबर दोन-तीन सदस्य होते. बाकी सारे विरोधी. धर्मबदल झाला म्हणून लगेच मागासलेपण गेले असे होत नाही. मी परोपरीने समजावीत होते. कायदेशीर, घटनात्मक बंधन नसेलही कदाचित, तरी नैतिक व सामाजिकदृष्ट्या सवलती चालू ठेवणेच न्यायाचे आहे असे माझ्या सद्सदविवेकाला वाटते. मी समजावण्याचे प्रयत्न केले. मीच अल्पमतात होतो. क्षणभर मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा द्यावा असेही वाटले, पण विषय स्थगित ठेवण्याचा प्रस्ताव आला. मी प्रधानमंत्र्यांशी बोलावे, ते काय म्हणतील तसे करावे असे ठरले. माझा जीव भांड्यात पडला. मी दिल्लीत जाऊन पंडितजींशी बोललो. त्यांनी सारे ऐकून घेतले नि सवलती चालू ठेवण्याच्या बाजूने कौल दिला. मी तसे मंत्रिमंडळाच्या बैठकीत मांडले आणि बौद्धाच्या सवलती चालू ठेवण्याचा ऐतिहासिक निर्णय झाला. बाबासाहेबांच्या स्वप्नाला मला थोडीशी साथ देता आली याचा फार मोठा आनंद होता. नागपुरातल्या ज्या जागेवर बाबासाहेबांनी आपल्या लक्षावधी अनुयायांना बौद्ध धर्माची दीक्षा दिली ती

दीक्षाभूमीची जागा आणि स्मारक उभे करण्यास मदत केली.

१४ एप्रिलला माझ्या आयुष्यात फार महत्त्व आहे. तो बाबासाहेबांचा जन्मदिवस आणि या दिवशी मी माझ्या संसदीय कामाला सुरुवात केली. मी पहिल्यांदा संसदीय सचिव म्हणून १४ एप्रिललाच कामाला सुरुवात केली. माझे राजकारण १४ तारखेला सुरू झाले. हा माझ्या आयुष्यातला मोठाच आनंदाचा दिवस होता. १४ एप्रिल या बाबासाहेबांच्या जन्मदिनी सर्वांना आनंद साजरा करता यावा म्हणून मी सुट्टी जाहीर केली.

दादासाहेब गायकवाडांबरोबर माझी छान मैत्री होती. माणूस फार मोठ्या दिलाचा. मी संरक्षणमंत्री म्हणून दिल्लीला गेलो. आता मला खासदार व्हायचे होते. नाशिकची जागा रिकामी होती. नाशिकला दादासाहेब गायकवाड होते. त्यांचेकडे गेलो, गप्पा झाल्या. त्यांना मी संरक्षणमंत्री झाल्याचा खूप अभिमान. त्यांना मी माझ्या मनातली गोष्ट बोललो. त्यांच्यासाठी, त्यांच्या संस्थांसाठी काही करण्याचा मी प्रस्ताव दिला. त्यावर ते उसळून म्हणाले,

'यशवंतराव, असल्या गोष्टी सोडा. तुम्ही देशाची शान आहात. इथून बिनविरोध जाल. यासाठी हा आता कामाला लागतो. पण नाशिकला विसरू मात्र नका. पोराबाळांना हाताला काही कामं मिळतील आसं मात्र करा.'

या माणसाने कधी चहाचा कप घेतला नाही. मी बिनविरोध निवडून आलो. मीही माझा शब्द पाळला. थोड्याच दिवसांत मिग विमानांचा कारखाना ओझरला निघाला.

शामराव गावातून जाऊन त्यांचे काही काम होते ते करून परत आले. मी साहेबांचा निरोप घेतला. पुढे साहेब गेले आणि बाबासाहेबांचे चरित्र लिहिण्याचा त्यांचा संकल्पही अपुराच राहिला.

ती. सौ. वहिनींना, बाबांना सप्रेम जयभीम.

तुझा,

लक्ष्मणकाका

दिनांक १८/९/२०१२

चि. सुप्रिया,

सप्रेम जयभीम.

त्यादिवशी सकाळी सकाळी अप्पासाहेब भोसले यांनी गाडी पाठवली. साहेबांनी पुण्यास बोलावले आहे. तेथे दिवसभर तुम्ही बरोबर राहाल. सायंकाळी मुक्कामाला सातारला यायचे आहे. मी पटकन उरकले आणि पुण्याला गेलो. साहेब पुण्यात दादांच्या बंगल्यावर उतरले होते. चतुश्रृंगीच्या पायथ्याशी त्यांच्या पुतण्याचा बंगला होता. तेथे पोहाचलो. मी पहिल्यांदाच त्यांचे पुण्यातले घर पाहत होतो. चहा झाला. आम्ही नगरला कसल्यातरी कार्यक्रमाला निघालो होतो. त्यासंबंधी किंवा कोणाकडे जायचे आहे यासंबंधी फारसे बोलले नाहीत. त्यांना कदाचित राजकारण या विषयाचा विट आला असेल असेही शक्य आहे.

नेहमीसारखी चौकशी झाली. लक्ष्मण, या तुमच्या पंचायती चालतात त्यासंबंधी मला जाणून घ्यायचे आहे. तुम्ही बोलायचे मी ऐकायचे.

साहेब, आपणास ते कंटाळवाणे होईल.

नाही नाही ते मी संवादीत करेन.

साहेब, माझी गंमत आहे. मी सातवीपर्यंत या लोकांमध्ये होतो. पोटापाण्यासाठी, शिक्षणासाठी आईवडिलांना सोडून मी या समाजापासून दूर गेलो. तो पुन्हा 'उपरा' लिहीपर्यंत माझा या जमातींशी संपर्कच तुटला होता. आता पुन्हा मी वाड्यावस्त्या, पालांवर, बिऱ्हाडांवर, हिंडतो आहे. परिस्थिती तीच आहे. जिथे मी यांना सोडले तिथेच ते आहेत. आमच्या पंचायती म्हणजे आमच्या जातींचे सरकार आहे. ते त्या त्या जातीचे सामाजिक जीवन नियंत्रित करते. पंचायतीचे पुढारी जन्माने ठरत नाहीत; ते गुणाने ठरतात. सरपंचाचा मुलगा सरपंच असे नसते. जो न्यायबुद्धीचा आहे, बोलका आहे, बुजुर्ग आहे तो पंच होतो. पंच पाचच असतात. पाचांपैकी तिघे जे मत देतील ते मत मान्य केले जाते. पंचायतीला व्यक्तीच्या जीवनात फार महत्त्व असते. जन्मापासून मृत्यूपर्यंत सारे जगणे या पंचायतीच्या हाती असते. कैकाडी जन्माने कैकाडी होत नाही. वडार, लमाण,

त्या त्या जातीत जन्मला म्हणून तो त्या जातीचा होत नाही. इतर जातीच्या लहान मुलालाही जातीत घेता येते.

म्हणजे आपसातल्या जातीत की कोणत्याही?

कोणत्याही जातीतल्या माणसाला कैकाडी होता येते, पण पंचायतीने त्याला जातीत घ्यावे लागते. मला नाही का शशीबरोबर दोनदा लग्न करावे लागले. एकदा कायद्याने आणि एकदा मामाने तिला दत्तक घेतले. मांडीवर बसवून साखर भरवली, म्हणजे रोटीबेटी व्यवहार होतात. अशा शक्यतो लहान मुलाला जातीत घेतात. त्याला भाषा शिकवतात. कोणीही त्याला मुलगी देतो. त्यास उरसांड घेणे असे म्हणतात. आमच्या जमाती बंदिस्त नाहीत. मुले कोणत्याही महिन्यात जन्मली तरी त्यांची नावे ठेवली जातात ती शिमग्याला. होळी हा बंजारा समाजात मोठा सण समजला जातो. त्यांची बारशी त्या सणाला होतात. कुणाची ती आषाढीत होतात. आषाढी पौर्णिमेला मोठ्या प्रमाणात नामकरणविधी होतो. आषाढात मोठ्या प्रमाणात लग्नेही होतात.

अरे! गंमतच आहे. आमची लग्ने आषाढात होत नाहीत. श्रावणात तर तोंडही पाहत नाहीत.

आमचे तसे नाही. आषाढात पाऊस असतो. एका जागेला काही दिवस तरी राहावेच लागते. आषाढी जत्रा असतात. सारे मातृपूजक. मातृदेवतांच्या यात्रा याच महिन्यात होतात. नामकरणविधी झाल्याशिवाय त्याला पंचायतीत बसता येत नाही. आषाढी पौर्णिमेला सर्व लहान मुलांना पंचायतीपुढे त्याचे त्याचे मामा उभे करतात. हा मुलगा यांचा आहे, हा माझ्या बहिणीचा आहे, याला समाजात घ्यायचे आहे. आपली परवानगी असावी. असा पंचायतीसमोर प्रस्ताव येतो. सरपंच त्या मुलाच्या आईवडिलांना पंचायतीपुढे बोलावतो. या दोघांचा हा मुलगा किंवा मुलगी आहे. याला समाजात घ्या असे म्हणणे आहे. कुणालाही काही म्हणायचे आहे का? सारी जमलेली माणसे गप्प बसली, कुणी काही बोलले नाही तर सरपंच दुसऱ्यांदा तोच प्रश्न विचारतो. पुन्हा शांतच बसले तर सरपंच तिसऱ्यांदा विचारतो. तरी कुणाला काही म्हणायचे नाही म्हटल्यावर मामाला परवानगी देतो. मुलांचे आईवडील आनंदाने मामाला पोशाख करतात. मुलाला मामाच्या मांडीवर बसवतात. मामा या मुलाचे जावळ काढतो. सौर करतो-चकोट गोटा. मुलगी असो की मुलगा, सारे केस काढतात. मुलाला नवे कपडे दिले जातात. पंचायतीला जेवण घातले जाते. मुलाचे नाव घोषित होते. सर्व मुलांचे सार्वजनिकरीत्या बारसे होते. कधी गोडाचे जेवण असते तर कधी बकरे कापले जातात. मामाच मुलाचा मालक असतो. आईबाप नाही. बहिणीच्या लग्नात काही विघ्न आले तर मामाच

मुलाचे सारे करतो.

पंच पाचच का असतात?

पाचामुखी परमेश्वर.

असे होय, छान.

लग्न ठरवणे, लग्न लावणे, लग्न मोडणे म्हणजे सोडचिठ्ठी घेणे, तंटेबखेडे सोडवणे हे सारे पंचायत करते. जेव्हा निर्णय होत नाही तेव्हा मढी, माळेगाव, जेजुरी येथील जत्रांमध्ये महा पंचायत भरते. तेथेही निकाल झाला नाही, दोन्ही पक्षकारांना तो पटला नाही तर आणखी एक आपील असते ते त्या तांड्यातल्या सर्वांत वृद्ध असलेल्या आजीकडे. तिला म्हणतात भ्यार अम्मा. आमच्या भाषेत असे वेगवेगळ्या जमातीत शब्द वेगळा असेल पण अंतिम निर्णय तिचा असतो. तिला सर्व तंटा सांगितला जातो. तो ती ऐकते आणि निर्णय देते. तो अंतिम असतो. त्याला अपील नाही. पटण्या न पटण्याचा विषयच नसतो. सारे श्रद्धापूर्वक निकाल ऐकतात आणि अंमलबजावणी होते. कायदे मोठे कठोर असतात. स्त्री-पुरुष संबंध मुक्त असतात. बंदिस्त नसतात. कोणत्याही स्त्रीला कोणत्याही क्षणी घटस्फोट मागता येतो. तेथे वयाचा प्रश्न नाही. कोणत्याही वयाच्या स्त्रीला तो मागता येतो. लगेच दुसरे लग्न करता येते. मुले अर्थातच मामाकडे जातात. त्याने आमच्या या जमातीमध्ये बलात्कार नाही, अत्याचार नाही, अनैतिक संबंध नाहीत. याला परवानगीही नाही. फार जबर शिक्षा आहेत. याउलट काडीमोड सोपी आहे. कितीही लग्ने करता येतात. योनीशुचितेच्या नसत्या फालतू कल्पना नसतात. विधवा कोणी राहतच नाही. नवऱ्याने सोडून दिले आहे असले काही नसते. साहेब, परवा एक गमतीचा प्रसंग घडला, सांगू का?

हं, सांगा ना.

पुण्यातल्या स्वारगेट एस.टी.स्टॅन्डवर सारे वैदू रात्री मुक्कामाला असतात. दिवसभर पेट्या चाळणी, डबे, दुरुस्त करणारे पुरुष आणि घरोघर कटलरी विकणाऱ्या स्त्रिया. दिवसभर भिक्षा मागून जगत असतात. रात्रीचा मुक्काम असतो एस.टी.स्टॅन्डवरल्या मोकळ्या जागेत. अगदी बारा महिने हे लोक असेच उघड्या जागेवर झोपतात. स्त्रिया-पुरुष आपआपल्या कुटुंबाचे नीतीनियम फार कडक पाळतात. जातपंचायत फार जागरूक. आपले यल्लाप्पा वैदू गुरुजी सातारचे. ते यांचे पंचप्रमुख. परवा गुरुजी आले ते घाईघाईने. मला म्हणाले, चला, एका पंचायतीला जायचे आहे. मोठा चमत्कारिक पेच आहे. पण मी कशाला? चला तुमचीपण गरज आहे. असला प्रसंग माझ्या तीस-चाळीस वर्षांत पंचायतीत आला नव्हता. हडपसरच्या एका मोकळ्या जागेवर आम्ही पोहाचलो. शंभर-दोनशे लाल

फेटेवाले पुरुष, आखुड धोतरे, अंगात नुसत्या बंड्या, सारेच्या सारे काठीसारखे लांबसडक. स्त्रिया काष्टा घातलेल्या, नऊवारीतल्या. डोक्यावर पदर, दाताला बहुतेकजणींनी दातवाण लावलेले त्याने सर्व स्त्रियांचे दात जांभळे. कपाळावर, गालावर गोंदलेले. गुरुजी व मी पोहोचलो. गुरुजींच्या नावाच्या घोषणा सुरू झाल्या. साहेब हा माणूस या अडाण्यांच्या पंचायतीत तोंडाला फेस येईपर्यंत बोलतो. तासन् तास, दिवस दिवस. आम्ही गेल्याबरोबर सारे लगेच गोलाकार बसले. स्त्रिया-पुरुष आमच्या पंचायतीत बसतात. गुरुजींना लोकल पंचाने आरोपीसमोर उभे केले. नुकतेच लग्न झालेली, दोन तरुण जोडपी. पंचायती समोर उभी राहिली. नितळ काळ्या रंगाच्या दोन तरुण मुली आणि दोन तरुण मुले. यांनी काय केले असेल? मी उत्सुकतेने ऐकू लागलो. त्यांच्या तेलगू भाषेत गुरुजींना सारी हकीकत पंचाने सांगितली. रस्त्याने वाहतूक चालू होती. लोकांची वर्दळ होती. त्यातल्या कुणालाही काय चालले आहे ते समजत नव्हते. गजबजलेल्या शहरात एखादे स्वतंत्र मानवी बेट असावे तसे यांच्या जातीपुरते बेट होते. गुरुजी त्यांचे नाईक होते. गुरुजी मला हळू आवाजात मराठीतून सांगू लागले. एक वर्षापूर्वी या दोघा पोरांशी या दोन पोरींनी लग्न केली. पंचायतीत मीच लग्न लावली. आमच्या लग्नाला ब्राह्मण येत नाही. मीच लग्न लावतो. सत्यशोधक पद्धतीने. यांचेही लग्न झाले, संसार सुरू झाला. आमचे लोक एकत्र हिंडतात पाचपन्नास बि-हाडे असतात. या दोन्ही जोड्यांचे संसार सुरू झाले, पण एक विचित्र गोष्ट घडू लागली. दिवसभर या पोरी आपआपल्या नवऱ्याबरोबर असायच्या. सारे व्यवहार उघड्यावर, रात्री मात्र उलटे व्हायचे ही मुलगी त्याच्याकडे आणि ती मुलगी याच्याकडे! चौघांना सारे काही ठाऊक होते. एक-दोनदा पंचाकडे तक्रार आली, पण हे काही कबूल करत नाहीत आणि आता लोकांच्या लक्षात आले आहे. काय करायचे? दोन्ही घरे, त्यांचे आईबाप, नातेवाईक सारेच कायद्याने अडचणीत आलेत. काय करायचे? ही पोरे तर कबूल होत नाहीत. मोठा पेच. कालवा, भांडणे, हमरीतुमरीवर. गुरुजी मध्ये पडले. साऱ्यांना एका जागेवरून हलायचे नाही असा हुकूम दिला. सारे गप्प एका जागेवर बसून राहिले. गुरुजी मला म्हणाले, चला. आम्ही शेजारच्या टपरीवर गेलो. गुरुजींनी दोन्ही पोरींना बोलावले. हळूहळू मराठीतून विचारू लागले, तुमचे आपण तुमच्या पसंतीच्या मुलाशी लग्न लावून देवू. पण खरे काय ते सांगा.

पोरी मोठ्या बोल्ड वाटल्या. त्या न घाबरता, न संकोचता सांगू लागल्या, की ही सारी चूक आमच्या आईबापांची आन् मामांची आहे. आम्ही पोटात असतानाच पोटाला कुंकू लावून लग्न जुळवली होती. आम्ही मोठे झालो. आम्हाला यातले काही माहिती नव्हती आन् पोटातल्या भाजीचे लग्न.

पोटातली भाजी? साहेब कुतूहलाने म्हणाले.

होय, पोटातली भाजी. म्हणजे मूल पोटात राहिले याची खात्री पाचव्या महिन्यात करतात. पाचव्या महिन्यात माझ्या मुलाला तुझी मुलगी दे असे मामा बहिणीला म्हणतो. तिने ते मान्य केले की तिच्या ओटीपोटाला कुंकू लावले जाते. खणानारळाने ओटी भरली जाते आणि हा लग्नविधी झाला असे समजले जाते.

आता पण मुलगीच होईल कशावरून?

हां. मुलगी झाली तर हा विधी लागू होणार. मुलगा झाला तर नारळ पावला.

साहेब मोठ्याने हसू लागले. काय रीती असतात नाही.

हां. तर पोरी सांगत होत्या, मामांच्या पोरांना आम्हाला द्यायचे हे आम्ही पोटात असतानाच ठरले होते. आम्ही मोठे झालो. आमचे जोडीदार आम्ही निवडले. प्रत्यक्षात आमचे लग्न ठरू लागल्यावर आम्ही घरी सांगायला हवे होते. आम्ही दोघांनी आयांना सांगायचा प्रयत्न केला. पण आपल्या भावाची वाट चालू ठेव म्हणून रडू लागल्या. आमचे कुणी ऐकतच नव्हते. आम्ही चौघेजण लग्नाअगोदरही एकत्रच हिंडत होतो. चौघांना सारे माहीत होते. जमात ऐकायला तयार नव्हती. आम्ही चौघांनी ठरवले. आपसात एकमेकाला बाटवायचे नाही. यल्लमा आईला साक्षी ठेवून लग्ने केली. त्यानं आज बी आम्ही एकमेकास्नी फशीवलं न्हाई. पण जातीरिवाजात बसत न्हाई. तुम्हीच वाट दाखवा. मग फिरवाफिरवी करण्याचे ठरले. सारा गुंता उलगडला होता. जातीरिवाजानं पंचायत पुन्हा सुरू झाली. दोन्ही जोडप्यांची काडीमोड गुरुजींनी केली. आणि तिथल्या तिथे जोड्या फिरवून पुन्हा लग्ने लागली. दोन्ही जोड्या खूष होत्या. आईबाप नाराज होते. पंचायतीला मोठे जेवणे घातले.

लक्ष्मण, आपल्या समाजात असे कधी होईल का? हे गरीब लोक, पण किती निर्मळ! साहेब म्हणाले.

साहेब, आमच्या समाजात मुलीला निवड करण्याचे स्वातंत्र्य असते. पुरुषाला नाही. मुलीला हुंडा द्यावा लागतो. मुलाला नाही.

आता आम्ही नगरला आबासाहेब निंबाळकरांच्या घरी पोहोचलो होतो. मी साहेबांचा निरोप घेतला. त्यांचे काही कार्यक्रम होते. सायंकाळी पाच वाजता भेटू म्हणाले. मी संघटनेच्या कामासाठी नगरमधील कोल्हाटी समाजातल्या लोकांकडे गेलो. माझे तिथले सहकारी दि.स. वैद्यगुरुजी मला घेवून जायला आले होते. मी भिंगारला वैद्य गुरुजींकडे गेलो. जेवण झाले. पाच वाजेपर्यंत मी माझी कामे केली. पाच वाजता पुन्हा साहेबांसोबत आबासाहेबांच्या घरी भेटलो. आता पुण्याकडे

पुन्हा प्रवास सुरू झाला. साहेब सांगू लागले,

लक्ष्मण, १९४३ साल असावे. त्यावेळी मी भूमिगत होतो. बेचाळीसची चळवळ जोमात होती. मला पकडून देणाऱ्याला मोठे इनाम सरकाने जाहीर केले होते. पुण्यातल्या दारूवाला पुलाजवळच्या गोसावपुऱ्यात बबन गोसावी यांच्या घरात मुक्कामाला होतो. दिवसभर घरात बसून राहायचे आणि रात्री बाहेर पडायचे. जानेवारी महिना होता. मला अचानक निरोप आला, वेणूबाईंना अटक झाली. त्यांना कराडच्या तुरुंगात ठेवले आहे. १४ जानेवारीला माझ्या लग्नानंतरच्या पहिल्या संक्रातीला वेणूबाईंना तुरुंगात जावे लागले होते. लग्नानंतर पहिल्याच संक्रातीला पत्नीला तुरुंगात जावे लागले. खूप यातना झाल्या. वेणूबाईंनी कराड, इस्लामपूर येथल्या तुरुंगात सहा आठवडे काढले. बंधू गणपतरावही तुरुंगात. मी असा भूमिगत. गणपतरावांना सोडवून आणण्यासाठी थोरले बंधू ज्ञानोबा यांनी पाठीवरील गळूची शस्त्रक्रिया करून घेतली. त्याचे सेप्टिक झाले. त्यातून निमोनिया झाला आणि अवघ्या आठ-दहा दिवसांत त्यांचे निधन झाले. आईला भेटायला जायला जीव उतावीळ झाला होता, पण जाता आले नाही. लक्ष्मण, त्यावेळी आम्हाला स्वातंत्र्य मिळवण्याचे एकच ध्येय होते. 'पत्री सरकार' या आमच्या बेचाळीसच्या चळवळीकडे साऱ्या देशाचे लक्ष लागले होते. घरातले आजार, अडचणी या सर्वांना वेणूबाई धैर्याने तोंड देत होत्या. तुरुंगातून सुटल्याबरोबर त्यांनी ज्ञानोबांची सुश्रूषा केली. दीराच्या निधनाचा धक्का बसून त्या स्वतः आजारी पडल्या, बेशुद्ध पडू लागल्या. मी सारखी माहिती घेत होतो. मध्यस्थामार्फत त्यांना पुण्यात आणवले. चांगल्या वैद्यांना दाखवले आणि फलटणला माहेरी पाठवून दिले. मी पुण्यातला मुक्काम हलवला. घोडनदीला म्हणजे शिरूरला गेलो. ओळखपाळख काही नव्हती. वेशांतर केल्याने कुणी ओळखण्याचा प्रश्न नव्हता. बाजारपेठेत एक शिंपी कपडे शिवीत होता. त्याचे पुढून दोन-तीन वेळा पुढेमागे गेलो. त्याने मला जवळ बोलावले. मी खरे काय ते सांगितले. त्याला संतोष झाला. तो म्हणाला, चला माझ्याबरोबर. बोळाबोळातून तो एका घरी मला घेऊन गेला. हे माझे घर तुम्हाला पहिजे तेवढे दिवस राहा. गरिबाघरची मीठ-भाकरी खा. मी चांगला आठ-दहा दिवस राहिलो. फार प्रेमळ कुटुंब होते. पुढे मी मुख्यमंत्री झालो. शिरूरला एका कार्यक्रमाला गेलो होतो. मी माझी सारी आठवण शिरूरच्या सभेत सांगितली. आता ते गृहस्थ कुठे असतील माहीत नाही असे म्हणालो. आणि सभेतून एक हात वर आला. साहेब, हा मी येथे आहे, तो शिंपी म्हणाला. मला खूप आनंद झाला. कार्यक्रम संपल्यावर तो येऊन भेटला. खूप गर्दी होती. या माणसाने मला काहीही मागितले नाही. विचारूनही अडचणी सांगितल्या नाही. साहेब, तुम्ही मंत्री झाला. मला लक्षात

ठेवले हेच खूपखूप झाले. असे म्हणून गर्दीतून बाजूला झाला.

आमची गाडी आता शिरूरजवळ आली होती. घोडनदी ओलांडली. हे बाळूताई खरेंचं गाव, बाळूताई खरे म्हणजे आपल्या मालतीबाई बेडेकर.

साहेब, त्या शिंप्याचे पुढे काय झाले?

हां. मी आणि माझे स्वीय साहाय्यक डोंगरे यांचे असे काही जमले होते की विचारू नका. नुसत्या नजरेवरून डोंगरेंना पुढचे कळत असे. तात्काळ डोंगरेंनी त्यांना गाठले, बोलते केले. त्यांना मॅट्रिक झालेला मुलगा होता. नोकरी नव्हती. घरची गरिबी तशीच होती. डोंगरेंनी खिशातून तीन-चारशे रुपये बाहेर काढले. हातावर ठेवले. मुलांना खाऊ न्या म्हणाले. एका कागदावर मुलाचे नाव शिक्षण लिहून आणले होते. मी तात्काळ नगराध्यक्षांना जवळ बोलावले. त्याच्या हाती तो कागद दिला आणि त्याला सांगितले लगेच जिल्हापरिषदेत जा. अध्यक्षांना भेटा. या मुलाच्या योग्यतेचे काम द्या नि मला फोन करून कळवा असे सांगितले. त्या ऋणातून उतराई होण्याचा अल्पसा प्रयत्न केला.

साहेब, वेणूताईंची तुमची केव्हा भेट झाली?

नाही, त्यानंतर त्या खूपच आजारी पडल्या. फलटणहून मला निरोप मिळाला. मी भाड्याची टॅक्सी केली. रात्री निघालो व फलटण गाठले. वेणूबाईंना फार बरे वाटले. मी आलोय यानेच त्यांचा आजार पळाला असे त्यांना वाटले. डॉ.बर्वे यांनी त्यांची जबाबदारी घेतली. एक रात्र राहून लगेच परतायचे असे ठरवून गेलो होतो. पण दुपारीच फलटणच्या पोलिसांनी घराला गराडा घातला. मला अटक झाली. फलटण संस्थानच्या तुरुंगात टाकले. आई भेटायला आली. मला खूप आनंद झाला. तिचे सांत्वन मी काय करणार होतो. आठ-दहा दिवसांनी मला साताऱ्च्या जेलमध्ये हलवण्यात आले. तेथे मला सत्याग्रहींसोबत न ठेवता एका अट्टल दरोडेखोराबरोबर ठेवण्यात आले होते. हे खरे मला तुम्हाला सांगायचे होते, पण मध्येच आपण खाजगीकडे गेलो. त्या दरोडेखोराचे नाव होते म्हातारबा रामोशी. गुन्हेगार असूनही माणूस मोठा रूबाबदार, देखणा आणि उंचापुरा, टापटिपीत राहणारा. अत्यंत सरळ, स्वच्छ बोलणारा, दरोड्यात स्त्रियांवर हात टाकायचा नाही. दरोड्यातला चौथा वाटा गोरगरिबांना वाटून टाकायचा. कोयना नदीच्या काठचा हा रामोशी. मोठा दरारा. कुणाची काही अत्याचारी वागण्याची पद्धती असली की हा तेथे हजर होणार. कोणत्याही समाजातल्या स्त्रीच्या अब्रूचा प्रश्न निर्माण झाला की हा कर्दनकाळ. गोरगरिबांना, अडल्यानडल्यांना हा म्हातारबा आधाराला. टाचेने भिंती चढायचा म्हणतात. सारी राखण यांच्याकडे होती. मी रामोसवाड्यातच लहानाचा मोठा झालो. अनेक रामोशी लहानपणी माझे मित्र

होते. ते बिचारे तेथेच राहिले. पण आज मोठे अपराधी वाटते. 'उपरा' वाचेपर्यंत यांचा कधी विचारच आला नाही डोक्यात. समाज म्हणून ही माणसं काय आहेत, कशी जगतात, या गोष्टीत शिरलो नाही, याची मोठी खंत आहे.

गाडी साहेबांच्या दारात होती.

या लक्ष्मण, चार चार घास जेवूया.

नको साहेब, तुम्ही खूप दमला आहात. मीही निघतो.

बरं या.

सुप्रिया, यशवंतरावांना जाऊन अठ्ठावीस वर्षे झाली. पण एखादा दिवसही असा गेला नाही जेव्हा मी त्यांना आठवले नाही, त्यांची आठवण झाली नाही. खरे तर देण्यासारखे त्यांच्याकडे काही नव्हते. होते ते अनुभव, व्यथा, वेदना. कदाचित वेदनांचे आमचे समान नाते आम्हाला अधिकाधिक घट्ट करीत गेले असावे.

ती. सौ. वहिनींना, बाबांना सप्रेम जयभीम!

तुझा,

लक्ष्मणकाका

दिनांक २१/०९/२०१२

चि. सुप्रिया,

सप्रेम जयभीम.

चव्हाणसाहेब मुंबई-पुणे असा प्रवास करून आले होते. मी पोहोचलो तेव्हा माझ्या वेंधळटपणामुळे त्यांना थोडी वाट पाहावी लागली. मला खूप खजिल झाल्यासारखे झाले. साहेबांनी नेहमीसारखेच स्वागत केले. घरच्यांची विचारपूस केली. इतक्या मायेने ते वागत, की या माणसाला राग कधी येत असेल की नाही, असा प्रश्न मनात आल्यावाचून राहत नसे. ते हसतमुख होते. पुण्याहून आम्ही कराडला मुक्कामी जाणार होतो. ठरल्यावेळेपेक्षा मला तासभर उशीर झाला होता. साहेबांकडे कायम एक काळ्या रंगाची गाडी असे. छान गाडी होती ऐसपैस. साहेबांबरोबर रसिकभाई शहा हे त्यांचे कोल्हापूरचे स्नेही होते. ते दोघे मागे बसले. मी पुढच्या सिटवर बसलो. साहेब म्हणाले, काय लक्ष्मण, गप्पगप्प आहात? उशीर झाला म्हणून? अरे, तुम्ही एस.टी.ने आलात ना? झाला असेल थोडा उशीर, त्यात काय एवढे.

नाही साहेब, सकाळी सकाळी एक लडतर लागली पाठीमागे.

काय लडतर होती?

सकाळी सकाळी आमच्या पारधी समाजातली फलटणची हत्यारी नावाची पोक्त बाई आली होती. आली होती म्हणजे काय सांगू! ती दारात आली नि किंकाळायला लागली. दार उघडून पाहिले तर हत्यारी ओळखेना, काष्टा घातलेला गुडघ्याच्या वर डोक्यावरल्या पदराने तोंड झाकलेले, मला कळेचना तोंड का झाकलेय. ती म्हणाली,

'काय सांगू सायबा, ही बग काय केलंय रांडनं' साहेब तोंडावरला पदर तिनं काढला आणि मला कळेचना. पाहवत नव्हते. तिच्या विहीणबाईने दोघींच्या भांडणात गालांचे लचकेच्या लचके काढलेले. मांसच तोडून घेतलेले. बरं दवाखाना, मलमपट्टी असले काहीच नाही. त्याने ते इतके भेसूर दिसत होते, रक्त थांबले होते, पण काय झाले, हे सांगताच येत नाही. बाकी चेहरा सुजलेला. जनावरे तरी बरी.

नुसती ओरडत होती.

'तिला रांडला जेलात बशीव. आताच्या आता फोन कर. तिला जेलात घाल. पोलिसास्नी सांग.'

आता काय करावे? मी तिला समजावीत होतो, तू फलटणला जा. पोलिसात फिर्याद दे.

ती म्हणे मी ठेसनात जात न्हाय. म्हणतर हितवर आली तू जाणं. त्या शिवाय फिर्याद कोण करणार? मी ठेसनाची पायरी चढत नाही. तू चल.

आता काय करावे. शशीने तिला पहिल्यांदा घरात घेतली. पाणी दिले, जखमेवर हळद घातली. चहा दिला. ती थोडी शांत झाली. रडायची थांबली. मी तिला समजावली, काय झाले तर सांग.

'न्हातुला म्हणू, गतकाळीची लेक म्या मोठ्या लेकाला केली. तीन सालं झाली. पोटापाण्याला एकांदं तरी लेकरू व्हावा का न्हाय? तू सांग म्हण माझ्या पोरानं तिची लेक घालावलीती रागारागानं. तर हिनं इकून टाकली ना? माझी सून इकून टाकली. मंग म्या का गप्प बसू? घावली मले बाजारमधी. गोड बोलून नेहली घरी आन् लागली कलागत. तिनं माझी आशी दशा केली.'

पर तू का हात बांधलं होतं का? मी म्हणालो

हां म्या लय चेचलीया. तिनं माझं गाल खाल्लं. म्या तिजं नाक तोडलं. झिंज्या तर गावभर केल्या. म्या का तिला तसं सोडीन. रांडच्या....

बरं, आता असं करूया मला पुण्याला काम हाय. तू पत्र घी आन् पोलिसात जा.

म्या जात न्हाय म्हणती ना तुला, तू चल.

बरं. झबझब्याला पाठव.

न्हाय म्या त्याच्याकडंबी जाणार न्हाय. काय ती तू सुई लाव.

आता त्याज्याशी का भांडलीस?

हां त्योबी... तसलाच हाय. म्हातारपणात चळलाय. माझ्यापरीस त्याला तिजाच पुळका हाय. तू चल.

बरं. आसं करू, तू जा. मी मागनं येतो. माझे काम झाल्यावर. नाय तर उद्याच्याला सकाळच्या पारी येतो. मंग झालं. अशी समजूत घालून तिला पाठवलं.

रसिकभाई तर पार उडूनच गेलेले.

लक्ष्मणराव, कसे काम करता या लोकांत?

साहेब म्हणाले, पण ती पोलिसांकडे का जात नाही म्हणत होती?

त्याची मोठी कहाणी आहे साहेब. फलटणच्या माकडमाळावर फलटण

बारामती रस्त्याला लागून माकडवाला माळ आहे ना तिथे झबझब्या हत्यारी हे दांपत्य राहते. दहाबारा मुले असतील. त्यातली दोन मुले सस्तेवाडीला राहत होती. सस्तेवाडीला झबझब्या हत्यारी राहत असताना कुठेतरी चोरी झाली. कुठेही चोरी झाली तरी पोलिस गुन्हेगार समाजाची पाले कुठे उतरली ते पाहतात. सस्त्याच्या वाडीत गिरणीत ठेवलेले पीठ चोरीला गेले होते. पोलिसांत खबर गेली. आणि पोलिसांनी माग नेला तो या पारधी कुटुंबाकडे. घरात पुरुष कुणीच नव्हते. हत्यारी दारात बसली होती. पोलिस इन्स्पेक्टरने त्यांच्या पद्धतीने चौकशी सुरू केली. तिला पिंजऱ्यात बसवू लागली. हिने मोठा विरोध केला. मी काही केले नाही म्हणून विनवीत होती. पण पोलिसांनी तिला गाडीत घातले नि लॉकअपमध्ये बंद केले. आत गेल्यावर इतके अत्याचार केले की मला सुद्धा लाज वाटते. पोलिस किती अमानुष वागवतात ते न सांगितलेलेच बरे. तिला नग्न करून तळपायांना ठोकले. ती कबूल होत नाही म्हटल्यावर तिच्या मागच्या अंगात हातातली काठी घातली. रक्ताची धार लागली. ती काही थांबेना, मग पोलिस घाबरले त्यांनी तिला दवाखान्यात नेहले. वर्तमानपत्रांच्या प्रतिनिधींपर्यंत बातमी गेली. पोलिसी अत्याचार जनतेसमोर आले. फलटणचे ॲड.जी.बी.माने साहेबांनी या प्रकरणात मोठे काम केले. प्रचंड मोर्चे काढले. संबंधित पोलिसाला निलंबित करावे लागले. फलटणच्या कोर्टात खटला खूप गाजला. माने वकीलांनी सर्व बुद्धीपणाला लावून केस लढवली. पोलिस इन्स्पेक्टरला नोकरी तर गमवावी लागलीच पण सक्तमजुरीची शिक्षा झाली. पोलिस अत्यंत क्रूरपणे पारधी स्त्रियांशी वागतात. म्हणून हत्यारी पोलिसांना घाबरते.

चव्हाणसाहेब अत्यंत अस्वस्थ झाले.

लक्ष्मण, काय म्हणावे हेच समजत नाही. शासनात असताना शासनाची एकच बाजू समोर असते. सत्तेत असणाऱ्यांनी फार काळजीने या प्रश्नांकडे पाहिले पाहिजे. पण कसे होणार लक्ष्मण? ही एका बाजूला जंगली, तुफानी माणसं. त्यांचे आभाळ फाटलेले. कसे होणार संघटन? वाऱ्यावरली वरात. यांची मोट बांधायची कशी? फार अवघड आहे. स्वातंत्र्याची चळवळ सोपी वाटू लागते. शत्रू परका होता. सारा देश त्याच्या विरोधी उभा होता. आम्हा लोकांना मोठी मदत होती जनतेची. जनतेची मोठी संरक्षणाची फळी होती. या कामात लक्ष्मण, तुम्हाला कोण मदत करणार? सुन्न व्हायला होते. जनतेने ज्यांना स्वीकारलेले नाही, शत्रू मानले आहे. त्यांच्या पाठीशी कोण उभे राहील?

गाडीतली चर्चा फारच उदासवाणी झाली. मी हळूच साहेबांना त्याच्यातून बाहेर काढले.

साहेब, देगा उसका भला, न देगा उसका भला. एका गावातला पाटील वाईट असला म्हणजे सारे पाटील वाईट नसतात. ते गाव तिसऱ्या दिवशी आम्ही सोडून दुसरीकडे जातो. फारच वाईट अनुभव असेल ना तर त्या गावातला मुक्काम लगेच हलतो. साहेब, फलटणमधले आपले पत्रकार रवींद्र बेडकिहाळ आहेत ना? ते आणि मी या झबझब्या हत्यारी यांच्या घरी गेलो होतो. मी कसे काम करतो, या जंगली लोकांशी कसे बोलतो, हे पाहायला नि त्यांना मदत करायला आले होते. उघड्यावरचा प्रपंच. हत्यारीने चुलीवर कसलीतरी भाजी टाकली होती. तव्यावरली भाजी ती हलवीत होती. रवींद्रने ते सारे पाहिले. पाहता पाहता त्याला वाटले, काय भाजी आहे? तसे त्यांनी विचारले.

हत्यारी म्हणाली, काय की.

रवींद्रने त्यातली भाजी उचलली आणि तोंडात घातली. ती इतकी कडू होती की रवींद्रना जन्माची आठवण राहिली. दिवसभर ते थुंकत होते. तरी तोंडाची कडू चव जात नव्हती. ते मला एवढेच म्हणत होते, आपण कोणत्या देशात राहतो. भातावरले तूप नसले तर आम्हांला चालत नाही. गरम वाफाळलेला भात नसला तर चालत नाही. काय हे जग आहे? थोड्यावेळाने आम्ही फलटणमधल्या गोसावी वस्तीत गेलो. रवींद्र बरोबर होते. यातले जोशी समाजातले लोक होते. त्यात शंकर चव्हाण नावाचा एक आमचा कार्यकर्ता होता. हे सारे भविष्य सांगणारे लोक.

इतक्या अडाणी लोकांना. हे कसे जमते, लक्ष्मण? साहेब म्हणाले.

साहेब, ही माणसे निव्वळ अडाणी. पण सुताला धरून स्वर्गाला जातात. माणसाचा चेहरा बघून ते चेहरा वाचतात. हातावरल्या रेषा पाहण्यात वेळ काढतात. तेवढ्यात घर बघतात. घरातल्या चपला सांगतात, माणसे किती, स्त्रिया किती. लहान मुले किती. मुली किती. घरात मुले असतील तर कोपऱ्यात बॅटबॉल असतो. वलणीवर वाळायला घातलेली धोतरे, साड्या, धुतलेले कपडे, घराचा साईज, घराची कळा, अंगण सांगते. निरीक्षणशक्ती मोठी असते. अत्यंत बोलके असतात. विचारच करू देत नाहीत. प्रत्येकाच्या आयुष्यात दुःख असतेच. आजार असतो, म्हातारे आईवडील असतात, अपघात असतो, भाऊबंदकी असते. बास! या भांडवलावर पुढचा प्रवास सुरू होतो. तो सांगू लागतो, मोठ्या अडचणीतनं वाचलास. माणूस मान डोलवायला लागतो. ते पटू लागते. मग जे पटते ते धरून तो बोलू लागतो. मग त्याला जे पटेल ते ते सांगायचे. साहेब, हिप्नोटाईज केल्यासारखे करतात. अंगातला शर्टसुद्धा माणूस काढून देतो. शर्ट घेणार आणि वर म्हणणार, 'तू मला काही दिलं नाही, मी काही घेतलं नाही, तुझं मन बघितलं.' चारपाच

किलोमीटर गेल्यावर माणसाला भान येतं. अरे, आपण उघडे आहोत!

लक्ष्मण, या भविष्याचे मोठे आकर्षण खेड्यापाड्यातल्या माणसांना असते. मलाही होते. मीही ऐकत असे. यांचे बोलणेच ऐकत राहावे असे. शिक्षण नाही मग जमते कसे?

साहेब, भविष्य सांगणाऱ्या जमाती बारागावचे पाणी प्यालेल्या. रोज नवे गाव, नवी माणसे. त्याने माणसांचे मानसशास्त्र पाठच असते. करपल्लवी, नेत्रपल्लवी, हस्तरेषा पाहणारे, पोपटवाले, पहाटे फिरणारे पिंगळे हे सारे जोशी, जोगी. यातले कुडमुडे जोशी, मेडंगी जोशी, जोश्यांच्याच पंचवीस-तीस जाती आहेत.

लक्ष्मण, याचा स्वतंत्र अभ्यास केला पाहिजे, नाही?

होय साहेब, ही माणसे अडाणी आहेत असे वाटणार नाही. असे बोलण्यातले चातुर्य असते. आता पोपटवाला रस्त्याच्या कडेला बसलेला असतो. पिंजऱ्यात पोपट असतो. पिंजऱ्यासमोर कार्डांचा ढीग असतो. रस्त्याच्या कडेला पोते अंथरून त्यावर बसलेला हा जोशी कपाळाला गंध, पांढरीशुभ्र टोपी, धोतर, मलमली पांढरा सदरा, तोंडात पान, कायम रस्त्यावर पिचीपिची थुंकत गिऱ्हाईकाची वाट बघत असतो. गिऱ्हाईक आले की हा पोपटाला बोलावतो. पोपट शिकवून ट्रेंड केलेला असतो. तो बाहेर येतो. गिऱ्हाईक बुड टेकते. काय असेल आपल्या नशिबात हे पाहण्यात गिऱ्हाईक फार उतावीळ असते. तर याचा पोपट ढिगातले कार्ड काढतो, खाली टाकतो. पुन्हा त्या कार्डाभोवताली नाचतो. पुन्हा कार्ड काढतो. अशी चार-पाच कार्डे खाली टाकतो. आणि गमंत झालेली असते. तो चार-पाच कार्डांतले कार्डे काढतो. या जोश्याला, साहेब, एका अक्षराचा गंध नसतो. मजकूर सारा पाठच असतो. आणि सारा मजकूर सारखाच असतो. कोणतेही कार्ड निघाले तरी मजकूर तोच असतो! ऐकणारा मान डोलावू लागतो. जोशी त्याचा ताबा घेतो. पक्षी पुन्हा पिंजऱ्यात बंद असतो. दुपारपर्यंत हा धंदा करायचा नि दुपारी बारा वाजता ओढा गाठायचा. धोतराने धडप्याने मासे धरायचे. खेकडे धरायचे आणि बिऱ्हाडावर आणून आस्तुरीला द्यायचे. चार पैसे बरे मिळाले की एखादा कप देशी टाकायची.

पण लक्ष्मण, त्यांचे शिक्षण झाले नाही, मग हे कसे?

साहेब, हे आमच्या धंद्यातले सिक्रेट आहे. कुणाला सांगू नका.

साहेब हसू लागले.

सुप्रिया, या माणसाला जो सेन्स होता तो क्वचितही इतरांकडे दिसणार नाही. ते मला विचारू लागले मग हे लोक करणी कशी करतात.

नको साहेब, हे फारच सिक्रेट आहे. ते सांगितले तर त्यांच्या पोटापाण्याचे

प्रश्न निर्माण होतील. शिवाय मारही खावा लागेल.

पण मी नाही ना कुठे बोलत. आपल्या दोघांपर्यंतच सिक्रेट. रसिकभाईंना कशाला कोण विचारणार?

मग मी त्यांना सांगू लागलो. आता तूही कुणाला सांगू नको.

काय? सारे काही सांगता येत नाही.

मी पुन्हा साहेबांना सांगू लागलो. त्याचे काय आहे साहेब, दुपारच्या वेळेला स्त्रियाच घरात असतात. ही वेळ बरोबर हेरून हे गिऱ्हाईक शोधत असतात. तरुण बाई आहे, मूलबाळ नाही, ती घरात कुणी नाही असे पाहून याला बोलावते. आपल्याला मूलबाळ नाही असे सांगते. की हा एकदम गंभीर होतो. आभाळाकडे पाहतो. तिच्या हातावरल्या रेषा पाहतो. डोळे मिटायला सांगतो. स्वतः डोळे मिटतो. तिला डोळे उघडायला सांगतो. याच्या हातातल्या लिंबाच्या फोडीतून रक्त येऊ लागते. बाई घाबरते. तो म्हणतो करणी, करणी केलीय जावू बाईने. आणि एकदा ही मात्रा चालू झाली की बास. वर्ष-दोन वर्षे हा या बाईला लुबाडू लागतो. अंगाऱ्याच्या पुड्या देतो. खूप खट्याळ आहे, भूत काढावे लागेल. एवढा एवढा पैसा लागेल. तिच्याकडून सारा वृत्तांत, सासुरवास, सारे ऐकून घेतो. आडाखे बांधतो. अंगारा, धुपारा, उपवास, नवस अशी नादाला लावतो. ती बिचारी पोरासाठी सारे करते. जोशी पोराला जन्मालाही घालतो. पण गिऱ्हाईक बघून. अत्यंत सावध आणि चाणाक्ष. दुपारी बायकोकडून ऐकल्यावर नवऱ्याबद्दल सारे जाणून घेतो. नवऱ्याला शोधून काढतो. त्याला तंतोतंत पटणारी माहिती सांगतो. करणी केल्याचे सांगतो. नवराबायको दोघांनाही नादाला लावतो. शे-पाचशे काढतो नि पसार होतो. हे सारे गिऱ्हाईकावर अवलंबून. तत्काळ विसरून जाण्याचा माणसाचा गुण असतो. अंगठा छाप असलेली ही माणसे असे पोटासाठी खोटेनाटे करून, लबाड्या करून दोन वेळचे अन्न मिळवीत असतात. भिक मागणे, पोटासाठी लाचारीने, कधी हुशारीने गावे बदलीत ही माणसे पिढ्यान् पिढ्या जगत असतात.

साताऱ्यात साहेब मला गाडीतून स्टँडवर सोडतात. रसिकभाई नि साहेब पुढे कराडला जातात. मला हत्यारीचे भांडण निस्तरायचे असते.

गाडी निघून जाते. मी माझ्याच नादात घरी पोहचतो.

ती. सौ. वहिनींना, बाबांना सप्रेम जयभीम.

तुझा,<br>
लक्ष्मणकाका

दिनांक २१/०९/२०१२

चि. सुप्रिया,

सप्रेम जयभीम.

फलटणचे सुभाष शिंदे तुला माहीत आहेतच. उंच वाढलेल्या रामकाठीसारखे उंचच उंच, काटकोळा, गोरापान, तरुण उत्साही कार्यकर्ता, सातारच्या सर्किट हाउसवर साहेब मुक्कामाला होते. नेहमीची प्रचंड गर्दी वगैरे काही नव्हते. गाड्याचा गराडा नव्हता. साहेब नेहमीच्याच त्यांच्या सुटमध्ये उतरले होते. अनंतराव कुलकर्णी साताऱ्याच्या समर्थ साप्ताहिकाचे संपादक, साहेबांचे मित्र आणि मी. जरा बरे नसल्याने डॉ. विजयराव मोहिते साहेबांना तपासून गेले. म्हणाले, काही विशेष नाही. पोटाला थोडा विसावा हवा आहे. कुठेतरी खाण्यात काही आले असेल. मी दिल्यात गोळ्या. काळजीचे कारण नाही. तर साहेब निघाले होते सुभाष शिंद्यांकडे फलटणला. मीही त्यांना ओळखत होतो. माझ्या आधीच्या बॅचला श्रीराममध्येच ते शिकत होते. फार कडक. साहेब शिंदेवाडीला जाणार होते. तरुण पोरांना उभे केले पाहिजे. फलटणला तरुण पोरांची मोठी फौज साहेब जमा करीत होते. त्यातला हा एक उत्साही चळवळ्या तरुण. आता तिसऱ्या पिढीतल्या माणसांना आपल्याबरोबर पक्षात आणि संपर्कात ते ठेवत होते. प्रत्येकाच्या शक्तीचा उपयोग कसा होईल याचा ते विचार करीत. सहकारी संस्थांत सुभाषराव डॉ. भोईट्यांबरोबर काम करीत होते. शेतकरी मेळाव्याला शिंदेवाडीला जायचे. कुणी काहीही म्हणो. विरोधी असो की आणखी काही, प्रस्थापित लोक नवीन तरुण मुलांना काही पुढे येऊ देत नाहीत. आपणच त्यांना ताकद दिली पाहिजे. म्हणून कुणाच्या रागालोभाचा विचार न करता जाणार आहे. तुम्हाला तर फलटण माहीतच आहे. अनंतराव म्हणाले, यशवंतराव, जेवण करून मग बसूयात. औषधही घेता येईल. लक्ष्मण, चला तसे करू. मी म्हणालो मी जाईन घरी. आता जेवणाची वेळ आहे. थोडेसे जेवा, थोडे तरी. चार घास इथे, चार घास तिथे. आम्ही सारे जेवू लागलो. जेवता जेवता मी त्यांना काहीना काही विचारतच होतो. साहेब, सहकारला सुभाषराव काम करतात ही तिसरी पिढी. तुम्ही सर्वांना मदत करता. इतक्या लोकांनी साखर

कारखाने काढले. तुम्ही का नाही काढला साखर कारखाना?

म्हणजे? सारे साखर कारखाने तर माझेच आहेत. एकही कारखाना राज्यातला असा नसेल ज्याला मी मदत केली नाही. किंवा माझा हातभार लागला नाही.

पण साहेब, हे सारे कारखानदार आज कुठे आहेत या काळात?

लक्ष्मण, हा काळाचा महिमा हेच खरे. हे सारे मानवी आहे. राजाने राजासारखे वागले पाहिजे. मध्येच अनंतराव निरोप देऊन गेले. आमचे बोलणे सुरू होते.

मी राजासारखा वागलो. कारखाना काढला असता तर त्यांच्या रांगेतला एक झालो असतो. ते माझे काम नव्हते. मी देण्याच्या जागेवर होतो, देत गेलो. सारा सहकार, सर्व सहकारी संस्था. केवढा विस्तार झालाय, पण मी कुठे कुणाचा सभासद नाही. त्यांच्या कोणाच्या स्पर्धेत उभा नाही. आज जे लाखो लोक या चळवळीत आहेत त्या सर्वांमागे शक्ती उभी करायची. गोरगरिबांची, शेतकरी-कामगारांची शक्ती वाढवायची. शेतीच्या प्रक्रियांचा नवनवा विचार करायचा. शेतीच्या मालावर आधारलेले औद्योगिक धोरण म्हणजे आर्थिक विकेंद्रीकरण नाही का? उत्पादकालाच मालक करायचे. संपत्तीचे फेरवाटप म्हणजे समाजवाद ना? गरीबाला उभे करायचे. प्रत्येक माणूस सक्षम झाला पाहिजे. सहकार हा त्यासाठी उत्तम मार्ग. राज्य सर्वांचे, सर्वांसाठी, सर्वांचे कल्याणकारी राज्य.

साहेब, आपण म्हणता तसे आज आहे का?,

नाही, तसे नाही हे खरे. त्यात काही वाईटप्रवृत्तीचे लोक आहेत. पण कायद्याने ते नष्ट करता येतील. काम दुरुस्त करावे लागेल. काही मूठभर लोक वाईट असतातच. ते सर्वच क्षेत्रात असतात, नाही का?

पण तुम्ही एखाद्यातरी नातेवाईकाला कारखाना काढून द्यायचा ना?

अरे, कुणी सांगितले तुम्हाला माझ्या नातेवाईकांच्या नावे कारखाना नाही?

आबासाहेब वीर मला माझ्या भावासारखे. कल्लाप्पा आवाडे तर पाहतच आहात. तात्यासाहेब कोरे, रत्नाप्पा कुंभार, वसंतरावदादा ही सारी माणसे नातेवाईकांपेक्षा मला जवळची. या प्रत्येकाच्या नावाशी माझे नाव जोडलेले आहे. अशी हजारो माणसे. लक्ष्मण, हा माझा खरा ठेवा, इस्टेट. मी माणसांची संगतसोबत करीत आलो. त्यांच्या बेरजेचे राजकारण करत आलो. हे करताना जात धर्म, पंथ असल्या गोष्टी कधीच पाहिल्या नाहीत. सर्वांभूती सागरेश्वर हा आईने संस्कार केला. तोच पुढे पिंडप्रकृती झाला.

साहेब, त्यावेळी खाजगी कारखानदारी होती, साखरेची. तिची स्पर्धा कशी केली?

मी स्पर्धा नाही केली. माझी रेषा मी मोठी केली. आपोआपच त्यांची रेषा

छोटी झाली. सगळी सरकारी शक्ती या नव्या चळवळीच्या मागे उभी केली. सत्तेचे पाठबळ दिले. शेतकऱ्यांना, पैसा कमी पडू दिला नाही. शेतकरी जागृत झाले. त्यांनी संघटित होऊन त्या त्या परिसरातल्या खाजगी कारखानदारीला सहकाराचा पर्याय दिला. अनेक खाजगी कारखानदारांनी आपले कारखाने शेतकऱ्यांच्या हवाली केले. ऊस उत्पादक तर शेतकरीच होते ना? हजारो एकर जमिनी या कारखानदारांनी खंडाने घेतल्या होत्या. ही एक प्रकारची लूटच होती. या शेतजमिनी शेतकऱ्यांना वाटून द्या, असे हल्ली लोक बोलू लागलेत. मला ही गोष्ट मान्य नाही. शेतीवाटपाला मर्यादा येणार आहे. बाबासाहेब आंबेडकर म्हणत होते शेतीचे राष्ट्रीयीकरण करा. आमच्या लोकांनी गांभीर्याने पाहिले नाही. पण आज ना उद्या या शेतीच्या वाटपाला मर्यादा येणारच ना? लोकसंख्या वाढते आहे. जमीन वाढत नाही. वाढते नागरीकरण, औद्योगिकीकरण यात जमिनी जात आहेत. धरणांसाठी, कालव्यांसाठी, जमिनी निघाल्या. मी जगभर हिंडलो. तसा पुस्तकी समाजवाद स्वीकारला नाही. शेतीचे असंख्य प्रयोग जगभर मी पाहिले. रशियातले प्रयोग मला खूप जवळचे वाटले. आपल्याला त्यांच्याच मार्गाचा विचार करावा लागेल.

पोथीनिष्ठा मला मान्य नाही. आपण आपली उत्तरे आपल्या स्थितीत पाहिली पाहिजेत. कमाल आणि किमान उत्पन्न ठरवलेच पाहिजे. कुळकायदा राबवण्याबाबत तसेच तुकडेबंदी, तुकडेजोड या कायद्याची अंमलबावणी मनापासून केली पाहिजे. याचेच पुढचे पाऊल मी टाकले होते. सिलींगचा कायदा करून.

साहेब, या कायद्याने पुरोगामी पाऊल आपण टाकलेत, पण कसे जमवलेत?

सिलींगला बड्या बागायतदारांनी विरोध करून पाहिला. पळवाटा शोधल्या. मी सावधपणे पाऊले टाकली. जिरायती जमीन, बारमाही पाणीपुरवठा असलेली जमीन दुबार हंगामी पाणीपुरवठा असलेली जमीन अशी वर्गवारी करून, पाच माणसांचे कुटुंब गृहीत धरून एकरावर मर्यादा घालण्याची तरतूद केली. जिरायती ८० ते १५० एकर. बारमाही बागायतीला १६ एकर, आणि हंगामी पाणीपुरवठा असलेल्या जमिनीला २४ एकर अशी मर्यादा घालून देण्यात आली.

साहेब, श्रीमंतांनी पळवाटा काढल्यातच. अनेकांनी आपल्याच बायकांशी कागदोपत्री घटस्फोट घेऊन तर कित्येकांनी जनावरांच्या नावाने, नोकरचाकरांच्या नावाने जमिनी केल्या. हा कायदा धाब्यावर बसवला.

हां, पण कोणताही कायदा केला तरी लबाड लोक त्यातून पळवाटा शोधणारच ना? ते लबाड लोक म्हणजे जनता नव्हे ना? याउलट या कायद्याचा फायदा मोठ्या वर्गाला झाला. उत्पादनात घट होऊ नये म्हणून नद्यांचे पाणी अडवणे,

वाट काढणे, वीज पंपांना वीज पुरवणे यासाठी मी इरिगेशन बोर्ड, इरिगेशन सर्कल स्थापन केले. आपल्या देशाचा कणा शेती आहे. आपण शेतीवर अवलंबून आहोत. सर्वात मोठा रोजगार शेतीचाच आहे. शेतीच्या पाण्याचा अभ्यास करायला स.गो. बर्वे कमिशन नेमले केवळ २०-२२ टक्केच जमीन ओलिताखाली येऊ शकते असे कमिशनने सांगितले. पाणी जेथून मिळेल तेथून उचलण्याची परवानगी राज्यातल्या शेतकऱ्यांना दिली. हे करताना राज्यात प्रादेशिक ऐक्य कायम राहील हेही पाहिले. विशेषतः विदर्भ, मराठवाड्याला झुकते माप दिले. श्रीमंतांना वेसण घालण्याचा प्रयत्न केला. गरीब शेतकऱ्याला बळ दिले. गरीब आणि श्रीमंत यांच्यातली दरी जेवढी कमी, जेवढे अंतर कमी, तेवढा समाजवाद लवकर येईल. गरीब आणि श्रीमंत यांच्यातले अंतर कमी करणे म्हणजे समाजवाद.

सुप्रिया, साहेबांनी किती कमी शब्दांत व्याख्या केली समाजवादाची! ते सहज बोलत ती सुभाषिते असत. विचारांसाठी कुठे अडत नसे. शब्दांसाठी शोधाशोध करावी लागत नसे, की थांबावे लागत नसे. अंतरीची तळमळ खरी असेल ना, तर नक्कल करावी लागत नाही. उसनवारी करावी लागत नाही. शेती नसलेल्या बिगरशेतकऱ्याला शेती खरेदी करता येत नव्हती. जो शेतकरी असेल, शेती हाच त्याचा व्यवसाय असेल, त्यालाच शेती खरेदी करता यायची. इतरांकडे कितीही पैसा असला तरी शेती घेता येत नव्हती. आज काय स्थिती आहे? शेती करणारा शेतकरी उद्ध्वस्त झाला आहे. 'उद्ध्वस्त' या माझ्याच कथासंग्रहातल्या कथा वाचल्यास की तुझ्या लक्षात येईल. गावगाडा मोडतो आहे. शेती, शेतकरी देशोधडीला लागतो आहे. हजारो एकरांचे मालक पुन्हा होऊ लागलेत. सिलींगचे कायदे, कसणाऱ्यांची जमीन असल्या मंगलमय कल्पना मोडीत निघाल्यात. शेरडं सुद्धा जेवढ्या गतीने झाडे ओरबडत नाहीत तेवढ्या प्रचंड गतीने ओरबडणे सुरू आहे. पृथ्वी बिचारी कण्हते आहे. तिचे कण्हणे ऐकायला यशवंतराव हयात नाहीत, हे बरेच झाले म्हणायचे. हे ओरबाडणे त्यांच्याच्याने सहन नसते झाले. ते पक्के समाजवादी होते. नेहरूंचा समाजवाद त्यांनी आपला मानला होता. समाजवादाचा पहिला पाळणा महाराष्ट्रात हलेल हे त्यांचे उद्‌गार त्या काळात देशभर गाजले होते. मानवेंद्रनाथ रॉय, मार्क्स, लेनिन, स्टॅलिन असे माओपर्यंत अनेक त्यांनी वाचले होते. पण त्यांची निष्ठा होती नेहरूंच्या समाजवादावर. कल्याणकारी राज्यावर. आज काय स्थिती आहे? विचारसरणीचा अंत म्हणजे काय तर अराजकाला निमंत्रण, असे ते म्हणत असत. ते सिद्ध करण्याची सुपारी भांडवलदारांनी जगभरातल्या मवाल्यांना दिली आहे. यातून देश कसा मार्ग काढेल हे माझ्यासारख्या तळात काम करणाऱ्या कार्यकर्त्याला समजत नाही.

वेळ बराच झाला होता. मला फोर्ड फाउन्डेशनची दोन लक्ष रुपयांची अमेरिकन शिष्यवृती मिळाली होती. अनेक पुरस्कार मिळत होते. साहेबांनी मनापासून माझे अभिनंदन केले होते. अगदी मिठी मारून.

लक्ष्मण, जबाबदारी वाढते आहे. कानात वारे शिरू देऊ नका. अनेकजण भेटतील, ऐका, पण स्वतःला बजावीत राहा. खरेखोटे आपल्या मनाशी तपासा. आपणच आपले काउन्सिलर. आपला सदसद्विवेक हेच न्यायालय. तिथे न्याय करायचा. आता अमेरिकेला निघालात. मला, वेणूताईंना फार आनंद झाला आहे. पुढच्यावेळी जेवण तुमच्याकडे.

नको साहेब, माझे घर छोटे आहे.

घर छोटे आहे. त्यात माझी मुलगी राहते ना? मग आता होईल ना मोठे घर. घराच्या साईजवर का नाती ठरतात आणि माझे म्हणाल तर देवराष्ट्रामध्ये माझे घर आपण पाहिलेच आहे. नो प्रॉब्लेम, पुढचे जेवण तुमच्याकडे.

माझा आनंद मनात मावत नव्हता. मी खाली वाकून नमस्कार केला. त्यांनी पुन्हा उठून मिठी मारली. चला, पुन्हा भेटूया.

मी सर्किट हाऊसमधून बाहेर पडलो. दहा वाजून गेले होते. माझे मन फुलपाखरू झाले होते. माझ्या पाठीशी साहेबांचे आशीर्वाद होते.

ती. सौ. वहिनींना, बाबांना सप्रेम जयभीम.

तुझा,
लक्ष्मणकाका

दिनांक २४/०९/२०१२

चि. सुप्रिया,

सप्रेम जयभीम.

मला फोर्ड फाउन्डेशनची दोन लक्ष रुपयांची शिष्यवृत्ती १९८१ साली मिळाली. मागील पत्रात मी तसे तुला लिहिले होते. मान्य केल्याप्रमाणे चव्हाणसाहेबांनी मला कळवले,

'लक्ष्मण, तांबडा रस्सा, पांढरा रस्सा खायला यायचे आहे. शशी फार छान मटण करते असे मला अनिल अवचट सांगत होते. तिच्याकडून रेसिपी सुनंदाने, शैला दाभोळकरांनी नेली असल्याचे कानावर आले. यापूर्वी एकदा पोहे खाल्ले होतेच. आता फाउन्डेशनचा पुरस्कार मिळालाय.' साहेब फोनवरून दिल्लीहून बोलत होते. मी अप्पासाहेबांच्या केबीनमधून बोलत होतो त्यांच्याशी.

साहेब जेवायला येणार आहेत हे समजताच अप्पासाहेब म्हणाले आम्हालापण आवडते कोल्हापुरी.

मी अप्पासाहेबांना म्हणालो, याना मग तुम्हीही.

नको नको, हसून म्हणाले, नंतर केव्हातरी पाहू.

दोन-तीन दिवसांनी चव्हाणसाहेब साताऱ्यातल्या माझ्या घरी आले. शशीने कोल्हापुरी मटण केले होते. साहेब त्या दोन खोल्यांच्या घरात आले. त्यांना गरीबांबद्दल किती आस्था वाटे ते सांगणे कठीण आहे. मलाच संकोचल्यासारखे झाले होते.

हं, लक्ष्मण, आई, बापूराव कुठे आहेत, सोमंथळीला की निरगुडीला?

मी सांगितले, ते ऐकत नाहीत. इथे या, राहा म्हणालो तर त्यांना चालत नाही. अजूनही पाट्या वळीत हिंडत असतात. एका जागेला राहणे हाच मोठा प्रश्न आहे. एका गावाला राहिले की पोटे बिघडतात. तंबाखू खाऊन थुंकता येत नाही. परसाकडेस खूप लांब जावे लागते. त्यापेक्षा न आलेले बरे. या अशा अडचणी. काय करायचे?

साहेब हसले. हे मात्र खरे. खेड्यापाड्यातल्या माणसांना मोकळे ढाकळे

बरे वाटते. माझे एक मित्र आहेत, ते खेड्यात राहतात. माहीत आहे ना? त्यांना असे मोकळ्यावर जायची सवय होती. काही केल्या संडासमध्ये पोटच रिकामे होत नसे. अनेक प्रकारच्या प्रयत्नांनी ते संडास वापरू लागले. आता काही प्रश्न नाही.

आम्ही सारेच हसलो.

आता शिष्यवृत्तीचे काम कसे करणार?

यावर मी त्यांना एक छान प्रसंग सांगितला. मला फोर्ड फाउन्डेशनची शिष्यवृत्ती मिळाली याचा आनंद माझ्यासारखा माझ्या कुटुंबीयांना आणि मित्रांनाही झाला होता. डॉ.अनिल अवचट आणि मी, त्यांच्या स्कूटरवरून, पुण्यातच ए.बी. शहासरांकडे गेलो होतो. मे.पु. रेगे, शहासर, शहासरांच्या घरी होते. ए.बी.शहा ही साहेबांचे चांगले मित्र होते. आम्ही त्यांचेकडे गेलो. त्यांना खूप आनंद झाला होता. त्यांनी माझे अभिनंदन केले. आता काय करणार येवढ्या पैशांचे? अनिल म्हणाला.

छान झाले. आता तो हे पैसे बँकेत ठेवून पूर्णवेळ काम करणारा कायकर्ता होणार आहे. शहासर हसले.

रेगे सर ही विचारात पडले.

शहासर म्हणाले, लक्ष्मण, हे पैसे ज्या कामासाठी मिळालेत त्याच कामासाठी खर्च केले पाहिजेत. ही फार मोठी संधी आहे. महाराष्ट्राला कैकाडी आणि त्यांचे जीवन समजले आहे, पण अजून तळात काय काय दडले आहे ते शोधले पाहिजे. या कामासाठी हा सारा पैसा खर्च करा. त्यातून नवीन खूप काही निघेल.

मी आणि अनिल विचारात पडलो. पुढे अनिलचेही तसेच मत पडले.

मी घरी आलो. शशीशी बोललो. ती म्हणाली, पैसे त्याच कामासाठी वापरायचे. मी खूप पैसे पाहिले आहेत. मला त्याचा मोह नाही. आपण काम करूया.

चव्हाणसाहेबांना फार आनंद झाला. शहांचा सल्ला मानलात. छान! आता व्यवस्थित प्लॅन करा. माझी लागेल ती मदत आहेच. तुमची भ्रमंती तर सुरू आहेच. आता तिला आर्थिक पाठबळही मिळाले. आता मागे फिरायचे नाही. पूर्णवेळ काम आहेच फक्त ते आता तुमच्या आवडीच्या कामाचे आहे.

शशी आतल्या खोलीत ताटे वाढत होती. एक खुर्ची लाकडी, दोन खुर्च्या पत्र्याच्या. मध्ये टेबल ठेवले. आम्ही छान गप्पा मारत जेवलो. साहेबांना खूप आवडले. राजाराम कॉलेजात असतानाचे दिवस आठवले. तांबडा रस्सा, पांढरा रस्सा, सुके मटण ही खास कोल्हापुरी खासियत. ते सांगत होते, म्हणाले, या

तांबड्या रस्स्यासाठी त्यावेळी आम्ही अनेक मित्र एकत्र भवानी मंडपाजवळच्या एका खानावळीत जात असू. मला वाटते ती चोरग्यांची खानावळ असावी. लोक रांगा लावून जेवत. आम्ही कधीतरी त्याचा आस्वाद घ्यायला जात असायचो.

टोपी नसलेले, अवघडून खुर्चीत बसलेले यशवंतराव आजही नजरेपुढून हलत नाहीत. दीड-दोन तास गप्पा मारीत बसले. त्यांना वेळेचा तसा आता फारसा प्रश्न नव्हता. अठरा अठरा तास काम करणारा हा माणूस अचानक रिकामा झाला होता.

साहेब म्हणाले, लक्ष्मण, एक बरे झाले मला घर समजले. फारशी शोधाशोध न करता घर सापडू शकेल. शशीचा त्यांनी निरोप घेतला. तिने पायाला स्पर्श करून नमस्कार केला. मला वाटते ते पुन्हा येईन म्हणाले, पण पुन्हा तसा योग आला नाही. ते पुन्हा जेवायला आले नाहीत. घरीही आले नाहीत. कुठे माहीत होते की ही त्यांची शेवटचीच भेट होती. काळाच्या उदरात काय दडले असेल, सांगता येत नाही. मी शशीला सांगितले नि त्यांच्याबरोबर बाहेर पडलो. वाटेत थोडावेळ त्यांचे मित्र बन्याबापू गोडबोले यांच्याकडे थांबलो. त्यांचा चहा आणि गप्पा गोष्टी झाल्या. आम्ही निघालो कराडकडे. मी म्हटले, बोगद्याकडून जाऊया. रस्ता थोडा कच्चा आहे. गाडी पुन्हा बोगद्याकडे वळली. बोगदा पार करून आम्ही खिंडीतल्या गणपतीजवळ आलो.

साहेब म्हणाले, लक्ष्मण, या खिंडीतल्या गणपतीला नारळ वाढवल्याशिवाय मी लोकसभेचा फॉर्म भरत नाही. त्याने लोकांना बरे वाटते. आणि खरे तर संघाचीही मते आपोआपच आपल्या पारड्यात पडतात. दुसरे, मी फॉर्म भरण्यापूर्वी राजमातांना अदालतवाड्यात जाऊन नमस्कार करतो. मग गणपती, मग फॉर्म. तुम्ही नास्तिक आहात. तुम्हाला हे चालणार नाही. पण लोकांच्या श्रद्धा जिथे असतात तिथे जावे लागते. याचा अर्थ मी देवभोळेपणाला थारा देतो असे नाही. उलट, ते काही लोकांच्या रोजगारहमीचे काम आहे असेच मला वाटते. तुम्ही जसे स्पष्ट बोलू शकता तसे मी बोलत नाही. काही पथ्ये पाळावीच लागतात. मी दर्ग्यातही जातो. तेथेही चादर चढवतो. आता तुम्ही एक काम सुरू करताय. काय स्वरूप असेल त्याचे?

साहेब, माझी पण गोचीच आहे. मी शिक्षणाच्या निमित्ताने भटक्याविमुक्तांना सोडून पंधरा-सोळा वर्षे झालीत. आधी सेवादलात नि तेथून समाजवादी परिवारात गेलो. डोक्यातली जात जाणीवपूर्वक काढली. आता परत जातींच्याच दलदलीत जातो आहे. सगळी स्थिती तीच. तीच हागणदारी, ओसाड उघडे माळ, ओढ्यांचा किंवा नदीकाठावर बिऱ्हाडे मांडलेली. बिऱ्हाडे दिसली की एस.टी.तून खाली

उतरतो. त्यांच्याबरोबर चालू लागतो. माणसे हळूहळू बोलू लागतात. आधी खात्री करून घेतात, माणूस आपलाच आहे का, पोलिसवाला तर नाही किंवा त्यांचा खबऱ्या तर नाही? खात्री झाली तर बोलू लागतात. काही जमाती फारच चाणाक्ष, हुशार. मी आणि आमच्या समाजातले एक जाणकार कार्यकर्ते औरंगाबादच्या कैकाडी समाजातले. मी आणि ते, पारध्यांच्या एका वस्तीवर जाण्याचे ठरवले. सातारा तांडा नावाचा लमाणतांडा आहे औरंगाबाद शहराजवळ. मी गेलो होतो व्याख्यानासाठी. आसारामगुरुजींना म्हणालो, जाऊन येऊ पारध्यांकडे. आम्ही चालत चालत बरेच गेलो शेताच्या बांधाबांधाने. मध्ये ओढा आला. ओढा म्हणजे मोठी वघळ होती. ओढ्याच्या पलिकडे माळावर लहानमोठे दगड विखरून पडले होते. त्या दगडांच्यामध्ये पाचपन्नास माणसांची बिऱ्हाडे एका भल्यामोठ्या लिंबाच्या झाडाखाली राहिली होती. आम्ही ओढ्याच्या अलिकडच्या काठावर उभे होतो. पलिकडे माणसे दिसत होती. आम्ही वघळ ओलांडून पलिकडल्या काठावर चढलो. आता किती वेळ लागला असेल? अक्षरशः दोन मिनिटेसुद्धा नाही. पलिकडच्या काठावर गेलो तर एकही माणूस नाही. पळायला कुठे जागा नाही. लपायलाही जागा नाही. भुताटकी झाल्यासारखी झाली.

साहेब हुंकारत होते.

आम्ही तसेच पुढे गेलो तर लिंबाखालच्या झोपडीत एक बाळंतीण बाई. अंगावरले रक्त तसेच! सारे उघड्यावर. आम्हीच शरमेने मान खाली घातली. एक म्हातारी दारात. गुरुजींनी पारधी भाषेतून म्हातारीशी बोलायला सुरुवात केली. त्यांना सारे ओळखत होते. म्हातारीने खात्री करून घेतली. उभी राहिली काठीसारखी. लांबच्या लांब काड्यावर बुजगावणे दिसते ना तशी. तिने मोठयाने '–हा तुम्हा म्हणू' अशी साद घालीत पारधी भाषेतून हाका मारल्या आन् काय आक्रित! माणसं भराभरा जमू लागली. सारी उघडी, लंगोट्यावर, बायाही लुगडी नेसलेल्या कंबरेपुरत्या. हातापायाचे मुटकुळे करून, दगडासारखे, पाय पोटाशी घेऊन गपचीप पडलेले. माळावरल्या दगडासारखीच ह्यांनी मुटकुळी बांधलेली. पोलिसांचा बाप आला तरी ओळखता येत नाही. पोरंलेकरं बायांच्या पोटाशी. बघता बघता पाचपन्नास बाया, पोरे, बापे जमले. मी, आसारामगुरुजी बैठकीला बसलो. एकाने बोलावे बाकीच्यांनी ऐकावे असा रिवाजच नाही. कोण काय बोलतोय समजत नाही. नुसता कालवा. पोरांच्या अंगावर कळा नसते. एका एका माणसाला डझनात पोरे बोलता बोलता म्हातारीने सांगितले, 'ह्यो माझा चौथा नवरा. मागच्याच साली केला.' आता मात्र साहेबही उडाले. पुढे आणखी आक्रित आहे. तिला मी म्हणालो, मुले किती? ती म्हणाली इस आन् दोन. नवरे चार, सात लॅक. बाकी

समद्या लेकी. समद्यांची लग्नं झाली.

साहेब, या समाजात मुलगी म्हणजे संपत्ती समजतात. मुली विकता येतात. भाड्याने देता येतात. गहान ठेवता येतात.

आता मात्र साहेब खरोखरीच अचंबित झाले होते. लक्ष्मणराव, काय सांगता काय, अशी स्थिती आहे?

होय साहेब, विकतात याचा अर्थ दुसऱ्या जातीत नव्हे. सारे व्यवहार जातीतच होतात.

पण असे का?

साहेब, विकण्यासारखे एवढे एकच तर साधन आहे. पोलिस, वकील, कोर्ट, गावचे गुंडलोक यांना पैसा द्यावा लागतो तर काय विकणार? या म्हातारीला न्हाणे आले तेव्हापासून मुले झाली. प्रत्येक नवऱ्याने मुली काढून घेतल्या. मुले बाईसोबत राहिली. बापांनी मुली विकल्या. जोवर मुले होत होती तोपर्यंत मुलं झाली. पुरुष या समाजात फार जगत नाहीत. पोलिस मारतात. तुरुंगात किंवा बाहेर. शिकार करावी तसे गावचे लोक यांची शिकार करून मारतात. बहुसंख्य पुरुष तुरूंगात खितपत पडतात. तेथेच मरतात. किंवा सुटून आल्यावर हे त्याला मारून टाकतात.

का बरे?

तो म्हातारा यांच्या सोबत पळू शकत नाही. अडचण होते. मग सोडून देतात. खबऱ्या झाला तर मारून टाकतात.

लक्ष्मण, हे सारे कादंबरी, कथा, चित्रपट, नाटक यापेक्षा कल्पनातीत आहे. हे सारे खरे असेल तर आपण कोणत्या शतकात आहोत?

इसवी सनाच्या पूर्वीच्या विसाव्या शतकात!

इतक्या मोकळेपणाने स्त्रीपुरुष संबंध उघड्यावर चालतात की ते बघूच शकत नाही आपण. म्हटले तर साहेब, ही माणसे मानवी वंशात जन्माला आली म्हणून ही माणसे, एरवी जनावरांच्यात यांच्यात कोणता फरक आहे. या देशाने आम्हाला माणूसच मानलेले नाही. आमची बेरीज-वजाबाकी माणसात नाही.

लक्ष्मण, 'उपरा'त एके ठिकाणी तुम्ही पार्लमेंटवर बॉम्ब टाकण्याचा उल्लेख केलाय. तो वाचून मला फार धक्का बसला होता. माझ्या गावात माझ्या मतदारसंघात राहणारा एक तरुण पोरगा पार्लमेंटवर बॉम्ब टाकावा असे म्हणतो याचे मला फार वाईट वाटले होते. आश्चर्य वाटले होते आणि थोडा रागही आला होता. पार्लमेंट ही फार पवित्र गोष्ट आहे असे मनापासून मी मानतो. पण तुमचे हे सारे अनुभव ऐकले की मन कसे सैरभैर होते. तुमच्या जागी मी असतो ना तर मीही पार्लमेंटवर बॉम्बच टाकावा असे म्हटले असते. खरोखर मुळातून हादरवून टाकणारे,

सुन्न करणारे आहे हे सारे. आपण सत्य ऐकतोय की कथा, चिमटा काढून पाहिले पाहिजे. काय माणसांची स्थिती आहे. लक्ष्मण, हे सारे आले पाहिजे. लोकांना समजले पाहिजे. लोकांचे प्रबोधन झाले पाहिजे. अहो, यातले काहीही माहीत नाही आम्हा लोकांना! कसले राज्यकर्ते आम्ही. फार गिल्टी वाटते. कुठे दैनिकात का लिहीत नाही सारे हे अनुभव. डोळे उघडतील लोकांचे. खरेच, मला जसे सांगितलेत तसेच लिहा. फार गरज आहे याची.

साहेब, 'सकाळ'मध्ये सदा डुम्बरे, अरुण खोरे माझे मित्र आहेत.

हो, माझाही परिचय आहे. सदाचे वाचन फार छान आहे. चांगले काम चालते सकाळचे. श्री.ग.मुणगेकर आहेत फार सज्जन गृहस्थ आहेत. पाहा सकाळमध्ये सुरू करता येते का? मी बोललोय त्यांच्याशी. मुणगेकरसर म्हणालेत सुरू करूया. माझ्याकडूनच राहिले आहे. मी जरा नावाच्या शोधात आहे.

अहो, मी सुचवतो. अमृता प्रीतम माहीत आहेत? त्यांची एक कलाकृती आहे 'बंद दरवाजा'. अगदी अशीच, व्यवस्थेने दारे बंद करून घेतलेली. छान नाव आहे, विचार करा. त्यांच्याशी बोला. काय होते ते पाहा. अडचण आली तर मला सांगा, पण हे फार महत्त्वाचे काम आहे. तुम्ही हे सारे लिहिलेच पाहिजे.

साहेबांच्या अस्वस्थतेत मी भर घातली. मी त्यांची क्षमा मागितली. तसे त्यांनी हातात हात घेतला.

लक्ष्मण, क्षमा कसली मागता? आम्हालाच तुम्ही क्षमा केली पाहिजे.

गाडी विरंगुळ्याला पोहचली. आम्ही चहा घेतला.

जेवून जाणार का? बाजरीच्या भाकरी, पिठलं.

नको साहेब, परत येतो त्यावेळी जेवण.

साहेबांना घरी सोडले निरोप घेतला नि परत सातारला फिरलो. मन मोकळे झाले होते.

ती. सौ. वहिनींना, बाबांना सप्रेम जयभीम.

तुझा,
लक्ष्मणकाका

दिनांक २६/०९/२०१२

चि. सुप्रिया,

सप्रेम जयभीम.

आता तारीख लक्षात नाही. पुण्याहून आम्ही साताराला येत होतो. साहेब म्हणाले, लक्ष्मण, आता सासुरवाडीकडले लोक येतात की नाही, काय म्हणते सासुरवाडी?

साहेब माझे सासरे फार चांगले आहेत. पुरोगामी आहेत, हुंडेकरांचा व्यवसाय आहे. स्वातंत्र्यसैनिक आहेत. खादीशिवाय अन्य कपडे मी कधी त्यांच्याकडे पाहिले नाहीत. पांढरेशुभ्र कपडे, आपल्यासारखी टोपी, जाकीट, काँग्रेसवालेच आहेत. पण नातेवाईक सारे उच्च कुलीन, शिवाजी पेठेत थोरली मेहुणी भोसल्यांकडे सरनोबत वाड्यात तर धाकटी घोरपड्यांकडे, मधली शिंद्याकडे. शशी तिसरी. तिने असा पराक्रम केला. त्याने सारे नातेवाईक आम्हाला शोधत हिंडत होते. आम्ही शामराव पटवर्धन यांच्या घरात लपून बसलो होतो आठ दिवस. सापडलो असतो तर खैर नव्हती. सासऱ्यांनी एवढेच समजावून घेतले की लग्न दिवाण बहादूर सबनीसांच्या घरात झाले. लग्नात पुढाकार समाजवादी विचारवंत नेते मा.बापूसाहेब पाटलांनी घेतला होता. त्यांनी माझा पाय काढणाऱ्यांना सांगितले, 'माझ्या मुलीनं लग्न केलं आहे. मग जावयाचा पाय काढून काय पोरीचं वाटोळं करायचंय. शाहू महाराजांच्या नावानं नुसत्या मिशा पिळता. मग त्यांनी सांगितलेलं का कळत नाही?' यावर बरीच गरमागरमी होऊन विषय मिटला. बारा वर्षे झाली लग्नाला, पण कुणीही आले नाही आमच्याकडे. शशीच जाते केव्हातरी.

अरे, म्हणजे माहेर बंदच आहे तर.

हो. घरातल्या स्त्रिया मान्य करीत नाहीत.

ठीक आहे. भेटले पाहिजे एकदा सासऱ्यांना. काय नाव म्हणालात?

श्रीपतराव भोसले, हुंडेकरी, राजारामपुरीत टाकाळ्यावर राहतात.

ठीक आहे.

साहेब, मी सातारा सोडायचा विचार करतोय.

आणि?

आणि पुण्याला कुटुंब हलवावे म्हणतोय. तशी जागा पण बाबा आढावांनी धनकवडीला पाहिलेय. भाड्याने तर राहायचे. इथे सातारला आमची संघटना होती. त्यातही बारा जणांची तोंडे बारा वाटेला. त्यात काही ज्येष्ठ सहकाऱ्यांना वाटते हा आता गेला. आपल्यासोबत राहणार नाही. त्यात आपला अनुभव म्हणून ते सांगतात. यशवंतरावांनी एखाद्याच्या खांद्यावर हात टाकलाना की तो त्यांच्या गळाला लागतो. तो त्याच्यासोबत जातो. त्यामुळे मी तुमच्याबरोबर संपर्क वाढवला याचे वैषम्य असणारा वर्ग आहेच. त्यामुळे इथे कटकटी करीत राहण्यापेक्षा पुण्याला गेलेले बरे. बाबा आढावांसोबत सतरा-अठरा वर्षे काम केले आहे. पुणे तसे मध्यवर्ती ठिकाण आहे. राज्यभर जाता येते. रेल्वे, एस.टी.ची सोय होईल. म्हणून पुण्याला जाण्याचा विचार करतोय. साहेब गंभीर होते.

लक्ष्मण, मी सर्वांशी प्रेमाने वागतो. विरोधकांशी तर फारच प्रेमाने वागतो. माझे सर्व पक्षात मित्र आहेत. राजकारण वेगळे, व्यक्तिगत संबंध वेगळे. राजकारणात विचारांचे संघर्ष असतात, व्यक्तींचे नाही. त्यामुळे माझ्याकडे माझ्या पक्षातले महत्त्वाचे कार्यकर्ते कामे घेऊन येतात तसे विरोधी पक्षाचेही कार्यकर्ते येतात. माझ्या पक्षातल्या कार्यकर्त्याला मी थोडे थांबायला सांगतो आणि विरोधी पक्षातल्या कार्यकर्त्यांची कामे प्राधान्य देऊन करतो. हेतू हा, की आपला कार्यकर्ता आपलाच असतो. तो थोडा थांबला तर रागवणार थोडाच आहे. आणि समजा रागावला तर समजूत काढता येते. तसे विरोधकाचे नाही. तो आपल्या विरोधी नाही, आपल्या धोरणाच्या विरोधात आहे. त्याचे काम तत्काळ केले तर त्याला बरे वाटेल आणि धारही कमी होईल. तेव्हा खांद्यावर नुसता हात ठेवलेल्याने आपलेपणा वाढेलच असे नसते. आपलेपणा मनातही असावा लागतो. तो माझ्याकडे होता. त्यांना त्यांची माणसे सांभाळता येत नाहीत, त्याला मी काय करणार, नाही का?

आता दुसरे, तुम्ही जायचेच ठरवले असेल पुण्याला, तर मी काय बोलणार, पण ठरवलेले नसेल तर सांगतो, मी कामासाठी मुंबईला गेलो, दिल्लीला गेलो, दोन्ही ठिकाणी दीर्घकाळ राहिलो, पण दिल्लीत माझे घर नाही. मुंबईतही माझे घर नाही. कुठेच माझे घर नाही. जेव्हा आता घरी परतावे लागेल, असे वाटले तेव्हा मित्रांच्या मदतीने मी घर शोधले ते कृष्णेच्या काठावर कराडला. माझे घर कराडलाच असू शकते. ज्या कृष्णेच्या काठावर आपण वाढलो, जेथे लहानाचे मोठे झालो ती माती, ती माणसे ही आपल्या उभ्या आयुष्याला आकार देतात. म्हणून मी कामासाठी कोठेही गेलो तरी घर कराडलाच बांधले. आता असे बघा, आपल्या जिल्ह्यातले सहा कुलगुरू राज्यातल्या सहा विद्यापीठांमध्ये गेले. अगदी शंकरराव खरातांपासून दाभोळकरांपर्यंत, पण साताऱ्यात कितीजण राहिले? लोक आपल्या खेड्यापाड्यातून

मोठे होतात. नावलौकिक त्यांच्या कर्तबगारीने मिळवतात व खूप खूप मोठे होतात. पण पुण्यामुंबईला निघून जातात. आणि जेथे आपण वाढलो ती गावे ओकीबोकी होऊन जातात. हे केवळ कुलगुरूंसाठी नाही. आपल्या समाजातील सर्वांसाठीच आहे. आपली गावे मोठी व्हायची तर मोठ्या माणसांनी नको का तेथे राहायला. शशीला भेटायला जायचे तर तिचे घर सातारलाच हवे. कृष्णा-वेण्णेच्या काठी. इथेही प्रीतिसंगमच आहे ना? सातारा कोल्हापूरच्या दोन नद्या इथेच तर रमल्या. बघा विचार करून.

मी मानेनेच होकार दिला. साहेबांचा निरोप घेतला. साहेब पुढे कराडला गेले तेथून कोल्हापूरला जाणार होते. मी घरी परत आलो. शशीला सारी हकीकत सांगितली. आम्ही दोघांनी विचार केला. घर करायचे तर ते सातारलाच. आता यापुढे पुण्यातच नाही तर कुठेच जायचे नाही. कामासाठी राज्यात किंवा कुठे जायचे पण आपले घर सातारलाच असले पाहिजे.

सुप्रिया, मी राज्यभर हिंडतो पण माझे कुठेही घर नाही. कोणत्याही गावात बँक खाते नाही. मधल्या काळात मी आमदार होतो. साहित्यिक म्हणूनही लौकिक झाला होता. शासनाच्या १० टक्क्यातून मला घर मिळवता आले असते. अनेकांना माझ्या पत्रावरल्या शिफारशींनी तुझ्या बाबांनी घरे दिली. पण मला मी कधी जागा मागितली नाही की घर. तुझ्या बाबांना आपल्या जवळच्या माणसांची परीक्षा पाहण्याचा, त्यांचे मन समजावून घेण्याचाही छंद आहे. त्यांनी माझ्या पत्रावर माझ्या एका सहकाऱ्याला मुंबईला प्लॉट दिला. पुन्हा त्याने दुसऱ्याच्या नावे मागितला तोही दिला. तो मित्र बाहेर गेला. मला थोडे थांबा म्हणाले. मी थांबलो. टेबलच्या ड्रॉवरमधून एक किल्ली काढली आणि माझ्या हातावर ठेवली.

म्हणाले, 'दुसऱ्या एकासाठी फ्लॅट दिला होता, पण आता तुम्हाला देतो आहे. मोठा आहे.'

मी घाम पुशीत म्हणालो, मी कधी मागितलाय?

ते म्हणाले, ते तर मला माहीतच आहे, तुम्ही मागणार नाही. छान आहे ठेवा.

मी म्हणालो, साहेब, मी सातारला राहतो. केव्हातरी मुंबईला येतो. मला काय करायचेय इथे घर? समजा, एका रात्रीपुरता प्रश्न आला तर प्रतिभावहिनी काही मला हाकलून नाही द्यायच्या. मला ह्या असल्या गोष्टीत रस नाही. मी गुपचूप किल्ली ठेवली. तुझे बाबा मनाने किती मोठे आहेत हे मी हजारो वेळा अनुभवले आहे. प्रश्न त्यांच्या मोठेपणाचा नाही. मी चव्हाणसाहेबांनी सांगितलेली गोष्ट मनात ठेवली आहे. माझे घर सातारलाच असेल.

झाले! दोनच दिवस गेले आणि माझे सासरे, सासुबाई, आणि चुलत सासरे

माझे घरी हजर. शशीच्या माझ्या आनंदाला पारावार राहिला नाही. चांगले दोन–तीन दिवस राहिले. या गोष्टीचे शशीला फारच अप्रूप वाटले. माझे सासरे सातारला आले. सायंकाळी चार–पाच वाजले असतील. शेजारची लहान पोरे दारात जमली होती. भाईच्या आई, भाईच्या आई, तुमच्याकडे कुणीतरी आलेय. घर विचारत होते. अशी मोठी गाडी आहे. शशी बाहेर गेली. तिने पाहिले तर तिचे आईवडील, काका. पळतच गेली आणि हातातली बॅग घेतली. घरात आली. मलाही मोठे आश्चर्य वाटत होते. असे कसे काय झाले? ही मंडळी कशी काय आली? अण्णा, काका कॉटवर बसले. आई आतल्या घरात गेली. मी खुर्चीवर बसलो. शशीने पाणी दिले. कळवायचे नाहीसा? असं अचानक कसं काय आला?

अण्णा म्हणाले, भाग्यवान आहेस पोरी! खरं सांगतो, भाग्यवान आहेस. अण्णा भिंतीला टेकून बसले. त्याचे असे झाले– परवा यशवंतरावांनी आमचे डोळे उघडले. श्रीपतराव दादांचा फोन आला पेढीवर. नमस्कार श्रीपतराव. शशी नावाची आपलीच मुलगी आहे ना?

मी हो म्हणालो.

सातारला असते का?

मी हो म्हणालो.

तिने लक्ष्मण माने नावाच्या माणसाशी विवाह केलाय?

मी हो म्हणालो. मला कळेचना, कशासाठी चौकश्या करीत आहेत.

ते हसू लागले. आम्ही कार्यकर्ते मोठ्या पेचात पडलो होतो. चव्हाणसाहेब आलेत इथे, रसिकभाईंच्या घरी आहेत. माझ्याकडे काही कार्यक्रम आहेत त्यांचे. त्यांना श्रीपतराव भोसले यांना भेटायला जायचे आहे. आता आली का पंचाईत. कुणालाच कळेना, हा श्रीपतराव भोसले कोण?

साहेबांना विचारले.

ते म्हणाले, तुम्ही 'उपरा' वाचले नाहीत काय? ते लक्ष्मण माने यांचे सासरे आहेत. हुंडेकरी आहेत. आणि सारा तिढा सुटला. सारे हसू लागले. तुमचे नाव सर्वांनी सांगितले. तरीही मला खात्री वाटत नव्हती. म्हणून मी फोन करून खात्री करून घेण्याचे ठरवून तुम्हाला फोन केला. चव्हाणसाहेबांना तुम्हाला भेटायला यायचे आहे. मी थोडा गोंधळलो. दादा, मी येतो ना?

नाही. साहेबांना यायचे आहे तुमच्या घरी.

मी बरं म्हटलं. घरी तात्काळ पोहोचलो. मी घरात कुणाला काही सांगत होतो तोवर श्रीपतराव दादा बोंद्रे, माझे मित्र व राज्यात मोठे मंत्री होते. चव्हाणसाहेबांचे भक्त, करवीरचे आमदार. ते आणि खुद्द यशवंतराव चव्हाणसाहेब दारात उभे. हॉलची

आवराआवरही करता आली नाही. साहेब आले. सोफ्यावर बसले. शेजारी दादा बसले. घरात कोणीच नव्हते. हार-शाल आणायलाही वेळ मिळाला नाही. साहेबांनी नमस्कार केला. मोठ्या कौतुकाने माझ्याकडे पाहत राहिले. अत्यंत छान हसले.

श्रीपतराव, मला बघून तुम्हाला फार आश्चर्य वाटले असेल ना? चव्हाणसाहेब म्हणाले.

साहेब, कसलीच कल्पना नसल्याने आपले स्वागतही करता आले नाही. क्षमा करा. मला बोलावले असते तरी आलो असतो मी.

साहेब म्हणाले, ते सोडा, ते महत्त्वाचे नाही. 'उपरा' वाचले की नाही?

मी 'नाही' म्हणालो.

ते म्हणाले, ते आणून वाचा. तुमच्या शशीने केवढे मोठे काम केले आहे. आपल्या घराघरात अशा कर्तबगार मुली जन्माला याव्यात असे वाटते. किती अडचणीत तिने घर चालवले. मी तिच्या घरी जाऊन जेवून आलो. छान केला होता तांबडा, पांढरा रस्सा. कोल्हापुरातल्या जुन्या काळाची आठवण झाली. गुणी मुलगी आहे. बारा वर्षे झाली तुम्ही काही राग सोडला नाही.

साहेब ती येते. पण आम्ही जात नाही. आपला समाज तुम्हाला माहीत आहे. घरातली मंडळी हे स्वीकारत नाहीत, त्यामुळे नाही गेलो. मी म्हणालो.

साहेब थोडे गंभीरपणे म्हणाले, तुम्हा लोकांना मी काय सांगावे. तुम्ही कोल्हापूरकर सारे महाराजांबद्दल किती आस्था बाळगता मला माहीत आहे. उठताबसता महाराजांचे नाव घ्यायचे, पण त्यांचे ऐकायचे मात्र नाही, असे कसे? महाराजांनी स्वतः जाती मोडण्यासाठी सारे आयुष्य खर्ची घातले. आपल्या घरातली मुलगी धनगर समाजात दिली. खरे की नाही? त्यावेळी घरातल्या लोकांनी विरोध केलाच होता की आपण ज्या शिवछत्रपतींचे नाव घेतो मोठ्या अभिमानाने त्यांनी बजाजीराव निंबाळकरांच्या मुलाला आपली मुलगी दिली. बजाजीराव तर मुस्लीम झाले होते. त्यांना धर्मात तरतूद नसतानाही धर्मशास्त्र गुंडाळून ठेवून पुन्हा हिंदू करून घेतले. आपली मुलगी त्यांच्या मुलाला दिली. खरे की नाही? आपली पुराणे तर काय काय सांगतात. सारे महाभारत, रामायण, किती दाखले देऊ सांगा! मी आपल्याला सांगायला आलोय. तुम्ही शशीला मुलगी माना की मानू नका. मी तिला मुलगी मानलीय. लक्ष्मणला जावई मानले आहे. सारे तिचे माहेर मी करणार आहे. तुम्ही सारेजण तिला स्वीकाराल. तिला हे घर पुन्हा मायेने आत घेईल तर बरे.

मी अगदी खजील झालो होतो. साहेब, आपण या कामासाठी आलात! आमचे डोळे उघडलेत. शशीबद्दल एवढ्या जिव्हाळ्याने बोललात. तिला आपली मुलगी मानलेत.

तोवर चहा आला. साहेबांनी चहा घेतला. डॉ. आंबेडकरांबद्दल म्हणाले, श्रीपतराव, कल्पना करा, आपण सारे स्वातंत्र्यसैनिक देशाला स्वातंत्र्य मिळावे म्हणून अविरत प्रयत्न केले. ते मिळवले. पण अखंड स्वातंत्र्य मिळाले नाही. देशाचे दोन तुकडे झाले. त्यावेळी बाबासाहेबांचे कितीतरी मित्र अनुयायी त्यांना म्हणत होते जिनांनी लढून पाकिस्तान घेतले, तुम्ही दलितस्थान का घेत नाही? या मित्रांच्या कार्यकर्त्यांच्या आग्रहाला ते बळी पडले असते तर देशाचे दोनऐवजी तीन तुकडे झाले असते. पण बाबासाहेबांनी आयुष्यात कधी असला विचार केला नाही. हे देशावर केवढे उपकार आहेत त्यांचे. तेही आपल्याएवढेच राष्ट्रभक्त होते. आपण त्यांना समजून घेतले नाही. असामान्य बुद्धिमत्तेच्या पुरुषाची ओळख शाहूराजांनी, सयाजीरावांनी ठेवली, त्यांना पोटाशी धरले आणि त्यांनी देशाला घटना दिली. जाती, धर्म, पंथ भेदाभेद यापलिकडे विद्वान माणूस उभा असतो. मी हल्ली त्यांच्या जीवनचरित्राचा अभ्यास नव्याने करतोय. त्यांचे चरित्र लिहून त्यांच्या कामाला, कार्यकर्तृत्वाला न्याय देण्याचा प्रयत्न करणार आहे.

साहेब अर्धाएक तास बसले असतील. पण पोटात कालवाकालव होत होती. हा केवढ्या मोठ्या मनाचा माणूस, पण लाल दिवा नाही. कार्यकर्त्यांचा गराडा नव्हता. फार वाईट वाटले. घरातल्या लोकांनी ऐकले होतेच. साहेब हसतहसत गेले. आणि मी तुझ्याकडे येण्याचा निर्णय केला. आता चार दिवस तुला घेऊन जाणार. आणि थोडा मोकळा झाल्यावर तुझ्याकडेही राहायला येणार.

मला आणि शशीला सारा उलगडा झाला होता. चव्हाणसाहेबांनी शशीचे माहेरचे दार तिच्यासाठी कायमचे उघडले. आज अण्णांनाही राहावले नाही. अण्णांनी आपली दोन नंबरची सून मुस्लिम समाजातली असूनही स्वीकारली. तिला तिचे स्वातंत्र्य दिले. नमाज पढ किंवा आमच्या देवाची पूजा कर, तो तुझा प्रश्न. आज नातवंडांनी आंतरजातीय विवाह केलेत. सोळा-सतरा जातीतली मुलेमुली आमच्या कुटुंबात आहेत. कोकणस्थ ब्राह्मण आणि कैकाडी आणि आता बौद्ध असा विस्तार झाला. आज शशीला माहेर तर मिळालेच, शिवाय घरामध्ये प्रतिष्ठाही मिळाली. चव्हाणसाहेबांचे मोठेपण किती सांगावे? त्यांनी आम्हाला त्यांचे मानले हे किती स्वप्नवत!

सुप्रिया, तुझ्या बाबांची जडणघडण या विचारांनी झाली. त्यामुळे शरद पवार हे वेगळे रसायन आहे.

ती. सौ. वहिनींना, बाबांना सप्रेम जयभीम.

तुझा,
लक्ष्मणकाका

दिनांक ०२/१०/२०१२

चि. सुप्रिया,

सप्रेम जयभीम.

फोर्ड फाउन्डेशनने अमेरिकेला बोलावल्याचे निमंत्रण मला सातारला मिळाले. माझा आनंद गगनात मावेना. गाढवांच्या मागे जाणारा, हागणदारीत राहणारा, रोज शिव्याशाप खाणारा मी माणूस, अमेरिकेला विमानात बसून जाणार होतो! साध्या एस.टी.ने सुद्धा मी जाताना दहा वेळा विचार करत असे. आता अमेरिकेला आणि तेही त्यांच्या खर्चाने जाणार होतो. सातारकरांनाही मोठा आनंद झाला होता. लोक फार मोठ्या संख्येने भेटायला येत असत. रोज फुलांचे हार, गुच्छ यांनी घर भरलेले असे. शशीसाठी, माझ्यासाठी ही मोठी आनंदाची बाब होती. भाईला कळू लागले होते. तर समता अगदीच लहान होती. आम्ही अजून झोपडपट्टीतल्या जागेतच राहत होतो. राज्यभरातून लोक येत असत. लक्ष्मण माने या माणसाला पाहायला. खरे तर माझे काहीही झाले असते. म्हणजे असे यश 'उपरा'ला मिळेल हे काही माझ्या स्वप्नातही नव्हते. माझ्या कानात वारे शिरले असते तर, पाय जमिनीवर राहिले नसते तर? तर मी आज जसा आहे तसा नसतो हे नक्की. माझे पाय जमिनीवर राहिले ते शशीमुळे, मित्रांमुळे, बाबा आढाव, अनिल अवचट, सुनंदा अवचट आणि यशवंतराव या माझी सातत्याने काळजी घेणाऱ्या ज्येष्ठांमुळे. फोर्ड फाउन्डेशनच्या दिल्लीच्या प्रतिनिधी पुष्पा सुंदर यांची तार मला मिळाली. त्यांनी तात्काळ दिल्लीला बोलावले होते. काही कागदपत्रे पुरी करायची होती. मी अप्पासाहेब भोसल्यांकडून साहेबांना तसे कळविले. साहेबांचा निरोप आला. येथे पोहचल्यावर फोन करा. मी दिल्लीला कधी गेलो नव्हतो. आता कसे करावे? बाळासाहेब थोरात नावाचे समाजवादी युवक दलातले माझे एक स्नेही होते. फार छान माणूस. तेही मला जावई मानत असत. त्यांनी बरोबर यायची तयारी दाखवली. आम्ही साताऱ्यातून ट्रेनने दिल्लीला गेलो. पहिल्यांदाच मी देशही पाहत होतो. रेल्वेच्या प्रवासाने सारा प्रदेश न्याहाळीत प्रवास करता येतो. आम्ही दिल्लीला पोहचलो. साहेबांना फोन केला. पुष्पा सुंदर यांना भेटायचे आहे. कागदपत्रे,

व्हिसा, पासपोर्ट असे कायकाय करायचे आहे असे सांगितले. साहेब म्हणाले तुम्ही आहात तिथेच थांबा मी गाडी पाठवतो. अर्ध्या तासात गाडी आली. गाडीत साहेबांचे पुतणे अशोकराव होते. ते मला ओळखत असल्याने त्यांनी आम्हाला साहेबांच्या घरी नेले. मी पहिल्यांदाच रेसकोर्सवरले त्यांचे घर पाहत होतो. साहेबांनी अनपेक्षितपणे जे मनापासून स्वागत केले त्याने मी अगदी भारावून गेलो. छानसा मोगऱ्यांच्या फुलांचा हार साहेबांनी माझ्या गळ्यात घालायला हात वर नेले. मी वाकून त्यांच्या पायांना स्पर्श करून नमस्कार केला. त्यांनी दिलेला हार वरच्या वरच धरला. साहेब, तुमचे आशीर्वाद मिळाले यातच सारे आले. साहेबांनी सोफ्यावर बसायला सांगितले आणि आत गेले. वेणूताईंना बरे नव्हते. अंगात ताप होता. तरीही तशाच बाहेर आल्या. मी वाकून नमस्कार केला. त्यांनी सांगितले, 'उपरा' त्यांनी तीन वेळा वाचले. फलटणचे लहानपण आठवले. त्यांना खूप थकवा होता. साहेबांनी त्यांना पुन्हा आत नेऊन बेडवर झोपवले. चहा आला. साहेब म्हणाले, तुम्ही मोदी इस्टेटला जाऊन या, पुष्पा सुंदरला नमस्कार सांगा. फार छान बाई आहेत. तुम्हाला त्या सगळी मदत करतील. परत या. जेवू नि मग पासपोर्ट आदी गोष्टी करूया.

ताईंना बरे नसल्याने साहेब थोडे काळजीत होते. मी त्यांच्या गाडीने अशोकरावांना घेऊन फोर्ड फाउन्डेशनच्या कचेरीत पुष्पा सुंदरना भेटलो. त्यांना मला कामकाजासंबंधी कागद द्यायचे होते. नॅरेटिव्ह रिपोर्ट, टाइम बजेट, आर्थिक खर्चाचे नियोजन असे सारे कागद दिले. माझे दिल्लीचे काम झाले होते. मला लगेच परतायचे होते. वेळ थोडा होता. आम्ही साहेबांच्या घरी आलो. बाळसाहेब थोरातही बरोबर होते. त्यांची ओळख साहेबांशी करून दिली. त्यांचे थोरले बंधू फलटणला मोठे पत्रकार होते. शाहू थोरात. ते आणि साहेब एकमेकांना ओळखत असत. आम्ही बाजरीची भाकरी, भरलेलं वांगे, मटकीची उसळ असे छान जेवलो. गाडीनेच साहेबांनी आम्हाला रेल्वे स्टेशनला सोडले. दिल्ली पाहायला परत या. निवांत वेळ काढून माझ्याकडेच राहायचेय. शशी–मुलांना घेऊन या. असे हसत हसत त्यांनी आम्हाला निरोप दिला. यशवंतराव, ज्येष्ठ पत्रकार माधव गडकरी, दिनू रणदिवे, काकोडकर या सर्वांनी मला पासपोर्ट–व्हिसासाठी सारी मदत केली. माझ्यासोबत दया पवार यांना फोर्ड फाउन्डेशनची शिष्यवृत्ती मिळाली होती. आणखी एक तामिळनाडूतल्या सी.एस.लक्ष्मी नावाच्या बाई होत्या. त्यानाही फोर्ड फाउन्डेशनीच शिष्यवृत्ती मिळाली होती. दया माझ्यापेक्षा ज्येष्ठ. त्याचे 'बलुतं' खूप गाजले होते. ते आणि मी मुंबईहून अमेरिकेला गेलो. २५ डिसेंबर ८१ रोजी अमेरिकेत मोठा कार्यक्रम करून फाउन्डेशनने आम्हाला शिष्यवृत्त्या दिल्या. दोन

दिवस कार्यक्रम होता. त्यानंतर आम्ही जवळपास तीन आठवडे न्यू यॉर्कमध्ये होतो. जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात आम्ही भारतात परत आलो. येताना दिल्लीला आलो. आम्ही दिल्लीला येत असल्याचे साहेबांना आधीच कळवले होते. विमान मध्यरात्री पोचणार होते. साहेबांनी आमच्यासाठी गाडी पाठवली होती. आम्ही विमानतळात बाहेर आलो. गाडी शोधली, पण दिसलीच नाही. इतक्या मध्यरात्री साहेबांनी गाडी नसेल पाठवली असे समजून आम्ही भाड्याची गाडी केली. पण जायचे कुठे? दया सिनियर. तो म्हणाला, दिल्लीत महाराष्ट्रीय लोकांचे महाराष्ट्र भवन आहे तेथे जाऊ. गाडीने आम्हाला तेथे नेले. सोबत मोठ्या बॅगा. जिना चढून वर गेलो. बेल वाजवली. त्यांनी दार उघडले. त्रासानेच आत घेतले. आम्ही थेट अमेरिकेहून आलोय. आम्हाला एक रूम हवी आहे. उद्या ती आम्ही सोडू असे सांगितले. त्या गृहस्थाने सारे ऐकून घेतले. मराठी भाषक असल्याने ते चांगले बोलत होते. आम्ही दोघे लेखक आहोत म्हटल्यावर त्यांनी आस्थेने विचारावयास सुरुवात केली. दयाने काय लिहिले आहे ते त्याने सांगितले, मी काय लिहिले आहे ते मी सांगितले. आमच्या पुस्तकांचे विषय समजले. न सांगता आमची जातही समजली. झाले! गृहस्थ गप्प झाले. शांतपणे म्हणाले, क्षमा करा, पण इथे एकही रूम नाही. मी देऊ शकत नाही. शिल्लकच नाही. आता काय करायचे? जायचे तर कुठे? सकाळपर्यंत आम्हाला इथे थांबू द्या. पहाटेचे चार वाजलेत. सारे सांगून झाले. मात्र त्यांनी आम्हाला अक्षरशः हाकलून दिले. बॅगा घेऊन खाली फुटपाथवर आलो. बॅगाना टेकून उभे होतो. थंडीचा कडाका पडलेला. अंगात उबदार कपडे होते, पण बैचेन होतो. अशोक जैन महाराष्ट्र टाइम्सचे दिल्लीतील प्रतिनिधी होते. त्यांचा फोन दयाकडे होता. पण इतक्या अवेळी फोन कसा करावा? दोन तास फूटपाथवर आम्ही दोघे उभे राहिलो. सकाळी सहा वाजता, दयाला थोडा अनुभव असल्याने, तो पुन्हा भवनात गेला. तेथून चव्हाणसाहेबांचा नंबर मिळवून त्यांना फोन केला. आता उजाडले होते. साहेबांनी फोन घेतला. अरे बाबांनो, तुम्ही आहात कोठे? मी रात्रभर काळजीत आहे. गाडी मोकळीच परत आली. तुम्ही आलात की नाही? काय झाले काय? दयाने सारे सांगितले. साहेब शांत झाले. म्हणाले आता टॅक्सी करा नि १ रेसकोर्स सांगा. मी वाट पाहतोय. आम्ही साहेबांकडे गेलो. साहेबांनी विचारपूस केली. त्यांनी तीन वाजताच गाडी पाठवली होती. तासभर वाट पाहून ती मोकळीच परत आली. आमचाच वेंधळेपणा नडला होता. त्यांची काय पंचाईत झाली असेल या विचाराने आम्ही फार शरमून गेलो. दयाने अशोक जैनांना फोन केला. अशोकला सारी स्थिती सांगितली. तोही आवाक झाला. म्हणाला, माझ्याकडे या. साहेब म्हणाले, आता चार दिवस

माझ्याकडे राहा, पण आम्हाला अपराधी वाटत होते. आम्ही अशोककडे जातो असे सांगितले. संध्याकाळी गप्पा मारायला येतो असे सांगितले. साहेब म्हणाले, आता बॅगा उचला नि आत चला. सारे उरका, मग पाहू काय करायचे ते. साहेबांनी एका रूममध्ये आम्हांला नेले. फ्रेश होऊन हॉलमध्ये आलो. साहेबांची काळजी, जागरण हे सारे कुठल्याकुठे पळून गेले होते. पोहे पोटात गेले, चहा झाला. आता रात्रीचा प्रसंग सांगून आम्ही हसायला लागलो. साहेब म्हणाले, आपण सायंकाळी सातच्या सुमारास या. गप्पा मारायच्या आहेत. अनेक विषयांवर मला तुमच्याकडून समजावून घ्यायचे आहे. आम्ही बॅगा उचलल्या. साहेबांनी त्यांच्या गाडीने आम्हाला अशोक जैन यांच्या घरी नेऊन सोडले. अशोककडे आम्ही दोन दिवस राहिलो. अशोक त्यावेळी 'ग्रंथाली'चा विश्वस्त असावा. 'ग्रंथाली' माझी व दयाची प्रकाशक. दिवसभर दिल्लीत भटकलो. सायंकाळी साडेसहा-सात वाजता पुन्हा साहेबांकडे गेलो. आम्ही दोघे सोफ्यावर बसलो. साहेबांनी हसत आपुलकीने स्वागत केले. ते एका खुर्चीवर बसले. शेजारी दुसरी खुर्ची रिकामी होती. ताई आत होत्या. दया म्हणाला, साहेब, लोकांचा राबता फारच कमी झालाय असे दिसते. मागे मी आलो होतो कोण गर्दी होती तेव्हा. साहेब खिन्नपणे उदास हसले. दया, उगवत्या सूर्याला सारेच नमस्कार करतात. मानवी प्रवृत्तीच आहे ती. ते त्या उदासवाण्या स्थितीततून बाहेर येऊन म्हणाले, त्याचे काय आहे, दिल्लीचा एक नबाब राज्यावर होता. त्याचे कुत्रे आजारी पडले तेव्हा त्या कुत्र्याचा समाचार घेण्याकरिता दिल्लीतल्या लोकांनी त्याच्या वाड्याबाहेर रांग लावली होती. पुढे राज्य गेले आणि नबाब स्वतः आजारी पडला तेव्हा त्याच्या समाचाराला त्याचे ते कुत्रेसुद्धा फिरकले नाही! त्यांच्या बोलण्यातले उदास मन रेसकोर्सवरच्या त्यांच्या प्रचंड घरात गोठून राहिल्यासारखे वाटत होते.

त्या मोठ्या दिवाणखाण्यात साहेब आणि आम्ही दोघे दोन तास गप्पा मारत बसलो होतो. त्यांनी आणखी एक छान गोष्ट सांगितली. ते म्हणाले, गर्दीचं मानसशास्त्र मोठे विचित्र असते. सोने पांघरून चिंध्या विकत होतो. गर्दी हटता हटत नव्हती. आता चिंध्या पांघरून सोने विकतो आहे. कुणी फिरकत नाही. काय करावे? चला, आता मला तुम्हा लोकांना काही विचारायचे आहे. खरे सांगतो, लक्ष्मण जसे बोलतो तसे बोलावे असा मोह मलाही तरुणपणी होत असे. पण मी लगाम घालत आलो. आमचे वास्तव वेगळे होते. आजचे वेगळे आहे. तुम्ही ताकदीने भाषा वापरता, वाकवता, तिची तलवार करता आणि विरोधकाला घायाळ करता. बाण कसा लक्ष्यभेद करतो तसे दलित साहित्य आरपार जाते. शब्दांचे मोठे सामर्थ्य तुम्हा लोकांना बाबासाहेबांनी शस्त्रासारखे दिले आहे. म्हणून अभिजन

काहीही म्हणोत, मी दलित साहित्याचा चहाता आणि समर्थक राहिलो आहे. दुःख आणि वेदना ही वंचना वाट्याला आल्याशिवाय समजत नाही. मलाही बसलेली जागा सारवावी लागली होती. तो सल मी कधीही विसरू शकत नाही. त्यामुळे लक्ष्मणची साडेतीन टक्क्यांची संस्कृती समजावून घ्यायची आहे. बोला लक्ष्मण, काय टक्केवारी आहे ती.

साहेब, कसली आलीय टक्केवारी? मी मॅजेस्टिक गप्पांमध्ये बोलत होतो. कार्यक्रमाचे अध्यक्ष होते ना.ग.गोरे. अनिल अवचट, प्र.ना.परांजपे आणि अरुण खोरे माझी खुली मुलाखत घेत होते. एका प्रश्नाचे उत्तर देताना मी म्हणालो, आजचे साहित्य, संगीत, कला आणि संस्कृती साडेतीन टक्क्यांची आहे. म्हणजे मूठभर लोकांची आहे. त्यात सारे साहित्यिकप्रवाह आले. अभिजन आले नि दलितग्रामीणही आले. सारा साहित्य-कलांचा व्यवहार समाजातील मूठभर लोकांचा असतो, असे मला म्हणायचे होते. कार्यक्रम छान झाला. दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्रांनी मथळे केले आणि माझ्यावर आगपाखड सुरू झाली. मी ब्राह्मण द्वेष्टा ठरवला गेलो. अनेक ब्राह्मण मित्रांनी तोंडे फिरवली. मी लढणारा कार्यकर्ता, मी गडबडलो. मग मला अर्थ कळला, साडेतीन टक्के लोकसंख्या ब्राह्मणांची आहे. साडेतीन शहाणे, यातील साडेतीन शब्दाला पेशवाईचा वास आहे. मग मी त्याचेच हत्यार केले आणि सांस्कृतिक संघर्ष सुरू केला. माझ्या पद्धतीने. आता बघा, मी 'उपरा'त जी भाषा वापरली ती अशुद्ध आहे. आम्ही बोलतो ती अशुद्ध आणि पुण्यातल्या सदाशिव पेठेतली स्त्री जी भाषा बोलते ती शुद्ध. मी विचारले, हे कुणी ठरवले शुद्ध आणि अशुद्ध? भाषा भाषाच असते, ती शुद्ध नसते अशुद्ध नसते. ती श्लील ही नसते आणि अश्लीलही नसते. 'पाणी'तला न नळाचा की बाणाचा यावर मास्तर मार्क देणार. ण आणि न काय फरक आहे? आमचे खेड्यापाड्यातले लोक असे नाकातून बोलत नाहीत. म्हणून त्याची भाषा अशुद्ध हे मला मान्य नाही. उलट सदाशिवपेठी मूठभर लोक 'ण' म्हणतात बाकी सारे 'न' म्हणत असतील तर भाषा शुद्ध कोणाची? भाषेत लोकशाही का नको. आम्ही सारे काळ्या रंगाचे. माझी आई काळी, बहीण काळी, बायको काळी, आपण तिघेही काळे, पण माझ्या आईला सून हवी ती गोरीपान. हे गोऱ्या रंगाचे वेड कशासाठी? आपली माती काळी, आमच्या भूमातेचा रंग काळा, आमचा रंग काळा. तरीही आमची मानसिकता गोरी का? मी या मानसिक गुलामगिरीविरुद्ध आहे. ही गुलामी टाकून दिली पाहिजे.

साहेब सारे मन लावून ऐकत होते. वेणूताई खुर्चीत केव्हा येऊन बसल्या ते समजलेच नाही. पुन्हा चहा झाला. गप्पा पुन्हा रंगल्या. साहेबांच्या चेहऱ्यावरची

उदासी काही वेळ तरी गेली. साहेबांकडे कुणीतरी भेटायला आले आणि आमचे बोलणे थांबले. या या मंडळी, म्हणून साहेब उठून आत गेले. काही स्त्रिया होत्या. स्थानिक असाव्यात. आम्ही आपसात बोलत बसलो.

थोडया वेळाने पाहुणे गेले. आम्ही जेवायला उठलो. जेवतानाही मी माझे सौंदर्यशास्त्र सांगतच होतो.

रा.भा.पाटणकरांना ऐकवले का, लक्ष्मण? साहेब म्हणाले.

साहेब, ती मोठी माणसे, काय बोलतात, सौंदर्यशास्त्रावर मला काही कळत नाही. त्यांचा मोठा ग्रंथ आहे. तो मी पुन्हा पुन्हा वाचला, पण त्यातले मला काही समजले नाही. मग मी नाद सोडून दिला.

साहेबांचा निरोप घेतला. अशोककडे परत गेलो. साहेबांनी पुन्हा सकाळी बोलावले होते. ते आता खूप खूष होते.

ती. सौ. वहिनींना, बाबांना सप्रेम जयभीम.

तुझा,

लक्ष्मणकाका

दिनांक ०३/१०/२०१२

चि. सुप्रिया,

सप्रेम जयभीम.

दिल्लीतल्या मुक्कामात दुसऱ्या दिवशी सकाळी दया पवार आणि मी साहेबांकडे दुपारच्या जेवणाला जाणार होतो. मी दिल्ली पहिल्यांदाच पाहत होतो. म.गांधींची समाधी, पं.नेहरूंची समाधी पाहायला आम्ही सकाळी सकाळी गेलो. बऱ्यापैकी भटकून झाल्यावर आम्ही साहेबांच्या बंगल्यावर पोचलो. साहेब अस्वस्थपणे एका खुर्चीवर बसले होते. आम्हांला पाहिले आणि हसतहसत स्वागताला आले. या, कालच्या गप्पा छानच झाल्या. साहित्याचा या अंगाने खरेच मराठीत विचारच झालेला नाही. भाषिक लोकशाही आपण स्वीकारली नाही. बोली भाषांसाठी वेगळा विचारच केला नाही. ते काही केल्या माझ्या डोक्यातून जात नव्हते. मी सारखा देवराष्ट्रातल्या माझ्या लहानपणी पाहिलेल्या, ऐकलेल्या माणसांबद्दल त्यांचे भाषेबद्दल विचार करू लागलो. असा विचार मनात यायचा, पण अभिजनांच्या भाषेच्या शिकवणुकीचा इतका प्रभाव होता की आपण मराठी बोलावे ते शुद्धच असावे, उच्चारही शुद्ध असावेत यावर माझा नेहमी कटाक्ष राहिला. सदाशिवपेठेचे मानसिक दडपण मनावर असायचेच. बोलत बोलत आम्ही दिवाणखान्यात गप्पा मारीत बसलो. ताईंनाही या गप्पा ऐकायच्या होत्या. दया पवारांच्या कविताही ऐकायच्या होत्या. त्याही येऊन बसल्या. दोघांच्या खुर्च्या ठरलेल्या असाव्यात. ते आपापल्या आसनावर बसले. आम्ही समोर कोचावर बसलो. साहेब फार कौतुकाने बोलीभाषांवर आपली मते मांडीत होते. कोल्हापुरी मराठी, वऱ्हाडी मराठी, अहिराणी, कोकणी, मराठवाड्यातली, उर्दूच्या प्रभावाखालची मराठी, सातारी मराठी आणि सदाशिवपेठी मराठी अशी आमची चर्चा सुरू होती. आता भाषेच्या समृद्धीबद्दल आम्ही बोलत होतो. भाषेचे सामर्थ्य साहेबांएवढे कोणाला समजतेय. खेड्यापाड्यातल्या स्त्रियांचे मराठी, साहेब सांगत होते, विठाईच्या भाषेतील गोडवा, ओव्या, जात्यावरली गाणी, सारी तर बोली भाषेतच होती.

'नका बाळांनो डगमगू, सूर्य चंद्रावरला जाईल ढगू' हे त्यांनी कितीतरी वेळा वेगवेगळ्या संदर्भात म्हणून दाखवले. साहेब मराठीवर किती मनापासून प्रेम करतात ते समजत होते. स्त्रियांना तसेही फार अदबशीर बोलावे लागते. मोजूनमापून त्या बोलतात. पल्हाळ नसतो, पण जे बोलतात त्याने सारे मनातले, पोटातले ओठावर येते. स्त्रीची स्थिती स्त्रिया किती छान पद्धतीने सांगतात. मी साहेबांना सांगत होतो. बाबा आढावांच्या आई, त्यांना बाई म्हणत असत, त्या फार छान बोलत. अगदी उखाण्यात बोलावे तसे त्यांचे बोलणे सहज असे. 'बायाची जात, कांद्याची पात, दिली लाथ, गेली वाहत' किंवा 'काय बाई जमीनजुमला बाबांसाठी केला नाहीत?' असे गमतीने म्हणावे तर त्या म्हणाल्या, 'न्हाय न्हाय, तसं कसं? बाबाला जमीन हाय की, थुक्यानं भिजवतो आन् चांदण्यात वाळवतो.' साहेब आणि वेणूताई हसू लागल्या. तसे बाबांचे मराठीही ऐकण्यासारखे. ते एका पोक्तशा बाईचा किस्सा सांगत होते. हडपसरला ते त्यावेळी प्रॅक्टिस करत असत. त्यांच्या साहाय्यक डॉक्टराने तिला तपासले. तिचा काहीतरी समज झाला. ती त्याला म्हणाली, 'मूठभर कॅस, कवळीभर काया, आन् त्याजवर भुललास व्हय रं माझ्या राया.' बाई संतापाने बाबाकडे तक्रार करीत होती. मराठीतले हे वैभव मराठी भाषेत आले नाही. लिहिणारी, वाचणारी, चर्चा करणारी तोवर एकच जात होती ना? इतरांनी नुसते त्यांचे भजन करायचे!

दयाने मराठीतल्या शिव्यांबद्दल साहेबांना सांगितले. लक्ष्मणने मराठीतल्या शिव्यांबद्दलही वेगळी भूमिका मांडली होती. मी पण उडालो होतो. त्याचा आक्रमकपणा हा खास त्याचाच असतो. अशी प्रस्तावना केली नि मी शिव्यांबद्दल सांगू लागलो. आम्ही कोल्हापुरातल्या कॉलेजातले मित्र, 'रांडेच्या' ही एकच शिवी किती पद्धतीने देत असू ते सांगितले. प्राध्यापकाने एखादा विषय छान शिकवला तर आम्ही म्हणायचो, 'काय रांडचं शिकवितय', मित्राला तंबाखू मागायची तर काड रांडच्या तंबाखू, रांडच्यानू चहा देशिला की नाही. हा रांडच्या शब्द इतका वेगवेगळया पद्धतीने कोल्हापुरी लोक वापरतात की ती शिवी वाटतच नाही. रांडच्या म्हणजे ठेवलेल्या बाईच्या असे काही कुणाला म्हणायचे नसते. रांडच्या बाहेर ये तुला दाखवतोच, मिशाला ताव मारीत तिरीमिरीने बोलला की ती शिवी होते. साहेबांच्या भाषणांतही कधीकधी शिवी येते. असे म्हटल्यावर तर ते अवाक्च झाले. अहो, काय म्हणताय काय? होय साहेब, सातारचा माणूस, च्या आयला म्हणल्याशिवाय राहतच नाही. इतक्या सहजपणे तो हा शब्द वापरतो की त्याचे त्यालाही माहीत नसते. इतका तो लोकभाषेत गुंतलेला असतो. त्याने आपल्या भाषणातही तो येतो. च्याआयला लक्ष्मण, हे भलतेच निरीक्षण आहे, असे डोळे

मिचकावीत म्हणून साहेब हसू लागले. दया ते 'बलुत्या'तले कवाखान्यातले जगणे समजले. चानी, बोटी, असे उल्लेख आले. मीही लहानपणी ते ऐकलेत. पण अर्थ उलगडत नाही.

दयाने सांगितले, ढोरे फाडायची, मांस वाटून घ्यायचे, इतके मांस एकावेळी शिजवून खाता येत नाही. हे सारे मृत जनावरांचे मांस. ते घरी आणायचे, दोऱ्या बांधायच्या, त्या दोऱ्यांवर मांसाच्या बोंबलासारख्या पट्ट्या काढून वाळायला घालायच्या. त्यांना म्हणतात चाण्या. चारपाच दिवस असे मांस वाळवायचे. ते अगदी कडकडीत बोंबलासारखे वाळले की त्याचे बारीक बारीक तुकडे करायचे. बोटाएवढे त्याला बोटी म्हणायचे. या बोट्या मग डेऱ्यात भरून उतरंडीला लावायच्या. पावसाळ्याच्या दिवसांत त्या काढायच्या. सुगडात शिजवायच्या. किंवा खरपूस भाजायच्या. छानपैकी खिशात घालायच्या. शेंगदाणे, फुटाणे खात हिंडावे तसे खिशात घालून आम्ही खात फिरायचो.

डल्ली, डुल्ली म्हणजे? साहेबांनी विचारले.

डल्ली डुल्ली म्हणजे मोठ्याचे मांस.

काय विलक्षण जग आहे दया. भाषेचे वैभव म्हणून या गोष्टीकडे खरेच मराठी माणसांनी पाहिलेच नाही. दलित साहित्याने मराठीला फार समृद्ध केले असे मी मानतो. मी मनापासून त्याचा समर्थक आहे. मला ही भाषा माझीच वाटू लागते. पण लक्ष्मण, त्या शिव्यांचे मध्येच राहिले.

मी सांगू लागलो. साहेब, शिव्या आणि ओव्या तितक्याच उत्कट असतात. दोन्हीतली उत्कटता काळजाच्या देठापासून आलेली असते. रागाचा नि लोभाचा तो आविष्कार असतो. तो थेट या हृदयीचा त्या हृदयी जात असतो. कविता आणि शिवी तेवढीच ताकदीने येत असते. 'अंधाऱ्या कोठडीत म्हातारी मेली, पाच मुलं असून दोघांनीच नेहली. ओळखा?' साहेब हसू लागले. कोणालाच उत्तर कळेना. ताई शांत बसल्या होत्या ऐकत, दया नि साहेब म्हणाले, नाही बाबा कळत. तुम्हीच सांगा. ताई म्हणाल्या, थांबा मी सांगते, लहानपणी फलटणला असताना मी ऐकलय सांगू? हां ताई सांगा. नाकातला शेंबूड! साहेबांना इतके हसू आले की डोळ्यांतून पाणी आले. इतके छान की कविताच की ती. साहेब, मराठी भाषा आणि तिच्यातल्या शिव्या यावर संशोधन झाले पाहिजे. मुडद्या, किरड्या, तुझा मुडदा गेला, भाड्या, तुला खाल्ला आराबानं, तुझी डोली शिनगारली, या शिव्या 'उपरा'त आल्या आहेत. 'उपरा'च्या समीक्षेत समीक्षकांची भाषा न समजल्याने मोठीच गोची होते. खरडा माहीत नसतो, शिंच्या ही शिवी वाटत नाही. शिंच्या म्हणजे शिंदळीच्या म्हणजे ठेवलेल्या बाईच्या. ही शिवी वाटते

का? सहज येते. शिंच्या तेवढ्याच सहज येते. शिंच्या व रांडच्या दोन्हीचा अर्थ एकच, पण एक येतं झणझणीत तांबड्या रस्यासारखा तर दुसरा एक येतो बुळबुळीत तूप लावल्यासारखा. रांडच्या शिवी वाटते, तुझी डुली म्या शिनगारली म्हणजे एका समीक्षकाने लिहिले डोली म्हणजे हिंदी सिनेमातली डोली. जिच्यात नवरी मुलगी बसून येते. साहेब, समीक्षकांना बारामतीचे डोले पाहायला नेले पाहिजे नाही, मराठी भाषिक अलंकाराची जाण खेड्यापाड्यातल्या लोकांना नसते. अलंकारांची ओळखही नसते. पोटपुजा करणाऱ्यांनी व्याकरणे निर्माण केली. 'घेणं ना देणं आन् खंदील लावून येणं.' आहे का कुठे इंद्रियगोचरता, पण अर्थ अश्लिल आहे. कित्येकदा अभिव्यक्तीतले शब्द इंद्रियगोचर असतात, पण अर्थ फार साळसूद असतो. अशा असंख्य शिव्या मी साहेबांना सांगितल्या. लहानपणी तर मीही या शिव्या ऐकल्यात, दिल्यात नि घेतल्यात. बहुसंख्य शिव्या आई, बहिणीवरून येतात. बहीणच्योत अशी सामान्य शिवी. भगिणी भोग्या असे कुणी म्हणीत नाही. मादरच्योत म्हणजे मातृगमण्या असे कुणी म्हणीत नाही. माझे शिव्यांचे भांडार पाहून ते आणि ताई अवाक्‌च झाले. तरीही ताई तेथे असल्याने मला मर्यादा होत्या. आमच्या लोकात इतक्या सहजपणे शिव्या देतात की त्या शिव्या वाटतच नाहीत. यांच्या नाकाला रूमाल लागतात. मला सुकटीचा वास सर्वांत सुंदर वास वाटतो. मोगऱ्याचा नाही. मोगरा माझ्या वाट्यालाच कधी आला नाही. तरवडाची फुले सर्वांत सुंदर. धोतऱ्याचे फूल सर्वात देखणे. असे माझे तऱ्हेवाईक म्हणता येतील असले सिद्धांत. मराठीतल्या संतांनी दिलेल्या शिव्या, चव्हाणसाहेबांचे वाचन किती अफाट होते. सहजपणे ते श्लोक मुखोदगत म्हणत असत. तुकाराम, ज्ञानेश्वर, रामदास आणि त्यांनी दिलेल्या शिव्या साहेबांना भराभर आठवत होत्या. जनाबाई, नामदेव, आणि पांडुरंगभक्तांनी वाहिलेली लाखोली. त्यांच्या पांडुरंग भक्तीचे पुरावे म्हणून आजही मराठी माणूस या संतांना काही शिवराळ म्हणत नाही. साहेबांना मराठी भाषेतला हा तिखटजाळ रस्सा खास पुरण पोळीतल्या येळवणीसारखा वाटला. खूप वेळ बोलत बसलो होतो. एखादा फड जमावा तसे. मध्येच ताई आत गेल्या. जेवणाचे वाढले होते. पिठले-भाकरी-वांगे असा खास मराठी बेत. बाजरीची, ज्वारीची भाकरी खात गप्पा सुरू होत्या.

लक्ष्मण, मराठी भाषेतला एक वेगळा बाज आपण पाहिला. माझे खूप मित्र अभिजनवर्गातले आहेत. त्यांच्याशीही मी असा तासनतास बोललोय. गप्पा मारल्यात. पण खरे सांगू, आजचे जेवण भलरी म्हणताना मारलेले बरबाटाचे झुरके जसे असते तसे वाटले. सर्व जातीधर्मातले लोक जेव्हा लिहू लागतील ना तेव्हाच मराठी समृद्ध होईल. 'उपरा'तल्या कितीतरी शब्दांबद्दल लोक मला विचारतात.

मी त्यांना सहज अर्थ सांगू शकतो. सातारी बोलीभाषा हे 'उपरा'चे खास वेगळेपण आहे.

साहेबांचा ताईंचा निरोप घेऊन आम्ही निघालो. सायंकाळी आम्ही मुंबईला परतणार होतो. तेथून सातारला. दुसऱ्या दिवशी मुंबईत पोहचलो. दया त्याच्या घरी गेला. मी माझ्या मित्राच्या घरी जाऊन झोपलो होतो. न्यू यॉर्क, दिल्ली, मुंबई असा प्रवास झाल्याने झोपेचे थोडे वेळापत्रक बिघडले होते. त्यात बापजन्मात विमानाने प्रवास केला नव्हता. तो वेगळा आनंद तर होता पण झोपेचे तंत्र बिघडले होते. दुपारचे बारा वाजले होते. रेणकेंच्या चुनाभट्टीतल्या घरात मी झोपलो होतो. त्याने मला उठवले. मी झोपतच होतो. त्याने सांगितले, अरे ऊठ, लोक तुला शोधत असतील. 'उपरा'ला साहित्य अकादमी मिळाली आहे. मी त्याला म्हणालो झोपू देना रे, तुला चेष्टा करायला हीच वेळा आहे का? त्याने अंगावरले पांघरूण ओढले नि हातात दिला महाराष्ट्र टाइम्स. 'उपरा'ला साहित्य अकादमीचा पुरस्कार जाहीर झाला होता. मला खरेच वाटत नव्हते. साहित्य अकादमीचा पुरस्कार त्यावेळी सत्तर वर्षांच्या पुढे मिळत असे. माझ्यासारख्या नवख्या लेखकाला कसा मिळेल? त्यात माझे हे पहिलेच आपत्य. मला खूप आश्चर्य वाटले होते. मी उठलो, क्षणभर वि.स. खांडेकर भाऊंची आठवण झाली. त्यांना किती आनंद झाला असता. मी माझ्यावरली जबाबदारी वाढल्याचे लक्षात आल्यावर फार काळजीत पडलो. तोपर्यंत मी तंबाखू खात असे. वयाच्या बत्तीसाव्या वर्षी मला साहित्य अकादमी आणि तीही पहिल्या पुस्तकाला मिळाली. हा राष्ट्रीय विक्रमच होता. उशाशी तंबाखूची पुडी नि चुन्याची डबी पडली होती. ती उचलली आणि रेणकेंच्या घराच्या खिडकीतून बाहेर फेकून दिली. अनेक वर्षांची ही सोबतीन. कळायला लागले तेव्हापासून गाढवामागे जाताना ती खायला लागलो. म्हणजे जवळपास वीसपंचवीस वर्षं तंबाखू खाल्ली. तिचा शेवट केला. त्यानंतर तंबाखूच काय कोणतेही व्यसन नव्हते. मनातून खूप आनंद झाला होता. आता दोन वेळ जेवण या पलिकडे आपल्याला कोणत्याही वायफट गरजा नव्हत्या, ज्यांची शरम वाटावी. काल दिल्लीत होतो पण माहिती नव्हते, आज माहिती झाले. उरकले नि तसाच सातारला पळालो. साहित्य अकादमीने मी लेखक म्हणूनही उत्तम सेवा केल्याचे शिक्कामोर्तब केले. खूपखूप आनंद झाला. चव्हाणसाहेबांची भेट झाल्यावर त्यांनी सांगितले. वेणूताई त्यादिवशी दिवसभर येणाऱ्याजाणाऱ्या सर्वांना पेढे वाटत होत्या. साहेबांना सारखे सांगत होत्या. फलटणने तुम्हाला अनेकदा त्रासच दिला आहे. पण माझ्या भावाच्या शाळेत शिकलेल्या एका गरीब समाजातल्या पोराने साहित्य अकादमी मिळवली. अमेरिकेला जाऊन आला. तुम्हालाही आनंद दिला.

त्यांना माझा खूप जिव्हाळा. साहेबांचे प्रेम मिळणे ही माझ्यासाठी मोठी शिदोरी होती.

सुप्रिया, साहेब म्हणजे एक परीस होता, त्यांच्या स्पर्शाने कोणत्याही लोखंडाचे सोने होई. तुझ्या बाबांसारखे कितीतरी लोक साहेबांनी जवळ केले. त्यांच्यावर पुत्रवत प्रेम केले. म्हणूनच त्यांना विसरणे अशक्यच.

ती. सौ. वहिनींना, बाबांना सप्रेम जयभीम.

तुझा,
लक्ष्मणकाका

दिनांक ०८/१०/२०१२

चि. सुप्रिया,

सप्रेम जयभीम.

माझे सहकारी मित्र यल्लाप्पा वैदू आणि मी साहेबांना भेटायला रिव्हीएरा या त्यांच्या मुंबईतील निवासस्थानी भेटावयास गेलो होतो. साहेबांनी बोलावले होते. त्या वेळी मी पोटदुखीने फार हैराण होतो. उकळलेल्या पाण्याची बाटली कायम शबनममध्ये असायची. साहेबांनी मला विचारले 'लक्ष्मण, असे पाणी बरोबर घेऊन कसे हिंडणार?'

'बंद दरवाजा' सकाळमध्ये ते वाचत होते. मी तेव्हा आताच्यासारखा इनोव्हातून फिरत नव्हतो. मिळेल ते वाहन, सायकल, बैलगाडी, ट्रक, टेंपो, पायी पायी आणि एस.टी., मिळेल त्या वाहनाने फिरायचे. तेव्हा गाढवांचे तांडेच्या तांडे रस्त्याने पोटामागे हिंडत असत. फिरस्त्यासोबत ते दिसले की एस.टी.तून उतरायचे आणि पायी पायी चालायला लागायचे, त्यांच्याबरोबर, त्यांच्यातला एक बनून. किती प्रकारचे मटण त्यावेळी खाल्ले असेल ते मटणालाच ठाऊक. त्यांच्या बिऱ्हाडावर, पालावर बसून त्यांचेबरोबर जेवायचे. पाणी तिथलेच प्यायचे. बारा गावाचं पाणी. त्याने पोटाला सहन होईना. ते लागले दुखायला. मग माझे सहकारी मित्र डॉ. दाभोळकर, त्यांनी साताऱ्यातले डॉक्टर केले. औषधांच्या चिठ्ठ्यांनी फाईल बरीच जाड झाली. प्रत्येक डॉक्टरने औषधे द्यायची. अशी सारखी औषधे खात होतो. त्याने औषधांचे दुष्परिणाम होऊन पुन्हा दुसरेच काहीतरी दुखायचे. त्याने फार बेजार झालो होतो. कुठेतरी दूर महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात रस्त्याच्या कडेला, हागणदारीत, किंवा बोडक्या माळावर रेल्वेच्या रुळांच्या बाजूने किंवा एस.टी.स्टँड, रेल्वेस्टेशन, डोंगरांच्या उताराला, दऱ्यामध्ये, किंवा पर्वताच्या उंचच्या उंच शिखरावर, कुठेही मी असायचो. तेथून मिळेल त्या कागदावर अगदी एस.टी.ची तिकीटेही वापरत असे लिहिण्यासाठी. मजकूर लिहून झाला की तो एस.टी.ने सकाळच्या पुण्याच्या कचेरीत पाठवायचा. सदा डुम्बरे, अरुण खोरे तो मजकूर सकाळच्या रविवारच्या पुरवणीत वापरत असत. सकाळचे संपादक

श्री.ग.मुणगेकर यांनी फार मोठी जागा दिली होती. आतासारखे शब्दांचे बंधन नव्हते. सारा मजकूर वापरला जाई. कधीकधी पुरवणीचे अख्खे पान मिळे. वर्तमानपत्रे समाजपरिवर्तनाचे साधन वाटत. महाराष्ट्राच्या सामाजिक परिवर्तनात जी संवेदनशीलता वर्तमानपत्रांनी दाखवली तशी आज ती नावालाही नाही. मजकूर वाचून स्वतःचे डोळे पुसणारे हजारो वाचक असत ना तसेच संपादकही असत. मुणगेकर, चंद्रकांत घोरपडे, माधवराव गडकरी, तुकाराम कोकते, अरुण साधू, गोविंदराव तळवळकर, वा.दा.रानडे, अशोक जैन, दिनकर गांगल, आणि त्यावेळच्या तरुण पिढीतले निखिल वागळे कितीतरी जणांनी या कामात मला मदत केली. लोकांपर्यंत भटक्याविमुक्तांचे जगणे गेले.

सुप्रिया, साहेब हे सारे लेखन काळजीपूर्वक वाचत होते. माझी वणवण पाहून त्यांचे काळीज तुटत हाते. माझ्यावर प्रेम करणारी बाबा आढाव, अनिल अवचटांसारखी माणसे तर होतीच, शिवाय एस.एम.जोशी अण्णा आणि यशवंतराव यांनी माझ्यावर जो लोभ दाखवला, जे अकृत्रिम प्रेम केले तोच माझ्या आयुष्यात मोठा ठेवा होता. तेव्हा नेते संवेदनशील होते. राजकारणाचा धंदा झाला नव्हता. आपुलकी, प्रेम, माया, जिव्हाळा हे नुसते फुकाचे शब्द नव्हते तेव्हा. लक्ष्मण, कशी बांधणार ही आपल्या आवळ्याभोपळ्यांची मोट, वाऱ्यावरची वरात कशी बांधणार? अण्णा जसे काळजीने विचारीत तसेच साहेबही चिंतेत असत. मी म्हणे, साहेब, आमचे एक सूत्र आहे. देगा उसका भला, नही देगा उसकाभी भला. तुमच्या आशिर्वादाने हे काम करू शकलो तर उत्तमच. पण नाही जमले तर पुढच्या पिढ्यांसाठी पायवाट बनता आले तरी आनंद वाटेल. ज्या वाटेने कुणी गेले नाही ती वाट आपली आपण निर्माण करावी, इतरही येतील. हळूहळू बनेल त्याची सडक. नाही बनली तरी दुःख नाही.

सुप्रिया, डांबरी रस्त्याचे वैभव न्यारे असते हे खरेच. पण ती वाट तिला पाहिजे तिकडे नेते. आपल्याला हवे तिकडे ती जात नाही. आपल्याला तिच्यामागून जावे लागते. पायवाटेचे तसे नाही आपली पायवाट आपल्याला हवे तिकडे नेते. म्हणून मी पायवाटेने जातो. कोण काय म्हणतो याचा विचार करीत बसत नाही. स्वतःच्या बुद्धीला पटेल ते करतो. 'सत्यासत्याशी मन केले ग्वाही, मानियले नाही बहुमता.' हा तुकोबारायांनी दाखवलेला मार्ग. या मार्गाने मी जात आलो. निंदा नालस्ती करणारे करतच राहतात. त्याने हैराण होण्याचे कारण नाही. आपल्या मार्गावरून आपण चालत राहावे. कोणाशी भांडण करू नये. हा संस्कार सेवादलात मिळाला. मी यल्लाप्पा, साहेबांशी त्यांच्या दिवानखान्यात बोलत होतो. डॉ.बी.डी. पिंपरकर हे मुंबईतले प्रख्यात डॉक्टर, तीन तीन महिने अपॉईन्टमेंट मिळत नसे.

साहेबांचे स्नेही. साहेबांनी त्यांची वेळ घेतली होती माझ्यासाठी. वेळ होता तोवर चहा झाला. साहेब तेव्हा इंदिरा काँग्रेसमध्ये परत निघाले होते. आम्हा तरुण मंडळींना साहेबांची ही भूमिका पटत नव्हती. साहेबांना इंदिराजींनी दारात ताटकळत ठेवले होते. ज्या माणसाने इंदिरा गांधींसाठी, मिळत असलेले पंतप्रधानपद सोडण्याचा मनाचा मोठेपणा दाखवला होता. इंदिराजींना पाठिंबा देऊन पंतप्रधान केले होते. त्या बाईंनी साहेबांना असे काँग्रेसच्या उंबऱ्यात उभे केले होते. ज्यांच्या जगण्याचा सारा ध्यास काँग्रेस होती. ज्यांनी उभे आयुष्य काँग्रेसला वाहिले होते, ज्यांनी पक्षासाठी हाडाची काडे केली होती, त्या यशवंतराव चव्हाण नावाच्या काँग्रेसनिष्ठ राष्ट्रीय नेत्याला दारात उभे केले होते. त्याचा राज्यातल्या जनतेला फार राग आला होता. त्यामुळे सारे सांगत होते, साहेब, नका जाऊ बाईंच्या काँग्रेसमध्ये. त्या तुम्हाला सन्मानाने वागवणार नाहीत. त्या फार दुष्ट आहेत. हट्टी आहेत. अहंकारी आहेत. मी साहेबांना विनवीत होतो. साहेबही फार व्यथित होते. ते राजकारणावर आमच्याशी फारसे बोलत नसत. राजकारण आले की ते फार अबोल होत. तोंड कोठे बंद ठेवावे, कोठे काय बोलावे, काय बोलू नये आम्हाला काहीच गमवायचे नसते. त्याने आम्ही बोलतो. तसे त्यांनीही बोलावे असे वाटे, पण ते घट्ट ओठांचे होते. राजकारण त्यांच्या जगण्याचा मोठा अध्याय होता. ते राजकारणाशिवाय राहू शकत नव्हते. लोक त्यांना त्यासाठी नावे ठेवीत. सत्तेशिवाय त्यांना जगताच येत नाही असे म्हणत. वर्तमानपत्रे टीका करत होती. मी बोलत होतो. ते शांत होते. मला म्हणाले, लक्ष्मण, मला आता लोक काय म्हणतात व वर्तमानपत्रे काय म्हणतात हे सारे समजते, पण आपण मुख्य प्रवाहात राहिले पाहिजे असे माझे मत आहे. देशाने इंदिराजींच्या काँग्रेसला मान्यता दिली आहे. आपण देशाबरोबर असले पाहिजे असे माझे प्रामाणिक मत आहे. दुसरे असे, की व्यक्तिगत भावनेच्या आहारी जाऊन राजकारणातले निर्णय करू नयेत. आपल्या निर्णयाने लाखो कार्यकर्त्यांच्यावर त्याचा काय परिणाम होईल याचा विचार करावा नि मग निर्णय घ्यावा. मोठ्या कष्टाने, परिश्रमाने आम्ही लोकांनी हजारो संस्था उभ्या केल्यात. कोट्यवधी रुपयांची उलाढाल या संस्था करतात. लाखो लोकांच्या या संस्था मी मोठ्या परिश्रमाने सत्तेचा टेकू देऊन उभ्या केल्यात. बहुजनांच्या या संस्था सत्तेच्या ताकदीवर उभ्या आहेत. बाई फार हट्टी आहेत. राजकारणात सत्तेसाठी त्या काहीही करू शकतात. सत्तेचे पाठबळ गेले तर त्या या संस्था मोडून टाकतील. एका व्यक्तीच्या मानपानापेक्षा या संस्था खेड्यापाड्यातली आपली माणसे, त्यांच्या संस्था जगणे मला मोलाचे वाटते.

यावर उसळून मी म्हणालो, साहेब, आपण म्हणता ते खरे, पण एस.एम.

नानासाहेब नाहीत का सत्तेच्या बाहेर? तेही चालवतातच की संस्था. यावर साहेब म्हणाले तेही सुप्रिया आपण सर्वांनी लक्षात ठेवले पाहिजे. ते म्हणाले, लक्ष्मण, त्यांची गोष्ट वेगळी आहे. हजारो वर्षांची परंपरा त्यांच्या समाजाला आहे. स्वयंशिस्त काय असते त्यांना माहीत आहे. तत्त्वनिष्ठ राहूनही ते काम करू शकतात. त्याचे कारण त्यांना फार मोठा सांस्कृतिक वारसा लाभलेला आहे. हजारो वर्षे त्या समाजाकडे ज्ञानाची परंपरा आहे. सत्ता, प्रशासन, शासन त्यांच्या तर हातात आहे. त्यामुळे एकट्या एस.एम.नी काहीही भूमिका घेतली ना तरी त्या समाजाचे फारसे बिघडत नाही. याउलट सारे आपले आहे. आपली माणसे, आपला समाज, आपल्या संस्था, अजूनही बाल्यावस्थेत आहेत. त्यांना सत्तेच्या आधाराची गरज आहे. सत्तेशिवाय यांना उभेच राहता येणार नाही. सत्तेचा भक्कम आधार होता म्हणूनच सहकारात, शिक्षणात, कृषी-औद्योगिकीकरणात हजारो संस्था आज आपल्या माणसांनी उभ्या केल्यात. त्या चालविण्याची कोणतीही परंपरा नाही. प्रशासनातला अनुभव नाही. सत्तेचे बदलते स्वरूप तर हैराण करणारे आहे. आपल्या नव्या नेतृत्वाकडे पाहून काय आशा करावी?

यावर मी म्हणालो, साहेब, हे सारे आपणच तर उभे केलेत. या प्रत्येकाच्या बोटाला धरून पाय टाकायला शिकवलेत. यावर ते म्हणाले, होय लक्ष्मण. हे सारे खरे आहे, म्हणून तर काळजी वाटते ना? माझी पहिली निवडणूक मी लढवली. पण एक पैसाही खर्च केला नाही. त्यानंतरच्या प्रत्येक निवडणुकीचा खर्च वाढत गेला. आणि आता हे सारे निवडणुकांचे तंत्र पाहिले की निराश व्हायला होते. निघालो होतो देवाच्या आळंदीला आणि पोहचलो चोरांच्या आळंदीला, काय करावे? लोकशाही नावाचे केवळ कलेवर खांद्यावर वागवत नाही. लक्ष्मण, या निवडणुका आपल्या हातातून गेल्यात. त्या आता सेवेपक्षा पैसेवाल्यांनी पळवल्या आहेत. हे सत्तेचे सूत्रही आता आपल्या हातातून निसटले आहे. सत्ता पुन्हा तिच्या मूळ स्वभावावर गेली. ती पुन्हा उर्ध्वगामी झाली. मी मोठ्या कष्टाने तिला अधोगामी केले होते. विकेंद्रीकरण, विकेंद्रीकरण म्हणजे काय? सत्ता सर्वात शेवटच्या माणसाजवळ जाणे, सामान्यातला सामान्य माणूस सत्ताधारी होणे, म्हणजे लोकशाही ना? आजचे सारे भेसूर चित्र पाहिल्यावर मी काय, एस.एम.काय व्यथितच आहोत. त्यांचा मार्ग माझा मार्ग एक नाही हे मलाही कळते, पण आमचे ध्येय एकच आहे. तुम्ही म्हणता हे सारे सोडून द्या. लक्ष्मण, आता मला कराडाच्या कोर्टात वकीलीही करता येणार नाही. जमीनजुमला, इस्टेटीच्या भानगडीत मी पडलो नाही. त्याने शेतीवाडीही नाही नि त्यातले आता मला काही करताही येणार नाही. आणि खरे सांगू, राजकीय पुरुषाला निवृत्ती नसते. अखेरच्या श्वासापर्यंत

राजकारणी माणसाला इच्छा असो वा नसो; राजकरणच करावे लागते. आज राजकारण हे सत्ताकारणच झाले आहे. काहीही करा, निवडून या. बास्स! झाली लोकशाही. मोठ्या तळमळीच्या लोकांनी उभा केलेला पक्ष. सोसलेले तुरुंगवास, इंग्रजांच्या जाचाला, जुलुमाला न जुमानता गोळया छातीवर झेलून हसतहसत मृत्यूला कवटाळणारी कोवळी मुले, गांधी–नेहरूंनी उभा केलेला पक्ष. मी आयुष्यात काँग्रेसनिष्ठा कधी सोडली नाही. प्रसंग कसेही आले तरी काँग्रेसबाबत तडजोडही केली नाही. त्यामुळे माझ्या मानपानापेक्षा पक्षा मोठा आहे. ज्यांच्या हातात सत्ता आहे त्यांनीच काहीशा जाणतेपणे, अजाणतेपणे मी म्हणेन ते पूर्व या व्यक्तिवादी भूमिकेने पक्षाचे अतोनात नुकसान झाले आहे. पक्ष संघटना मोडीत निघाली आहे. हे सारे सावरले पाहिजे. त्यासाठी आपण तेथे असलो पाहिजे. जमेल ती पक्षाची, जनतेची सेवा केली पहिजे. आपण सकारात्मक विचार केला पाहिजे. हे राष्ट्र फार मोठे आहे. आमच्या तरुण सहकाऱ्यांना हे पटत नाही. माझ्या मानापमानाचा विचार ते जास्त करतात. मी तसे करीत नाही. मी मानापानाच्या पलिकडे गेलो आहे. मला दुःख याचेच आहे की आम्रवृक्षाची कमाई आगंतुक वाढलेली वनस्पती खाते आहे.

मी मध्येच म्हणालो, आपल्याला बांडगुळ म्हणायचे आहे का?

नाही. तुमच्यासारखे कठोर शब्द मी नाही वापरत. पण माझ्या म्हणण्यातला अर्थ काहीसा तसाच आहे. मी तुम्हाला गंमत सांगतो, ही व्याधी जुनीच आहे. १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले. मी पहिल्या ध्वजवंदनेस हजर राहण्यासाठी १४ तारखेलाच मुंबईला पोचलो. सकाळी लवकर उठून ध्वजवंदनेसाठी निघालो. सारी मुंबई आझाद मैदानाकडे निघाली होती. सातारा जिल्ह्यातल्या ज्या लोकांनी ब्रिटिशांच्या खबऱ्याचे काम केले होते, आम्हा कार्यकर्त्यांना पकडून दिले होते असे बरेचजण पांढऱ्याशुभ्र परिट घडीतले कपडे घालून, जाकिटे घालून, टोकदार गांधी टोप्या घलून आमच्यापुढे पळत होते. आता हे का राजकारण करणार, माझ्या मनात पाल चुकचुकली. मी आईच्या बोटाला धरून अनेकदा पंढरपूरला गेलो आहे. तिथे जसे हौसे, गौसे, नवसे जमलेले असतात तसाच प्रकार या ठिकाणीही दिसत होता. स्वातंत्र्याचे विरोधक झेंडावंदनेला आघाडीवर! तेव्हापासून निष्ठावान कार्यकर्त्यांची पांगापांग सुरू झाली. राजकारण म्हणून आम्ही लोकांनी ही हाराळी वाढू दिली हे नाकारण्यात अर्थ नाही.

मी म्हणालो, साहेब, पण आता तर ही हाराळी नि माजलेला कुंदा या वयात कसा निपटणार?

खरे आहे, पण प्रयत्न तर केलाच पाहिजे. आपल्या हातून होते तेवढे करायचे.

लक्ष्मण, मी काहीतरी मिळवण्यासाठी काहीतरी केले नाही. लाचारीने कुणाच्या दारात उभा राहिलो नाही. हां, आपण काही साधूसंन्याशी नाही. जी जी मिळेल ती संधी नाकारली नाही. संधी मिळाली तिचे सोने केले. सामान्य माणूस केंद्रबिंदू मानला आणि त्याच्यासाठी जे जे करता येईल ते ते केले. तसेही मी तीसपस्तीस वर्षे सत्तेच्या जागेवर बसून काम केले. त्यामुळे विरोधक मला लोभी ठरवतील. ते त्यांचे मत आहे. मी एकदाही पराभूत झालो नाही. ४६ ची निवडणूक सर्वात साधी. सर्वार्थाने चांगली. त्यानंतरच्या प्रत्येकच निवडणुकीच्या वेळी वेगवेगळे चित्र असे. सारे विरोधक मला पाडण्यासाठी सर्व डावपेच लढवीत असत. माझा प्रचारक मीच असे. माझी संयमित भाषणशैली, साधे साधे बोलणे, प्रांजळपणा ही माझी शक्ती होती. या बळावर, माझ्या मित्रांच्या आणि कार्यकर्त्यांच्या बळावर मी अजिंक्य ठरलो. कधी मोठ्या फरकाने तर कधी थोड्या फरकाने मी विजयीच होत आलो. नाशिकला तर बिनविरोध निवडून आलो. मी कायम अपराजित राहिलो. अगदी परवाची निवडणूक तर तुम्ही पाहिलीच आहे. संयुक्त महाराष्ट्रासारखी वादळेही पाहिली. पण माझ्या लोकांनी माझ्यावर अलोट प्रेम केले. विश्वास दाखवला. मी कधी दारू वाटली नाही, पैसे वाटले नाहीत, जेवू घातले नाही. माझे कार्यकर्ते हीच मोठी माझी शक्ती होती.

साहेब, आताच्या पिढीने काय करावे? सामान्य माणूस या सर्वात कसा टिकाव धरणार?

कठीण आहे. ज्या माणसाचे नावही लोकांना माहीत नसते असे लोक आडनावाने भोसले असले की कसे सत्तेत बसतात हे पाहिले की चक्रावून जायला होते. आणि चिंता आणखीच वाढते.

सुप्रिया, ही स्वगते किंवा आत्मचिंतन खरे तर टेप करायला हवे होते. ते सारे संचित होते. त्यावेळी माझ्याकडे सुविधा नव्हत्या. टेप करता आले नाही पण स्मृतीत जे शिल्लक राहिले ते तुला सांगतो आहे. एका फार मोठ्या वटवृक्षाच्या छायेत मला काही काळ रहाता आले. त्यांच्या उतरतीच्या काळांत सारे आयुष्याचे सार मला पाथेय म्हणून ते देत होते. एक तर मी त्यांच्या मुलासारखा, राजकारणाच्या भानगडीत नसलेला आणि उत्तम वाचक असलेला. त्याअर्थाने निरुपद्रवी.

साहेबांचे घड्याळाकडे लक्ष होते. चला लक्ष्मण, आपल्याला निघाले पाहिजे. डॉक्टर फार शिस्तप्रिय आहेत. वेळेत पोहोचले पाहिजे. आम्ही उठलो. यल्लाप्पागुरुजी अवाक् होऊन ऐकत होते. आम्ही जिन्याच्या पायऱ्या उतरत होतो. समोर अरबी समुद्राच्या लाटा उचंबळून उसळ्या मारीत होत्या. गुरुजी खांद्यावर हात ठेवून म्हणाले, तुमच्यामुळे एवढा योग आला. माझ्यासारख्या वैदूला यांना

पाहता तरी आले असते का? साहेबही मागोमाग आले. चर्नीरोडला डॉ. पिंपरकराचा दवाखाना होता. आम्ही लिफ्टने तिसऱ्या मजल्यावर गेलो. बाहेरच्या हॉलमध्ये गेल्याबरोबर डॉक्टर त्यांच्या केबीनमधून बाहेर आले. साहेबांचे स्वागत केले. डॉक्टरांची तब्येत म्हणजे अगदी किडकिडीत. हातापायांच्या सडसडीत ठेवणीमुळे ते चांगले उंच दिसत, पण तसे ते उंच नव्हते. आम्ही त्यांच्यापाठोपाठ आत गेलो. साहेब म्हणाले, डॉक्टर, हे लक्ष्मण माने. 'उपरा' नावाचे पुस्तक सध्या गाजत आहे, त्याचे लेखक. माझे छोटे मित्र आहेत. मी नमस्कार केला. चला. मी तपासणीच्या टेबलावर गेलो. डॉक्टरांनी पोट तपासले. काही तपासण्या सांगितल्या. मी हळूच फाईल काढून दाखवली. ते पोटाच्या विकाराचे तज्ज्ञ. जागतिक कीर्तीचे. त्यांनी फाईल बघितली, वैतागले. साहेबांना म्हणाले,

साहेब, हे असे आहे बघा. आमच्या क्षेत्रामध्ये प्रयोगशाळा करून टाकलीय यांच्या पोटाची. त्यांना काहीही झालेले नाही. फाईलीतले कागद त्यांनी भराभरा फाडून टाकले टोपलीत आणि मला म्हणाले. दोनच गोळ्या देतो. पोट रिकामे ठेवू नका. तुम्हाला काहीही झालेले नाही.

साहेबही छान हसले. जगातले सारे जंत यांच्या पोटात आहेत. मग मी माझी भटकंती सांगितली. ते म्हणाले, हे पाणी वगैरे बंद करा. पण काळजी घेऊन स्वच्छ पाणी प्या. मी व यल्लाप्पा केबीनच्या बाहेर येऊन बसलो. थोड्या वेळाने साहेबही बाहेर आले. चला लक्ष्मण, म्हणाले. आम्ही साहेबांचा तेथेच निरोप घेतला. साहेब कुठेतरी जाणार होते. डॉ. पिंपरकरांचा लोभ जडला तो जडला. पुढे पोट दुखणे थांबले. माझे त्यांच्याकडे जाणे कमी झाले. पण आजही त्या रोडने निघालो की आठवण होते ती यशवंतरावजी चव्हाण या आभाळाएवढ्या माणसाच्या मायेची.

ती. सौ. वहिनींना, बाबांना सप्रेम जयभीम.

तुझा,
लक्ष्मणकाका

दिनांक ०८/१०/२०१२

चि. सुप्रिया,

सप्रेम जयभीम.

मला १९८२ साली 'बंडोगोपाळा मुकादम पुरस्कार' जाहीर झाला. रयत शिक्षण संस्थेत शिकलेले माजी विद्यार्थी कुसुर ता. कराड येथे जमले आणि त्यांनी दानशूर बंडोगोपाळा मुकादम या अण्णांच्या सहकाऱ्यांच्या नावे मराठीतील नामवंत साहित्यिकास पुरस्कार देण्याची प्रथा सुरू केली. त्यातला पहिल्या किंवा दुसऱ्या वर्षातला पुरस्कार मला जाहीर झाला. मला या वर्षी पुरस्कारच पुरस्कार मिळाले. वर्तमानपत्रामध्ये माझ्या नावाची मोठी धमाल सुरू होती. माझे सत्कारही ठिकठिकाणी सुरू होते. पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागाने माझा सत्कार आयोजित केला होता. त्यासाठी मी मराठी विभागात गेलो होतो. विभागप्रमुख होते डॉ.भालचंद्र फडके. हे फडके म्हणजे आमच्या चळवळीतले आणि साहित्यिक म्हणून दलित साहित्याचे मोठे समीक्षक, पाठीराखे. त्यांचा माझा-मोठा स्नेह होता. त्यात आम्ही दोघेही चव्हाणसाहेबांचे जावई. डॉ. फडकेसर यशवंतरावांचेही तेवढेच भक्त. कार्यक्रम संपल्यावर आम्ही आपसात चर्चा करीत होतो. फडकेसरांनी त्यांची एक रचना मला ऐकवली. ती यशवंतरावांना न्याय देणारी होती.

नमुने वाहुन, स्तवने उधळू गाऊ मंगल नाम
महाराष्ट्राच्या प्रेमळ नेत्या तुजला लक्ष प्रणाम
या सोन्याच्या दिनी भेटली मोरणेला कृष्णा
या ज्ञानाच्या मंदिरी करतो स्वागत यशवंता
सह्याद्रीच्या दऱ्यांत घुमतो तुझा कीर्ती घोष
वऱ्हाडाच्या मातीत जागतो तुझाच आवेश
घराघरातून आज वाहतो हर्षाचा गंध
तुझिया स्पर्शे तेवत राहील इथे ज्ञानज्योत
लोक सुखी तर देश सुखी हा अमुचा मंत्र
एकमुखाने गर्जत राहू आमुचा महाराष्ट्र

डॉ. भालचंद्र फडकेसर मोठे विद्वान, साहित्यिक, परिवर्तनाच्या चळवळीत डॉ. बाबासाहेबांचे अनुयायी. बाबासाहेबांच्या मिलिंद महाविद्यालयात घडलेले व्यक्तिमत्व. त्याने आरपार आंबेडकरवादी. त्यांना लोक महार फडके म्हणून हिणवत. जसे श्री.म. माट्यांना महार माटे म्हणत तसे डॉ. फडक्यांनाही लोक महार फडके म्हणत. त्यात त्यांना कधी कमीपणा वाटला नाही. त्याचा अभिमान बाळगला. त्यांनीही तुझ्या-माझ्यासारखाच आंतरजातीय विवाह केलेला. त्यांचे सासरे डॉ. कदम कृषीखात्याचे सहसंचालक व आंतरराष्ट्रीय किर्तीचे संशोधक. यशवंतरावजी चव्हाण साहेबांचे जवळचे मित्र. सर सांगत होते. माझाच परिचय डॉ. कदमांचे जावई असा करून दिला आणि साहेब लगेच म्हणाले 'म्हणजे काय, म्हणजे आमचेच जावई.' लगेच त्यांच्या रहाण्याची चौकशी केली. घर मिळाले नाही असे समजले. तेव्हा शेजारी बसलेल्या जिल्हाधिकाऱ्यांना म्हणाले 'काय हो शिंदे, आमच्या जावयाला घर द्यायला पाहिजेल.'

डॉ. शिंदे म्हणाले, साहेब, कदमांनी मुलगी दिली, आम्ही घर देऊ.

चार दिवसांत फडकेसरांना घर मिळाले. साहेबांच्या कितीतरी आठवणी सर सांगत होते. एकदा यशवंतराव मिलिंद महाविद्यालयात आले होते. डॉ. आंबेडकरां-संबंधी त्यांच्या मनात खूप आदर होता. त्यांच्या भाषणातील एक वाक्य आठवते. ते म्हणाले होते, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे प्रकांडपंडित होते. त्यांच्याजवळ महात्मा बुद्धांची प्रज्ञा आणि करुणा होती. पुणे विद्यापीठाने त्यांना डी.लिट. पदवी दिली. तेव्हा ते सत्तेवर नव्हते. सत्तेवर नसताना त्यांना पुणे विद्यापीठाने डॉक्टरेट देऊन गौरविले. त्यावेळचा प्रसंग फडकेसर सांगत होते. तो प्रसंग असा, यशवंतरावांच्या स्वरातच एकप्रकारचे आर्जव आणि मार्दव असते. सत्तेवर असणारी माणसे आपल्याच कार्यकर्त्यांशी तुसडेपणाने वागतात. मग इतरांना तर कसे वागवतात ते आपण रोजच पाहतो. यशवंतराव सत्तेवर होते तेव्हा आणि सत्तेवरून उतरल्यानंतरही त्यांच्या वागण्याबोलण्यात तोच जिव्हाळा, तीच गुणग्राहकता होती. ते या पदवीदान समारंभात केलेल्या भाषणात म्हणाले,

'कुठल्याही समाजातला कर्तृत्ववान माणूस हा समाजाला सोडून कर्तृत्व करूच शकत नाही. नवनीत म्हणजे आपण ज्याला लोणी म्हणतो ते दुधातून येते. दूध नसेल तर लोणी नाही. समाजजीवन जेव्हा खळबळलेले असते तेव्हा त्यामध्ये काहीतरी साचत असते. नवनीत निर्मिणाऱ्या दुधाप्रमाणे त्यात एक शक्ती असते. नवनीताला स्वतंत्र अस्तित्व असते ही गोष्ट खोटी असते. तीच गोष्ट कुठल्याही कर्तृत्ववान माणसाच्या जीवनासंबंधी खरी आहे. लक्ष्मण एका अर्थाने यशवंतरावांचे जीवन हा मराठी जनतेच्या जीवनाचा प्रसादकण आहे.'

सुप्रिया, हे डॉ.फडकेसरांसारख्या प्रख्यात माणसाचे निरीक्षण आहे. ते आपण लोकांनी पुन्हापुन्हा वाचले पाहिजे. सार्वजनिक जीवनातल्या नव्या पिढ्यांनी तर याची पारायणे केली पाहिजेत. तर त्यांचे नवनीत त्यांना सापडेल. एरवी फसगतच होण्याची शक्यता जास्त. सदैव माणसांच्या मेळ्यात रमणारे यशवंतराव-

आधीचा प्रसाद घेत, पुढची ऐकीत साद
नादात शिळ, वाजवीत चाललो.

अशी वाट चालत राहिले. सावधपणे कानोसा घेत. पुढची साद ऐकणारे यशवंतराव आज नाहीत आणि डॉ. भालचंद्र फडकेसरही नाहीत. ही माझी जीवाभावाची माणसे. रक्ताच्या नात्यापेक्षा कैक पटींनी श्रेष्ठ. निःस्वार्थ प्रेम करावे ते यशवंतरावांनी. पाण्यापेक्षा रक्त घट्ट असते असे आपण सहज बोलून जातो. पण हे घट्ट रक्त स्वार्थाने आंधळे होते. तेव्हा भाऊ भावाचा मुडदा पाडताना आपण पाहतो आणि कोणाच्यातरी लेकरासाठी नामदेव तळमळत असतो. ही नामदेवाची जातकुळी यशवंतरावांची होती.

त्यादिवशी मोठी गंमत होती. पुणे विद्यापीठातला कार्यक्रम उरकून मी नानासाहेब गोऱ्यांच्या घरी गेलो. त्यांना घेऊन कुसुरला बंडोगोपाळा मुकादम पुरस्कारासाठी प्रमुख पाहुणे म्हणून नानासाहेबांना घेवून जाण्याची जबाबदारी कुसुरच्या मित्रांनी माझ्यावर टाकली होती. मी पोहोचलो तेव्हा नानासाहेब तयार होऊन वाटच पाहत होते. मी सेवादल सैनिक असल्याने आमचा परिचय नसण्याचा प्रश्नच नव्हता. नानासाहेबांसारखा मराठीतला शब्दप्रभू मी तरी दुसरा पाहिला नाही. साधेसोपे रसाळ लेखन वाचायचे तर विनोबांचे मराठी आणि संस्कृत प्रचूर, विद्वत्तापूर्ण मराठी वाचायचे असेल तर नानासाहेबांचे. नानासाहेबांचे मराठी म्हणजे पांडित्य, लालित्य, आणि आशयगर्भ मराठी. नानासाहेबांशी गप्पा मारणे म्हणजे वैचारिक मेजवानी असायची. अत्यंत उत्तम प्रकारे ते बोलत असत. समाधीस्थ व्हावे तसे. आम्ही गाडीने प्रवास सुरू केला. कामातल्या माझ्या अडचणी, भटक्या-विमुक्त हा शब्द सुद्धा लोकांना माहीत नव्हता. 'उपरा'ने हे मोठेच काम केले होते. स्वातंत्र्य चळवळीच्या नशेत आणि नंतर स्वातंत्र्य मिळाले याच आनंदात स्वातंत्र्यसैनिक मशगुल होते. स्वातंत्र्याची, ते मिळवल्याची, सत्ताधारी म्हणून काँग्रेस आणि त्याचा विरोध करणारेही पूर्वीचे काँग्रेसवालेच. वैचारिक मतभेदामुळे वेगळे झालेले असले तरी लोकशाही समाजवादाच्या आग्रहावरून यांचे मतभेद असतील. सामाजिक प्रश्नांचे भान समाजवादी, साम्यवादी यांना होते असे दिसत नव्हते. ते एकदम कामगारवर्गाची अधिसत्ता बोलत असत. या देशातल्या जाती काय चीवटपणे आपली मुळे खोलवर रुजवून बसल्या आहेत याचे भान डॉ. बाबासाहेब आंबेडकर

आणि डॉ. राममनोहर लोहिया या दोघांना सोडले तर कुणाला होते असे दिसत नाही. नानासाहेब माझे म्हणणे शांतपणे ऐकत होते. वर्णसंघर्ष आणि वर्गसंघर्ष एकत्र करावा लागेल असे नानासाहेब सांगत होते. देशातल्या छोट्या छोट्या जाती, उच्चनीचता, श्रेणीबद्धता हाच मोठा अडसर होता. साम्यवादी तर जाती व्यवस्थेबद्दल बोलायला तयार नसत. दलित साहित्य 'उपरा', 'बलुत', 'आठवणींचे पक्षी', 'गोलपिठा' अशा अनेक विषयांवर नानासाहेब माझ्याकडून समजावून घेत होते. मी त्यांना साऱ्या जातीप्रथेतले शोषण माझ्या परीने सांगत होतो. आणि बोलता बोलता यशवंतराव चव्हाण या विषयावर आमची गाडी आली. त्याना अनेक आमच्या समतावादी मित्रांनी सांगितले होतेच, लक्ष्मण आता आपला राहिला नाही. आपण माणसे तयार करायची नि तयार झालेली माणसे यशवंतरावांनी पळवायची असा एक राग यशवंतरावांवर होताच. पण एस.एम.असोत की नानासाहेब, त्यांचे विचार इतके उथळ नसत. पहिल्यांदाच नानासाहेबांनी मला सांगून टाकले. ज्याने 'उपरा' वाचले आहे त्याला हे समजते की हे अमानुष जीवन या वंचितांच्याच वाट्याला आले आहे. याची साधी नोंद याआधी आम्ही कुणी केलेली माहितीत नाही. आम्ही वर्गसंघर्षाची स्वप्ने पाहत होतो. सत्याकडे आम्हाला दलित साहित्यानेच नेले, हे सत्य कसे नाकारता येईल. लक्ष्मण, हा प्रश्न सोडवण्यासाठी राक्षसाची मदत घ्यावी लागली तरी घ्या. आम्हां लोकांची काळजी करू नका. तुमच्या जागेला मी असतो तर गेला देश उडत असे म्हणालो असतो. आणि यशवंतरावांबद्दल म्हणाल तर त्यांच्यासारखा माणूस आजतरी कुणी नाही. स्वातंत्र्यानंतरची जी महाराष्ट्राची नि भारताची बांधणी झाली तीत यशवंतरावांचा फार मोठा वाटा आहे. 'कृष्णाकांठ' वाचल्यावर राहून राहून वाटते की त्यांचा संकल्प पुरा व्हायला हवा. महाराष्ट्राच्या समकालीन इतिहासावर त्याचा फार मोठा प्रभाव पडेल. माझ्या दृष्टीने सांगायचे, तर आम्ही वेगवेगळ्या विचारधारेने पोहणारे, पण अंतिम ध्येय एकच असलेले लोक आहोत. यशवंतराव समाजवादीच होते. त्यांच्या विचारावर समाजावादाची जी छाप पडली होती ती आपणास पहावयास मिळते. मग त्यांचे कुळकायद्याचे बिल असो, की सीलिंग ॲक्टचा कायदा, की शिक्षणासाठी त्यांनी उपसलेले कष्ट असोत. आपण देशभर ज्या साखर-कारखान्यांचीच चर्चा करतो आहोत तो सहकार तरी समाजवादापेक्षा कुठे वेगळा आहे. आपले लोक एक गोष्ट विसरतात ती गोष्ट म्हणजे महाराष्ट्रातल्या त्यावेळच्या खाजगी साखर कंपन्याकडे असलेली जवळजवळ ८० हजार एकर जमीन त्यांच्याकडून घेऊन तिचे सत्तांतर शासनाच्या नियंत्रणाखाली असलेल्या विशाल कृषी क्षेत्रात करणे, ही हजारो एकर जमीन शासनाने नेमलेल्या शेती महामंडळाच्या

हाती सोपवायची आणि तिथे प्रचंड प्रमाणावर ऊसाचे उत्पादन करून तो ऊस सहकारी साखर कारखान्यांना पुरवायचा, अशी ती भव्य योजना होती. शासन नियंत्रित शेती महामंडळाचा हा भक्कम आधार जर पाठीशी नसता तर महाराष्ट्रात सहकारी साखर कारखाने एवढ्या मोठ्या प्रमाणात उभे राहिले असते की नाही यात शंका आहे. हे शेती महामंडळ आपण आर्थिक समाजवादाच्या दिशेने राज्याची वाटचाल व्हावी म्हणून निर्माण करीत आहोत याची जाणीव त्यावेळी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असलेल्या यशवंतरावांच्या ठिकाणी होती. ती त्यांनी समाजवादाच्या दिशेने टाकेलेले एक पाऊल होते, अशा शब्दात बोलूनही दाखवले होते. यशवंतरावांनंतर इतर मुख्यमंत्र्यांना ही जाण होती किंवा आहे असे दिसत नाही. नाही तर या जमिनीपैकी हजारो एकर जमिनी पुन्हा मूळ मालकांना देण्याची योजना राज्यकर्त्यांनी मनाशी आखलीच नसती. लक्ष्मण, आपण मिश्र अर्थव्यवस्था स्वीकारली याचे भान यशवंतरावांएवढे कोणसही नव्हते. खाजगी क्षेत्र, शासकीय क्षेत्र, सहकारी क्षेत्र या सर्व क्षेत्रांमध्ये आपण गुंतवणूक करीत होतो पण सामान्य माणसाच्या विश्वासाला, कर्तृत्वाला वाव मिळाला तो सहकारातच. यशवंतरावांची ही मोठी जमेची बाजू होती असे मी तरी समजतो. यशवंतरावांची आणखी एक कामगिरीही राष्ट्रासाठी मोलाची ठरली. कृष्णमेनन जितके बडबडे तितके यशवंतरावजी मितभाषी. अजिबात गाजावाजा न करता त्यांनी आपल्या सेनादलाची फेररचना केली. उणिवा दूर केल्या. दारूगोळ्याचे कारखाने मेनन यांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे विजेच्या किटल्या आणि गॅसच्या चुली अशासारख्या फालतू गोष्टी न करता, दारूगोळा तयार करतील यावर यशवंतरावांनी भर दिला. सेनादलाच्या पुनर्रचनेचा जो भक्कम पाया त्यावेळी यशवंतरावांनी घातला त्यावरच आजच्या आपल्या सामर्थ्यवान सेनादलाची इमारत उभी आहे. याचा विसर आपणास पडता कामा नये.

एवढी राष्ट्राची भरीव कामगिरी ज्या यशवंतरावांनी केली, त्यांच्याकडे पुढे पुढे दुर्लक्ष झाले. त्यांच्या अंगच्या कर्तृत्वाचा आणि अनुभव संपन्नबुद्धीचा जो लाभ शासनकर्त्या पक्षाला आणि विरोधी पक्षाला मिळायला हवा होता तो मिळू शकला नाही. ते आता अडगळीत पडल्यासारखे वाटते आहे. याचे दुःखही होते. त्यांच्यासारख्या वकुबाचा राजकारणी आज सत्ताधारी पक्षात एकही दिसत नाही आणि विरोधी पक्षांतही दिसत नाही. आम्ही संघर्षही खूप केले. भांडलो-तंडलो, पण ते काही स्वतःच्या स्वार्थासाठी नाही. देशहित हे पहिले गोरगरीब जनता, तिचे जगणे हा आमच्याच पिढीच्या चिंतनाचा विषय होता. भेद, मतभेद हे सारे राष्ट्रासाठी विरले की नितळ प्रेम उरतेच. नानासाहेबांना असे बोलताना मी क्वचितच पाहिले

असेल. जुन्या पिढ्यातील स्वातंत्र्यसैनिक विचाराने वागत असत. आज विचार करणाऱ्या माणसांची राजकारणात वानवा आहे. सत्तेपुढे शहाणपण चालत नाही. शहाणी माणसं सत्तेला चालत नाहीत. नानासाहेबांसोबत तीन-साडेतीन तास गप्पा झाल्या. लाखांच्या सभा घेणारे हे लोक पन्नास माणसांपुढेही तेवढ्याच तावातावाने बोलत असत.

कुसुरची सभाही खूप छान झाली. नानासाहेबांनी मला खूप प्रेरणा दिली. लोकांना म्हणाले, 'मला जर अशी अवहेलना सोसावी लागली असती, अशी अन्नासाठी भिक मागावी लागली असती तर गेला तुमचा देश उडत असे म्हणून मीही पार्लमेंटवर बॉम्ब टाकला पाहिजे असेच म्हणालो असतो. हे तर लोकशाहीचे निवडणुका जिंकण्याचे तंत्र आहे. यात लोकही नाहीत आणि शाहीही नाही. आहे ती घराणेशाही. पूर्वी सरंजामशाही होती, साम्राज्यशाही होती, आज लोकशाही आहे. संविधान आहे. पण पैसेवाल्यांनी ती केव्हाच पळवली आहे. आता आम्ही सारेच संदर्भहीन झालो आहोत. स्वातंत्र्य यासाठी मिळवले होते का? लक्षावधी लोकांना माणूसपणाचे हक्क मिळत नसतील तर हा कसला देश? म्हणून लक्ष्मणला मी सांगितले आहे आणि जाहीरपणेही सांगतो, हा प्रश्न सुटला पाहिजे. मग राक्षसाबरोबर जायला लागले तरी जा. पण या गोरगरीब माणसांना न्याय मिळाला पाहिजे.'

त्यानंतर माझे भाषण झाले. माझ्या भाषणामध्ये मी म्हणालो, भटक्या विमुक्त समाजाचे लोक अजूनही मतदारच नाहीत, तर लोकशाहीशी त्यांचा काय संबंध? ५.५ टक्के लोकांना लोकशाहीच्या चौकटीच्या बाहेर ठेवून हा देश लोकशाहीचे ढोल वाजवतो कसा हेच मला काही समजत नाही. ग्रामपंचायतीपासून पार्लमेंटपर्यंत या उपेक्षित वंचित लोकांना प्रतिनिधीत्वच नसेल तर असेंब्लीत काय किंवा पार्लमेंटमध्ये काय, यांचे प्रश्न कोण मांडणार?

नानासाहेब गेले. एस.एम.गेले. चव्हाणसाहेब गेले. प्रश्न होते तिथेच आहेत. ही क्रांतिकारक माणसे गेली. बेडकाने बैल होऊन उपयोग नाही. पण असे बैलच काय रेडेसुद्धा पैशाच्या बळावर लोकप्रतिनिधी बनून सभागृहांमध्ये जाताहेत. ५०-६० टक्के प्रतिनिधी कोट्यधीश असतात, त्यातले काही अब्जाधीश असतात तर ही कसली लोकशाही ही तर भांडवलशाही. मूठभर लोकांनी सर्व लोकांना विकत घेऊन भारतीय संविधान आणि पार्लमेंट गुंडाळून ठेवून माजवलेली दलदलशाही आहे. साधा कार्यकर्ता ज्याला म्हणावे त्याच्या गळ्यात म्हसरांना लाज वाटेल अशा सोन्याच्या साखळ्या, हातात सोन्याचे ब्रेसलेट, दहाच्या दहा बोटांत अंगठ्या, डोळ्यांना रिबॉनचा गॉगल, पांढरेशुभ्र परीट घडीचे कपडे, तोंडात पानाचा तोबरा,

हातात पाचपन्नास लाखाच्या गाडीची किचेन आणि तोंडात भाषा असते, साहेब दिल्लीत आहेत, साहेब कलकत्त्यात आहेत, साहेब मुंबईत आहेत. म्हणजे साहेबाची जशी हा रोजनिशी लिहितो. असा कार्यकर्ता हा सत्ताधाऱ्यांच्या जवळचा कार्यकर्ता असतो. समाजसेवा करणारा, गरिबांसाठी मरमर करणारा, प्रश्नांची उत्तम जाण असलेला, समाजामध्ये मुळे खोलवर रुजलेला असा सत्त्वशील कार्यकर्ता आता कोणत्याही पक्षाच्या कचेरीच्या बाहेर सापडणे शक्य नाही.

बंडोगोपाळा मुकादम कोण म्हणून विचारणारे लोक सभागृहात आहेत. सेनापती बापट कोण असे मंत्री सभागृहात विचारत असतील तर लोकशाहीच्या नावाने चांगभले! दुसरे काय?

ती. सौ. वहिनींना, बाबांना सप्रेम जयभीम.

तुझा,

लक्ष्मणकाका

दिनांक ०८/१०/२०१२

चि. सुप्रिया,

सप्रेम जयभीम.

'उपरा'ची पहिली आवृत्ती हातोहात संपली. प्रसिद्धीच्या आणि पारितोषिकांच्या उधळणीने खरोखर मी भारावून गेलो होतो. उपराच्या दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन साहेबांच्या हस्ते करावे असे 'ग्रंथाली'चे चिटणीस दिनकर गांगल यांनी मला सुचवले. मी साहेबांशी बोललो, तारीख ठरली. डोंबिवलीच्या कोणत्या तरी थिएटरमध्ये प्रकाशन कार्यक्रम ठरला. कार्यक्रमाला केसरीचे संपादक चंद्रकांत घोरपडे, नवशक्तीचे संपादक तुकाराम कोकजे, गांगल, प्र.ना. परांजपे, अरुण साधू ही नामवंत मंडळी पाहुणे म्हणून उपस्थित होती. सायंकाळी साडेसहा वाजता प्रकाशनाचा कार्यक्रम होता. साहेबांनी दुपारीच मला बोलावले होते. ते दिल्लीहून आदल्या रात्रीच रिव्हिएरामध्ये मुक्कामाला आले होते. ते आता इंदिरा काँग्रेसमध्ये दाखल झाले होते. त्यांना बाईंनी फार वेळ ताटकळत ठेवले. याचे आम्हा साऱ्या त्यांच्या चाहत्यांना वाईट वाटत होते. माझ्यासोबत यल्लाप्पा वैदूगुरुजी होतेच. आम्ही दोघे त्या काळी खूप भटकलो. मुंबई बसने, रेल्वेने पाहत होतो. लोकलचा प्रवास म्हणजे मोठी जीवघेणी गोष्ट. मला तशी गर्दी अजिबात आवडत नाही. त्यामुळे शक्यतो बसने आम्ही फिरायचो. दुपारी साहेबांकडे गेलो. साहेब एकटेच होते. समोर मरिन ड्राइव्हचा सागर उसळला होता. उंचच्या उंच एकामागून एक येणाऱ्या वेगवान लाटा. किनाऱ्याला त्यांचे येऊन फुटणे आणि पाणी उसळ्या मारीत रस्त्यावर फूटपाथवर येऊन पसरणे. अनेक नवपरिचित जोडप्यांना आपल्या तुषारांनी ओलेचिंब करणारे सागरातले खारे पाणी, उचंबळणारा समुद्रकिनारा, भरउन्हातही चांदण्यात बसावे तसे सागराकडे तोंडे करून बसलेले तरुण पोरापोरींचे थवे. मुंबईची सारी गर्दी एका बाजूला आणि दुसरीकडे हे प्रेमी जीव. गर्दीपासून दूर, सागराच्या साक्षीने एकमेकांना सर्मपित करणारे. मी आणि यल्लाप्पा कितीतरी वेळ खिडक्यांशी उभे होतो.

साहेब, आता आठव्या वित्तआयोगाचे प्रमुख झाले होते. त्यामुळे पुन्हा लाल

दिव्याची गाडी व दिमतीला स्टाफ आला होता. मधल्या काळात रसिकभाई शहा या त्यांच्या मित्राची गाडी साहेब वापरीत. काळ्या रंगाची देखणी गाडी साहेबांच्या दिमतीला असे. साहेब महाराष्ट्रात आले की हीच गाडी वापरीत. मला वाटे, ही साहेबांचीच गाडी असावी. नंतर साहेबांनीच मला सांगितले. त्याचे असे झाले– रावसाहेब कसबे हे संगमनेरला प्राध्यापक होते. 'झोत'मुळे साहेब त्यांना खूप छान ओळखत होते. कसब्यांनी मला साहेबांना संगमनेरला व्याख्यानासाठी निमंत्रण द्यायचे असल्याचे सांगितले होते. रावसाहेब कसब्यांचा निरोप मी साहेबांना दिला, तेव्हा म्हणाले, 'लक्ष्मण, रावसाहेबांना सांगा माझ्याकडे गाडी नाही. गाडीची काही व्यवस्था करता आली तर मी त्यांना वेळ कळवतो.' माझे काळीज चर्र झाले. साहेब देशाचे उपपंतप्रधान होते. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, केंद्रात २०–२२ वर्षे वेगवेगळ्या खात्यांचे मंत्री होते. चाळीस वर्षे हा माणूस सत्तेच्या खुर्चीत बसला होता. याचे घर दिल्लीत नव्हते. मुंबईत नव्हते. रिव्हिएराही त्यांचे नव्हते. पुण्यात नव्हते. कराडला घर बांधले होते ते अगदी अलिकडे. आता नगरपालिकेत निवडून आलेला माणूस कोटीकोटीची भाषा करू लागतो. ज्याने हजारो लोकांचे संस्थांचे संसार उभे केले, देशाचे नेतृत्व केले, राज्याचे नेतृत्व केले त्या माणसाकडे स्वतःची गाडी नव्हती! मी त्यांना म्हणालो, साहेब, आपण इतकी वर्षे सत्तेत होता, गाडी घ्यावी असे कसे वाटले नाही? आता गल्लीबोळातल्या पुढाऱ्याकडे या गोष्टी सहज असतात. साहेब छान हसले. 'लक्ष्मण, मी १९४६ साली सत्तेच्या राजकारणात आलो. तेव्हापासून सरकारी गाडी नि सरकारी बंगला कायम मिळत गेला. त्यामुळे स्वतःची गाडी असण्याची गरजच वाटली नाही. वेणूबाईंना दिल्लीत लोकल कामासाठी जावे लागते त्यासाठी मी तिच्या सोयीसाठी एक गाडी घेतली आहे ना, ती दिल्लीत असते. स्वतःची गाडी असावी असे वाटण्याचे कारणच नव्हते. कधी रसिकभाईंची, कधी कल्लाप्पा अण्णांची गाडी दिमतीला असते. मला काय करायची गाडी, हिंडाफिरायची व्यवस्था झाली की झाले. रावसाहेबांना सांगा मी संगमनेरला येईन. त्यांना म्हणावे पत्र टाका.'

साहेब तयार होऊन आले. चला लक्ष्मण, 'उपरा'च्या अशाच आवृत्त्या निघतील. निघूया आपण. आम्ही पायऱ्या उतरून खाली आलो. साहेबांनी खांद्यावर हात ठेवला. त्यांच्या डोळ्यांतले कारुण्य मला दिसत होते. डोळ्यांतली प्रतिमा वाचण्याचा प्रयत्न मी करत होतो. सुप्रिया, खरे सांगतो, हा देवमाणूस किंचितही साधनांसाठी दुःखी होताना मी पाहिला नाही. राजा असूनही उपभोगशून्य स्वामी असावा तसा. हसत हसत आम्ही दोघे मागच्या सीटवर बसलो. यल्लाप्पागुरुजी पुढच्या सीटवर बसले. आम्ही डोंबिवलीला लाल दिव्याच्या गाडीतून निघालो.

गाड्यांचा ताफा नव्हता की लोकांची वर्दळ नव्हती. साहेब म्हणाले, लक्ष्मण, आता कसे वाटते?

मी म्हणालो, कशाबद्दल साहेब?

उपरातला लक्ष्मण आणि आताचा लक्ष्मण, कसे वाटते?

स्वप्नातल्यासारखे. मी असे स्वप्नसुद्धा पाहू शकत नव्हतो. एवढे सत्कार, एवढे हार, एवढ्या शाली. वर्तमानपत्रातल्या बातम्या... सारे जमिनीवरून पाय निघावेत असेच. आपल्यासारखे वडीलधारे, शशीसारखी पत्नी, बाबा, अनिल, सुनंदासारखे मित्र. या सर्वांनी मला जमिनीशी घट्ट ठेवले आहे.

त्यावेळी मी बाबा आढावांच्या बरोबर काम करीत होतो. आमचा बाबा आढाव यांच्याबद्दल संवाद सुरू झाला. बाबांबद्दल साहेबांना फार आस्था होती. समाजवादी मित्रांबद्दल ते फार चांगले बोलत. समाजवादी मंडळी बोलायला, बसायला, चर्चा करायला, वैचारिक स्पष्टता येण्यासाठी कष्टपूर्वक वाचन-चिंतन करणारे लोक. माणूस म्हणून फार चांगली माणसे. सभ्य, सुसंस्कृत, शालीन, एकमेकांवर हमरीतुमरी होऊन चर्चा करतील, भांडणे करतील, मतभेदांचे रूपांतर लगेच गटातटात होईल, पण माणूस म्हणून फार छान. मैत्रीला छान. फक्त लक्ष्मण, ती आपल्या उपयोगाची नसतात. बाबा आढावांसारखी अपवाद. बोलायला, बसायला उत्तम, कामाच्या उपयोगाचे नाहीत. काही काम करून समाज उभा करतील अशी फार थोडी. बाबा त्यातले एक. सतत काम करीत असतात. मला त्यांचे फार कौतुक वाटते. सत्ता, संपत्ती, प्रतिष्ठा, पद काहीही नसताना काम करीत राहणे सोपे नाही. त्याने मग एकारलेपणा येतो. साऱ्याच अभावग्रस्ततेमध्ये काम करायचे. स्वतःची चांगली चाललेली प्रॅक्टिस सोडून, दवाखाना बंद करून ते 'एक गाव एक पाणवठा' चळवळ करीत आहेत. आम्हा राजकारण्यांचे बरे असते. कणभर केले तरी मणभर दाखवता येते. स्वार्थी माणसांचा राबता मोठा असतो. त्यामुळे माणसांची पारख करावी लागते. सगळ्यात मोठा हार घेऊन माणूस आला की समजायचे याचे कामही तसेच मोठे असणार. माणूस हार घेऊन आला की मी मनात म्हणत असे पोहोचला, पोहोचला म्हणजे खुर्चीला पोहोचला. खाली वाकून पाय धरले की समजावे याच्यापासून जपून राहायला हवे. आणि गर्दीत आला, चोरून पिशवीतून काही आणले असेल तर समजावे हा यशवंतराव या माणसावर प्रेम करणारा. मग पिशवीत कधी भाकरी, कधी मिठाई, कधी कागदांचे पुडके. मग तेवढ्याच प्रेमाने मिठी मारून म्हणे, साहेब, भेटायला आलो. भाकरी आणलीय, धपाटी हायेत, उसळ बी हाये. मग गर्दीतून डोंगरे त्याला बाजूला नेत. गर्दी पांगली की मग आमचे बोलणे होत असे. लांबलांबून आलेले शेतकरी, स्वातंत्र्यसैनिक हे

खरे जीवभावाचे. मला आठवत नाही की बाबा माझ्याकडे कधी काही मागायला आले आहेत. ते आले असते तर त्यांचे सोने केले असते, पण फार तत्त्वनिष्ठ. बहुजन समजातला माणूस पण एस.एम.नी अशी काही संस्कारांची जादू केलीय की बापू काळदाते, बाबा आढाव, बापूसाहेब पाटील असे कितीतरी तरुण विचाराने बांधीलकी मानून काम करीत आहेत. मलाच कधीकधी आश्चर्य वाटते, कसे जमते हे! स्वार्थ मोठा असतो. उलट बाबांनी एकदा माझा रस्ताच अडवला. प्रश्न हमाल-माथाडी मंडळींचा होता. मी एका कार्यक्रमाला जाणार होतो. पेपरात बातमी, बाबा आढाव रस्ता अडवणार. मोठमोठे मथळे. मी पोलिसांना सांगितले, मी बाबांना जाऊन भेटणार आहे. तुमचा मार्ग सांगा. पोलिसांनी मला सांगितले, प्रथम कार्यक्रम करावा मग बाबांना भेटावे. त्यांना आपल्याकडे आणता येईल. मी म्हणालो, नको, नको. मी जाईन वेगळ्या रस्त्याने. कार्यक्रम केला नि परत आलो तो थेट रस्त्यावर बसलेल्या बाबा आढावांजवळ. मांडी घालून त्यांच्याशी बसून बोलू लागलो. बाबा नि मी काय वेगळे आहोत? रस्त्यावर बसलेली, अंगमेहनत करणारी माणसे माझीच होती ना? बाबांचे मला कौतुक वाटे. त्यांना काय वाटे मला माहीत नाही. एकदा तर त्यांनी माझी धरणाच्या जागेची पूजाच उधळून टाकली. आमचे लोक फार संतापले होते. बाबाने पूजा उधळली. शेतकऱ्यांचे पुनर्वसन आधी करा. आधी पुनर्वसन मग धरण. मी धरणग्रस्तांच्या वेदना माझ्या भाषणातून मांडल्या.

मी मध्येच म्हणालो, साहेब, ती पूजा बाबांनी उधळली. त्याचे आयुष्यभर परिणाम त्यांना भोगावे लागले. ते कधी बोलत नाहीत त्याबद्दल.

साहेब खजिल होऊन म्हणाले, म्हंजे काय झाले?

ताटाचा काठ डोळ्याला लागला. तो डोळा कायमचा अधू झाला. एका डोळ्याने त्यांना दिसत नाही फार.

अरे देवा, पण मला कुणी बोलले नाही. वेणूबाईंच्या नावाने मी पाच एकर शेती घेतली होती उरळीकांचनला. तेव्हाही, मंत्र्यांनी शेती घ्यावी कशाला म्हणून त्यांनी आम्हा लोकांच्याविरोधी आंदोलन केले होते.

साहेब, हसावे की रडावे कळत नाही. पाच एकर जमीन घेतलीत म्हणून सत्याग्रह करणारे बाबा आणि खजिल होणारे तुम्ही. दोघेही ग्रेट आहात. आता हजारो एकर जमिनी तुमच्या काँग्रेसवाल्यांनी केल्या आहेत.

मग मी बाबा करीत असलेल्या अनेक कामांची चर्चा केली. कष्टाची भाकर, हमालपंचायत, अंगमेहनती कामगार, भटके विमुक्त, देवदासी, परित्यक्ता, मुरळ्या, भाविणी, जोगतिणी, जटानिर्मूलन, एक गाव एक पाणवठा, आणि महात्मा फुले

समता प्रतिष्ठान अशा अनेक गोष्टींवर चर्चा झाली. मी त्यांना बाबा या व्यक्तिमत्त्वाबद्दल सांगत होतो. या दोघांनी तरुणपणी खूप संघर्ष केला होता आपआपसात. पक्षही वेगवेगळे होते. भूमिकाही वेगवेगळ्या होत्या. पण मी या दोघांनी एकत्र एका कार्यक्रमाला यावे म्हणून प्रयत्न करीत होतो. आम्ही तेव्हा समग्र जवळकर प्रकाशित करण्याच्या कामात होतो. साहेबांनी प्रकाशनाला येण्याचे मान्यही केले होते. पण एकदा ते म्हणाले, लक्ष्मण, बाबाला सांगा मी जवळकरांबद्दल एके ठिकाणी प्रतिकूल लिहिले आहे. त्यामुळे मी प्रकाशनाला येऊन औचित्यभंग होईल. साहेब काही आले नाहीत. पण बाबांना सांगितल्यावर ते म्हणाले, यशवंतरावच हे भान ठेवू शकतात. आपण समजून घेतले पाहिजे की साहेबांना जेधे, जवळकर, मोरे, भालेकर, मेघाजीराव लोखंडे अशी कितीतरी पुस्तके म.फुले समता प्रतिष्ठानने छापली.

फुल्यांच्या कामाला बाबा उजाळा देत असल्याबद्दलही चव्हाणसाहेबांना संतोष होता. या दोघांनीही मला भारतीय भटकेविमुक्त विकास व संशोधन संस्थेच्या स्थापनेसाठी मोलाची मदत केली. या दोघांमध्ये मी पुढच्या पिढीचा तरुण कार्यकर्ता होतो. दोघेही माझ्यावर प्रेम करीत. मी दोघांवर प्रेम करत होतो. हळूहळू पण यशवंतराव आणि बाबा आढाव माझ्या कामासाठी का होईना एकत्र आले याचे मला फारफार समाधान होते. यशवंतरावांना मुख्यमंत्री असताना किंवा सत्तेवर नसतानाही माणसे जोडण्याचे जे असामान्य कसब जमले होते ते आमच्या समाजवादी मित्रांनी जपले असते तर आज राजकारणात काही वेगळे चित्र असते हे नक्की. बाबा आढाव या एका विषयावर आम्ही तास-दीड तास बोललो. स्वभावातल्या गमतीही मी त्यांना सांगितल्या. बाबाने लिहिले पाहिजे असे त्यांना फार वाटत होते. शैली आहे, अनुभव फार मोठा आहे. ललितही फार छान लिहितील. त्यांना अंग आहे. आपल्याविरोधी विचार करणाऱ्या माणसांबद्दल आजचे नेते कसे वागले असते.

आम्ही डोंबिवलीला पोहोचलो. दिनकर गांगलांनी आम्हांला पाहिले आणि त्यांचा जीव भांड्यात पडला. सभागृह खच्चून भरले होते. प्रास्ताविक गांगलांनी केले. त्यानंतर चंद्रकांत घोरपडे बोलले. त्यांचा माझ्यावर लोभ होताच. 'उपरा' हे आत्मकथन या विषयांवर ते बोलले. मी प्रास्ताविक स्वरूपात थोडा बोललो. साहेबांनी उपराच्या दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन केले. टाळ्यांचा कडकडाट झाला. साहेब माईकसमोर गेले नि तोंडभरून माझे कौतुक केले. ते जाहीर सभेत पहिल्यांदाच मला 'जावई' म्हणाले. लक्ष्मण आमचा जावाई आहे. मी शशीला मुलगी मानले. तिच्या वडिलांना भेटलो. आणि आजच मला लक्ष्मण सांगत होते की बारा वर्षांनंतर

त्याचे सासूसासरे त्यांच्याकडे येऊन गेले. मी लेकीचे माहेर पुन्हा तिला मिळवून दिले याचा मला आनंद आहे. मला मनापासून आनंद झाला होता. 'उपरा'संबंधी ते बोलू लागले. तरी सारे मराठी भाषिकांसाठी ते बोलत होते.

'केवळ शब्दलालित्य म्हणजे साहित्य ही साहित्याची व्याख्या घेऊन त्याप्रमाणे चालण्याचा काळ संपला आहे. दलित साहित्याने आपल्याला डुलक्या घेणाऱ्या मध्यमवर्गीय वाचकांना कान पकडून, हे जगणेही साहित्यिकच असते हे दाखवून दिले आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेने लिहीत असलेले हे तरुण आता जातीअंताच्या लढाईचे सैनिक म्हणून रणांगणात उतरले आहेत, हे पाहायला आज ते हवे होते. लक्ष्मण माने या तरुणाच्या पाठीवर त्यांनी नक्कीच शाब्बासकीची थाप मारली असती. साहित्य हे एक सामर्थ्य आहे. कारण ते विचार देणारे आहे. बंदुकीच्या गोळीने प्राप्त होत नाही हे सामर्थ्य. ते विचारातून येते. संस्कारातून येते. आणि हे परिवर्तनाचे काम साहित्य करीत असते. म्हणून शब्दाचे मोल शस्त्रापेक्षा मोठे आहे. लोक मला म्हणतात 'उपरा'तल्या शब्दांचे अर्थ आम्हाला समजत नाहीत. त्यांना मी असे म्हणेन की ज्यांना उपरातले शब्द कळत नाहीत त्यांचे मराठीचे पुन:शिक्षण केले पाहिजे. उपरातली बोलीभाषा आम्हा सातारकरांची आहे. तिखट खर्ड्यासारखी जरा झणझणीत आहे. पण ती अस्सल आहे. ती मला माझी भाषा वाटते. मी लिहिले असते तर ते असेच लिहिले असते. मराठी भाषेचा एक वेगळा बाज उपराने मराठी भाषेला दिलाय. म्हणून मी मराठी शारदेच्या गळ्यातील कंठमणी असे उपराचे वर्णन करतो. ते त्यातल्या शब्दकळांमुळे. दलित साहित्यातल्या शिव्यांबद्दलही तेच आहे. लक्ष्मण माने मोठे विलक्षण व्यक्तिमत्त्व आहे. ते परवा दया पवारांसह आले होते. त्यांनी शिव्या नि ओव्या यासंबंधी माझा वर्गच घेतला असे म्हटले तर वावगे होणार नाही. मराठी भाषा समृद्ध व्हायची तर अठरापगड जातींनी लिहायला हवे. बारा बलुतेदार, आलुतेदार, कारू-नारू, आणि शेतकरी हे खरे मराठीचे वैभव आहे. ते समजत नसेल तर ते समजावून घेतले पाहिजे. शब्दांचे अर्थ हवे असतील तर दारातली भाजीवाली, हमाल, दलित उपेक्षित समाजातली माणसे हीच आम्हा लोकांची डिक्शनरी आहे. बोलीभाषा जेवढ्या समृद्ध आहेत तेवढे मराठी वाङ्मय समृद्ध होईल. धगधगते विचार, अन्याय आणि दु:ख, वेदना, आणि विद्रोह ही या साहित्याची शक्तिस्थळे आहेत. बाबासाहेब आंबेडकरांचे सर्वात मोठे योगदान भारतीय संविधान आहेच, शिवाय त्यांनी ज्ञानाकांक्षी समाज घडवण्याचे जे मोलाचे काम केले ते खरे त्यांचे क्रांतिकार्य आहे. हा वारसा दलित तरुण नेटाने, हिमतीने पुढे नेत आहेत. त्याचा मला मनापासून आनंद आहे. कोणता भोगवटा या

माणसांच्या वाट्याला आलाय हे बलुतं, उपरा, आठवणीतले पक्षी ही आत्मकथने वाचली म्हणजे कळते. आपल्या डोळ्यांत अंजन घातल्यासारखे वाटते. उपराच्या निमित्ताने मला येथे बोलावलेत. लक्ष्मण माने या तरुण मित्राची कैफियत मराठी माणसापुढे मला मांडता आली. माझ्या गावातला तरुण मुलगा साहित्य अकादमी मिळवतो, याहून मला आणखी काय हवे.'

कार्यक्रमामध्ये अनेकजण बोलले. परंतु सभागृह खिशात घातले ते चव्हाणसाहेबांनी. चव्हाणसाहेब म्हणजे मराठी साहित्याचा चालताबोलता शब्दकोशच होता. केव्हा-किती बोलावे, काय बोलावे आणि काय बोलू नये, याचे उत्तम भान म्हणजे यशवंतराव चव्हाण. कार्यक्रम संपवून आम्ही एकेठिकाणी जेवलो. आम्ही निरोप घेतला नि साहेबांची गाडी मुंबईकडे गेली.

ती. सौ. वहिनींना, बाबांना सप्रेम जयभीम.

तुझा,
लक्ष्मणकाका

दिनांक १७/१०/२०१२

चि. सुप्रिया,

सप्रेम जयभीम.

'उपरा'च्या दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन करून आम्ही परतलो. मराठवाडा विद्यापीठ नामांतराचा प्रश्न लटकून पडला होता. त्याने आमच्या चळवळीतले लोक फार संतप्त होते. चव्हाणसाहेब अर्थातच नामांतराच्या बाजूने होते. त्या वादात ते फारसे बोलत नसत. माझे सहकारी मित्र प्रा. अरुण कांबळे आणि मी साहेबांना भेटलो. साहेबांनी आम्हाला सांताक्रुझच्या विमानतळावरल्या एका हॉटेलमध्ये बोलावले होते. सेंटॉर या हॉटेलमध्ये ते उतरले होते. आठव्या वित्त आयोगाचे अध्यक्ष असल्याने कामासाठी ते तामिळनाडूला जाणार होते. त्यांचे लवकरचे विमान होते. आम्हां दोघांना त्यांनी सकाळी सात वाजता बोलावले. आम्ही सकाळी सकाळी साहेबांना भेटायला हॉटेल सेंटॉरमध्ये गेलो. त्यांच्या जवळच्या कुणीतरी नातेवाईकाने दार उघडले. काय काम आहे? साहेब कुणाला भेटणार नाहीत. त्यांचे विमान थोड्या वेळात आहे असे म्हणून पुन्हा दार लोटू लागले. साहेब आत उरकत होते. त्यांनी दारातला हा संवाद ऐकला आणि धोतर नेसत नेसत दारात आले. अरे येऊ दे त्यांना. मीच बोलावले आहे. साहेबांनीच सांगितल्यावर तो माणूस बाजूला झाला. आम्ही सोफ्यावर बसलो. चहा आला. साहेबांनी विचारले, काय अरुण, काय चाललेय?

साहेब, विद्यापीठाच्या प्रश्नाने लोक फार अस्वस्थ आहेत. नामांतराचा प्रश्न लवकरांत लवकर सुटावा असे वाटते.

साहेब उरकता उरकता आमच्याशी बोलत होते. अरुण, त्यासाठी माझे मत आता महत्त्वाचे राहिलेले नाही. राज्यकर्ते दररोज हास्यास्पद होत आहेत. लोक असुरक्षित झाले आहेत. प्रत्येकाला वाटते आपले काही खरे नाही. सरकारचे वागणे-बोलणे फार जबाबदार असले पाहिजे. गरीब असो की श्रीमंत, राज्य प्रत्येकाला आपले वाटले पाहिजे. ही स्थिती आज नाही. त्यामुळे मला वाटते आपण असे करावे. नामांतर व्हायचे त्यावेळी होईल. आपण काही हात जोडून

बसू नये. अरुण, तुम्ही एक संस्था सुरू करा. मुंबईच्या परिसरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने आपण आंतरराष्ट्रीय स्वरूपाचे विद्यापीठ स्थापन करू. मी तुम्हाला लागेल ती मदत द्यायला तयार आहे. मला आता सत्तेत फारसा रस राहिलेला नाही. आपण आपल्या हातून राहून गेलेली कामे करावीत असे सारखे मनात येते. म्हणून तुम्हाला बोलावले.

टाटा सामाजिक विज्ञान केंद्रासारखी त्याची रचना असावी. तुम्ही घटना तयार करा. जमिनीच्या शोधात राहा. आपल्याला असे आधुनिक विद्यापीठ डॉ.बाबासाहेबांच्या नावाने मुंबईत सुरू करायचे आहे. कोणत्याही वादात पडायचे नाही.

अरुणने साहेबांना अडचणी सांगितल्या. साहेब म्हणाले, मी आहे ना तुमच्या पाठिशी, माझी जी काही पुण्याई आहे ती उभी करीन, त्याची चिंता तुम्ही करू नका. मुंबईला बाबासाहेब राहिले. चैत्यभूमी येथे आहे. आयुष्यातला मोठा काळ त्यांनी या शहरात काढला. नावलौकिक मिळवला. देशाचे नेतृत्व केले. त्यांच्या इतमामाला शोभेल असे संस्थात्मक काम करायचे राहून गेले. तुम्हा तरुण मित्रांनी आता हे काम हाती घेतले पाहिजेल आहे असे मला वाटते. अशी मोठी संस्था उभी करावी. ज्ञानार्जनाचे, ज्ञानदानाचे काम ज्या शहरात बाबासाहेबांनी केले. तेथे त्यांचे स्मारक ज्ञान मेरीटनेच होऊ शकते. त्यांचे देशावर फार महान उपकार आहेत. अरुण, मला बाबा वलणकरांची सारी लिखित साधने हवी आहेत. सुरवा नाना टिपणीसांशी मी बोललो आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे चरित्र मला लिहायचे आहे. साधनांची जुळवाजुळव मी करतो आहे. त्याचे असे झाले, की डॉ. सविता जाजोदिया आणि डॉ. सय्यद असद अली हे दोघे नॅशनल बुक ट्रस्टच्या राष्ट्रीय चरित्रमालेसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे एक संक्षिप्त चरित्र लिहिण्याची गळ घालीत होते. माझ्या मनात अनेकदा हा विचार येऊन गेला होता. पण मी आज-उद्या करीत हे काम रेंगाळले आहे. ते मला करावयाचे आहे. मी त्यांना तसा शब्द दिला आहे. अरुण, तुम्ही म्हणाल राजकारणातल्या माणसाचा शब्द, तो दिला काय नि नाही दिला काय. लोक समजून घेतात. पण हे दोघे माझ्या मागेच लागले आहेत. मी शब्दांचा फार पक्का आहे. आपल्या शब्दाची प्रतिष्ठा आपण राखली नाही तर कोण राखील? शब्द काही नुसते सुटे शब्द नसतात. त्या पाठीमागे भावना असते. शब्दांना अर्थ असतात. ते वाऱ्यावर उडून गेले तर बोलण्यात कोणता अर्थ राहील? शब्द नुसते शब्द नसतात. ते दुधारी शस्त्रासारखे आहेत. त्यामुळे शस्त्रापेक्षा मला शब्द श्रेष्ठ वाटतात. ते एकमेकाला जोडतात आणि तोडतातही; म्हणून ते फार जपून वापरले पाहिजेत. शब्दांनी जखमा होतात. त्या विसरता येत नाहीत. ते

शस्त्र आहे, जपूनच वापरले पाहिजे. मी डॉ. जाजोदियाना शब्द दिलाय. तुम्ही मला मदत करायची. बाबासाहेबांच्या चरित्राचा फार गंभीरपणे अभ्यास करतो आहे. त्यांचे सारे अंक मी मिळवतो आहे. काही जुनी चरित्रे हवी आहेत. त्यात वलणकरांचे चरित्र हवे आहे. ते तुम्ही मला मिळवून द्या.

अरुणला आणि मला खरेच फार आश्चर्य वाटत होते. बाबा वलणकरांसंबंधी साहेब आमच्याशी चर्चा करीत होते. बाबासाहेबांपूर्वीचा कालखंड आणि चळवळ त्यांना समजावून घ्यायची होती.

आता ते माझ्याकडे वळले. नेहमीसारखी चौकशी, विचारपूस झाली. लक्ष्मण, माझ्या मनात असे आहे, की हे राजकारण; त्यातही धावपळ आता बंद करून तुमच्याबरोबर काम करावे. आयुष्यात उरलेला वेळ या भटक्या-विमुक्तांसाठी काम करावे. 'बंद दरवाजा'ने माझ्याही मनाची कवाडे त्यांच्यासाठी खुली झाली आहेत. आपण सातारला भटक्या-विमुक्तांची एखादी मोठी संस्था काढावी. त्यांचे सारेच रखडले आहे. लक्ष्मण, मी असा विचार करतो, ज्यांचे शिक्षण झाले त्यांचे सारे काही झाले. ज्यांचे शिक्षण रखडले, त्यांचे सारे जगणे रखडले. ज्यांच्या शिक्षणाची आबाळ झाली, त्यांच्या जगण्याची आबाळ झालीच म्हणजून समजा. महात्मा फुले झाले नसते, सयाजीराव गायकवाड, शाहू महाराज झाले नसते तर माझी काय परवड झाली असती सांगा!

साहेब, आपण कर्ते असताना भटक्या-विमुक्तांवर अन्याय कसा झाला? हे आदिवासी समाजातले लोक, बलुतेदारांच्या, ओबीसींच्या यादीत कसे काय गेले?

लक्ष्मण, त्याचाही इतिहास आहे. तुमचे म्हणणे खरे आहे. मी काही त्यासाठी एक्स्क्यूज मागत नाही. मीही अपराधी आहेच. पण ज्या काळात या याद्या घटनेला जोडल्या गेल्या त्याकाळी मी नुकताच राजकारणात आलो होतो. ज्युनिअर होतो. आमचे कर्तेकरविते मोरारजी देसाई, भाऊसाहेब हिरे, गणपतराव तपासे होते. त्यावेळी मी पार्लमेंटरी सेक्रेटरी होतो. माझ्याकडे साधा फोन नव्हता. राहायला जागा होती पण फोन करायला गणपतराव तपासे यांच्या बंगल्यावर मला जावे लागणार होते. मी फोनसाठी गणपतरावांकडे जात होतो कारण ते कॅबिनेट मंत्री होते. मी राजकारणात कुणाचे लांगुलचालन केले नाही. लाचारीने उभा राहिलो नाही. काही मिळवण्यासाठी काही केले नाही. त्यावेळी माझा सल्ला कुणाला मी देणार होतो? पण जेव्हा बासष्ठ साली जवाहरलालजी सोलापूरला आले, सेंटलमेंटच्या त्यांनी तारा तोडल्या त्या राष्ट्रीय परिषदेचा मी साक्षीदार आहे. पंडितजींचे भाषण आजही मला आठवते. ते म्हणाले होते 'हा जन्माने गुन्हेगार ठरवणारा कायदा अत्यंत अमानुष आहे. तो कायदा आपण नष्ट केला. पण हे लक्षात ठेवा. पिंजऱ्यातून

सोडलेला पोपट फार लांब उडून जाऊ शकत नाही. तो पुन्हा पिंजऱ्यावरच येऊन बसतो. तसे नुसते अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीमध्ये यांना समाविष्ट करून भागणार नाही. यांच्यासाठी पुनर्वसनाचा वेगळा सब प्लॅन तयार करा. यांचे फार मोठे योगदान स्वातंत्र्य चळवळीत आहे. सारे स्वातंत्र्यसैनिक त्यावेळी सर्वात जास्त सुरक्षितपणे याच मंडळींमध्ये होते हे लक्षात ठेवा. तातडीने यांच्यासाठी काहीतरी करा.'

मी तात्काळ या गोष्टीची दखल घेतली. थाडे कमिशन नेमले आणि मी दिल्लीला गेलो. लक्ष्मण, त्यावेळी मारुतराव कन्नमवार या भटक्या बेलदार समाजातल्या माणसाच्या हाती सत्ता देऊन मी दिल्लीला गेलो. मराठा समाजातले अनेक पात्र उमेदवार बाशिंग बांधून उभे होते. पण मी सत्ता जाणीवपूर्वक विदर्भातल्या अल्पसंख्य समाजातल्या माणसाला दिली. त्यांच्या आकस्मात निधनाने रिकाम्या झालेल्या जागेवर वसंतराव नाईक या लमाण-बंजारा समाजातल्या तरुण शिक्षित माणसाच्या हातात बारा वर्षे महाराष्ट्र ठेवला. आपल्या जातीचे भले आपला माणूस करील हे काही खरे नाही, तसे झाले. मी त्यांना दोष देऊन रिकामा होऊ मागत नाही, मीही त्यांच्याएवढाच दोषी आहे. त्याचेही परिमार्जन करायलाच पाहिजेल. वेगळे बजेट करणे दूरच राहिले. त्यांना अस्पृश्य आदिवासींच्या सवलती द्यायचे राहिले. चार टक्के जागा कशाबशा दिल्या. आणि त्यानंतर राजकारणाचे सर्वव्यापी स्वरूप हळूहळू लोप पावत निघाले. जातींनी राजकीय रूप धारण केल्याचे मी आज रोज पाहतो आहे. पूर्वी राजकारणात जाती होत्या. आज जातींचे राजकारण झाले आहे. त्यात हे भरडले गेले हे मला कबूल आहे. म्हणूनच मी यांच्या शिक्षणाकडे वळण्याचे ठरवले आहे. घटना, तिचे स्वरूप सारे माझे मी करेन, तुम्ही चिंता करू नका.

साहेब, हे काम माझ्याने होणार नाही. मी असा झोळी खांद्याला अडकवून भणंग फिरणारा माणूस; ज्याला कोणतीही शिस्त नाही. अत्यंत बेशिस्त मनुष्य हा माझा पिंड, असले काम करणारा नाही. आपण मला मोर्चे काढायला सांगा, मेळावे घ्यायला सांगा, सतरंजा अंथरणे, माईक लावणे, गर्दी जमा करणे, टाळ्या वाजवणे, नेते निघून गेले की रिकाम्या सतरंज्या उचलणे, झाडून काढणे, माईक गोळा करणे असल्या कामाचा माझा अनुभव. संस्था काढणे, ती चालवणे यासाठी मी योग्य नाही. तो माझा पिंड नाही. मला हे कसे जमणार?

कसे जमणार म्हणजे काय? मी आहे ना. आपण सारे करू. लक्ष्मण, आपला क्रूस आपल्याच खांद्यावर असतो. इतरांच्या खांद्यावर आपला क्रूस जात नाही. जो इतरांवर विसंबला त्याचा कार्यभाग बुडाला. तुमचे दुखणे तुम्हाला जेवढे समजेल

तेवढे इतरांना समजणार नाही. पर दुःख शीतल असते. तेव्हा हे काम आपण करायचे. मी तुमच्यासोबत आहे. चिंता करू नका. सारे नीट होईल.

सुप्रिया, साहेबांशी आमच्या गप्पा झाल्या. साहेबांनी फार मोठी जोखीम माझ्या खांद्यावर टाकली होती. मला माहीत होते की मी असल्या कामाला लायक नाही. साधी बालवाडी चालवण्याचा अनुभव नाही. कसे करणार होतो मी? संस्था स्थापण करणे व ती चालवणे हा माझा पिंडच नव्हता. पण साहेबांचा आदेश होता. भटक्या-विमुक्तांच्या शिक्षणासाठी, संशोधनासाठी संस्था काढायची. ते कामालाही लागले होते. अनेक सहकारी मित्रांशी बोलत होते. लक्ष्मणला या कामात मदत केली पाहिजे. त्यांना पाठबळ दिले पाहिजे. माझी नकारघंटा चालूच होती. आत्मविश्वास नव्हता. साहेब, मी नवीन पुस्तक लिहू शकेन असे आता वाटते, पण शाळा चालवणे अशक्य वाटते. साहेबांनी माझे ऐकले नाही. विषय बदलला.

अरुणने नवा प्रस्ताव आणला होता. विषय बदललाच होता. अखिल भारतीय साहित्य संमेलनवाले जर परदेशात जाऊन संमेलन भरवतात तर आपले दलित साहित्य संमेलन परदेशात का भरू नये? मी अरुणच्या सुरात सूर मिसळला, साहेब थोडे गंभीर झाले.

अरुण, कल्पना चांगलीच आहे. प्रश्न साधनांचा आहे. साधने कशी उभी करणार?

अरुण म्हणाला, साहेब, आपले लोक आहेत असा देश लंडन. तेथे घमरे नावाचे आपले जयभीमवाले उद्योगपती आहेत. ते करतील मदत.

मग काय उत्तम आहे, साहेब म्हणाले. साहेबांचा होकार मिळाला. लंडनमध्ये दलित साहित्य संमेलन भरवायचे. साहेबांनी उद्घाटक म्हणून यायचे मान्य केले. मी सांगतो कोणाकोणाशी बोलतोय ते. आपण उत्साहात संमेलन करू. या निमित्त जगभर या साहित्याची चर्चा होईल. साहेबांची विमानाला निघायची वेळ झाली होती. चेन्नईला त्यांची मीटिंग होती. ते विमानतळाकडे जायला तयार झाले नि दोन्ही संस्था, दलित साहित्य संमेलन करण्याचे ठरवून आम्ही खोलीतून बाहेर पडलो. आम्हाला निरोप द्यायला ते खोलीच्या दरवाजापर्यंत आले. हसतहसत निरोप दिला. पुढे हे दलित साहित्य संमेलन झाले नाही. मात्र महाराष्ट्र टाइम्सचे त्यावेळचे संपादक गोविंदराव तळवळकर यांनी 'आता दलित लंडनला' असा अग्रलेख लिहिला. त्यावर माझी प्रतिक्रियाही त्यांना व्याख्यानमालेत मी ऐकवली.

सुप्रिया, ब्राह्मण जातीत जन्म झाला की आपल्याला साऱ्या जगाला अक्कल शिकविण्याचा परवाना मिळाला असे काही लोकांना वाटते. अर्थातच ही मक्तेदारी

आंबेडकरवादी लेखकांनी मोडून टाकली, हा भाग वेगळा. ज्ञानाच्या क्षेत्रात ब्राह्मणेत्तर समाजही किती आघाडीला राहू शकतो हे यशवंतरावांचा दहा हजार ग्रंथांचा संग्रह पाहिला म्हणजे लक्षात यायला हरकत नाही. तुझ्या बाबांच्या पुस्तकांचा संग्रह ब्राह्मण कधीच पाहत नाही. नुसते निवडून येणारे अनेकजण आहेत. ते सारे नुसते निवडून येतात. जातींच्या बळावर आणि राज्य करतात. लेखन-वाचन नसते. ज्ञानसाधना नसते, ज्ञानाकांक्षा नसते. असे बरेच ग्रेट समज या समाजात आहेत. बारामतीच्या किंवा कराडच्या घरांमध्ये हे जाऊन पाहतील ना तेव्हा त्यांना कळेल. ज्ञान, विज्ञान, साहित्य, कला, संस्कृती ज्या ग्रंथाशी जोडलेली असते ते ग्रंथसंग्रह कोणाही उच्चवर्णीय म्हणवणाऱ्याच्या घरी असणार नाहीत. यशवंतराव तर भाषाप्रभूच होते. शब्दांचे सामर्थ्य काय असते ते त्यांच्याएवढे कुणालाच माहीत नव्हते. एक नवी जबाबदारी घेऊन मी साहेबांचा निरोप घेतला होता.

ती. सौ. वहिनींना, बाबांना सप्रेम जयभीम.

तुझा,

लक्ष्मणकाका

दिनांक २४/१०/२०१२

चि. सुप्रिया,

सप्रेम जयभीम.

यशवंतराव आणि एस.एम.जोशी हे दोन्ही माझे पितृतुल्य मार्गदर्शक. दोघांबद्दल मला आजही मनापासून प्रेम. त्यांची आठवण झाली नाही असा एखादाही दिवस जात नसेल. माझ्यासारख्या भणंग माणसाला या दोघांबरोबर तासन् तास राहता आले, बोलता आले, त्यांच्यासोबत काम करता आले याचा मला मनापासून आनंद आणि अभिमान वाटतो. या दोघांशी बोलताना माझे मन दोघांची एकमेकाशी तुलना करीत असे. दोघांची जडणघडण वेगळी, परिस्थिती वेगळी. एकाने सारे आयुष्य तत्त्वनिष्ठा सांभाळली. विचाराबरोबर तडजोड केली नाही. सतत सत्तेशी संघर्ष केला. गोरगरिबांसाठी, श्रमिक कष्टकऱ्यांसाठी त्यांच्या चळवळी चालविल्या आणि दुसऱ्याने सत्तेत राहून सत्तेचा वापर समाजपरिवर्तनासाठी केला. एकजण महाराष्ट्राचा मुख्यमंत्री तर दुसरा विरोधी पक्षनेता. दोघेही थकल्यावर मी त्यांच्या जवळ गेलो. त्यांच्या उभारीच्या, उमेदीच्या काळात त्यांच्याजवळ जाण्याचा प्रश्नच नव्हता. मी तेथवर पोचू शकत नव्हतो. केवळ मी शिकलो. शब्दांची ओळख झाली. ग्रंथाशी नाते जोडले गेले आणि या शब्दांनीच मला या दोन दिग्गजांशी जोडले. ग्रंथांनी, शब्दांनी माझी-त्यांची भेट घडवली. एरवी मी उकिरड्याच्या कडेला वाढलेला माणूस आणि ते गावात राहणारे लोक. काय संबंध होता आमचा? काय नाते होते आमचे? ना मी त्यांच्या परिघातला ना नात्यागोत्यातला, पण मला जो आपलेपणा दोघांनीही दिला तो माझ्या अंतःकरणात जपून ठेवला आहे. मेणबत्तीसारखा त्यातला थोडासा उजेड तुला नि तुझ्या पिढीला देता आला तर पाहावे असे वाटले. म्हणून खरे तर हा पत्रप्रपंच.

अण्णा आजारी होते. त्यांना पहायला चव्हाणसाहेब गेले होते. मी काही नव्हतो, पण चव्हाणसाहेबांची भेट झाली आणि आम्ही अण्णांबद्दल बोलू लागलो. साहेबांचे अण्णांबरोबर का नाते होते ते साहेब मला समजावून सांगत होते. मी दोघांचा चाहता. साहेब सांगत होते- १९३२ साली फेब्रुवारी महिन्यात मी सत्याग्रह करून तुरुंगात आलो. येरवड्याच्या कॅम्प जेलमध्ये मी संपूर्ण एक वर्ष होतो. आणि त्यानंतर विससापूर

जेलमध्ये तीन महिने होतो. १९३३ च्या मे महिन्यात मी सुटून बाहेर आलो. जेलमधले पंधरा महिन्यांचे जीवन म्हणजे माझ्या जीवनातला अत्यंत उत्तम काळ होता. प्रत्येक बराकीत शंभर माणसे राहतील अशी व्यवस्था होती. बारा नंबरच्या बराकीत अगदी निवडक शंभर माणसे होती. बारा नंबरच्या बराकीमध्ये आचार्य भागवत, रावसाहेब पटवर्धन अशी फार मोठी माणसे होती. रावसाहेबांचे इंग्रजी म्हणजे ऐकत राहावे. फार व्यासंगी माणूस. जाणते लोक बराकीत येऊन विविध विषयांवर चर्चा होऊ लागल्या. आणि जेलमध्ये आमचे वास्तव्य अधिक समृद्ध व संघटित होऊ लागले. बारा नंबरची बराक म्हणजे ग्रंथालयच चालते-बोलते. पुण्याचे अतीतकर, मामा गोखले, वि.म.मुस्कुटे आणि एस.एम. जोशी. एस.एम.ना मी पहिल्यांदा पाहिले ते या जेलमध्ये. या काळात जेवढे वाचन झाले तेवढे वाचन पुढे कधी झाले असे वाटत नाही. राजकीय विचारांच्या वेगवेगळ्या छटा आणि परस्परांशी संबंध याची ही बराकीत चर्चा होत असे. त्याने व्यासंग वाढू लागला. आचार्य भागवत हे कट्टर गांधीवादी होते. गांधीवादाची उकल ते करून सांगत असत. आम्ही सर्वांनीच गांधींचे राजकीय नेतृत्व मान्य केले होते. परंतु सर्वांनीच त्यांचे तत्त्वज्ञान स्वीकारले होते किंवा सर्वांना ते समजलेले होते असे म्हणता येण्यासारखे नव्हते. या चर्चांमुळे विचारातील मूलभूत फरक आणि त्यातील फरकांच्या सूक्ष्म छटा ध्यानात यायला मदत झाली. मी गांधींचे नेतृत्व स्वीकारले असले तरी तत्त्वज्ञान स्वीकारलेले नव्हते. तसेच एस.एम.जोशींचे होते. एस.एम.जोशी, ह.रा.महाजनी ही तरुण पिढी गांधीवाद स्वीकारलेल्यापैकी दिसत नव्हती. त्यांच्या मनात त्या संबंधी अनेक शंका होत्या व ते त्या वेळोवेळी विचारत असत. स्वातंत्र्याच्या चळवळीसाठी समाजवादाचा विचार आवश्यक नाही का? असे प्रश्न उभे करीत. आणि त्यामुळे त्यांचे-माझे चांगले सूत जमत असे. वि.म.मुस्कुटे हे मार्क्सवादाचे गाढे अभ्यासक. त्यांच्या मताने निव्वळ समाजवादाची पोकळ भाषा बोलून काही काम भागणार नाही. तर समाजवादाचा शास्त्रीय विचार करून त्या विचारांची पद्धती राजकीय लढ्यात स्वीकारल्याशिवाय देशाला स्वातंत्र्य मिळणार नाही. गांधीवाद, समाजवाद, मार्क्सवाद या गोष्टीचा खल सतत चालू होता. एकदा एस.एम.शी बोलत होतो. काहीसे गोंधळल्यासारखे होते. सारेच साऱ्यांचे खरे वाटू लागते. पण सारेच खरे कसे असेल? कोणते तरी एकच म्हणणे खरे म्हणजे बरोबर असेल. त्यावर एस.एम.म्हणाले, आपला विचार आपणच करायला हवा. त्यावर मी ठरवून टाकले कोणताही निर्णय कोणी सांगितले म्हणून आपण स्वीकारावयाचा नाही. विचारांच्या क्षेत्रातील निर्णय हा आपला आपणच केला पाहिजे. त्यासाठी आपण वाचन केले पाहिजे, चिंतन केले पाहिजे. जेलमध्ये तर वाचन केलेच पाहिजे पण जेलच्या बाहेर गेल्यानंतरही वाचन व चिंतन सुरू ठेवले पाहिजे. प्रत्यक्ष

जनतेच्या कामात असताना आलेल्या अनुभवाच्या आधारे यासंबंधीचे निर्णय घेतले पाहिजेत.

यावर मी म्हणालो, साहेब, मग यातली कोणती विचारसरणी आपण स्वीकारलीत आणि आपले या क्षेत्रातले गुरू कोण?

साहेब हसले. आले लक्षात. माझी आई माझी गुरू. ग्रंथ हेच माझे गुरू. याशिवाय जगात मला कुणी गुरू नाही. आणि मी कुणाचा शिष्य नाही की मी कधी माझा मठ स्थापन केला नाही. लोकशाही समाजवादावरची माझी निष्ठा दिवसेंदिवस घट्ट होत गेली. तसे मी मार्क्सवादाच्या प्रेमात पडलो. रशियन राज्यक्रांतीबद्दलही मी बरेचसे वाचले. 'टेन डेज दॅट लुक द वर्ल्ड' हे जॉन रीडचे पुस्तक आमच्या बराकीत फारच गाजले होते. मी त्या पुस्तकावरील चर्चा आणि त्याचे प्रत्यक्ष वाचन या दोन्ही तऱ्हांनी ते समजावून घेतले. रशियन क्रांतीची सगळी कहाणी रोमांचकारी आहे. आणि त्यातील लेनिनचे कार्य जागतिकदृष्ट्या ऐतिहासिक स्वरूपाचे आहे. त्यामुळे त्याच्या व्यक्तिमत्त्वाची फार मोठी छाप माझ्या मनावर पडली. रशियन राज्यक्रांती ज्या प्रकाराने झाली त्या प्रकारे इतर देशांत राज्यक्रांती होईल की नाही हे सांगणे अवघड आहे. किंबहुना हे काम अवघड आहे, अशीच माझी भावना होती. परंतु लेनिन यांच्या राजकीय व आर्थिक परिस्थितीचे विश्लेषण करून निर्णय घेण्याच्या शक्तीबद्दल अचंबा वाटत राहिला. लेनिनसंबंधी वाटणारी आदराची भावना तेव्हापासून जी मनात बसली ती त्यानंतरही आजपर्यंत वाढत राहिली आहे.

पण मग आपण रॉयीस्ट कधी झालात? मी म्हणालो.

मानवेंद्रनाथ रॉय यांच्यासंबंधी या बराकीमध्येच मला खूप समजले. डॉक्टर शेट्टी आणि ह.रा. महाजनी यांनी मला रॉय यांच्यासंबंधी खूप माहिती दिली. जागतिक वस्तुनिष्ठ चळवळीतले त्यांचे योगदान सांगितले आणि त्याचे मतभेद का झाले तेही मी समजावून घेतले. जेलमधून बाहेर पडल्यावर मी माझ्या अनेक सहकारी मित्रांशी त्यांच्या आग्रहाखातर काही काळ रॉय यांच्या विचारांचा पाठपुरावा केला होता. पण म्हणून मी काही रॉयीस्ट ठरत नाही.

या सर्व अभिजनवर्गात तुम्हाला स्वत्व कसे सापडले? तुम्ही तर खेड्यापाड्यातून गेलेलात. मग या सर्वात तुम्हाला अडचण होत नव्हती का? मी म्हणालो.

या बराकीत सर्वच विषयांची चर्चा होत असे. हे लोक कसे अडाणी आहेत हेही कळे. त्यांचे केवढे गैरसमज आहेत. यातले बरेचसे उच्च प्रवृत्तीचे असत. सत्यशोधक चळवळीसंबंधी आणि म. फुले यांच्याबद्दल या लोकांना काही माहिती आहे असे मला वाटत नसे. यामध्ये अपवाद म्हणून समजावादी विचारसरणीची मंडळी होती. त्यात एस.एम. जोशी, ह.रा. महाजनी, मुस्कुटे ही मंडळी काहीशी

अपवाद होती. ती समजूतदारपणे बोलत असत.

एस.एम. जोशी हे विशेषतः तरुण कार्यकर्त्यांच्या चळवळीकडे आणि त्यांच्या प्रश्नाकडे मोठ्या आत्मियतेने पाहत असत. ते त्यावेळी युथलीगचे पुढारी होते. बारा नंबरच्या बराकीमध्ये एके दिवशी सायंकाळी युवक चळवळीच्या संबंधाने त्यांचे एक सुरेख व्याख्यान झाल्याची मला आठवण आहे. त्यांची त्या विषयाची तळमळ आणि स्वातंत्र्यासंबंधी असलेल्या भावनेची तीव्रता, सर्व जातीच्या मंडळींना एकत्र घेण्याची वाटणारी गरज या त्यांच्या विचार सरणीने माझ्या मनात त्यांच्याबद्दल जिव्हाळा निर्माण झाला. दररोज चाललेल्या वादाच्या खटपटीत ते फारसे भाग घेत नसत. प्रसंगी ते वादात पडत. परंतु जेव्हा पडत त्योवळी मोठ्या हिरीरीने ते पडत. त्यांच्या सेवाभावी वृत्तीबद्दल मला फार मोठा आदर वाटण्यासारखा अनुभव या काळात आला. जेलमध्ये त्यांनी सत्याग्रहींचे केस कापण्याचे आणि दाढी करण्याचे काम आपणहून आपल्याकडे मागून घेतले. आणि हळूहळू ते यात थोडेफार तज्ज्ञ झाले. ते काम मोठ्या आनंदाने आणि हसतखेळत करीत असत. त्यामुळे एस.एम. जोशी हे बाराव्या बराकीतील एक लोकप्रिय व्यक्तिमत्त्व होते. एस.एम.चा आम्हाला त्यामुळे अभिमान वाटे. एस.एम.ची माझी वेव्हलेंथ अखेरपर्यंत कायम जुळलेली असे. माझ्या अनेक सहकारी मंत्र्यांना पुढे हे मोठे गूढ वाटे. पण त्यात गूढ काही नव्हते. आमच्या निष्ठा लोकशाही समाजवादाशी जोडलेल्या होत्या. त्याने आम्ही बांधलेले होतो. मार्ग वेगळे असतील कदाचित, पण आम्ही एकाच स्कूलचे विद्यार्थी होतो. निष्ठांबद्दल किंचितही शंका नव्हती. प्रामाणिकपणा, साधेपणा हा एस.एम.चा खास विशेष होता. त्यामुळे पुढे अनेक प्रसंगांत आम्ही एकमेकांना समजावून घेत परस्परांना विश्वास देत घेत अनेक कठीण प्रसंगी, कसोटीच्या प्रसंगी सामंजस्याने वागू शकलो. त्याचे कारणही बारा नंबरची बराक. एस.एम. माझे नेते होते.

मग आपण दोघे एकत्र एकाच पक्षात का राहिला नाहीत. किंवा एकाच झेंड्याखाली का नांदला नाहीत. समाजवादी विचारांच्या वेगळ्या छटा होत्या काय?

नाही, आम्ही लोकशाही समाजवादी होतो. सत्याग्रही समाजवाद, लोकशाही समाजवाद असे किरकोळ भेद असतील पण भारताचे संविधान आणि धर्मनिरपेक्षता, विज्ञाननिष्ठा या मुद्यांवर आम्हा दोघांची अढळ निष्ठा होती. पण त्यांचे सोबतचे इतर सहकारी तसे होते असे म्हणणे धाडसाचे होईल.

सुरुवातीला आपणही समाजवादी गटात होता ना?

होय, होतो. पण नंतर बाजूला झालो. त्याचे असे झाले– मी भूमिगत असताना म्हणजे ४२ च्या चळवळीतली गोष्ट. अण्णासाहेब सहस्रबुद्धे यांनी मला मुंबईला बोलावले होते. मी आमच्या एका मित्राच्या गाडीने सुरक्षितपणे मुंबईला पोहोचलो.

साताऱ्यातल्या कामगारांच्या घरात मी राहत होतो. रोज घर बदलत असे. मोठमोठ्या पुढाऱ्यांच्या गाठी पडू लागल्या.

एस.एम.जोशींना मी एक वेळ भेटलो. त्यांना भेटून मला खूप आनंद झाला. मी त्यांना सातारा जिल्ह्यातल्या कामाची माहिती सांगितली. ते तेव्हा मुसलमान म्हणून वावरत होते. बोहरी मुसलमानाला शोभेल अशी दाढी, टोपी, विजार, लांब कोट अशा वेशात ते मला भेटले होते. आमच्या छान गप्पा झाल्या. ना.ग.गोरे, सानेगुरुजी मुंबईला अधूनमधून असतात; त्यांना भेटता येईल असे त्यांनी मला सांगितल्याचे स्मरते. एके दिवशी डॉ. राम मनोहर लोहिया यांची भेट झाली. अण्णासाहेब सहस्रबुद्धे यांच्या मध्यस्थीने भेट झाली. डॉ. लोहिया इतके मोकळे गृहस्थ होते की त्यांनी आपल्या वेशातही फारसा बदल केलेला नव्हता. पूर्व यु.पी. बिहार येथे झालेल्या चळवळीचा वृत्तांत त्यांनी मला सांगितला. सर्व देशभर क्रांतीचे उधाण कसे वाढते आहे याचे उत्साहजनक चित्र माझ्या डोळ्यांपुढे उभे केले. मीही त्यांना सातारा जिल्ह्यातल्या माझ्या चळवळीतील अनुभव सांगितले. चळवळीतील मानवी हिंसेबद्दलही मी खंत व्यक्त केली.

मनुष्यहानी झाली ही गोष्ट खरी आहे. ती टाळण्याचा तुमचा निर्णयही बरोबर आहे. तुफान वादळामध्ये जशी नौका टाकून द्यायची असते. तसाच काहीसा प्रयत्न एका जबरदस्त लष्करी शक्तींशी लढताना करावा लागतो. म्हणून क्रांतिकारक चळवळीत काही बलिदान अपरिहार्य असते. झालेल्या मनुष्यहानीबद्दल तुम्हाला दुःख होणे स्वाभाविक आहे. पण त्याने मन मोडून घेऊ नका. या चळवळीच्या निर्णयाने समाजातील जे गरीब, दलित व मागासलेले वर्ग आहेत त्यांच्यापर्यंत जा. त्यांच्यातील कार्यकर्ते उभे करा. हा लोहियांचा माझ्यासाठी संदेशच होता. जवळजवळ तासभर आम्ही बोललो. लोकनेता कसा असावा याचे मूर्तिमंत चित्रच मी त्यांच्या रूपाने पाहिले. त्यांची भेट प्रयत्नांनी पण होऊ शकते हे विशेष होते. त्यांनी केलेल्या विचारांचे मार्गदर्शन फार उपयुक्त होते. ते मनाशी जोखून पाहिले आणि त्याचा मनाशी साठा केला.

अण्णासाहेब सहस्रबुद्धे यांनी मला एका बैठकीला बोलावले होते. ते सारे आठ-दहा लोक होते. एका टुमदार घरात आम्ही बसलो होतो. चर्चा सुरू झाली. ही बैठक जवळपास दोन तास चालली होती. सारी नेते मंडळी नावे बदलून, वेश बदलून बसलेली. कोणकोण होते नक्की सांगता येत नाही. मी मात्र माझे नाव हैदर सांगितले होते, काय करतो ते सांगितले होते. बैठकीत झालेली एक चर्चा आठवते. त्यातल्या एका कार्यकर्त्याने उठून ग्रामीण भागामध्ये सरकारच्या हातामध्ये वाटणीसाठी धान्य जाऊ देता कामा नये अशी काही योजना आखली पाहिजे. असा विचार मांडला. विचार

मी समजू शकलो. पण त्याची अंमलबजावणी कशी करायची असा प्रश्न जेव्हा आला तेव्हा रशियात जर्मन आक्रमणापुढे शरण जाण्यापूर्वी सर्व पिके जाळून टाकण्याचा जो कार्यक्रम घेतला होता तोच येथे घेतलेला बरा अशी त्याची सूचना होती. दगदभू करावी आणि त्यावेळी या प्रमुख केंद्राकडून जी सुचना पत्रके आली होती. त्यात या योजनेचा उल्लेख होता. याची मला आठवण आहे. मी या कल्पनेला अत्यंत स्पष्ट शब्दात विरोध केला.

ही अत्यंत अव्यवहार्य योजना आहे. उभी पिके आहेत ती काही ब्रिटिश सेनेची नाहीत. ती देशातल्या जनतेसाठी आहेत. प्रत्यक्ष शेतकऱ्यांसाठी आहेत. पिके जाळण्याचा कार्यक्रम हाती घेणे म्हणजे लोकांशी लढाई सुरू करणे असा त्याचा अर्थ होईल. आणि लोक आपल्याबरोबर न येता उलट सरकारला मदत करतील. वर्तमानपत्रात वाचलेल्या पुस्तकी कार्यक्रमांचा अवलंब करून ही चळवळ चालवता येणार नाही. पिके तर माझीच जळताहेत असे चित्र मला दिसू लागले. तेव्हापासून मी मनाने या मंडळीपासून दूर गेलो. अण्णासाहेब सहस्रबुद्धे यांना माझा विचार पटला.

साहेब, आपण तर शे.का.प.च्या स्थापनेच्याही पहिल्या बैठकीला होता. त्यातून का बाहेर आलात? मी म्हणालो.

त्याचे असे आहे- त्यावेळचे मुख्यमंत्री बाळासाहेब खेर यांचे नेतृत्व जनसामान्यांपासून दुरावलेले होते. त्यामुळे काँग्रेसमध्ये असंतोष होता. आमदारांमध्ये मोठी नाराजी होती. मला स्वतःलाही या सरकारचा कारभार लोकाभिमुख वाटत नव्हता. माझ्यासारखे अनेकजण नाराज होते. जेधे काँग्रेसचे अध्यक्ष होते. ते फार अस्वस्थ होते. ग्रामीण शेतकरी समाजाला न्याय वा दिलासा या सरकारकडून मिळण्याची शक्यताच नव्हती. याविरुद्ध संघटित शक्ती उभी करणे आवश्यक होते. त्यात केशवराव जेधे, शंकरराव मोरे, तुळशीदास जाधव हे प्रमुख होते. मीही काही काळ त्यांच्या सोबत होतो. या बहुजनसमाजवादी गटाने जेव्हा काँग्रेसबाहेर पडण्याचा विचार केला तेव्हा मी थांबलो. पक्षांतर्गत दबाव वाढवण्यास माझा पाठिंबा होता, मात्र स्वतंत्र प्रादेशिक पक्ष काढण्यास माझा विरोध होता. समाजवादी पक्षांतल्या तर अनेक मित्रांशी माझे वैचारिक सौहार्द होते. तरीही मी काँग्रेस सोडून जाण्याचा विचार केला नाही. तसे मी सत्यशोधक कुटुंबातला. माझे बंधू मला म.फुलेंचा सत्यशोधक समाज, त्याचे काम, ध्येय सारे सांगत होतेच. पण मी मनानेच राष्ट्रीय प्रवाहात उडी घेतली होती. प्रादेशिक पक्ष पत्री सरकार या मार्गाने नव्हे तर देशाच्या मुख्य प्रवाहात आपण राहिले पाहिजे. नेहरूंचा समाजवाद मी पत्करला तो अखेरपर्यंत. मी कधीही काँग्रेस पक्षनिष्ठांशी, विचारांशी तडजोड केली नाही. माझे विरोधक काहीही म्हणोत, मी कायम माझ्या हितापेक्षा राष्ट्राचे हित महत्त्वाचे मानले. मानपान, मर्यादा सारे बाजूला

ठेवून मी राष्ट्रीय प्रवाहात राहिलो. हे राष्ट्र फार मोठे आहे. आपली आयुष्ये छोटी आहेत असे मी मानत आलो.

सुप्रिया, जसे मी साहेबांशी मोकळेपणाने बोललो तसे अण्णांशीही अत्यंत मोकळपणाने बोलत असे. मी सेवादल सैनिक होतो. पण अण्णांना माझी जात कोणती ते माहीत नव्हते. अण्णा मोठे विद्वान विचारवंत वगैरे नव्हते. ते अत्यंत साधे, सरळ, पारदर्शी व्यक्तिमत्त्व होते, लोभस होते. गोरगरिबांबद्दल, उपेक्षित वंचितांबद्दलची त्यांची कणवही बुद्धाच्या करुणेशी धागा जोडणारी होती. 'उपरा' वाचल्यावर त्यांना मी माझी जात, मी जेथून आलो ती जागा समजली आणि गहिवरून गेले. माझ्यासाठी, माझ्या माणसांसाठी, वेदानांसाठी डोळ्यांना धारा लागलेले एस.एम.मी पाहिलेत. मुंबईला आम्ही परिषद भरवली होती. त्या परिषदेला एस.एम.नी जे मार्गदर्शन केले ते आसवांनी भिजलेल्या थेंबासारखे. परदुःख काय असते? इतरांच्या दुःखाने दुःखी होणारे पुढारी आज स्वप्नातही पाहायला मिळणार नाहीत असे इतरांसाठी तुरुंगात यातना भोगणारे पुढारी आम्ही पाहिले आहेत. त्यांचे अंतरीचे नाते कसे स्फटिकासारखे होते हेही पाहिले आहे. माझ्या सोलापूरला झालेल्या सत्काराची आठवण तर मी नेहमीच सांगतो. साहित्य अकादमी मिळाली म्हणून सोलापूरच्या आमच्या संघटनेच्या लोकांनी माझा सत्कार ठेवला होता. अध्यक्ष होते एस.एम.अण्णा तर प्रमुख पाहुणे होते ॲड.शंकरराव खरात, प्रा. अरुण कांबळे. समोर मोठा जनसमुदाय. अरुण कांबळे माझे मित्र. ते बोलायला उभे राहिले. सारखे 'बाबासाहेब म्हणाले होते' असे त्यांच्या तोंडी यायला लागले. सभा अस्वस्थ झाली. काही म्हातारे उठून म्हणाले, बास करा. ही काय महारांची सभा आहे? मी उठून सारे शांत केले. सभा सुरू झाली. पुन्हा अरुणचे तसेच सुरू झाले. आता मात्र सारेच उठले. मी पुन्हा माईकवर जायला लागलो. अण्णांनी मला बसवले. माईकवर गेले आणि म्हणाले, खाली बसा. सारे गपचीप बसले. या पोराचा सत्कार का करताय? त्याने पुस्तक लिहिले म्हणून ना? मग याच्या हातात पेन कोणी दिले? डॉ. आंबेडकरांनीच ना? तुम्हाला माणसात कुणी आणले? बाबासाहेबांनीच ना? त्यांचे नाव घेतले तर असे अस्वस्थ का होता? अरे, मी स्वतःला काही ब्राह्मण मानत नाही. पण माझा जन्म तर एका ब्राह्मण आईच्याच पोटी झाला ना? तरीही बाबासाहेबांना मी गुरू मानतो. त्याची मला लाज वाटत नाही. अभिमान वाटतो. आणि तुम्हाला ज्याने जनावरांसारखे जगत होता, माणसे केले, आम्हाबरोबर मांडीला मांडी लावून बसवले त्या महापुरुषाचे नाव घेतले की गडबड करता. अण्णांनी दम दिला, सभा शांत झाली. पण सात्त्विक संताप काय असतो तो साऱ्यांनीच पाहिला.

अण्णांच्या बरोबर पुण्याला यायला निघालो. गाडीत गप्पा सुरू झाल्या. अण्णाही

आता थकले होते. नेहरू शर्ट, पायजमा, वुलनचा कोट, अत्यंत सडपातळ देहयष्टी, आवाज खडा, खडखडीत बोलणे, प्रसंगी शब्दांना विलक्षण धार असे तर कधी ती हितगुज करणाऱ्या मित्रांची वाटे, कधी मिश्किली अशी की पोट धरून हासायला लावीत. खट्याळपणाही खास त्यांचाच. विनोदांची लयलूट असे. असे अत्यंत हलकेफुलके वातावरण ठेवीत. मधून मधून मी चिमटे काढीत असे. ते अत्यंत मिस्किलपणे डोळे मिचकावीत हातावर टाळी देत. फार छान हासत स्वगत, प्रकट चिंतन करीत. खरे तर अशा वेळी वाटते, आतासारखी यांत्रिक करामती करणारी यंत्रे असती तर तुम्हा मुलांना अण्णा समजले असते.

अण्णा तुमचे नि यशवंतरावाचे नेमके मेतकूट काय होते हो?

अरे, काय शब्द शोधलास 'मेतकूट'. होते खरे आमचे मेतकुट. यशवंतराव म्हणजे काळजाला कुरूप असलेला माणूस होता. बहुजनांच्या कल्याणाचे कुरूप त्याच्या काळजाला झाले होते. बहुजनांचे कल्याण, त्यांच्या दुःखावर इलाज शोधणे हा त्यांचा ध्यास होता. आमचे मार्ग वेगवेगळे हाते. पण व्हेवलेंग्थ एकच होती. वेगवेगळ्या पातळ्यांवर पण आम्ही एकच विचार करीत असू. आमचे मेतकूट बराक नंबर बारामध्ये होते. येरवड्याच्या जेलमध्ये कॅम्पातल्या दिवसांत. आम्ही स्वातंत्र्यासाठी खस्ता खाल्या. तुरुंगवास सोसला. तेव्हा कुठे होते सत्तेचे स्वप्न. साम्राज्यशाही वरवंटा फिरत होता. जीवाचे नाव मरण ठेवून जगणारे आम्ही. त्यावेळचे तरुण हेच आमचे मेतकूट होते.

ते मुख्यमंत्री तर तुम्ही विरोधी पक्षनेता. मग कसे जमत होते? की विरोधासाठी विरोध होता?

नाही, नाही. असे नकली कशाला काय असेल? आम्ही माणसेच मंतरलेल्या काळातली असली होतो. विचारांची स्पष्टता होती. त्यांनी निवडलेला मार्ग त्यांचा होता. माझा मार्ग माझा होता. पण, लोकशाही, समाजवादी मूल्य, साधनशुचिता, प्रामाणिकपणा, विश्वास हे राजकारणात फार महत्वाचे असते.

स्वातंत्र्यलढ्यात भाग घेतलेल्या आम्हा स्वातंत्र्यसैनिकांमध्ये आपुलकीचे विशेष संबंध निर्माण झाले आहेत. एका परिवारातील माणसे जशी नाजूक प्रेमभावनेने बांधली जातात तसाच काहीसा हा प्रकार आहे. त्यामुळे एकमेकांचे दोष माहीत असूनही आमच्यामध्ये पारिवारिक सौहार्द आहे. परस्परांच्या सुखदुःखात आम्ही सहभागी होतो. अडीअडचणीच्या वेळी साहाय्य देण्यास, मागण्यास मनाला संकोच वाटत नाही. नव्या पिढीतल्या लोकांना आमच्या पारिवारिक संबंधाचे आकलन होऊ शकत नाही. मेतकूट वाटते आणि त्याचे महत्त्वही समजत नाही. म.गांधींच्या स्वातंत्र्यलढ्यात भाग घेतलेल्यांना हा अमूल्य वारसा मिळाला आहे. या मार्गाने जाण्यातच जीवनाचे

साफल्य आहे असे आम्ही मानतो. त्यामुळे आमच्या जीवनात वैफल्याचे सावट येऊ शकत नाही.

यशवंतरावांनी आपल्या जीवननिष्ठांशी कधी प्रतारणा केली नाही. मतभेद असू शकतात. कित्येक वेळा भल्याबुऱ्या संबंधीचे चुकीचेही ते होऊ शकतात. कालांतराने तसे सिद्ध होऊन जाते. परंतु जो निर्णय घेतला तो अंतरात्म्याला साक्षी ठेवून घेतलेला असतो. म्हणूनच माझ्या-त्यांच्यामध्ये सतत सामंजस्य राहिले आहे. निराळ्या शब्दांत सांगायचे तर आमच्यामधील व्हेवलेंग्थ कधीच मोडलेली नाही. त्यांनी दिलेला शब्द मोडल्याचे कधीच स्मरत नाही. त्यांच्याबद्दल माझा हा विश्वास माझ्या काही मित्रांना पसंत पडत नसे. परंतु त्यांची चूक मागाहून त्यांना कबूल करावी लागे.

अनेकदा जीवनात अटीतटीचे प्रसंग आले. अत्यंत कौशल्याने आम्ही त्यातून मार्ग काढला. व्यक्तीगतरीत्या आम्ही कधीही कमरेखाली वार केले नाहीत की कुचाळक्या केल्या नाही. माणसे भांडणारच; पण ती कशासाठी भांडताहेत ते महत्त्वाचे. भांडण महत्त्वाचे नाही. हे आम्हापुरते नीट आकलन झालेले होते. संयुक्त महाराष्ट्राचा काळ आम्हा दोघांसाठी फार कसोटीचा होता. पण आमचे अंडरस्टँडिंग फार पक्के होते. नुसत्या देहबोलीने आम्हांला समजत असे.

अण्णा, आज जसे तुम्ही बोललात तसे पूर्वी बोलला नाहीत कधी?

अरे, आता जाण्याचे दिवस जवळ आले ना? आता कसला रागलोभ. व्हायचे ते तर होऊन गेले. आता या सर्वापलिकडे गेलो म्हणून मोकळेपणाने बोललो. आपल्या लोकांना शाहू, फुले, आंबेडकर हे गणित कळले नाही. मग बिचारे यशवंतराव कसे कळणार? तुम्ही तरुण लोक डोळसपणे पाहाताय ना? याचसाठी तर सारा आयुष्यभर प्रपंच केला. खरे की नाही? अण्णा हातावर टाळी देत. आम्ही हसत गुलाम अलीच्या गजला लावल्या. अण्णांचा आवडता गजल गायक.

ती. सौ. वहिनींना, बाबांना सप्रेम जयभीम.

तुझा,
लक्ष्मणकाका

दिनांक २६/१०/२०१२

चि. सुप्रिया,

सप्रेम जयभीम.

माझ्या मनात अनेक वर्षे अनेक प्रश्न सतत मला सलत असत. त्यात सर्वात महत्त्वाचा प्रश्न असे तो जातीचा. आपला जन्म येथे का झाला? आपल्या हाती जन्म घेणे होते का? मग जी गोष्ट आपल्या हाती नाही तिचे चटके इतके का बसावेत? उठता-बसता माणसाचे मूल्यमापन त्याच्या जातीवरूनच का व्हावे? माणसाचा दर्जा त्याच्या जातीवरून ठरतो तो का? धर्मशास्त्राने दिलेले उत्तर मला माहीत आहे. पण ते उत्तर मीच काय कुणीच विज्ञानवादी माणूस स्वीकारत नाही. कर्मविपाकाचा सिद्धांत मी स्वीकारीत नाही? किंवा त्यावर विश्वासही ठेवीत नाही. हे असले माणूसपणाला कमी लेखणारे सिद्धांत माणूसघाणे आहेत. मग त्याचा निर्माता कुणी का असेना. एक माणूस तुपाशी आणि दुसरा उपाशी ही गोष्टच तळपायाची आग मस्तकला नेणारी आहे. कुणीतरी श्रीमंत बापाच्या पोटी जन्मला म्हणून तो पिढ्यान् पिढ्या श्रीमंत आणि कुणीतरी गरीबाघरी जन्मला म्हणून तो पिढयान् पिढया गरीब. त्याला पोटभर अन्न मिळणार नाही. अंगभर वस्त्र मिळणार नाही. डोक्यावर छप्पर मिळणार नाही. पाय ठेवायला आसरा नाही. त्यामुळे जन्माधिष्ठित उच्चनीचता, जन्माधिष्ठित जातीव्यवस्था, जन्माने बहुसंख्य नि जन्माने अल्पसंख्य हे लोकशाही कसे निर्माण करणार? लोकांनी, लोकांसाठी, लोकांकरवी चालवली जाणारी राज्यपद्धती म्हणजे लोकशाही. या व्यवस्थेत या व्याख्येला काय अर्थ आहे? मी बाई माणूस म्हणून जन्मले हा काय गुन्हा आहे? बाईला माणूसच धर्मशास्त्रांनी मानलेले नाही. त्यामुळे समाजात स्त्रियांचा दर्जा नेहमी खालचा. ती पुरुषाच्या बरोबरीची असूच शकत नाही. पायातली वहाण पायात असली पाहिजे. म्हणजे काय ती गुलामच आहेना? असले सामाजिक विषमतेचे अनेक प्रश्न माझ्या मनात रुंजी घालत असल्याने वेळ मिळेल तेव्हा मी चव्हाणसाहेबांना भंडावून सोडत असे. त्यांचे माझ्यावर प्रेम असल्याने व माझ्या प्रामाणिकपणावर त्यांचा विश्वास असल्याने ते कधी विचलीत होत नसत. त्यांना

रागावण्याचे इंद्रियच नाही की काय? मी तर छोट्याछोट्या गोष्टीवर रागावतो. आपण सामान्य माणसं. साहेब सामान्य नव्हते. त्यांचे मन अत्यंत हळवे, संवेदनशिल आणि प्रगल्भ विचारवंताचे होते. त्यामुळे आईची माया, थोरल्या भावाची माया, कुटुंबातल्या कर्त्या पुरुषाची माया त्यांच्या ठायी होती. म्हणूनच मीही त्यांच्या प्रेमात पडलो होतो.

दिवस उगवून बराच वर आला होता. पावसाळा नुकताच संपला होता. सह्याद्रीच्या उंच सुळक्यांनी, खोल दऱ्यांनी हिरव्याकंच शालूने आपला देह झाकला होता. कंबरेवर वाढलेले गवत वाऱ्यावर झोके घेत होते. झोपाळ्यावर डुलावे तसे गवतांचे तुरे डुलत होते. पानांचा हिरवा काळा रंग, पानावरली तुकाकी, पानांची तरुण तेजदार विन होती. मध्येच फुलांनी सजलेले वृक्ष आपआपल्या माना वर करून आकाशाला खुणावत होते. आकाशाचे बदलते रंग आपल्या विविध छटांनी मनावरून मोरपिस फिरावे तसे फिरवत होते. ढगांचे बदलणारे आकार, वाऱ्याच्या दिशेने पळणारे राखाडी रंगाचे ढग. त्यातली विविधता, संपन्नता मनाला फार मोहवीत होती.

मी अगदी सकाळी सकाळी स्कूटरवरून सह्याद्री सहकारी साखर कारखान्यावर निघालो होतो. चव्हाणसाहेब कारखान्यावर येणार होते. त्याचं परमस्नेही पी.डी.पाटील असेच अत्यंत दुर्मिळ व्यक्तिमत्त्व. शांत, कमी बोलणारे. पायजमा, शर्ट, कोट, डोक्यावर खादी टोपी. टपोरे डोळे, उंच दांडीचे नाक. सडसडीत अंगाचे पी.डी.म्हणजे चव्हाणसाहेबांचे उजवे हात. कराड शहराचे वर्षानुवर्षे नगराध्यक्ष. पी.डी. नि नगराध्यक्ष असे समीकरणच होते त्या काळात. साहेबांचा निरोप होता, कारखान्यावर भेटूया. काही कारणाने मी आप्पासाहेब भोसल्यांपर्यंत माझा गाडीसाठीचा निरोप पोचवू शकलो नव्हतो. पण जायला तर हवेच होते. काय करावे याचा विचार न करता मी स्कूटरने मजा करीत कारखान्यावर पोचलो. साहेब यायला बराच वेळ होता. सह्याद्रीच्या कुशीतल्या या कारखान्यातल्या पी.डी. साहेबांच्या अधिकाऱ्यांनी मला सारा कारखाना, त्याचा परिसर दाखवला. दिवस वर सरकू लागला. तसं ऊन वाढायला लागले. साहेबांची सभा असल्याने गर्दी बरीच जमू लागली. मी आल्याचा निरोप साहेबांपर्यंत पोहोचला. त्यांनी तात्काळ मला बोलावले. जवळ बसवून घेतले. जिल्ह्यातले अनेक नेते जमू लागले. मी हळूच सटकलो. का कोण जाणे, पण मला या लोकांत संकोचल्यासारखे होत होते, अगदी आजही होते. ही माणसे दोन चेहऱ्यांची असतात. त्याचा सार्वजनिक चेहरा वेगळा असतो नि खरा चेहरा वेगळा असतो. हसणे हे खोटे असते किंवा उसने असते. आणि डोळ्यांत कायम इतरांबद्दल तुच्छतेचा भाव असतो. या

तुच्छतेचाच मी पराकोटीचा तिरस्कार करीत असतो. ती तुच्छता या पांढऱ्या कपड्यातल्या मोठमोठ्या असामींमध्ये मी ठासून भरल्याचे पाहतो. या सर्वांत नितळ माणूस म्हणून मी चव्हाणसाहेबांच्या प्रेमात पडलो होतो. पण माझ्यासारखी खालच्या जातीची माणसे घेऊन यशवंतराव हिंडतात या गोष्टीचे त्यांना वरकरणी कौतुक असले तरी डोळ्यांतली तुच्छता काही त्यांना सराईतपणे लपवता येत नाही.

एकदा तुझे बाबा मला गमतीने म्हणाले होते. लक्ष्मणराव, तुम्हा लोकांना समोरचा माणूस जातीयवादी आहे हे कसे समजते? तेव्हा तुलाही ते सांगतो. आम्हाला एक सहावे ज्ञानेंद्रियच आहे. समोरचा पुरुष नालायक आहे, तो कितीही संभावितपणाचा, सभ्यतेचा आव आणत असला तरी त्या स्त्रीला तो काय लायकीचा आहे हे अगदी नजरानजर झाल्याबरोबर समजते. कारण तिलाही सहावे इंद्रिय असते. ती मनातल्या मनात शिवी हासडते. आपला पदर नीट करते आणि पुन्हा त्याच्याकडे बघतही नाही. तिला जसे नुसत्या नजनेने समोरच्याला जोखता येते. तसेच ज्यांच्या वाट्याला अवहेलना, तुच्छता आलेली असते त्यांना समोरच्या माणसाचे डोळे क्षणांत तो काय आहे हे सांगतात. त्यामुळे समोरचा माणूस जातीयवादी आहे की नाही आम्ही क्षणात सांगतो. कारण त्याचे डोळेच सांगत असतात. या माझ्या उत्तराने शरदराव कितीतरी वेळ कोट्या करून हसत आणि हसवत राहिले होते. या त्यांच्या स्वभावामुळे त्यांचे माझे मेतकूट वर्षानुवर्षे जमले आहे.

मी साहेबांशी बोललो. कार्यक्रम संपल्यावर. कराडला घरी भेटण्याचे ठरले. साहेबांनी कारखान्याची मोळी टाकून कारखान्याचा गळीत हंगाम सुरू केला. शेतकरी मेळाव्यात भाषण केले. मी थोडा वेळ त्यांची सभा ऐकली नि स्कूटरने कराडला पोहोचलो. मी माझ्या समाजातल्या लाला साळुंखे नावाच्या घिसाडी समाजातल्या तरुण कार्यकर्त्याकडे बराच वेळ बसलो. तो आपला उद्योग करीत माझ्याशी बोलत होता. आम्ही बराच वेळ गप्पा मारल्या. गाड्यांचा ताफा विरंगुळ्याकडे वळला नि मी स्कूटर त्याच्याच दारात लावून साहेबांकडे गेलो. साहेबांकडे फारशी गर्दी नव्हती. होती थोडी माणसे तीही पांगली. मी आत गेलो. माझे स्वागत करून बसा म्हणाले. ते आतल्या बाजूला गेले. फ्रेश होऊन बाहेर आले. लक्ष्मणराव, जेवणाचे काय केले? मी वाट पाहिली. तुम्ही लगेच निघालात काय? पी.डी. तुम्हाला शोधत होते जेवायला. चला आता एकटेच जेवून घ्या. मी जेवून आल्याचे सांगितले. साहेबांना एन.बी.टी.साठी बाबासाहेबांचे चरित्र लिहायचे होते. त्या ग्रंथाची तयारी ते करीत होते. प्राथमिक तयारी झाली होती. काही

संदर्भग्रंथ, काही त्यावेळच्या पत्रकांच्या शोधात ते होते. त्यासंबंधी आम्ही बोलत होतो. खैरमोड्यांचे ग्रंथ होते. तशी बाबासाहेबांची अनेक उत्तमोत्तम चरित्रे होती. पण त्यांना त्या सर्वाहून वेगळे लिहायचे होते. डॉ. आंबेडकरांच्या कार्यकर्तृत्वाला एका वेगळ्या पद्धतीने त्यांना मांडायचे होते.

माझ्या मनातली अस्वस्थता मी त्यांच्याशी बोलत होतो. आम्ही कितीही कर्तबगारीने उभे राहिलो तरी आमची जातच पाहिली जाते. त्यामुळे कुणीच आपले वाटत नाही. या जातीचे, विषमतेचे करायचे काय? आम्ही सोन्यासारखे काम केले तरी त्याची माती होते. आमच्या अंगी सोन्यासारखे गुण असले तरी त्याची माती होते आणि यांची टुकार पोरे, सुमार लेकरे हागली तरी त्याचे सोने होते. साहेब म्हणाले, खरे आहे लक्ष्मण, पण हे एक गोष्ट लक्षात घेतली की उलगडते. बाबासाहेब उतरंड म्हणतात ना तसेच हे आहे. सारी गाडगी दुसऱ्याच्या तोंडावर बसली आहेत. खालचा डेरा म्हणजे आपण सारे. पण डेरा मोठा असला, त्याचा आकार मोठा असला तरी दुसरे गाडगे त्याच्या तोंडावर बसते नि त्याचे तोंडच बंद होते. तोच न्याय इतर गाडग्यांचा असतो.

साहेब, देशाला स्वातंत्र्य मिळून आज तीस वर्षे उलटली. संयुक्त महाराष्ट्र झाला त्याला वीस पंचवीस वर्षे झाली. पण आज ब्राह्मण परवडले पण मराठे नकोत असे आम्ही लोक म्हणत आहोत. मराठयांचा जेवढा त्रास आहे या वंचित समाजाला तेवढा आज कोणाचाही नाही. ब्राह्मण खेडी सोडून पळाले. आज औषधाला नाहीत. मग त्रास का चालू आहे? अन्याय, अत्याचार कोण करीत आहे? आम्ही आजही अंगावर घातलेले कपडे, पायातले बूट, बांधलेली घरेदारे, घोड्यावर काढलेल्या वराती, कोणतेही निमित्त पुरते नि अत्याचार सुरू होतात. सामूहिक बलात्कार, सामाजिक बहिष्कार होतात. काय उपयोग त्या घटनेचा, पुस्तकाचा? सारी चांगली सूत्रे एकत्र केली, चांगली सुंदर घटना बनवली ती आमच्या बायापोरींची अब्रू वेशीला टांगली तर काय करायची ती घटना? असून नसल्यासारखीच की.

लक्ष्मण, तुम्ही म्हणता ते सारे खरे आहे. चटके तुम्हाला बसताहेत हेही खरे आहे. पण हे मी पंचवीस-तीस वर्षापूर्वी मांडले आहे हे लक्षात घ्या. आमच्या पिढीला मर्यादा आल्या हे खरेच आहे. आज ब्राह्मण ब्राह्मणापुरता विचार करतो. मराठा, मराठ्यांपुरता विचार करतो. महार महारांकरिता विचार करतो. माळी माळ्यांकरिता विचार करतो. हे मासले मी नमुन्यासाठी सांगितले. जातीयवादाच्या या विषारी विचारापासून आपण महाराष्ट्राला मुक्त केले पाहिजे. जातीयवादाचा हा विचारच समूळ नष्ट केला पाहिजे. तेव्हाच महाराष्ट्राचे मन एकजिनसी होईल.

बाबासाहेबांचे चरित्र लिहिण्यामागे माझा हाही एक हेतू आहेच. म्हणूनच मी ते कबूल केले आहे. ते मीच लिहिले पाहिजे हेही माझ्या मनाने घेतले आहे. महाराष्ट्रात केवळ मराठी भाषकांचे राज्य झाले. लोक मला त्याकाळात शिव्या देत होते. जोड्याच्या माळांनी माझे स्वागत करीत होते. तेव्हाही मला मनातून आनंद होत होता. यानिमित्ताने का असेना, सर्व जातीधर्मातले लोक एका झेंड्याखाली आले होते. महाराष्ट्र राज्य निर्माण झाले. मला वाटले आता काम सोपे झाले. महाराष्ट्राचा कारभार मी हाती घेतला. आणि आमचे मराठीतले एक मोठे विचारवंत अगदी माझे जवळचे मित्र माडखोलकर यांनी असा प्रश्न निर्माण केला होता की, 'महाराष्ट्राच्या निमित्ताने निर्माण होणारे राज्य हे मराठी राज्य आहे की मराठा राज्य आहे?' मी त्यावेळी त्यांना सांगितले होते. आपल्याला काय करायला पाहिजेल आहे हेही मांडले होते. आणि आजही मी त्याला बांधील आहे. हे मराठा राज्य मुळीच होणार नाही. जोपर्यंत माझ्या हातात सत्तेची सूत्रे असतील तोपर्यंत निदान मी हे राज्य एका जातीचे-मराठ्यांचे किंवा आणखी एखाद्या जातीचे-होऊ देणार नाही. ते तसे होत आहे असे वाटले तर महाराष्ट्राच्या कल्याणाकरिता, मराठा जातीत जन्माला आलो आहे यातून मला कदाचित एका बाजूला हटावे लागले तरी मी हटण्याचा प्रयत्न करीन. पण ही गोष्ट मी होऊ देणार नाही. आणि म्हणून साहित्यिकांना नि विचारवंताना मी विचारू इच्छितो की कशासाठी हा वाद आपण पुन्हा उभा करीत आहोत? ते संशय, त्या शंका, आणि त्या आशंका यामुळे मी खूप अस्वस्थ आहे. माझे मन भरून येते आहे. पुष्कळ वेळा मला बोलणे अवघड होते. मी पुष्कळ वेळा सांगत आलो आहे, की मराठा हा शब्द जातीवाचक नाही. आचार्य अत्र्यांनी आपल्या वर्तमानपत्राला 'मराठा' हे नाव दिले ते काय तो शब्द जातीवाचक आहे म्हणून दिले? मराठा शब्दामागे महाराष्ट्राच्या एकजिनसी जीवनाची भावना आहे. मराठा शब्दाचा हाच अर्थ आम्हाला अभिप्रेत आहे आणि म्हणून मराठी राज्य हे कोणा एका जातीजमातीचे मुळीच होता कामा नये. या गोष्टीवर माझा विश्वास आहे. पण आपण म्हणता तसा हा जातीयवादी विचार सर्व समाजात आहे. मी असे म्हणत नाही की मराठा समाजात जातीयवाद नाही. ब्राह्मण समाजात नाही. माळी समाजात नाही. सगळ्याच समाजांत तो आहे, नाही कुठे? परंतु आम्ही विचारपूर्वक २५-२५ वर्षे ३०-३० वर्षे राष्ट्रवादी भावनेला वाहून घेतलेली माणसे आहोत. जसे मराठ्यांबद्दल इतरांनी बोलता कामा नये, तसे मराठ्यांनीही इतरांबद्दल बोलता कामा नये असे माझे मत आहे. तीस-पस्तीस वर्षांपूर्वी मी ही मते मांडली. त्यांच्याशी चिकटून राहिलो. मी कधीही माझे मन जातींच्या जंजाळात अडकू दिले नाही.

ते पण साहेब, आज काय दिसते? गांधी निवडणुकीसाठी कोठून उभे राहिले असते? बाबासाहेबांनी देशाला घटना दिली. ज्या महापुरुषाने घटना लिहिली त्यालाच पराभूत व्हावे लागले. ज्या नेहरूंना आपण आदर्श मानून आयुष्य घालवले. ते नेहरू कोठून उभे राहिले असते? ते ज्या काश्मिरी ब्राह्मण कुटुंबात जन्माला आले त्या जातीची लोकसंख्या किती? त्यांचे डिपॉझिट तरी राहिले असते का? मी अनेक ग्रंथ लिहिले. म्हणून मला कुणी ब्राह्मण म्हणेल काय? निवडणुकांचा विचार तरी आम्ही भटकेविमुक्त करू शकतो काय? आम्हाला लोकशाहीच्या परिघाबाहेर ठेवून घटनेची तरफदारी करण्यात काय अर्थ आहे? मी पार्लमेंटवर बॉम्ब टाकला पाहिजे असे म्हणालो याचे आपणास दुःख झाले. पण साहेब, आमचा जन्मच दुःखात आहे, त्याचे काय?

लक्ष्मण, मी तुमच्या सर्व भावनांशी सहमत आहे. पण कसे झालेय सांगू? स्वातंत्र्य मिळाले या आनंदातच आमची पाच-दहा वर्षे गेली. लग्नाच्या गडबडीत असलेल्या वऱ्हाडी मंडळींना जसे परसदाराच्या विहिरीत लहान मूल पडून मरून जावे आणि याची खबरही वऱ्हाडी मंडळींना नसावी तसे आमचे झाले. स्वातंत्र्याच्या जल्लोषात मागे पडलेले वर्ग लक्षातच नाही आले. माझ्यापुरते म्हणाल तर मी सांगतो, पण त्यासाठीची अपराधीपणाची भावना मी मुळीच नाकारीत नाही. आमचा नाकर्तेपणाही मी नाकारीत नाही. तुम्ही तरुण आहात. मी दिल्लीला गेलो ते मारुतराव कन्नमवार या बंधूच्या हाती मुख्यमंत्री पदाची सूत्रे देऊन. ते अल्पकाळ राहिले हे खरे. त्यांचे अकाली निधन झाले. ते ज्या भटक्या बेलदार समाजातले होते त्यांना कसे मुख्यमंत्री करता आले असते? पण मी कर्तेपणाने ते केले. त्यानंतर लमाण समाजातल्या वसंतराव नाईक यांना मुख्यमंत्री केले. तेही तुमच्या समाजातले. तब्बल बारा-तेरा वर्षे ते मुख्यमंत्री होते. तरीही तुमचा प्रश्न रखडला ही गोष्ट मला मान्य करायलाच पाहिजेल. प्रश्न माझा आणि तुमचा नाही. जी मानसिकता आहे ती मला महत्त्वाची वाटते. तुमच्या मनातली कटूता मी समजू शकतो. तुम्ही जे गांधी-नेहरूंबद्दल सांगितले ते खरेच आहे. आज उच्च वर्णीय समाजाची मानसिकताही तुमच्यासारखीच आहे. बुद्धीची, ज्ञानाची सेवा करण्याचे काम ज्या समाजांनी आजपर्यंत केले, देशाच्या अलिकडच्या इतिहासातही ज्यांनी वैचारिक नेतृत्व केले त्यांच्याही मनात तुम्ही म्हणता तशीच मानसिकता आहे. गेली २५-३० वर्षे निवडणुकांचे राजकारण तपासून पाहिले तर जातींच्या संख्याबळावर काही माणसे पुढे जात असतात. आपल्या गुणांची उपेक्षा आणि अवहेलना होते आहे अशी भावना वाढताना दिसते आहे. आपल्या जातींच्या कारणासाठी आज आपण मागच्या बाकावर बसण्याची तयार केली पाहिजे का? तुमचे तर आभाळच

फाटलेले आहे. ही मने कशी सांधावीत हेच कळत नाही. जेव्हा हातात ताकद होती तेव्हा तुम्ही नव्हता. आज तुम्ही आहात प्रश्न सांगता आहात, आकांत करीत आहात आणि माझ्या हातात काही नाही. हा सल लक्ष्मण, काळजाला झालेल्या कुरूपासारखी मनाला टोचणी लावते आहे. म्हणून तर यापुढचे आयुष्य तुमच्या कामात घालवण्याचा निर्णय मी केला आहे. असाच निकडीचा प्रश्न त्याकाळात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या समाजाचा होता. बाबासाहेबांनी धर्मांतर केले होते. त्याची मोठी कटूता सवर्ण म्हणून जगणाऱ्यांच्या मनात होती. तोही प्रश्न असाच लटकला असता कारण सत्तेत इतरांना सामावून घेण्याची तयारीच उच्चवर्णीय म्हणवणाऱ्या समाजाची नव्हती. बाबासाहेब तर गेलेच होते. पण माझ्या हातात हुकूमाची पाने होती. सर्वांच्या पाठबळाने मला हिंमत आली. ज्याचे होते त्याला द्यायलाच हवे होते. मी काही माझ्या पदरचे देणार नव्हतो. प्रसंगी सत्ता गेली तर गेली असा मनाने कौल दिला आणि मी माझ्या मनाचा कौल महत्त्वाचा मानला.

डॉ.आंबेडकरांनी त्या समाजात नवी जागृती निर्माण केली होती. अनेक बुद्धिमान, विचार करणाऱ्या कर्तृत्ववान तरुणांचा एक वर्ग त्यांनी या समाजात निर्माण केला. एवढ्या मोठ्या संख्येने हा समाज आपल्यासोबत वावरला आणि ज्याला अस्पृश्य म्हणून बाजूला फेकले त्या समाजाचा स्वाभिमान आज जागृत झाला आहे. या समाजातील या होतकरू तरुणास जवळ केले पाहिजे, आपलेसे केले पाहिजे. आम्हाला कोणाची सहानुभूती नको आहे. आमचा जो हक्क आहे तो आम्हाला मिळाला पाहिजे आणि तो आम्ही तो मिळवणारच. या जिद्दीने काम करण्याची कुवत त्यांच्यात निर्माण झाली पाहिजे. तिचे आम्ही स्वागत केले पाहिजे. आपले जुने राग, द्वेष दूर केले पाहिजेत. आपल्या वागणुकीने त्यांच्यात भागिदारीची जाणीव निर्माण केली पाहिजे. डॉ. आंबेडकरांच्या हयातीमध्ये महार वतनांचा प्रश्न अधिक उदारपणे, अधिक समजूतदारपणे आम्ही त्यांच्याशी बोलू शकलो असतो तर त्यांच्या अनुयायांमध्ये आणि आमच्यांमध्ये आज जो एक प्रकारचा मानसिक तुटकपणा निर्माण झाला आहे तो कदाचित निर्माण झाला नसता. यापुढे जाणत्या बुद्धीने, भागिदारीच्या भावनेने महाराष्ट्रातील आपण आपल्या या लोकांचा प्रश्न सोडवला पाहिजे. म्हणून मी वतनाचे बिल आणले. ते पास केले. बाबासाहेबांचे स्वप्न मला या निमित्ताने पुरे करता आले. तसे तुमचाही प्रश्न मी सोडवू शकलो असतो पण कसे माहीत नाही पण राहून गेले. थाडे कमिशन नेमून नेहरूंनी मला यांच्या तारा तोडताना दिलेला शब्द पाळायचा होता. नेहरू म्हणाले होते. अस्पृश्य आदिवासींच्या सवलती तर यांना द्याच पण एवढ्याने भागणार नाही. यांच्या

पुनर्वसनाचा स्वतंत्र प्लॅन तयार करा. मी थाडे कमिशन यासाठी नेमले होते. पण मी महाराष्ट्रातून दिल्लीला गेलो आणि हा साराच प्रश्न नीट हाताळला गेला नाही. हे अस्पृश्य आदिवासी आहेतच, कित्येक वर्षे या सवलती यांना मिळतातच या समजात मी स्वतः होतो हे मला कबूल केले पाहिजे. लक्ष्मण, आता हा प्रश्न सोडवल्याशिवाय थांबायचे नाही.

सुप्रिया, माणसे किती मोठी असतात हे मी चव्हाणसाहेबांच्या रूपात पाहत होतो. तुझे बाबा या प्रश्नात लक्ष घालतात पण ते नेटाने पुढे का रेटत नाहीत ते मला माहिती नाही. चव्हाणसाहेब त्यांच्याशीही या प्रश्नावर बोलले होते. म्हणून साहेब गेल्यापासून आम्ही तुझ्या बाबांबरोबर आहोत. सोडवला तर तेच हा प्रश्न सोडवतील ही माझी श्रद्धा आहे. इतरांना हा प्रश्न समजेलच असे नाही. आणि आजचे राजकारण पाहता ही गोष्ट संघर्ष केल्याशिवाय सुखाने सुटेल असेही वाटत नाही. लोकशाहीत दुबळ्यांचे संरक्षण कायदा करतो तो कायदा हातात घेतला जाणार नाही आणि पिंजऱ्यातून सोडलेला पोपट जसे फार लांब उडून जात नाही, तो सोडला तरी पुन्हा पुन्हा पिंजऱ्यावर येऊन बसतो, याउपर तुला काय सांगू? तुझ्याही मतदारसंघात पाचपन्नास हजार मते या समाजाची सहजपणे आहेत. पुन्हा लोकांनी चोऱ्यामाऱ्या खुनखराबा करीत हिंडावे की त्यांना मुख्य प्रवाहात सामील करून घ्यायचे हे तुम्ही राज्यकर्त्यांनी ठरवायचे आहे.

ती. सौ. वहिनींना, बाबांना सप्रेम जयभीम.

तुझा,<br>
लक्ष्मणकाका

दिनांक ३१/१०/२०१२

चि. सुप्रिया,

सप्रेम जयभीम.

मी १ जून १९८३ रोजी निलंगा तालुक्यातील कासार शिरसीला भटक्या-विमुक्तांच्या मेळाव्यात भाषण करीत होतो. बेरड समाजातील लोकांना स्मशान नव्हते. एका माणसाची मयत झाली होती. प्रेत पुरायला गाव जागा देत नव्हते. त्यांची परंपरागत स्मशानभूमी होती तिच्याकडे जाणारा रस्ता एका माणसाच्या खाजगी जागेतून जात होता व त्याने तो अडविला होता. आम्ही प्रेताचे करायचे काय, म्हणून चिंतेत होतो. नातेवाईक, पैपाहुणे जमले होते. प्रेत पुरायला जागा नव्हती. सारे गावकरी त्या माणसाची समजूत घालीत होते. पण तो ऐकायला तयार नव्हता. लोक हळूहळू जमू लागले. गर्दी वाढली. लोकांनी प्रेत उचलले आणि त्या माणसाच्या विरोधाला न जुमानता स्मशानात नेले. विरोध करणारा माणूस, त्याची भावकी यांनी दगडफेक केली. काही लोक जखमी झाले. या देशात मेलेल्या माणसाला पुरायलाही जागा नाही. घराला जागा नाही. मी प्रचंड अस्वस्थ होतो. लातूरच्या जिल्हाधिकाऱ्याच्या कचेरीवर सत्याग्रह करायचा ठरवून छोटेमोठे मेळावे घेत फिरत होतो. माझे भाषण चालू होते. आणि विलास माने हा माझा अत्यंत तळमळीने काम करणारा कार्यकर्ता माझ्याजवळ आला नि म्हणाला, 'रेडिओला बातमी सांगितलीय वेणूताई चव्हाण गेल्या.' क्षणात सारा नूर बदलला. आमच्या मेळाव्यात ही बातमी समजली आणि मेळाव्याचे शोकसभेत रूपांतर झाले. श्रद्धांजली अर्पण करून सभा संपली.

मी मुंबईपासून खूपच दूर होतो. मला अत्यंविधीला उपस्थित राहता येणार नाही हे उघड होते. मी रात्रीच सातारला पोचण्याचा निर्णय केला. दुसऱ्या दिवशी मुंबईला निघावे म्हणजे रक्षाविसर्जनाचा विधी तरी मिळेल. मी निलंग्याच्या स्टॅन्डवर पोचलो. सातारला थेट जाता येणार नव्हते. सोलापूरपर्यंत जावे आणि पहाटे सातारला गाडी आहे त्या गाडीने निघावे असे ठरवून सोलापूरच्या गाडीत बसलो. कार्यकर्त्यांना निरोप दिला. डोळ्यांपुढून चव्हाणसाहेबांची करुण मूर्ती काही हलत

नव्हती. त्यांचे सांत्वन मी कसे करावे? काय करावे? माझ्या डोळ्यांपुढून वेणूताई हलत नव्हत्या. त्यांच्याशी माझा फारसा संबंध आला नव्हता. पण जो काही आला त्यात त्यांनी ज्या आपुलकीने, मायेने पाठीवर थाप मारली होती ते हात आता पुन्हा पाठीवर फिरणार नव्हते. माझी जर अशी स्थिती तर साहेबांची स्थिती काय असेल? मी कल्पनाच करू शकत नव्हतो. मी पाहिलेल्या वेणूताई पुन्हा पुन्हा डोळ्यांपुढे उभ्या राहत. मी डोळे पुसत होतो. पुन्हा पुन्हा ते भरून येत होते. सौजन्यशीलता म्हणजे काय? सौजन्यशीलतेचे दुसरे नाव वेणूताई होते. साहेबांचा-माझा स्नेह तसा चार-दोन वर्षांचा, पण हे नाते वर्षानुवर्षांचे असावे तसे मायेने भरलेले होते. यशवंतरावांच्या अखेरच्या काळात मी त्यांच्यासोबत होतो. सूर्याची मावळतीची दिशा त्यांना फार आवडत असे. मावळतीचा सूर्य ही संकल्पना ते अनेक अर्थाने वापरीत असत. थकलेला सूर्य, वाकलेला सूर्य, निरोपताना ते नाते थेट त्यांच्यापर्यंत पोचत असे.

आपणा सर्वांना एकच सावली असते. ती चोवीस तास आपल्याबरोबर असते. सावलीशिवाय काहीच नाही. यशवंतरावांना दोन सावल्या होत्या. एक त्यांची स्वतःची आणि दुसरी वेणूताईंची. एक क्षणसुद्धा त्यांच्याशिवाय ते जगले नव्हते. तब्बल एक्केचाळीस वर्षे ही सावली चव्हाणसाहेबांबरोबर अहोरात्र सोबतीला होती. पतीवरील त्यांची अविचल श्रद्धा, निष्ठा, पतिपरायणता ही एखाद्या व्रतस्थासारखी. पातिव्रत्य म्हणजे वेणूताई. श्रद्धा, करुणा, सात्त्विकता, सौजन्यशिलता, सहनशीलता, मृदूता, प्रेमळपणा, आत्मीयता, चाणाक्षपणा, आत्मसंयम म्हणजे वेणूताई. राजकीय आणि खाजगी आयुष्यात यशवंतराव अनेकानेक कठीण प्रसंगांत वावरले. तेव्हा तेव्हा त्यांच्या पाठीमागे त्यांची ही सावली खंबीरपणे उभी राहिली. वेणूताईंचे असणं हाच मोठा आधार होता त्यांना. त्यांचा हात हातात होता तोवर हा माणूस कधी वाकला नव्हता. आता अचानकपणे हा हात सुटला होता. एका कर्तबगार पुरुषाच्या मागे एक स्त्री उभी असते हे निदान चव्हाणसाहेबांच्या बाबतीत तरी शंभर टक्के खरे होते. जन्माला येणाऱ्या प्रत्येकाचा प्रवास मृत्यूकडेच होत असतो हे सर्वज्ञात आहे. जन्माला आलेला प्रत्येक जीव मरणाकडेच निघालेला असतो. जन्म हा मृत्यूचाही जन्मच असतो. जन्मापासून मृत्यू बरोबरच प्रवास करीत असतो.

४१ वर्षांपैकी तीन तपांहून अधिक काळ वेणूताई आजाराशी झुंजत होत्या. साहेब भूमिगत असताना त्या प्रथम आजारी झाल्या. त्या अत्यवस्थ असतानाच पोलिसांनी यशवंतरावांना फलटणमध्ये अटक केली. वेणूताईंना त्यांचे थोरले दीर गणपतराव आणि त्यांच्या पत्नी भागीरथीबाई यांची सेवा करावी लागली. या

दोघांनाही क्षय रोगाची बाधा झाली होती. त्यांची सेवा करता करता वेणूताईंना क्षयरोगाची बाधा झाली. १९४२ साली त्यांना मिरजेच्या दवाखान्यात दाखल व्हावे लागले होते. त्या रोगातून त्या मुक्त झाल्या तरी तेव्हापासून कमीअधिक प्रमाणात त्यांना आजाराशी झुंज द्यावी लागली. असाध्य रोगाने त्यांची फुफ्फुसे अशक्त बनली. आणि त्यातून त्या दम्याच्या विकाराने हैराण झाल्या. साहेबांच्या कुटुंबाच्या अत्यंत कठीण काळात सारे चव्हाण कुटुंब ताईंच्या खांद्यावर पडले होते. नवरा कायम भूमिगत, घरात दीर जाऊ आजारी. आर्थिक स्थिती बेताची. यशवंतरावांनी आताच्या पुढाऱ्यांसारखी दौलत जमा केली नव्हती. तसला विचारही त्यांनी कधी केला नव्हता. आजारी असलेल्या पत्नीला मूलबाळ होणार नाही ही स्पष्ट कल्पना डॉक्टरांनी स्वतः चव्हाणसाहेबांना, वेणूताईंना दिली असताना आणि ताईंनी साहेबांकडे दुसरा विवाह करण्यासंबंधी त्यांचे मन वळवण्याचा प्रयत्न केला असतानाही साहेबांनी कधी असला विचार केला नाही. महाबळेश्वरच्या चाललेल्या शिबिरात त्यांचे मित्र आबासाहेब वीर यांनी अत्यंत खाजगीत चव्हाणसाहेबांना दुसरा विवाह करण्यासंबंधी गळ घातली तेव्हा चव्हाणसाहेब म्हणाले, तुम्हाला कोण म्हणाले मला मुलगा नाही. यावर आबा अवाक् झाले. यांना मूलबाळ आहे आणि आपल्याला माहीत कसे नाही? किसनवीरही सावलीसारखे चाळीस-पन्नास वर्षे साहेबांबरोबर होते. ते गोंधळल्याचे लक्षात घेऊन साहेब म्हणाले, आबा, मला मुलगा आहे आणि त्याचे नाव 'वेणू' आहे. या विषयाची चर्चा पुन्हा करायची नाही. जिने अत्यंत कठीण काळात माझी आई आणि माझ्या कुटुंबीयांना पाठच्या भावासारखे सावरले त्यांना सवत आणण्याची साधी कल्पनासुद्धा मी करू शकत नाही. यापुढे या विषयावर चर्चा करायची नाही. असे 'एक दुजे के लिये' बनलेले हे जोडपे होते.

सातारला पोचेपर्यंत माझ्या मनात असे विचार येत राहिले. दुसऱ्या दिवशी मुंबईला निघालो. आतासारखी चार-पाच तासांत मुंबई गाठता येत नव्हती. कधी दहा तास कधी पंधरा पंधरा तासही लागत असत. दुसऱ्या दिवशी रक्षाविसर्जनाचा विधी होता. मी आणि यल्लाप्पा वैदूगुरुजी धावतपळत स्मशानभूमीत पोचलो. चंदनवाडी स्मशानभूमीत बरीच गर्दी होती. राज्याचे सारे मंत्रिमंडळच उपस्थित असावे. राजकारणी, समाजकारणी, उद्योगपती, कार्यकर्ते, जीवाभावाचे मित्र. सारे चव्हाणसाहेबांचे सांत्वन करायला जमले होते. शैक्षणिक क्षेत्रापासून सर्व क्षेत्रांतील नामवंत मंडळी उपस्थित होती. मी व यल्लाप्पागुरुजी पोचलो तेव्हा चव्हाणसाहेब एका बाकावर विमनस्क स्थितीत बसले होते. चेहरा सुजला होता. डोळे सुजले होते. मी त्यांना पाहिले आणि त्यांचेकडे निघालो. साहेबांनी मला

पाहिले आणि स्वतः उठून माझ्याकडे येऊ लागले. लोक मोठ्या औत्सुक्याने पाहत होते. साहेब जवळ आले नि मिठी मारली. लक्ष्मण, बाई गेल्याहो, म्हणून माझ्या खांद्यावर डोके ठेवून रडू लागले. मीही रडत होतो. कोणत्या शब्दात सांत्वन करावे ते कळेना. मी त्यांना बाकावर बसवले. सारे मोठमोठे लोक कुजबुजत होते. कोण हा मुलगा? माझ्या गळ्यातली शबनम बघून मी कोणी राजकारणी तर वाटत नव्हतो. कुणीतरी नाव सांगितले. चर्चा हळू आवाजात सुरू होती. साहेब मला सांगू लागले. लंडनच्या संमेलनासाठी कोणाला काय बोललेत. मला ते संमेलन आणि इतर गोष्टी ते सांगत होते. पण डोळ्यांचे पाणी संपत नव्हते. असा मोडून गेला होता कणा साहेबांचा. अत्यंत हळव्या मनाचा माणूस आणि पत्नी ज्या वयात अत्यंत गरजेची होती त्याच वयात तिचा वियोग. आकाशच कोसळले होते.

साहेबांना धक्क्यावर धक्के बसत होते. त्यांचे अत्यंत विश्वासू म्हणून ज्यांनी वीस वर्षे चव्हाणसाहेबांचे स्वीयसाहाय्यक म्हणून काम केले होते आणि त्यांचे सूर जुळले होते असे डोंगरे नावाचे त्यांचे सचीव होते. त्यांचे या कुटुंबाशी फार स्नहाचे संबंध होते. मंत्री आणि सेवक या पलिकडे जाऊन ऋणानुबंध होते. चव्हाण कुटुंबीयांची सावलीसारखी राखण श्रीपाद डोंगरे यांनी केली होती. परस्परांबद्दल प्रचंड विश्वास, साहेबांना काय हवे आहे ते साहेबांच्या नजरेत पाहून डोंगरे समजून घेऊ शकत असत. ते डोंगरे गेले. साहेबांचे अत्यंत विश्वासू निकटवर्ती आबासाहेब वीर. ४२ च्या स्वातंत्र्यचळवळीत भूमिगत अवस्थेत असताना हे दोघे मैत्रीच्या धाग्याने बांधले गेले. राज्यात असोत की केंद्रात असोत, आबा साहेबांबरोबर राहिले. भल्याभल्या संकटकाळात आबा साहेबांच्या पाठीशी ठाम उभे राहिले. नजीकचे मित्र शत्रू म्हणून उभे राहिले आणि दूरचे शत्रू मित्र झाले. कडेलोटाचे प्रसंग उभे राहिले. त्या प्रत्येक प्रसंगात आबा त्यांच्या सर्व शक्तीनिशी उभे राहिले. आबा स्वभावाने फार कडक होते. कधी कधी याचा त्रासही साहेबांना सोसावा लागे. या दोघांची मैत्री फार घट्ट होती. ती तुटावी म्हणून अनेकांनी प्रयत्न केले पण या दोघांची मैत्री अतूट राहिली. साहेब सांगत, मी महाराष्ट्राचा देशाचा नेता असलो तरी सातारा जिल्ह्यात आबा माझे नेते आहेत. ते आबासाहेब वीरही गेले आणि ६ मार्च १९८३ रोजी तर त्यांच्यावर फार मोठी संकटाची कुऱ्हाड कोसळली. त्यांनी पोटच्या पोरासारखे ज्याचे लालनपालन केले तो त्यांच्या गणपतरावांचा धाकटा मुलगा डॉ. विक्रम याचे अचानक अपघातात निधन झाले. हे दुःख वेणूताई सहन करू शकल्या नाहीत. चव्हाण कुटुंबातला सगळ्यात कर्तबगार मुलगा. हा लहान असतानाच वडील आई गेली. त्यामुळेच या मुलाचे संगोपन वेणूताईंनी

केले होते. राजा या नावाने ताई त्याला बोलावीत. त्यामुळे तो सर्वांचा लाडका राजा झाला. तो डॉक्टर झाला. झोपडपट्टीत दवाखाना चालवू लागला. जातपात, गरीब–श्रीमंत असले काही भेद न पाळता त्याने समाजसेवेला वाहून घेतले. दोन मुले पोटाशी असताना अपघातात गेला. राजा गेल्यानंतर हे सारे कुटुंबच कोसळले. असे धक्क्यावर धक्के हे पतीपत्नी सोसत होते. ६ मार्च रोजी डॉ. विक्रमचे निधन झाले या दुःखातून ताई सावरल्याच नाहीत. दोन नातवंडे, तरुण सून त्यांचे दुःख सागरासारखे. त्यानंतर वेणूताई केवळ दोन महिने कशातरी जगल्या. १ जूनला त्या गेल्या. साहेबांचे सारे दोरच नियतीने कापून टाकले होते. अखेरचा बळकट धागा हातातून हात सोडवून गेला होता. वटवृक्षाचे कोसळणे होते ते. या दुःखातून ते कधी सावरलेच नाहीत. एक्केचाळीस वर्षे ज्या आधाराने चव्हाण कुटुंब आपली नौका हाकीत होते त्या नौकेचे शिड आता तुटून पडले होते. नावाडी नौका सावरू शकत नव्हता. त्याची सारी शक्तीच गळाली होती. त्याचे स्वत्व, सावली तो या गर्दीत शोधत होता. यशवंतरावांचा शोकाकुल चेहरा त्यानंतर अखेरपर्यंत शोकमग्नच राहिला. मनाचा हा कोपरा कदाचित भरून येण्यासारखा नव्हता. रक्षाविसर्जन झाले. त्यानंतर आम्ही अनेकवार अनेक प्रसंगांत भेटलो. पण वेणूताईंना एक क्षणभरही ते कधी विसरू शकले नाहीत.

वेणूताईंच्या निधनानंतरचे यशवंतराव सत्व नसलेल्या बियाणांसारखे जगले. दर पावलांवर त्यांना ताईंची आठवण येत असे. औषधे वेळेवर घेतली का? कोणते औषध कोणत्या खिशात ठेवले आहे, ते किती वाजता घ्यायचे आहे, ते घेतले की नाही? साहेब जगात कोणत्याही कानाकोपऱ्यात असोत वेणूताईंना सारा तपशील ठाऊक असे. औषधाची वेळ झाली की त्या स्वीय साहाय्यकाला लगेच सांगत. जेवणे, झोपणे, त्यांचे ग्रंथ, टिपणे, टाचणे, कपडे, बॅगा भरणे, कपड्यांचे इस्त्रीपासून सारे सोपस्कार त्या करीत. घरात काय लागते, काय लागत नाही, त्याच्या किमती काय असतात, कोणती वस्तू कुठे मिळते, यातले साहेबांना काही पाहावे लागत नसे. ते क्वचितसुद्धा बाजारात जात नसत. ते सारे काम ताईंचे. तो विभाग नातेवाईक, पैपाहुणे, कार्यकर्ते, मित्र, साहित्यिक, कुशल राजकारणी ज्या तऱ्हेने प्रश्न हाताळतो तसे वेणूताई सारे हाताळीत असत. साहेबांना काय हवे, काय नको किंवा आता आपला नवरा काय भूमिका घेईल याचा अचूक अंदाज त्या बांधीत असत. त्यावेळी कऱ्हाडला एक जातीय दंगल झाली होती. साहेब पार्लमेंटमध्ये होते. तेथील काम संपवून ते तात्काळ बाहेर पडले. घरी आले. ताईंना म्हणाले, काय काय झाले ते समजले का? ताई म्हणाल्या, हो. बॅग भरून तयार आहे. म्हणजे आता आपला नवरा काय करील याचा केवढा अंदाज त्या बरोबर बांधू

शकत! साहेबांनी राजकीय चर्चा करावी ती पहिल्यांदा वेणूताईंशी. अनेकांना वाटे या साध्या घर चालवणाऱ्या बाईला काय समजत असणार. त्या लोकांना हे कळत नाही की यशवंतरावांसारख्या असामान्य माणसाचे घर चालवणे, प्रपंच चालवणे म्हणजे काय पोरखेळ आहे? बावन्न आणि सत्तावन्नच्या निवडणुका तर ताईंनीच बरोबर जाऊन प्रचार करून जिंकल्या होत्या. फार मोठा विरोध या काळात होता. सारे संयुक्त महाराष्ट्राचे वारे होते. त्या तुफानात साहेब तरले. त्या भाषणे करीत नसत. घरोघरी जाऊन प्रचार करीत. महिलांचे संघटन करीत. आज साध्या सरपंचाची बायको सरपंच असल्याच्या तोऱ्यात वागते. पण वेणूताई कधीही तशा वागल्या नाहीत. राजकारण असो की प्रशासन, त्यांनी कधीही अपवाद वगळता हस्तक्षेप केला नाही. पैशापाण्याच्या, प्रसिद्धीच्या मागे पळाल्या नाहीत. यासाठी फार मोठ्या संयमाची गरज असते. तो संयम, ती निरपेक्ष वृत्ती असणे हे सामान्य माणसाचे काम नाही. त्यासाठी फार मोठे मन लागते. माझ्यापुरते सांगायचे तर माझ्यासाठी पेढे वाटणारी ही माऊली अनंतात विलीन झाली होती. तिच्या ऋणातून मुक्त होणे सोपे नाही. आणि मातेच्या ऋणातून मुक्त होताही येत नाही. साहेब दुःखसागरात बुडाले ते कायमचे. या दुःखातून तेही सावरूच शकले नाहीत. जरामरण यातून सुटला कोण प्राणीजात असे ग.दि.मा. म्हणाले, ते काही खोटे नाही.

ती. सौ. वहिनींना, बाबांना सप्रेम जयभीम.

तुझा,

लक्ष्मणकाका

दिनांक ०१/११/२०१२

चि. सुप्रिया,

सप्रेम जयभीम.

'जनावरांना न्याय, माणसांचं काय?', 'चिमणीला कोठं, सापाला वारूळ, गुरांना गोठा, माणसाला घर कुठाय?', 'भिक नको, उपकार नको. माणुसकीचा हक्क हवा', 'आम्हांला न्याय मिळालाच पाहिजे, घटनेचे संरक्षण मिळालेच पाहिजे', 'हम सब एक है' अशा घोषणांनी सारं आभाळ भरून गेलं होतं. चारपाच हजार स्त्री-पुरुष, लहान मुलं, त्यांची गाढव, डुकरं, बैलं, लहानमोठी सारी घोषणा देत उभी होती. शिवाजी नगरच्या मराठा प्रिपरेटरी स्कूलच्या समोरच्या रस्त्यावर जवळच महानगरपालिकेचे ऑफिस होते. घोषणा टिपेला गेल्या होत्या. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री वसंतदादा पाटील, आठव्या वित्त आयोगाचे अध्यक्ष यशवंतराव चव्हाणसाहेब कार्यक्रमाला उपस्थित होते. सारा रस्ता ब्लॉक झाला होता. पोलिसांच्या शिट्ट्या, धावपळ सुरू होती. रस्त्यावरले लोक पोलिसांना आवरत नव्हते. 'जागा आमच्या हक्काची, नाही कुणाच्या बापाची.' लोक आक्रमक होवू लागले. महिला आघाडीवर होत्या.

सुप्रिया, इंग्रज सरकारने १८७१ साली गुन्हेगार जमाती कायदा केला. जन्मजात गुन्हेगार म्हणजे माणूस जन्माने जसा अस्पृश्य असतो तसाच माणूस जन्माने गुन्हेगार असतो, असे या कायद्याचे गृहितक होते. ते कितीही अमानवी असले तरी इंग्रजांनी जिप्सींचा प्रश्न जसा युरोपात सोडवला होता तसाच घेट्टो निर्माण करून इथल्या आदिवासी जमातींचा बंदोबस्त करायचा होता. माणूस कायद्यापुढे मी गुन्हेगार आहे असे म्हणाला म्हणजे तो गुन्हेगार. त्याच्या मागच्या पिढ्या गुन्हेगार आणि त्याच्या पुढच्या पिढ्याही गुन्हेगारच असणार, असे गृहीत धरून आदिवासींचे उठाव मोडून काढण्यासाठी त्यांना या कायद्याने गुन्हेगार ठरवले. एका राज्यातील जमाती दुसऱ्या राज्यात नेऊन त्यांच्या स्वतंत्र सेटलमेंट्स वसाहती केल्या. तीन तारांच्या कंपाउंडमध्ये त्यांना डांबण्यात आले. बायापोरांनिशी चोवीस तास त्यांच्यावर निगराणी ठेवली. दिवसातून तीन वेळा आणि रात्री तीन वेळा हजेरी

लावायला लावली. आणि त्यांच्या खाजगी जगण्यावर अमानवी बंधने आणली. १९११ पर्यंत या जमातींना अत्यंत क्रूरपणे वागवले गेले. नंतर त्यांच्या शाळांची व्यवस्था झाली. पुरुषाला सहा रुपये आणि स्त्रीला तीन रुपये, मुलांना एक रूपया असे अनुदान होते. त्यांच्या प्रशिक्षणाची स्वतंत्र व्यवस्था होती. कामगार म्हणून कापड गिरण्यांमध्ये त्यांना नोकरी मिळत होती. इंग्रजी बोलणारी सासू या सेटलमेंटमध्ये होती तर स्वातंत्र्यानंतर जन्माला आलेली तिची सून अंगठाबहाद्दर होती! इंग्रजच दयाळू होते असे म्हातारे लोक बोलतात. देश स्वतंत्र झाला. इंग्रजांनी सर्वोदय हौसिंग सोसायट्या आणि सर्वोदय सहकारी फार्मिंग सोसायट्या करून अक्षरशः हजारो एकर जमिनी या लोकांच्या पुनर्वसनासाठी ठेवल्या होत्या. स्वातंत्र्यानंतर चोर लोकांच्या त्याच जमिनी मोठ्या चोरांनी पळवायला सुरुवात केली. हे अडाणी अंगठाबहाद्दर चिरीमिरी चोरत, तर हे शिकलेसवरलेले दरोडेखोर हजारो एकर जमिनी चोरत होते. निमित्त झाले पुणे शहरात रस्त्यात बसणारी गुरे, वाहतुकीला अडथळा करणारी मोकाट जनावरे झाले! महापालिकेने ठराव केला आणि मुंढवा सेटलमेंटच्या २२५ एकर जमिनीवर पुणे शहरातल्या जनावरांचे गोठे करण्याचा प्रस्ताव पास केला. ही सेटलमेंटच्या मालकीची शेतजमीन गुरांच्या गोठ्याला संपादन केली. शासनाने त्याला तात्काळ मान्यता दिली. वस्तुतः या जमिनी हस्तांतरीत होत नव्हत्या. पण सरकारनेच ठरवल्यावर काय करणार? या जमिनींच्या मालकीचा लढा आम्ही भटक्याविमुक्तांच्या संघटनेच्या वतीने लढत होतो. मोर्चे, मेळावे, परिषदा चालू होत्या. मुख्यमंत्री पुण्यात होते म्हणून हा मोर्चा आम्ही मुख्यमंत्र्यांच्या कार्यक्रमाच्या जागेवर आणला होता. आम्हाला गेटवरच अडवले होते. कार्यक्रमात दादांसोबत चव्हाणसाहेबही होते. हा सारा प्रश्न त्यांना माहीत होता. या सर्व जमिनी सेटलमेंटच्या तारा तोडतानाच १९५२ साली चव्हाणसाहेबांनी या जमातींना कायद्याच्या मालकीने सहकारी तत्त्वावर सोसायट्या करून दिल्या होत्या. पोलिस गेटवर आले. पाच लोकांना शिष्टमंडळ घेऊन बोलावले आहे. आम्ही आठ-दहाजण शिष्टमंडळ घेऊन मुख्यमंष्यांना भेटायला गेलो. कार्यक्रम संपवून मुख्यमंत्री चहासाठी बसले होते. निवेदने देणाऱ्यांची गर्दी रेटारेटी सुरू होती. दादांभोवती माणसांचा गराडा पडला होता. चव्हाणसाहेबांनी हातानेच मला जवळ बोलावले. निवेदन घेतले वाचले. दादांना सांगू लागले, 'दादा हे माझे तरुण मित्र, लक्ष्मण माने.' दादा काही लक्ष देईनात. साहेब पुन्हा पुन्हा सांगत होते. त्यांचा अवमान होतोय हे लक्षात आले. आणि मी माझ्या स्वभावानुसार आक्रमक झालो. मुख्यमंत्र्यांच्यासमोर घोषणा सुरू केल्या. घोषणा मुख्यमंत्र्यांच्या विरोधाच्या होत्या. दादांनी घोषणा थांबवायला लावल्या. मी संतापलो होतो. आम्हाकडे

बघायला तुम्हाला वेळ नाही, पण यांच्याकडे तरी पाहा. ते तुमचे ज्येष्ठ नेते आहेत. त्यांचा अवमान करता? दादा ताडकन उभे राहिले. माझी-त्यांची बाचाबाची सुरू झाली. चव्हाणसाहेबांनी मला हाताला धरले आणि बाहेर नेले. गोंधळ थोडा कमी झाला. साहेबांनी मला शांत केले.

अरे, मोर्चा काढला तर यांना एवढा राग कशाला यायला पाहिजे? आम्ही सभ्यतेनेच बोलत होतो ना?

साहेबांनी माझा हात धरून मला गेटवर आणले. समोर मोर्चेकरी उभे होते. साहेबांना बघितले आणि सारे शांतपणे रस्त्यावर बसले. साहेब बोलू लागले. सारा मोर्चा शांत झाला.

''तुम्हाला या प्रश्नासाठी मोर्चा काढावा लागला. तुमची स्वतःची जमीन आहे. ती मीच त्यावेळी दिली आहे. साऱ्या सेटलमेंटच्या जमिनी तुमच्याकडेच राहतील यात मला शंका नाही. आता शासनाने काय केले आहे ते मी पाहतो. जनावरांचे गोठे तेथे होणार नाहीत, तुम्ही काळजी करू नका. मी संबंधितांशी बोलतो. जमीन जायला लागली तर मी तुमच्यासोबत राहिन.'' टाळ्यांचा कडकडाट झाला. मुख्यमंत्र्यांनी पोलिसांकरवी पुन्हा निरोप दिला पण आता आम्हाला जायचेच नव्हते. सरूबाईने आभार मानले. ती साहेबांना म्हणाली, ''साहेब, तुमाला कळवळा आला. उन्हात हिथं तुमी आला. पर चौगुल्याला पाटीलकी दिली म्हण काय राजा होता येत का? ज्याचं जळतं त्याला कळतं. आमचं पॉट दुखतया म्हण आम्ही बोंबलतुया. तेवढं दादास्नी सांगा की, सरूबाई अशा मैंदाळ्या टाळ्या मिळवून भाव खाऊन गेली. साहेब गाडीत बसून गेले. मला 'संध्याकाळी या' असे सांगून जायला विसरले नाही.

मी मोर्चाची निरवानिरव केली. संध्याकाळी साहेबांच्या चतुश्रृंगी येथील घरी त्यांना भेटलो. साहेब सांगत होते. मुख्यमंत्री असताना मुंढवा सेटलमेंटच्या जमिनीच्या वादातून एकाचा खून झाला होता. सारेच अडाणी. फार्मिंग सोसायटी करून दिली. जमिनी कसण्याची तयारीच नव्हती. जमीन पडून होती. कुणी कशी कसावी? मनगटाच्या ताकदीवर ठरू लागले. रामा शेटीप्पा नावाचा कार्यकर्ता होता. त्याने माझ्यापुढे खूप गोंधळ घातला. मी शांतपणे जमिनीचे पट्टे करून देण्यासंबंधी प्रशासनाला सांगितले होते. हजारो एकर जमिनी होत्या. काय स्थिती आहे आज तिथली? साहेबांनी मला विचारले.

साहेब, महसूल खात्याकडे गेल्या. काही समाजकल्याणकडे गेल्या. काही जमिनी खाजगी लोकांनी लाटल्या. विसापूर, उंदीरगाव, दरेगाव या जेलच्या सेटलमेंट जमिनी हजारो एकर होत्या. त्या अक्षरशः पुढारी मंडळींनी लाटल्या. सोलापूरच्या

साडेचारशे-पाचशे एकरांतल्या सर्व जमिनी, इमारती लोकांनी लुटून नेल्या.

साहेबांचा चेहरा पडला होता. मी नेहरूंना शब्द दिला होता. अनेकदा वाटते, अजून पाच-दहा वर्षांचा काळ मिळाला असता तर हे पेंडिंगला पडलेले प्रश्न नक्की मार्गाला लागले असते. लक्ष्मण, सत्ताधारी बदलले की धोरणे बदलतात. आधीच्या शासनाने घेतलेले निर्णयही बदलतात. थाडे कमिशनचे हे काम होते. शासकीय मालकीच्या जमिनी होत्या. योग्य नियोजन करून त्यांचे पुनर्वसन करायचे होते. मी सोसायट्या केल्या होत्या, त्याही हातोहात चोरीला गेल्या असे दिसते.

साहेब, कोल्हापूरला राजर्षि छत्रपती शाहू महाराजांनी साडेतीनशे एकर जमीन दिली होती. त्यातली बरीच जागा कंजारभाट, माकडवाले, पारधी, कैकाडी या गुन्हेगार जमातींना दिली होती. त्या जागेवर आपण शिवाजी विद्यापीठ केलेत.

कोणती, सागरमाळाची जमीन म्हणता?

होय साहेब.

माझ्या आठवणीप्रमाणे, लक्ष्मण, तेवढीच जागा या लोकांना उचगावच्या माळावर मी द्यायचा प्रस्ताव केला होता. त्याचे काय झाले हे मला आता माहिती नाही. पण आपण त्यांना पर्यायी जागा दिली असे आठवते.

होय साहेब, पारधी कंजारभाटांनी ती जमीन मिळवली. काही जागेत शांतीनगर ही पारधी वसाहत आहे आणि १८० एकर जमीन शेतजमीन आहे. ती या लोकांच्या वहिवाटीत आहे.

चला, बरे झाले. तुम्हीही यात लक्ष घातलेत. छान! आता आपले पुढारी तालुका पुढारी झालेत. राज्याचे नेतृत्व करायचे तर माहिती हवीच. सेटलमेंटच्या जमिनी, मालतीबाई बेडेकर यांची आठवण ते सांगत होते. मालतीबाई बेडेकर सेटलमेंट स्कूलवर सुपरिटेंडंट होत्या. त्यांनी मला ही आठवण सांगितली होती. त्या या गुन्हेगार जमातींच्या वसाहतीतच राहायच्या सुपरिंटेंडेंट म्हणून. एकदा सायंकाळी बाई रेल्वेच्या रूळांच्या कडेने फिरावयास गेल्या होत्या. तिन्हीसांज झाली. त्यांनी मागे वळून सहज पाहिले. तर त्यांच्यामागे एक काळा कुळकुळीत धिप्पाड माणूस हळूहळू चालत येत होता. बाई घाबरल्या. जवळपास कुणीच नाही. वेळ तिन्हीसांजेची. हातपाय गार पडले, पायच उचलेना. तो माणूस मागेही जाईना, पुढेही जाईना. उभा राहिलेला. बाईंनी धाडस केले. चालू लागल्या. तसा तोही चालू लागला. आता मात्र बाई फारच घाबरल्या. घाम फुटू लागला. काय करावे? त्या भरभर चालू लागल्या. तोही भरभर चालू लागला. त्यांनी धाडस करून कोण आहे? म्हणून विचारले. तसा तो जवळ येत म्हणाला. 'बाई, मी रायाप्पा गायकवाड.' अरे, तुम्ही होय! मी किती घाबरले. तो माणूस म्हणाला,

'बाई, उशीर झाला, मी तुमच्या मागं मागं आहे. अंधारात तुम्ही कुठं निघालात एकट्या! आमची माणसं तुम्हाला ठावं हाय नव्हं. मग मला पंच म्हणाले, पोरगी तरुण आहे. तू मागं मागं जा. म्हणताना राकनीला पाठविले.'

लक्ष्मण, 'बळी' वाचलीत की नाही? मला तरी 'बळी'मुळेच सेटलमेंटचा प्रश्न समजला.

मी 'बळी' वाचल्याचे सांगितले. मी म्हणालो, साहेब एवढे केव्हा वाचता? एवढ्या व्यापात?

लक्ष्मण, कामासाठी काही वाचावे लागते. काही आपल्या मनाची मशागत करण्यासाठी वाचावे लागते. करमणूक म्हणून मी काही वाचत नाही. यातील ग्रंथ बाजारात आले की मी ते मागवून घेतो. मग क्रमाने, माझ्या सोयीने ते वाचत जातो. सावकाशीने वाचतो.

साहेब, हा प्रश्न तुम्ही असतानाच सुटला असता. आता याचा सीमा प्रश्न झालाय.

नाही लक्ष्मण, तसे होणार नाही. मी आहेना तुमच्या बरोबर. हा राहून गेलेला प्रश्न आहे. सीमाप्रश्नाची गोष्ट वेगळी आहे. हा वंचितांना न्याय देण्याचा प्रश्न आहे.

साहेब हसतहसत उठले. कपाटातील पुस्तक काढले. ते युरोपातील घेट्टोमधील कुणा लेखकाच्या काही अनुभवावर आधारलेले होते. मला आठवत नाही. ते किती चौफेर वाचत हे लक्षात आले.

सुप्रिया, मी दैववादी नाही, पण मनात सतत सल टोचत राहतो. पुन्हा बाबासाहेब, शाहू महाराज, म. जोतिराव फुले, यशवंतराव होतील काय? उत्तरही मला माहिती आहे. पण आजची उतरती कळा पाहून अशी अपेक्षा करावी अशी स्थिती नाही. प्रत्येकाला आपले पडले आहे. कुणाला वंचितांच्या चिंता आहे? वंचितांना न्याय द्यायची कुणाची तयारी आहे. सुसंस्कृतपणा, सभ्यपणा, चांगुलपणा ही मूल्ये कालबाह्य झाली आहेत. माणूस माणुसकीला पारखा झाला आहे. राजा सोन्याचा आणि कान पितळेचे असे आपल्या राज्यकर्त्यांचे नि संसदीय लोकशाहीचे झाले आहे. अत्यंत हलक्या कानाचे, हलक्या मनाचे, हलक्या वकुबाचे लोक हलकेच असणार. पैशाने तालीवार असणे आणि मनाने तालीवार असणे यात फार मोठा फरक आहे, नाही?

ती. सौ. वहिनींना, बाबांना सप्रेम जयभीम.

तुझा,<br>
लक्ष्मणकाका

दिनांक ०५/११/२०१२

चि. सुप्रिया,

सप्रेम जयभीम.

त्या दिवशी सकाळी सकाळी अप्पासाहेबांचा माणूस दारात उभा. तुम्ही आहात का? आमचे साहेब येणार आहेत.

'का, काय काम काढलेत? आज तर रविवार आहे. बँकेला सुट्टी आहे ना?

हो, मला साहेबांनी आपण आहात का पहायला सांगितले आहे. ते भेटायला येणार आहेत.

मी घरी असल्याचे अप्पासाहेबांना कळवले. १०-१०:३० वाजता अप्पासो भोसले आले. मला म्हणाले, दुपारी चव्हाणसाहेब सातारला पोहोचतील. त्यांना तुमचा गवडी प्रकल्प पाहायचा आहे.

मला आश्चर्यच वाटले. आणीबाणीच्या काळात खाजगी सावकारीविरुद्ध आणीबाणीतल्या वीस कलमी क्रार्यकमाचा फायदा घेत समाजवादी युवकदलाने खाजगी सावकारीविरुद्ध चळवळ केली होती. गवडी, ता. सातारा येथली मागासवर्गीयांची जमीन सावकारीतून सोडवली होती. गावाचा मोठा विरोध होता. तरीही आबासाहेब वीरांनी आम्हाला पाठबळ दिले. बँकेतले अधिकारी आणि त्या भागातले मोठे नेते बबनराव बडदरे यांना सोबत दिले. शेतकऱ्यांना सांगून आबांनी ट्रॅक्टर दिले. आम्ही मागासवर्गीयांच्या शेतजमिनी वहिवाटीखाली आणून सावकारीतून मुक्त केल्या. त्या काळात अप्पासाहेबांनीही मोठी मदत केली होती. त्या जमिनींची आताची स्थिती काय आहे, आज त्यात काय पिकते आहे, हे खरे तर मलाही माहीत नव्हते. मी तसे अप्पासाहेबांना म्हणालो. ते हसले आणि म्हणाले, अहो, तोच तर प्रश्न आहे. आज काय तेथे आहे ते पाहायचे आहे. या सर्व काळात साहेबांचे दिल्लीतून लक्ष होते. का, कशी त्यांना या प्रकल्पाची आठवण झाली, माहीत नाही. त्यांचा काल निरोप आला. म्हणून आपण जागा पाहायला जायचे आहे आणि आणखीही काही जागा पाहायच्या आहेत. साहेबांना तुम्हांला

काहीतरी संस्था करून द्यायची आहे, असे ते म्हणत होते.

आता माझी ट्यूब पेटली. भटक्याविमुक्तांच्या शिक्षणासाठी संस्था स्थापन करायची हे ठरले होते. साहेब जागा शोधायला लागले होते. आता मला मनाने तयार व्हायला लागणारच होते. दुपारपर्यंत आम्ही सर्वत्र जागा शोधल्या. बँकेचे काही अधिकारी, तलाठी, तहसिलदार बरोबर होते. सारखळ, गवडीची जागा पाहिली. डेव्हलपमेंटला मोठा खर्च आला असता. दुसरी जागा राष्ट्रीय महामार्गावर रस्त्याला लागून पाहिली. लिंब खिंडीत आता तिथे रयत शिक्षण संस्थेचे इंजिनीअरिंग कॉलेज झालय ना त्याचवेळी त्या जागेच्या समोर रस्त्याच्या कडेला डोंगर आहे. ती जागा प्रशासनाने सुचवली. नुसता डोंगर, अप्पासाहेब म्हणाले. लक्ष्मणराव जागा चांगली आहे पण डेव्हलपमेंटला मोठा खर्च येईल. माळवाडीला आणखी जागा आम्ही पाहिल्या. काही ना काही अडचणी होत्या. आम्ही परतलो.

साहेब सातारला सर्किट हाऊसला आले. वेणूताई गेल्यानंतर ते पहिल्यांदाच सातारला आले होते. त्यांचा अत्यंत उदास, करुण चेहरा अंगावर काटा आणीत होता. ते नॉर्मल होण्याचा प्रयत्न करीत होते. हसून माझे स्वागत केले. जवळ येऊन बसले. अत्यंत हळव्या मनाचा हा माणूस. शशीची, मुलांची चौकशी केली. आईवडिलांची चौकशी झाली. डॉ. विजय मोहिते यांनी साहेबांची प्रकृती तपासली. त्यांच्याशी काही बोलले. बी.पी. नॉर्मल होते. गोळ्या वेळेत घ्यायला हव्यात असे ते म्हणाले. साहेबांच्या डोळ्यांच्या धारा थांबत नव्हत्या. ४० वर्षे हा प्रश्नच कधी पडला नव्हता. वेणूताई औषधांची वर्गवारी करून, कुठल्या गोळ्या किती वाजता घ्यायच्या त्याच्या स्वतंत्र पुडया करून जाकीट, कोट, शर्ट, यांच्या खिशांत ठेवीत. पुडी उघडली की गोळी वेळेत घ्यावी लागे. आता स्वतःला गोळ्या घ्याव्या लागत. त्या वेळा पाळता येत नसत. त्याची आठवण झाली की साहेब लहान मुलांसारखे रडत. क्षणात सावरले आणि बॅगेतले काही कागद काढले. भारतीय भटकेविमुक्त विकास संशोधन संस्था, सातारा या नावाने टाईप केलेले काही कागद माझ्याकडे दिले. 'वाचून पाहा. संस्थेच्या घटनेचे टिपण आहे. ध्येय, उद्दिष्टे तुम्हाला लिहावी लागतील. तुम्हाला हवी असतील ती माणसे घ्या. पदाधिकारी, त्यांची कर्तव्ये, निवडणुका यासंबंधी सारे मी लिहिले आहे. वाचून पाहा. पुन्हा बसू. बाबांशी बोला. रजिस्ट्रेशन करून घ्या. तात्पुरता अध्यक्ष कुणाला तरी करा. सह्यांसाठी अडायला नको. मी आहेच.' मे.पु. रेगे, व.द. देशपांडे, अनिल अवचट, डॉ. नरेंद्र दाभोळकर, प्र.ना. परांजपे, किशोर बेडकिहाळ अशा नावांची यादी झाली. अप्पासाहेब भोसल्यांनी आम्ही पाहिलेल्या जागा सांगितल्या. साहेब म्हणाले, शक्यतो कराड-सातारा रोडवर किंवा पुणे-सातारा रोडवर चालेल.

मला सहजपणे संस्थेत जाता येईल अशी जागा शोधली पाहिजे. पाहू, शक्य तेवढ्या लवकर जागा शोधली पाहिजे. इतर गप्पा सुरू झाल्या.

आम्ही शक्यतो ताई हा विषय निघणार नाही असे बोलत असू. पण तो विषय काही त्यांच्या मनातून जात नसे. परवा एकदा असे झाले. लक्ष्मण, ४० वर्षांत मी मंडईतच गेलो नव्हतो. त्याअगोदरही क्वचितच गेलो असेन. पण भाजीवालीशी भाजीसाठी कधी बोलल्याचे आठवत नाही की किराण्यावाल्याशी कधी हुज्जत घातल्याचे स्मरत नाही. मला घरातल्या लोकांनी एवढे लाडावून ठेवले होते, की रूमालापासून पायातील पादत्राणांपर्यंत मी कधी काही घेतले नाही स्वत:साठी. सारे वेणूबाई पाहत. नातेवाईक असोत की पैपावणे असोत. जाणारे-येणारे असोत. काय करायचे हा प्रश्न मला कधीच पडला नाही. घरातल्या काम करणाऱ्या माणसांचे सुद्धा सारे दुखलेखुपले त्याच पाहत. त्या गेल्याने घर उघडे पडले. परवा घरातल्या माणसाने तांदळासाठी पैसे मागितले. वीस वर्षांत त्याला पैसे मी कधी दिले नव्हते. मी घरातून २० रुपयांची नोट आणून दिली. त्याने मान खाली घालून घेतली. बाहेर गेला, रडत उभा राहिला. बराच वेळ गेला. दुसरा आला. म्हणाला, सर्व्हंट रडतो आहे. मी त्याला आत बोलावले. तो म्हणाला, साहेब, कसं सांगू? एवढ्या पैशात १ किलो तांदूळ मिळेल. मी खजिल झालो. घरात जाऊन २००० रुपये आणून दिले. काय आहे लक्ष्मण, अशा गोष्टींसाठी मला कधी लक्षच घालावे लागले नाही. सोन्याचे मंगळसूत्र केवढ्याला मिळते असे मी त्यांना विचारीत नसे. बॅग भरणे, कपडे शिवून आणणे, मी कधी केले नाही. मधूनमधून डोळे पुसण्याचा कार्यक्रम सुरू होता.

डॉ. मोहिते त्यांचे एक मित्र. साहेबांची परवानगी घेऊन गेले. अप्पासाहेबही काही कामासाठी विचारून गेले. आम्ही दोघेच बोलत बसलो. कुणाचीतरी ते वाट पाहत होते. संस्था कशी चालवावी लागेल, ती भटक्याविमुक्तांसाठी आहे हे लक्षात घ्या, कामाची माणसे जवळ ठेवा. नुसत्या चर्चा नकोत. सारे एकहाती आहे. सारा कारभार तुम्हाला करायचा आहे. आम्ही सच्चे मित्र आहोत. संशोधनासाठी फार काम आहे. मी डी.डी. नरूला नावाचे आय.सी.एस.एस.आर. या दिल्लीतल्या संस्थेचे प्रमुख आहेत त्यांना पत्र लिहितो. नरसिंहराव मानव संशोधन खात्याचे मंत्री होते, त्यांना लिहितो. संशोधन प्रकल्प तयार करा. तो कसा करायचा ते सांगतो. बसा असे, खुर्ची इकडे घ्या. मी जरा पडतो. मला थिसीस अँटी थिसीस सारे सांगितले. प्रश्नावल्या करणे, भरून आणणे हे सारे सांगू लागले. संशोधन पद्धतीबद्दल मी पहिल्यांदाच ऐकत होतो. भटक्याविमुक्तांचे संशोधन करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. आदिवासींच्या अनेक जमातींचा अभ्यास झालाय, मात्र

या जमातींचा राहून गेलाय. तो झाल्याशिवाय राज्यकर्त्यांना, अभिजनवर्गाला ते समजणार कसे? साहेब मला तळमळीने समजावीत होते. मी भारावून गेलो होतो. या जबाबदाऱ्या साहेब माझ्यावर टाकत होते. माझ्या बापजन्मात संशोधन हा शब्दसुद्धा कुणी ऐकला नव्हता. मला ते करायचे होते. पण साहेब होते ना बरोबर, त्याने धीर येत होता. बघता बघता साहेबांचा डोळा लागला मी तसाच बसून राहिलो. थोड्या वेळाने प्रतापराव भाऊ कुणाला तरी घेऊन आले. आवाज आल्याबरोबर साहेब पटकन उठून बसले. लक्ष्मण, डोळा लागला वाटते. दारावरची बेल वाजली. मी दार उघडले. भाऊ आत आले. साहेब उठले. तुम्ही आहात होय, मग काय साहेबांना छान कंपनी मिळाली. मी उभा होतो. भाऊ म्हणाले, बसा, बसा. साहेब आतून आले ते तयार होऊन. चला प्रतापराव, लक्ष्मण, कागदं वाचून घ्या. पुढच्या आठवड्यात पुण्यात भेटू. मी निरोप देतो तुम्हाला, म्हणाले नि विषय न वाढवता बाहेर पडले. मी कागदांची पिशवी घेतली. मीही बाहेर पडलो.

त्यानंतर दोन-तीन वेळा आमच्या बैठका झाल्या. संस्थेची घटना तयार झाली. २ ऑक्टोबर १९८३ रोजी संस्था रीतसर धर्मादाय आयुक्तांकडे नोंदली गेली. भारतीय भटकेविमुक्त विकास व संशोधन संस्था, सातारा ही संस्था भटक्याविमुक्तांसाठी काम करणारी शिक्षण संस्था स्थापन झाली. आपल्या विद्यापीठाच्या अनेक उणिवा साहेब मला सांगत होते. संशोधन पद्धतीतील करायची कामे, संशोधन पद्धती ते कितीतरी वेळा मला सांगत होते. त्यावेळी काय शिक्षणाचे करायचे पण आश्रमशाळा हा विषयही कधी निघाल्याचे आठवत नाही. संशोधन संस्था असेच स्वरूप त्यांना अपेक्षित होते. संस्थेची ध्येयउद्दिष्टे मी लिहिली. किशोर बेडकिहाळ व मी सुरुवातीला हे काम करीत होतो. डॉ.दाभोळकरांना पहिले अध्यक्ष म्हणून निवडले. संस्था रजिस्टर झाल्यावर साहेबांचे संमतीपत्र आले आणि संस्थेचे अध्यक्ष यशवंतरावजी चव्हाण झाले. परंतु काही वैचारिक मतभेदांमुळे डॉ.दाभोळकर, किशोर बेडकिहाळ संस्था सोडून गेले. मी आणि माझे सहकारी काम करीत राहिलो. जातवार कार्यकर्ते प्रशिक्षण शिबिरे सुरू केली. संशोधन प्रकल्प तयार झाला. आता त्याला आर्थिक साहाय्य हवे होते. 'बंद दरवाजा' पुस्तकरूपाने आणायचे होते. 'ग्रंथाली'ने प्रकाशित करण्याचा निर्णय घेतला. मी सारी जुळवाजुळव सुरू केली. निवडणुकांचेही नगारे वाजू लागले होते. साहेब पुन्हा निवडणुकांमध्ये गुंतणार होते. संस्था सुरू झाली तरी साधे पाय ठेवायला जागा नव्हती. बँकेत खाते उघडण्याची साधी प्रक्रिया मला माहीत नव्हती आणि आम्ही संशोधन करणार होतो! साहेबांचे अनुदानासाठी प्रयत्न करणे सुरू

होते. काही मित्रांना मी चव्हाणसाहेबांबरोबर काम करीत असल्याचे मान्य नव्हते. त्यांचा एक लाडका सिद्धांत होता. रचनात्मक कामात माणसे गुंतून गेली की ती संघर्ष विसरतात. त्या कामात गुंतून पडतात. लक्ष्मणला संघर्षाच्या कामातून यशवंतराव बाहेर नेत आहेत. तो आता संपला. सारी भ्रष्टाचाराची संस्कृती काँग्रेसवाल्याबरोबर येईल आणि आता आपल्यासारख्यांनी इथे थांबून उपयोग नाही. असे म्हणून ते बाहेर पडले. खरे तर आता यशवंतराव थकले होते. वेणूताईंच्या जाण्याने खचले होते. ते माझ्यासारख्या उपेक्षित समाजातल्या माणसाबरोबर काम करणार होते. याचा आनंद होण्याऐवजी मित्रांना त्यात राजकारण दिसू लागले. त्यांचा आणि माझा कैक वर्षांचा संबंध त्यांनी संपवला, मीही संपवला. आमच्या वाटा वेगळ्या झाल्या. मी तसा साताऱ्यात एकटा झालो. बाकी सारे बाजूला गेले. मी चव्हाण साहेबांना अध्यक्ष केल्याने अनेकांना ते रुचले नाही. न बोलता, न भांडता ते वेगळे झाले हेच खूप झाले.

अनेक प्रसंगी साहेबांना भेटत होतो. साहेबांचे मित्र अनंतराव कुलकर्णी, मी आणि साहेब खिंडीतल्या गणपतीला गेलो होतो. मी कधी देवळात जात नसे. ते दोघे गेले देवदर्शन करून परत आले. येताना जकातवाडीतल्या बोगद्याजवळ आलो. अनंतरावांनी गाडी थांबवायला सांगितले. यशवंतराव, लक्ष्मणच्या कामाला ही जागा कशी वाटते बघा. साहेब खाली उतरले. बोगद्यासमोरच्या कट्ट्यावर आम्ही तिथे उभे राहिलो. समोर तीन ओढे असलेली तीव्र उताराची जमीन होती. साहेबांनी मावळतीकडे पाहिले. मावळतीला सज्जनगड, उगवतीला अजिंक्यतारा, क्या बात है! अनंतराव मिळाली; जागा मिळाली, काय लक्ष्मण कशी आहे जागा? मलाही फार आवडली. पाच-दहा सुबाभळीची झाडे, पाच-दहा निलगिरीची झाडे, बाकी सारा उजाड माळ. साहेबांना जागा खूप आवडली आम्ही सर्किट हाऊसला आलो. साहेबांनी प्रतापराव भाऊंना बोलावले. तेही रेस्ट हाऊसमध्ये होते. ते भाऊंना म्हणाले, प्रतापराव, तुम्ही मंत्री आहात. आम्हाला जकातवाडीतली राज्यशासनाची जागा पाहिजे आहे. मी लगेच पत्र देतो. झाले, प्रतापरावांनी जागा देण्याचे मान्य केले. साहेबांनी जिल्हाधिकारी सातारा यांना जागा मागणी करणारे पत्र लिहिले. सातबाराचा उतारा, नकाशा जोडला नि सारी फाइल तयार करून प्रशासनाला दिली. साहेब फार समाधानी दिसले. ते त्यांचा विरंगुळा यात पाहत होते.

सुप्रिया, या अत्यंत नाजूक काळात मला त्यांच्यासोबत राहता आले, ऐकता आले, पाहता आले. अत्यंत अनमोल मार्गदर्शन. एका अर्थाने आयुष्याचे नवनीत ते माझ्या तळहातावर ठेवीत होते. मी जेवढी माझी कुवत होती तेवढे घेत होतो.

वाईट याचे वाटते, ते सारे चित्रीत करता आले नाही की टेपही करता आले नाही. अनेक सुंदर प्रसंग, सुंदर मूड्स मी टिपू शकलो नाही. आम्ही चुकूनही राजकारणावर बोलत नसू. पण इतिहास, तत्त्वज्ञान, संरक्षण, वाङ्मय, शिल्प, चित्रकला, संगीत कितीतरी विषयांवर ते बोलले मनापासून. मनाने निवृत्त झालेले साहेब मला नव्या माार्गाला घेवून आले. ते भेटले नसते तर मी कोणत्या दिशेने केला असता प्रवास? कदाचित ताडमाडासारखा वाढलो असतो, पण कोणाच्या उपयोगाचा राहिलो असतो की नाही ते मला सांगता येणार नाही. तुझी, तुझ्या बाबांची साधी ओळख तरी झाली असती का? माझी वाटचाल मी पाहतो नि खरेच मी इथवर आलो ते या माझ्यावर प्रेम करणाऱ्या ज्येष्ठांमुळे. साहेबांच्या उन्मळून गेलेल्या मनाला चार घटका हसवू शकलो. त्यांचे बोलणे शेअर करू शकलो. माझे आयुष्य समृद्ध झाले. आणखी काय लिहू?

ती. सौ. वहिनींना, बाबांना सप्रेम जयभीम.

तुझा,
लक्ष्मणकाका

दिनांक ०५/११/२०१२

चि. सुप्रिया,

सप्रेम जयभीम.

पुण्याच्या दैनिक सकाळमधून 'बंद दरवाजा' नावाने सदर मी सुरू केले होते. हे यापूर्वी तुला मी सांगितले आहे. ते सदर खूपच गाजले. भटक्याविमुक्तांचे जग लोकांसमोर मराठीत पहिल्यांदाच येत होते. प्रचंड प्रसिद्धी मिळाली. सकाळचे संपादक श्री.ग. मुणगेकर, सदा डुंबरे, अरुण खोरे, वा.दा. रानडे या सकाळमधील मित्रांनी फार मोलाचे सहकार्य केले. मी वर्षभर मुक्तपणे लिहिले. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात, दऱ्याखोऱ्यांत, वाड्यावस्त्यांवर, तांड्यावरून मिळेल त्या कागदावर मी मजकूर लिहीत असे. तो लिहिलेला मजकूर एस.टी.ने ड्रायव्हरमार्फत स्वारगेटच्या स्टँडवर पाठवत असे. अरुण खोरे तेथून तो मजकूर सकाळमध्ये नेहत असे. तसा तो वाचकांपर्यंत जात होता. या सर्व काळात माझ्यासारखेच हे सारे मित्र झपाटून गेले होते. रविवार सकाळच्या पुरवणीची केवढीतरी जागा मुणगेकरसर मला देत होते. या सर्व लेखांचे पुस्तक तयार करण्याचे व प्रकाशन करण्याचे 'ग्रंथाली'चे दिनकर गांगल यांनी मनावर घेतले. पुस्तक उत्तम तयार झाले. माझे मित्र संजय पवार यांनी उत्तम कव्हर केले. पुस्तकाच्या प्रकाशनासाठी चव्हाणसाहेबांना बोलावण्याचे ठरले. त्यावेळी मी डॉ.बाबा आढावांसोबत म. फुले समता प्रतिष्ठानचा सरचिटणीस म्हणून काम करीत होतो. बाबांना ही कल्पना सांगितली. त्यांनीही तात्काळ मान्य केली. म. फुले समता प्रतिष्ठान, भटक्याविमुक्त जमाती संघटना यांच्यामार्फत पुस्तकाचे प्रकाशन ठरले. चव्हाणसाहेबांच्या कानावर घातले. चव्हाणसाहेबांनी पुस्तक प्रकाशनाचे निमंत्रण आनंदाने स्वीकारले.

पुण्यातल्या इतिहास संशोधक मंडळाच्या सभागृहात प्रकाशन होणार होते. हॉल कार्यकर्त्यांनी पूर्ण भरलेला. जाणकारांचीही बऱ्यापैकी हजेरी. कार्यकर्त्यांनी आपली मनोगते सभेपुढे मांडली. मीही दोन शब्द बोललो. सभेचे अध्यक्ष डॉ. बाबा आढाव. चव्हाणसाहेबांनी पुस्तकाचे प्रकाशन केल्याचे जाहीर केले.

व्यासपीठावर बाबा, साहेब, मी, प्रमुख कार्यकर्ते, समोर विनायकराव कुलकर्णी, सदा डुंबरे, वा.दा. रानडे, अरुण खोरे आणि कितीतरी जण. साहेबांच्या सोबत आलेले त्यांचे भाचे शामराव पवार आणि रामभाऊ जोशी, सारे उत्सुकतेने साहेब आता काय बोलणार म्हणून लक्ष देऊन ऐकायला तयार. सारे सभागृह कमालीचे शांत. टाचणी पडली तरी आवाज येईल, सारे व्यासपीठावर नजरा खिळवून होते. चव्हाणसाहेब माईकच्या पुढ्यात उभे नि:शब्द, अत्यंत करुण, गंभीर चेहरा, बोलण्यासाठी ओठ उत्सुक, पण तोंडातून शब्द फुटेना. डोळ्यांतून नुसत्या धारा वाहत होत्या. सारे श्रोतेही अचंबित होऊन समोरचे दृश्य पाहत होते. साहेब मुक्तपणे रडत होते. सारे सभागृहच कारुण्याने भरले होते. बाहेर आकाशात प्रचंड ढग जमले होते. भरदुपारी विजांचा कडकडाट चालू होता आणि जाहीर सभेत चव्हाणसाहेबांचा अश्रुपात सुरू होता. सभागृहात कमालीचे गरम होत होते. साहेबांनी स्वत:ला सावरले आणि बोलू लागले, ''काय बोलावे या ग्रंथाबद्दल? अपराध्याच्या पिंजऱ्यात उभे असल्यासारखे वाटते. जो समाज लक्ष्मणने या ग्रंथात उभा केलाय तो मला नवा नाही, पण यासाठी काही करता आले नाही. विसरून राहून गेले असे म्हणून पळता येत नाही. मी कर्ता होतो, आणि म्हणूनच अधिक खजिल व्हायला होते. राहून गेले नाही, राहिले हे वास्तव आहे. आता उरलेले आयुष्य लक्ष्मणच्या या प्रश्नासाठी द्यायचे आहे, हा मनाचा निर्धार आहे.''

आता साहेब मोकळे झाले होते, सावरले होते ते मोकळेपणाने बोलू लागले, ''वडार, कैकाडी, रामोशी, कोल्हाटी यांच्याच तर वाड्यावस्त्यांत आम्ही लहानाचे मोठे झालो. कितीतरी रामोशी समाजातले सहकारी सत्याग्रहात तुरुंगातही सोबती होते. आणि सर्व जातीजमातींचा 'सामाजिक दस्तऐवज' या ग्रंथरूपाने लक्ष्मणने मराठी सारस्वतापुढे मांडला आहे. साऱ्यांचे डोळे उघडले असतील इतके अंजन त्यांनी आम्हां कर्त्यांच्या डोळ्यांत घातले आहे. भाषेच्या संबंधी सर्वांनीच त्यांची प्रशंसा केली आहे. पण एक अनुभव सांगतो, मी दिल्लीवरून या पुस्तकाच्या प्रकाशनाला येत होतो, ग्रंथ हातात होता, पुन्हा पुन्हा वाचत होतो. वाडे, तांडे, बिऱ्हाडं, गाढव, कुत्री, माणसे, झोपडपट्ट्या, चिंध्या पांघरलेली खोपटी. सारे डोळ्यांपुढून हलत नव्हते. एवढी चित्रमयता लक्ष्मणच्या भाषेत आहे. हे सारे डोळ्यापुढून सरकत असताना कानावर कुत्रे ओरडल्याचा आवाज येऊ लागला. मला या ग्रंथाने झपाटून टाकले होते. वाटले, कोण ताकद आहे या ग्रंथाची. नजरेसमोर चित्र उभे राहतेच पण कानावर कुत्र्यांचे आवाजही येतात. फार कौतुक वाटले. पुस्तक मिटले आणि तंद्री लावून डोळे मिटून बसलो, तरीही कानावर कुत्र्याचा आवाज येतच होता. विमानात कुत्रे कुठून येईल! माझं कुतुहल जाग

झाले, ग्रंथ बाजूला ठेवला आणि बाथरूमच्या निमित्ताने उठलो आणि बाथरूमकडे जाऊ लागलो. तर माझ्याच थोडेसे मागच्या सीटवर एक गोऱ्या गोमट्या मध्यमवयींन बाई आपल्या कुत्र्यासमवेत विमान प्रवास करीत होत्या. त्यांच्या पांढऱ्याशुभ्र केसाळ कुत्र्यासाठी स्वतंत्र सीट! ते कुत्रे त्या कुरवाळीत होत्या आणि ते आवाज काढीत होते. मी पुढे जायचा मागे वळलो. जागेवर येऊन बसलो. आणि एक प्रचंड अपराधीपणाची भावना माझ्या मनात दाटून आली. ती अजूनही जात नाही. एका बाजूला अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य, शिक्षण या प्राथमिक गरजा पुऱ्या होत नाहीत म्हणून जनावरांच्या पातळीवर जगणारी या ग्रंथातली माणसे. एकमेकांना दारिद्र्याने ग्रासल्याने खाऊ की गिळू करून संतापून भंडणारी, पंचायती बसवणारी माणसे, लक्ष्मण मानेंनी अतिशय समर्पक भाषेत आपल्या समोर मांडली आहेत. ही माझी माणसे माझीच आहेत. या दोघांतले जीवघेणे अंतर आता आम्ही कसे मिटवणार आहोत? श्रीमंतीला काही मर्यादा आहे काय? बाबा, आम्ही खूप काही केल्याचा गर्व मला असे, पण ही दोन टोके पाहिली की मनाच्या चिंध्या होतात, उद्ध्वस्त होतो. स्वातंत्र्य काय यासाठी मिळवले होते? पंडितजींनी पाहिलेला समाज काय असा होता? बाबा, याचे दु:ख होते की आता राजकारण गरिबांचा हक्क राहणार नाही. तो पैसेवाल्यांचा खेळ केव्हाच झाला आहे. ज्या बहुजनांसाठी, त्यांच्या सुखी संसारासाठी लोकशाही स्वीकारली. तो विचारच विमानातून फिरणाऱ्या या वर्गाला भिडत नाही. याचे मला अत्यंत यातना देणारे दु:ख होते. जेव्हा हातात होते तेव्हा काही करण्याचा प्रयत्न जरूर केला, पण तो अत्यंत अपुरा आहे. मी निराश बिल्कुल नाही. ज्या समाजात माणूसपणाची जाणीव नाही, तेथे स्वत्व कसे येईल? ते येऊ लागले याचा इसार हा ग्रंथ आहे, आणि यांचे शिक्षण हा इलाज आहे. मी, तुम्ही आपण साऱ्यांनीच या वर्गाच्या शिक्षणाकडे आईच्या मायेने पाहणे आवश्यक आहे. मी लक्ष्मणशी यासंबंधी बोललो आहे. आपण सर्वांनी एक काम एकत्र करण्याचा निर्णय केला आहे, या वर्गाच्या शिक्षणाला पर्याय नाही. उरलेल्या काळात हे काम अंगावर घ्यायचे आहे, चांगला संच जमला आहे. भटक्याविमुक्तांच्या नव्या जाणिवांनी उभ्या राहणाऱ्या या मुलांच्या पाठीशी आपण ठामपणे उभे राहू, आणि यांच्या पुढच्या पिढ्या तरी नक्कीच सुजाण होतील यासाठी आपण काम करायला लागेल. लक्ष्मण माने यांना लागेल ती मदत या कामात करण्याचे मी ठरवले आहे. मराठी भाषा, साहित्य या निमित्ताने समृद्ध होत आहे याचाही मला तेवढाच आनंद आहे.''

अत्यंत भारावल्या शब्दांत बाबांनी या सभेचा समारोप केला. माझ्या पाठीशी उभे राहण्याचे त्यांनीही जाहीर केले. आमच्या संस्थेच्या कामाला गती मिळाली

होती. सभा संपली, साहेब मला म्हणाले, 'लक्ष्मण, एका अत्यंत चांगल्या मित्राला मी भेटून आलोय. आपल्या कामासंबंधी त्यांच्याशी बोललोय.' मी कुतूहलाने विचारले कोण? ते म्हणाले, अण्णासाहेब शिंदे, माजी मंत्री, माझे सहकारी होते. फार मोठ्या मनाचा माणूस आहे. इकडे येण्याअगोदर मी त्यांच्याकडेच होतो. आपल्या या प्रश्नाची मोठी जाण आहे. एकदा जाऊन भेटून ये, आवडतील तुला. मी गाडीपर्यंत पोचवायला निघालो होतो. बरोबर शामराव पवार, रामभाऊ जोशी होते. दारातून बाहेर पाऊल पडले आणि प्रचंड कडकडाट करीत मुसळधार पाऊस सुरू झाला. गाडीपर्यंत जाईपर्यंत साहेब पावसाने चिंब भिजले. मीही भिजलो होतो. ते गाडीत बसले. हात हातात होता. पावसाचे बरसणे सुरू होते. साहेबांनी दिल्लीला यायला सांगितले. ही माझी-त्यांची नियतीने शेवटचीच भेट घडवली होती. हे आम्हा दोघांना ठाऊक नव्हते. काळ अनंत असतो, अनादि असतो, आणि तो निष्ठुरही असतो. त्यानंतर त्यांचे-माझे बोलणे झाले, ते सोलापुरातून दिल्लीला मी येऊ का म्हणून विचारत होतो. ते आजारी होते. मला म्हणाले, चिंता कसली करता? मी दोन दिवसात बरा होईन. येण्याची गरज नाही. पण साहेब पुन्हा भेटलेच नाहीत. त्यांनी दिलेली जबाबदारी मी यथावकाश पार पाडीत आहे. त्या कार्यक्रमाला गं.ना. जोगळेकर उपस्थित होते. पुण्यातले मोठमोठे विद्वान गृहस्थ सभेला होते. सारे माझे अभिनंदन करीत होते. बाबांनी त्या दिवशी केलेले भाषणही मोठे विलक्षण होते. चव्हाणसाहेबांना त्यांनी सांगितले, साहेब, आता गर्दी हटली आहे. पांगापांग सुरू आहे. हात ओला करण्याची शक्ती होती. तोवर भुते होती. त्यावर बाबांना टाळी देत चव्हाणसाहेब म्हणाले. बाबा, खरे सांगू, सोने पांघरून चिंध्या विकत होतो. गर्दी हटता हटत नव्हती. आता चिंध्या पांघरून सोनं विकतोय कुणी फिरकता फिरकत नाही. हा जगाचा शिरस्ता आहे. सारे संचित आपण या दुबळ्यांमागे उभे करूया. लक्ष्मण, हे काम कसे करणार मला समजत नाही. काळ मोठा विपरीत आहे. ही वाऱ्यावरली वरात, ही वाऱ्यावर उधळलेली पाखरे हा कशी गोळा करणार ठाऊक नाही. मी आशीर्वाद तर देतोच आहे, पण त्याने भागणार कसे?

साहेब, आपले आशीर्वाद लक्ष्मणला मिळाले ही फार मोठी गोष्ट आहे.

साहेब डोळे पुशीत होते. बाबांना फार कमी वेळा मी हळवे, कातर होताना पाहिले आहे. तेही डोळ्यांच्या कडा पुशीत होते.

सुप्रिया, एस.एम.नीही असेच डोळ्यांनी मला आशीर्वाद दिलेत. आज दिसणारा संस्थेचा परिसर अथक कष्टाने उभा केलाय. तो काही कुबेराच्या धनावर उभा नाही. तो एस.एम., यशवंतराव, बाबा यांच्या आशीर्वादांच्या बळावर उभा

आहे. प्राण कंठात असेपर्यंत मी माझे ध्येय सोडणार नाही. या दुबळ्यांच्या पाठीमागे सारा समाज उभा करीन. शब्दांनीच पेटतात घरेदारे, नि माणसे हे ठाउक आहे मला. जसे जीवभावाचे मित्र असतात, जीवाला जीव देणारे. तसे विरोधकही असतात धार लावून तलवारींना, ठाऊक आहे मला. कोणत्याही संकटाची पर्वा न करता करावा लागणार आहे हा लांबचा प्रवास. पायातले बळ संपेपर्यंत चालणार आहे हा काट्याकुट्याचा रस्ता. तुझ्यासारखी तरुण पोरे आहेतच की सोबतीला. थोरामोठ्यांचे बळ हीच असते शिदोरी. त्यांना आठवावे, त्यांनी दाखवलेल्या मार्गाने चालत राहावे. यशापयशाची चिंता करून उपेक्षितांचे, वंचितांचे प्रश्न सुटत नसतात. हेही ठाऊक आहे मला. चव्हाणसाहेबांना निरोपताना सारा महाराष्ट्र दु:खसागरात बुडाल्याचे मी पाहिले आहे. लाखांच्या गर्दीत त्यांना त्यांच्या आवडत्या कृष्णाकाठावर चिरनिद्रा घेताना मी पाहिले आहे. क्वचित असे वर्ष असेल त्यांच्या जयंती-पुण्यतिथीला मी कृष्णाकाठावर गेलो नाही. आजही त्यांच्या स्मृती जागवत त्यांच्यावर मनापासून प्रेम करणारे हजारो लोक त्यांच्या समाधीवर माथा टेकवतात.

ती. सौ. वहिनींना, बाबांना सप्रेम जयभीम.

तुझा,
लक्ष्मणकाका



**पद्मश्री लक्ष्मण माने**
जन्म १ जून १९४९

'उपरा' या आपल्या पहिल्याच आत्मकथनाने मराठी साहित्यात खळबळ माजवून देणारे लक्ष्मण माने यांनी पुढे 'बंद दरवाजा', 'पालावरचं जग', 'प्रकाशपुत्र', 'विमुक्तायन', 'उद्ध्वस्त', 'भटक्याचं भारूड', 'का कराचं शिकून?', 'खेळ साडेतीन टक्क्यांचा', 'क्रांतिपथ' कवितासंग्रह अशी ललित व अभ्यासपूर्ण पुस्तके लिहिली. 'बंद दरवाजा' या मासिकाचे १२ वर्षे आणि साप्ताहिकाचे ४ वर्षे संपादन केले.

त्यांच्या पुस्तकांचा आजपर्यंत बराच गौरव झाला असून, त्यांना
साहित्य अकादमी (१९८१), बंडो गोपाळ मुकादम पुरस्कार (१९८२),
न.चिं. केळकर पारितोषिक (१९८२), भारती विद्यापीठ पुरस्कार (१९८२),
महाराष्ट्र गौरव पुरस्कार (१९९०) व महाराष्ट्र फाउंडेशन पुरस्कार (१९९८)
असे सन्मान लाभले आहेत.

याशिवाय, फोर्ड फाउंडेशन (१९९१), होमी भाभा फेलोशिप (१९८५), यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान (१९८८) यांच्या अभ्यासवृत्ती त्यांना मिळाल्या.
आदिवासी साहित्य संमेलन (१९८९) व अस्मितादर्श साहित्य संमेलन (१९८७), आंबेडकर दलित साहित्य संमेलन (२००१), समतावादी साहित्य संमेलन (२०१०) यांचे ते अध्यक्ष होते.

माने यांची घडण राष्ट्र सेवा दलात (१९७५ ते १९८०) व समाजवादी युवक दलात (१९७३-१९८३) झाली. आज ते अनेक मोठ्या प्रतिष्ठानांचे सभासद व विश्वस्त आहेत. राज्यपालांनी नियुक्त केलेले प्रतिनिधी म्हणून ते महाराष्ट्र विधान परिषदेचे सभासद (१९९०-१९९६) होते.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सर्वोत्कृष्ट व्याख्याता पुरस्कार (२००५)
महाराष्ट्र फाउंडेशनचा सामाजिक सेवा पुरस्कार (२००६)
पद्मश्री सन्मान (२००९)

**अन्य सामाजिक कार्य**

संस्थापक, एकता शिक्षण प्रसारक संस्था (१९७५ पासून)
संस्थापक, भीमाबाई आंबेडकर प्रतिष्ठान
सचीव, महात्मा फुले समता प्रतिष्ठान
संस्थापक, सामाजिक कृतज्ञता निधी
अध्यक्ष, भटक्या-विमुक्त जमाती संघटना (१९९३ पासून)
संस्थापक आणि अध्यक्ष, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ रिसर्च ॲन्ड डेव्हलपमेंट ऑफ नोमॅडिक ॲन्ड डि-नोटिफाइड ट्राइब्ज (१९८३)
सिनेटर, शिवाजी युनिव्हर्सिटी, कोल्हापूर (१९८४-१९९४)
अध्यक्ष, फुले-आंबेडकर साहित्य पंचायत (१९९०-१९९३)
संस्थापक-सदस्य आणि विश्वस्त, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई
सदस्य, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्रसाधने व प्रकाशन समिती (१९९०)
सदस्य, संस्कृती साहित्य मंडळ, महाराष्ट्र (२०००)
अविरोध सिनेटर, शिवाजी युनिव्हर्सिटी, कोल्हापूर (२०००)
अध्यक्ष, लक्ष्मण माने एज्युकेशनल ट्रस्ट (२००३)

**उपक्रम**

क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले आश्रमशाळा, करंजे, सातारा (१९८८), यशवंतराव चव्हाण प्राथमिक आश्रमशाळा, भोसरी, पुणे (१९८९), साथी एस.एम. जोशी माध्यमिक आश्रमशाळा, उकळी, सातारा (२००४), यशवंतराव चव्हाण माध्यमिक आश्रमशाळा, भोसरी, पुणे (२००४), राजर्षी छत्रपती शाहू प्राथमिक आश्रमशाळा, कोल्हापूर (१९९०), राजर्षी छत्रपती शाहू माध्यमिक आश्रमशाळा, कोल्हापूर (२००४), शारदाबाई पवार प्राथमिक आश्रमशाळा, जकातवाडी, सातारा (१९९१), शारदाबाई पवार माध्यमिक आश्रमशाळा, जकातवाडी, सातारा (१९९४), शारदाबाई पवार ज्युनिअर कॉलेज, जकातवाडी, सातारा (२००८), भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रशाळा, सोलापूर (१९९१), यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस, जकातवाडी, सातारा-शिवाजी युनिव्हर्सिटी, कोल्हापूर, संलग्न.

इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ रिसर्च ॲन्ड डेव्हलपमेंट ऑफ नोमॅडिक ॲन्ड डि-नोटिफाइड ट्राइब्ज संस्थेद्वारा महाराष्ट्रातील भटक्या-विमुक्तांचा १४ जातींचे सखोल संशोधन केले. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानतर्फे प्रसिद्ध झालेल्या या दस्तावेजाचे प्रकाशन १२ मार्च १९९७ रोजी तत्कालीन पंतप्रधान एच.डी. देवेगौडा यांच्या हस्ते झाले.

आठवणी यशवंतराव चव्हाणसाहेबांच्या आणि कथन करणारे लक्ष्मण माने. उत्तम पुस्तक होण्यासाठी आणखी काय हवे आहे?

यात माने यांनी शरद पवार यांच्या कन्या सुप्रिया सुळे यांना पत्ररूपाने या आठवणी सादर केल्या आहेत. खरे तर, हे कथन आहे सुप्रियाच्या पिढीसाठी. सुप्रिया निमित्तमात्र आहे.

यशवंतरावांचा जीवनपट विस्तीर्ण आहे व विविध पैलूंनी नटलेला आहे. त्यातील काही काळ व काही पैलू माने यांच्या वाट्याला आले आहेत. ते त्यांनी अत्यंत संवेदनशील मनाने टिपले आहेत व पत्ररूपाने सादर केले आहेत.

सध्याच्या पिढीसाठी आवश्यक व उपयुक्त असे चव्हाणसाहेबांच्यावरील लिखाण या निमित्ताने झाले आहे. यशवंतराव चव्हाण जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने निर्माण झालेला हा महत्त्वाचा दस्तऐवज आहे.

ही पत्ररूप आठवणींची साठवण मराठी वाचकांच्या सदैव लक्षात राहील.

– विनायक पाटील

ग्रंथाली